# ख्रिस्तायन

नाताळ ई - अंक ♦ वर्ष अकरावे ♦ २५ डिसेंबर २०२१ ♦ संपादक ख्रिस्तोफर रिबेलो




BASSEIN CATHOLIC
CO-OPERATIVE BANK LTD.
ESTD. 1918
(SCHEDULED BANK)
This Christmas,
May you be filled with warmth and happiness!
Merry Christmas
&
Happy New Year
Board of Directors
Ryan Fernandes
Chairman
Manvel Lopes
Vice Chairman
Sixto Fargose
General Manager
Roshan Pereira
General Manager
Head Office : Catholic Bank Building, Papdy Naka, Papdy, Vasai West, Dist. Palghar - 401 207, Maharashtra
Board Lines : 9527441600 / 9527451600 / 9527461600 / Toll Free : 1800-266-2407 | www.bccb.co.in

# ख्रिस्तायन

नाताळ ई-अंक    वर्ष अकरावे    २५ डिसेंबर २०२१

## संपादक : ख्रिस्तोफर रिबेलो

**सहसंपादक : एडवर्ड डिसोजा**    **तांत्रिक सहकार्य : स्वप्निल रिबेलो**

**विशेष साहाय्य : स्मिता ख्रि. रिबेलो, पायस तुस्कानो, मिल्टन परेरा**

**मुखपृष्ठ : पॉल डिमेलो, गास**

**संपर्क / अभिप्राय :** आमच्याशी संपर्क साधावयाचा असल्यास आणि आपल्याला काय आवडलं, काय नाही ते आम्हाला कळवण्यासाठी खालील पत्त्यांवर ई-मेल करा वा फोन करा.

chrisrtayan25online@gmail.com (9819436078)

**आभार : आमचे सर्व लेखक, कवी, हितचिंतक व प्रसिद्धी देणारे सर्व प्रसार माध्यमे यांचे " ख्रिस्तायन" तर्फे मन:पूर्वक आभार व नाताळ आणि नव वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा.**

या अंकात प्रसिद्ध झालेल्या मताशी संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही

**© सर्व हक्क लेखक व कवींच्या स्वाधीन**

# अंतरंग ...

## संपादकीय...

## कथा / ललित लेख :-


श्रद्धेला जोड संस्कृतीची ... - आर्चबिशप फेलिक्स मच्याडो

जन्मोत्सव - फा. फ्रान्सिस दिब्रिटो

पाण्याचा पैसा पाण्यात (विज्ञान कथा) - जोसेफ तुस्कानो

चार अति लघुकथा - सायमन मार्टिन

काष्ठशिल्पकार सिक्वेरा बंधू ... - ख्रिस्तोफर रिबेलो

वस्तू - वर्जेश ईश्वरलाल सोलंकी

देवाची भाषा कंची...? - जॉन कोलासो

रम्य ते बालपण! - रेमंड मच्याडो

वसईच्या पत्रकारितेतील भीष्म - अनिलराज रोकडे

जीवन सम्राट येशू - फा. डॉ. एलायस रॉड्रिग्ज

मुक्त चिंतन - डॉ. नरेश नाईक

तीन राजांचे तीर्थस्थान - प्रा. स्टीफन आय परेरा

शिक्षक आणि वैज्ञानिक दृष्टिकोन - फ्रान्सिस आल्मेडा सर

गटाराच्या पाईपातील ख्रिस्तजयंती - फादर मायकल जी

आऊ - प्रा. नेहा किशोर सावंत

एका श्रद्धावंताची रोमयात्रा - ज्युलियस (दीपक) मच्याडो

'थँक यू ! - कामिल पारखे

मी, माही वसई आणि कोळीगीतं.. - अतुल काटदरे

MPSM: धर्मापलिकडचा धर्म - फा. वेन्सी डिमेलो

कोरोनाचे बळी - पौलस वाघमारे

आमचेही अभिव्यक्ती स्वातंत्र्य! - स्टॅन्ली गोन्सालवीस

मला कोणीच विचारत नाही...! - आशिष शिंदे

सुख-दुःखात मी तुझ्याशी एकनिष्ठ ... - सिडनी जस्टीन मोरायस

स्पेशल ९०.... (क्राईम कथा) - सुहास बिऱ्हाडे

न्याय की निकाल ? - अतुल आल्मेडा

ग्रंथ आमचे साथी, ग्रंथ आमचे हाती - जॉन गोन्सालवीस

आज मुक्तीचा चंद्र उगवला - ॲन्थनी परेरा

वसईतील सामाजिक राहणीमान - वैष्णवी विवेकानंद राऊत

संस्कृती संपन्न वसईची लोकगीते - मेलविन डाबरे

अंक पहिला - विलास पागार

काळ्या ढगाआड... - ॲलेक्स मच्याडो

कोरोना नि करुणा - बर्नर्ड लोपीस

सूटकेस - अमर म्हात्रे

कोविड, वसईकर आणि भवितव्य - प्रकाश आल्मेडा

हम्पी सफरनामा - शेखर सदाशिव जोशी

अभागिनी - बॅप्टिस्ट एम वाझ

आज सोचा तो...... - मॅक्सवेल लोपीस

आनंद - एमेल आल्मेडा

माझा IISc (भारतीय विज्ञान संस्था) चा प्रवास - सिद्धेश नाईक

बारदानी कुटुंबे - पॅट्रिक कोरिया

वसईला वाचविताना... - मॅकेन्झी डाबरे

ख्रिस्ती धर्मगुरू व सामाजिक कार्य - फादर असिस रॉड्रिग्ज

परदेशस्थ श्रावणबाळ - डॉ. नेन्सी विन्सेंट डिमेलो

तुटला धागा, गळले मोती - सौ. सुनिता बर्नड परेरा

निवड - आशा (पेट्रेशिया) गोन्सालवीस

प्रतिफळ - फ्रँक डॉ. मिरांडा

सांजसावल्यातील तेज - डॉ. नेन्सी विन्सेंट डिमेलो

पश्चिमेकडची गोष्ट - मुकेश माचकर

बाळ जन्मला - क्लेमेंट डिमेलो

एक गोड आठवण - चार्ली रोझारिओ

कथा आमच्या टोबीची - कल्पना रॉड्रिग्ज

वसईचं पाणी - ऑल्विन रॉड्रीग्ज

श्रद्धा - भरत  वाळींजकर

खेळ नियतीचा कुणा न कळे... - अशोक बाप्टीस्टा डिब्रिटो

ख्रिस्ती लोकांसाठी वारसा हक्क कायदा - अ‍ॅड. अनिल डिसोजा

माझा गायन प्रवास - विजय मच्याडो

एका सत्याचा उलगडा - मेल्सीना तुस्कानो

संस्कृती डोळसपणे जपू या - एडविन डाबरे

वाडवळी लगीन - विनिता अजय राऊत

करोना आणि वसईकर - विजय तुस्कानो

पदर - आयवन डिकुन्हा

## कविता / चारोळया :-

वर्जेश ईश्वरलाल सोलंकी, महेश लिलापंडित, सबिना फोस,
ॲलेक्स मच्याडो, पुरुषोत्तम पवार, सचिन मेंडिस,
शकुंतला नारायण पाटील, आयवन क्रास्टो,
जिम (फिलीप) रॉड्रिग्ज, एलिजाबेथ गोन्सालवीस,
फ्रान्सिस गावद्या, आशा (पेट्रेशिया) गोन्सालवीस,
ब्रिनल कुडेल, ब्रायन मेंडिस, जयेश प्रदीप घरत

## कलाकुसर :-

चार्ली कोरिया, अमर म्हात्रे, ऑस्टिन डाबरे,
रॉयल बॅप्टिस्ट रॉड्रिग्ज,ऑल्विन कोरिया, ऑल्विन परेरा,
सेलिना कोरिया

# संपादकीय ...

प्रिय वाचक मित्र-मैत्रिणींनो, सर्वप्रथम नाताळ सणाच्या हार्दिक शुभेच्छा.

ख्रिस्ती धर्मीयांचा हर्षोल्लासाने भरलेला सण म्हणजे नाताळचा सण. मी प्रत्येक वर्षी संपादकीयमध्ये या गोष्टीचा आवर्जून उल्लेख करतो आणि करत राहीन की दिवाळी सण आणि दिवाळी अंक हे जसे अतूट नाते आहे तसेच नाताळ सण व नाताळ अंक यांचे नाते व्हावे असे आमचे स्वप्न आहे आणि ते आम्ही १९ वर्षाअगोदर प्रथम छापील स्वरुपात अंक प्रकाशित करून प्रत्यक्षात आणि गेली अकरा वर्षे हा अंक ऑनलाइन प्रकाशित करून ते पुढे नेण्याचा प्रयत्न करत आहोत.

मंडळी, यावर्षी हा अंक 'वसई स्थानिक संस्कृती विशेषांक' म्हणून प्रकाशित करण्याचा मानस गेल्या वर्षीच्या अंकातच जाहीर केला होता. पुर्णपणे नाही तर काही अंशी तो पार करण्यात यश आले आहे आणि वसईच्या संस्कृतीची माहिती देणारे, वसईतील विविध समाजाचे दर्शन घडविणारे, त्या विविध समाजातील चालीरीती, परंपरा तसेच दैनंदिन जीवन, वसईच्या समस्या याची माहिती देणारे विविध लेख या अंकात आले आहेत. वसईतील अनेक मान्यवर विविध क्षेत्रात चमकले आहेत, माणिकपूरचे आनंद मिनेझिस ऑलिंपिकमध्ये भारत देशाचे प्रतिनिधित्व करतात तर दरपाळे येथील स्वप्नील पाटील आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये यूएई संघाकडून प्रतिनिधित्व करतो. आमचे मित्र मेल्विन डाबरे यांनी आपले आयुष्यच जणू संगीत क्षेत्राला वाहिले आहे, रिदम वसईकर ही त्यांची संस्था यंदा रौप्यमहोत्सव साजरा करत आहे. मित्र सेविन तुस्कानो बॉलीवुडचा चित्रपट दिग्दर्शित करतो. इतरही खूप असे कलाकार जे आमच्या वसईची पताका उंच फडकवत आहेत, माझ्या वसईतील वाचक सहकाऱ्यांना या अंकाद्वारे नम्र विनंती आहे की कृपया पुरेशा माहितीअभावी मी या सर्वांचा धांडोळा या अंकात घेऊ शकलो नाही त्यामुळे कृपया आपल्या निदर्शनास किंवा माहितीमध्ये असे जे कलाकार, खेळाडू आणि इतर नामवंत असतील त्यांची विस्तृत माहिती या अंकात दिलेल्या आमच्या ईमेल आयडीवर किंवा फोन वर जरूर पाठवावी.

या अंकात वसई ख्रिस्ती समाजाचे मेंढपाळ आर्चबिशप डॉ. फेलिक्स मच्याडो यांनी संकृतीचे विविध पैलू उलगडून दाखवताना वसईतील विविधतेत एकता असलेल्या संस्कृतीचा ऊहापोह केला आहे.

९३व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांनी येशूजन्म काव्यात्मक बोलीतून सुंदरपणे उधृत केला आहे. पाणी उपशाचा कसा गंभीर परिणाम होऊ शकतो हे ज्येष्ठ विज्ञान लेखक जोसेफ तुस्कानो त्यांच्या विज्ञानकथेत उत्कृष्टरीत्या कथित केले आहे. जीवनाचे विविध रंग चार लघुकथेद्वारे ज्येष्ठ कवी सायमन मार्टिन यांनी उलगडले आहेत. जगभरात प्रसिद्ध व वसईचे भूषण असलेल्या काष्ठशिल्पकार 'सिक्वेरा बंधू' विषयी मला स्वत:ला लिहायला मिळाले आणि त्यांच्या भेटींद्वारे वैयक्तिक स्नेह प्रस्थापित झाला हे माझे भाग्य समजतो.

एखादी 'वस्तू' घेताना काय काय करावे लागते याचं सुरेख विश्लेषण वर्जेश सोलंकी यांनी केलं आहे. कोण कोणतीही भाषा बोलत असो परंतु प्रत्येक मानवी भाषा ही देवाची भाषा आहे असे प्रतिपादन म. टा. चे माजी उपसंपादक जॉन कोलासो हे त्यांच्या लेखात करतात. साठ-सत्तरच्या दशकातील निसर्गसंपन्न वसईचे दर्शन रेमंड मच्याडो त्यांच्या बालपणातील आठवणी सांगताना करतात. वसईच्या पत्रकारितेतील भीष्म अँण्ड्र्यू कोलासो यांचा जीवनपट ज्येष्ठ पत्रकार अनिलराज रोकडे यांनी थोडक्यात उधृत केला आहे. येशू आपला जीवन सम्राट आहे असे फा. एलायस रॉड्रिग्ज सांगतात. डॉ. नरेश नाईक माणसाच्या खऱ्या ओळखीविषयी मुक्त चिंतन करायला लावतात तर बाल येशूला भेट देणाऱ्या जर्मनीतील कोलोनगावी असलेल्या तीन राजांविषयी प्रा. स्टीफन आय परेरा माहिती देत आहेत.

शिक्षकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन असावा आणि तो त्यांनी शिकवताना विद्यार्थ्यांना कसा देता येईल याचा ऊहापोह फ्रान्सिस आल्मेडासर यांनी सांगितला आहे. तर सामाजिक कार्यकर्त्याला त्याच्या मेहनतीचे फळ मिळतेच असे फा. मायकल जी. त्यांच्या सुंदरशा कथेतून सांगताहेत. सुनिती जैन ते मॅडम ते आऊ हा नात्यामधला प्रवास कसा झाला हे सांगण्याचं काम प्रा. नेहा सावंत यांनी केलं आहे. दीपक मच्याडो यांनी त्यांच्या रोमयात्रेचे फोटोंसह सुंदर प्रवासवर्णन केले आहे. कामिल पारखे धन्यवादासाठी भाषेचा अडसर कधीही नसतो हे त्यांच्या लेखातून प्रकट करत आहेत. अतुल काटदरे हे कोळीगीतांसोबत असलेलं त्यांचं नातं विविध गीतांच्या दाखल्याद्वारे दाखवताना संपूर्ण कोळीवाड्याचीच सैर घडवून आणली आहे. धर्मापलिकडच्या धर्माच्या सेवाकार्याचा अनुभव फा. वेन्सी डिमेलो महाराष्ट्र प्रबोधन सेवा मंडळाच्या कार्याद्वारे व्यक्त करतात. पौलस वाघमारे त्यांच्या कथेतून कोरोना काळातील विदारक परिस्थितीचे वर्णन करतात. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे विविध कंगोरे स्टॅन्ली गोन्सालवीस यांनी मस्तच उलगडले आहेत.

आशिष शिंदे व सिडनी मोरायस यांचे अनुभव, सुहास बिऱ्हाडे यांची क्राइम कथा, ॲड. अतुल आल्मेडा यांचा न्यायालयीन प्रकियेवरील लेख, जॉन गोन्सालवीस यांचा ग्रंथांवरचा लेख, अँथनी परेरा यांचा एएवरील लेख, वैष्णवी राऊत यांचा वसईच्या विविध समाजाची माहिती देणारा लेख, नाटक क्षेत्रातील विलास पागार यांचे अनुभव, ॲलेक्स मचाडो यांची भावस्पर्शी कथा, बर्नर्ड लोपीस यांचे कोरोना काळावर विवेचन करणारा लेख, अमर म्हात्रे यांनी सांगितलेली सत्यकथा, करियर गुरु प्रकाश आल्मेडा यांचा कोरोनानंतरच्या भवितव्याचा वेध घेणारा लेख, शेखर जोशी यांची हम्पी भ्रमंती. बॅप्टिस्ट वाझ यांची हृदयद्रावक कथा, मॅक्सवेल लोपीस यांनी घेतलेला मदनमोहन यांच्या संगीताचा धांडोळा, देण्यात आनंद आहे हे सांगणारा एमेल आल्मेडा यांचा लेख, सिद्धेश नाईक यांचा भारतीय विज्ञान संस्थेतील प्रवास, पॅट्रिक कोरिया यांनी सांगितलेली बारदानी कुटुंबाची माहिती, मॅकेन्झी डाबरे यांनी वसईला वाचविताना कराव्या लागणाऱ्या खटापटी, फा. असिस रॉड्रिग्ज यांनी ख्रिस्ती धर्मगुरूंचे सामाजिक कार्य याचे केलेले विवेचन तसेच नवोदित तथा मान्यवर कवींच्या कविता व लेख आणि हाडाचे कलाकार असलेल्या चित्रकारांच्या कलाकृती या सर्वांचा या अंकात समावेश आहे.

अंकात समावेश असलेले मान्यवर लेखक-कवी यांना मी दरवर्षी लिहायला सांगून त्रास देत असतो, पण आजपर्यंत एकाही व्यक्तीने नकार दर्शविला नाही. मानधनाची अपेक्षा न करता फक्त या उपक्रमाला साथ म्हणून माझ्या विनंतीला मान देऊन या प्रवासात मला सोबत करतात, म्हणूनच हे सर्व सुहृद मला माझे कुटुंबियच वाटतात. मी हक्काने मागतो आणि ते देतात. मी या सर्वांच्या सदैव ऋणात राहू इच्छितो.

आम्ही हा अंक ‘पीडीएफ’ स्वरुपात देत आहोत, त्यामुळे आपणास अंक वाचण्यासाठी पूर्ण वेळ ऑनलाइन असण्याची गरज नाही. त्याचबरोबर या अंकाचे अँड्रॉईड ॲपही आहे. प्ले स्टोअर वरुन आपण हा अंक डाऊनलोड करून नंतर आपल्या सोयीप्रमाणे अगदी मोबाईलवरही वाचू शकता. आपण हा अंक वाचल्यानंतर इतरांनाही कळवा.. आणि आपल्या सूचना आणि अभिप्रायांची देखील आम्ही वाट पाहत आहोत.

**नाताळ सणाच्या व नव वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!!!**

**Merry Christmas & Happy New Year.**

# श्रद्धेला जोड संस्कृतीची व संस्कृतीला आधार श्रद्धेचा !

**■ + आर्चबिशप फेलिक्स मच्याडो, वसई धर्मप्रांत**

"संस्कृती" (Culture) हा शब्द फ्रेंच शब्दापासून आला आहे, ज्याचे मूळ "colere" ह्या लॅटिन भाषेतील शब्दात आहे. Culture म्हणजे मशागत करणे. जसे मातीतून उगवलेले रोपटे पृथ्वीच्या दिशेने झुकते आणि वाढते, भाताच्या रोपाची मूठ लागवड (आवणी) केल्यावर आपण त्याची मशागत करतो, त्याप्रमाणे जीवनाच्या मशागतीला "संस्कृती" हा शब्द वापरतात. मग त्याचा व्यापक अर्थ रूढ होऊन माणसाच्या जीवनाला समजून घेण्याचा प्रयत्न होत राहिला.

आपण संस्कृतीसह जन्माला येत नाही. परंतु, एका विशिष्ट संस्कृतीत आपण जन्म घेतो. मग जन्म घेतल्यापासून आपण "संस्कृती" आत्मसात करीत असतो. संस्कृती ही एक गोष्ट आहे जी आपण अखंड व मरेपर्यंत शिकतो. तथापि, हे आपण कधीच विसरता कामा नये की, संस्कृती आपल्याला समजते तेवढीच, दिसते तेवढीच नसून ती अधिक व्यापक आहे. मानवाच्या अंतमनात शिरून सारासार जीवनाचा शोध घेण्यासाठी संस्कृती हे प्रवेशद्वार ठरते. संस्कृती ही स्थिर नसून एक गतिशील, क्रियाशील व प्रक्रियात्मक संकल्पना आहे. बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेत संस्कृती वाढत राहते.

संस्कृतीचे काही पैलू ही आपली ओळख आहे; वांशिकता, वय किंवा पिढी; व्यवसाय आणि सामाजिक - आर्थिक स्थिती, भाषा, अभ्यास, शिक्षण, चिंतन, इ. संस्कृतीचा वापर आपल्या जीवनशैलीचे वर्णन करण्यासाठी आणि आपण दैनंदिन जीवनात वापरत असलेली मूल्ये, श्रद्धा, धर्म आणि प्रवृत्ती यांचे वर्णन

करण्यासाठी देखील केला जाऊ शकतो. संस्कृतीच्या काही व्याख्या कला, धर्म, खाण्याच्या सवयी, बोली भाषा, पेहराव, अन्न, निवास, वाहतूक, पैसा, हवामान, जीवनशैली, विधी, विनोद, विज्ञान, कायदा, खेळ, समारंभ इत्यादींवर लक्ष केंद्रित करतात.

एका संस्कृतीला दुसऱ्या संस्कृतीपेक्षा उच्च किंवा कमी, दुसऱ्यापेक्षा चांगली किंवा वाईट, दुसऱ्यापेक्षा मोठी किंवा लहान म्हणून प्रक्षेपित करणे चुकीचे आहे. संस्कृती आपणास जोडणारी असली पाहिजे, तोडणारी नाही. संस्कृतीचा गैरवापर एक शस्त्र म्हणून सुद्धा होऊ शकतो. दुर्दैवाने तसा गैरवापर होतो. विशिष्ट संस्कृतीमुळे समाजात गट पडू नयेत, दुफळी माजू नये ह्यासाठी आपण सतर्क राहीले पाहिजे. देशात, समाजात, चर्चमध्ये माणसं जोडली गेली पाहिजेत.

संस्कृती संपूर्ण मानवी कुटुंबाला पूरक असली पाहिजे, एक दुसऱ्याच्या विरोधात नाही, स्पर्धेत तर मुळीच नाही. प्रत्येक संस्कृती स्वतःच्या पायावर उभी असते. आणि ती संस्कृती एक दुसऱ्यापासून सुव्यक्त असली तरी ती अलग नसते. म्हणून संस्कृतींमध्ये परस्परसंबंध, आंतरप्रवेश आणि परस्परसंवाद नाही असे समजायचे नाही. निरनिराळ्या संस्कृती एकमेकांना आधार देऊ शकतात आणि काही वेळा, परस्पर संबंधाने निरनिराळ्या संस्कृती अधिक सात्विक व अजून समृद्ध बनू शकतात. संस्कृती निर्जीव गोष्ट नसून ती जिवीत किंवा सजीव आहे. म्हणून संस्कृती सातत्याने वाढत राहते, काळानुरूप बदलत राहते. जे अयोग्य आहे, त्याला तिलांजली देत संस्कृती चांगल्या गोष्टींचा समावेश करून घेते.

संस्कृतीतील सर्वच गोष्टी (पद्धती) जीवन फुलविणाऱ्या, जीवन संवर्धक किंवा जीवनाला अनुकुल असतातच असे नव्हे. जसे भौतिक जीवन एकाचवेळी प्रकाशकिरणांनी आणि अंधारमय छायांनी भरलेले असते तसे संस्कृतीचे असते. काही संस्कृतीत जशा तारक पद्धती, तशाच मारक पद्धती एकत्र असू शकतात. म्हणून संस्कृतीची फक्त वरवरून समजून वाखाणणी करीत बसून

संस्कृतीला स्वप्रवत हरभऱ्याच्या झाडावर चढविण्याचे प्रयत्न सतर्कतेने टाळावेत.

आपला भारत देश हा समृद्ध, प्राचीन आणि वैविध्यपूर्ण संस्कृती असलेला देश आहे. भारतातील संस्कृती जगातील इतर ठिकाणी आढळणाऱ्या संस्कृतींपेक्षा वेगळ्या आहेत. भारतातील चर्च (CBCI) आणि भारतातील स्थानिक चर्च (आपला वसई धर्मप्रांत) ह्या समृद्ध व प्राचीन भारतीय संस्कृतीला शुभवर्तमानाच्या प्रकाशात अधिक संपन्न व समृद्ध करण्याचा प्रयत्न करीत आहे. ख्रिस्ती म्हणून कोणत्याही एकाच संस्कृतीच्या काही विशिष्ट मर्यादेत अडकून न पडता सतत शुभवर्तमानाच्या प्रकाशात आपणाला लाभलेल्या संस्कृतीची व्यापकता जाणून घेण्याचा प्रयत्न आपण ख्रिस्ती श्रद्धावंतांनी केला पाहिजे. आपल्या ख्रिस्ती समुदायांची मूळ व खरी ओळख ही आपण भारतीय आहोत व त्याच बरोबर आपली श्रद्धा ख्रिस्ती आहे ह्यात होते.

धर्माला संस्कृतीपासून वेगळे करता येत नाही. धर्म आणि संस्कृती यांचा घनिष्ट संबंध आहे. पोप संत दुसरे जॉन पॉल म्हणतात, "संस्कृतीचा मार्ग हाच माणसातील माणुसकीपाशी पोचण्याचा मार्ग आहे. याच मार्गावर माणसाची परमेश्वराबरोबर भेट घडते. कारण सर्व चराचर सृष्टीला सामावणारा परमेश्वर सर्व संस्कृतींच्या तारक मूल्यांशी घनिष्ठ संबंधांनी मढलेला असतो". संस्कृती केवळ माणसाद्वारे आणि माणसासाठीच अस्तित्वात असते तरीपण, धार्मिक मुळावर उभी असलेली संस्कृती माणसाला भौतिक व लौकिक जीवनाच्या पलीकडे नेण्यास समर्थ ठरते. संपूर्ण मानवी क्रियाकलाप, मानवी बुद्धिमत्ता आणि भावना, अर्थ, मानवी चालीरीती माणसाला नीतीमान बनण्यासाठी साहाय्यकारक ठरतात. संस्कृती ही माणसासाठी इतकी नैसर्गिक आहे की मानवी स्वभाव संस्कृतीतूनच प्रकट आणि विदित होऊ शकतो.

आपल्या वसईला सुद्धा एका प्राचीन, समृद्ध आणि वैविध्यपूर्ण संस्कृतीची देणगी लाभलेली आहे. वसईमध्ये विविध धर्माचे, परंतु एकाच संस्कृतीच्या धाग्यांनी गुंफलेले लोक

प्रेमाने, शांतीने व गुण्यागोविंदाने पिढ्यानपिढ्या समृद्ध जीवन जगत आहेत, ह्यासाठी आपण परमेश्वराचे आभार मानले पाहिजेत. वसई धर्मप्रांत आगर (वाडवळ, कुपारी, पानमाळी, भंडारी, ईस्ट इंडियन, इ. लोक राहत असलेला विभाग), नगर (विशेषत: स्थलांतरित होऊन आलेले लोक - रेल्वे लगत असलेला विभाग), डोंगर (आदिवासी लोक राहत असलेला विभाग), सागर (कोळी लोक राहत असलेला विभाग) अश्याप्रकारे फोड करून सांगता येऊ शकतो. प्रत्येक विभागातील संस्कृतीच्या विविध पैलूंचा आपण अनुभव घेऊ शकतो.

खिस्ती श्रद्धेच्या बाबत सांगायचे तर एकच श्रद्धा वसई धर्मप्रांताच्या वेगवेगळ्या संस्कृतीद्वारे कुठल्याही गोंधळाविना सुंदरपणे व्यक्त केली जाते, साजरी केली जाते व जगली जाते. आपल्या वाड्वडिलांनी जी संस्कृती, मग ती आपली बोली भाषा असो, पेहराव असो कि सोहळ्यांचे साजरीकरण असो, ती आपल्या पिढीसाठी आपणापर्यंत हस्तांतरित केली आहे; ती सुंदर विविधतेने नटलेली संस्कृती आपण सगळ्यांनी मिळून रोज खिस्ती श्रद्धेच्या प्रकाशात मंगल आणि पवित्र करीत राहिले पाहिजे. आणि त्या संस्कृतीला धरून आपण सर्वांनी परमेश्वराची स्तुती – आराधना केली पाहिजे. म्हणून आपल्या संस्कृतीचे जतन, संवर्धन आपण केले पाहिजे व आपल्या पुढच्या पिढीकडे तो वारसा परिणामकारकरित्या सुपूर्द केला पाहिजे.

विविध संस्कृतीच्या आविष्काराद्वारे खिस्ताच्या शुभवर्तमानाची घोषणा श्रदेचे जिवंत समुदाय तयार करण्यास, आशा आणि प्रेमाचे वाहक बनविण्यास, संपूर्ण जगामध्ये सत्य आणि प्रेमाची सभ्यता आणि सर्वांचे जीवन समृद्ध करण्यास आपणाला उद्युक्त करते व आपणाला देवाचा अस्सल गौरव करण्यास सक्षम करते. अशी जीवनसंवर्धक व जीवन फुलविणारी संस्कृती कृतीत आणण्यास आपण सर्व कटिबद्ध होऊ या.

# जन्मोत्सव

■ **फादर फ्रान्सिस दिब्रिटो**
९३व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष

निर्गुण... निराकार... निर्विकार... त्याला साकार व्हावेसे वाटले. त्याने जीवांची निर्मिती केली, निर्मितीला सृजनाचे वरदान दिले, सृजनाला कोंभ फुटत गेले.

जो 'एक' होता, तो अनेक झाला. जिवाची पहिली उर्मी जगण्याची, अस्तित्व टिकवून ठेवण्याची, त्यानंतर धडपड सातत्याची.....

चिरंजीव होण्याची, चिरंतन होण्याची. नश्वरतेचा शाप जीवाच्या उरात होता तसा सृजनाचा उ:शापही.

जो अमर्याद, अजन्म आहे, त्याच्या पुत्राला मर्यादित व्हावेसे वाटले, गर्भात सामावण्याचे, कणाकणाने, क्षणाक्षणाने वाढण्याचे त्याला डोहाळे लागले. त्याने तिन्ही लोक धुंडाळले, तिन्ही काळ पारखले, ग्रहगोलांचा वेध घेतला.

पॅलेस्टिनच्या पठारावरील निनावी नाझरेथ गावी मरिया नामक शुद्ध कुमारिकेवर त्याचा अनुग्रह झाला. अंतराळातून अवतरला आत्मा शुद्ध कुमारिकेवर स्थिरावला. निरागस, निर्मळ मरिया दुहिता परिपूर्ण जाहली दिव्य तेजाने, तिचिया ऊदरी साकारला स्वर्ग.

नवमासाचा गर्भवास सरला, मातेचे मुख पाहण्यासाठी, प्रकाशाचे दर्शन घेण्यासाठी, धरतीचे सौंदर्य न्याहाळण्यासाठी लडिवाळ उतावीळ झाला. त्याच्या आगमनासाठी चराचरालाही पिसे लागले...

मध्यरात्रीच्या प्रशांत प्रहरी मांगल्याचा सूर्योदय झाला. बाळराजाच्या दर्शनाने धरतीचे सर्वांग थरथरले.

कळ्याफुलांना बहर आला, रानपाखरांना कंठ फुटला, गुरेवासरे अवेळी हुंदडू लागली, वृक्षवेलींनी अंगाई सुर धरला, नक्षत्र मंडळ डोलू लागले, आकाशाची उघडली कवाडे, हाती घेऊन टाळ मृदुंग, देवदूतांचे गाऊ लागले वृंद, “रात्र शांतीची परम सुखाची”

जन्म... इतिहासाचा प्रारंभ,

जन्म... सुजनशक्तीचा सोहळा,

जन्म... प्रेमाचा पाळणा,

जन्म... जीवनाची हाक

जन्म... भवितव्याची आशा,

जन्म... चिरंतनाचा श्वास

जन्म... जगण्याचा ध्यास,

जन्म... मानवतेचा वर

जन्म... मृत्यूचा सहचर,

जन्म... ईश्वराचा स्पर्श.

# पाण्याचा पैसा पाण्यात (विज्ञान कथा)

■ जोसेफ तुस्कानो, गास / बोरीवली

आटपाट गावात अंद्रूशेठ नावाचा एक धनाढ्य गृहस्थ राहत होता. तो सगळ्या गावात 'नंबर वन'चा श्रीमंत माणूस होता. त्याच्याकडे बक्कळ शेतीवाडी होती. त्याचा दुधदुभत्याचा खूप मोठा धंदा होता. त्याची मोठी दोन मुले दुधाचा व्यवसाय सांभाळीत असत, तर धाकटे दोघे शेतीत लक्ष द्यायचे. गावाजवळच्या शहरात अंद्रूशेठचा नियमित दुधाचा राबता होता. तालुक्यात 'दुधाचा पास' काढणारा तो पहिलाच शेतकरी होता म्हणे. वर्षानुवर्षे लक्ष्मी अंद्रूशेठच्या घरी पाणी भरत आली होती, पण सगळा गाव अंद्रूशेठला कंजूस मारवाडी म्हणायचा. गावाजवळच्या बाजारपेठेत अंद्रूशेठच्या वाडीतून दररोज कित्येक पाट्या भाजीपाला आणि फळफळावळ जायची. पण अंद्रूशेठ नोकरचाकरासोबत बाजारपेठेत पायी चालत जायचा. गावातील लोक म्हणायचे, "एवढा पैसा जमविला आहे, तो कुठे न्यायचा? ५० पैसे खर्चून बसमध्ये बसून बाजारात जायला काय होते?" पण अंद्रूशेठ हाडाचा श्रीमंत होता. तो पै न पै वाचवून साठवीत होता. आपला कामधंदा आणि पैसा याव्यतिरिक्त तो कुणाच्या अध्यात की मध्यात नव्हता.

एकदा काय झाले, गावातल्या प्राथमिक शाळेचे वार्षिक संमेलन होते. आटपाट गावातील चर्चच्या फादरांना वाटले की अंद्रूशेठला अध्यक्ष केले तर काही चांगली रक्कम दान मिळेल, शाळेची इमारत वाढवायची आहे, त्यासाठी पैसा जमा होईल, अन भरसभेत अंद्रूशेठने ५००१ जाहीरसुद्धा केले, पण स्कूल कमिटीचे सभासद अंद्रूशेठच्या घरी गेले तेव्हा त्याने त्यांच्या हातावर पन्नास रुपये नि एक पैसा दिला. कमिटीचे सभासद संभ्रमात पडले. बेरकी अंद्रूशेठ म्हणाला, "मी ५००१ रुपये असं थोडंच म्हणालो होतो. मला ५००१ पैसे द्यायचे होते." फादरांनी कपाळावर हात मारला. पुढल्या वर्षी, त्यांनी वार्षिक संमेलनासाठी, गावात येऊन गब्बर झालेल्या राजस्थानच्या वाण्याला अध्यक्ष केले. त्या चाणाक्ष

वाण्याने चक्क ५००१ रुपये शाळेला देऊन टाकले आणि आपल्या पुढच्या तीन-चार पिढ्यांची गावात सोय करून टाकली.

दैवाचा खेळ किती निराळा असतो, बघा. अंद्रूशेठकडे एवढा पैसा होता, जमीन-जुमला आणि शेतीवाडी होती. पण त्यांच्या घरात छोटे मूल नव्हते. त्यामुळे राजवाड्यासारख्या त्याच्या घराला घरपण नव्हते. आपल्या चारी मुलांची लग्ने होऊन घरात नातवंडं नाही, ही खंत अंद्रूशेठच्या मनाला बोचून होती. खूप नवससायास झाले. माहीमच्या सुकुर माऊलीची अखंड भक्ती चालू होती. वांद्र्याच्या फा. आग्नेलोची नोव्हेना करून झाली होती. वेलंकनीच्या फेऱ्या चालू होत्या. पण मावल्या काही नवसाला पावत नव्हत्या. अंद्रूशेठ मनातून खूप दुःखीकष्टी होता. मात्र कामधंदा व्यवसायात तो कटाक्षाने बरकत आणीत होता.

त्याच वेळी आणखी एक नवीन संधी चालून आली. आटपाट गाव शहराच्या जवळ होते. शहरातील लोकवस्ती बेसुमार वाढली होती. तिथे माणसांचे जंगल झाले होते. घरे बांधायला जागा नव्हती. तेव्हा शहरातील बिल्डर मंडळी आजूबाजूच्या गावाजवळ असलेल्या जमिनीकडे वळली होती. त्यांनी गावातल्या गरीब शेतकऱ्यांना पैशाचे आमिष दाखवून त्यांच्या जमिनी बळकावल्या. त्या जमिनीवर प्रचंड इमारती बांधायला सुरुवात केली. हिरव्याकंच गावांचे पिवळ्याजर्द इमारतीच्या जंगलात रूपांतर करायला सुरुवात केली. अंद्रूशेठचे शहरात एक दुधाचे गिऱ्हाईक होते. तो माणूस खूप मोठा बिल्डर होता. त्यानेदेखील वाहत्या गंगेत हात धुऊन घ्यायचे ठरविले. अंद्रूशेठच्या मदतीने त्याने आटपाट गावाजवळची मोठी जमीन विकत घेतली. अंद्रूशेठने नात्यातल्या गरीब लोकांना गोडगोड बोलून त्यांच्या जमीनी आपल्या गिऱ्हाईकाला विकायला लावल्या. त्यात त्याला दोन टक्के हिशोबाने खूप पैसा मिळाला.

तिथे अंद्रूशेठच्या बिल्डर गिऱ्हाईकाने मोठमोठ्या इमारती बांधायला घेतल्या पण, इमारतीच्या बांधकामासाठी पाणी कमी पडू लागले. तेव्हा त्या बिल्डरने अंद्रूशेठला एक आयडिया सुचवली. ती ऐकताच अधाशी अंद्रूशेठच्या आनंदाला पारावार उरला नाही. जमिनीतून आणि दुभत्या जनावरापासून पैसा मिळतो, हे अंद्रूशेठ जाणून होता. फारतर दुधात मिसळलेल्या पाण्याला अप्रत्यक्ष किंमत येते, हे देखील तो उमजून होता. पण, जमिनीच्या पोटात दडलेले पाणी नुसते

उपसून काढले, तर पैसा मिळेल, हे त्याच्या स्वप्नीदेखील नव्हते. मग अंद्रूशेठने आपल्या घरालगत असलेल्या शेतीच्या जमिनीत मोठमोठ्या विहिरी खणल्या. बिल्डरचे टँकर येऊन पाणी उपसू लागले. अंद्रूशेठच्या घरी पैसा चहूबाजूने नुसता धो धो वाहू लागला.

त्यातच दुधात साखर ओतणारी आणखी एक घटना घडली. अंद्रूशेठच्या प्रार्थनेला देव पावला होता. त्याच्या तिसऱ्या सूनबाईने एका छकुल्या बाळाला जन्म दिला होता. अंद्रूशेठने राजपुत्राच्या थाटात नातवाचं बारसं केलं. कधी नाही ते, साऱ्या गावाला जेवण दिले. गावच्या लोकांनी चकीत होत, तो सोहळा लुटला... बाळ हळूहळू वाढू लागलं. आता, तो चांगला तीन वर्षाचा झाला. तो घरात सगळ्यांच्या गळ्यातला ताईत होता. अगदी लाडाकोडात वाढत होता. आणि एके दिवशी बाळ आजारी पडले. त्याने खायचं प्यायचं सोडून दिलं. तो सारखे कपडे ओले करायचा. दूध पाजले की पातळ संडास करायचा. अंद्रूशेठची खूप धावपळ झाली. त्याने बाजारपेठेतील दोन-तीन डॉक्टरांना दाखवून बघितले पण कुणाचाही इलाज उपयोगी पडेना. अंद्रूशेठचा धीर खचला. त्याच्या तोंडचे पाणी अक्षरश: पळाले. तो भराभर डॉक्टर बदलू लागला. सगळ्या संत मावल्यांचा धावा करू लागला. पण बाळ पूर्ण बरं होत नव्हतं. औषधपाणी केले की त्याला बरे वाटायचे. पुन्हा तो दूध प्यायला नि खायला सुरुवात करायचा आणि लगेच आजारी पडायचा. त्याचा इवलासा जीव कासावीस व्हायचा. अंद्रूशेठ पाण्यासारखा पैसा खर्चत होता. त्याचवेळी चर्चच्या फादरांचे एक धन्वंतरी मित्र गावात आले होते. फादरांनी त्यांना विनंती करून अंद्रूशेठच्या घरी नेलं. त्यांनी बाळाला नीट तपासले. त्याच्या खाण्यापिण्या विषयी बारीकसारीक चौकशी केली. त्याआधी अंद्रूशेठची सगळी माहिती त्यांनी फादरांना विचारून घेतली होती. त्यामुळे मुलाला तपासीत असताना त्यांच्या डोक्यात अचानक प्रकाश पडला. त्यांनी अंद्रूशेठला एकांतात बोलवले, “शेठ कसा काय चाललंय, कामधंदा?” त्यांनी विचारले.

“डॉक्टर, कामधंदा जोरात आहे, हो. पण माझं चित्तच ठिकाणावर नाही. पोराला होतंय काय, तेच कळत नाही.” अंद्रूशेठ व्यथित होऊन बोलला.

“ते मला समजलंय”, ते धन्वंतरी शांतपणे बोलले.

“मग, पटकन सांगा ना !” अंद्रूशेठ अगदी काकुळतीला येऊन म्हणाला.

“पण त्यासाठी तुम्हाला काही त्याग करावा लागणार आहे. तयारी आहे?”

“ हो, डॉक्टर, पोरापुढे ही संपत्ती काय किमतीची? लवकर सांगा”, अंद्रूशेठमध्ये दडलेली माणुसकी जणू जागी झाली होती.

“मग ऐका, तुम्ही जमिनीतील पाणी उपसून बिल्डरला विकता. त्यामुळे तुमच्या या भागातील जमिनीच्या पोटातले गोड्या पाण्याचे प्रमाण कमी कमी होत गेले आहे. इथुन समुद्र तर अगदी हाकेच्या अंतरावर आहे. तिथून खारे पाणी झिरपत झिरपत तुमच्या विहिरीत येऊ लागले आहे. तुमच्या गोड्या पाण्याच्या विहिरी खाऱ्या पाण्याच्या होत आहेत. परंतु ही प्रक्रिया मंदगतीने होत चालली आहे, म्हणून पटकन लक्षात येत नाहीय. तुम्ही दुधात जे पाणी मिसळता, ते पाणी काहीसे खारट असते. त्यात अवाजवी क्षार असतात. तुमच्या बाळाच्या पोटात हे क्षार दुधातून जातात. पिण्याच्या पाण्यातील किंवा दुधातून शरीरात जाणाऱ्या पाण्यात जास्त क्षार असले की ते शरीराला झेपत नाहीत. मग लघवी द्वारा हे क्षार पुन्हापुन्हा शरीराबाहेर फेकण्याचा प्रयत्न होतो. त्यासाठी वारंवार लघवी होते याद्वारे शरीरातील खूप मोठ्या प्रमाणात पाणी बाहेर टाकले जाते. शरीराला त्यामुळे सुकेपणा जाणवतो. पाण्याच्या कमी प्रमाणावर घट्ट झालेले रक्त, शरीरातून मोकळेपणाने वाहत नाही. मग जीव कासावीस होतो. पचन धड होत नाही. हे सारखे घडत गेले तर माणूस दगावू शकतो.”

“नाही, डॉक्टर नाही !” अंद्रूशेठ जणू किंचाळलाच. त्याची मान शरमेने खाली गेली होती. त्या डॉक्टरांनी सांगितलेला शब्द न शब्द खरा होता. अंद्रूशेठला ते पटले होते. त्याचे डोळे उघडले होते.

त्या दिवसापासून अंद्रूशेठने पाणी विकायचा धंदा बंद केला. त्याचा स्वभावदेखील बदलला. तो लोकात मिळून मिसळून वागू लागला. मुक्तहस्ते दानधर्म करू लागला. त्याच्या नातवाला चर्चच्या शाळेत घातले, तेव्हा त्याने एकरकमी २५ हजार रुपयांची देणगी शाळेच्या इमारतीसाठी दिली. पुढे अंद्रूशेठची भरभराट होत गेली. त्याला आणखी नातवंडे झाली. त्याचा वंश फुलला आणि बहरला. अंद्रूशेठ पुढे उतला नाही की मातला नाही. घेतला वसा, त्याने सोडला नाही. ही साठा उत्तराची कहाणी तुम्हा-आम्हा सफळ संपन्न होवो.

(सौजन्य :- सुवार्ता मे १९९१)

# चार अति लघुकथा

■ **सायमन मार्टिन, भुईगाव** 9421549666

### तिची कथा

मग मी तिला पत्र पाठवलं नाही. कशासाठी पाठवायचं? आणि मीच का पाठवायचं? राग अनावर झाला होता. झाला काही दिवस त्रास पण हट्टाला पेटलो होतो. संवाद झालाच नाही. आणि तो थांबला तो कायमचा थांबला. आता त्या घटनेला लोटली आहेत चाळीस वर्षे. मध्यंतरी ती भेटली, तब्बल वीस वर्षांनी. खबरबात झाली. मग ती म्हणाली, तुझ्या पत्राची मी वाट पाहत होते, तू असा आयुष्य मोडून तोडून टाकायला नको होतं. पुन्हा आपल्याला जोडता आलंच नाही. रस्ते वेगळे झाले. भेटीगाठी थांबल्या.... मला वाटलं होतं जखम भरून आली आहे पण तसं नव्हतं.

ती जखम वाहायची थांबलीच नव्हती. तेव्हाच कळलं आयुष्यात काय काय गमावलं आहे....

### तिचा गाव

त्या गावात आता जायचा प्रश्नच उरला नव्हता. कित्येक वर्षांच्या अंतराने त्या गावात गेलो. आता ते भलं मोठं शहर झालं होतं. उत्तुंग इमारती आल्या होत्या, रस्ते मात्र पूर्वीसारखेच अरुंद होते. एकदा तुला भेटायला आलो होतो तेव्हा नाक्यावरच्या सलूनमध्ये जाऊन केस निटनेटके केले होते. तेव्हा तेथला सलूनवाला म्हणाला होता, आज कुछ खास दिखता है.... आणि खासच होतं. आज तुला भेटायचं होतं, आज तुला सांगणार होतो की मी तुझ्यावर प्रेम करतो. मी तुझ्या घरी आलो, तू वाटच पाहत थांबलेली. चहा झाला, तासभर गप्पाटप्पा झाल्या, तू म्हणाली देखील आज तुझे चित्त काही ठीक दिसत नाही.

मी म्हणालो कसलं काय... नेहमीसारखंच अखेरपर्यंत मला जे काही बोलायचं होतं ते बोलून झालं नाही. आपण अनावश्यक विषयावरच बोलत राहिलो. त्यादिवशी नाही आणि त्यानंतर ही नाही बोलणं झालंच नाही. मला हे देखील कळलं नाही की तुझ्या मनात काय होतं.

खूप वर्षांनी अशीच भेटलीस.

आता खूप प्रवास झाला होता

चेहरे बदलले होते आपले.

मनाचं काही सांगता येत नाही पण तेदेखील निबर झालं असावं. अंगावरच्या कातडी सारखं...

मग तूच विषय काढला

मनात असते ना ते बोलून टाकावं

नाही तर संपूर्ण आयुष्य हरवून जाते... मला अर्थबोधच झाला नाही तुझ्या बोलण्याचा

खरं म्हणजे त्या दिवशी मला, तुला जे सांगायचं होतं ते तू माझ्या चेहऱ्यावर वाचलं होतं तर...

पण मी मात्र बोलू शकलो नव्हतो म्हणून आपली गोष्ट अपूर्णच राहिली होती.

**एक संध्याकाळ**

त्यादिवशी उशीर झाला होता. रात्री साडेदहा वाजता फोर्ट वरून निघालो होतो. युनिव्हर्सिटीच्या शेजारच्याच बारमध्ये मित्रासोबत खूप दिवसांनी गप्पा रंगल्या होत्या. खूप वर्षांनी गाठ भेट झाली होती. अर्थात तुझा विषय निघालाच...

भेटते का? संपर्कात असते का?

हजार प्रश्न उत्तरं नसलेले.

चर्चगेट स्टेशनवर जाण्यासाठी युनिव्हर्सिटीच्या बाजूच्या गल्लीतून निघालो.

खूप शोधलं तिला...

आपण कॅम्पस मधून निघायचो संध्याकाळी तेव्हा चेहरा रंगवून

ती गिऱ्हाईकाच्या शोधात

तेथल्या खांबाजवळ उभी असायची. हातात काही पिशव्या असायच्या...

रिकाम्याच असाव्यात त्या

तिच्या आयुष्यासारख्या

आत्ता एवढ्या वर्षाच्या अंतरानंतर ती जिवंत असणे देखील शक्य नव्हतं.

म्हणजे आता त्या घटनेला लोटली आहेत चाळीस वर्ष...

तरीही दुसरी कुणीतरी दिसेल म्हणून खूप शोधलं....

तुरळक रहदारी होती त्या रस्त्यावर खरं म्हणजे आपण जात येत होतो त्या रस्त्यावर मी पुन्हा तुलाच शोधत होतो

तू आहेस ना ?

**वाईटच असते प्रेम**

फोनवरचं बोलणं तासभर लांबलं. जुन्या आठवणीची उजळणी झाली. काही घटना, गोष्टी मला आठवत होत्या काही तुला....हे देखील सांगून झालं की आपण एकत्र आलो असतो तर असं तासनतास फोनवर कशासाठी बोललो असतो? यावर तू मात्र मस्त हसलीस. मी चुकूनही मान्य केलं नाही की तू नाहीस म्हणून मी दुःखी झालो आहे.. आपण बोलत असताना मी मागे मागे गेलो.

पुन्हा त्याच दिवसात गेलो ज्या दिवसात आपण नियमित भेटायचो आता काय राहिलं होतं?

आयुष्य जसं जगायचं तसं

किंवा न जगायचं तसं जगून झालं होतं.

आता मागे वळणं शक्य नव्हतं

खूप पुढे निघून गेलो होतो

आता कुणाच्याही हाका

कुणालाही ऐकू जाणं शक्य नव्हतं

हाका ऐकू येणंच थांबलं होतं, फोनवरचं बोलणं थांबलं... कृष्णबिहारी नूरची गझल

सुजात खानच्या आवाजातली, ऐकत बसलो...

निराश झालो, तसाच... जसे आपण दूर होताना झालो होतो. त्या दिवशी फार एकाकी वाटलं. वाईटच असते प्रेम यावर पुन्हा एकदा ठाम राहिलो.

तुझं मत काय आहे?

# काष्ठशिल्पकार सिक्वेरा बंधू – मानवतेचे मूर्तीकार

■ ख्रिस्तोफर रिबेलो

जुलै महिन्यात घराचे रेनोवेशन संपल्यानंतर वडिलांच्या इच्छेनुसार हॉलमध्ये पुनरुत्थित ख्रिस्ताचा स्टॅच्यू बसवायचे ठरवले. मागच्याच वर्षी गावातील नूतनीकरण झालेल्या क्रॉसच्या कामात मरिया माता आणि क्रूसावरील येशू यांचे स्टॅच्यू गिरिज येथील सिक्वेरा ब्रदर्स यांनी बनविले होते, एक-दोन वेळा त्या संदर्भात त्यांच्या वर्कशॉपला भेट दिली होती, पण ती वरवरून होती. जेव्हा घरी स्टॅच्यू बसवायचा निर्णय अंतिम झाला. मी आणि मिसेस आम्ही परत एकदा त्यांच्या वर्कशॉपला भेट दिली.

त्यांच्याबरोबरच्या बोलण्यात खूप असे विषय निघाले आणि त्याच आत्मियतेतून त्यांनी आम्हाला त्यांचे पूर्ण वर्कशॉप दाखवले. त्यांच्या घरातच असलेली त्यांची ऑफिस कम मुर्त्या ठेवलेली रूममधील ते शिल्पकलेतील सौंदर्य बघून या वर्षीच्या ख्रिस्तायन अंकात त्यांच्याविषयी लेख लिहावा असे मनात ठरवले. त्यांच्या बरोबर झालेल्या नंतरच्या काही भेटीत जुजबी माहितीही घेतली आणि एक जगप्रसिद्ध शिल्पकारांशी आपली बातचीत होतेय याची जाणीव झाली.

'सिक्वेरा ब्रदर्स'(रॉक अँड रेनॉल्ड सिक्वेरा ब्रदर्स, Brand Of Sequeira Fine Art) या नावाने ते भारतातच नव्हे, तर जगभरात सुरेख, आखीव-रेखीव लाकडी मूर्तींसाठी ओळखले जातात. १९२० साली गिरिज चर्चच्या उपवासकालीन मिरवणुकीसाठी प्रभू येशूचा पुतळा नव्हता तेव्हा आजोबा

मायकल सिक्वेरा यांनी तो बनविण्याचा निर्णय घेतला आणि तद्नंतर सुरू केलेला शंभर वर्षाचा हा प्रवास व्हाया मुलगे रॉक आणि रेनॉल्ड, नातू मिंगलेश्वर सिक्वेरा आणि बेनझोनी सिक्वेरा यांच्या द्वारे आजही अव्याहतपणे सुरू आहे. वारशाने मिळालेल्या या कौशल्याबद्दल बोलताना, सिक्वेरा बंधू त्याचे श्रेय त्यांच्या आजोबांना देतात, ज्यांच्या उद्योजकतेने सुतारकामाचा कौटुंबिक व्यवसाय लाकूड कोरीव कामाच्या विशेष क्षेत्रात आणला. लाकडाच्या मूर्तीपासून त्यांनी सुरुवात केली होती पण आता फायबर आणि धातूच्यादेखील मूर्ती ते तयार करु लागले आहेत.

तीन पिढ्यांचे हे कौशल्य वूड कार्व्हिंग क्षेत्रात असाधारण असे आहे. आज वसई किंबहुना भारतातील बहुतेक चर्चमध्ये त्यांनी तयार केलेल्या मुर्त्या विराजमान आहेत. केवळ मरिया वा येशूच्या मुर्त्या नाही तर गौरी-गणपतींच्या मुर्त्याही त्याच कौशल्याने बनविण्यात ते माहीर आहेत. एकाचवेळी मरियामाता आणि दुर्गामाता तसेच येशू आणि दत्तगुरू अशा मुर्त्या त्यांच्या हातून घडलेल्या आहेत. त्यामुळेच त्यांच्या ख्याती भारतातच नव्हे तर सातासमुद्रापलीकडेही इतर देशांत गेली आहे.

त्यांच्या मुर्त्या ह्या मजबूत, आकर्षक डिझाईन, क्रॅक रेसिस्टंस, वापरण्यास सुलभ आणि टिकाऊपणासाठी ओळखल्या जातात. त्यासाठी त्यांनी मॉड्यूलर मशीन्स आणि टूल्सने युक्त असे विस्तृत इन्फ्रास्ट्रक्चर यूनिट स्थापित केले आहे, हे युनिट मॅन्युफॅक्चरिंग, डिझाइनिंग, क्वालिटी टेस्टिंग, वेअरहाउसिंग, पॅकेजिंग, सेल्स आणि मार्केटिंग इत्यादी विविध विभागांमध्ये विभागलेले आहे. हे विभाग त्यांच्या संबंधित क्षेत्रामध्ये सखोल उद्योग ज्ञान असलेल्या कुशल व्यावसायिकांच्या दूरदर्शी मार्गदर्शनाखाली कार्यरत आहेत.

मिंगलेश्वर आणि बेनझोनी यांचे वडील रेनॉल्ड सिक्वेरा, एक उत्कृट खगोलशास्त्रज्ञ होते. यावर्षी एप्रिल महिन्यात प्रदीर्घ आजाराने वयाच्या ७८व्या वर्षी निधन झाले. त्यांनी खगोल शास्त्राचा खास अभ्यास करून आकाश

दर्शन करणारी अनेक उपकरणे शास्त्रोक्त पद्धतीने बनविलेली आहेत. त्यामध्ये शनी व त्याच्या कडा, सूर्याची विविध ऋतूमधील भ्रमंती, ग्रहण आदि दाखविणाऱ्या उपकरणांचा समावेश आहे. यापैकी काही उपकरणे नेहरू तारांगण आणि ऑस्ट्रेलियाच्या सिडनी येथील वेधशाळेत आहेत. त्यांची ही उपकरणे पाहून नेहरू तारांगणचे त्यावेळचे संचालक डॉ. वेंकट वर्धन यांनी त्यांचे कौतुक केले होते. विक्रम साराभाई अंतराळ प्रदर्शनात त्यांनी ठेवलेली ही उपकरणे पाहून इस्त्रोनेही त्यांना प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा गौरव केला होता.

त्यांच्या सांगण्यानुसार एखाद्या मूर्तीसाठी मिळालेला तपशील आणि उपलब्ध कामगार याद्वारे ते एका महिन्यात जवळपास ७ ते ८ मुर्त्या तयार करतात. त्यांच्या वर्कशॉपमध्ये निरनिराळ्या सेक्शनमध्ये फिरताना आपण एका वेगळ्याच जगात असल्याचा भास होतो. एकमेकांच्या खांद्याला खांदे उभे असणारे देव, राजे, संतांचे पुतळे, नेते यांच्यावरून आपण नजर फिरवीत असताना ते जणू आपल्याशी आता बोलतील की काय असे वाटते. मध्येच कामाची देखरेख करत असताना त्यांचे काका, रॉक यांचे मंद स्मितही मिळते.

'सिक्वेरा बंधू' जितके यशस्वी काष्ठशिल्पकार आहेत तितकेच ते स्वभावाने नम्र आहेत, विविध माहिती देत असताना त्यांचे ते सावकाश हळुवार बोलणे सतत कानावर पडत राहावे असे वाटत राहते. जगविख्यात आर्टिस्ट असूनही त्याचा अभिमान असला तरी गर्वाचा लवलेशही त्यांच्या बोलण्यातून जाणवत नाही.

विशेष नमूद करण्यासारखी गोष्ट त्यांच्या बोलण्यातून जाणवली ती म्हणजे कोरोना काळात त्यांनी त्यांच्या कामगारांची आणि परिसरातील गरजू लोकांच्या मदतीला धावून जाण्याची कळकळ. सिक्वेरा बंधूंनी पुढाकार घेत पहिले कुटुंब, मग कामगार आणि नंतर समाजाचे आपण देणेकरी लागतो म्हणून 'लॉकडाऊन'च्या काळात सर्व नियम पाळून जमेल तितक्या लोकांना मदत केली. अचानक उद्भवलेल्या या 'लॉकडाऊन'मुळे मजूरवर्ग गोंधळला

आणि गावी जाण्याची तयारी करू लागला. अशावेळी त्यांना धीर देऊन, काम करणाऱ्या मजुरांची राहण्याची सोय सिक्वेरा बंधूंनी केली. आपल्या कर्मचाऱ्यांची समजूत घालून, त्यांना आर्थिक चणचण जाणवणार नाही, याची काळजी त्यांनी घेतली. कर्मचाऱ्यांशी सुसंवाद ठेवत, त्यांचे मानसिक आरोग्य जपण्याचे कामदेखील सिक्वेरा यांनी केले. यामध्ये त्यांना कुटुंबाचीदेखील चांगली साथ मिळाली.

माणुसकीचे दर्शन घडवणारे कौतुकास्पद काम सिक्वेरा बंधूंनी केले.

या काळात व्यवसायवृद्धीसाठी 'डिजिटल प्लॅटफार्म'चा त्यांना चांगला उपयोग झाला. ग्राहकांशी ऑनलाईन संपर्क साधून त्यांना हव्या तशा डिझाईन्स बनवून घेणे, सर्व बँकेचे व्यवहार हे ऑनलाईन करणे, यामुळे कोरोना काळात सर्व नियमांचे पालन करत, त्यांना आपला व्यवसाय सुरळीत ठेवण्यात यश आले. आजोबांनी चालू केलेला हा व्यवसाय पुढे चालू ठेवण्यासाठी दोन्ही भावांनी संघटित होऊन कुठल्याही लोभाच्या आहारी न जाता, प्रगतिपथावर घेऊन जाण्याचा निर्धार केला. त्यांच्या मेहनतीला सलाम करताना त्यांची अशीच भरभराट होत राहो ही त्यांना सदिच्छा.

---

आपल्या स्वत:त 'स्व' असणं
आपल्या असण्याचं लक्षण असतं
लोक काय म्हणतील करण्यात
त्या 'स्व'त्वाचं भक्षण असतं

खंडहर झाली नात्यांची वीण
आणि अवशेषही शेष नाही राहिले
एकला चलो रे झाली रीत
माझ्या संवेदनांचे पर गुंग झाले.

झिडकारल्या गेलेल्या मनाला
कुणाचा मागमूस उरत नाही
उध्वस्त असलेलं ते हृदय
उसन्या हास्याने भरत नाही.

सोप्पं वाटणारं एखादं कोडं
असं अवघडून जातं
आयुष्य अनुभवणं मग अगदीच
कठीण होऊन जातं

# वस्तू

■ वर्जेश ईश्वरलाल सोलंकी, वसई

आपण तसे खुप चाणाक्ष व विचक्षण असतो म्हणजे एकदा आपण चष्म्याच्या दुकानात जर गेलो तर पहिली चष्म्याची फ्रेम डोळ्याला लावतो, नंतर दुसरी, नंतर तिसरी, नंतर चौथी, फडताळावर लावलेल्या असंख्य फ्रेम्सनी तर डोके व डोळे दोघांचाही भूगा केलेला असतो. ‘रुप कसे दिसे आयनी’ करित आपण पाचव्या फ्रेमला पसंद करतो. चष्म्यावाल्याचा व आपलाही जीव भांड्यात पडलेला असतो. असं बारीक बारीक का असेना आपण अनुभवत असतो. म्हणजे रेल्वे स्टेशनच्या पायऱ्या उतरल्या की तिकडे लहानसे शॉपींग मॉल अदबीने उभे असतात.

काय नसतं तिकडे? जे आपल्याला हवं असतं त्याचा ढिगारा असतो. खुप साऱ्या शर्टाचा ढिगारा लावलेला असतो. गोदी का माल गोदी का माल असा धोषा चालू असतो. किंमतसुद्धा आपल्याला परवडणारी असते. एकदम पानी के भावमे कपडा लेलो म्हणून विक्रेता किंचाळत असतो. चहाचे अधूनमधून घोट घेत असतो. प्रवासी घरी जाण्यासाठी निघालेले असतात मात्र त्याच्या ओरड्याने थांबतात व एखादा तरी घ्यायला हवा अशा विचाराने ढिगाऱ्याला विळखा घालतात.

अशाच बघ्यापैकी आपण सुद्धा. अनेकातले एक. त्याच्या जाहिरातीचे गाणे ऐकता ऐकता आपण त्या ढिगाऱ्यात शिरतो. अलीबाबाची गुहाच सापडलेली असते. कुठला शर्ट घेऊ, येईल की न येईल, हाफबाय की फुलबाय मात्र, एक घेऊ की दोन की तीन, मात्र मध्यमवर्गीय विचाराने एकच उचललेला असतो, निगोशिएशनला तिकडे वावच नसतो. लेने का तो लो असा आर्विभाव

विकणाऱ्याचे डोळे सांगत असतात व एखादी शर्यत जिंकल्यासारखे तो शर्ट घेऊन आपण लोकलच्या भयाण गर्दीत शिरकाव केलेला असतो. घरी गेल्या गेल्या त्या शर्टाच्या अनामिक गंधात न्हाऊन निघायचं असतं. तोऱ्यात सांगायचं असतं की पाहा कशी स्वस्त, मस्त, सुंदर व टिकाऊ वस्तूची आपण खरेदी केलेली आहे. खरेदी व विक्री हा आपल्या जीवनाचा अविभाज्य भागच असावा. तिच्या मिनाराखाली आपला जीव अवघडलेला असतो.

सकाळी उठल्यापासून ते झोपेपर्यंत आपण काहीतरी खरेदी करित असतो व विक्री करित असतो. विकत घेतलेल्या काही वस्तू आपण लागलीच पुन्हा विकून टाकत असतो तर काही वस्तू ठेवून देत असतो. त्याचे जिवापाड जतन करत असतो. वस्तूंमागे आठवणी असतात, जुन्या दिवसांचा ओलावा, हळवे क्षण अनुभवता. स्वतःला इजा झाली तरी चालेल मात्र त्या निर्जीव जिवाला स्वतःच्याच शरीराच्या एखाद्या भागासारखे जपता. त्याची निगा राखता, त्यावरली धूळ झटकता, एखाद्या खोबणीत किंवा कपाटात ती कुलुपबंद करता. कुणी ती वस्तू मागायला आले तर म्हणता लाख रुपये काय करोडो रुपये दिले तरी ही मी वस्तू तुला देऊ शकणार नाही. इतकी ती गोष्ट तुमच्यासाठी महनिय असते. जीवातोलाची असते.

ती एका पिढी नंतर दुस-या पिढीकडे सरकते, कितीतरी दशकांची धूळ तिच्या अंगाखांद्यावर वारुळासारखी चढलेली असते. ती तुमची परंपरा असते. म्हणजे बाबांच शिलाई मशीन, त्यांची कातर, अंगुस्तान अजुनही आम्ही जपून ठेवलेले आहे. तो आपला वारसा असतो. आपली ओळख असते. ती विकली तर आपणसुद्धा विकलो गेलो अशा विचारांचं काहूर वावटळीसारखं उठलेलं असतं. ही वस्तू जर का घरातून गेली तर काहीतरी अघटित होईल असही वाटत असतं.

आपण आयुष्यात पहिली कुठली वस्तु विकत घेतली आठवते का बच्चमजी? आठवत असेल एकदम अंधूकबिंधूक किंवा कुणीतरी आपल्याला दुकानात घेऊन गेलेले असते दुकानात उदा. म्हणजे फटाक्याच्या. कितीतरी फटाके एकदम

हारीने. काय घेऊ किंवा काय नको अशी दैन्यावस्था. सिनेमातच बंदूक पाहिलेली, लागलीच ती हातात घेऊन आपण दुकानातच चालवायला घेतलेली, दुकानवाल्यावर नेम धरलेला, खाट करुन फुसका आवाज निघालेला. दुकानापासून ते घरी येईपर्यंत ठो असा आवाज तोंडाने काढीत अख्ख्या एरियावर आपला गोळीबार चाललेला.

तरी मुद्द्यावर येतो की आपण पहिली वस्तु कुठली घेतली म्हणजे स्वतःच्या पैशाने विकत. थोडं डोकं खाजवतो. मेंदूला ताण देत आहे. पहिला पगार झालेला म्हणजे रुपये १२५०/-. त्यावेळी बाटा ह्या चप्पलची दहशत होती. बाटाचे शुज, त्याचे सँन्डल, कोणाला काही विचारलं तर म्हणायचा, बाटाचे आहेत. वस्तूंचीही आपल्या मनावर मोठी दहशत असते हे पहिल्यांदाच जाणवलं. म्हणजे कंपॉस बॉक्स कॅमलिनची, वह्या नवनीतच्या, पेन्सिल नटराजची, टुथपेस्ट कोलगेटचं, वॉशिंग पावडर फलाण्याचं, तर बुशर्ट वॅन ढिकण्याचं, असं एकदम ठरलेलं. तरी ठरलं मग. फोर्टला कामाला होतो. बाटाचं शोरुम गाठलं. अनेक चपला, सॅन्डल, शुजचा वास भरभरुन घेतला. नव्याकोऱ्या वहीचा वास घ्यावा तसा. बराच वेळ घालवला. कालवाकालव झाली.

सरतेशेवटी सुंदरा मनामध्ये भरली तशी एक सॅन्डल मनामध्ये भरली. पायात तिला अदबीने सरकवली. नील आर्मस्ट्राँगला जितका आनंद चंद्रावर पाय ठेवताना झाला नसेल त्याहून कितीतरी शतपटीने ती सॅन्डल घालून दुकानाबाहेर पडताना आपल्याला झालेला. मोराचे पाय कुरुप असतात म्हणे पण त्याने अशी जर सॅन्डल घातली तर त्याचेही पाय आपल्याच पायासारखे लकाकून जातील इतके निश्चित.

# देवाची भाषा कंची...?

■ जॉन कोलासो, गिरीज, वसई

देवाने माणूस घडविला की, मानवाने देव घडविला, हा वादाचा विषय असेल.... सद्गुरूसारख्या काही आध्यात्मिक मार्गदर्शकांचे मत आहे की, माणसाने देवाची निर्मिती केली आहे... तर केशवसुत सांगून गेले आहेत 'देव दानवा नरे निर्मिले...' अशा या मानवनिर्मित देवाची भाषाही आपणच ठरविली आहे असंच म्हणावं लागेल. ख्रिस्ती भाविक देवाची भाषा लॅटिन समजत आले आहेत तर मुस्लिमधर्मीय अल्लाची भाषा अरबी समजतात. भारतात पूर्वीपासून संस्कृतला देवभाषेचा मान आहे कारण वेदमंत्र, ज्ञान, तत्त्वज्ञान, सर्व संस्कृतमध्येच आहेत आणि ते सर्व देवांनी लिहिलेले आहेत, असा समज आहे.

परंतु संस्कृत हीच केवळ देवभाषा आहे, हा समज खोटा ठरविणारा निकाल मद्रास हायकोर्टाने दिला. या उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने सप्टेंबर २०२१मध्ये दिलेल्या एका निकालपत्रात म्हटले आहे की, 'केवळ संस्कृत भाषाच देवाला समजते आणि इतर भाषा त्याला कळत नाहीत, असा दावा व समज करणे चुकीचे आहे. प्रत्येक मानवीभाषा ही देवभाषा आहे. प्रत्येकाची संस्कृती आणि धर्म यानुसार भक्तीस्थळे बदलत असतात. विविध देशांत धार्मिक श्रद्धा आणि उपासना पद्धती वेगवेगळ्या आहेत. परंतु, आपल्या देशात असा समज निर्माण करून देण्यात आला आहे की, संस्कृत हीच केवळ देवभाषा आहे आणि इतर भाषा संस्कृतच्या तोडीच्या मुळीच नाहीत. नि:संशय, प्राचिन वाङ्मयाने परिपूर्ण

असलेली संस्कृत एक प्राचिन भाषा आहे. परंतु, केवळ संस्कृत वेद वा मंत्रांचा उद्घोष केला तरच देव भक्ताचं ऐकतो, इतर भाषेतील नाही, असा समज निर्माण करून देण्यात आला आहे, हे चुकीचे आहे. तामीळनाडूमधील मंदिरात प्राचिन काळापासून तामिळी भाषेत प्रार्थना करण्यात येत आहे, म्हणून केवळ संस्कृतच देवभाषा मानणे योग्य नाही.' उच्च न्यायालयाचे खंडपीठ इतके सांगून थांबले नाही तर तामिळनाडू सरकारला आदेश देत सांगितले की, यापूर्वी होऊन गेलेल्या थोर तामीळ संतांनी लिहून ठेवलेल्या प्रार्थना, स्तोत्र, काव्य एकत्रित करण्यासाठी तामीळ विद्वान व भाविकांचा समावेश असलेली एक तज्ज्ञ समिती नेमावी.

थोडक्यात मद्रास उच्च न्यायालयाला केवळ संस्कृतच देवभाषा आहे, हा दावा मान्य नाही. उच्च न्यायालयाचा हा निकाल वाचल्यावर मला लोकहितवादी गोपाळराव हरि देशमुख यांनी संस्कृत भाषेसंबंधी लिहिलेले निबंध आठवले. १८व्या शतकाच्या मध्यास म्हणजे आज सुमारे पावणे दोनशे वर्षांपूर्वी लिहिलेल्या या लेखांत त्यांनी संस्कृत भाषा आणि तिचे अवडंबर माजवणाऱ्या वर्गावर सडकून टीका केलेली आहे.

लोकहितवादींनी 'संस्कृत विद्या' या शीर्षकाच्या लेखात परखडपणे म्हटले आहे की, 'संस्कृत विद्या मोठी गहन आहे व तिचा उपयोग मोठा आहे, असे लोकांस वाटते. यामुळे शास्त्री, पंडित वगैरे संस्कृताचे विद्वान लोक मानतात. वैदिक हे जरी ग्रंथ नुसते पाठ करितात, तरी निदान पक्षांत ग्रंथांचे रक्षण तरी करितात. परंतु, या संस्कृत विद्येचे तात्पर्य पाहिले तर त्यांत व्यावहारिक उपयोग काहीच नाही. संस्कृत भाषा फार प्राचीन आहे आणि देव म्हणजे जुने हिंदु, त्यांची ती भाषा आहे. तिला बहुतांनी शोधून संस्कार देऊन सुधारली आहे. म्हणून तीस संस्कृत म्हणतात हे खरे परंतु, तिजमध्ये जे ज्ञान वाढते ते कोणांच्याही उपयोगी नसते. कारण त्यांतील ग्रंथात फारसे ज्ञान मुळीच नाही. जे आहे ते केवळ जुन्या काळचे. त्याचा आता काही उपयोग नाही.'

तर 'सुशिक्षा व पंतोजी आणि संस्कृत व इंग्रजी भाषा' या शीर्षकाच्या दुसऱ्या लेखात म्हटले आहे की, जे संस्कृताचा अभिमान धरतात ते अगदी अज्ञानांत आहेत. ते सुधारणेस हरकत मात्र करतील. संस्कृत आजच्या काळी काही उपयोगी नाही व त्यातील ग्रंथही उपयोगी नाहीत.... संस्कृतची योग्यता इतकीच आहे की, ती भाषा सुधारलेली आहे. परंतु, ही भाषा येऊन अज्ञानवृद्धी झाली तर काय उपयोग? कारण या भाषेतील ज्ञान अगदी उपयोगी नाही. संस्कृत भाषेतील ग्रंथ आणि इंग्रजी भाषेतील ग्रंथ यांची तुलना करून पहावी, म्हणजे संस्कृताचा अभिमान जाईल.

लोकहितवादींनी संस्कृत भाषेवर अशी टीका करण्याचे कारण म्हणजे या भाषेचे ज्ञान असलेल्या वर्गाने आपल्याजवळ असलेल्या ज्ञानात नवीन भर टाकली नाही. या भाषेत असलेले ग्रंथ, धार्मिक विधी, वैदिक व्रते, कर्मे, दाने, औषधी ज्ञान इत्यादींचा वापर सर्वसामान्यांना लुटण्यासाठी केला. देवापेक्षा ही भाषा येणाऱ्या वर्गाचेचे भय समाजात निर्माण झाले. कित्येक काळपर्यंत त्यांचे आशीर्वाद, त्यांचे शाप, त्यांची अनुष्ठाने ही मोठी सामर्थ्यवान आहेत, असे लोकांत प्रसिद्ध झाले होते. परिणामी संस्कृत भाषेतील ज्ञान अद्ययावत न होता, जुनेच राहिले. ती निरोपयोगी बनली.

मद्रास उच्च न्यायालय आणि लोकहितवादी गोपाळराव देशमुख यांनी केवळ संस्कृतला देवभाषा मानण्यास नकार दिला असला तरी मला शालेय जीवनापासून संस्कृत श्लोक आणि त्याचे अर्थ समजून घेताना खरोखरच ही देवभाषा असावी, असं वाटत आलं आहे. आजही मला या भाषेबद्दल आदर आहे. इतकंच नव्हे तर जे विद्वान आपल्या भाषणांत वा लेखनात संस्कृत सुभाषितांचा चपखल वापर करतात, त्या विद्वानाबद्दल आदर वाटतो. कारण सर्वच भारतीय तत्त्वज्ञान संस्कृतमध्ये उपलब्ध आहे. भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाच्या माध्यमातून आपल्याला पाजलेले बोधामृतही संस्कृतमध्येच आहे. सर्व प्राचीन अजरामर वाङ्मय संस्कृतमध्येच आहे. कालीदासांचे मेघदूत, शांकुतल, मालविकाग्निमित्र तसेच भवभुतीचे

मालतीमाधव, उत्तररामचरितम इत्यादी साहित्य आपणास संस्कृत येत नसल्याने वाचता येत नाही, त्यामुळे या साहित्याचा आनंद घेता येत नाही, अशी भावना अनेक वर्षांपासून माझ्या मनात दडून राहिलेली आहे.

फेडरिक मॅक्सम्युल्लर, अलबरुनी, जोहान्स गटेन्बर्गसारख्या अनेक परदेशी अभ्यासकांनी वेद, उपनिषदे, संस्कृत वाङ्मय यांचा अभ्यास करण्यासाठी भारतात येऊन संस्कृत शिकून घेतली होती किंवा त्यांना शिकून घेणे भाग पडले होते.

परदेशी अभ्यासकांनी भारतात येऊन संस्कृत भाषा शिकून घेतली परंतु, आपण भारतीय असूनही संस्कृत शिकता आलं नाही, या विचाराने माझ्या मनात तर न्यूनगंडच निर्माण झाला. मला संस्कृत न येण्याचे कारण म्हणजे त्यावेळी एसएससीला संस्कृतऐवजी गणित विषय घेण्याचा पर्याय उपलब्ध असल्याने संस्कृत विषयाचा अभ्यास काही मनापासून केला नव्हता. त्याच्यात संस्कृत व्याकरण आणि मोठेमोठे शब्द वाचताना भंबेरी उडत असे. तरीही काही संस्कृत सुभाषते आजही स्मृतीत दडलेली असल्याने संस्कृत ही देवाची भाषा आहे, हा समज माझ्या मनात आतापर्यंत कायम होता. माझाच नव्हे तर असा अनेकांचा समज असणार, त्यात केवळ हिंदूधर्मीयच असतील असे समजण्याचे काही कारण नाही. सर्व भारतीयांना संस्कृतबद्दल आदर वाटत असतो. अध्यात्म, ज्ञान, तत्त्वज्ञान आणि साहित्य यादृष्टीने एक परिपूर्ण अशी ही भाषा आहे. तिच्यात अद्ययावत ज्ञानाची भर पडली नसेल, पण जे प्राचीन ज्ञान आहे, ते आजही उपयुक्त असल्याचे समजले जाते. म्हणूनच आपल्या देशाची समृद्ध संस्कृती दर्शविणारी ही देवभाषा असल्याने आपण दरवर्षी ‘विश्व संस्कृतदिन’ साजरा करतो. या विश्वदिनामुळे आपण भारतीयांनी मिळविलेले ज्ञान, विज्ञान, संस्कृती, विद्या यांची माहिती जगाला होते. आजही या भाषेतील ज्ञानकण वेचण्यासाठी अनेक परदेशी विद्वान भारतात येत असतात.

# रम्य ते बालपण!

■ रेमंड मच्याडो, होळी, वसई

लहानपणी आम्ही मुलं-मुली तीन-चार कौलारू घरे असलेल्या वसई पश्चिमेकडील एका छोट्याशा गावांमध्ये वाढलो. आमचा गावच आमचे विश्व होते. त्या पलीकडे काय अस्तित्वात आहे त्याबद्दल आम्ही अनभिज्ञ होतो. शाळेत 'टाके'पर्यंत गावातील मुलं-मुली कोणत्याही शेजाऱ्यांच्या शेणाने सारवलेल्या ओटीवर किंवा सामाईक अंगणाच्या धुळी-मातीत मनसोक्त खेळत असत. ओटीवर रांगणारे बाळ सारवलेल्या भुईच्या भेगेत आपले ईवलेशे बोट घालून माती चिकटलेली शेणाची खपली काढत व तेव्हा एकमात्र ब्रँड अस्तित्वात असलेले पार्ले ग्लुकोज बिस्कीट समजून खात. वडीलधारी माणसं बाळाच्या शरीरात लोह या घटकाचे प्रमाण कमी झाले आहे असे समजून त्याला ते खाऊ देत. त्यावेळी खपल्यातील मातीमुळे बाळाला सेप्टीक संसर्ग होऊ शकतो याचा त्यांना गंधही नव्हता. मात्र ओटीवर निघालेल्या खपल्या गोठ्यातील ताजे शेण घमेल्यात कालवून ओटा पुन्हा सारवण्याची वेळ आली आहे, हे घरातील सुनेसाठी पूर्वसुचक चिन्ह होते.

पाच वर्षापर्यंत आकलनबुद्धी विकसित होत गेली तशी चर्च किंवा शाळेमध्ये नित्यक्रमाने जाण्याच्या आठवणी मनात घर करू लागल्या. चर्च व शाळा एकाच ठिकाणी दोन मिनिटांच्या अंतरावर होती. तेथे पोहोचण्यासाठी होळीच्या बाजारपेठेतून जावे लागत असे. त्यावेळी होळी बाजार ही वसईतील केंद्रस्थानी असलेली एकमेव बाजारपेठ होती. वसई परिसरातील शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या पालेभाज्या व फळेभाज्या विविध प्रकारची केळी व विड्याची पाने यांची विक्री करण्यासाठी हा बाजार नावाजलेला होता. पाली-नायगाव पासून गिरीज-भुईगांव-निर्मळ पर्यंतचे होणारे बहुतांश कृषी उत्पादन होळीच्या बाजारात विकण्यासाठी आणले जाई. कै. जगदीश

राऊत यांनी दिलेल्या जागेत पालेभाज्या व फळे, भाज्यांचा घाऊक बाजार भरत असे आणि केळी व विड्याच्या पानांचा बाजार डिसिल्वा कुटुंबीयांच्या जागेत भरत असे. वसईची काळीभोर पाने तिखट व विशिष्ट चवीची असल्यामुळे पाकिस्तान व उत्तर भारतातून त्यात भरपूर मागणी असे. विड्याची पाने आगाशी-नाळा व पालीवरून स्पेशल एसटी बसने आणली जात.

कृषी उत्पादनाचा माल खरेदी करणारे व्यापारी (भय्ये) मुंबईहून येत. त्यावेळी ब्रिटिश काळातील चार डॉज कंपनीच्या विंटेज कारगाड्या टॅक्सी म्हणून वापरात होत्या. दररोज पहाटे वसई रेल्वे स्टेशनवरून ह्या टॅक्सी प्रत्येकी कमीतकमी दहा भय्ये कोंबून व त्यांच्या पाट्या कारच्या डिकीमध्ये भरून, घाईघाईने होळी बाजारात पोहोचत. उशिरा येणाऱ्या व्यापाऱ्यांना एसटी बस होतीच. खरेदी केलेला माल, विशेष करून ताज्या पालेभाज्या मुंबईला नेण्यासाठी बस वर चढवून वसई रेल्वे स्टेशनवरून लोकल रेलगाडीच्या लगेज डब्यात नेला जाई. फळभाज्या व केळी व विड्यांची पाने हा इतर माल चारपाच लॉऱ्यांममधून मुंबईच्या विविध बाजारपेठेत रवाना होत असे. शेतकरी वर्ग वसईच्या अनेक भागातून येत असल्यामुळे होळीचा मच्छीबाजारही तेजीत चालत असे. होळीच्या बाजारातील लोकांची सकाळची वर्दळ दुपारी सुमारे एक दोन वाजेपर्यंत सतत चालू असे आणि तदनंतर सायंकाळपर्यंत परिसर एकदम सामसूम होत असे. नगर पालिकेच्या सफाई कामगारांकडून सर्व बाजारपेठा दुसऱ्या दिवसासाठी झाडून साफ केल्या जात.

तेव्हा होळी बाजारात फडके, पोंगाडी मामा, सील व फोस यांची छोटेखानी रेस्टॉरंट होती, परंतु खमंग वासावर समाधान मानावे लागत असे. घरचा फळभाज्यांचा बाजार विकल्यावर फडकेंच्या दुकानातील खाजे, मेसूर किंवा सुतारफेणी इत्यादी मिठाई आणली जाई. दुपारचे भोजन झाल्यावर एक आण्याच्या चार चण्याच्या पुड्यांतील एक पुडी व एक बसरायचे (हिरव्या सालीचे) केळे मिळत असे. मात्र पावसाळ्याच्या मोसमात अनेक वेळा सायंकाळच्या चहाबरोबर होळीवर नव्यानेच सुरू झालेल्या भगवती किंवा लक्ष्मीविलास रेस्टॉरंटमधून गरम कांदाभजीचा यथेच्छ आस्वाद घेतल्याचे आठवते. तेथे बटाटेवडा, कांदाभजी,

समोसा, चिवडा व गाठिया इत्यादी पदार्थ मिळत असत. खरे पाहता भर पावसामध्ये शेतात भाताची लावणी करणाऱ्या कष्टकरी आदिवासी बांधवांसाठी यापैकी पदार्थांचा नाश्ता असे.

मुलांना तेव्हा आजच्यासारखे अधून-मधून खाण्यासाठी चॉकलेट, वेफर्स व बिस्किटे उपलब्ध नसायची. अर्धचंद्र आकाराच्या ऑरेंजच्या आंबट गोड गोळ्या व छोट्या गोल चकतीच्या आकाराच्या तोंडाला थंडावा देणाऱ्या सफेद पेपरमिंटच्या गोळ्या असायच्या. आजच्यासारखे हॅंबर्गर, हॉटडॉग, श्वर्मा किंवा अनेक प्रकारच्या आईस्क्रीम नसायच्या. तेव्हा लेमन व गुलाब या सोड्याचा प्रकार काचेच्या बाटलीत स्थानिक पातळीवर कार्बन-डाय-ऑक्साईड भरून बनविला जाई. एक आण्याला बाटली मिळे व एका बाटलीत गॅसयुक्त सरबताचे दोन ग्लास भरत. बाजार विकल्यावर कष्टकरी महिला फेसाळलेले थंड सरबत पिऊन आपली तहान व थकवा घालवत. सकाळी होळीच्या बाजारातील हातगाडीवर बर्फाचे सरबत व गोंडे बनवून विकणारे भय्ये दुपारच्या भोजनानंतर गावागावातील बीदींमधून फिरत. त्यांची विशिष्ट घंटी ऐकू आली की गावातील मुलं वेशीवर गुळाला मुंगळे लागतात तशी भैय्याच्या गाडीभोवती दिसायची.

मुलांचे किंवा त्यांच्या पालकांना त्यांचे वाढदिवस कधी येत व कधी जात याची तेव्हा कोणाला आठवण सुद्धा होत नसे. त्यातील अनेक पालकांना त्यांची जन्मतारीखही ठाऊक नसे. त्यावेळी सर्वसाधारणपणे दांपत्यांना सरासरी आठ-नऊ मुले असत. अनेक कुटुंबात डझन असत तेथील वडिलांना मुलांची नावेसुद्धा नीट आठवत नसत. क्रिसमस, नवीन वर्ष व इस्टर याव्यतिरिक्त धर्मग्रामातील ख्रिस्तमंदिराचा वार्षिक उत्सव व इतर पॅरिशचे सणाचे दिवस, तेवढे मात्र लक्षात राहत.

शाळेत जाण्यासाठी वरच्या इयत्तेतील विद्यार्थ्यांच्या हातात त्या दिवसाला लागणाऱ्या वह्या-पुस्तकांचा सुटा गठ्ठा असे किंवा तो रुंद आकाराच्या रबरबॅंडने घट्ट एकवटलेला असे. खालच्या वर्गातील मुलं पाटी व बालभारतीचे पुस्तक ठेवण्यासाठी कापडी धोपटी वापरत. तेव्हा आजच्या सारख्या विविध रंगाच्या व आकाराच्या महागड्या स्कूल बॅग नसत. आज प्रत्येक मम्मी मुलाच्या स्कूलबॅगला असलेल्या खास कप्प्यामध्ये पिण्याच्या

पाण्याची बाटली ठेवायला विसरत नाही. तेव्हा शाळेत तहान लागल्यावर सामूहिक पाण्याची टाकी व पेला असे, तर लघुशंकेसाठी मुलांना शाळेच्या दूर कुंपणाजवळ उघड्यावर जावे लागत असे. परंतु आज प्रत्येक शाळेत मुला-मुलींसाठी वेगळी प्रसाधनगृहे बांधण्यात आली आहेत.

तेव्हा वर्षाला दोनच परीक्षा असत... एक सहामाही व दुसरी वार्षिक. निकालाच्या वेळी प्रगती पुस्तकावर विषयात कमी मिळालेले गुण लाल शाईमध्ये लिहिले जात. त्यावर वडिलांची सही घेणे मोठे जिकीरीचे काम असे. वार्षिक परीक्षेत काही विद्यार्थ्यांना एखाद्या विषयात ३५ टक्क्यांपेक्षा कमी गुण मिळाले असतील तर ग्रेस मार्क देऊन त्यांना पुढच्या इयत्तेत चढवले जाई. मात्र कोण अनेक विषयात नापास झाले असेल त्यास त्याच इयत्तेत दुसरे वर्ष काढावे लागत असे.

त्यावेळी शाळेत जाण्यासाठी रिक्षा किंवा जीपगाडी नसे. शाळा कितीही दूर असली तरी उन्हा-पावसात व थंडीत पायी जावे लागे, ते सुध्दा अनवाणी! रबरी स्लिपर्स ६०च्या दशकात आली. त्याअगोदर उच्च मध्यमवर्गीय मुलंच मोच्याकडून तयार केलेली चामडी चप्पल वापरत. तेव्हा टिफिनबॉक्स वगैरेची पद्धत नव्हती. शाळा संपूर्ण दिवस असल्यामुळे दुपारच्या भोजनासाठी विद्यार्थी आपापल्या घरी जात. शाळेतून जाता-येता मोठी मुलं खाण्यासाठी रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडांवरून आंबा, बोरे व नारळ इत्यादी दगडाने अचूक नेम धरून पाडत. शाळेत उशिरा येणे, गृहपाठ करून न येणे, वर्गात खोड्या काढणे किंवा वेळेत केस न कापणे, यासाठी वर्ग शिक्षकाकडून छडीचे हाताच्या तळव्यावर व पायाच्या पोटरीवर फटके बसत. तेव्हा पालकाकडे तक्रार करण्याचे प्रयोजन नव्हते. चुकून त्यांना कळले तर शिक्कामोर्तब म्हणून त्यांच्याकडूनही रपाटे मिळत असत.

शाळेतून आल्यावर शाळेचा युनिफॉर्म घाईने काढून पलंगावर फेकला जाई आणि घरचे कपडे चढवून अंगणात खेळण्यासाठी गावातील मुलांची चुरस लागत असे. खेळत असताना गावांतील मुलांमध्ये भांडण-तंटा झाला तरी तो त्या दिवसापुरताच असे. खेळण्यासाठी अंगणात उतरताना एकमेकांची नावे जोराने बोंबा करून पुकारली जात. सायंकाळी बॉल दिसेनासा होईपर्यंत बॅट-बॉलचा खेळ चालू राही. तेव्हा लपाछपी,

चोर-पोलिस, लगोरी, काचेच्या गोट्या, काजूबिया, क्रिकेट इत्यादी आणि पावसाळ्यात एकमेकांच्या ओटीवर साप-शिडी, मेंढीकोट पत्ता, सागरगोट्या इत्यादी खेळ खेळले जात.

वरच्या इयत्तेतील मुलांना शेती-बागायती मधील कामासाठी पालकांना हातभार लावणे भाग पडे. मुलगे बैल रहाटाला जुंपून शेती बागायती मधील लागवड पाण्याने शिंपत. तर मुली दुसऱ्या दिवशी बाजारात विकण्यासाठी शेतातून पालेभाज्या, फळभाज्या व फुले काढण्यास आईला मदत करत. गावातील ज्येष्ठांच्या शिस्तीपुढे इतर कोणाची भीती वाटत नसे. त्या जमान्यात धर्मगुरू, धर्मभगिनी, ज्येष्ठ व्यक्ती, डॉक्टर, शिक्षक-शिक्षिका व पोलिस यांच्या प्रती सामाजिक आदराने पाहिले जाई व त्यांना प्रत्युत्तर देण्यास कोण कदापी धजले नाही.

त्यावेळी वसई-विरार भागातील घरोघरी स्वयंपाकघराच्या बाजूला कुटुंबातील महिलांना छोटेसे न्हाणीघर असे किंवा घराच्या मागे बांबूच्या सहाय्याने नारळाच्या विणलेल्या झावळ्यांनी चौफेर लपेटलेले व मध्यभागी मोठा दगड ठेवलेले छोटे न्हाणीघर असे. अनेक घरी पुरुष मंडळी सायंकाळी शेती-बागायतीचे काम संपल्यावर घरामागील विहिरीवरच आंघोळ आटोपत असत. तेव्हा सेप्टीक टँक नसल्यामुळे शौचकूपाची व्यवस्था परसाकडे केली जात असे. वाडीमध्ये झाडेझुडपे वाढलेल्या ठिकाणी एक खड्डा खणून बसण्यासाठी दोन विटा ठेवण्यात येत व समोरच्या बाजूला दोन बांबू उभे करून विणलेल्या झावळीचा आडोसा तयार केला जाई. तेथे जाताना प्रत्येकाने आपापले पाण्याने भरलेले टमरेल घेऊन जाणे अत्यावश्यक होते. ह्या बाबतीत वयात आलेल्या मुलींची व महिलांची आणि घरी आलेल्या पाहुण्यांची भयंकर कुचंबणा होत असे. परंतु नाईलाजास्तव हा नित्यक्रम त्यांच्या अंगवळणी पडला होता. लहान मुलं परसाकडे झुडपाच्या आडोशाला उघड्यावरही बसत असत. कुटुंबाच्या वाट्याला आलेल्या बागायत जमिनीच्या तुकड्याला 'भग' म्हणत. मुलाला शौचास जायचे झाले तर तो आईला म्हणत असे, "आयंव जरा 'भगा'र जाऊन येतंय"!

जनतेच्या मनोरंजनासाठी वसई गावातील पारनाक्यावर मोहोळ यांचे एकमेव 'प्रभात टॉकीज' होते, तेथे मराठी व हिंदी सिनेमांचे दररोज तीन 'शो' सातत्याने होत असत. पुढे दुरुस्तीसह त्याचे नामकरण 'जानकी थिएटर' असे

झाले. किंगकाँग व दारासिंग यांची कुस्ती समाविष्ट असलेले सिनेमे पाहण्यासाठी मुलांची व विशेष करून कोळी लोकांची गर्दी होत असे. तेव्हा खालच्या आसनांचे तिकीट चार आणे मात्र होते. तदनंतर सोनावाला हे दुसरे सिनेमागृह झेंडाबाजारात आले परंतु ते दीर्घकाळ चालले नाही. दरम्यान वसई रोड परिसरात 'पार्वती' व नंतर 'केटी-विजन' ही थिएटर्स चालू झाली होती. त्यावेळी गावपातळीवर सुट्टीच्या दिवसात वसईतील विविध चर्चच्या आवारात धार्मिक सिनेमे दाखवले जात. तसेच होळीच्या पान मार्केटमध्ये तेव्हाचे फेमस झालेले हिंदी व मराठी चित्रपट मामुली दरात दाखवले जात. मात्र आधुनिक काळात मॉल संस्कृती वाढीस लागली व त्यांच्यात छोट्या 'मल्टिप्लेक्स'चा समावेश असल्यामुळे, जुन्या मोठ्या सिनेमागृहाच्या अस्तित्वावर संकट कोसळले आहे.

सत्तरच्या दशकात मुंबईला दुरदर्शन संचावर कृष्णधवल कार्यक्रम सुरू झाले, त्यातून ठरावीक वेळेलाच बातम्या व निवडक कार्यक्रम प्रसारित होऊ लागले. वसईत फार थोड्या लोकांकडे कृष्णधवल टीव्ही सेट होते, त्यासाठी वार्षिक लायसन्स फी भरावी लागत असे. गावात एखाद्याकडे टीव्ही असेल तेथे गावातील लहान थोर मंडळी कुतूहल म्हणून बातम्या, क्रिकेटचा सामना, बुधवारी सायंकाळी सुरभी, गुरुवारी छायागीत, रविवारी रामायण-महाभारत किंवा जंगल बुक पाहण्यासाठी; तर पुढे शनिवार-रविवार वा विशेष सुट्टीच्या दिवशी जुना हिंदी सिनेमा पाहायला जमत. काही वर्षांनी रंगीत टीव्ही सुरू झाले व जसे टीव्हीचे जाळे पसरत गेले तसे बाजारपेठेत इलेक्ट्रॉनिक दुकानात विविध भारतीय व परदेशी बनावटीचे रंगीत टीव्ही विकू लागले. ज्यांच्या घरी वीज किंवा टीव्ही नव्हता असे पादचारी लोक आंतरराष्ट्रीय क्रिकेटची फायनल मॅच पाहण्यासाठी बाजारपेठेतील सदर दुकानांसमोर भरपूर गर्दी करत असत. आता तर कोणत्याही भाषेत जगातील कोणतेही चित्रपट वा इतर कार्यक्रम इंटरनेटद्वारे टीव्ही, मोबाईल, लॅपटॉप व इलेक्ट्रॉनिक माध्यमातून कोणत्याही वेळी पाहिले जाऊ शकतात.

त्या दिवसांत आजच्यासारखे घरोघरी टेलिफोन नव्हते. गावात एक-दोन घरीच फोन असत. गरजेनुसार शेजाऱ्यांनाही फोन वापरायला दिला जाई. मात्र फोन आला आहे हे शेजाऱ्याला सांगण्यासाठी मालकाच्या वेळेचा अपव्यय

होऊ लागला व ती एक अवांछित दुनियादारी ठरू लागली. तसेच शहरातील इमारतींमध्ये किंवा मुंबईच्या चाळींमध्येसुद्धा असेच प्रकार घडू लागले. काही वर्षांनी शहरात व गावागावात पिसीओ व ठिकठिकाणी टेलिफोन बूथ बसवण्यात आले. त्यावेळी मुंबईबाहेर फोन करायचा झाल्यास तो ट्रंककॉल करावा लागत असे. तसेच वसईहून मुंबईचा हवा असलेला फोनही बुकिंग करून लावावा लागत असे! काही अवकाशाने सरकारकडून दूरध्वनी जाळे विस्तारित करण्यात आले तेव्हा घरोघरी टेलिफोन खणखणू लागले आणि पिसीओ व बूथ यांचेही अस्तित्व नाहीसे झाले.  पुढे 1994 मध्ये भारतात मोबाईल फोन आले तेव्हा, हळूहळू टेलिफोनचे महत्त्व कमी होत गेले. त्या काळी संगीत, बातम्या, शेती विषयी व सांस्कृतिक कार्यक्रम ऐकण्यासाठी वॉल्हचे रेडिओ असत. नंतर मग ट्रांजिस्टर रेडिओचे आगमन झाले. त्यांचा आकारही शर्टच्या पाकिटात जाईल एवढा छोटा झाला व नंतर हेडफोनमध्ये अंतर्भाव असलेले ट्रांजिस्टरही आले.

किती सुंदर ते दिवस! किती नैसर्गिक ते जीवन!! तेव्हा गावातील मुलांबरोबर वाडीतील नारळ, आंबा, चिंच, पेरू व बोरे पाडून खाण्यात जी मजा येत असे त्याची आजच्या मुलांना कल्पनाही करता येणार नाही. आज जेवणाच्या मेजावर अनेक प्रकारची फळे असतात, तरी त्याबद्दल मुलांना अप्रूप वाटत नाही. त्यावेळी श्रीमंती व ऐशारामी जीवनशैलीचा साधा लवलेशही नव्हता. त्यावेळी शॉपिंगसाठी ॲमेझॉन व फ्लिपकार्टसारखे ॲप नव्हते, परस्पर संपर्कासाठी फेसबुक, ट्विटर व व्हॉट्सअप सारखे मोबाईल ॲप नव्हते, तरीसुद्धा त्या वेळचे साधेसुधे कौटुंबिक व निखळ सामाजिक जीवन यांमधून मिळणारा खरा आनंद अलौकिक व आजही अविस्मरणीय आहे.  रम्य ते बालपण!

---

माणसाने माणसासारखं वागावं
यात चांगुलपणा दिसून येतो
पण प्राण्यांनी पशूपणा सोडावा
हा प्रश्न का मनात येतो

बेडकी कितीही फुगली तरी
तिला सांड होता येत नाही
क्षमतेहून अधिक हडप केलेले
पासंगालाही पुरे पडत नाही.

# वसईच्या पत्रकारितेतील भीष्म

**■ अनिलराज रोकडे, ज्येष्ठ पत्रकार**

वसईत गेल्या ४६ वर्षापासून अतिशय नियमित प्रकाशित होणाऱ्या शासनाच्या मान्यता यादीत स्थान असलेल्या 'साप्ताहिक जनपरिवार'चे संस्थापक व संपादक, फादर स्टीफन अकॅडमी इंग्लिश स्कूलचे संस्थापक, तथा 'लीलाई दिवाळी अंका'चे एक सल्लागार मा. श्री. अँड्र्यू कोलासो यांचा दि. ७ ऑक्टोबर २०२१ रोजी सहस्त्रचंद्रदर्शन-दिन संपन्न झाला. गिरीज येथील त्यांच्या फा. स्टीफन अकॅडमी स्कूलमधील शिक्षक वर्गाने छोटेखानी कार्यक्रम करून त्यांचे ८०व्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन केले. या निमित्ताने खूपच साधी राहणी आणि कोणताही बढेजाव अभिव्यक्तीमध्ये नसलेल्या ऋषितुल्य व्यक्तिमत्वाच्या अँड्र्यू कोलासोंबद्दल थोडक्यात माहिती........!

मला गुरुतुल्य असलेल्या अँड्र्यू कोलासो यांच्याशी २५ वर्षांहून अधिक काळ आमचा कौटुंबिक स्नेह असून, तो 'साहित्य जल्लोष' उपक्रमातील सहयोगी म्हणून, तसेच प्रारंभापासून 'लीलाई' अंकातील त्यांचे योगदान अश्या दुहेरी नात्याने वृदिंगत होत आला आहे. कोलासोंची ध्येयवादी पत्रकारितेतील कामगिरी, स्वतःची जीवनमूल्ये आणि तत्त्वावरील अतूट निष्ठा यामुळे त्यांचा प्रभाव पडून, माझी त्यांच्याशी जवळीक वाढत गेली. दि. ७ ऑक्टोबर १९४१ रोजी जन्मलेल्या कोलासो सरांना शालेय दशेपासून कविता, लेख लिहिण्याची आवड होती. त्यांनी मराठी आणि संस्कृत विषय घेऊन एम.ए. केले. पुढे लेखनाच्या आवडीतून कॉलेजला असतानाच, एप्रिल १९६२ मध्ये दै. मराठामधून आचार्य प्र. के. अत्रे आणि शिरीष पै यांच्या मार्गदर्शनात उपसंपादक म्हणून पत्रकारितेस प्रारंभ केला. या काळात त्यांनी स्व. रॉक कार्व्हालो, अशोक कारखानीस, स्व. पुष्पा

त्रिलोकेकर आणि ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांच्यासोबत काम केले. नंतरच्या काळात, डिसेंबर १९६५ मध्ये त्यावेळच्या पूर्व जर्मनीच्या मुंबईतील वकालाती कार्यालयात माहिती अधिकारी म्हणून कार्य केले. नंतर १९७२ मध्ये सोव्हिएत संघराज्याच्या मुंबई वाणिज्य कार्यालयात माहिती अधिकारी म्हणून काम पाहिले.

त्यानंतरच्या काळात कोलासो यांना मुंबईतील कोणत्याही बड्या दैनिकातून मोठया हुद्द्यावर काम करण्याची योग्यता आणि संधी असे दोन्ही असतांना, मात्र कुणाची चाकरी करण्यापेक्षा आता काहीतरी स्वनिर्माण करूया, अशी खूणगाठ बांधली. त्यातूनच दि. ९ मे १९७७ साली जनपरिवारचे पाक्षिक स्वरूपात प्रकाशन करून, त्यातून वसईसह ठाणे, पालघर परिसराचा वेध घेण्याबरोबरच या परिसरातील लेखकांना लिहिते करण्याचा कसोशीने प्रयत्न सुरु झाला. या दरम्यान, कँसरग्रस्त पत्नीची दहा वर्ष उपचार आणि सेवा त्यांनी केली. १९९२ साली मात्र पत्नीच्या वियोगानंतर काहीसे एकाकी झाले असले तरी कोलासो यांनी, संजय आणि नितीन ही दोन मुले, तसेच मुलगी अजिता यांच्या रोजगार आणि प्रपंचाची नीट घडी बसवून दिली. त्यांच्या तिन्ही अपत्यांचे संसार सुखात असून, कोलासो गुरुजींनी मात्र संन्यस्त जीवनशैली स्वीकारून पूर्ण वेळ स्वतःला शाळेत गुंतवून घेतले आहे.

पुढे दि. १५ ऑगस्ट १९९३ साली जनपरिवारचे साप्ताहिकात रूपांतर झाले. वसई-विरार शहराने विस्तार नि विकासासोबतच नव्या प्रश्न आणि समस्यांना जन्म दिलेला होता. या संक्रमण काळात कोलासो यांनी चौफेर आपली लेखणी चालवून, जनपरिवारचे स्वतंत्र स्थान निर्माण केले. या वाटचालीत त्यांचे छोटेबंधू, तथा ज्येष्ठ पत्रकार जॉन कोलासो, ज्येष्ठ साहित्यिका डॉ सिसिलिया कार्व्हालो, विज्ञान लेखक जोसेफ तुस्कानो अश्या एका मोठया पिढीस प्रेरणा देऊन त्यांनी लिहिते केले. अशी खूप मोठी यादी सांगता येईल. सन २००४ साली महाराष्ट्र शासनाने पत्रकारितेतील अग्रलेखांसाठीचा पुरस्कार देऊन, त्यांचा गौरव केला आहे. या पुरस्काराचे वितरण तत्कालीन मुख्यमंत्री स्व. विलासराव देशमुख यांच्या हस्ते झाले होते. महाराष्ट्र टाइम्स दैनिकातून सहसंपादक म्हूणन प्रदीर्घकाळ सेवा बजावून निवृत्त झालेले जॉन कोलासो आता आपल्या दादाला जनपरिवारसाठी सर्व ते सहाय्य करीत आहेत.

याच दरम्यान, जून १९९५ साली कोलासो यांनी गोरगरीब आणि कनिष्ठ मध्यमवर्गीय पालकांच्या पाल्ल्यांसाठी इंग्रजी माध्यमातील शिक्षण माफक फी मध्ये सहज उपलब्ध व्हावे, म्हणून गिरीज येथे फादर स्टीफन अकॅडमी इंग्लिश स्कूलची स्थापना केली. स्व. नारायण सुर्वे, स्व. सुभाष भेंडे आणि प्रा. पु. द. कोडोलीकर यांच्या उपस्थितीत कनिष्ठ के. जी. स्वरूपात लावलेल्या या शाळेच्या रोपट्याने आता दहावीपर्यंतच्या विध्यार्थ्यांना शिक्षणाची सावली, सुविधा निर्माण केली आहे. शासनाच्या अनुदानाशिवाय बँकेच्या कर्जातून स्वतःच्या मालकी जागेत, दोन स्वतंत्र इमारतीमधून ही शाळा कोणतेही डोनेशन न आकारता जिल्ह्यातील सर्वात कमी मूल्याची फी घेऊन चालवली जात आहे. आजही कोलासो सर वयाच्या ८० व्या वर्षातसुद्धा, बाराही महिने सुट्टीच्या दिवसांसह दररोज १२-१२ तास या शाळेच्या कामात व्यस्त राहून ज्ञानदान आणि शाळा संचालनाचे कार्य करीत आहेत.

श्री. कोलासो साहेबांनी सहकाराच्या आकर्षणातून बॅसीन कॅथॉलिक सहकारी बँकेची निवडणूक लढवून दोन टर्म विजयी होत, सतत दहा वर्षे संचालक म्हणूनही यशस्वीपणे कार्य केले आहे. सन १९९३ आणि १९९८ असा काळ त्यांचा बँकेच्या सेवेत व्यतीत झाला. समाजकारण, राजकारण, सहकार, शिक्षण, साहित्य आणि पत्रकारिता अश्या विविधांगी क्षेत्रातील अभ्यास असल्यामुळे त्यांच्याकडे अनेक होतकरू आणि नवोदित मार्गदर्शन, तथा सल्ला घेण्यासाठी येत असतात. वसईतील राजकीय आणि सामाजिक नेते स्व. मायकल फुर्ट्याडो सारख्या अनेक कार्यकर्त्यांना त्यांनी प्रेरणा व मार्गदर्शन दिले आहे. 'लीलाई'च्या प्रारंभीच्या काळात अंक वेळेवर यावा, म्हणून अनेकदा त्यांनी एडिटिंग पासून ते प्रुफे तपासण्यापर्यंत सहाय्य केलेले आहे. माझ्या पत्रकारितेच्या वाटचालीत अनेकदा त्यांचा उपदेश आणि मार्गदर्शन मला सहाय्यभुत ठरले आहे. यासाठी त्यांची कृतज्ञता व्यक्त करीत त्यांना शतकी आयुष्य लाभो, अशी प्रार्थना ईश्वराकडे करून सहस्त्रचंद्रदर्शन-दिनानिमित्त त्यांचे अभिष्टचिंतन व त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा.

# जीवन सम्राट येशू

■ **फा. डॉ. एलायस रॉड्रिग्ज** (9423908787)

मरिया मातेने आपल्याला येशू दिला आणि येशू कोण आहे हे जर आपल्याला थोडया फार प्रमाणात कळू लागले तर मरिया मातेने आपल्याला किती अद्वितीय, किती असामान्य, किती महान देणगी दिली आहे हे कळू लागते. येशू स्वत: म्हणतो, माझ्यावर पवित्र आत्मा उतरलेला आहे. मी गरिबांना शुभवर्तमान सांगण्याकरिता आलो आहे, जे कोणी बंधनात आहेत, जे कोणी ठेचले जात आहेत, ज्यांच्यावरती अन्याय होतो अशा लोकांना साहाय्य करण्याकरिता, मुक्त करण्याकरिता मी आलेलो आहे. जे आंधळे आहेत त्यांना दृष्टी देण्याकरिता मी आलेलो आहे. ही यादी अशी खूप मोठी करता येते. जे लुळे पांगळे आहेत, जे आजारी आहेत हयांच्यावर फार अन्याय होतो, असे जे आपण बघतो तो दूर करण्याकरिता येशू आलेला आहे. हे सगळे येशूने एका वाक्यात सांगितले आहे, 'तुम्हाला जीवन आणि समृद्ध जीवन देण्याकरिता मी आलो आहे.' म्हणजे हया गोष्टीमुळे माणसाच्या जीवनाचे खच्चीकरण होते. माणूस गुपचूपपणे जीवन जगू शकत नाही. येशू आपल्याला स्वर्गीय जीवन देण्यासाठी आलेला आहे. येशू काहीतरी एक चमत्कार करतो एवढाच येशूचा अर्थ नाही. आपल्या लहान लहान गरजा येशू भागवतो परंतु येशू जीवन सम्राट आहे. तो आपल्याला नवजीवन देण्याकरिता आलेला आहे. प्रत्यक्ष जीवन देण्याकरिता आलेला आहे.

संत पॉल सांगतो, जे झोपी गेले आहेत, झोपी गेलेले म्हणजे जे मरण पावले आहेत त्याच्याविषयी तुम्ही अजाण असावे असे मला वाटत नाही. तर शेवटच्या दिवशी येशूची हाक येईल, कर्णा वाजेल, जुन्या करारामध्ये कर्णा नावाचे वाद्य वापरायचे तर त्यावेळेला जे मरण पावलेले आहेत ते उठतील. म्हणजे त्यांना जीवन मिळेल. येशूच्या शब्दामुळे, येशूच्या हाकेमुळे सर्व जिवंत केले जातील. जे ज्यावेळेला जिवंत असतील त्यानासुद्धा येशूची हाक ऐकू येईल आणि तेसुद्धा येशूच्याबरोबर सदासर्वकाळ शाश्वत जीवन जगतील. पण हे कधी होईल? येशूचा मृत्यू आणि येशूचे

पुनरुत्थान यावर आपण विश्वास ठेवू तेव्हा येशूचा मृत्यू आणि येशूचे पुनरुस्थान म्हणजे येशूची सर्व शिकवण, क्रूस वाहण्याची शिकवण, त्याग करण्याची शिकवण, प्रीती करण्याची शिकवण हे दैनंदिन जीवनामध्ये जर आपण स्वीकारू लागलो तर मग आपण येशूच्या बरोबर राहतो. मग येशू काय सांगतो बघा, हा जो शब्द तुम्ही ऐकता तो तुमच्या बाबतीत बरा झालेला आहे. नाझरेथ गावी येशूने जे वाचन केले त्या वेळेला लोक सगळे बघायला लागले. येशूने मग प्रवचन दिले. पवित्र आत्मा माझ्यावर उतरला आहे. पवित्र आत्मा जीवन देणारा आहे, स्वर्गीय, दिव्य जीवन देणारा आहे. तो तुम्हाला मिळावा म्हणून मी आलेलो आहे. आज हे वचन ऐकताना तुमच्या बाबतीत ते पूर्ण होत आहे.

आपण जे प्रवचन ऐकतो, आपण देवाच्या शब्दाचे वाचन ऐकतो, ते फार अर्थपूर्ण आहे. जो माणूस विश्वास ठेवतो आणि देवाचा शब्द ऐकतो तो येशूचा स्वीकार करतो. येशू स्वत: देवाचा शब्द आहे आणि हा येशू जीवन देणारा आहे. आपल्या जीवनातील अडथळे, अडचणी, सगळी ओझी दूर करण्याकरिता तो आला आहे. तुम्हाला मुक्त करण्याकरिता, बंधनातून बाहेर काढण्याकरिता मी आलेलो आहे. मी स्वर्गीय जीवन देण्यासाठी आलेलो आहे. काही लोकांना वाटते हे येशूचे सगळे आश्वासन मिळेल तेव्हा मिळेल. असे नाही. आज देवाचा शब्द खरा ठरत आहे, असे येशू म्हणतो. आज जर तुम्ही विश्वास ठेवला, आज जर तुम्ही भक्तिभावाने प्रार्थना केली, आज जर मरियेच्या मध्यस्थीची याचना केली तर आज मला प्रभू येशूची कृपा मिळते आणि ती कृपा म्हणजे पवित्र आत्मा माझ्यावर उतरतो. येशू गोरगरिबांना संदेश देतो. मीसुद्धा जे कोणी बंधनांत आहेत त्यांना मुक्त करतो. कारण येशू माझ्याबरोबर आहे. आपण येशूबरोबर जोडलेलो असल्यामुळे येशूची पवित्र आत्म्याची शक्ती माझ्या ठिकाणीसुद्धा उपलब्ध आहे. पहिल्या प्रथम आपण आपल्या स्वत:च्या जीवनामध्ये हे सत्य स्वीकारले पाहिजे. येशूच्या पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने आपण पवित्र जीवन जगले पाहिजे. मग ती कृपा आपण आपल्या कुटुंबामध्ये, आजूबाजूला पसरू शकतो. आज येशूला सगळ्या लोकांकडे जायचे आहे. सगLयांना शुभवार्ता सांगायची आहे, सगळ्यांना प्रकाशात आणायचे आहे, सगळ्यांचे सांधे मोकळे करायचे आहेत. ते कसे? ते आपल्याद्वारे, आपल्यापैकी प्रत्येकाद्वारे, जेव्हा आज आपण येशूचा स्वीकार करून येशूच्या पवित्र आत्म्याने

संचरित होऊन बायबल वाचतो तेव्हा येशूचे शब्द इतरांच्या जीवनालादेखील लागू पडतात; त्यांनादेखील येशूकडून शाश्वत जीवन मिळू शकते.

येशू ख्रिस्त आपल्याला मरणाच्या दाढेतून काढून नवजीवन देण्याकरिता आलेला आहे. जितक्या प्रमाणात माणसाच्या जीवनात पाप असते तितक्या प्रमाणात तो हया जगामध्ये जगताना मरण अनुभवतो. जितक्या प्रमाणात फार मोठे पाप तितक्या प्रमाणात मरणाचा प्रभाव मोठा आणि मग शेवटी प्रत्यक्ष मरण जेव्हा येते तेव्हा सर्व काही नष्ट होते, असे आपल्याला वाटते. जो कोणी येशूवर विश्वास ठेवतो त्याला पुनरुत्थानाची आशा आहे. जो माझ्यावर विश्वास ठेवतो तो जरी मरण पावला तरी तो जगेल, हे येशूचे आश्वासन आहे. पुष्कळ लोक प्रवचन ऐकतात, पुष्कळ लोक शरीराच्या कानांनी शब्द ऐकत राहतात पण देवाचा शब्द ऐकणारे कोण आहेत? जे आपल्या अंत:करणाच्या कानांनी देवाचे सत्य ऐकतात आणि ते सत्य आपल्या अंत:करणामध्ये जतन करून ठेवतात आणि त्या सत्यावरती जीवन उभारतात ते लोक देवाचे वचन ऐकणारे आहेत. अशा लोकांकरिता येशू आज जे तुम्ही ऐकता ते तुमच्या बाबतीत घडत आहे असे येशू म्हणतो.

समारोप

हे प्रभो परमेश्वर पित्या, तुझ्या महान तारणयोजनेमध्ये मरिया मातेने आम्हाला तुझा पुत्र दिला. जो येशू जीवनदाता, जो येशू प्रत्यक्ष मृत्यूवर विजय देणारा आहे, जो येशू स्वत: आम्हाला समृद्ध जीवन देण्याकरिता आलेला आहे तो येशू मरिया मातेचा पुत्र आहे. म्हणून आम्ही तुला धन्यवाद देतो. तुझा गौरव करतो. मरिया मातेच्या मध्यस्थीद्वारे आम्ही येशूचा अधिकाधिक स्वीकार करावा म्हणून आम्हाला साहाय्य कर.

हे प्रभो येशू , जे कोणी तुझा शब्द ऐकतात त्यांना तुझ्या शब्दामधून कृपा मिळत. कारण तू म्हणतोस, जे कोणी माझा शब्द ऐकतात त्यांचे जीवन अधिकाधिक समृद्ध करण्यासाठी तू आलेला आहेस. तू स्वत: पुनरुत्थान आहेस. तू मृत्यूवर विजय मिळवलेला आहे.

हे प्रभो येशू, तू आम्हाला नवजीवनाची देणगी देण्याकरिता आलेला आहे. कारण जो पवित्र आत्मा तुझ्यावर उतरलेला आहे आम्हाला नवजीवन मिळावे म्हणून तू श्रद्धावंतांना देतोस. प्रभो तुझ्या पवित्र आत्म्याने आम्हाला भरून टाक. ही प्रार्थना आम्ही एकमनाने, एकदिलाने व एकमुखाने आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

# मुक्त चिंतन

■ डॉ. नरेश नाईक, विरार ७३५०५०८३१०
Nareshnaik55@gmail.com

कधी कधी मला असा प्रश्न पडतो की माणसाची खरी ओळख काय असते? मी अमूक अमूक आहे असं आपण एखाद्याला सांगतो तेव्हा आपल्याला नक्क्की काय सांगायचे असते? मी डॉक्टर आहे, इंजिनिअर आहे, शिक्षक-प्राध्यापक आहे किंवा लेखक, कवी, संगीतकार वगैरे आहे असं सांगितलं जातं तेव्हा ती त्या व्यक्तीची व्यावसायिक ओळख असते की व्यक्ती म्हणून ओळख असते? उपजीविकेव्यतिरिक्त आपली जी काही ओळख असते ती नेमकी कशी असते?

कोरोना काळात अनेक लोकांनी सेवाभावी मंडळे, संस्थांमार्फत कोट्यवधी लोकांना मोफत अन्न दिले. कोरोनाबाधीतांना हॉस्पीटलमध्ये दाखल करण्यापासून ते त्यांच्या औषधोपचारावर अनेक दानशूर लोकांनी सढळ हस्ते आर्थिक मदत केली. कोरोनाने जीव गमावलेल्या मृतांवर तर अनेकांनी आपला जात-धर्म विसरून अंत्यसंस्कारसुद्धा केले. हे सगळं करणा-या लोकांचा हा काही व्यवसाय नव्हता. कित्येकांनी अशा प्रकारचं काम यापूर्वी कधीच केलेलं नव्हतं. तरीही त्यांनी हे काम निरपेक्ष वृत्तीने केलं आणि आपण माणूस आहोत याचा परिचय दिला. त्यांच्यापैकी कित्येकांचा व्यवसाय काय, उपजीविकेचं साधन काय याचीही आपल्याला माहिती नाही. पण त्या सर्व लोकांनी केलेली उत्स्फूर्त कृती हीच त्यांची खरी ओळख आहे.

याच काळात गल्लोगल्ली वसलेले अनेक दुकानदार, प्रवासी वाहतूकदार, अन्नधान्याचे पुरवठादार, अनेक डॉक्टर व खाजगी हॉस्पीटल्स यांनी लोकांच्या असहायतेचा फायदा उठवून आर्थिक

लुबाडणूकही केली. व्यवसाय करताना आतला माणूस मरत जातो तो हा असा. ज्यांनी नफेखोरी केली ते फक्त व्यावसायिकच राहिले. पण ज्यांनी इतरांना मदत केली त्यांनी आपल्या आतला माणूस जिवंत ठेवला. ही आतला माणूस जिवंत ठेवण्याची उर्मी व्यक्तीव्यक्तीगणिक कमीजास्त असेल. पण त्यातून जागे होणारे माणूसपणाचे भान मात्र सारखेच असते.

आजकाल धर्म ही सुद्धा आपली मूलभूत गरज बनलीय. म्हणजे आपल्याकडे खायला अन्न नसलं, अंगावर धड कपडे नसले किंवा राहायला घर नसलं तरी आपल्याकडे कोणता ना कोणता धर्म हा असतोच. आपण आपापल्या धर्मानुसार आपला पेहेराव ठेवतो, अंगावर धर्माचे प्रतीक मिरवतो. यातून मी अमुक एक धर्माचा अनुयायी आहे हेच आपल्याला ठसवायचे असते. किंबहुना आपल्या व्यवसायासारखी धर्म ही सुद्धा आपण आपली ओळख म्हणूनच मिरवत असतो. तुम्ही हिंदू असाल तर मंदिरात जाता, पूजाअर्चा केल्यावर कपाळावर भगवा टिळा लावता, ख्रिस्ती असाल तर नियमितपणे चर्चमध्ये जाता किंवा मुसलमान असाल तर दिवसातून पाच वेळा नमाज अदा करता. आणि ह्यालाच आपण धार्मिक असणं असं मानतो. किंबहुना समाजही ही कर्मकांडे करणा-यालाच धार्मिक समजतो. पण यातून आपण खरेखुरे धार्मिक असल्याचे सिद्ध होते काय? कोरोनाच्या संकटात ज्या लोकांनी जातीधर्माच्या पलिकडे जाऊन गरजूंना मदत केली त्यांचा धर्म काय होता?

कोरोनाच्या आधी जगातले काही देश तर महासत्ता बनण्याची स्वप्ने पाहत होते. आर्थिक व युद्धसामग्रीच्या बळावर त्यांना सगळं जग आपल्या तालावर नाचवायचे होते. पण कोरोनाच्या सूक्ष्म विषाणुंविरोधात त्यांची युद्धसामग्री व अण्वस्त्रे कामी आली नाहीत. म्हणूनच या महामारीने आपल्याला जाती-धर्माच्या पलिकडे जाऊन एक माणूस म्हणून विचार करायला मजबूर केले आहे. कोरोनासारखे विषाणू जात, धर्म, लिंग, पंथ, प्रांत, देश असला भेद मानत नाहीत. पण आपण ते मानत आलो आणि लाखो लोकांचे प्राण देऊन त्याची किंमतही

चुकवली. कोरोनाचे हे विषाणू चीनमधल्या एका प्रयोगशाळेत तयार केले आणि तेथून ते जगभर पसरवले गेले अशी एक बातमी होती. यामागे चीनची साम्राज्यवादी भूमिका आहे हेही आता लपून राहिलेले नाही. सत्तेसाठी आपण एकदा विशिष्ट विचारसरणी स्वीकारली की ती टिकवण्यासाठी सत्ताविस्ताराचा मोह होणे अटळ आहे. किंबहुना सत्ता टिकवण्याच्या दृष्टिकोणातून ती एक अपरिहार्य कृतीच बनून जाते. परंतु या प्रवृत्तीचे मूळ माणसा माणसातील जातीय, धार्मिक किंवा वांशिक भेदात दडलेले आहे हेच आपण लक्षात घेतलेले नाही. म्हणूनच हे भेद जितके कट्टर होत जातील तितका माणुसकीचा वावर कमी कमी होत जाईल. आणि जर आपल्यातला माणुसच मरून जाणार असेल तर असल्या भेदाआडून हस्तगत केलेली सत्ता काय कामाची?

मानवाच्या उत्क्रांतीचा इतिहास फार जुना आहे. जंगलात व दऱ्याखोऱ्यात राहणारा माणूस आज आधुनिक निवाऱ्यात राहतो. सभोवताली सगळ्या सोयीसुविधा आहेत. माणसाच्या देहात आणि मेंदूतही बरीच उत्क्रांती झाली आहे. पण एक माणूस म्हणून आपले बौद्धिक व वैचारिक उन्नयन झाले आहे का हा खरा प्रश्न आहे. भौतिक प्रगती आणि काळावर मात करण्याच्या नादात आपण निसर्गाचा व पर्यावरणाचा बराच विनाश केला आहे. भूकंप, चक्रीवादळे, अकाली पाऊस व त्यामुळे होणारी वित्तहानी, जीवितहानी आपण असहाय होऊन सोसत आहोत. आपल्या अस्तित्वावरच घाला घालणाऱ्या या संकटातून आपण काहीच शिकायचं नाही का?

गेल्या महिन्यात दिल्लीला राष्ट्रपती महोदयांच्या हस्ते पद्म पुरस्काराचे वितरण झाले. त्यात राहीबाई पोरे व तुलसी गौडा या दोन स्त्रियांना पर्यावरण क्षेत्रात मोलाची कामगिरी केल्याबद्दल सन्मानीत करण्यात आले. सेंट्रल हॉलमधल्या रेड कार्पेटवरून त्या दोघी पुरस्कार घेण्यासाठी अनवाणी चालत गेल्या तेव्हा सगळा हॉल एकदम निःस्तब्ध झाला. अंगावर साडीचा पदर गुंडाळून आदिवासी पेहेरावात आलेल्या तुलसी गौडांना पाहून हॉलमधली सगळी सभ्य

संस्कृती लाजेने चूर झालेली दिसत होती. अशा लोकांना सन्मानीत केल्याबद्दल निवड समितीचे अभिनंदनच करावयास हवे. पण कळत नकळतपणे त्यांनी आपल्याच देशातील दोन संस्कृती एकमेकांच्या समोर आणून उभ्या केल्या. एका बाजुला पर्यावरणाच्या विनाशालाच कारणीभूत ठरणारी आधुनिक संस्कृती आणि दुस-या बाजुला पर्यावरणाच्या रक्षणासाठी उभं आयुष्य वेचणाऱ्या दोन स्त्रियांची प्राकृतिक संस्कृती. यापैकी आपण कोणत्या संस्कृतीचा पुरस्कार करणार आहोत हा खरा प्रश्न आहे.

कृषीसंस्कृती हा पर्यावरणाचा अभिन्न घटक आहे हा मुद्दा आपण लक्षातच घेतलेला नाही. उपभोग हे पाश्चात्य संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे. म्हणूनच त्या देशांनी शेतीला व्यावसायिक दर्जा दिला. म्हणून आपणही त्यांचेच अनुकरण केले पाहिजे असा काही नियम नाही. म्हणूनच नव्या कृषी कायद्याला शेतकरी बांधवांनी विरोध केला. निसर्ग आम्हाला शेतीतून जे देतोय ते खाऊन आम्ही सुखाने जगतो आहोत. आम्हांला तुम्ही लादत असलेल्या पंचतारांकीत विकासाची गरज नाही हीच गोष्ट शेतकऱ्यांनी आपल्या आंदोलनातून सांगितली. एका बाजुला तुलसी गौडा आणि राहीबाई पोरे यांच्यासारख्या वंचित आणि दुर्लक्षित स्त्रियांचा नागरी सन्मान करायचा आणि दुसऱ्या बाजुने वेगवेगळ्या कायद्यांच्या आडून त्यांच्याच संस्कृतीवर आघात करायचा या विसंगतीचा अन्वय कसा लावायचा?

जाती-धर्माच्या नावाखाली मतांचे धृवीकरण करून निवडणूक जिंकण्याला आपल्या राजघटनेनेच मान्यता दिल्यासारखी आजची परिस्थिती आहे. संसदीय लोकशाहीत बहुमताचे महत्त्व नाकारून चालत नाही. परंतु याच बहुमताचा वापर जाती-धर्मात दुही आणि भेदाभेद करण्यासाठी केला जात असेल तर? अलिकडच्या काळात अशा अनेक घटना घडवल्या गेल्या, ज्याने आपल्या समाजाची एकात्मिक वीणच उसवून टाकण्याचा सपाटा लावला आहे. यात राजकीय पक्षांचा दोष आहेच. पण त्यांच्यापेक्षा जास्त दोष राजकीय पक्षांच्या भुलथापांना बळी पडणा-या तरूणांचा आहे. त्यात समाजमाध्यमांचा

वाटाही मोठाच आहे. स्मार्टफोनच्या आहारी गेलेली ही पिढी कोणत्याही घटनेवर तात्काळ व्यक्त होतात. प्राचीन काळी सुंदर तरूणीला रोज थोडं थोडं विष देऊन विषकन्या बनवण्याचा प्रकार अस्तित्वात होता. अशी विषकन्या आपल्या शत्रूचा काटा काढण्यासाठी वापरली जात असे.

आज समाजमाध्यमांवर व्यक्त होणाऱ्या तरूणांचा वापर त्याच पद्धतीने सुरू आहे. व्हाट्स ॲप, ट्विटर किंवा फेसबुकवरून ज्या मतांचा आणि विचारांचा रतीब घातला जातोय आणि आपल्या विरोधकांवर ज्या भाषेत हल्ले चढवले जात आहेत ते पाहता या तरूणांचा शस्त्रासारखा वापर होतोय हे लक्षात येते. हे सगळे जाती-धर्माच्या नावाने चाललेले असल्यामुळे सामान्य वाचकही याला बळी पडतात. स्वतःच्या भवितव्याचे प्रश्न बाजुला सारून जाती-धर्माच्या विळख्यात जखडून घेणाऱ्या या तरूणांचे भवितव्य काय असणार आहे?

अहिंसावादावर सातत्याने केला जाणारा हल्ला हाही एक चिंतेचा विषय आहे. ज्यांना अहिंसा मान्य नाही त्यांच्यावर कुणी सक्ती करू शकत नाही. पण अहिंसेपेक्षा हिंसाच श्रेष्ठ हा मुद्दा समाज मनावर ठासून बिंबवला जातो आणि त्याआडून अहिंसाविचार हा कसा समाजाला घातक आहे हे पटवून देण्याचे प्रयोग सुरू होतात तेव्हा मात्र याची गंभीरपणे दखल घ्यावीच लागते. एक जीवनमूल्य म्हणून आपण अहिंसेकडे पाहिले तर त्यातून माणसाला माणूस म्हणून जगण्याची नक्कीच प्रेरणा मिळते. वर उल्लेख केलेल्या जातीधर्मातील भेदांचे पर्यावसान हिंसेतच होते याचा अनुभव आपण वारंवार घेतला आहे. आजपर्यंत झालेल्या सर्व युद्धांचा इतिहास तपासून पाहिला तर त्यातून प्रचंड प्रमाणात हिंसाच झालेली आढळून येते. पण एवढी हिंसा घडवूनही त्यातून युद्ध लादणाऱ्या देशाचे, तेथल्या लोकांचे काही भले झाले आहे असे मात्र दिसून येत नाही. तरीही आम्हांला हिंसेचे एवढे आकर्षण का वाटते?

# तीन राजांचे तीर्थस्थान

■ प्रा. स्टीफन आय परेरा, सांडोर, वसई.
संपर्क :- ९८५०८७८१८९

बेथलेहेम गावी येशूचा जन्म झाल्यावर त्याला भेटण्यासाठी पूर्वेकडून तीन खगोलशास्त्रज्ञ एका विशिष्ट ताऱ्याचा वेध घेत आले होते, त्याचे सविस्तर वर्णन आपण मत्तय २:२-११ मध्ये वाचतो. जुन्या करारातील स्तोत्रसंहिता ७२:१० मध्ये "शिबा व शेबाचे राजे त्याला नजराणे घेऊन येतील" असा उल्लेख आहे. त्याचा संदर्भ लावून या तीन खगोलशास्त्रज्ञांना 'तीन राजे' म्हटले गेले आहे. वास्तविक त्यांना राजे म्हणणे काही अंशी बरोबरच आहे; कारण तेही येशू बाळासाठी नजराणे घेऊन आले होते. त्यांनी आणलेल्या भेटवस्तू होत्या, सोने, ऊद आणि गंधरस. त्यांना प्रतीकात्मक अर्थ आहे. सोने म्हणजे ख्रिस्ताचे राजेपण, ऊद म्हणजे त्याचे दैवीपण आणि गंधरस, त्याच्या दु:खसहनाचे आणि मरणाचे चिन्ह असल्याचे दर्शविते. या तीन राजांना कालांतराने पाश्चिमात्य संस्कृतीत कॅस्पर, मेल्किओर आणि बाल्थाझार अशी नावे देण्यात आली.

असे हे तीन राजे पूर्वेकडून आले असल्याचा उल्लेख असला तरी ते प्रत्यक्ष कोणत्या देशातून आले होते आणि येशूला भेटल्यानंतर ते कुठे गेले याबाबत बायबलमध्ये किंवा इतर सुप्त वाङमयात कुठेच उल्लेख नाही. एक गोष्ट मात्र निश्चित की ते परप्रांतीय व परधर्मीय होते. ते सर्व मानवजातीचे प्रतिनिधी होते. त्यांनी येशूला नमन केले, म्हणजे येशू हाच सर्वांचा राजा आहे.

जर्मनीत कोलोन येथे या तीन राजांच्या नावाने एक ख्रिस्तमंदिर आहे. आता त्याला तीर्थस्थानाचा (Shrine) दर्जा देण्यात आला आहे. आर्चबिशप रेनॉल्ड व्होन डॅसिल यांनी इटलीतील मिलान शहरातून तीन राजांच्या अस्थींचे अवशेष कोलोनला आणून याच मंदिरात ठेवले आहेत.

या तीर्थस्थानाचे वैशिष्ट्य म्हणजे ते कोलोनच्या महामंदिराच्या आतमध्ये बांधलेले असून अशा प्रकारचे ते जगातले एकमेव तीर्थस्थान आहे. कोलोनचे महामंदिर म्हणजे जर्मनीचा अभिमान (Pride Of Germany) समजले जाते. याच महामंदिराच्या गाभाऱ्याच्या आतल्या बाजूस मुख्य वेदीच्या मागे सोनेरी पेटीच्या आकारात साकारलेली इमारत हेच तीर्थस्थान होय.

आर्चबिशप रेनॉल्ड व्होन डॅसिल यांच्या इच्छेनुसार त्यांच्या पश्चात आर्चबिशप कॉनराड हॉक्टँडेन यांनी दिनांक १५ ऑगस्ट १२४८ रोजी या महामंदिराची पायाभरणी केली व अनेक वर्षानंतर त्याचे काम पूर्ण झाले. या मंदिराची उभारणी अशी करण्यात आली आहे की, त्याच्या मध्ये असलेल्या तीन राजांचे अवशेष ठेवलेल्या तीर्थस्थानाच्या खालून भाविकांना जाण्यासाठी रस्ता ठेवलेला आहे. सरकारी अधिकारी, धर्माधिकारी, मोठमोठ्या पदावरील व्यक्ती आणि भाविकही या वाटेने जाण्यात धन्यता मानतात. काही वर्षापूर्वी कोलोनला जागतिक युवा संमेलन भरले होते त्यावेळी हजर असलेल्या पोप बेनेडिक्ट सोळावे यांनीही तीन राजांच्या अवशेषांखालून जाण्याची संधी दवडली नाही.

महामंदिराच्या आतील गाभाऱ्यात ठेवलेल्या तीन राजांच्या अवशेषांची सोनेरी पेटी त्याकाळातील सुप्रसिद्ध कलाकार निकोलस व्होन व्हॅर्डन यांनी बनवली आहे. या मंदिराला तीन गाभारे असून मंदिराच्या पुढच्या भागावर बाळ येशूला नमन करून भजणाऱ्या तीन राजांचे भलेमोठे चित्र कोरलेले आहे. मंदिराच्या मागच्या बाजूला येशूचे दुःखसहन आणि क्रूसावरील बलिदान यांची चित्रे कोरलेली आहेत. तळमजल्याच्या दोन्ही बाजूंनी जुन्या करारातील राजे, संदेष्टे आणि कुलपती यांचे पुतळे तर वरच्या मजल्यावरील कमानीत सर्व प्रेषितांचे पुतळे उभे करण्यात आले आहेत.

या मंदिराची सजावट काचेसारख्या चकचकीत आवरणाने करून त्यावर हिरे-रत्ने लावलेली असल्याने ते मंदिर एकमेव अतिमौल्यवान व अतिसुंदर बनले आहे. कोलोनचे हे मंदिर संपूर्ण जर्मनीचे हृदय समजले जाते तर महामंदिरातील तीन राजांचे तीर्थस्थान हे त्या मंदिराचे हृदय मानले जाते.

संदर्भ :- द एक्झामिनर १० जानेवारी २००९

# शिक्षक आणि वैज्ञानिक दृष्टिकोन

■ फ्रान्सिस आल्मेडा सर, निर्मळ, वसई

शिक्षणाच्या सहाय्याने समाजपरिवर्तन घडवून आणण्यासाठी शिक्षकांची भूमिका अतिशय महत्त्वाची असते. शिक्षकांचा शिक्षण प्रक्रियेविषयीचा दृष्टिकोन त्यांच्या शिकवण्यावर परिणाम करीत असतो आणि त्यातूनच विद्यार्थ्यांची जडणघडण होत असते. शिक्षणामधून सुसंस्कार करीत असताना समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करणे हीदेखील एक महत्त्वाची गरज असते याची जाणीव शिक्षकांना असणे आणि तशाप्रकारचा दृष्टिकोन देखील शिक्षकांमध्ये असणे आवश्यक असते. वैज्ञानिक दृष्टिकोन शिक्षकांमध्ये नसेल तर अशा प्रकारच्या दृष्टिकोनाची समाजाला गरज आहे याची जाणीव देखील त्याला असू शकत नाही. वैज्ञानिक दृष्टीकोन सर्व नागरिकांमध्ये असेल तर केवळ वैज्ञानिक प्रगतीच नव्हे तर सर्व प्रकारची बौद्धिक व भौतिक प्रगती होऊन देशाचा झपाट्याने विकास होतो.

वैज्ञानिक दृष्टिकोन काय असतो हे समजून घेणे आवश्यक आहे. मानवाच्या बुद्धीचा विकास झाल्यापासून त्याला निरीक्षणाच्या आधारे तर्कसंगत विचार करता येऊ लागला. एखादी कृती घडून येण्यासाठी कारण असावे लागते हे त्याला निरीक्षणाने कळले. परंतु जर कारण कळले नाही तर त्यासाठी त्याला कल्पना करावी लागली. निसर्गात नेहमी घडणाऱ्या गोष्टी का घडून येतात याची कारणे त्याला माहीत नव्हती. सूर्याचे उगवणे मावळणे, पाऊस पडणे, विजा चमकणे, ढगांचा गडगडाट यासारख्या घटनांचे स्पष्टीकरण त्याला देता येत नव्हते. त्यासाठी कल्पना करून तर्कसंगत उत्तरे देण्याचा प्रयत्न म्हणजे विविध धर्मग्रंथ व तत्वज्ञाने होत.

मानवाकडे निरीक्षणशक्ती, कल्पनाशक्ती आणि तर्कसंगत विचार करण्याची शक्ती होती. परंतु या गोष्टी प्रयोगाने पडताळून पाहण्याची क्षमता त्याच्याकडे नव्हती, ती विज्ञानाने दिली. त्यातूनच वैज्ञानिक दृष्टिकोनाचा उदय झाला. विजेचे चमकणे आणि ढगांचा गडगडाट निरीक्षणाने कळते. त्याचे कारण कल्पनेने सांगितल्यानंतर त्याचे तर्कसंगत स्पष्टीकरण करता येते. परंतु प्रयोगाने पडताळून पाहता येणे महत्त्वाचे असते. आता आपल्याला प्रयोगाने ठाऊक झाले आहे की ढगावर जमा होणाऱ्या विद्युत प्रभाराच्या प्रभावाने वीज चमकते आणि विजेच्या प्रभावाने प्रचंड ताप वाढून गडगडाट होतो. पृथ्वी सपाट दिसत असलेली तरी ती गोलाकार आहे आणि सूर्य पृथ्वीभोवती फिरत नसून तिच्या स्वतःभोवती फिरण्यामुळे सूर्य तिच्या भोवती फिरताना दिसतो. त्यामुळे निरीक्षण आणि तर्कसंगत विचार यांच्या बरोबरच प्रयोगाच्या आधाराने आपल्याला सत्यस्थिती कळू शकते हे आपल्याला समजले. गॅलिलिओ या शास्त्रज्ञांच्या पूर्वी ॲरिस्टॉटलने सांगितलेली एक गोष्ट विद्यार्थ्यांना शिकवली जात असे, ती म्हणजे उंचावरून खाली सोडलेल्या वस्तू मध्ये जड वस्तू लवकर खाली येते आणि हलकी वस्तू उशिरा खाली येते. हजारो वर्षे हे भौतिक विज्ञानामध्ये शिकवले जात होते. परंतु गॅलिलिओने जेव्हा प्रत्यक्ष प्रयोग करून पिसाच्या मनोऱ्यावरून दोन वस्तू खाली सोडल्या आणि आपल्या विद्यार्थ्यांना दाखवून दिले, की जड आणि हलकी दोन्ही वस्तू एकाच वेळेला खाली येतात, त्यावेळी विचार करण्याच्या प्रक्रियेतील प्रयोगाच्या प्रक्रियेचे महत्त्व स्पष्ट झाले. यालाच वैज्ञानिक दृष्टिकोन असे म्हणतात.

वैज्ञानिक दृष्टीकोन ही विचार करण्याची पद्धत विज्ञानातून निर्माण झालेली असली, तरीही तिचा उपयोग जीवनाच्या सर्वच क्षेत्रांमध्ये करता येऊ शकतो. किंबहुना सत्याचा शोध घेण्याची ती एक विश्वसनीय पद्धत ठरली आहे!

वैज्ञानिक पद्धतीने विचार करून मानव अवकाशात दूर अंतरावरील ग्रहावर पोहोचू शकला, तसेच कम्प्युटर, मोबाईलसारखी उपकरणे तयार करू शकला हे सत्य आहे. त्याचबरोबर आरोग्याच्या क्षेत्रातील भरारी आपल्या डोळ्यासमोर आहे. त्यामुळे मानवाची

आयुर्मर्यादा शंभरीच्या जवळपास पोहोचलेली आहे. विज्ञानाच्या प्रगतीने जीवनाच्या सर्व क्षेत्रात बदल घडवून आणले आहेत.

वैज्ञानिक दृष्टिकोन आपल्याला, विज्ञानापलीकडे असलेल्या जीवनाच्या क्षेत्रात देखील वेगळ्या पद्धतीने विचार करायला भाग पाडतो. इतिहास, भूगोल, नागरिक शास्त्र, राजकारण, समाजकारण, साहित्य, कला, धर्म, अर्थशास्त्र, शिक्षण, न्याय या सगळ्या क्षेत्रात वैज्ञानिक दृष्टीकोन वेगळ्या पद्धतीने विचार करायला शिकवतो. केवळ कल्पना आणि तर्क यावर विसंबून न राहता प्रयोग करायला भाग पाडतो, त्यामुळे वैज्ञानिक दृष्टीकोनाला जीवनाचे कोणतेही क्षेत्र वर्ज्य राहिलेले नाही!

वैज्ञानिक दृष्टिकोन जीवनात शिक्षकांच्या माध्यमातून येऊ शकतो. परंतु आपल्याकडील शिक्षणात पाठ्यपुस्तके आत्मसात करून परीक्षेची उत्तरे लिहिणे यावर भर असल्यामुळे वैज्ञानिक दृष्टिकोन बाजूलाच राहतो. शिक्षकांकडे हा दृष्टिकोन नसेल तर त्यांचा भर केवळ परीक्षा पास होणे व परीक्षेत गुण मिळवणे एवढाच मर्यादित राहतो. आपल्याकडे बहुसंख्य शिक्षक त्यामुळेच विद्यार्थ्यांना वैज्ञानिक दृष्टिकोन देऊ शकत नाहीत. केवळ विज्ञान शिकवणारे शिक्षकच नव्हे तर सर्व विषयांच्या शिक्षकांमध्ये या दृष्टिकोनाची गरज आहे. विज्ञान शिकवताना वैज्ञानिक दृष्टिकोन जसा वापरावा लागतो तसा तो भाषा, गणित, सामाजिक शास्त्रे, कला आणि खेळ शिकवताना देखील वापरता येऊ शकतो. त्यासाठी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्याची पूर्ण मोकळीक असावी लागते. कोणत्याही गोष्टीवर डोळे मिटून विश्वास न ठेवता, चिकित्सक बुद्धीने स्वतंत्र विचार करून आपले मत तयार करायला विद्यार्थ्यांना प्रवृत्त करावे लागते. ही गोष्ट आपल्या या शिक्षणपद्धतीतून होत नाही. त्यामुळेच जीवनाच्या सर्व क्षेत्रात, उच्चशिक्षित देखील आहे त्या स्थितीत राहणे पसंत करतात. आपल्या जीवनात वैज्ञानिक दृष्टिकोनातून विचार करून त्यात बदल घडवून आणण्याची क्षमता जर शिक्षणाने दिली नाही, तर शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे साधन होऊ शकत नाही.

सध्या शिक्षकांकडे या वैज्ञानिक दृष्टिकोनाचा मोठ्या प्रमाणात अभाव आढळतो. त्यामुळे चालू शैक्षणिक पद्धतीमध्ये हा दृष्टिकोन कसा वापरता येईल हा विचारही त्यांच्याकडून केला जात नाही. विज्ञान शिकवणारे शिक्षकदेखील अंधश्रद्धेला बळी पडतात. परीक्षेला जाण्यापूर्वी देवाला नमस्कार करून प्रार्थना करणे या प्रकाराचे समर्थन केले जाते. शासनातर्फे देखील मूल्यशिक्षणाच्या नावाखाली विविध धार्मिक श्रद्धांचे पारायण केले जाते. सरस्वती वंदना किंवा देवाला अभ्यासासाठी मदतीसाठी आवाहन करणे या गोष्टी वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या विरुद्ध आहेत. आपल्या चर्चने चालवलेल्या शाळांमधून विद्यार्थ्यांना सक्तीने धार्मिक शिक्षण दिले जाते. रविवारी संडे स्कूल असते त्यामध्ये बायबल शिकवले जाते. धार्मिक शिक्षणामध्ये कोणत्याही प्रकारच्या स्वतंत्र विचाराला वाव नसतो. हजारो वर्षांपूर्वी लिहिलेल्या गोष्टी सत्य मानाव्यात असे गृहीत धरले जाते. विद्यार्थ्यांना स्वतंत्र विचार करायला शिकवले, प्रश्न विचारण्यासाठी वाव ठेवला आणि प्रयोग करून पाहण्यासाठी संधी दिली तर विद्यार्थी निश्चितपणे वैज्ञानिक दृष्टीकोन स्वीकारतील या विषयी शंका नाही.

शिक्षकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्यासाठी अशा प्रकारची जाणीव असलेल्या शिक्षकांनी एकत्र येऊन शिक्षकांच्या सभेमध्ये या विषयावर चर्चा घडवून आणली पाहिजे. त्याचप्रमाणे व्हाट्सएप्प सारख्या माध्यमातून वैज्ञानिक दृष्टिकोनावर आधारित अशा पोस्ट तयार केल्या पाहिजेत तसेच अवैज्ञानिक व अंधश्रद्धेवर आधारित असणाऱ्या पोस्टची चिकित्सा केली पाहिजे. अंधश्रद्धा निर्मूलन सारख्या चळवळीशी जोडून घेतले पाहिजे. प्रत्यक्ष प्रयोग करून एखादी गोष्ट सत्य आहे हे दाखवून दिले पाहिजे. त्यामुळे हळूहळू शिक्षकांचा दृष्टिकोन बदलत जाईल आणि त्याचा परिणाम विद्यार्थ्यांवर तसेच एकूण शिक्षण व्यवस्थेवर देखील होईल.

# गटाराच्या पाईपातील ख्रिस्तजयंती

■ फादर मायकल जी, नानभाट, वसई

ती २४ डिसेंबरची रात्र होती. ज्युडीथने जेरोमची खूप वाट पाहिली. जेरोमबरोबर घेतलेली काश्मिरी साडी नेसून ती तयार होती. 'संध्याकाळी सहाला घरी टच होईन' असे त्याने वारंवार कबूल केले होते पण घड्याळात साडे अकराचा टोला पडला तरी त्याचा पत्ता नाही. मोबाईल लावला तर उचलत नाही. एकदा वाटलं होतं, सगळा साज उतरवून सरळ झोपी जावे! पण मुले थोडीच शांत बसणार? अखेर दोघा मुलांना तयार करून ती मध्यरात्रीच्या मिस्साला चर्चच्या दिशेने चालू लागली. रस्त्याला जोडपी कशी हातात हात घालून चालली होती ऐटीत!

ती मनात खूप चरफडत होती. पण जेरोमचे हे वागणे तिला काही नवीन नव्हते. दिवाळीच्या रजेत वीणा ट्रॅव्हलबरोबर नोंदवलेली काश्मिर ट्रिप कॅन्सल करावी लागली होती, भावाला हार्टअटॅक आला होता म्हणून.. हार्टअटॅक्स कोणाला येत नाहीत का? का ते सगळेच मरतात? आणि भावाचे कुटुंब नाही का त्याला बघायला? बरा मुंबईला फ्लॅटमध्ये जाऊन राहिला आहे, आई बाबांना आमच्या हवाली करून!

नेहमीच जेरोम लष्कराच्या भाकरी भाजत असतो! फक्त आता पहावयाचे होते की आज कोणत्या प्रकरणात स्वारी अडकली आहे. आज त्याने तिचा सारा मूड घालवला. मोठा मुलगा नितीन सफारीमध्ये हँडसम दिसत होता. पण त्याचे कौतुक करण्यासाठी तिचे मन उल्हासित होईना. आज तो नाताळच्या नाटकात भूमिका करणार आहे, त्याविषयी तो वाटेला बडबडत होता.

"मम्मी, मला सफारी काढून कॉस्च्युम घालावा लागेल हं, सफारी तुझ्याकडेच ठेवीन! पण ज्युडीथ फक्त 'हं हं' म्हणण्याव्यतिरीक्त अधिक काही व्यक्त करण्याच्या अवस्थेत नव्हती.

तेवढ्यात धाकटा रोहन ठेच लागून पडला. रडू लागला. त्याला दोन रपाटे लगावून तिने त्याला खेचतच रस्त्याला काढले. शेजारी चाललेल्या क्लेराने तिला हटकले, "अगं

ज्युडीथ, आज काय अशी मुलांना हिडीसफिडीस करतेस?”

ज्युडीथ फक्त थोडी हसली आणि पुढे चालू लागली. पण मनात गुरगुरली, “कळत नाही? तू कशी नवऱ्याबरोबर मिरवत चालली आहेस? मला नाही तसे वाटत?

ती देवळात शिरली तेव्हा नवजात येशूबाळाची मिरवणूक निघाली होती. पण तिला सारेच उदासवाणे वाटू लागले. जे दिसे, जे ऐकायला येई त्या सर्वांवर ती टीकेचा आसूड ओढू लागली. मिरवणुकीत सर्वात पुढे प्रार्थनासंघाचे नेते गोट्याशेठ होते, पत्नीबरोबर आपले स्वतःचे नवजात बालक घेऊन. यंदा फादर रॉबिननी नवीन प्रथा पाडली होती, नवजात अर्भकांच्या जोडप्यांना आरंभीच्या मिरवणूकीत पवित्र कुटुंबाबरोबर अग्रक्रमाने सहभागी करायचे.

‘प्रथा अर्थपूर्ण आहे पण मिरवणुकीत ज्यांना मिरवत न्यायचे त्यांचे वर्तन पारखून नको का पाहायला?’ तिचं मन पुटपुटलंच. ‘गोटयाशेठने आपली जमीन चर्चला स्वस्तात दिली म्हणे; पण अर्धी किंमत रिसीट शिवाय घेतली ती?’ खोट्या व्यवहाराने खरेदी केलेल्या जमिनीवर हे फादर देवाला विराजमान करणार! काय मुल्ये शिकवणार त्या मंदिरातून? धर्म म्हणजे सारे सोंग नि ढोंग झाले आहे!

गोट्याशेठच्या हातातील अंगठ्या आणि गळ्यातील भलीमोठी जाडजूड सोन्याची साखळी पाहून तिला टीव्ही सिरीयलमधला एक सीन आठवला, ‘एक आध्यात्मिक गुरू होते. सिल्की कपड्यात, लोडाला टेकलेले. हातांच्या सर्व बोटांत आंगठ्या नि चेहऱ्यावर सुबत्तेचे तेज चढलेले! पायात खडावा खुंटीच्या पण लपवायला मखमली भगवा पट्टा आडवा पायावर... तिला वाटलं, ‘दास डोंगरी राहतो, असे शिकवत दऱ्याखोऱ्यातून रामदास उगाच भटकले; पायांच्या अंगठ्यात खडावांची खुंटी सांभाळत, राष्ट्रभक्ती आणि शक्तिपूजा जागवत.’

ती देवळात शिरून बाकावर बसते इतक्यात तिला मागून खांद्यावर स्पर्श झाला. तिने मागे पाहिले, तो जेरोम होता. तिला बरे वाटले, पण एक क्षणच. दुसऱ्या क्षणी तिच्या अंगाचा तिळपापड झाला. तो फॅक्टरीच्या कपड्यानेच चर्चमध्ये आला होता. ‘शी! घाई झाली होती तर नसते ययचे देवळात!’ तिने तोंड वेदीकडे फिरविले. तिचे लक्ष पुन्हा गोट्याशेठकडे गेले. गोट्या नव्याकोऱ्या सुटात आणि बायको रेशमी साडीत होती. ‘आणि माझ्या

नशिबात हा खादीचा दिवसभर चुरगळलेला झब्बा’ पाठीवर झुरळ पडल्यासारखे तिला वाटू लागले. उच्चभ्रू समाजापुढे असे आपले ओंगळ प्रदर्शन करण्यापेक्षा सरळ निघून घरी जाण्याचा ती विचार करू लागली.

तेवढ्यात फादरांनी येशूबाळ वेदीवर ठेवले. तेथेही तिला विरोधाभासच दिसला. फादरांचे विधीसाठी परिधान केलेले भरजरी व्हेस्टमेंट्स आणि हातात उघडे-नागडे येशू बाळ. तेव्हा कुणीतरी तिच्या कानात हलकेच कुजबुजले, “त्यामानाने जेरोमचा झब्बा गरीब येशूबाळाला अधिक साजेसा नाही का?” तेवढ्यात तिला मागून ठुसकी मिळाली. तिने दुर्लक्षच केले. पण जेरोम कसा तिला सोडणार? शेवटी तो पुटपूटला, “चावी दे. घरी पाहुणे आले आहेत.”

‘चला, निदान या अवघडलेल्या स्थितीतून आपण मुक्त होत आहोत’ या विचाराने तिला थोडेसे हायसे वाटले. तिने चावी दिली आणि तो निघून गेला. ‘कोण पाहुणे असावेत बरे? नाताळसाठी आले असावेत का? नक्कीच नसतील, कोणी ‘जंटलमन’. त्यादिवशी तर भोतमांगे नावाचा कोणी निर्वासित माणूस घरात आणला होता. खैरलांजी प्रकरणी त्याला मुलाखतीसाठी कोण्या संस्थेने मुंबईच्या ओबेरॉय हॉटेलात आणला आणि मुलाखत संपताच त्याला तसाच एकटा सोडून सारी नेतेमंडळी आणि वार्ताहर निघून गेले.

फादर आता शुभवर्तमान वाचू लागले, “त्या रात्री काही धनगर रानात आपल्या कळपाची राखण करत होते. देवदूत त्यांना म्हणाला, “अरे, इथे काय पेंगत बसला आहात? जा, तुमच्या हक्कांसाठी झगडेल असा त्राता बेथलेहेमात जन्माला आहे!”

चर्चच्या गर्भगृहात बसलेले ‘धनगर’ ऊठले, तिचा मुलगा नितीन एक धनगर बनला होता. ‘येडा बघा’ असे म्हणत ती हसलीच. ‘कमरेला गोणपाट आणि खांद्यावर फाटका टॉवेल, असु दे. हे सारे थोडावेळ नाटकासाठी. नंतर आज जाईल नि नवा वुलनचा सफारी घालून बाहेर येईल.’

प्रवचनात फादर बोलत होते, “ख्रिस्त देवाचा पुत्र, तरी स्वर्ग सोडून तो मानव झाला. एखाद्या राजाच्या राजवाड्यात नाही तर गरीब हद्दपार झालेल्या एका कुटुंबात, गाईच्या गोठ्यात जन्माला आला. कशासाठी? संत पौल म्हणतो, “त्याला रिक्त व्हायचे होते.” संपत्ती, धन, मानपान सारे त्याने सोडून दिले. येशू स्वतःच म्हणतो, ‘पक्ष्यांना घरटी आहेत; कोल्ह्यांना बिळे आहेत पण

मनुष्याच्या पुत्राला डोके टेकावयास जागा नाही...”

‘मग फादर, तुमच्या अंगावर ही भरजरी वस्त्रे कशाला? ज्युडीथचे विषण्ण मन गुरगुरलेच.

फादर पुढे म्हणाले, “एकदा एक माणूस रात्री झोपायला गेल्यावर एका तासात जागा झाला“ गोष्ट सुरु झाली म्हणून तिचे लक्ष काहीसे केंद्रित झाले. “तो अस्वस्थ होता. आपले पोट बिघडले आहे याची त्याला जाणीव झाली. रात्री तो एका समारंभात मेजवानीसाठी गेला होता. जेवण वाजवीपेक्षा जास्त झाले होते. ह्या कुशीवरून त्या कुशीवर तळमळत तो वेळ काढू लागला. पण चैन काही पडेना. तो उठून बसला. त्याला वाटले, एकदा का पोटातले बाहेर पडले असते तर हलके वाटले असते. पण शौचालाही इच्छा होत नव्हती. शेवटी अस्वस्थता सहन होत नाही, म्हणून त्याने काय केले असेल? तो मोरीत गेला, घशात बोटे घातली आणि उलटी करवून घेतली. तेव्हा मात्र त्याला आरामच पडला नाही, तर शांत झोपही लागली”

ज्युडीथ संतापली. ‘शी! काय ही उदाहरणे! उलट्या आणि शौचाला; ही भाषा का आजच्या सुंदर सणाच्या दिवशी प्रवचनात करायची? किती ओंगळ वाटते!’

“पण मित्रहो...” फादर पुढे सरकले, साधूपुरुष धनाच्या बाबतीत हा असा वागतो. त्याला धनाचे अजीर्ण होते. धन आपल्याजवळ जमा होताच ते केव्हा एकदा इतरत्र जाते, असे त्याला होते; तोवर त्याला शांती लाभत नाही. धनदौलत ही साधुपुरुषाला अडगळीसारखी वाटते. कधी एकदा आपण त्यापासून मुक्त होतो, असे त्याला होऊन जाते.”

कावीळ झाली की सारे पिवळेच दिसते; तशी ज्युडीथच्या मनाने नकारात्मक कमेंट केलीच. ‘हो, जेरोमला तशीच संपत्तीची किळस येते. झोपडपट्टीतल्या लोकांसाठी झटतो आणि अगदी तसेच दरिद्री जीवन स्वतः जगू पाहतो. पण म्हणावं, बायको आणि दोन मुले आहेत तुला!’

तिला मनाच्या एका कोपऱ्यात कुठेतरी अजून वाटत होते, ‘मिस्सा संपता संपता तरी जेरोम सुटाबुटात येईल आणि धाकट्याला उचलील. मग आपण नितीनचा हात धरू आणि चौघे गोठ्याजवळ जाऊन पवित्र कुटुंबाकडे प्रार्थना करू. तिथे दोनचार मैत्रिणी नक्कीच भेटतील, माहेरी आलेल्या.

एकदोनदा तिने मागे वळून पाहिलेसुद्धा; पण जेरोमचा पत्ता नव्हता. ती रोहनला घेऊन एकटीच निघाली गोठ्याजवळ.

यंदाचा गोठा म्हणे नाविन्यपूर्ण आहे. युवा संघाने बनविला आहे पण दिग्दर्शन आहे फादर रॉबिनचे! फादर रॉबिन काही विचित्रच, ते वेगळ्याच मातीचे घडवलेले दिसतात. गोठा हमरस्त्यावर उभारला होता. काहीतरी चकित करणारे पहावयास मिळणार आहे, म्हणे. तिला आठवले, काही दिवसांपूर्वी फादर रॉबिन घरी आले होते. जेरोमबरोबर झालेला संवाद तिला आठवला.

ते जेरोमला म्हणाले, "जेरोम, मला ख्रिस्तजयंतीचा पारंपारिक गोठा मुळीच पसंत नाही. जेरोम लगेच दुजोरा देत म्हणाला होता, "ख्रिस्तजयंतीनिमित्त घराघरात गोशाळा बनविण्याचा आपला प्रघात आहे, पण कृत्रिम आणि नेहमीच्या गोठ्यांऐवजी ख्रिस्तजन्माचा वास्तववादी संदेश देणारे गोठे बनवायला हवेत. त्या मुळ घाणेरड्या गोशाळेची आजच्या काळात अनुभूती देणारी ती प्रतिकृती असावी.

'बरोबर, त्या येशूजन्माच्या गाईच्या गोठ्यात किती अंधार असेल! जेमतेम कंदिलाच्या उजेडात ते कुटुंब तिथे पडले असेल. ऐनवेळी टपकल्यामुळे तेथे स्वच्छता तर मुळीच नसेल. शेण काय नि उग्र वास किती! पण आज? आपण मात्र येशूबाळाच्या गोठ्यात इलेक्ट्रिक रोषणाई करतो; रंगरंगोटी करतो. सेंटही मारतो! सारे चकाचक करून येशूबाळाला आरामशीर जागा बनवतो.'

"फादर, मला वाटते, आपण एखाद्या अडगळीच्या ठिकाणी गोशाळा बनवून त्याचे तेथे येशूचा जन्मदिन साजरा करायला हवा. गुरुविद्यालयात एखाद्या वर्गात तेथली बाके आणि टेबले याचा उपयोग करूनच गोठा बनवावा. खेडेगावात घेतल्या 'खैरलांजी'त गोशाळा बनवून सर्व भाविकांना नाताळच्या रात्री त्या महारवाड्यात न्यावे किंवा फादर, तुम्हाला माहित आहे, ती केस, कोळीवाड्यातल्या सुवर्णाची. व्हर्टिब्रेटचे दुखणे लक्षात घेऊन डॉक्टरांनी तिला गर्भपाताचा सल्ला दिला होता. पण त्या जोडप्याने तो न जुमानता येशूबाळाच्या प्रेमाने आपल्या बाळाला जन्म दिला आणि सुवर्णा मात्र कमरेतून लुळी झाली. मध्यरात्रीच्या मिस्सानंतर आपण सर्वांनी जाऊन तिच्या घरीच ख्रिस्तजन्माचा सोहळा साजरा केला तर?"

जेरोमने फादरांना असे खूप काही सुनावले होते पण आज हा वास्तववादी गोठा पाहायला तो मात्र पोहोचला नाही. तो असेल एखाद्या झोपडीच्या खऱ्याखुऱ्या गोशाळेत.

तेवढ्यात ध्वनिवर्धकावर युवकाची सूचना झाली; “भाविकांनो आपण आमची नावीन्यपूर्ण गोशाला पाहायला उत्सुक झाला असणारच. सर्वप्रथम आम्हा युवकांना असे नाविन्यपूर्ण प्रयोग करण्यास प्रोत्साहन दिल्याबद्दल बिशपचे आभार मानतो. तयारी झाली आहे. मात्र ऐन वेळी आम्ही उद्घाटक बदलले आहेत. गोट्याशेठच्या परवानगीनेच आम्ही एक योग्य व्यक्ती उद्घाटनासाठी हजर केली आहे. मित्रहो, नुकतीच टीव्हीवर बातमी प्रसूत झाली आहे. महाराष्ट्र समाजकल्याण खात्याने आपल्या गावातील एक व्यक्ती ‘दीनमित्र’ या पुरस्कारासाठी निवडली आहे. उद्या सारा देश त्याचा उदोउदो करील; त्याचा सत्कार करायला आम्ही गावकऱ्यांनी का उशीर करावा? आज रात्रीच तो आम्ही करत आहोत. कोण आहे ती व्यक्ती? आता आपली उत्सुकता जास्त ताणून न धरता मी फादर रॉबिन यांना त्यांचे नाव घोषित करण्याची विनंती करतो.”

“ते आहेत आपले झोपडपट्टी मित्र श्री. जेरोम डिसोजा”

टाळ्यांचा कडकडाट झाला आणि ज्युडीथला थोड्या वेळ भोवळच आली. जेरोम स्टेजवर कधी आला ते तिने पाहिलेच नाही. फादरांचे निवेदन चालूच होते, “मित्रहो, जेरोमच्या दीनसेवेची मी आपल्याला ओळख करून द्यायला नको. ते सारा महाराष्ट्र जाणतोय. फक्त मी त्यांची क्षमा मागतो की त्यांच्या सेवेची पहिली दखल एरवी संवेदनाशून्य वागणाऱ्या शासनाने घेतली आणि मगच आम्ही. मी श्री.जेरोम ह्यांना गोशाळेचे उद्घाटन करण्याची विनंती करतो. तेव्हा कुठे ज्युडीथने वर पाहिले, जेरोम त्याच अख्ख्या दिवसाच्या झब्ब्यात तिथे उभा होता, पण आता तो झब्बा शोभत होता.

पुन्हा एकदा टाळ्यांचा कडकडाट झाला आणि गोशाळेचा देखावा खुला झाला. हमरस्त्याच्या कडेला गटारासाठी टाकून दिलेल्या एका पाईपमध्ये ख्रिस्तजन्माचा देखावा बनविला होता. त्यातले जोसेफ-मरिया म्हणजे देवळाच्या गेटजवळ नेहमी भीक मागण्यासाठी बसणारे दोन भिकारीच होते. नितीन अजून गोणपाटाच्या वस्त्रात उघडाबागडा पाईपात बसला होता. पार्श्वभूमीवर झोपडपट्टीच्या जीवनातील दृश्ये व समोर सफाई कामगारांचे साहित्य इत्यादी अक्षरशः उकिरडा आणून भरला होता त्या गोशाळेत.

“शी.. हे का येशूबाळाला शोभते?” बाजूला कोणीतरी हळूच पुटपुटले.

“मुलांना नाताळच्या शुभरात्री चिंध्या नेसून बसविले आहे आणि फादरांनी मात्र चमकती वस्त्रे परिधान केली आहेत.”

“ख्रिस्तजयंतीचा गोठा केवळ एक ‘देखावा’ असतो, त्याप्रमाणे आपण वागायचे नसते. वेडे ठरु आपण.” बाजूला कोणीतरी पुटपुटलेच.

नितीन मात्र मोठ्या धीर गंभीर चेहऱ्याने गोठ्यात बसला होता. फादरांनी सूचना दिली, ”आता आपले जेरोम साहेब आपल्याला नाताळचा संदेश देतील.

‘मित्रहो, मी आणखी संदेश काय देऊ? फादर रॉबिन यांनी आज या गटारात गव्हाणी बनवून जहाल संदेश दिला आहे. ही जागा आता पवित्र झाली आहे. सर्वच गटारे शुचिर्भूत झाली आहेत. देवाला देवळात कोंडून ठेवू नका. त्याला या गटारातही अनुभवायला शिकूया.

ख्रिस्त गव्हाणीत जन्मला तो केवळ पापाचे प्रायश्चित म्हणून नाही किंवा नाईलाज म्हणूनही नाही. दारिद्र्याचा तो बळी झाला होता. मानवजातीच्या जीवनाशी पूर्णपणे एक होण्यासाठी तो गरीब झाला. पण गरिबीतही तो सुखी होता नव्हे खरे सुख गरिबीत किंबहुना साध्या राहणीत आहे. स्वतःहून गरीब बनलेला माणूस दुःखी होत नाही, तो मुक्तता अनुभवतो. त्याला मन:शांतीचा अनुभव असतो.

असो, आपले समाजबंधू फादर रॉबिनसमोर मी काय संदेश देऊ? माझा ख्रिस्त हा गटारातला आहे. त्याचा सहवास घेण्यास मला परवानगी देणारी माझी पत्नी ज्युडीथ आणि माझी दोन गुणी मुले, एक नितीन येथे धनगराच्या भूमिकेत बसला आहे, मी त्यांना धन्यवाद देतो. आम गावकऱ्यांना शुभ ख्रिस्तजयंती.”

जेरोम खाली आला आणि हातातील फुलांचा गुच्छ त्याने ज्युडीथच्या हातात दिला. क्षणभर डोळे मिटून गोठ्यासमोर त्याने प्रार्थना केली. ज्युडीथने आपले डोळे पुसले आणि तिची जणू कावीळ साफ झाली. जेरोमने रोहनला उचलले आणि तो घराकडे चालू लागला. ज्युडीथ नकळतच बरोबर चालू लागली. क्लेराबाई होत्याच बाजूने चालत. त्यांनी ज्युडीथमध्ये झालेला फरक टिपून घेतला आणि नजरानजर होताच म्हणाल्या, “अभिनंदन ज्युडीथ.”

दोघेही गालातल्या गालातच हसल्या.

फादर मायकल जी हे मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलन व अखिल भारतीय धर्मशिक्षण समूहाचे माजी अध्यक्ष आणि अखिल भारतीय कॅथॉलिक संस्थेचे (NBCLC) माजी संचालक आहेत.

# आऊ

■ प्रा. नेहा किशोर सावंत, दहिसर, मुंबई

काही माणसं आपल्या आयुष्यात खूप उशिरा येतात आणि आयुष्याचा अविभाज्य भाग होऊन कधी जातात तेच कळत नाही. आपण विचार करीत राहतो, या आधीचं आपलं आयुष्य यांच्याशिवाय कसं काय गेलं? किंवा आपण आपलं जगणं इतकी वर्ष यांच्या शिवाय कसं व्यतीत केलं? कदाचित ही अतिशयोक्ती वाटेल पण हे खरंच आहे. निदान मी माझ्या आऊच्या बाबतीत तरी असं नक्की म्हणू शकते.

सुनिती जैन ते मॅडम ते आऊ हा नात्यामधला प्रवास किती झटकन आणि कसा झाला हे सांगणं अवघड आहे. पण झाला खरा हा प्रवास. खरं तर आऊची आणि माझी पहिली ओळख झाली ती अशोक जैन यांच्यामुळेच. अशोक जैन म्हणजे महाराष्ट्र टाइम्सचे उपसंपादक. त्यांच्या नावाचा एक विलक्षण दबदबा होता. तर सुनिती जैन म्हणजे अशोक जैन यांची पत्नी आणि लेखिका अशीच पहिली ओळख होती. पहिल्या प्रथम मनावर या व्यक्तिमत्वाचा जो ठसा उमटला तो काहीसा दडपण आणणारा होता. चौकोनी चेहरा, चेहऱ्याला शोभून दिसेल असा बॉय कट. समोरच्या माणसाला पारखणारी नजर, समोरच्याचा वेध घेणारे डोळे. पहिल्यांदा त्यांना पाहता क्षणी मला काहीसं दडपण आल्याचं आठवतंय. आवाजात आणि बोलण्यातही खणखणीतपणा आणि सुस्पष्टता, आग्रही आणि ठाम मतं. आणि ती पटवून देण्याची तितकीच हातोटी. अखंड, अथक बोलण्याचा ओसंडता धबधबा. तल्लख स्मरणशक्ती, आठवणींचा खजिना उलगडून सांगण्याची ओघवती शैली, यामुळे माझ्या मनातील अवघडलेपण आणि दडपण पहिल्या भेटीतच कधी गळून पडलं कळलंच नाही. अशोक जैन असताना त्यांच्यासोबत आणि ते नसतानाही (खरंतर ते आजही बोलण्यातून आमच्या भोवतीच असतात) आमच्या गप्पा रंगत गेल्या. ना कधी वेळेचा अडसर आला ना विषयांचा ना वयाचा. आम्हा

दोघींचे स्वभाव विलक्षण बोलघेवडे आणि आरस्पानी असणं, हे आमच्यातील समान गुणधर्म आहेत, हे  आमच्या मैत्रीमागील एक कारण असू शकेल.

आऊला मी २००९ पासून पाहतेय. जवळजवळ एक तप लोटलंय. पण ती आहे तशीच आहे. चैतन्यमयी, उत्साही, आश्वासक आणि सकारात्मक ऊर्जेने भरलेली आणि भारलेली. या बारा वर्षात मी तिची किती रुपं पाहिली आहेत! तिला पाहिलं की मला विंदांची 'झपताल' ही कविता आठवते.

‘ओचे बांधून पहाट उठते...

तेव्हापासून झपझपा वावरत असतेस.’

आऊच्या बाबतीत ह्या ओळी अगदी चपखल बसतात.

‘तू घरभर भिरभिरत असतेस,

लहान मोठ्या वस्तुंमध्ये

तुझी प्रतिबिंबे रेंगाळत असतात...

स्वागतासाठी "सुहासिनी" असतेस,

वाढताना "यक्षिणी"असतेस,

भरवताना "पक्षिणी" असतेस,

साठवताना "संहिता" असतेस,

भविष्याकरता "स्वप्नसती" असतेस.

....संसाराच्या दहा फुटी खोलीत दिवसाच्या चोवीस मात्रा

चपखल बसवणारी तुझी किमया मला अजूनही समजलेली नाही.’ (झपताल - विंदा करंदीकर)

खरोखरच इतकी विविध रूपं धारण करून, हसतमुखाने वावरण्याची, अख्खं आभाळ आपल्या खांद्यावर पेलून घेण्याची हिची किमया मला अजूनही कळलेली नाही.

कांता, सखी, सचिव, सहचारिणी या भूमिका बजावत स्वतःचं अस्तित्व तितक्याच अभिमानाने जपणारी. कणखर, तितकीच संवेदनशील. समोरच्याची चूक लक्षात आणून देऊन स्पष्टपणे चार शब्द सुनावणारी, आणि एखाद्याचं तितक्याच खुलेपणाने, मनमुक्तपणे, दिलखुलास कौतुक करणारी. राष्ट्रसेवा दलाचे संस्कार आपल्या वागण्याबोलण्यातून कसोशीने जपणारी अशी सुनिती म्हणजेच आऊ. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांनाच प्रिय असणारी आऊ म्हणजेच सुप्रसिद्ध लेखिका आणि अनुवादिका सुनिती जैन.

आऊच्या व्यक्तिमत्वाचा अविट ठसा माझ्यावर उमटला तो अशोक जैन यांच्या आजारपणाच्या काळात. तिने ज्या पद्धतीने आणि ज्या निष्ठेने त्यांची सेवा

केली आहे त्याला तोड नाही. त्या काळात तर ती अर्धी डॉक्टरच झाली होती. अशोक जैनांना इतक्या गोळ्या दिवसभरात द्याव्या लागत असत की एखादी व्यक्ती नक्कीच गांगरून गेली असती, अशोक जैन यांच्या आजारपणातील गुंतागुंत पाहून एखादी ढासळून गेली असती. पण आऊने हे सगळं मोठ्या संयमाने आणि धीराने हाताळलं. त्यांची औषधं, वेळच्यावेळी खाणंपिणं देणं हे काम अगदी लीलया पार पाडायची. घरातील वातावरण इतकं आश्वासक आणि सकारात्मक असायचं की घरात कुणी आजारी व्यक्ती आहे याचा मागमूसही इतरांना लागायचा नाही. किंबहुना त्या आजारी माणसाच्या आसपासही नकारात्मक जाणिवेला ती फिरकू देत नसे. अगदी काटेकोरपणे तिने अशोकजींच्या औषधपाण्याची खबरदारी घेतली होती, ते तिचं कसब खरोखरच वाखाणण्याजोगं होतं. तिने दिवसभराच्या गोळ्यांसाठी सुंदर छोट्या डब्या केल्या होत्या. त्यामुळे टेबलवर उगाचच औषधांचा पसारा किंवा औषधांचा वास दरवळत नसे. यातून तिचा नीटनेटकेपणा आणि टापटिपीची आग्रही वृत्ती दिसून यायची. या काळात तिने औषधांचा आणि व्याधींचा इतका अभ्यास केला असावा की ती अर्धी डॉक्टरच झाली होती. तिची चिकित्सक आणि चौकस, अभ्यासूवृत्ती याकाळात दिसून आलीच, पण आपल्या मनातील प्रश्न इतरांच्या मनातही येऊ शकतात, त्यांच्यापर्यंत ही उत्तरं सुद्धा पोचली पाहिजेत या जाणिवेतून तिने लिहिलेलं 'पोस्टमॉर्टम' हे जबरदस्त पुस्तक, म्हणजे तिची विलक्षण सकारात्मक सर्जक कलाकृती आहे. घरातील अशी तणावग्रस्त आजाराची परिस्थिती असतानाही, त्यातून अशी निर्मिती करणं हे तिलाच जमू शकतं.

अशोक जैन यांच्या आजारपणात घरातील वातावरण आनंदी आणि नॉर्मल ठेवणं, वेळप्रसंगी त्यांची सहचारिणी ही भूमिका निभावताना परिचारिका होणं, त्यांची लेखनिक होणं, अवघड आणि कठीण परिस्थितीत डोकं आणि मन शाबूत ठेवून योग्य निर्णय घेणं, त्याची अंमलबजावणी करणं हे सारं निभावणं नक्कीच सोपं नव्हतं. प्रसंगी बिल्वा, क्षिप्रा या पोटच्या मुलींशी वाद घालून आपल्या भूमिकेवर ठाम राहून, आपली भूमिका त्यांना पटवून देणं अशावेळी किती मानसिक संघर्ष करावा लागला असेल, याची कल्पनाच केलेली बरी. कधी आऊचं वागणं आक्रस्ताळी वाटतं, पण त्यामागे तिची पोटतिडीक असते. अशोक, सुनिती, बिल्वा, क्षिप्रा या चार कोनांनी बनलेल्या

चौकोनाचा एक कोन ढासळताना पाहताना प्रत्येकाचीच परिस्थिती किती नाजूक झालेली असेल? अशावेळी दोष, दूषणे कमी सहन करावी लागली नसतील! पण आपल्या नावाला जागत सगळे अडथळे लीलया पार करत ती पुढेच चालत राहिली. दोन्ही लेकींचा आधारस्तंभ होत तर कधी त्यांची मैत्रीण होऊन चरैवेती मंत्र जपत मार्गक्रमणा करत राहिली, आजही करीत आहे. आपला भार इतरांवर पडू नये, यासाठी ती स्वतःच्या प्रकृतीची निगुतीने काळजी घेते. जराशी जरी प्रकृतीची कुरबुर सुरू झाली किंवा आतून काही शंकेची पाल चुकचुकली की ही लगेच सावध होते, योग्य त्या चाचण्या ती करून घेते. ही गोष्ट खरच शिकण्यासारखी आहे.

डोळस सामाजिक जाणीव आणि मानवतावादी दृष्टिकोन हा आऊचा स्थायीभाव आहे. अडचणीत असलेल्या माणसाला मदत करणे, मानसिक आधार देणे हा सेवादली संस्कार तिच्यात पुरेपूर भिनलेला आहे. किती विलक्षण योगायोग आहे, भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आणि आऊचा अमृत महोत्सव एकाच वर्षी आलाय, तिच्या जन्मासोबतच हा जाज्वल्य देशाभिमान, राष्ट्राभिमान तिच्यात पेरला गेला असावा. आपापल्या परीने ती कित्येक जणांना वेगवेगळ्या प्रकारे मदत करत असते. दुर्गम भागातील महिलांना कपडे पाठव, कुणाला पुस्तकांची मदत कर. काहीबाही शिवून दे असं काही ना काही करतच असते. सध्याच्या कोरोनाच्या काळात तर स्वतः मुखपट्टिका शिवून अनेकांना दिल्या आहेत. सतत सामाजिक भान आपल्या कृतीतून जपत असते ती. 'क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे ' हे आयुष्याचं ब्रीद ठरवलं आहे तिने. अगदी अलीकडे म्हणजे दोन वर्षांपूर्वी उत्तरांचलमध्ये आपल्या मैत्रिणी सोबत आणि लेकीसोबत जाऊन तिथल्या मुलांसाठी छंद वर्ग घेतले. दुसरी एखादी असती तर मस्तपैकी फिरून, भटकून मजा केली असती. पण 'जे आपणासी ठावे ते दुसऱ्यासी सांगावे, शहाणे करून सोडावे सकळ जन' हे रामदासी तत्व तिच्या अंगी भिनलेलं आहे. सतत कार्यमग्न राहणं, दुसऱ्याच्या उपयोगी पडावं, हेच तिचं आध्यात्म आहे. पारंपरिक मूर्तिपूजा, देवपूजा यापेक्षा 'मानवसेवा हीच ईश्वरसेवा' हे ती आपल्या कृतीतून दाखवून देते, ही मला विशेष भावलेली तिची एक बाजू.

सतत कार्यमग्न राहणं हीच तिची जगण्याची ऊर्जा आहे. स्वतःला कोणत्या

ना कोणत्या छंदात मग्न ठेवणं ही तिची विश्रांती. उत्तम पाककला, उत्तम शिवणकला, भरतकाम, लेखन, अनुवाद, वाचन (एकेकाळी नृत्य, अभिनयातही पारंगत असावी), गिर्यारोहण या साऱ्यात पारंगत. दिवाळीतील चिवडा आणि अनसाफणसाची भाजी खावी तर तिच्याच हातची. स्वतः स्वखर्चाने नानाविध रंगांची कापडं आणून, त्यावर स्वखर्चाने डिझाईन छापून (ती ही बडोद्याला जाऊन) सुरेख अशा रंगसंगतीतून भरतकाम करून आपल्या लाडक्या मैत्रिणींना किंवा एखाद्याचं कौतुक म्हणून भेट देण्याचा विलक्षण खर्चिक छंद तिला आहे. मला तिने इतका सुंदर भरतकाम केलेला अखंड ड्रेस सूटच भेट म्हणून दिलाय, माझ्या आयुष्यातील सगळ्यात मौल्यवान भेट आहे. ही भेट तिने ज्या पद्धतीने माझ्यापर्यंत पोहोचती केली तो दिवस, त्या दिवशी आम्ही एकत्र घालवलेले ते क्षण म्हणजे आमच्या दोघीतील गोड गुपित आहे. त्यादिवशी मला तिच्यातील एक साहसी तरुणी दिसली. एखाद्या चित्रपटात ज्याप्रमाणे नायक नायिका अनंत काळाच्या विरहानंतर, एकमेकांसाठी आसुसलेपणाने भेटतात, तशी ती भेट होती... आश्वासक ऊर्जा देणारी ती भेट होती. खरंतर त्याच दिवशी मी मनोमन ठरवलं होतं, या नात्याला नाव द्यायचं 'आऊ'. काळाप्रमाणे, स्वतःला काळाशी सुसंगत करून जगण्याची कला तिला छान जमली आहे. कधी उत्तमोत्तम रंगसंगतीच्या साड्या नेसणं तर कधी सुटसुटीत असा जीन्स टॉप घालणं तर कधी सलवार कमीज सारंच तिला शोभून दिसतं.

मराठी, इंग्रजी भाषेवर तिचं असलेलं प्रभुत्व वाखाणण्याजोगं आहे. एखाद्या शब्दाचा नेमक्या अर्थासाठी ती अगदी जंगजंग पछाडते. एखादा अनुवाद करताना त्यासाठी ती जो अभ्यास करते, मेहनत घेते ती विलक्षण असते. तिने अनुवादित केलेली पुस्तकं ही प्राधान्याने वैद्यकीय किंवा राजकीय क्षेत्रातील आहेत. त्यासाठी तिने त्या क्षेत्रांचा, त्यातील घडामोडी, त्यातील पारिभाषिक संज्ञा यांचा सखोल अभ्यास करून मगच अनुवादाचे शिवधनुष्य लीलया उचलले. अर्थात अनुवादिका किंवा अशोक जैन यांची पत्नी हीच तिची ओळख नव्हे. तर मुंबईतील सचिवालयाच्या प्रसिद्धी विभागात सीनिअर असिस्टंट डायरेक्टर म्हणून ती कार्यरत होती. मंत्रालयातून निघणारी परिपत्रके, पुस्तिका यावर तिचा हात फिरल्याशिवाय ती प्रसारित केली जात नव्हती. पुढे अशोक जैन यांची

दिल्लीतील टाइम्स ग्रुपमध्ये वरिष्ठ पत्रकार, संपादक म्हणून बदली झाली तेव्हा दिल्लीतील प्रसिध्दी विभागाच्या परिचय केंद्रात इन्फॉर्मेशन ऑफिसर म्हणून हिची नेमणूक झाली. स्वतःची एक स्वतंत्र आणि वेगळी ओळख तिने निर्माण केली. मधु लिमये, विठ्ठलराव गाडगीळ, एसेम जोशी, मधू दंडवते, मृणाल गोरे अशा कितीतरी दिग्गजांचा सहवास तिला मिळाला. त्या सहवासातील कितीतरी आठवणींचा खजिना तिच्याकडे आहे. त्या आठवणी सांगताना ती अनेकदा 'नॉस्टॅल्जिक' झालेली मी पाहिली आहे. त्या आठवणींचे एखादे सुंदर पुस्तक होऊ शकेल, इतकी सामुग्री तिच्याकडे आहे.

दिल्लीतील महत्वाच्या कामासाठी तेथील मंत्रालयात जाणारे बहुतांशी साहित्यिक मंडळी हक्काने आऊच्या हातचा पाहुणचार घेतल्याशिवाय जात नसत. कविवर्य दया पवार, नारायण सुर्वे, कुसुमाग्रज, वसंत बापट अशा अनेकांनी तिच्याकडचा पाहुणचार अनुभवला आहे. तिचा मित्रमेळा तर बघायलाच नको. पाच ते नव्वद या रेंजमधली सगळी मित्रमंडळी तिच्याकडे अगदी मोकळेपणाने वावरतात. नामवंत थोरामोठ्यांनी लिहिलेल्या पत्रांचा खजिना तिने जपून ठेवलेला आहे. तोही प्रकाशित केला तर एक सुंदर ऐतिहासिक अशी साहित्यकृती निर्माण होईल.

तिने लिहिलेली 'वॉर्ड नंबर पाच', अपराजित, 'पोस्टमॉर्टम' ही पुस्तकं सगळ्यांनी वाचायलाच हवीत. अनुवादिका आणि लेखिका म्हणून असलेले तिचे वेगळेपण यातून अधोरेखित होते. अशोक जैन आजारी असतानाही त्यांनी फेलुदा मालिका अनुवादित केली शिवाय इतर अशी एकूण दहा बारा पुस्तकं अनुवादित केली याचं खरं श्रेय आऊलाच द्यायला हवे. कारण त्यावेळी ती त्यांची केवळ सहचारिणी नव्हती तर सहलेखिकाही होती, असं म्हटल्यास चुकीचं ठरणार नाही. इतकंच नाही तर बहुतांशी या वयातील माणसं साधा मोबाईल किंवा स्मार्ट फोन वापरतानाही बिचकतात तिथे आऊने या आधुनिक तंत्रज्ञानावर मिळवलेली हुकूमत कौतुकास्पद आहे. स्वतःचं सगळं लेखन लॅपटॉपवर मराठीतून टंकलिखित करण्यात जो वेग तिने गाठला आहे, ते पाहून थक्क व्हायला होतं.

सध्याचा काळ हा कोरोना काळ आहे. प्रत्येकजण आपल्या मित्रमैत्रिणींच्या भेटीसाठी आसुसला आहे, पण भेट घेता येत नाही. अशावेळी आऊचा आलेला एखादा फोन म्हणजे हायपॉवर ऊर्जेचा



स्रोत असतो. मनातील उदासिनतेची पुटं गळून पडतात आणि पंखांमध्ये फिनिक्स पक्ष्याप्रमाणे बळ येतं. ही जर कसलाही बाऊ न करता इतकं करते तर आपण का नाही ही जाणीव मला प्रचंड ऊर्जा देऊन जाते. या दीड वर्षाच्या काळात नव्या तंत्रज्ञानाशी मैत्री करणं माझ्या शिक्षकी पेशासाठी आवश्यक होतं. ते करताकरता मी माझे आभासी पद्धतीने कार्यक्रम सुरू केले, प्रत्येक कार्यक्रमानंतर आऊची दिलखुलास दाद, कौतुकाची थाप माझा आत्मविश्वास द्विगुणित करणारी असायची. या बारा वर्षांच्या काळात मी तिला काय दिलं माहीत नाही पण मी तिच्याकडून खूप काही शिकले आहे. आज वयाची पंच्याहत्तरी ओलांडूनही ती कधी थकलेली, कंटाळलेली किंवा वैतागलेली पाहिली नाही मी. कामातील बदल आणि नव्या कामातील उत्सुकता आणि कामातील सातत्य हे तिच्या सकारात्मक जगण्याचं गमक आहे. छोट्या गोष्टींनी खचून जाणाऱ्या माणसाने हे शिकण्यासारखे आहे. आजही तिचा फिरण्याचा उत्साह, ट्रेकिंगची आवड तिने जोपासली आहे. तिचं हे जगणंच प्रेरणादायी आहे.

खरंतर माझ्या लेखनकलेला प्रेरणा देण्याचे काम अशोक जैन आणि आऊनेच केलं आहे, हे मला विसरता येणार नाही. माझी लेखनकला उभरण्यासाठी, मला सतत प्रोत्साहन देण्यासाठी तरी आऊने आयुष्याचं शतक गाठावं ही सदिच्छा. कारण आऊ म्हणजे माझ्या आयुष्याची ऊर्जा आहे. आशादायी ऊर्जा आहे, आश्वासक ऊर्जा आहे. आऊसारखी माणसं अवतीभवती असली की आयुष्य उत्साहाने सळसळत राहतं. पावसाच्या एका थेंबानेही वठलेल्या झाडाला तरारून पालवी फुटते. तशी अनेकांच्या वठलेल्या आयुष्याला पालवी देण्याची क्षमता या आऊच्या स्पर्शरुपी अमृत थेंबात आहे, हे निर्विवाद सत्य मी अनुभवलेलं आहे.

# एका श्रद्धावंताची रोमयात्रा

■ ज्युलियस (दीपक) मच्याडो, वडवली पाली, वसई

टेली : ९९६७२३८६११, ईमेल: deepak.machado@yahoo.com

आपण अनेकजण प्रवासाकरिता युरोप यात्रेवर जातो. त्यात रोम, व्हेनिस, पॅरिस, ॲमस्टरडॅम, प्राग अशा शहरांचा समावेश असतो. आपण, ज्याला प्रेक्षणीय म्हणता येतील, अशी स्थळे बघायला जातो. थोड्या दिवसांत आपला टूअर मॅनेजर आपल्याला "जीवाचा युरोप" असा अनुभव देऊन आपल्या घरी आणून सोडतो. रोममध्ये असताना प्रवास कंपनीने अधोरेखित केलेली व्हॅटिकन, सिस्टीन



1संत जॉन लॅटरन मध्ये आम्ही

चॅपल, त्रेवी फाउंटन अशी स्थळे आपण पाहतो. रोम हे कॅथॉलिक धर्मश्रद्धेचे केंद्रस्थान आहे. एक ख्रिस्ती श्रद्धावंत म्हणून अनुभव घ्यायचा असेल तर ह्या शहरात ख्रिस्ती धर्माच्या इतिहासाच्या खाणाखुणा इतक्या विस्तीर्णतेने पसरल्या आहेत की एक नव्हे अनेक तीर्थयात्रा केल्याचे समाधान मिळते. मी आणि माझ्या पत्नीच्या सुदैवाने आम्ही रोममध्ये काही दिवस वास्तव्यच केले होते. आणि तेथे स्थायिक असलेल्या आमच्या ओळखीच्या काही धर्मभगिनींनी मार्गदर्शन केल्यामुळे काही अद्वितीय अशा स्थळांचे आम्हाला दर्शन घेता आले म्हणून त्यांना शत प्रणाम.

आध्यात्मिक अनुभवाची संपूर्ण सांगता व्हावी म्हणून रोममधील सात चर्चेसना भेट देणे महत्वाचे समजले जाते. ही परंपरा संत फिलिप नेरी यांनी १५५३ च्या सुमारास सुरू केली होती. सुरुवातीच्या काळापासूनच्या संतांचा वारसा शोधून एक समान धार्मिक अनुभवाची सांगड

घालण्यासाठी नेरीने तीर्थयात्रींसाठी एक प्रवास कार्यक्रम तयार केला ज्यामध्ये सेंट पीटर बॅसिलिका, नंतर सेंट पॉल आउटसाइड-द-वॉल्स, सेंट सेबॅस्टियन, सेंट जॉन लेटरन, होली क्रॉस-इन-जेरुसलेम, सेंट लॉरेन्स-आउटसाइड-द वॉल्स आणि सेंट मेरी मेजोर ह्यांचा समावेश होता. ह्यातील सर्व नव्हे पण निदान पाच चर्चेस ना आम्हाला भेट देता आली ही मी मोठी भाग्याची गोष्ट समजतो.

## संत जॉन लॅटरन चर्च आणि पवित्र पायऱ्या

आमची पहिली भेट होती ती संत जॉन लॅटरन ह्या भव्य ख्रिस्तमंदिराची! हे ख्रिस्तमंदिर रोमचे कॅथेड्रल मानले जाते आणि त्या दृष्टीकोनातून ह्याचा दर्जा संत पीटर्स पेक्षाही वरचा आहे. १८७० पर्यंत पोपसाहेबांचा अधिग्रहण समारंभ येथेच केला जायचा. अनेकवेळा उध्वस्त होऊन देखिल पुनर्बांधणी केलेल्या ह्या ख्रिस्तमंदिराचे अंतरंग आपल्या भव्यतेने, त्यातील डोळ्याचे पारणे फिरवणाऱ्या मध्ययुगीन कलाकुसरीमुळे आणि कलाविष्कारांने आपल्याला भारावून टाकते. संपूर्ण ब्रॉंजचे असलेले ह्याचे मुख्य दरवाजे हे मूळ रोमन सिनेट (रोमन संसद गृह - सन ८१) च्या अजून उभ्या असलेल्या अवशेषातून काढून येथे लावलेले आहेत. ह्या ख्रिस्तमंदिराच्या भिंतींवर तसेच छतावर आध्यात्मिक इतिहासासंबंधी कलाकुसर इतकी ठासून भरलेली आहे की आपण संबंध दिवस जरी त्याच्या दृष्टीभोग घेत राहिलात तरी मन तृप्त होणार नाही. ह्या चर्चच्या लगत असलेल्या इमारतीमध्ये, ख्रिस्ताच्या दुःखसहनासंदर्भात आपल्या भावनांना जागृत करेल असा एक वारसा आहे. आणि तो म्हणजे "पवित्र पायऱ्या" किंवा पवित्र जिना. पिलाताच्या राजवाड्यात न्यायासनासमोर जाण्यासाठी ज्या संगमरवरी पायऱ्या येशू चालून गेला त्याच ह्या पायऱ्या यरुशलेम येथून सम्राट कोस्टान्टाईनच्या आई संत हेलेना ह्यांनी आणून त्या रोम मधील ह्या ख्रिस्तमंदिराजवळ पुनर्रस्थापित केल्या, असे म्हटले जाते. ह्या २८ पायऱ्या भाविकांनी गुढघे घालून चालून जायचे, ह्यावर पाय ठेवायचा नाही, अशी परंपरा आहे.



2संत जॉन लॅटरन चर्चसमोर माझी पत्नीअर्सला सिस्टर मारिओला सोबत

आम्ही तेथे पोहोचल्यावर पाहिले की तरुण आणि वयोवृद्ध असे अनेक भाविक एकेक पायरीवर गुडघे टेकून वेगवेगळ्या



4 ईल जेसू मधील छतावरील कलाविलास



3 ईल जेसू मधील संत फ्रान्सिस चा हात

उंचीवर पोहोचले होते. प्रत्येक जण रोजरीची प्रार्थना ही करीत होता. प्रत्येक पायरीवर कमीत कमी एक नमो मारिया चा जप करून पुढे जायचे असे आमच्या सोबत असलेल्या सिस्टरनी आम्हाला सांगितले. वरती पोहोचल्यावर एक छोटे वस्तुसंग्रहालय आहे, ज्यात शतकांपासूनची धार्मिक वस्तूंची मांडणी आहे. येशू ख्रिस्ताच्या चेहेऱ्याचे एक तैलचित्र ही आहे जे संत ल्युकने अंशतः बनविले असल्याचे सांगितले जाते. असो. आम्ही मनाची हिय्या केला आणि गुडघे टेकून त्या पवित्र पायऱ्या पार केल्या. थोडा काळ का होईना परंतु एका पवित्र जागेवर आपला शरीरस्पर्श होतोय ही भावना खूपच सुखद गहिवर जागृत करून गेली. ज्यांना गुडघे टेकून चढणे शक्य नाही त्यांच्याकरिता दुसराही एक समांतर जिना आहे ज्यावरून वरती जाता येते.

त्यानंतरचे आमचे भेटीचे स्थान होते संत मारिया मेजर चर्च. हे रोममधील पवित्र मारियेला अर्पण केलेले सर्वात मोठे चर्च आहे. ४४० साली बांधलेलं हे चर्च त्याच्या मूळ स्वरूपात उभे आहे आणि अत्यंत देखणे आहे. धार्मिक इतिहासावर आधारित कलात्मकतेचा ते जणू एक अद्वितीय भांडारच आहे. ह्याच्या इंचाइंचावर अभिजात कलेचे दर्शन होत असते. पाचव्या शतकातील मोझेक नक्षीकाम ते अठराव्या शतकातील अव्वल चित्रकारांची कलात्मक आतषबाजी सर्व गोष्टी मन मोहवून टाकतात.

## संत पॉल आणि ईल जेसू

रोमला जाऊन देखील बहुतेक लोकांना ज्याचे चुकूनच दर्शन घ्यायला मिळते असे दुसरे ख्रिस्तमंदिर आहे संत पॉल "आउटसाइड द वॉल्स" ख्रिस्तमंदिर. मूळ रोम शहराच्या वेशीबाहेर हे स्थापन झाल्यामुळे ह्यास "वेशीबाहेर" म्हणजेच "आउटसाइड द वॉल्स" म्हणतात. ज्या जागेवर रोमन सत्ताधाऱ्यांनी संत पॉलचा शिरच्छेद केला त्याच पुण्यस्थळावर ते बांधले गेले आहे. चौथ्या शतकात सम्राट कॉन्स्टंटाईन ह्याने जेव्हा रोमचा अधिकृत धर्म ख्रिस्ती म्हणून जाहीर केला तेव्हा त्याने ह्या जागेवर हे ख्रिस्तमंदिर बांधले. परंतु शहराच्या तटबंदीच्या बाहेर असल्यामुळे ते सारासेन आक्रमकांच्या फोडतोडीला बळी पडले आणि जमीनदोस्त झाले. त्याची



6 संत पीटर्स (व्हॅटिकन) चे मुख्य दालन

पुनर्बांधणी केल्यावर ते इतके भव्यदिव्य आणि सुशोभित करण्यात आले आहे की संत पिटर्सला देखील काही बाबतीत मागे टाकते. ८० खांबांवर उभे असलेले मुख्य दालन, त्याच्या छतावर सोनेरी रंग असलेले वैभवपूर्ण कोरीवकाम, प्रकाशात उजळून दिसणारी तेराव्या शतकातील मोझेकची उत्कृष्ट कारागिरी ही आपल्याला खिळवून ठेवते. बाहेरच्या भागात जमीनदोस्त झालेल्या आधीच्या वास्तूच्या खांबांचे काही भाग स्मृती म्हणून प्रदर्शनास ठेवलेले आहेत. ह्याच्या भव्य आल्ताराच्या पुढच्या भागात संत पॉल ह्याचे बलिदान स्थळ आहे



5 pantheon मधील छता वरचे भोक

आणि त्याची कबरही खालच्या भागात आपल्याला दिसते. त्याला ज्या साखळदंडाने बांधले होते त्याचाही भाग येथे एका काचेच्या आवरणात दर्शनासाठी ठेवलेला आहे. अत्यंत भव्य, रेखीव, आणि ऐतिहासिक कलाकृतीने समुद्ध असलेले हे खिस्तमंदिर कुठल्याही ख्रिस्ती भाविकाने चुकवू नये.

सात मुख्य चर्चेस सोडली तरी आणखीही काही वैशिष्ट्यपूर्ण स्मृती असलेली चर्चेसही आम्ही बघितली. त्यातील एक म्हणजे "ईल जेसू". १५८० मध्ये बनलेले हे जेसुइट ख्रिस्तमंदिर आहे.

ह्याच्या छतावर असलेले चित्रशिल्प हे सिस्टींन चॅपलमधील मायकल अँजेलोच्या अजरामर असलेल्या छत-शिल्पाच्या खालोखाल मानले जाते. ह्या ख्रिस्तमंदिराचे मुख्य आकर्षण म्हणजे,



7 पँथिऑन मध्ये आल्तारावर पडणारा नैसर्गिक प्रकाश



8 संत पॉल चे दालन आणि छत

ह्याच्या उजव्या बाजूच्या आल्तारात एका चांदीच्या आणि काचेच्या तबकात संत फ्रान्सिस झेवियर ह्याचा अबाधित उजवा हात ठेवलेला आहे.

## कॅटाकोम्ब- जमिनीखालील २००० वर्षांपूर्वीचे मृतावशेष

रोममधील आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण ऐतिहासिक आकर्षण म्हणजे कॅटाकोम्ब (catacomb). जमिनीखाली पन्नास फुटांपर्यंत बनवलेल्या बोगद्यामध्ये मृतशरीर ठेवण्याची जागा. कॅटाकोम्बबद्दल असा प्रचलित समज होता की येशू ख्रिस्ताच्या अनुयायांवर अत्याचार होत होते तेव्हा ह्या भूमिगत भागात ते लपून राहायचे. परंतु इतिहासकारांनी ही मृत शरीरे ठेवण्याची जागा होती असा निष्कर्ष काढला आहे. ह्यामध्ये काही दिवंगत पोपचे देखील अवशेष होते. परंतु त्याची चोरी होऊ लागल्याने ते इतरत्र सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आहेत. हे जमिनीखालील बांधकाम दोन हजार वर्षांपूर्वीचे आहे. रोममध्ये असे चाळीस कॅटाकोम्ब आहेत पण त्यातील तीन किंवा चारांमध्येच प्रवेश दिला जातो. आता या बोगद्यामध्ये एअर कूलिंग आणि लाइटिंगची सोय केल्यामुळे जाणे सुलभ होते. तरीदेखील पायऱ्या उतरत, जमिनी खाली जाऊन हजारो वर्षांपूर्वीच्या मृतावशेषांसोबत घालविणे हे अंगावर काटे आणते. ह्या कॅटाकोम्ब 'कडे जाताना रोमच्या प्राचीन एप्पीअन वे (Appian Way) या हमरस्त्यावरुन जावे लागते. बासष्ट किलोमीटर लांबीचा हा हमरस्ता ३१२ साली बांधलेला आहे आणि त्यावेळी लावलेले दगड हे अजून रस्त्याच्या पृष्ठभागावर आहेत.

## "डॉमिने को वादीस" चर्च

रोममध्ये कॅटाकॉम्ब्सकडे जाताना रस्त्यावरच संत मारिया देले पियांते हे छोटे ख्रिस्तमंदिर लागते. ह्यास "डॉमिने को वादीस" चर्च असेही म्हणतात. "डॉमिने को वादीस" चा अर्थ आहे, "स्वामी तुम्ही कोठे चाललात?" ह्यामागे एक आख्यायिका आहे. येशू ख्रिस्ताला क्रुसी खिळल्यानंतर रोमन सत्ताधाऱ्यांकडून ख्रिस्ताच्या



9 संत पॉल ह्याच्या कबरेशेजारी लेखक

अनुयायांचा छळ होऊ लागला. त्या पासून वाचण्यासाठी संत पीटर ह्याने रोम सोडून जायचा निर्णय घेतला. तेव्हा ह्याच ठिकाणी त्याला येशू ख्रिस्त समोरून येताना दिसला. अचंबित झालेल्या पीटरने येशू ला विचारले "स्वामी तुम्ही कोठे चाललात?" तेव्हा येशूने त्याला उत्तर दिले "मी रोमला चाललोय, पुन्हा स्वतःला क्रुसी खिळून घेण्यासाठी." ते ऐकून खजील झालेला संत पीटर रोमला परत गेला. तेथे त्याला अटक झाली आणि त्याला देखील क्रुसावर खिळले गेले. ह्या चर्चमध्ये शिरताक्षणीच एका बंदिस्त फ्रेममध्ये एक संगमरवरी लादी दिसते. त्यावर दोन पावलांची निशाणी कोरली गेली आहे. जेव्हा संत पीटर पुन्हा फिरला तेव्हा त्याच ठिकाणाहून येशूने पुनश्च स्वर्गारोहण केले तेव्हा त्याची पावले त्या लादीवर कोरली गेली असे समजले जाते.

## पॅंथियन- अति प्राचीन वास्तू असलेले ख्रिस्तमंदिर

आम्ही आणखी एक रोमांचक भेट ज्याला दिली ती म्हणजे विस्मयचकित करणारी प्राचीन वास्तू - पॅंथियन. रोमन मंदिर म्हणून उभारलेली ही इमारत सम्राट हॅड्रियनने १२६ साली पूर्ण केली. ६०९ साली त्याचे सांता मारिया आद मार्तिरेस ह्या ख्रिस्ती चर्चमध्ये रूपांतर करण्यात आले. आजही येथे मिस्सा साजरी केली जाते. प्राचीन वास्तुकलेच्या दृष्टीने एक चमत्कार गणल्या गेलेल्या, पॅन्थियनचे छत असलेला घुमट हा जगातील सर्वात मोठा अप्रबळीत कॉंक्रीटचा घुमट आहे. आजही, त्याच्या बांधकामानंतर जवळजवळ २००० वर्षानंतर, रोमन साम्राज्याच्या स्थापत्यशास्त्राची नेत्रदीपक रचना, प्रमाण, सुरेखता आणि सुसंवाद ह्याची प्रचिती ही वास्तू आपल्याला देते. पॅन्थियन हा शब्द ग्रीक विशेषण आहे ज्याचा अर्थ "सर्व देवांचा सन्मान करा". खरं तर पॅन्थियन सर्व देवतांचे मंदिर म्हणून प्रथम बांधले गेले.

पॅंथियनचे एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे त्याच्या छतावर घुमटाच्या

शीर्षस्थानी असलेला एक भोक (ऑक्युलस). २७ फूट व्यासाचा ऑक्युलस हा प्रकाशाचा एकमेव स्त्रोत आहे. ह्या ऑक्युलसचे छतावरील स्थान आणि दिशा अशा बेमालूम अभियांत्रिकीचा नमुना आहे की सूर्यप्रकाशाने पॅन्थियनचे आल्तार आणि अंतर्भाग उजळून निघतो. अधूनमधून पाऊसदेखील आतमध्ये येतो परंतु हळूवारपणे उतार दिलेली फरसबंदी आणि त्याच्या बांधकामात दडलेले २२ सुक्षम छिद्र पाणी काढून टाकण्यास मदत करतात. ऑक्युलसचे आणखीही एक उद्धिष्ट होते. ते देव आणि पृथ्वी यांच्यातील जोडबिंदू म्हणून काम करते.

ह्या पॅंथियनच्या बांधकामाचा इतिहासही रोचक आहे. पोर्टिकोला आधार देणारे १६ मोठे कोरिंथियन स्तंभ प्रत्येकी ६० टन वजनाचे आहेत. ते ३९ फूट उंच, पाच फूट व्यासाचे आहेत आणि ते इजिप्तमधून आणले गेले आहेत. पॅन्थियनमध्ये प्रसिद्ध कलाकार राफेल आणि अनेक इटालियन राजे आणि कवींच्या कबरी आहेत. विस्मयाचा भाग हा आहे की आजही आपण २००० वर्षांपूर्वी बनवलेल्या संगमरवरी फरसबंदीवर उभे असतो ज्यामध्ये भौमितिक नमुन्यांची मालिका असलेली कलाकुसर दिसून येते.

## व्हॅटिकन आणि सिस्टीन चॅपेल

रोममधील आपल्या धर्मश्रद्धेचे सर्वात मोठे आणि महत्वाचे स्थळ म्हणजेच व्हॅटिकन, आणि त्याच्या पासून थोड्याच अंतरावर असलेले सिस्टीन चॅपेल. त्याच्या आतमधील भव्यतेने आणि मध्ययुगीन चित्रकार आणि शिल्पकार यांच्या अद्वितीय कलेने कोणीही भारावून जातो. व्हॅटिकनला आम्ही दोन वेळा भेट दिली. एकदा ते पाहण्यासाठी आणि एकदा पोप दर्शन घेण्यासाठी. विस्तृत भव्यतेच्या बाबतीत संत पीटर्स हे मानाचा तुरा घेते. दर



10 पोप साहेब भाविकांना दर्शन देतात

बुधवारी पोपसाहेब जगभरातून आलेल्या भाविकांसोबत प्रार्थना करतात आणि दर्शनही देतात. हा कार्यक्रम जवळ दोन तास चाललेला असतो. अशा एका बुधवारी आमच्या सिस्टर यांच्या सल्ल्याने अशा मोक्याच्या जागी बसलो जेथे पोपसाहेबांचे दर्शन अगदी जवळूनच होईल. हे विलक्षण क्षण होते. जगभरातून आलेल्या भाविकांची रंगीबेरंगी उपस्थिती, त्यांनी आणलेले बँड, ते गात असलेली धार्मिक गीते (भजने), पोपसाहेबांनी चक्कर मारली

तेव्हा आनंद उल्हासाचे निर्माण झालेले वातावरण, सगळा परिसर जागतिक ख्रिस्ती बंधुत्वाच्या भावनेने ओतप्रोत भरलेला होता. ह्या वैश्विक जनसमुदायासोबत बसून सामूहिक प्रार्थनेत सहभागी होणे आणि अगदी दहा फूट अंतरावरून पोपसाहेबांचे दर्शन घेणे यामुळे अगदी जीवनाचे सार्थक झाल्यासारखे वाटले. मी स्वतः घेतलेले पोपसाहेबांचे फोटो मी फ्रेम करून घरात लावलेले आहेत.

सिस्टीन चॅपेल हे त्याच्या छतावर असलेल्या मायकेल अँजेलो आणि राफाएल या जगप्रसिद्ध मध्ययुगीन इटालियन चित्रकारांच्या कलाकृतीकरिता जगद्विख्यात आहे. आदामची निर्मिती ह्या विषयावरच्या कलाकृती सर्वात नामांकित आहेत. सिस्टीन चॅपेलमध्ये जाताना जे फर्लांगभर लांबीचे दालन आहे त्याच्या छतावर आणि आजूबाजूच्या भिंतीवरही इतक्या उच्च प्रतीच्या कलाकृती आहेत की तेथे जाईपर्यंत माणूस त्या अप्रतिम कलाविष्काराच्या आनंदात, किंबहुना नशेत अक्षरश: डुबक्या मारीत असतो.

होय. एवढे पाहून सुद्धा हौस अजून भरलेली नाही. "रोम एका दिवसात बांधले गेले नाही" असे म्हणतात. पण रोम एक दिवसातच काय, एका महिन्यातही पाहून होणार नाही इतकी धार्मिक ऐतिहासिक स्मारके येथे ठासून भरलेली आहेत. फक्त रोमच नाही तर आसीसी, पादुआ, मिलान, नेपल्स येथेही ऐतिहासिक-धार्मिक खजिन्याची रेलचेल आहे. आता पुन्हा कधी जाता येईल त्याची संधी बघतोय.

श्री. ज्युलियस (दीपक) मच्याडो हे सद्या बेसिन कॅथॉलिक बँकेच्या व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष आहेत. बी कॉम, सीएआयआयबी व एम ए (जर्नालिसम आणि मास कम्युनिकेशन ) अशी शैक्षणिक अर्हता असलेले दीपक नाबार्ड मधून उपमहाव्यवस्थापक म्हणून निवृत्त झाले आहेत. मराठी तथा इंग्रजी नियतकालिकांमधून त्यांचे ललित, प्रवास आणि कथा लेखन प्रसिद्ध होत असते.

टीप: सर्व फोटो लेखकाने काढलेले आहेत.

# 'थँक यू !

■ कामिल पारखे, पुणे

फोन – ९९२२४१९२७४, ईमेल- camilparkhe@gmail.com

सातारा जिल्ह्यात कराडला टिळक हायस्कुलात अकरावीला शिकत असताना तिथले तीन शिक्षक मला आजही आठवतात. इंग्रजी अगदी समरसून शिकवणारे धोतर आणि टोपीतले मुख्याध्यापक पागनीस, मराठीचे शिक्षक प्रभुणे आणि अर्थशास्त्र शिकवणारे द्रविड सर. यापैकी द्रविड सरांनी एकदा सांगितलेली रेल्वेप्रवासातली ती घटना मी आजही विसरलेलो नाही. रेल्वेगाडी कुठल्यातरी स्टेशनावर थांबली होती आणि मूळचे गोवन कॅथोलिक असलेले एक कुटुंब आपले सामान खाली उतरवत होते, त्या दाम्पत्यापाशी एकदोन मुलेही होती. रेल्वेडब्यातल्या द्रविड सरांनी की दुसऱ्या कुणी प्रवाशाने त्या जोडप्याला त्यांचे सामान खाली उतरवण्यात मदत केली आणि नंतर ते लहान मुलसुद्धा उचलून त्या माणसाच्या हातात दिले. त्यावेळी त्या माणसाने अगदी मनापासून 'थँक यू व्हेरी मच !' असे म्हणत धन्यवाद दिले.

द्रविड सर म्हणाले कि त्या माणसाचे ते `थँक यू' शब्द अगदी मनापासून होते हे त्याच्या चेहेऱ्यावरच्या हावभावातून स्पष्ट दिसत होते. त्याच्या त्या धन्यवादातून त्या माणसाचा सुसंस्कृतपणा दिसून येत होता. कुणी तरी आपल्याला काही तरी मदत केली तर त्याबद्दल आपण धन्यवाद दिलेच पाहिजे, कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे असे द्रविड सर म्हणत होते. विशेष म्हणजे आपल्याला सेवा किंवा मदत पुरवणाऱ्या व्यक्तीला आपण थँक्स म्हटले पाहिजे हा त्या गोवन कॅथोलिक व्यक्तीचा स्थायीभावच होता, असे सरांचे म्हणणे होते. मदत करणाऱ्या किंवा सेवा पुरवणाऱ्या व्यक्तीला आपण सहसा

धन्यवाद देत नाही, कारण आपण त्या व्यक्तीला किंवा अशाप्रकारच्या सेवेला गृहीत धरत असतो असे द्रविड सरांचे म्हणणे होते.

त्यानंतर काही महिन्यांतच अकरावीनंतर जेसुईट धर्मगुरु म्हणजे फादर होण्यासाठी गोव्यात मिरामारला प्री-नोव्हिशिएट किंवा पूर्वसेमिनरीत मी दाखल झालो आणि माझ्या आयुष्यातला तो ऐन उमेदीचा काळ गोव्यात घालवताना द्रविड सरांच्या त्या `थँक्स गिव्हिंग' मॅनर्सचा मला सातत्याने अनुभव येत राहिला. गोव्यात इंग्रजी बोलण्याचे शिक्षण घेताना पहिला धडा होता तो म्हणजे प्रत्येक वेळी बोलताना दोन शब्दांचा आवर्जून वापर करायचा... हे दोन शब्द होते 'प्लिज' आणि 'थँक यू' कुणाही व्यक्तीशी बोलताना त्याच्याकडून काही मागताना किंवा विनंती करताना 'प्लिज' हा शब्द अत्यावश्यक होता आणि ही मागणी किंवा विनंती मान्य झाल्यावर 'थँक यू' ' किंवा 'थँक्स' म्हणायचे असे इंग्रजी शिकताना दोन अगदी प्राथमिक धडे होते.

उदाहरणार्थ, जेवणाच्या टेबलावर शिष्टाचाराचे काही अगदी प्राथमिक नियम होते ते म्हणजे तोंड आ वासून, तोंड उघडे ठेवून जेवायचे नाही किंवा जेवताना मचमच आवाज करायचा नाही आणि जेवण झाल्यावर तृप्तीचा ढेकर तर मुळी द्यायचाच नाही. त्याशिवाय दुसऱ्याच्या ताटासमोर असलेले बिफ किंवा फिशच्या करीचे किंवा शिताचे (भाताचे) भांडे पाहिजे असल्यास 'प्लिज पास ऑन द करी ऑर राईस' अशी विनंती करायची आणि नंतर त्याबद्दल न विसरता 'थँक्स' म्हणायचे. तर असा 'प्लिज' आणि 'थॅन्क्स'चा सिलसिला सकाळी उठल्यापासून रात्री झोपायला जाईपर्यंत चालू ठेवायचा असा इंग्रजी भाषेतला नियम अंगवळणी पडला तरच या फिरंगी भाषेचे इतर धडे शिकता येणार होते असे आमचे प्री-नोव्हिस मास्टर असलेल्या फादर इनोसंट पिंटो यांनी मला बजावले होते.

पणजीला एखाद्या दुकानात एखादी वस्तू विकत घेतल्यानंतर दुकानदाराला थँक्स म्हणायचे असाही नियम ही भाषा बोलताना पाळणे जरुर होते. गंमत म्हणजे दुकानदाराचे उत्तर

सुरुवातीला मला अचंबित करायचे. कारण हे उत्तर असायचे थँक्स, वेलकम किंवा ओके असे दुकानदाराचे प्रत्युत्तर नसायचे याचे कारणसुद्धा मला समजावून सांगण्यात आले. कुठलीही सेवा, वस्तू आणि मदत स्वीकारणाऱ्या व्यक्तीने त्याबद्दल कृतज्ञ असलेच पाहिजे आणि त्याचबरोबर ज्याच्याकडून या सेवा, वस्तू विकत घेतल्या जातात त्यांनीही त्याबद्दल समोरच्या व्यक्तीशी कृतज्ञ राहून त्याबद्दल 'थँक्स' म्हटले पाहिजे. थँक्स गिव्हिंग एकतर्फी नसते, दोन्हीं बाजूच्या लोकांनी हे ओळखून परस्परांना थँक्स म्हणायला हवे.

मिळालेल्या प्रत्येक सेवेला, मदतीला किंवा वस्तूबद्दल समोरच्या व्यक्तीला धन्यवाद दिले पाहिजे, त्यामुळे आपण एखादी वस्तू वा सेवा दुकानदाराकडून घेतली तर आपण त्यास 'थँक्स' म्हटले पाहिजे तसेंच त्यानेंसुद्धा आपणास 'थँक्स' म्हटलेच पाहिजे हे अगदी साहाजिकच आहे हे हळूहळू माझ्या अंगवळणी पडायला लागले.

एखाद्याने दुसऱ्याकडून उसने घेतलेले पैसे किंवा वस्तू परत केली तर अशावेळी आभार नक्की कुणी मानले पाहिजे? अर्थातच दोघांनीही, पहिल्याने गरज असताना उसने पैसे वा वस्तू दिल्याबद्दल आणि दुसऱ्याने हे पैसे वा वस्तू इमानेइतबारे परत दिल्याबद्दल.

हाच नियम एखादी सेवा किंवा वस्तू खरेदी केल्यानंतर त्या सेवेबद्दल किंवा वस्तू दिल्याबद्दल वापरता येईल. येथे दोन्ही व्यक्तींनी म्हणजे दुकानदाराने आणि ग्राहकाने आभार मानायला हवेत. ही सेवा किंवा वस्तू कुठल्याही पक्षाने गृहित धरता कामा नये.

'प्लिज' आणि 'थँक्स' या दोन शब्दांच्या डोलाऱ्यावर इंग्रजी भाषेचा इमला उभारलेला आहे याची जाणीव झाल्यानंतरच ही भाषा आणि या भाषेची संस्कृती आत्मसात करणे शक्य आहे. गोव्यात कुठल्याही दुकानात किंवा इतरत्र कुठेही गेले कि मला हा अनुभव यायचा आणि आता हे दोन शब्द माझ्या केवळ इंग्रजी भाषेतल्या शब्दाकोशाचेच नव्हे तर मी संभाषणासाठी वापरणाऱ्या मराठी, कोकणी आणि हिंदी भाषेतल्या शब्दाकोशातले अविभाज्य घटक बनले आहेत. गोव्यात कोंकणीत 'देव बरें करो' हा शब्द कायम ओठांवर असतोच.

'ओब्रिगाद' हा पोर्तुगीज शब्द यासाठी आम्ही शाळा-कॉलेजात असताना सत्तरच्या दशकात वापरत असायचो.

युरोपच्या सहलीवर असताना विशेषतः पॅरिस आणि फ्रान्सच्या इतर परिसरात असताना आणि इतकेच नव्हे तर इटलीत रोम आणि व्हेनिस येथेसुद्धा 'मर्सी' हा शब्द कायम तोंडात असायचा. येशू ख्रिस्ताने दहा कुष्टरोग्यांना बरे केले अशी बायबलमध्ये एक कथा आहे. येशू जेरुसलेमला जात असताना हे दहा कुष्टरोगी दूर अंतरावर उभे राहून मोठमोठ्याने ओरडून म्हणाले 'येशू, स्वामी, आमच्यावर दया करा.' येशूने त्यांना म्हटले, “जा, आणि याजकांना आपले अंग दाखवा.' ते याजकाकडे जात असतानाच बरे झाले. आपण बरे झालो आहोत, हे पाहून त्यांच्यापैकी एक जण मोठ्याने ओरडून देवाची स्तुती करीत मागे फिरला. तो येशूच्या पायाजवळ खाली पडला व त्याने येशूचे उपकार मानले. येशू त्याला म्हणाला, 'दहाजण बरे झाले नाहीत काय? बाकीचे नऊ जण कुठे आहेत? या एका माणसाशिवाय दुसरा कुणीही देवाचे आभार मानण्यासाठी परत आला नाही ना?''

पुष्कळदा आपण या नऊ जणांसारखे वागत असतो असे मला वाटते. 'सॉरी' हा इंग्रजी संभाषणातला आणखी एक न टाळता येणारा शब्द. त्याची आवश्यकता आणि वापर कधी आणि कसा करायचा याचेही प्रात्यक्षिक गोव्यातल्या कॉलेजजीवनात विपुल प्रमाणात मिळाले.

काही शब्द हे विशिष्ट भाषांच्या संस्कृतीशी आणि शिष्टांचारांतर्गत अंतर्भुत असतात, प्लिज. थँक्स आणि सॉरी हे इंग्रजी भाषांचा वापर करणाऱ्यांसाठी अत्यावश्यक आहेत, नाहीतर हे शब्द न वापरणारे लोक एकतर गावंढळ किंवा असंस्कृत आहेत असे समजले जाईल. मात्र दुसऱ्या भाषांच्या संस्कृतीत हे शब्द आणि वाक्यप्रचार नसले तरी ते लोक असंस्कृत आहेत असा नित्कर्ष काढण्याची गरज नाही. आपली कृतज्ञता व्यक्त करण्याची किंवा आभारप्रदर्शन करण्याची रीत प्रत्येक भाषासंस्कृतीत वेगळी असते एव्हढेच.

उदाहरणार्थ, एखाद्या खरोखरीच गरजू असलेल्या वृद्ध व्यक्तीला कुणी एखाद्याने पैशाची वा इतर स्वरूपात मदत

केली तर अशा प्रसंगी त्या म्हाताऱ्या व्यक्ती मदतकर्त्या माणसाच्या डोक्यावर हात ठेवून 'देव तुझे आणि तुझ्या मुलाबाळांचं भलं करील’ असा तोंडभरुन आशिर्वाद देतात. तो आशिर्वाद एक प्रकारची थँक्सगिव्हिंग असते हे कोण नाकारील?

माझे वडील कुणा लहानग्याने त्यांना मदत केली तर 'शाब्बास, बाळा' असे म्हणून किंवा त्याच्या पाठीवर मायेने हात फिरवत कृतज्ञता व्यक्त करत असायचे. अशावेळी 'धन्यवाद' 'किंवा 'आभारी आहे' असे शब्द कृत्रिम वाटतात.

विशेष म्हणजे बहुतेक वेळेस 'थँक्स' म्हटल्यावर समोरची व्यक्ती खुश होते आणि त्यापैकी अनेक जण 'वेलकम' म्हणून दाद देतात यांमध्ये रिक्षाड्रायव्हर आणि अगदी चप्पल बूट दुरुस्त करणारे चांभारसुद्धा असतात.

उन्हापावसात प्रवास करत, दोनतीन मजले पायी चढून तुमच्या दारात पार्सल किंवा गरमागरम खाद्यपदार्थ घेऊन आल्यावर त्या कुरियरवाल्याला हसून ‘थँक्स' म्हटल्यावर त्यांना किती आनंद होतो ते अनुभवायलाच हवे. याचा अर्थ आपण दुसऱ्याला सेवा पुरवली आहे आणि त्याबद्दल धन्यवाद दिले जात आहे हे योग्यच आहे याचीही त्यांना जाणीव आहे.

हॉटेलमध्येसुद्धा वेटरने आपल्याला खाऊपिऊ घातले त्याबद्दल आपण टिप देतो तसेच 'थँक्स' पण म्हटले पाहिजेच ना? अशाप्रकारे कुठल्याही सेवा आणि मदतीसाठी 'थँक्स' म्हटले म्हणजे त्यासाठी आपण समोरच्या व्यक्तीला गृहित धरत नाही, अगदी त्यासाठी आपण पैसे मोजत असलो तरीही! आणि हे धन्यवाद विशिष्ट शब्दांनीच व्यक्त केले पाहिजे असे मुळीच नाही. धन्यवाद एखाद्या कृतीतून, केवळ स्मितहास्याने किंवा भाषेची समस्या असल्यास हातवाऱ्यातून सुद्धा व्यक्त केले जाऊ शकतात. धन्यवादासाठी भाषेचा अडसर कधीही नसतो, आणि हिच खरी संस्कृती, हाच खरा सुसंस्कृतपणा म्हणता येईल.

# मी, माही वसई आणि कोळीगीतं..

■ **अतुल काटदरे**, 9969285045
bhovara.bhramanti@gmail.com

कोळीगीतांसोबत माझं काय नातं जडलंय हे मला आजतागायत न उलगडलेलं कोडं आहे. का कुणास ठाउक पण आजही कुठल्याशा कोळीगीतांचे बोल अगदी पुसटसे जरी ऐकू आले तरी मन मोहरून जातं आणि कोळी बाजाच्या तालावर पावलं आपोआप थिरकतात.

तसं पाहीलं तर माझं बालपण बोरिवलीत गेलं. वझिरा, एक्सर, बाभई, गोराई, पोयसर.. कधी काळी गावं होती हे सांगून पटणार नाही त्या वेळी आम्ही तिथे रहायला आलो. शहर वसण्यापूर्वी या गावांतली बहुसंख्य वस्ती मुख्यतः कोळी, भंडारी, पाचकळशी, इस्ट इंडियन लोकांचीच असावी. वझिरा कोळीवाडा हाकेच्या अंतरावर असूनही कोळीवाड्याशी विशेष सलगी नव्हती. पुढे 'पोऱ्या फिरवावच्या' निमित्तानं गोराई गावचा संबंध आला. पण पोरींपेक्षा इथल्या निसर्गावरच अधिक प्रेम जडलं आणि मग सायकल फेरीत चढवून खाडी पार करत गोराई गावापासून पुढे मनोरीपर्यंत आणि मनोरी जेट्टीहून फेरीने पुन्हा खाडी पार करून मार्वेपासून थेट मढच्या किल्ल्यापर्यंत रपेट होत असे. या सायकलस्वारीदरम्यान समुद्रकिनाऱ्यालगतची ती सुंदर गावं कॅमेऱ्यात कैद करताना कमरेला 'सुर्का' लावून 'होऱ्या' सोडणाऱ्या एका विशिष्ट जमातीबद्दल प्रचंड कुतूहल जाणवू लागलं. 'लुगरं' नेसून डोईवर 'म्हावऱ्याची' टोपली वाहणाऱ्या त्यांच्या बायांचे फोटो काढताना अगदी मार खाता खाता वाचलो. पण मस्ती काही कमी झाली नाही. यादरम्यान पितळेची चकचकीत हत्यारं पाजळणाऱ्या ब्रास बँडनी सुद्धा काही दिवस भुरळ घातली अन् कॅथोलिक कोळ्यांच्या वऱ्हाडापासून अगदी मयतापर्यंत वाजणाऱ्या बँडच्या सुखद सुरात मी काही काळ रमलो. पुढे पोटापाण्याच्या

उद्योगधंद्यानिमित्त विरार पट्ट्यात रूजू झालो तेव्हा इथल्या स्थानिक ऑफिस बॉयच्या नादानं माझ्या फोनची मेमरी कोळीगीतांनी फुल्ल झाली. मला वाटतं इथेच कुठेतरी माझा कोळीगीतांसोबत स्नेह निर्माण झाला असावा आणि वसईला रहायला आल्यापासून तो अधिकच वृद्धिंगत होत गेला. आजही ट्रेनमध्ये एखाद्याच्या रिंगटोनवर कोळीगीत वाजते; तेव्हा त्याने फोन उचलून अगदी संभाषण पूर्ण करून फोन ठेवल्यानंतरही बराच वेळ ती टोन माझ्या मनात पिंगा घालत रहाते. एवढंच कशाला, हापिसात कामाचा खुप ताण असेल तर 'स्ट्रेसबर्स्टर' म्हणून युट्यूबवर कोळीगीतांचीच 'प्ले लिस्ट' लागते!

तर अशी ही माझी 'वेसावकर आणि मंडळीं'च्या टेपपासून सुरू झालेली लोकगीतांची मैफिल पांडुरंग वनमाळी, विठ्ठलदादा उमप, बालकराम वरळीकर वगैरे दिग्गज मंडळींपर्यंत येऊन पोहोचते. हा सांगितिक प्रवास मला माझ्या वसई ते अर्नाळा प्रवासासमान भासतो! यात वसईच्या किल्ल्यापासून ते अर्नाळा किल्ल्यापर्यंत लागणाऱ्या रानगाव, भुईगाव, कळंब, राजोडी, जेलाडी, नवापूर आणि अर्नाळा गावच्या समुद्र किनाऱ्यांलगतच्या कोळीवाड्यांसोबतच इथल्या स्थानिक वाडवळ, कुपारी, सामवेदी, इस्ट इंडियन व आदिवासी समाजातल्या लोकगीतांचे सूर देखिल मिसळतात; आणि ऐन 'नारली पुनवंला' अर्नाळ्यात रंगलेली ही मैफिल सोन्याचा मुलामा दिलेल्या नारळागत माझ्या आनंदसागराला भिडते.

आज ऑफिसात रात्री उशीरापर्यंत काम करून, अगदी ४-५ पर्याय देऊनही माझं डिझाईन अप्रूव्ह झालेलं नसतं तेव्हा मी पार कंटाळून जातो. अख्खं ऑफिस रिकामं असतं. माझा 'बे' सोडून बाकी सगळीकडचे दिवे मंद असतात. ए.सी.चा गारवा चांगलाच जाणवत असतो. एक ब्रेक घ्यावा म्हणून मी मशिनवरून फेसाळती कॉफी घेऊन पुन्हा जागेवर येतो. वाफाळणाऱ्या कॉफीचा कप डेस्कवर ठेवून युट्यूबवर हलक्या आवाजात माझ्या आवडत्या वसईच्या लोकगीतांची प्लेलिस्ट सुरू करतो. क्षणभरासाठी म्हणून रिक्लायनरवर बसल्या बसल्या डोळे मिटतो अन् आठवणींच्या हिंदोळ्यांवर स्वार होतो.

*"बागेसभोवती फुलयली शायली या बागेचा कोन माळी?*

*माळी या.. बागेचा कोन माळी??*

*व्हटाला लाली, कानाला वाली बाई.. दिसते ही रिंगवाली..*

*न माय ही दिसते गो रिंगवाली"*

उमेळ्यालगतच्या मिठागरांपासून ते वासळई, वटार, नवापूर, नाळ्यातल्या नारळी, पोफळींच्या अन् जाई-जुईच्या बागांपर्यंत कुठेही भरकटत जावं इतका देखणा निसर्ग मनात भरतो. बहुतेक दर शनिवार-रविवार फावला वेळ आणि मुबलक पेट्रोल असा योग मी जुळवून आणतो आणि स्कूटरवरून वाट मिळेल त्या दिशेने सुटतो. केवळ ट्रेकिंगदरम्यानच नाही तर अगदी शहरातल्या रस्त्यांवरही मला 'नेव्हिगेशन' नीट समजत नसल्याने मी हमखास हरवतो. पण इथे हरवण्यातच गवसण्याचा आनंद आहे. शिवाय कुठेच पोहोचायचं नसल्याने प्रवासाचा आनंद द्विगुणित होण्याचा अनुभव आहे! रस्त्याच्या दोन्ही बाजूंना असलेल्या वनराईतून डोकावणाऱ्या दयामाता, मर्सी, कृपासिंधू वगैरे नावं मिरवणाऱ्या टुमदार बंगलोज् किंवा 'पॅलिशिअस व्हिलाज्' च्या बाल्कनीमधून डोकावणारी सुंदर पोरगी पाहिल्यावर मनाच्या तारा आपोआप वाजू लागतात.

*"अंबर नंबर बोलतंय शंभर नंबर,*

*पोरी उभी कला खिडकीमनी..?*

*पोरी उभी कला खिडकीमनी..??*

*गुलाबी गाल, तुझी वाकरी ही चाल,*

*पोरी भरलंय तू माझे मनामनी..*

*पोरी भरलंय तू माझे मनामनी!*

*पोरी येरा केलास मला पागल केलास पोरी येरा केलास*

*तुझे नादानी.. मना येरा केलास तुझे नादानी..*

*लाखामनी एक तू पाटलाची लेक चमके टिमक्याची सारी हाय रंगामनी..*

*चमके टिमक्याची सारी हाय रंगामनी!!"*

त्यातही ओसरीवर शांत झोके घेत झोपाळ्यावर बसलेली 'पास्कीन'बाय जेव्हा फुलं खुडाया फाटकाशी येते तेव्हा तिची तारीफ काय वर्णावी.

*'पास्किन' उभी रे गो दारा*

*जीव माझा केलास तुझून वेरा*

*'पास्किन'चे वट्यावं हाय इमला*

*'पास्किन'चे बापाचा हाय बंगला..*

*'पास्किन'चे बापाचे शेतवारी*

*'पास्किन'चे दारा पों पों गारी*

*'पास्किन'चा गोरा शोभित चेहरा*

*'पास्किन' चल गो माझे घरा..*

*पास्किन.. पास्किन.. पास्किनचे पल्लाय दोस्तीन..*

तर वसईतली ही हिरवळ पाहून नियतीने लवकर लग्न उरकून आपली फसवणूक तर नाही ना केली हा विचार मनात आल्याखेरीज रहात नाही. नाहीतर आज मीसुद्धा शाहीर पांडुरंग वनमाळींसारखा नायगाव कोळीवाड्यातून "अगो सर्गेवाली होतेस का माझी नवरी, माझे मनानं भरलीया कवरी" म्हणत हिंडलो असतो.

*"हिरकनी नथनी घडवीन*
*तुला मुंबई बंदरा फिरवीन*
*अगो दारानं मांडव सजवीन*
*आन् वाजंत्र्याचा बार उरवीन*

*राजा-रानीची सोभंल जोरी..*
*माझे मनानं भरलीया कवरी.."*

बाकी या म्हावरेवाल्या पोरींना मुंबई बंदराचं काय एवढं 'कवतिक' आहे हा माझ्या आकलनशक्ती पलिकडला मामला आहे. म्हणजे नव्वदच्या दशकात 'कृणाल म्युझिक' सादर करीत आहे 'नॉन स्टॉप कोळीगीतांचा धमाल नजराणा' वगैरे टेप रेकॉर्डरच्या जमान्यात समजू शकतो. तेव्हा अगदी जोगेश्वरीला राहणारा माणूसही माहीमला जाताना 'मुंबईला जाऊन येतो' म्हणायचा. पण आता तर जग जवळ आलंय. तबकडीच्या सिड्यादेखिल आऊटडेटेड झाल्यात, तरी पोरी काही 'डेस्टिनेशन' बदलायला तयार नाहीत. अगदी हल्लीच्या कोळीगीतात सुद्धा तेच..

*"सागरी पिरतीची दौलत न्यारी पर मासोली हाय तू सोन्यावानी*
*बेभान पीरमाच्या लाटेवरी सांग येशील का तू मंगलेदारी?*
*फिरवू इश्काची नौका दर्यावरी, 'मुंबईचे किनारी'..*
*जाऊ जोऱ्यांशी आपुन बंदरावरी, 'मुंबईचे किनारी'.."*

अगदी आजच्या घडीला युट्यूबवर ट्रेंडिंग असणारा माझ्या आवडत्या कोळीगीतांचा गायक रजनीश पटेलसुद्धा आपल्या प्रेयसीला आमीश दाखवताना म्हणतो,

*"सकालचे पारीला बाबाचे होरीनं 'मुंबईचा मरीन' फिरवीन तुला..*
*इश्काची न्यारीसी, आय मीन प्यारीसी सफर मी देईन तुला!"*

च्याऽयला काय आहे तरी काय नेमकं मुंबईच्या किनारी? भयंकर गर्दी; इतकी की नजर जाईल तिथवर फक्त

माणसांचाच महासागर नजरेस पडतो. त्यापेक्षा आपले 'वसईचे किनारी' काय कमी आहे? पिकतं तिथे खपत नसतं हेच खरं. तरीसुद्धा मुंबईच का? पुण्याला समुद्र नाही म्हणून? मग अशा वेळी मला जराशी लाजत, थोडीशी घाबरत

*"गोव्याच्या किनाऱ्यावर नाखवा व्हरीनं नेशील का..*

*नील सागरी दुनियेची सफर देशील का?"*

म्हणणारी गोड नायिका जास्त 'रोमांचिक' भासते. पण गोवा म्हटल्यावर वारेमाप खर्च होतो अन् अचानक रिझर्व्हच्या दिशेने झुकलेला पेट्रोलचा काटा डोळ्यांसमोर येतो. तेव्हा मी लगेचच निष्कर्षाप्रत पोहोचतो आणि स्वतःलाच समजावतो, "अरे हटाव ये बोंबिल-मांदेली असली 'रावस' तर तीच जी म्हणेल,

*"नको मुंबई, नको पुना, नको नको मना गोवा...*

*किल्ला कुलाबा मला खंदेरी हुंदेरी दावा..*

*लई दिसाची हाय, इच्छा मनाची बाय,*

*माझी हाऊस पुरवाल का..*

*ओ नाखवा बोटीनं फिरवाल का??"*

काय गंमत आहे ना! काही म्हणा, सौंदर्य हे स्त्री जातीला लाभलेलं वरदान. त्यातही इथल्या कुपारी गाण्यात म्हटलंच आहे "वसईच्या पोऱ्या शोभेला बऱ्या.. वसईच्या बंदरा सुसाट वारा.." त्यामुळे किल्ल्यालगतच्या जेट्टीवर एखादी कोळीण 'लुगडं' नेसून ताटकळत उभी असते तेव्हा पुन्हा एकदा शाहीरांचे बोल कानात घुमतात,

*"वसयकरीन बाय तू उभी बांधावर, पदर तुझे खांद्यावर...*

*फुलांचा गजरा डुले माथ्यावर, नजर तुझी चांदावर..*

*कोली नवरा बरा गे माय, म्हावऱ्याच्या टोपल्या घरा गे बाय!*

*वसयकरीन बाय गो, वसयकरीन बाय..*

*म्हावऱ्याची टोपली तुझे माथ्यावर हाय गो!!"*

यावर उत्तरादाखल 'बारडोली'हून परतणाऱ्या तिच्या नाखवाचा 'होर' नांगरताना जवाब येतो,

*"गोमू सर्ग्याची टोपली तुझे माथ्यावरी*

*सगलेच बघतील तुझ्यावरी..*

*ये गो इक्रा करूनशी बेगिन घरी*

*तुझी वाट बघीन मी रस्त्यावरी!*

*बरा इक्रा कर गो बाजाराला,*

*तुझ्यासाठी आणतो नवा सारा..*

*उठ गोमू उठ गोमू होरं आयलंय म्हावरं झेऊन जा बाजाराला.."*

खरंच, वसईच्या मातीत प्रेम रुजतं. अगदी इस्ट इंडियन भाषेतल्या गोडव्याप्रमाणेच्! शेरीसोबत इथल्या गावांतून फिरताना माझ्या तोंडी व्हॅलेंटाईन मच्याडोची उडती गाणी नाही आली तर नवलंच्.. मात्र ही 'ड्यूएट्स' गायची पद्धत अगदीच निराळी! ब्रासच्या वद्यांच्या सुरात, ड्रम्सवर वाजणाऱ्या एका मस्त 'म्युझिक पीस'ने गाण्यांची सुरूवात होते. पुढे अगदी ध्रुवपदापासूनच् 'मेल'/ 'फिमेल' आपापले पार्ट गाऊन झाले की प्रत्येक कडव्याच्या शेवटाला दोन्ही पार्ट दोघांनी मिळून गायले जातात.

*"जुली तू दिसतेस आवरी भोली न जैसी मोगऱ्याची कली*

*कालजान मया तूझी खिलली, तुला बघून नजर माझी फिलली..*

*हायस् तू गावांचा मोवाली न करतंस लोकांची दलाली*

*हालविली झारांची डांगली न डांगली, कवरी बरी बरीच फुलं परली.."*

यामध्ये कोळीगीतांसारखा कोरस क्वचितच ऐकायला मिळतो पण ब्रास बँड मात्र कमाल करून जातो. प्रेमगीत असो, विरहगीत असो वा थट्टा मस्करी.. प्रत्येक ड्युएटची गंमतच निराळी..

*"शिकलेली पोरी तू नखरेबाज.. नखरेबाज ये गो शेरा तुला देतंय गंल्लास..*

*नको रं पोरा मला तुझं गंल्लास.. मला तुझं गंल्लास*

*दारू पाजून मला करशील खल्लास..*

*शेरा तुझा बघून चिकना चेहरा,*

*माझा जीव झायलाय एकदम येरा*

*तुझ्यासारखा बघितला नाय मीनी बेवरा,*

*मला नको ह्यो ऐसा नवरा!"*

बरं या गाण्यांत आणि एकंदरीतच् इथल्या लोकजीवनात दारू तितकीशी वर्ज्य नाही. काही सणासुदीला दारू निषिद्ध असली तरी काही सोहळे-समारंभ दारूशिवाय साजरे होत नाहीत. त्यामुळे कोळीगीतातसुद्धा तसा उल्लेख सहाजिकच आहे..

*"बिअर व्हिस्कीची बाटली*

*पिताना रस्त्यानं फुटली*

*निंबरान बेगीन चरली गो.. बेगीन चरली..*

*दारू हानली गो गोव्याची*

*चटनी केली गो बोंबलाची*

*फोडनी दिली गो लसनाची.. दिली गो लसनाची.."*

एक मात्र खरं, बिअर-व्हिस्कीपेक्षाही अधिक आनंद देणारी जबरदस्त नशा इथल्या मुशाफिरीत आहे. माझ्या प्रत्येक भटकंतीदरम्यान इथल्या खाऱ्या हवेत मला एका वेगळ्याच समाधानाची झुळूक जाणवते. किल्लाबंदर-पाचूबंदरापासून थेट अर्नाळा बंदरापर्यंत लाभलेला सागरी किनारा, आभाळात डोलणारे माड अन् पोफळी, जीवनदायी विहिरी, तलाव आणि बावखालं. त्यावर पोसलेली नाना तऱ्हेची वृक्षसंपदा आणि वनसंपदा. वाढत्या शहरीकरणाच्या रेट्यात टिकून राहिलेली ही हिरवीगार गावं मोकळा श्वास घ्यायला शिकवतात. या श्वासावाटे हृदयात शिरतो तो इथल्या मातीचा मृद्‌गंध!

ही गावं नकळत जगण्याची नैसर्गिक शैली शिकवून जातात. भरती-ओहोटीप्रमाणे बदलणाऱ्या सुखदु:खाच्या व्याख्या सांगतात. संकटी वादळात धीर धरायला लावतात. आणि सगळी वादळं पचवून इथल्या केळीप्रमाणे सालीच्या कोशात माधुर्य टिकवून ठेवायचं अगाध ज्ञान देतात. माझ्या वसईकर 'दोस्तदारां'च्या स्वभावासारखीच गोड अशी इथली प्रसिद्ध 'सुकेळी' खाऊन मी देखिल इथलाच होऊन जातो. पण अर्नाळकर होण्यासाठी मात्र "माहीमचा हलवा हानिन तुला गोमू हानिन तुला, नाय खाल्लास तर मारीन तुला" मधला 'माहीमचा हलवा' म्हटल्यावर माहीम स्थानकाबाहेर मिळणारा रबरासारखा चिकट, लिबलिबीत रंगीत पदार्थ मनातही न येता 'हलवा सारंगा' डोळ्यासमोर यावा लागतो!

अर्नाळ्याला पारनाक्यावर पोहोचल्यावर तर कहर होतो. आत्तापर्यंत कानात वाजणाऱ्या ऑडियोचं रूपांतर व्हिडिओत व्हायला सुरूवात होते. नाक्यावरच्या मासळी बाजारत "ये दादा आवार ये" किंवा "चिकना चिकना म्हावरा माझा" म्हणत 'इक्रा' करत प्रसंगी "फाटकी नोट मना घेवाची नाय, धंद्यात खोट मना खावाची नाय" म्हणून गिऱ्हाईकासोबत हुज्जत घालणारे विठ्ठलदादा उमप चक्क डोईवर लाल टोपी न् कमरेला रुमाल लावून उभे दिसतात! जेट्टी नसल्याने गुडघाभर पाण्यातून अर्नाळा बेटावर 'होरी' पकडायला धावणारे शाहीर पांडुरंग वनमाळी कमरेला रुमाल गुंडाळून "चल बेगीन चल गो चंद्रा,

होरी आयलिया बंदरा" अशी मनसोक्त 'हाळी' देताना दिसून येतात.

आणि शेवटी एकदाचा तो क्षण येतो ज्याची मी खुप आतुरतेने वाट पहात असतो. तो क्षण, तो सोहळा जो 'याची देही याची डोळा' पहाण्यासाठी मी दिवस मोजत असतो. ते बोल जे गेले कित्येक दिवस सतत माझ्या प्लेलिस्टवर आणि कानात घुमत असतात ते सत्यात उतरतानाचा हाच तो क्षण.

*"इथं कोलिवारा, नटून जमला सारा... सागर देवाला पुंजावला..*

*देव कोल्यांचा पावतो, संकटी धावतो.. राखन करावला..*

*चला वाजत गाजत नाचत जाऊया सोरूया होरीला!!*

*सन आयलाय गो, आयलाय गो नारली पुनवंचा..*

*मनी आनंद मावंना कोल्यांच्या दुनियेचा..*

*अरे बेगिन बेगिन चला किनारी जाऊ देवाच्या पुंजंला..*

*हात जोडुनशी नारल सोन्याचा देऊया दर्याला.."*

विठ्ठल मंदिरात आरती सुरू असते. बाहेर सोन्याच्या नारळाची भव्य प्रतिकृती मिरवणूकीसाठी सज्ज असते. मंत्रपुष्पांजली होते आणि 'सी स्टार' ब्यांडपथक चार्ज घेतं. मेहेर मास्तर, रुकेश तांडेल वगैरे मंडळी ब्रासची हत्यार पाजळतात. आता यापुढे आपण फक्त गाणी मोजायची.. मी हाय कोली सोरील्या डोली मुंबईच्या किनारी.., दर्यावरी आमची डोले होरी.., वेसावची पारू नेसली गो नेसली गो नवा सारा.., पारू गो पारू वेसावची पारू वर आयलेन तुला वर आयलेन.., हीच काय गो गोरी गोरी पोरी न मिरवते कवरी.., डोंगराचे आरून इक बाई चांद उंगवला.., एकवीरा आई तू डोंगरावरून नजर हाय तुझी कोल्यावरी.. एकापेक्षा एक अशी फार्मास गाणी वाजवली जातात. अशा वेळी ड्रम्सच्या तालावर अन् ट्रंपेटच्या सुरावटीत पावलं थिरकतात. एक हात वर उडवंत बेधुंद नाचणारी 'कोल्याची पोर' पाहून लतादिदींच्या गोड आवाजातलं 'डोलकर दर्याचा राजा' हे गाणं माझ्या डोळ्यांसमोर चित्रवत उभं रहातं..

*"आयबापाची लाराची लेक मी लारी*
*चोली पिवली गो नेसलंय अंजेरी सारी*
*माज्या केसान गो मालीला फुलैला चाफा*
*वास परमालता वाऱ्यानं घेतंय झेपा..*

*नथ नाकान साजिरवानी*
*गला भरुन सोन्याचे मनी*

*कोलिवाऱ्याची मी गं रानी*

*रात पुनवेला नाचून करतंय् मौजा!"*

बाळगोपाळांपासून म्हाताऱ्याकोताऱ्यांपर्यंत पारंपारिक वेशभूषेत नटलेली ती तमाम जनता सोन्याच्या नारळासोबत नाचत मिरवत समुद्रकिनारी पोहोचते. 'बारडोली'ला निघायला 'होऱ्या' तयारच् असतात. नाखवामंडळींची लगबग चालू असते. प्रार्थना करून मोठ्या भक्तीभावाने दर्याला नारळ अर्पण केला जातो..

*"नाखवा निंघालाय डोलीला... येऊंदे मांघारी घराला...*

*नारली पुनवंचे सनाला न् नारल सोरूया दर्याला.."*

अंधारात मिणमिणत्या दिव्यांच्या उजेडात, हवेत डिझेलचा दर्प सोडत अनेक बोटींची इंजिनं धडाडतात. इथून पुढे कित्येक दिवस परतून न येणाऱ्या त्या खलाशांच्या आया-बायांच्या मनाची अवस्थाही त्या धडधडणाऱ्या इंजिनांपेक्षा वेगळी नसावी. अशा या कातरवेळी मला 'नारली पुनंवे'च्या सणामागची भावना लक्षात येते.. हा सण केवळ ठराविक जाती-धर्माचा नसून 'दर्या सागर हाय आमचा राजा.. त्याचे जीवावर आम्ही करताव मजा..' मानणाऱ्या सर्वांचा उत्सवच जणू. निसर्गपुजक संस्कृतीचं एक सुंदर प्रदर्शन. रेती, मासेमारी, मीठशेतीसारख्या धंद्यांवर पूर्णपणे अवलंबून असणारा माणूस आणि त्याला पोसणारा त्याचा 'मायबाप' समिंदर यांच्या नात्यातला जिव्हाळा, प्रेम अन् ऋण व्यक्त करण्याची एक संधी.. आमचे विठ्ठलदादा उगाच नाय म्हणत,

*"देनं देवानं दिलंनं आम्हाला कवरं*

*पिक दर्याचं रेती मीठ आनि म्हावरं*

*ऐशी ही आमची शेती बरं.. कोल्यांना पोसतोय समिंदर..*

*देवाची किरपा आम्हावंर.. कोल्यांना पोसतोय समिंदर.."*

वाह! एखाद्या स्वप्नवत चित्रफीतीच्या अनुभूतीतून बाहेर पडावं तसं मी गतकाळातील आठवणींतून वर्तमानात परत येतो!!

कंप्युटरची स्क्रीन बंद असते. डेस्कवर ठेवलेली कॉफीदेखिल थंड पडलेली असते. मी वेळ पहाण्यासाठी म्हणून मोबाईल अनलॉक करतो तेव्हा व्हाट्सएप वर २ नोटीफीकेशन्स दिसतात. त्यापैकी १ म्हणजे मी अप्रूव्हलसाठी

पाठवलेलं पाचवं डिझाईनही रिजेक्ट झालंय हे दर्शवणारा माझ्या बॉसचा कॅपिटल अक्षरातला बोल्ड 'NO'.. मी तो मेसेज उघडायची तसदीही न घेता दुसऱ्या नोटीफीकेशनवर क्लिक करतो. त्यात आमच्या ऑफिसमध्ये 'क्लायंट सर्व्हिसिंग' सांभाळणाऱ्या आल्बन वैतीने 'गुलाबाच्या फुलाला' नावाच्या वसईच्या लोकगीतांच्या आल्बमची लिंक पाठवली असते. (आम्हा दोघांचं कोळीगीतांवरचं प्रेम सामायिक असल्यामुळे तो क्वचित मलाही अशा प्रकारची 'सर्व्हिस' देत असतो.) माझ्या चेहऱ्यावर मंद स्मित उमटतं..

घड्याळात साडेबारा वाजलेयत. वसईतल्या भटकंतीच्या व कोळीवाड्यांतल्या नारळी पौर्णिमेच्या आठवणी सरल्यायत. आता रात्रभरासाठी उरलीये ती नीरव शांतता, कंटाळवाणा

एकांत अन् सोबतीला गाडाभर कामातून काही क्षणांचा विरंगुळा देणारी माह्या वसईतली लोकगीतं..!

गेल्या काही वर्षांत 'भोवरा'च्या निमित्ताने वसई, पालघर, डहाणू, धारावी, ठाणे, अलिबाग या किनारपट्टीलगतच्या जिल्ह्यांतून खुप हिंडलो. इथला निसर्ग, इतिहास, संस्कृती, भाषा, लोकसंगीत, खाद्यसंस्कृती अनुभवायला मिळाली; त्यांच्या प्रेमात पडलो. आता स्वतः तर हिंडतोच आणि 'भोवरा'च्या माध्यमातून इतरांनाही फिरवतो!

या किनारपट्टीच्या खाऱ्या म्हावऱ्याचा दर्प आणि पुनवेच्या चांदण्या रात्री येणारा लाटांचा मंद आवाज माझ्या लेखणीतून कागदावर व्यक्त होतो इतकंच; बाकी त्यात माझं खास कौशल्य असं काहीच नाही. आशा करतो एखाद्या भटकंतीनिमित्त आपलीही भेट होईल आणि यापुढेही अश्याच सुरेख अनुभूती आपल्यासोबत शेअर करायची संधी मिळेल! तूर्तास नाताळ विशेषांकाच्या माध्यमातून भेटूच... वसयकरांना नाताळ व नवीन वर्षाच्या खुप खुप शुभेच्छा!!

# MPSM: धर्मापलिकडचा धर्म !!

■ फा. वेन्सी डिमेलो एस.जे., नाशिक.

जगातील विधीवत पारंपरिक धर्म मानवी कल्याणाच्या आड येऊ नयेत. सेवेत अडथळा ठरू नयेत. अभिनिवेश धर्माचा आणि त्यातील कर्मकांड विधींचा नसावा. माझाच धर्म श्रेष्ठ हा गर्वही नसावा. धर्मातील मानवी मूल्यांचा, मानवी हक्कांचा नि निष्टांचा अभिमान असावा.

जगातील धर्म पाळण्याचे स्वातंत्र्य सर्वांनाच आहे. पण ते वैयक्तिक पातळीवर असावे. सामुहिक पातळीवर ते अडथळा होऊ नये. त्यामुळे सर्वधर्मीय उदारमतवादी सेवक एकत्र येऊन जनसेवेचे कंकण बांधून सर्वात्मका सर्वस्पर्शी समाज घडवू शकतात. हेच स्वप्न नि विशाल दिशा घेऊन MPSM सर्वांना सोबत घेऊन सहप्रवासी होऊन नाशकात सेवाकार्य करीत आहे.

१९६२-६५ च्या सुमारास महाराष्ट्र प्रबोधन सेवा मंडळ (MPSM) ह्या संस्थेची स्थापना नाशकात झाली. गरजू आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांना शेतीविषयक मदत नि कृषी मार्गदर्शन हे संस्थेचे मुख्य ध्येय नि मिशन. आज गेली पच्चावन् साठ वर्षे ही संस्था नाशिकमधील पाच तालुके नि पालघर मधील मोखाडा अशा अतिदुर्गम डोंगराळ भागात शेतीविषयक सातत्याने अथक नि अविरत प्रबोधन नि सेवा अल्पभूधारक शेतकऱ्यांना देत आहे. सोबत शिक्षण, आरोग्य आणि जीवनमान उंचाणारे अन्न, वस्त्र, निवारा आदि वर मार्गदर्शन करीत आहे. त्यासाठी लागणाऱ्या सुविधा पुरवत आहे.

नाशिक व्यतिरिक्त संस्थेचे ठाणे, पालघर, रायगड, धुळे, नंदुरबार, औरंगाबाद व अमरावती येथेही विस्तारित सेवा कार्य चालू आहे. ह्या संस्थेच्या सत्तर वर्षांच्या अशा ह्या सेवा परंपरेत मला गेली सात वर्षे सेवाकार्य करण्याची संधी

लाभली. त्या कार्यात मी धर्मगुरू म्हणून घेतलेला धर्मापलिकडच्या धर्माच्या सेवाकार्याचा अनुभव ख्रिस्तायनच्या वाचकांसोबत शेअर करू इच्छितो.

धर्मगुरू पुरोहितांचे पाचारण म्हणजे, आणि ठोबळ मानाने त्याची व्याख्या म्हणजे, त्यांनी आपापल्या धर्मातील भक्तांची काळजी घ्यावी. धर्माचे शिक्षण द्यावे. संस्कार करावेत. पूजाअर्चा सांभाळाव्यात. भक्तांची धर्मसंख्या वाढवावी. अभिमान जागवावा आदि....

परंतु ख्रिस्ताचा धर्म खरे म्हटले तर जगातील इतर धर्माप्रमाणेच मानवी जीवनाच्या सर्व अंगाशी व पैलूंशी संबंधीत आहे. संपूर्ण मानवी जीवनाविषयी आस्था बाळगणारा त्याचा धर्म आहे. माणसाच्या संपूर्ण जीवनावर सत्यधर्माचा परिणाम झाला पाहिजे. या संपूर्ण जीवनात सामाजिक जीवन, राजकीय जीवन, आर्थिक जीवन, संस्कृती, पर्यावरण, शेती, शिक्षण, स्वातंत्र्य, न्याय, समता, बंधुता, एकता या सर्वांचा समावेश होतो. जीवनाच्या या विविध दालनात वावरताना ख्रिस्ती माणसाने ख्रिस्ताच्या ह्या सर्वात्मक सर्वस्पर्शी दृष्टिकोनाकडे पाहिले पाहिजे.

दुर्दैवांने आम्ही ख्रिस्ती लोकांनी इतर धर्मीयांप्रमाणे पूजाअर्चा भक्तिभाव अधिक जोपासला. जीवनाच्या ह्या विविध अंगातही कसे अध्यात्म आहे ह्याकडे पाहिलेच नाही. कर्मकांडाचाच अधिक पुरस्कार केला. समाज, माणसे बांधण्याऐवजी अवाढव्य कोरीव लेणी, धर्मस्थळे, तीर्थक्षेत्री चर्चेस इमारती अधिक बांधल्या. धर्मकलेला अधिक महत्त्व दिले. मात्र आजचे ख्रिस्ती धर्मगुरू धर्मभगिनी कला नि कर्म ह्यातील तारतम्य पाळून वागत आहेत. सामाजिक, शैक्षणिक आदी क्षेत्रामध्ये कार्य करताना दिसतात. आपल्या धर्माची संकोचित चौकट मोडून सर्व धर्मीय समाजासाठी राबताना दिसतात. जिथे जिथे अन्याय आहे. तेथे गोरगरीबांच्या न्यायासाठी लढताना दिसतात. प्रसंगी परार्था प्राणही देतात. ही येशूला अभिप्रेत असलेल्या धर्माची खरी ओळख आहे.

भारतात आपण अल्पसंख्यांक आहोत. ह्याची जाणीव त्यांना आहे.

म्हणून ते त्यांना अनुकुल असलेल्या इतर समाजसेवी संस्थांबरोबर मानवी कल्याणाच्या कार्यात सहप्रवासी बनून कार्य करतাताना दिसतात. "सेवेत जे आपणास अनुकूल आहेत ते आपणास प्रतिकूल नाहीत." अशा कार्याची मूहर्तमेढ जेज्वीट फादर बारांको आणि फादर बाकर ह्या धर्मगुरूनी सर्वप्रथम नाशिक, नगर भागात घातली.

MPSM ही त्यापैकी एक संस्था. पाण्याने बाप्तिस्मा देऊन नव्हे तर येथील पाण्याचाच बाप्तिस्मा त्यांनी केला आणि एक घोट पाण्यासाठी तळमळणाऱ्या वणवण हिंडणाऱ्या दुर्भिक्ष्यांचे आशीर्वाद मिळविले.

त्यावेळी शासन जिथे पोहचले नव्हते तेथे MPSMचा बोलबाला होता. दुष्काळी भागात महाराष्ट्रातील पहिली बोअरवेल नाशकात खणली गेली. साठ सत्तरच्या दरम्यान वसईतही 'वाडी तेथे विहीर' अशी योजना MPSMनी राबवली होती. शेतकऱ्यांचे जीवनमान उंचवावे, शेतीत आधुनिकता यावी, दारिद्र्य दूर व्हावे, पाण्याचे दुर्भिक्ष्य टळावे, शेतकऱ्यांच्या मुलांनी खूप शिकावे, सर्वांगीण प्रगती व्हावी हा त्यामागील हेतू होता.

आज सत्तर वर्षानंतरही MPSMचे हे काम पाचसहा तालुक्यात सातत्य ठेवून चालू आहे. जल, जमीन नि जंगले वाचावीत ती वाढावित. हिरवा निसर्ग रहावा, विधात्याच्या विश्वाचे रक्षण व्हावे म्हणून प्रबोधन करीत आहेत. ह्या पर्यावरणाच्या लढाईत आज दहा धर्मगुरू, धर्मबंधू, बारा धर्मभगिनी आणि एकोणीस एक्स्टेंशन ऑफीसर तालुक्याच्या खेडोपाडी राहून शेती शाळा आरोग्यात पूर्ण वेळ कार्यरत आहेत.

करोना काळात प्रतिबंधक उपाय म्हणून फादरसिस्टरांची एक टीम नर्सेससह सात आठ महिने योध्दे बनून जोखीम पत्करून खेडोपाडी राबत होती. ह्याची दखल येथील कलेक्टरसाहेबांद्वारे शासनाने घेतली आहे. येथील होलीक्रॉस चर्चची आतापर्यंतची संकोचित धार्मिक छबी बदलून आज ती विशालतेत बदलली आहे. सर्व धर्माचे सेवाभावी लोक इथे येऊन NGOच्या सभा समारंभ संमेलने

शिबिरातील मानव कल्याणकारी सेवाकार्यात नांदत आहेत. चर्चचे दरवाजे ह्या देवाच्या प्रजेसाठी खुले आहेत.

आज रोम शहरी जगातील निवडक बिशपांच्या उपस्थितीत पोप फ्रान्सिस ह्यांनी धर्म महासभेचे आयोजन केले आहे. त्यात विविध धर्माच्या लोकांसह सहप्रवास करून मिशन राबवणे हा प्रमूख मुद्दा चर्चिला जात आहे. आणि त्याच मार्गाने MPSMची गेली सत्तर वर्षे वाटचाल चालू आहे. ह्या मानवी विकासाच्या सर्वस्पर्शी घडणीत आस्तिक नास्तिक अशा विविध क्षेत्रातील विचारसरणीचे विचारवंत विवेकी धर्मसेवक कार्यकर्ते हितचिंतक धर्मापलिकडचा धर्म पाळून सहप्रवासी बनले आहेत. विश्वाच्या अभ्युदयाची एकमेव आशा त्यात दिसत आहे. "खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे" गीत गात आहेत. जगात धर्माच्या नावे उद्भवणाऱ्या दंगली, लढाया, मारामाऱ्या, निरपराध हत्या आदि रोखण्यासाठी हे MPSMचे धर्मापलीकडील मिशन सेवाकार्य त्यासाठी उत्तर उदाहरण असू शकते.

माझा पिंड हा वसईतील एका ख्रिस्ती विवेकी समाजवादी सेवाभावी कुटुंबात घडला आहे. आज मी ख्रिस्ती धर्मगुरू आहे. धर्माच्या सोनियाच्या पिंजऱ्यात न अडकता "आकाशी झेप घेरे पाखरा" असे खुले आकाश आज मला सेवेस खुणावत आहे.

---

इतरांना दाखवण्यासाठी म्हणून
वेगळा ‘मास्क’ तोंडावर चढतो
उसन्या मुखवट्यामधून आपण
खरं वागणंच सोडून देत असतो.

खऱ्याला किंमत राहिली नाही
रेटलेल्या खोट्याचा बुरूज उभा होतो
निस्पृह मैत्रीच्या आड सुद्धा
कृत्रिम ओशाळलेला भाव येतो.

# कोरोनाचे बळी

■ पौलस वाघमारे, पुणे

त्या दिवसाची सकाळ उगवली तीच मुळी काळवंडलेली. पक्षी किलबिल करीत होते पण त्यांची किलबिल कर्णकर्कश वाटत होती. नेहमी आल्हादायक वाटणारी उगवती आज भयाण वाटत होती. वसंतराव गेल्याची वार्ता रात्री झाली होती. खबर आल्यापासून घरात रडारड सुरू झाली होती. प्रत्येक जण आपापल्या जागी बसून होता. हृदय हेलावून टाकणारी ही घटना असूनही कोणीही गळ्यात पडून रडत नव्हते. शेजारीपाजारी सांत्वनासाठी आले होते तेही अंतरावरून सांत्वनापूरते शब्द उच्चारत होते. दुःख झालेल्या व्यक्तीच्या पाठीवर हात ठेवला तरी न बोलता आपल्या भावना त्यालाच पोहोचतात हा विज्ञानाचा निर्णय येथे फोल ठरत होता.

वसंतराव शहरातून गावाकडे आले त्यावेळी घरातल्यांना कोण आनंद झाला होता. कामाच्या निमित्ताने वसंतराव शहराकडे गेले होते, शहरात एकटेच राहत होते ते. खानावळीतील जेवण जेवूनही त्यांची प्रकृती  खडखडीत होती. खानावळ घरगुती असल्याने खानावळीच्या बाईने बनवलेल्या जेवणात आईचं प्रेम पुरेपुर उतरलं होतं.  त्यामुळे त्यांचा जेवण त्यांच्या अंगाशी लागत होतं.

त्या दिवशी वसंतराव नेहमीच्या वेळेला खाणावळीत आले नाही. खाणावळीच्या बाई बराच वेळ वाट पाहत होत्या. येणाऱ्या प्रत्येक मेंबराला त्या वसंतरावाची चौकशी करत होत्या. शेवटचा मेंबर खाणावळीत आला. जेवण केलं. यावेळी मात्र खाणावळीच्या बाईंचा धीर सुटला. त्यांनी त्या शेवटच्या मेंबराच्या समोर उभ्या राहील्या, हात जोडले. काय चाललंय हे त्या मेंबराला कळाले नाही.

“बाई, काय झालं?”

“साहेब, तुम्ही वसंतरावांना ओळखता का?”

“हो. आहेत की माहीत. ते आपल्या खाणावळीत येतात, तेच ना?”

"हो, तेच."

"ते आज आले नाहीत जेवायला म्हणून काळजी वाटली. तुम्ही जाऊन जरा चौकशी कराल का?"

"हो, जाईन की. सापडले की पाठवतो. येऊ का?"

त्या दिवशी वसंतराव खाणावळीत जेवायला आल्यानंतर खाणावळीच्या बाईंना खूप आनंद झाला होता. बाईंचं प्रेम पाहून वसंतरावही भारावून गेले होते. लोक इतकं प्रेम करतात आपल्यावर. हे तर आपल्या रक्ताचे सुद्धा नाहीत. भारावलेल्या मनस्थितीत त्यांना जेवण गेले नाही. पाणी तरळलेल्या डोळ्यांनी त्यांनी जेवण उरकले आणि ते आपल्या घरी आले. घरच्यांची आठवण त्यांना आली. आठवणीनं डोळ्यांनी दोन थेंब गाळले.

वसंतरावाचे नुकतेच लग्न झाले होते. आणि त्याच वेळी पत्नीचा पायगुण म्हणा किंवा काही, वसंतरावांना नोकरीचा कॉल आला होता. नोकरीच्या ठीकाणी जायचं ठरलं पण एकट्याने. "एकटाच जा. नोकरीवर रुजू हो. जरा स्थिरस्थावर झाल्यावर मग बायकोला घेऊन जा." अशी आई म्हणाली होती, म्हणजे तसा दमच दिला होता. तिचा शब्द मोडणे महाकठीण काम. आईचं म्हणणं मानून वसंतराव एकटेच शहराच्या ठीकाणी नोकरीसाठी आले होते. नवीन बायकोचा नवा सहवास त्यांना आठवला. अंग शहारून आले. आईवडील आणि भावंडांची त्यांना आठवण आली. उद्या मुलांना काय शिकवावं याचा विचार करता करताच त्यांचा डोळा लागला.

त्याचवेळी चिन्यांच्या देशात महामारीची साथ आली होती, पटापट माणसे मरत होती. मरणाऱ्यांची संख्या रोजच्या रोज वाढत होती. बातम्या वाचून जगातील लोक हबकले होते. हाहाकाराच्या बातम्या येऊन धडकत होत्या. त्याचवेळी शेजारच्या देशातही महामारीने दार ठोठावले. एक, दोन, पाच, सात, सत्तर, सव्वाशे असे रुग्णांची संख्या वाढू लागली. आणि देशादेशातील चिंता वाढताना दिसू लागल्या. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर चिंतेचे जाळे दिसू लागले. महामारीचे वारे आमच्या देशातही वाहू लागले. काय करावे, काय करू नये. धावपळ सुरू झाली. खबरदारीचा उपाय म्हणून काय काय करता येईल, महामारीची लक्षणे काय आहेत, काय करावे लागेल याचा विचार होऊ लागला. सगळीकडे हाहाकार माजला. राज्यकर्त्यांच्या तोंडचे पाणी पळाले. खबरदारीचा उपाय म्हणून

जिथे जिथे जमाव जमण्याची ठिकाणे आहेत, ती बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. शाळा, महाविद्यालये बंद करण्यात आली. शिक्षक, विद्यार्थी घरात बसले. नंतर सार्वजनिक वाहतूक व्यवस्था बंद करण्यात आली. लोकांचे दळणवळण बंद झाले. लोक कुरकुर करू लागले. निरनिराळे पर्याय शोधू लागले. आणि देशावरील धोका वाढताना दिसू लागला.

सरकारने उपाय म्हणून देशात आणीबाणी पुकारली. संपूर्ण देशात जमावबंदी आदेश लागू केला. धावता पळता देश थंड झाला. तरीही देशात इतर पर्यायांचा वापर करून लोक उल्लंघन करू लागले. इकडे चाललोय तिकडे चाललोय, अशी कारणे सांगून घराबाहेर पडू लागले. देशावरील संकट देशाकडे आगेकूच करत होते. त्याचवेळी देशात पहिला रोगी सापडला आणि हृदयाचा ठोका चुकला. देश खडबडून जागा झाला. सरकारने लॉकडाऊन जाहीर केले. देशाची जीवनवाहिनी मानली जाणारी रेल्वे एका जागी थांबली. गाव तिथे जाणारी एसटी थांबली. लोकांचे घरातून बाहेर पडणेच बंद झाले. सगळे व्यवहार बंद झाले. कंपन्या बंद पडल्या. मजुरांच्या हातांचा रोजगार गेला. लोक हवालदिल झाले. रोज पाण्यासारखे वाहणारे रस्ते सुनसान झाले. लोकांच्या तोंडचे पाणी पळाले.

वसंतरावांची शाळा बंद पडल्याने दिवसभर काय करावे हा प्रश्न पडला. दिवस जाता जात नव्हता. घरात बसून राहावे तर प्रश्नांच्या सावल्या भीती दाखवत होत्या. घराबाहेर जावे तर महामारी भीतीच्या वाकुल्या दाखवत होती. वसंतरावांना घरची आठवण झाली. नवीन लग्न झालेली बायको आठवली. आई-वडील भावंडांची प्रकर्षाने आठवण झाली. जावे का घरी, असा प्रश्नही डोक्यात डोकावला. पण दुसऱ्याच क्षणी वास्तवाची जाणीव झाली. घरी जावे तर कसे जावे? गाड्या बंद होत्या. जाणे शक्य नव्हते. त्यावेळी मजूर निघाले पायी. अशा शीर्षकाची बातमी त्यांच्या वाचनात आली. त्यांनी डोळे विस्फारुन बातमी डोळ्याखालून घातली. मजूर कुटुंब ४०० किलोमीटर चालत आपल्या गावी निघाले. सोबत विंचवाचे बिऱ्हाडही. वसंतरावांच्या मनात लख्ख प्रकाश पडला. त्यांचे पायी गावी जाण्याचे ठरले.

रात्रभर वसंतरावाच्या डोळ्याला डोळा लागला नाही. सारखे घड्याळाकडे लक्ष. अधूनमधून कुत्र्यांच्या भुंकण्याचा

आवाज येत होता. पण पहाट झाल्याचे अजून जाणवत नव्हते. इतक्यात कुठेतरी कोंबड्याने बांग दिली. लागोलाग मशिदीवरचे भोंगे ओरडले आणि पहाट झाल्याचे शिक्कामोर्तब झाले. प्रवासात घेण्याची पिशवी उचलली. घराला कुलुप लावले व वसंतराव रस्त्याला लागले. रस्त्याने तुरळक गाड्या सुरू झाल्या होत्या. पांढऱ्या पट्ट्याच्या अंदाजाने वसंतरावांनी पावलांचा वेग वाढवला. दोनशे किलोमीटर जायचे होते.

शहर मागे पडले. अंतराअंतरावर गावे येऊ लागली. मात्र गावात जाणारे रस्ते बंद केलेले दिसत होते. उन्हाचे चटके बसत होते. रानात डेरेदार झाड दिसत होते. वसंतरावांनी सावलीसाठी तिकडे पावले वळवली. सावलीला बसताच किती अंतर कापले याचे भान राहिले नाही. शेजारच्या विहिरीचे पाणी पिऊन वसंतरावांनी सावलीत अंग टाकले. थकलेले अंग लागलीच झोपेच्या अधीन झाले. तासाभराने जाग आली तेव्हा उन्हं बरीच उतरली होती. त्यांनी पुन्हा चालायला सुरुवात केली.

आता अंधार पडू लागला होता. गाव अजून कोसभर दूर होता. कसेही करून पुढच्या गावात मुक्कामाला पोहोचणे गरजेचे होते. बोडक्या माळावर मुक्काम कसा करणार अनोळखी ठीकाणी? वसंतरावांनी पावलांना वेग दिला. मध्येच एखादी गाडी शेजारून वेगाने जात होती. समोरून येणाऱ्या गाड्यांच्या लाईटचा प्रकाश डोळ्यावर पडत होता. डोळे दीपत होते. अंधार वाढू लागला होता. नकळत भीतीने हृदयाची धडधड वाढत होती. इतक्यात पाठीमागे पावलांची चाहूल लागली, वसंतराव केव्हढ्याने दचकले. त्यांनी मागे वळून पाहिले तर एक कुत्रे त्यांच्या मागून चालत होते. भितीचे दडपण कमी झाले. वसंतराव निर्धास्तपणे चालू लागले. गाव जसे जवळ आले तसे त्यांच्या जीवात जीव आला. त्यांनी मागे वळून पाहिले तर मागे कुत्रे नव्हते. रस्त्याला लागूनच मंदिर होते. महामारीच्या भितीने गाव चिडीचीप झाला होता. देवळाच्या पारावरच वसंतरावांनी अंग टाकले आणि काही वेळातच निद्रेच्या आधीन झाले.

पाखरांच्या किलबिलीनं वसंतरावांना जाग आली. झटपट आवरून त्यांनी वाट धरली. मुख्य रस्त्याला लागताच त्यांनी पावलांचा वेग वाढवला. वसंतरावांनी मागे वळून पाहिले. आपण शहरापासून किती पुढे आलो हे समजत नव्हते. आणि पुढे किती जायचे याचा

अंदाज येत नव्हता. फक्त चालत राहायचे एवढेच ध्येय समोर होते. बघता बघता उन डोक्यावर आले होते. घशाला कोरड पडली होती. डांबरी सडकेवर उन्हामुळे मृगजळ दिसत होते. त्यामुळे तहान अधिकच तीव्र भासत होती. इतक्यात रस्त्याच्या कडेला एक कौलारू घर दिसले. तहान भागेल या नुसत्या विचारानेच चेहऱ्यावर तजेला आला. पावले कुंपणाजवळ पोहोचली. अंगणात काही बाया उभ्या होत्या. वसंतरावांनी नमस्कार करून पाण्याची मागणी केली. एक मुलगी पटकन घरात गेली आणि पाण्याचा तांब्या घेऊन आली.

"ए, ए, सुमे, थांब. आगं काय कळतंय का नाय तुला? "

"काय झालं?"

"काय झालं? आगं कुठला कोण माणूस. शहराकडनं आलेला दिसतोय, शहरात महामारीनं लोकं मरायला लागलीत आन् चालली पाणी द्यायला. हो मागं."

सुमी मागं झाली. "आये, उन्हातान्हाचा तान्हेला हाय वाटसरू."

"आसल, आन् त्यांच्यामुळे आमाला काय झालं तर! ए बाबा. ते झाडाखाली माठ ठेवलाय ते पाणी घे."

वसंतरावांनी त्या माठातून पाणी घेतलं. थंडगार पाण्यानं जीव शांत झाला. पाणी पिऊन नमस्कारासाठी हात जोडले आणि त्यांनी वाट धरली. उन्हाची काहिली झाली होती. पुढे रस्त्यावर पोलीसांनी नाकाबंदी केली होती. गाड्या अडवण्याचं काम सुरू होते. इतक्यात एक ट्रक वसंतरावांच्या जवळून पुढे गेला. पण पुढे नाकाबंदीत पोलिसांनी ट्रकला आडवले. ट्रकमधून काही लोक खाली उतरले. बहुधा ते कुटुंब होतं. नवराबायको, दोन लहान मुले. पोलीसांनी नवऱ्याच्या मांडीवर काठीचे दोन तडाखे हाणले. बायकोच्या डोळ्यात टचकन पाणी आले.

"ओ भाऊ, मारू नका हो. आमी आमच्या गावाला निघालोय. शहरात कामासाठी आलो होतो. आता काम बंद झालंय. हाताला रोजगार नाय. पोटाला खायला काय नाय. म्हणून निघालोय गावाला." तिने पोलीसांना हात जोडले. एव्हाना वसंतराव जवळ येऊन पोहोचले होते.

पोलीसांनी वसंतरावांना पण हटकले. प्रसंग बघून त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली आणि नाकाबंदी पार करून पुढे चालू लागले. ट्रकमधून उतरलेले कुटुंब त्यांच्यामागून येताना त्यांनी पाहिले.

अडवलेल्या ट्रकचा ड्रायव्हर आणि पोलीस काहीतरी बोलत असताना वसंतरावांनी पाहिले. आलेला आवंढा तसाच गिळून ते पुढे चालू लागले.

पुढे एका गावात पारावर काही माणसांचे टोळके गप्पा मारत बसले होते. काही मंडळी बातम्या वाचण्यात गुंगली होती. थोडा आराम करावा म्हणून वसंतरावाचे पाय पाराकडे वळले. नमस्कार चमत्कार झाल्यावर गार सावलीत त्यांनी बस्तान मारले. पेपरचे पान हातात घेतले. आणि त्यावरून नजर फिरवली. एका बातमीवर त्यांची नजर खिळली. आजाराच्या भीतीने शहरातून आलेल्या मुलाला आईने घरात घेतले नाही. त्यांनी बातमी सविस्तर वाचली. महामारीच्या भितीने मुलाने आईकडे जाण्याचे ठरवले. तो घरी पोहोचला. तेव्हा स्वागत करण्याऐवजी आईने आणि बहिणीने मुलाला घराबाहेर काढले. ‘शहराकडून आला आहेस, आजार आणला असशील, आमाला बी होईल.’ असं म्हणून त्याला घरात येऊ दिले नाही. बाहेरूनच त्याला हाकलून दिले.

वसंतराव जेव्हा रस्त्याला लागले तेव्हा बातमीतले शब्द त्यांच्या डोक्यात पिंगा घालू लागले. मी ही घराकडे निघालो आहे. घरी गेल्यावर मला माझ्या घरचे स्वीकारतील का? आपलं काय होईल? जर आपल्याला घरातच घेतलं नाही तर मग कुठं जायचं? मागे पुन्हा शहराकडे जाणे मुश्कील. मग जीव देण्याशिवाय पर्याय नाही. असे नाना विचार वसंतरावांच्या डोक्यात चमकून गेले. माझ्या घरचे तसे नाहीत. ते समजूतदार आहेत. माझी आई माझ्यावर खूप प्रेम करते. तिचा खूप जीव आहे माझ्यावर. बहिणही खूप प्रेमळ आहे. हे आशेचे विचार मनात घोळवत वसंतरावांनी पायाचा वेग वाढवला.

मजल दरमजल करीत चौथ्या दिवशी वसंतराव आपल्या गावात पोहोचले. पायांना सूज आली होती. सलग वाटचाल आणि वर डोक्यावर तापलेलं उन. यामुळे वसंतरावांना भयंकर थकवा आला होता. वसंतराव घरी पोहोचले तेव्हा आई वडिलांनी, पत्नीने त्यांचं स्वागत केलं. आपला मुलगा शहरातून पायी चालत इतक्या लांब आला. हे पाहून त्यांचे अंतकरण गहिवरले. वसंतरावांच्या हातावर पत्नीने पाण्याचा तांब्या दिला. घटाघटा पाणी पिऊन वसंतराव लवंडले.

दुसऱ्या दिवशी सकाळी वसंतराव नेहमीप्रमाणे उठले नाहीत. थकव्यामुळे झोप लागली असेल असा समज करून

घरच्यांनी त्यांना उठविण्याची तसदी घेतली नाही. नंतर त्यांना उठविण्याचा प्रयत्न केला तर अंग तापाने फणफणले होते. लगेच घरच्यांनी त्यांच्या कपाळावर मिठाच्या पाण्याच्या पट्ट्या ठेवल्या. पण ताप उतरत नव्हता. वसंतरावांना जेव्हा जाग आली तेव्हा त्यांना खोकल्याची उबळ आली. पण खोकला कसला. फक्त खोकला असल्यासारखे वाटत होते. घरच्यांनी वसंतरावांना हळदीचे दूध दिले. हळदीचे दूध पिल्यानंतर वसंतरावांना आराम पडला. जरा तरतरी आल्यानंतर त्यांनी घरच्यांशी गप्पा मारल्या. शहरातील परिस्थिती, मग शहर कसे सोडले, पायी चालत येताना घडलेले प्रसंग सारे सारे त्यांनी घरच्यांना सांगितले.

हा आनंद फार काळ टिकला नाही. संध्याकाळी वसंतरावांना पुन्हा ताप आला. भयंकर ताप आणि खोकलाही. खोकला नेहमीसारखा नव्हता. घशात काहीतरी अडकलय असे वाटणारा. त्यामुळे जीव अगदी अस्वस्थ होत होता. घरचे सगळे जीव मुठीत घेऊन वसंतरावांचा हा त्रास पाहत होते. रात्र कशीबशी जागून काढली. दुसऱ्या दिवशी सकाळी दवाखान्यात जावे असे सर्वानुमते ठरले. वसंतरावांच्या घरातील माणसे जड अंतकरणाने वावरताना दिसत होते. घरात तापाने फणफणलेले वसंतराव, त्यात महामारीचे वातावरण. चिंतेच्या आठ्या प्रत्येकाच्या चेहऱ्यावर पसरल्या होत्या. इतक्यात दारात गाडीचा आवाज आला. घरातील मंडळी दारात आली. बाहेर पोलीसांची गाडी उभी. चिंतेचे भाव जाऊन आश्चर्याचे भाव चमकू लागले.

"चला, कोण है पेशंट?"

"पेशंट?"

"काल कोण आलय शहरातून? चला बाहेर या."

"हां. काल आमचा वसंत आला. शहरातून."

"बोलवा बाहेर त्याला."

इतक्यात पाठीमागून अँम्ब्युलन्स मधून दोन माणसे खाली उतरली. सगळे अंग झाकून घेतलेले कपडे. डोळ्यावर पारदर्शक पातळ काच. हातात रबरी मोजे. कुठल्या परग्रहावरून आलेल्या माणसासारखे दिसत होते. गाडीतील माणसे खाली उतरल्या उतरल्या सरळ घरात घुसू लागली. कुठय पेशंट? असे म्हणून त्यांनी वसंतरावांना बखोटीला धरून बाहेर आणले. आणि काहीही न बोलता गाडीत बसवू लागले. घरची मंडळी

पुढे झाली तर, त्यांना मागे व्हा. पुढे येऊ नका असे सांगण्यात आले. वसंतरावांना गाडीत बसवून गाडी निघून गेली.

“अहो, कुठे नेलं आमच्या वसंताला?”

“त्याला नेलंय तालुक्याच्या गावाला. तिथं त्यांची तपासणी होईल. रिपोर्ट नॉर्मल आला तर आणून सोडू माघारी आणि जर पॉझिटिव आला तर....”

“तर काय?”

“तर देव जाणे. तुम्हाला कळेलच नंतर आणि हो. तुम्ही सगळे सावध रहा.

एकमेकापासून अंतर ठेवा. आपला इकडे तिकडे नेहमी स्पर्श होतो. ही महामारी स्पर्शातून पसरते. तेव्हा साबणाने नेहमी हात धुवा. फार नाही पण किमान मिनीटभर तरी हात स्वच्छ धुवा. बाहेरून घरात आल्यानंतर हमखास हात स्वच्छ करा आणि ते तोंडाला रुमाल बांधा. आपल्या हाताचा स्पर्श सारखा तोंडाला, नाकाला, डोळ्यांना होत असतो आणि ह्या आजाराचा जंतू अशा नाजुक भागातून शरीरात प्रवेश करतो. तर काळजी घ्या.”

असे म्हणून पोलीसांची गाडी निघून गेली. गाडी निघून जाताच घरच्या लोकांनी हंबरडा फोडला. रडारड सुरू झाली. रडून काही उपयोग नव्हता. वसंतरावांना दवाखान्यात नेले आहे. निदान औषधोपचाराने त्यांना बरे वाटेल. बरे होऊन ते घरी येतील, या समजुतीने सर्वजण कामाला लागले. दोन दिवस तणावाखाली गेले. तिसऱ्या दिवशी ती पोलीसांची गाडी पुन्हा दारात उभी राहिली. सर्वजण आतुरतेने बाहेर आले. त्यांना वाटले वसंतराव बरे होऊन आले. पण तसे काहीही झाले नव्हते. गाडीतून पोलीस खाली उतरले.

“तुमच्या मुलाचा रिपोर्ट पॉझिटिव आलाय. महामारीचा आजार झालाय त्याला. आता त्यांच्यावर दवाखान्यातच औषधोपचार केले जातील. बरे झाल्यावर त्यांना घरी आणून सोडू. तुम्ही सर्व काळजी घ्या.” असे सांगून पोलीसांची गाडी निघून गेली.

वाचा गेल्यासारखे सर्वजण स्तब्ध झाले. कोणी कोणाशी बोलेनासे झाले. बोलावे तर काय बोलावे? गंभीर वातावरणात जो तो वावरत होता. आईवडील, बहिण, बायको सारे सारे मानसिक तणावाखाली वावरत होते. आयुष्यातील सगळे सुखदुःखाचे प्रसंग आठवत होते. एकमेकांसाठी तुटणारा जीव डोळ्यात आसवे जमा करत होता.

एकमेकांच्या चेहऱ्याकडे पाहण्याचे धाडस होत नव्हते. उगाचच एकमेकांना सावरण्याचा प्रयत्न करत होते. तिसऱ्या दिवशी दवाखान्यातून घरी फोन आला. प्रत्येकाच्या काळजाचा ठोका चुकला. फोन घ्यावा का घेऊ नये. शेवटी बहिणीने फोन घेतला आणि... तिकडून वसंतरावांचा आवाज ऐकला. तिचा चेहरा उजळला. "बोल दादा, कसा आहेस, कशी आहे तुझी तब्येत, कसं आहे तिकडचं वातावरण?" अशी नाना प्रश्नांची सरबत्ती केली. सर्वांचे चेहरे लकाकले. निरोप ऐकायला प्रत्येकाने कान सुपाएवढे केले. वसंतराव सांगत होते, "मी खडखडीत बरा आहे. उद्या परवा सोडतील मला घरी."

क्षणार्धात घरातील वातावरण बदलले. कामातली लगबग वाढली. आईची कामे उरकण्याची घाई तिच्या हालचालीतून दिसत होती. चेहऱ्यावरून आनंद ओसंडून वाहत होता. वसंता घरी आल्यावर काय काय करायचं याची यादी करायला सुरुवात झाली. त्यात बहिण भर घालत होती. आणि काय राहिलं बघा असं वडील आठवण करून देत होते. संध्याकाळी सर्वांनी आनंदानं जेवणं आटोपली. चेहऱ्यावर सुखाचे भाव घेऊन सर्वजण झोपी गेले. रात्री अचानक फोन आला. आनंदाच्या भरातच फोन उचलला. पलिकडून दवाखान्यातील एक नर्स बोलत होती, "तुमचं पेशंट गेलं. सॉरी." असं म्हणून फोन कट झाला. हातातून फोन गळून पडला आणि वसंतरावांच्या बहिणीनं हंबरडा फोडला. तसे सर्वजण सावध झाले. काय झालं म्हणून जो तो तिला विचारू लागला. दु:खाचा उमाळा कमी झाल्यावर तिनं सांगितलं, दादा गेला. घरात सगळ्यांची रडारड सुरू झाली. शेजारीपाजारी जमा झाले. कुजबुज सुरू झाली. सांत्वन करणारे लोक लांबूनच सांत्वन करू लागले. रात्र पुढे सरकली तशी लोकं आपापल्या घरी निघून गेले.

वसंतरावांचा मृत्यू मनाला चटका लावून गेला. स्वतः फोनवर उद्या डिस्चार्ज मिळेल असे सांगणारी व्यक्ती सहा तासाच्या काळात मृत्यू पावते. हे मनाला पटणारे नव्हते. विचारणार तरी कुणाला? दाद तरी कुणाला मागायची? हवालदिल झालेले वसंतरावांच्या घरातील लोक कसे तरी दु:खातून सावरण्याचा प्रयत्न करत होते. इतक्यात पोलीसांची गाडी दारात उभी राहिली. वसंतरावाचे वडील अंगणात आले. पोलीस खाली उतरले.

"हे बघा. तुमचं पेशंट गेलं. आम्हाला पण वाईट वाटलं. पण आपल्या हातात

काय आहे? सगळं भगवंताच्या हातात आहे. आता थोड्याच वेळात डेडबॉडी येईल. कुणीही तिला स्पर्श करायचा नाही. लांबूनच दर्शन घ्यायचं. आणि सगळ्यात महत्त्वाचं, अंतयात्रेला कुटुंबातले लोक सोडून कुणीही जायचं नाही. चला आता निघा आपापल्या घरी." असे म्हणताच लोक एक एक करून आपापल्या घरी निघून गेले. अँम्ब्युलन्समधून डेडबॉडी आली. त्याच लोकांसोबत कुटुंबिय स्मशानात गेले. अंत्यविधी झाले. दुखित अंतकरणाने सर्व घरी परतले. प्रत्येकाची अंतकरणे जड झाली होती. अन्नावरची वासना उडाली होती. पुढे काय करावे म्हणून विचार सुरू झाला. विचार सुरू असतानाच ग्रामपंचायतीचे लोक दारात उभे राहिले. वसंतरावांच्या वडिलांनी त्यांना घरात घेतले.

"देवाचा खेळ कुणी जाणावा? जे झालं ते वाईटच झालं बघा."

"बरं मग. पुढं काय ठरवलय?"

"आमी काय म्हणतो, तुमचा मुलगा महामारीच्या आजारानं गेला आणि त्यामुळे संशयाचं वातावरण सगळ्या गावात पसरलं आहे. गावातले लोक घाबरले आहेत. म्हणून आमी आसं ठरवलय की, तुमी हे गाव सोडून जावं. वाईट नका वाटून घेऊ. पण आमचा नाईलाज आहे. शेवटी गावातल्या लोकांचं पण ऐकलं पाहिजे ना. तुमाला हात जोडून विनंती हाय गावाची."

"सरपंच, आमी गाव सोडून कुठं जावं?"

"ते आमी कसं सांगावं? हे गाव सोडा म्हंजी झालं. काय रावसाहेब?"

"बरं, तुमी म्हणताय तर.... राम राम. आमी आजच आवरतो."

गावकरी निघून गेले. आईवडील, वसंतरावांची बायको, बहिण यांनी घर आवरायला घेतले. गरजेच्या वस्तू सोबत घेण्यासाठी त्यांची बोचकी बांधली. पहाटेच त्यांनी घर सोडले. तेव्हा पूर्वेकडून नवा सूर्योदय झाला होता. नव्या बळीसाठी नवा दिवस उगवला होता.

# आमचेही अभिव्यक्ती स्वातंत्र्य!

■ स्टॅन्ली गोन्सालवीस, वसई

अभिव्यक्ती ही मनुष्यप्राण्यांची नैसर्गिक गरज आहे. भारतीय राज्यघटनेने आम्हाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य बहाल केल्यापासून इंग्रजांच्या राजवटीत दीडशे वर्षे तोंडाला कुलूप लावून बसलेले आम्ही आता चोवीस तास धो धो व्यक्त होऊ लागलो आहोत. तसे मुळातच आपण भारतीय बोलघेवडे. सतत (दुसऱ्याविषयी) बोलल्याशिवाय आपल्याला चैन पडत नाही. लोकलमध्ये नाही का, नशिबाने चौथी सीट मिळालीय तर काढूया एक डुलकी असं ठरवून डोळे मिटावे, तोच शेजारचा अनोळखी मराठी माणूस कोपराने ठोसलीत हिंदीत म्हणतो, “क्यों भाई, बराबर हय ना, ए गोरमेंट टॅक्स बढाता हय, गाडी नय बढाता...”

लोकसभेत चर्चेला घ्यायचा विषय इथे गाडीच्या गर्दीत कशाला? पण गाडीत सदाचाच ‘शून्य प्रहर’ असल्याने असे फुकाचे प्रश्न ऐकून त्यावर उत्तरेही द्यावीच लागतात... मौनव्रत धारण करणाऱ्या अण्णांबद्दलही आम्ही इतके बोलतो, तर बोलणाऱ्यांविषयी बोलताना आमचे तोंड कोण धरणार? हे एकमेकांच्या कानी लागून चालणारं हितगुज किंवा भिंतीला कान लावून झाल्यानंतरच्या कानगोष्टी झाल्या.

सभासंमेलनात कानीकपाळी ओरडणाऱ्यांची जातकुळीच वेगळी. राजकीय सभेत उच्चारवाने कंठारव करणे म्हणजेच उच्चारस्वातंत्र्य समजत असल्याने घसा ताणून व तावातावाने बोलल्याशिवाय टाळयांचा कडकडाट होत नाही. सार्वजनिक सभा हा अभिव्यक्तीचा गमतीशीर प्रकार असतो. माईक हातात आला(च) तर मग सोडायचा(च) नाही असे ठरवूनच लोक तिथे बोलतात. व्यासपीठावरील मंडळी मोठी धूर्त असतात. ते सहसा खाली बसलेल्या श्रोत्यांना बोलायची संधीच देत नाहीत. आपल्या (अमोघ आणि मोघम) वक्तृत्वाने ते श्रोत्यांची बोलतीच बंद करुन टाकतात. श्रोतेच ते, त्यांचं काम नावाप्रमाणे फक्त

श्रवण करण्याचं. वक्त्यांनी व्यक्त व्हायचं, श्रोत्यांनी (फक्त) टाळ्या वाजवायच्या अथवा (गुपचूप) सभात्याग करायचा, इतकेच स्वातंत्र्य त्यांना असते.

सोसायट्या किंवा गावपातळीवरील सटरफटर अ.भा. संस्थांच्या सभेत व्यासपीठ नावाचा प्रकार नसतो. कुठेतरी कोपऱ्यात प्लॅस्टीकच्या खुर्च्या टाकून वार्षिक सर्वसाधारण(!) सभा होते. तिथे मात्र सर्वजण बोलण्याचे पुरेपूर स्वातंत्र्य घेतात. मेंबरांना तिथे इतके धारिष्टय येते की, प्रत्येकजण उठतो व ओकतो... चुकलो, व्यक्त होतो. अध्यक्ष महाशय बेरकी असतील तर ते वेळीच चहापानाची घोषणा करुन कटकट्या सभासदाच्या वटवटीला ब्रेक लावण्याचा सुज्ञपणा दाखवतात!

मीडिया-माध्यमे ही अभिव्यक्ती स्वातंत्र्याची महत्वाची साधने असे म्हणतात. म्हणूनच वृत्तपत्रांना लोकशाहीचा चौथा खांब की काय म्हटले जाते. हा खांब लोकशाहीला आधार पुरवतो की लोकशाहीच्या आधाराने तग धरुन आहे, हे कळायला मार्ग नाही. अनेकजण त्याला जागल्याही म्हणतात. आजकाल काही जागले हे फक्त आपल्या धन्याचे (म्हणजे धन पुरविणाऱ्यांचे) हितसंबंध राखण्यातच जागरुक असतात. आपल्या राजकीय गॉडफादरला साजेसे व सोयीस्कर तेवढेच छापण्याचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य ते घेतात.

वृत्तपत्रांतून काही(ही) छापून आलेले वाचताच वाचकांच्या पत्रांतून त्यावर (मूळ विषयाला फाटा देत) लेखन करणारे जागरुक वाचक हे खरे तर अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे 'जागले' म्हणायला हवेत. अतिजागरुक संपादक मात्र वाचकांच्या ह्या स्वातंत्र्याला कात्री लावून स्वत:चे स्वातंत्र्य (व अर्थसंबंध) जपण्याचा दुष्टपणा करीत असतात. पारतंत्र्यात असताना चिपळूणकर, आगरकर, टिळक वगैरे मंडळी वृत्तपत्रांना अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे महत्वाचे साधन मानायचे. पण आता स्वातंत्र्यातील (परतंत्र) वृत्तपत्रे त्यांच्या धन्याचे (म्हणजे धन पुरविणाऱ्यांचे) हितसंबंध राखण्यातच जागरुक असल्यामुळे लोकांनी सोशल मीडिया हे नवे माध्यम मुठीमध्ये घेतले आहे. सोशल मीडिया असे ह्या नवमाध्यमाचे भारदस्त नाव आहे. स्मार्टसिटी, स्मार्ट टि.व्ही., स्मार्ट फ्रिजप्रमाणे स्मार्ट मोबाईल हातात आल्यामुळे प्रत्येक (बावळट) माणूस स्वत:ला स्मार्ट समजून व्हॉट्सअप,

फेसबुक, ट्विटर अशी स्वैर स्वतंत्र टिवटिव करु लागला आहे.

माणसाने 'माकडाच्या हाती कोलीत' दिले हे खरे, पण त्याच मर्कटाची सुधारीत आवृत्ती असलेल्या माणसाच्या मुठीत आता मोबाईलचे कोलीत आले आहे. जरा काही फट दिसली, कुठे अपघात झाला, मारामारी झाली, लंगोटी पेपरात काही भडक छापून आलेले दिसले की, मागचा पुढचा विचार न करता टाका मोबाईलवर किंवा करा पन्नास लोकांना फॉरवर्ड... असा हा बिनभांडवलाचा फॉरवर्डींग बिझनेस अनेक निरुद्योगी लोक करत असतात. मात्र ह्यात अव्यक्त ते व्यक्त होतेय ह्याची त्यांना शुध्द नसते. प्रत्येकजण असा बातमीदार झाल्यावर बातमीत 'मी'च अधिक दिसणार... माझे विचार, माझ्या नजरेने, माझ्या सोयीने व माझ्या कलाने मांडायचे हे मला मिळालेले नव-स्वातंत्र्य. त्यामुळे इतरांच्या स्वातंत्र्यावर, अब्रूवर, चारित्र्यावर गदा आलीच तर त्यात माझा काय दोष?

आपली मुलं, नातवंडं, भावंडं, बायको व आपले स्वत:चे वाढदिवस, कुठे गल्लीतील समारंभात 'पुरस्कार' स्वीकारताना नाहीतर पार्टीत पेयपान करताना असे इव्हेंट ई-चव्हाटयावर मांडण्याचे स्वातंत्र्य आणखी कोणते माध्यम देणार आहे? काढला फोटो की टाकला फेसबुकवर. नाहीतर मग दुस-याच्या फोटोवर, कमेंटवर आपली कमेंट करायची... वादे जायते... वैचारिक आगडोंबच हा! त्यासाठी ग्रुप्स वाढवायचे, फ्रेंडस तयार करायचे, मग शेकडयांनी लाईक्स मिळतात, काही लोक ह्याला प्रसिध्दीलोलुपता किंवा आपणच आपली लाल करणे, असे कुत्सितपणे म्हणतात. अशांचे खरे म्हणजे थोबाडच लाल करायला हवे!

अहो, इतक्या मोठया घटना आपल्या आजूबाजूला घडतात, पण पेपरवाले त्या निर्लज्ज राजकारण्यांचे (आपल्याला पाहून) हसणारे फोटो तेवढे छापतात. वृत्तपत्रांत फोटो छापून यावा म्हणून किती गाठी घ्याव्या लागतात, 'भेटी' द्याव्या लागतात! राजकारण्यांना जे जमतं, ते आपल्याला कसं जमणार?

त्यापेक्षा हा 'स्मार्ट' पर्याय बरा. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत दिवसभरातील सर्व विधी 'अनकव्हर' करणारे सेल्फी काढायचे व अपलोड करायचे. असा मी, तसा मी (मी असा

कसा? असं मात्र नाही) असं फक्त मी, माझं व आमचं... आमच्यासारखे आभासी फ्रेन्ड्स हे सर्व डोळे मिटून लाईक करतात, त्यावर गोडगुलाबी कमेंट्स करतात. सगळं कसं छान, छान. आप भी खूश, हम भी खूश! अवघाची आनंदी आनंद!

टीव्ही हे (इतरांची) अभिव्यक्ती न्याहाळण्याचे माध्यम. दर्शकांचे काम तेवढेच असते. फार वर्षांपूर्वी भारतात दूरदर्शन नावाचे एक(मेव) चॅनेल होते. (आता ते आहे की नाही कुणास ठाऊक) तेव्हा टिव्हीला प्रबोधनाचे माध्यम म्हणायचे. अडाणी नेटिवांचे उद्बोधन करण्याचे काम राज्यकर्ते तेव्हा नेटाने रेटून न्यायचे. आता चॅनेलची चलती झाल्यामुळे तो बाळबोध विचार मागे पडला आहे. दर्शक आता प्रौढ, बंधमुक्त झाले आहेत. टिव्हीच्या लांबी-रुंदी-रंगाबरोबरच त्याचा आवाका वाढलेला आहे.  त्यामुळे मुक्त, मनमोकळे विचार (व अंग) प्रदर्शन आले आहे.

मालिकांमधील महिला अजूनही तशाच व्रतवैकल्ये करणाऱ्या पतिव्रता, कुटुंबवत्सल वगैरे टिपीकल भारतीय नारी असल्या तरी नाच-गाण्यांच्या कार्यक्रमांतील मॉड स्त्रिया आपल्या ‘अंग’भूत गुणांची झलक दाखविण्यात अजिबात कसर करीत नाहीत. किंबहुना, आजवर झाकून ठेवलेले आपले गुण त्या अनावृत्त करु लागल्या आहेत. अंगावरील कपडेही काटकसरीने वापरुन त्या आपल्या देशातील गरिबांशी जणू तादात्म्य दर्शवितात. घरात भले त्या स्वतंत्र नसतील, पण टिव्हीच्या पडद्यावर त्या खूपच मोकळया-ढाकळया होतात. अभिव्यक्ती स्वातंत्र्यामुळे झालेले हे भारतीय महिलांचे सबलीकरण नव्हे काय?

ह्याशिवाय चोवीस तास बातम्यांचं दळण दळणारी चक्की म्हणता येईल अशी न्यूज चॅनेलांची दुकानंही आता बरीच उघडली आहेत. तिथे दिल्लीतल्या खूर्चीपासून गल्लीतल्या गटारापर्यंतचे विषय चघळले जातात. त्या चर्चाघोळासाठी तथाकथित नामवंतांना निमंत्रित केले जाते. हे बुध्दिवंत, ज्ञानवंत, धनवंत वगैरे सार्वजनिक पाणवठ्यांवरच्या बायकांसारखे आपसात इतके भांडतात की, ते न्यूज चॅनेल आहे की अम्यूजमेंट चॅनेल, असा प्रश्न पडतो. तो अँकर नावाचा प्राणीसुध्दा आपली टकळी एखाद्या एक्सप्रेससारखी इतकी दौडवतो की त्या खडखडाटात त्याच्या दोन वाक्यांचा

ताळमेळ लागत नाही. आपण सामान्य माणसं बोलताना विचार करुन बोलतो. हे सेलिब्रिटीज बोलल्यानंतर इतरांना विचारात पाडतात! असो. ज्याचे त्याचे उच्चार स्वातंत्र्य!

अशा ह्या स्वातंत्र्याची मक्तेदारी केवळ आपल्याकडेच आहे, असा अनेक सत्ताधाऱ्यांचा गैरसमज असतो. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे रक्षण करण्याची जबाबदारी फक्त आपल्यावरच सोपविली आहे, अशी त्यांची (अल्प) समजूत असते. त्यामुळे त्यांच्याबद्दल काहीही अप्रिय लिहिले-बोलले की त्यांच्या अंगाचा पापड तिळासारखा तडतडू लागतो. इतकेच कशाला, दलित-आदिवासींवरील हल्ले, अल्पसंख्याकांवरील अत्याचार, विद्यार्थी संघटनांचे राजकारण, कुपोषित बालकांचे बळी, महिलांची सुरक्षा, पोलिसांची दंडुकेशाही, राज्यकर्त्यांचा भ्रष्टाचार अशा राष्ट्रीय सुरक्षेच्या विषयांवर टीका-टिप्पणी करताच त्यांच्यातील सत्ताशूळ पेटून उठतो.

सत्ताधाऱ्यांवरील टीका म्हणजे देशावरील टीका असाच अर्थ ते काढतात व कायद्याची कलमे उपसून विरोधकांना जेरबंद करतात. काहीजण तर विरोधकांच्या कानाखाली ठेवून देण्यासही कमी करीत नाहीत. अर्थातच, त्यांची एकूणच बौध्दिक कुवत लक्षात घेता कायद्याच्या अर्थाचा ते असा काही अनर्थ करतात, ह्यात आश्चर्य नाही. पाच वर्षांसाठी निवडून येणे एवढेच ज्यांचे कर्तृत्व आहे त्यांच्याकडून आणखी काय अपेक्षा करणार?

सरकारवर टीका करणाऱ्यांवर ते चक्क राजद्रोहाचा आरोप लावतात. आमचेच लोक (प्रतिनिधी) आम्हाला गजाआड करतात. कोण, कुठले राजे कोणे एकेकाळी होते, ते केराच्या डब्यात गेले. आता हे आले महाराजे! म्हणे, देशाच्या सुरक्षेला व स्थैर्याला धोका उत्पन्न करणारे वक्तव्य केले! आम्ही बोललो, तर देश अस्थिर होतो. ह्यांची वचने म्हणजे जणू वेदवाक्य!

देशाचा प्रश्न आला की आम्हा सर्वांच्या हातापायाच्या बेडक्या जणू जाज्वल्य की काय म्हणतात तशा देशभक्तीने स्फूरण पावू लागतात. तसे दरवर्षी १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारीला आमच्या राष्ट्रनिष्ठेला उधाण येते. त्यावेळी फेसबुक, व्हॉट्सअपवर ज्या संदेशांच्या त्सुनामी लाटा उसळतात, त्यात अख्खा देश गुदमरुन जातो.

भारत-पाकिस्तानमध्ये कलगीतुरा वाजल्यावर तर राष्ट्रभक्तांच्या पिपाण्या-तुताऱ्या अशा कलकलाट करतात, की वाटते पाकडयांची काही खैर नाही. ह्या देशप्रेमाच्या माहोलात कोणा शहाण्याने सबुरीची ट्वीट केली तर, 'खबरदार! एक शब्द देशाविरुध्द बोललात तर चिंधडया उडवू राई एवढ्या...' असे सर्व नेटकरी राष्ट्रभक्त त्यांना एकसुरात बजावतात.

जाज्वल्यपेक्षा जळजळीत असे हे राष्ट्रप्रेम! ते आमच्या नसानसांतून वाहते किंवा नाही, ठाऊक नाही. पण शब्दाशब्दांतून मात्र धुवांधार बरसत असते. आता काही नाठाळ कृतीवीर नुसते फुसके बार टाकीत म्हणतील होय, फक्त शब्दांतूनच... हे बोलघेवडे हाती बंदूक घेऊन लडाख-सियाचेनच्या बर्फात तासभर उभे राहतील तर त्यांची बोलती बंद होऊन 'आ' उघडेल!

बोलनाऱ्यांना कोण बोल लावणार? ते त्यांचे स्वातंत्र्य! खरे देशप्रेमी वेळ आल्यावर धडक कृती करण्यात अजिबात मागे राहात नाहीत. मात्र त्यांच्या महान विचारांची बेधडक अभिव्यक्ती पाहताना आपल्याही छातीत धडकी भरते... ह्या देशाच्या महान संस्कृतीला बट्टा लागेल असे कुठे, काही खुट्ट झाले की त्यांचे रक्त खवळून निघते. हा त्या अमक्या, तमक्या प्राण्याचे मांस खातो काय? गळा घोटून टाका त्याचा! आपल्या लष्कराबद्दल शंका घेतो? काढा मोर्चा त्याच्या घरावर! आपल्या नेत्यांवर टीका करतो? थोबाड त्याचे काळे करा! नाटक-सिनेमात नाचायचं सोडून हे कलावंत देशाविरुध्द बोलतात काय? घाला त्यांच्या नाटक-सिनेमांवर बंदी!

राष्ट्रभक्तीचे कंत्राट घेतलेल्या या स्वंयनियुक्त रखवालदारांना देश, धर्म व नेते ह्यांच्याविरुध्द इतरांनी 'ब्र'सुध्दा काढलेला खपत नाही. हे राष्ट्रवीर शिपाई आघाडीवर जात नसले तरी संधी मिळताच देशाच्या शत्रूंच्या बसगाडया जाळण्यात, घरंदारं, ऑफिसांची तोडफोड व सार्वजनिक मालमत्तेचा विध्वंस करण्यात अग्रभागी असतात. मात्र पोलिस येताच सर्वांच्या आधी पळून जाण्यातही ते रणछोडदास असतात. तसे आम्ही भारत, पाकिस्तान, चीन, अमेरिका अशा आंतरराष्ट्रीय प्रश्नांवर रोखठोक बोलताना कुणाच्या बापाचीही पत्रास ठेवत नाही. अमेरिकेचा प्रेसिडेंट असो, की पाकिस्तानचा पंतप्रधान, तालिबान असो की अल कायदा किंवा

बेकायदा, आम्ही कोणाचीही काडीचीही भीती बाळगत नाही! पण गल्लीतल्या नेतेमंडळींना मात्र (आदरापोटी) वचकून असतो, हे खरं!

हे राजे, भाऊ, दादा, साहेब, अमुकतमुक जी हात जोडून समोर येताच आम्ही त्यांच्यापुढे लोटांगण घालतो व तोंडाला कुलूप लावून उभे राहतो. त्यांच्यापुढे उभे राहिल्यावर आमचे उच्चार स्वातंत्र्य मूग गिळून बसते व अभिव्यक्ती लटपटू लागते! तीच गत धर्मांची. धर्म आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य ह्यांचं नातं बंदुका-तलवारींचं. धर्म आणि कापाकापी? OMG! ईश्वर, अल्ला, गॉड सगळ्यांना सन्मती द्या हो देवांनो! कारण धर्म म्हटला की भल्या स्वातंत्र्यवाद्यांची शेपटीxxx (म्हणजे बिळात) जाते! अशावेळी आम्हाला आठवतात ते दाभोळकर, पानसरे आणि कलबुर्गी! जिवापेक्षा स्वातंत्र्य का मोठे असते?

आपल्या ह्या देशात धार्मिक बाबतीत काही बोलणं (बरळणं तर सोडाच) म्हणजे मानेवर टांगती तलवार. आम्ही धार्मिक असूनही धर्म पाळला नाही तरी चालतो, पण आमच्या धर्मासंबंधी कोणी चकार शब्द बोलता कामा नये. आमच्या धर्म, धर्मग्रंथ, धर्मपुरुष (होय, धर्मपुरुष, कारण धर्मस्त्रिया नसतातच!) ह्यांवर काही वावगं (म्हणजे खरं) बोललात तर, तुमची वाचाच छाटली जाईल. मोर्चे, निदर्शनं व (पोलिस येईपर्यंत) मोडतोड अशा शांततामय मार्गाने आम्ही तुम्हाला केवळ सळो की पळो करुन सोडणार नाही, तर पळवूनच लावू!

आमची लेखक मंडळी तर अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी छातीचा कोट (कोटाच्या खिशाची बटणे उघडी ठेवून) करुन तयार असतात. त्यासाठी (महत्प्रयासाने प्राप्त केलेले) पुरस्कारही परत करण्याची ते (फक्त) घोषणा करतात. लेखक हे शब्दप्रभू असले तरी त्यांच्या छापील शब्दांवर स्वातंत्र्य रक्षकांचा करडा वॉच असतो. आमचा इतिहास, आमची संस्कृती, आमचा धर्म, आमची जात, आमच्या (अंध)श्रध्दा ह्यांची चिकित्सा कोणीही करायची नाही. झाडं-पानं, चंद्र-सूर्य, तो आणि ती ह्यांच्यावर लिहिणे ही तुमची लक्ष्मणरेषा. त्या पलीकडच्या प्रांगणात पाऊल टाकाल तर तुम्हाला आकाशातील तारे बघण्यासाठी थेट ढगातच पाठवू! लोकशाही आहे म्हणून तुम्हाला इतके लेखनस्वातंत्र्य, नाही तर

काही देशांत कोंबडी-बकऱ्यासारखी चक्क मानेवर सुरी फिरवली जाते, आवाज बंद!

मात्र ह्या बाबतीत आमचा ख्रिस्ती धर्म खूपच मवाळ. ह्या धर्माबद्दल कोणालाही, कसेही अभिव्यक्त होण्याचे अनलिमिटेड स्वातंत्र्य! त्यांच्यासाठी प्रार्थना करा, हीच आमची त्यावर प्रतिक्रिया. कोणी आमच्या प्रार्थनास्थळांची मोडतोड केली, मूर्तींची विटंबना केली, आगी लावल्या, माणसं जाळली तरीही आमचं शांती, शांती, शांती! शत्रूलाही क्षमा करायची ही आम्हाला दिलेली शिकवण. त्यामुळे शत्रूच काय, स्वत:लाही क्षमा करण्यात आम्ही तत्पर!

असो. 'अटी आणि शर्ती लागू' तसलं हे आमचं अभिव्यक्ती आणि धर्माचरणाचे स्वातंत्र्य! आमच्या सोयीने व आमच्या अटीनुसार. एक बरंय की, ह्या स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी आमची न्यायदेवता डोळे झाकलेली असूनही जागृत असते. ही आंधळी न्यायदेवता डोळसपणे आम्हास सांगते की, गप्प राहू नका, न भिता बोलत रहा, बोलणे हा तुमचा हक्क आहे, ते स्वातंत्र्य तुम्हाला राज्यघटनेने दिलेले आहे. त्याच्या रक्षणासाठी आम्ही आहोत. पण गल्लीबोळातील रक्षक उंदीर तिला चकवा देत ह्या स्वातंत्र्याला कुरतडण्याचा सतत प्रयत्न करीत असतात. कितीही ठेचले तरी उंदरांची पिलावळ कधी कमी होत नाही. म्हणूनच, स्वातंत्र्य हवे असेल तर सदा जागरुक राहायला हवं, त्यासाठी किंमत मोजायला हवी. आजवर अनेकांनी ती मोजली आहे, आपल्या रक्ताने...

दूरभाष : 8390706013

ई-मेल: stanleyg2013@gmail.com

---

काही सोन्या-चांदीचा चमचा
जन्मत: तोंडात घेऊन येतात
काहींच्या नशिबी आयुष्यभर
हाती कथीलाचे वाळे असतात

काही जखमा इतक्या खोल होतात
की त्या भरल्याच जात नाहीत
खपली सुकते, घाव भरतो
पण वण निघता निघत नाहीत.

# मला कोणीच विचारत नाही...!

■ **आशिष शिंदे**, राष्ट्रीय अध्यक्ष
अल्फा ओमेगा ख्रिश्चन महासंघ

मी
मी मध्ये मी गुरफटून पडला
मी प्रकाश, फाटे, वेली म्हणणाऱ्यासही
मी कोण आहे, याचा प्रश्न पडला

मी गेल्या बारा वर्षापासून अल्फा ओमेगा ख्रिश्चन महासंघाव्दारे समाजात फिरत आहे. तेव्हा मला प्रकर्षाने काही गोष्टी जाणवलेल्या आहेत. त्या मी काही लेख लिहून आपल्या समोर मांडण्याचा प्रयत्न करणार आहे.

मी बारा वर्षापूर्वी ही चारोळी लिहीली होती. वरील ओळीत 'मी' हा चारवेळा येतो. पहिला मी म्हणजे आपण स्वतः व दुसरा मी म्हणजे आपला जिवंत प्रभू येशू ख्रिस्त. सध्या आपल्या समाजात काही जणांना 'मी' पणाचा दर्प एवढा चढला आहे की, ते मी फाटे, वेली, प्रकाश म्हणणाऱ्यासच विसरले आहेत. हा 'मी'पणाचा दर्प जे मोठ्या पदावर व संपन्न आहेत. त्यांच्यात अधिक जाणवतो. (याला काही अपवाद आहेत) आपण सूदृढ वयात नोकरी करीत असताना एवढे काही स्वतःत गुरफटून गेलेले पाहिले की, समाजात मिसळणे, सर्वांशी हसून बोलणे, गुप्त व आनंदाने दानधर्म करणे, एकमेकाची ख्यालीखूशाली विचारणे, गरीबाविषयी मनात प्रेम व मदतीचा भाव जपणे, तरूण असताना स्वतःला समाजकार्यात झोकवून घेणे, समाजासाठी स्वतः वेळ खर्च करणाऱ्यांना सन्मान, प्रोत्साहन व मदत करणे, एकमेकाची काळजी घेणे हे पार विसरून जात आहोत.

चर्च संपल्यानंतर मला लोकांनी भेटायला यावे ही अपेक्षा ठेवणं हाच तर मीपणाचा दर्प आहे आणि प्रभू येशूला हे कदापि मान्य नाही असे बायबल सांगते. असे वागणाऱ्यांना सेवानिवृत्त किंवा

वयस्कर झाल्यावर याची खरी किंमत चूकवावी लागते. पहिली बाब म्हणजे समाज अशा लोकांना गर्विष्ट समजतो व कोणीही नातेवाईकसूध्दा यांच्याशी नाते जोडायला तयार होत नाही. मूलांची वये वाढतात, पैसा असतो, सगळे असते पण कैवारी व मदतीला धावून येणारे माणसे नसतात. कारण आयुष्य मीपणातच गेलेले असते. यांच्या वागण्याचे परिणाम त्यांच्या मूलाच्या आयुष्यावर होत असतात. विशेष म्हणजे उतारवयात हे अधिक धार्मिक बनतात व समाजात म्हातारपणी सेवा करायचा प्रयत्न करतात त्यावेळी तरूणपणी यांच्या मीपणाच्या वागण्याने समाज यांना स्विकारत नाही. नंतर यांना कोणीच विचारत नाही. मग यांना आपला भूतकाळ आठवावा लागतो.

त्यामूळे आपल्या भराच्या काळात आपला मीपणा सोडून कधी कोणाच्या दुःखात धावून जावून तर बघा, कधी गरिबांना गुप्त दान करून तर बघा, कधी समाजातील तरूण मुला-मुलींची विवाह वेळेवर जूळावेत म्हणून प्रयत्न करून तर बघा, कधी मंडळीतील एखाद्या गरीब मुला-मुलींच्या शिक्षण व विवाहाचा खर्च स्वतःच्या खिशातून करून तर बघा, आपले मोठेपण बाजूला ठेवून सर्वांसोबत जमिनीवर बसून तर बघा, कधी आपल्याकडे असलेल्या पदाचा लोक कल्याणासाठी उपयोग करून तर बघा, एका जागी न उभारता स्वतः चालत जावून इतरांच्या हातात हात देवून तर बघा, इतरांना तुम्ही खूप चांगले कार्य करीत आहात असे प्रोत्साहनपर शब्द बोलून तर बघा. मग तूम्हाला किती चांगले वाटते व तूमचा मीपणाचा दर्प निघून जातो व लोक तूम्हाला चांगला व भला माणूस म्हणून मागे नाव घेतात व तूमच्या पैश्यापेक्षा जीवनात तूम्ही कमवलेली माणसेच जीवनभर तूमच्या कामी येतील. तूम्ही लहान बनून राहाल तेव्हाच तूम्ही समाजात प्रभावी बनाल हे विसरू नका.

जीवनात आपण उभ्या केलेल्या भिंती आता तोडण्याची वेळ आली आहे. कारण आपण एकटे जे करू शकत नाहीत ते आपण सर्व मिळून मात्र नक्कीच करू शकतो. यावर विचार करा व जरा बघा आपल्या आसपास काय चालले आहे ते आणि त्या बदलात आपला थोडासा तरी जरूर सहभाग असू द्या.

# सुख-दुःखात मी तुझ्याशी एकनिष्ठ राहीन !

■ सिडनी जस्टीन मोरायस, नायगाव पाली
फोन - 9604385985

अंगावर शहारे आणणारा तो हृदयविदारक प्रसंग. विसरु म्हटलं तरी न विसरता येणारा. माझ्या कुटुंबावर तो वज्राघातच होता. असा प्रसंग, अशी वेळ वैऱ्यावर देखील येऊ नये. जगभरात करोनाच्या महामारीने थैमान घातले. खूपच जपायची स्वतःला, तरीही चोरपावलाने करोनाने माझी प्रिय पत्नी तेरेजा हीच्या शरीरात प्रवेश केलाच. नित्यनियमाने चर्चला जायची. दररोज अमला आश्रमचे फादर बेनी यांच्या प्रार्थनेत रममाण व्हायची. विविध चर्चच्या आध्यात्मिक आराधनेत सहभागी व्हायची. पण निर्दयी क्रूर करोनाला त्याचं काय? तेरेजाचं वय अवघं ६२ वर्षाचं. आपल्या कुटुंबासाठी तिला अजून खूप जगायची उमेद होती. मुलाचं लग्न पाहायचं होतं. नातवंडं खेळवायची होती. मग देवाने तिचीच निवड का बरे करावी?

१० एप्रिलच्या रात्री ११ वाजता तेरेजाने तिला ताप आलाय म्हणून मला सांगितले. सकाळी आपण डॉक्टरकडे जाऊ असे आश्वासन मी तिला दिले. एकाच रूममध्ये असल्यामुळे सकाळी मलाही ताप आला. आमच्या फॅमिली डॉक्टर सोनाली सुद्रिक यांच्या दवाखान्यात गेलो. आरटीपीसीआर रिपोर्ट पॉझिटिव्ह येताच आम्हा दोघांनाही विलगीकरणात जाण्याचा सल्ला देण्यात आला. आम्ही नखशिखांत हादरुन गेलो.

दोन दिवसात दोघांचाही ताप गेला. पण पत्नी मधुमेहाची रुग्ण असल्याने तिची ऑक्सिजन लेव्हल वाढत नव्हती. तर माझी कधी वर कधी खाली होत होती. त्यानंतरच्या आठ दिवसात तेरेजा खूपच अशक्त झाली. तिला रुग्णालयात हलवणे अत्यावश्यक झाले. पण वसईतील सर्वच रुग्णालये त्यावेळी करोनाच्या रुग्णांनी

भरून गेली होती. माझे स्नेही, कार्यकर्ते इच्छा असूनही घरी येऊ शकत नव्हते. मात्र मोबाईलवरून आमची खुशाली विचारून आपुलकीने सल्ला देत होते, धीर देत होते, प्रार्थना करत होते. माझ्या पत्नीला रुग्णालयात जागा उपलब्ध करून देण्यासाठी सर्वच जण, मुलाचे मित्रदेखील सतत प्रयत्नशील होते.

ताप आल्यावर दहा दिवसांनी तेरेजाला अचानक लघवी व शौचाला झाले. हे पाहून माझे तर धाबेच दणाणले. घरात बाईमाणूस कोणीच नव्हते. अशक्तपणामुळे तिला स्वतःचे विधी करणे शक्य होत नव्हते. अखेर मलाच उचलून न्हाणीघरात खुर्चीवर बसवून तिला आंघोळ घालावी लागेल. बेडरूम धुवावी लागे. हे पाहून तिच्या डोळ्यातून अश्रू ओघळत. तिची ही अवस्था पाहून माझ्या अंतःकरणाला वेदना होऊन माझ्याही डोळ्यात अश्रू उभे राहत. अश्रूंनेच आम्ही मूकपणे एकमेकांकडे पाहत-बोलत. तिचा शरीरावरील ताबा सुटला. तिला स्वतःहून काही करणे शक्य नसल्याने वाफेचा वाफारा देणे, तिला जेवण व फळे बळजबरीने भरविणे, कपडे, पांघरूण, सर्वांग स्वच्छ ठेवणे, माझ्या परीने जे जे काही शक्य होते ते ते सर्वच मी केले.

मागील आठ वर्षापासून तिला पार्किन्सन (शरीरकंप) या आजाराने ग्रासले होते. तशात करोनामुळे तिला खूप वेदना होऊन ती रात्रभर किंचाळायची, "माझे तळपाय चोळा, पायाच्या पोटऱ्या दाबा, डोकं घट्ट दाबून धरा." तिच्या किंचाळण्याने मी वरच्या बेडरूममधून विलगीकरण सोडून खाली धाव घेतली. रात्रभर तिच्या जवळ बसून तिच्या दुखऱ्या अंगाला मालिश करून तिला प्रार्थनेने धीर देई.

मध्यरात्रीच्या सुमारास तिचे पाय, डोके चेपत असताना दरवाज्यात उभा राहून माझा मुलगा सेल्डन पहात असे. त्याच्या डोळ्यात अश्रू उभे राहत. तो म्हणे, "डॅडी, तुम्ही तिची सेवा करता आहात हे ठीक आहे, पण तुम्हीदेखील करोना पॉझिटिव्ह आहात. डॉक्टरांनी तुम्हाला विलगीकरणात राहण्याचा सल्ला दिला आहे. तुम्हा दोघांचेही काही बरेवाईट झाले तर..." त्याचे डोळे अश्रूंनी भरून आले आणि त्याला हुंदका आवरला नाही. "डॅडी, तुम्ही वरच्या बेडरूममध्ये जा. मी मम्मीला पाहतो." "पोरा, ते शक्य नाही, तिला अशा

अवस्थेत तडफडत ठेवणे माझ्या सद्सद्विवेक बुद्धीला पटत नाही. मी तिला विवाहाच्या वेळी चर्चवेदीवर ख्रिस्ताच्या साक्षीने वचन दिलंय, ‘सुखदु:खात मी तुझ्याशी एकनिष्ठ राहीन’” असं मी त्याला समजावणीच्या सुरात म्हणालो. मी तिच्या शेजारीच सोफ्यावर झोपू लागलो. कसली झोप! नुसती चिंता!! भीती!!!

सेल्डन आणि मला अशा परिस्थितीत काय करावे तेच सुचत नव्हतं. मधुमेह, पार्किन्सन, करोना आजारावर घेत असलेली औषधे तेरेजाच्या शरीराला तारक ठरत आहेत की मारक? हेच कळत नव्हतं. सल्ला घ्यावा तर घरात कोणीच फिरकत नव्हतं. कोणाला बोलवावे तर सर्वच आपल्या जिवाला घाबरून होते. कोणाला दोषही देता येत नव्हता.

या करोनाच्या संसर्गाने मी देखील तिच्याबरोबर सती गेलो तर बरे होईल अशी माझ्या मनाची अवस्था झाली होती. तिची घालमेल, शरीराची होणारी तडफड दैन्यावस्था पाहवत नव्हती.

तेराव्या दिवशी तेरेजाचा शरीरावरील ताबा सुटल्याने तिच्या अनैसर्गिक क्रिया पाहून माझ्या मुलाने रात्री ९ वाजता रिक्षा आणून आम्ही तिला सरकारी रुग्णालयात नेले. तिथे करोना रुग्णासाठी बेडच नाही असे सांगून आम्हाला दवाखान्याबाहेरच ठेवले. परिस्थिती अवघड होती. मी रोझरी काढून एका कोपऱ्यात प्रार्थना करून येशूला हृदयातून साद घातली. तोच रात्रपाळीस आलेल्या डॉक्टरबाईने माझ्याकडे पाहिले. समाजसेवा करताना कधीतरी आमची भेट झाली होती. तिने मला ओळखले. तिला माझा कळवळा आला (आणि माझी सेवा फळास आली). डॉक्टरांनी माझ्या पत्नीला रुग्णालयाच्या स्टोअररूममध्ये एका टेबलावर झोपवून ऑक्सिजन लावला. त्यामुळे तिची ऑक्सीजन लेव्हल वाढण्यास मदत झाली. पहाटे पुन्हा तिला शौचास झाले. पैसे मोजूनही कोणी सफाई कामगार तिला हात लावायला तयार होईना. अखेर मलाच तेरेजाला वॉशरूममध्ये नेऊन स्वच्छ करावे लागले.

रात्रभर डॉक्टर कुठल्यातरी रुग्णालयात तेरेजासाठी जागा मिळेल याच्या शोधात होत्या. हाथी मोहल्ला येथील सिटीकेअर रुग्णालयात एक रुग्ण दगावल्याने आयसीयूमध्ये एक जागा झाल्याचे त्यांना कळविले. तिथे जाण्यापूर्वी तेरेजाचे सिटी स्कॅन करणे आवश्यक आहे

म्हणून सरकारी रुग्णालयाने आम्हास ॲम्बुलन्स दिली व आम्ही अंबाडी रोड येथील सीडीआरसी सेंटर येथे सिटीस्कॅन करताच तेरेजाच्या अंगाला दरदरून घाम फुटला. ती अतिशय घाबरली आणि तिने डोळे मिटले ते शेवटपर्यंत.

तेरेजाला सिटीकेअर रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे पाच दिवस उपचार करण्यात आले. तेथे सेल्डन सतत आईजवळ राहून तिची सेवा करत राहिला. या पाच दिवसात मी घरी राहून माझी प्रतिकारशक्ती वाढवली आणि ऑक्सिजन लेव्हलदेखील अन्यथा...! मला वाचवण्याची ही देवाची योजना असावी.

भीतीने निराश होऊन तेरेजाने खाणेपिणे सोडून दिले. त्यामुळे डॉक्टरांचाही नाईलाज झाला. पार्किन्सनचा आजार शरीरभर पसरून संपूर्ण शरीर कंप पावू लागले. जड अंत:करणाने सेल्डनला तेरेजाची सिटीस्कॅन फिल्म दाखवून डॉक्टर म्हणाले की, तिच्या यकृतावर कोविडच्या जंतूंनी हल्ला केलाय. तुम्ही प्रार्थना करा, आम्ही प्रयत्न करतो. सर्व देवावर सोपवा.

पुढील अटळ प्रसंगाला तोंड देण्याची मानसिक तयारी केली आणि मुलांनाही येणाऱ्या प्रसंगाला धैर्याने सामोरे जाण्यास तयार राहा म्हणून सांगितले. सहाव्या दिवशी २८ एप्रिल २०२१ रोजी सकाळी ८ वाजता तिने या जगाचा निरोप घेतला. मुलांनी मला फोन करून हंबरडा फोडला. आमच्या दु:खाला पारावार राहिला नाही. विजय व अजय बार बंधू, लिओ मोरायस, लेरॉय नरोना सेल्डनच्या मदतीला धावले. सर्व शासकीय प्रक्रिया पूर्ण करून तिचे पार्थिव पाली चर्च येथे आणले. अतिशय दयनीय अवस्थेत ठराविक कुटुंबियांसह आम्ही तिला निरोप दिला.

माझी प्रिय पत्नी रिकाम्या हाताने आली होती, रिकाम्या हाताने गेली. अखेरची आंघोळ, शालू नेसलेली, दागिने चढवलेली, फुलांनी सजवलेली शवपेटी, शववाहिका, सन्मानपूर्वक घरून चर्चकडे अंत्यविधीसाठी जाणारी ती प्रचंड प्रेतयात्रा, मिस्साविधी हे तेरेजाच्या वाटेला काहीच आले नाही, ही खंत मला आयुष्यभर छळत राहील.

मागे वळून पाहताना आठवतात ती आमच्या विवाहानंतरच्या सहचार्याची ३३ वर्षे. काय कमावलं आणि काय गमावलं याचा जणू लेखाजोखाच डोळ्यापुढून

सरकतो. या ३३ वर्षात जिने आपल्या संसारासाठी खस्ता खाल्ल्या, हाडाची काडं केली, शरीर चंदनासारखं झिजवलं, ती माझी प्रिय पत्नी जेव्हा मला सोडून गेली, तेव्हाच मला कळले की तिच्याविना मी अपूर्ण आहे. विविध संस्थातील माझी सेवा, समाजकार्य अखंड चालू राहिले ते तिच्याच पाठिंब्यावर. यशस्वी पुरुषामागे स्त्रीचा हात असतो याचा प्रत्यय मला आला.

स्वयंपाकघरात मदतीसाठी तिने मला कधी येऊ दिले नाही. अवेळी घरी आलो तरी जेवणाचं ताट न रागावता समोर ठेवायची. मला जेवणाचे ताट कधी धुवूही दिले नाही. तिच्या जाण्यानंतर आज काहीतरी हरवल्याची प्रकर्षाने जाणीव होते. चुकल्यासारखे वाटते. मन सैरभैर होते. काळीमिरी, लवंग, धणे, जिरे ही स्वयंपाकासाठीची नावे फक्त ऐकून होतो पण माझ्याशी त्यांचा प्रत्यक्ष संबंधच येत नव्हता. मूग, मसूर, तूर, विविध डाळीचे डबे कपाटात भरून ठेवलेले आहेत. त्या सर्वांची ओळख पटविण्यासाठी शेजाऱ्यांना विचारून मी डब्यावर नावे लिहून ठेवली. सर्व प्रकारचे मसाले शोधून वापरत आहे. सर्वच अघटित.

आता भाकऱ्या भाजणे, पोळ्या लाटणे, भात शिजविणे, भाज्या, मच्छी वगैरे स्वयंपाकाची कामे इतरांकडून शिकून घेतली. एवढ्या मोठ्या घराची साफसफाई करताना माझी दमछाक होते. वाकून झाडू मारताना तेरेजाने कमरेवर हात ठेवलेला मी कधी पाहिला नाही. पण मला सर्व करताना कमरेला तेल लावावे लागते. ही सर्व कामं खरंतर कष्टाची परंतु रोजच्या रोज आवडीने करणाऱ्या स्त्रीला गृहिणी का म्हणतात हे आता कळतंय. नोकरी-व्यवसाय करणाऱ्या पुरुषाला वाटत असतं की तो आपल्या कुटुंबासाठी जे कष्ट करतो, त्यामुळे त्याचा संसार सुरळीत चालू असतो. दिवस-रात्र घरात राबणाऱ्या गृहिणीच्या कर्तुत्वाकडे दुर्लक्ष होतं. तिचे कौतुक करायचं दूरच. पुरुष आपल्या नोकरीधंद्यातून कधी ना कधी निवृत्त होतो. गुहिणी कधी रिटायर होताना कोणी पाहिलंय? तेरेजा गेली आणि ह्या गोष्टी मला प्रकर्षाने जाणवल्या.

मी करीत असलेल्या समाजसेवेचा तिला मोठा अभिमान होता. माझ्या वकृत्व कौशल्याची ती माहेरी शेखी मिरवत असे. विन्सेंट डी पॉल सेवा संस्थेचा वसई धर्मप्रांताचा मी अध्यक्ष म्हणून निवडून

आलो तेव्हा माझ्या सिडनीने जणू वसई सर केल्यागत हर्षभराने न्हाऊन गेली. अध्यक्षपदाच्या त्या पाच वर्षांच्या कारकिर्दीत तिने मला यासाठी मनापासून साथ दिली. संस्थेच्या कामासाठी वेळी-अवेळी घराबाहेर जाण्याबद्दल तिने कधीच कसलीच कुरबूर केली नाही. आजपर्यंत माझ्या हातून जे काही समाजकार्य घडलं ते तिच्या या उदार मनोवृत्तीमुळे आणि प्रोत्साहनामुळेच हे नि:संशय !

चर्चमध्ये वाचन-प्रबोधन करताना, विवाह समारंभ, दिवंगत व्यक्तीचे श्रद्धांजली कार्यक्रम, संस्थांची संमेलनं, समारंभं, कोणाची षष्ठब्दी, पंच्याहत्तरी, निवृत्ती समारंभ अशा विविध प्रसंगी सूत्रसंचालन करण्यास जाताना मी कोणते कपडे परिधान करावेत याबाबत ती अतिशय दक्ष असे. योग्य प्रसंगास अनुरूप असे माझे कपडे ती स्वतःच काढून ठेवत असे. माझ्या पांढऱ्या केसांना आदल्या दिवशी स्वतःच कलप करत असे.

तेरेजाला दागिन्याची भारी हौस. चर्चला वा लग्न समारंभाला जाताना अंगावर दागिने पाहिजेतच. प्रसंगी पोटाला चिमटा घेऊन दागिन्यात पैसा गुंतवला. तिच्या जाण्यानंतर तिच्या कपड्याचं कपाट उघडून पाहिलं, तेव्हा त्यातील मौल्यवान ज्वेलरी, घड्या न मोडलेल्या साड्या, शालू, निरनिराळे असंख्य ड्रेस, चपला पाहुन माझ्या डोळ्यात अश्रू दाटले. संसाराच्या रहाटगाडग्यात माझं आणि मुलांचं करण्यातच तिचा सगळा वेळ गेला. हौसेने घेतलेले विविध कपडे परिधान करायचे राहूनच गेले.

सर्वांच्याच लग्नात कामाला जुंपणारी, बँड वाचताच मनसोक्त नाचणारी, विविध संस्कृतीचे ड्रेस करून व्याही मंडळीसोबत जाणारी तेरेजा अनेकांची लक्षवेधी झाली होती.

आयुष्यात एकदा तरी जेरुसलेम-रोमच्या पवित्र भूमीचे डोळे भरून दर्शन घ्यावे अशी तिची मनीषा होती. मे महिन्यात मुलीचे लग्न हौसेत पार पडले. मुलीच्या पहिल्या लग्नात माहेरवासियांनी सासुरवाशीण म्हणून बोलावून तिचा भाऊ सालू घोन्सालवीस, जोजघर ह्याच्या पत्नी व तीन मुलांनी दिलेली दोन लाखाची मुदत ठेव मोडून आपण दोघे ऑक्टोबर महिन्यात पवित्र भूमीचा दौरा करू व येशूच्या पदस्पर्शाने पावन होऊ असा विचार तिने माझ्या पुढे मांडला. तोच कानठळ्या बसणारा आवाज कानात

घुमला. मुलीच्या लग्नानंतर अवघ्या आठ दिवसांनी महाबळेश्वरला जाताना त्यांच्या बसला दुर्दैवाने अपघात झाला. त्यात स्वातीचा हात गंभीररित्या फ्रँक्चर झाला. तिच्या उपचारासाठी दोन लाखाची मुदत ठेव तिने दिली. आम्ही कर्जबाजारी झालो आणि जेरुसलेमच्या दर्शनाचे स्वप्न हवेतच विरले ही गोष्ट मला आयुष्यभर टोचत राहणार आहे.

स्वतःचं स्वतंत्र घर असावं अशी तिची खूप इच्छा होती. माझ्या तुटपुंज्या पगारात ते शक्य नव्हतं. तिने होळीच्या बाजारातून भाज्या आणून रस्त्यावर विकल्या. वराह पालन, कुकूटपालन, विनेगर, वाईन बनवून विकणे असे विविध लघुउद्योग करून मला कर्जमुक्त केले. तोपर्यंत सेल्डन नोकरीस लागला व त्याने घराचे स्वप्नही साकार केले. मोठ्या दिमाखात उद्घाटनही केले.

तिचे माहेर उत्तर वसईतील असूनही आमच्या दक्षिण वसईतील संस्कृतीशी ती सहज एकरूप झाली. आमच्या वळकर बोलीत बोलताना पाहून तिच्या माहेरच्या लोकांना संभ्रम होई की ही नक्की आपल्या कादोडी घराण्यातील आहे ना?

३३ वर्षांच्या वैवाहिक जीवनात अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत देखील आपला संसार जिद्दीने करून ‘संसार कसा असावा नेटका’ याचा तिने आदर्श निर्माण केला. रोज चर्चला जाणे, ठरलेल्या बाकावरच बसणे, सर्व लोकांची स्वतःहून ओळख करून घेणे-देणे यामुळे पाली पॅरिशच्या सर्वांचीच ती चाहती होती.

विपरीत परिस्थितीत देखील तिने कधी हार मानली नाही, तिला कोरोनापुढे मात्र हार मानावी लागली. विधिलिखितापुढे कोणाचेच चालत नाही असे म्हणतात. ज्या घराच्या पूर्ततेसाठी तिने काबाडकष्ट केले, चांगली सून घरात यावी म्हणून देवाला साकडे घातले, त्या घरात मुलाच्या मनासारख्या सहचारीने प्रवेशदेखील केलाय. पण हे पाहायला तेरेजा नाही. घरात मी एकटाच वावरतोय. वरखाली कोळीष्टके काढतोय, साफसफाई करतोय आणि क्षणोक्षणी तिच्या आठवणीने उर भरून येतोय.

आज दोन्ही मुलं तिच्या पवित्र स्मृतीला वंदन करून देवाकडे प्रार्थना करतात, “प्रिय मम्मी, ३३ वर्षे तू स्वतःला रिक्त केले आमच्यासाठी. धन्य तू आई, देवराज्यात विराजमान हो!”

# स्पेशल ९०.... (क्राईम कथा)

-- **सुहास बिऱ्हाडे, ज्येष्ठ पत्रकार**

संध्याकाळी नेहमीच्या चहाच्या टपरीवर अफजल आणि जॉन जमले होते. दोघांच्या चेहऱ्यावर उदासी स्पष्ट दिसत होती. जॉनने कटींग चहाची ऑर्डर दिली.. काही वेळ शांततेत गेला. दोघेही शांतपणे चहा पित होते.

"जॉन, आज पण काहीच मिळालं नाही रे" हातातील कटींग चहाचा ग्लास खाली ठेवत अफजल म्हणाला...

"मिळणार पण नाही... लॉकडाऊन काय कमी होण्याची चिन्ह दिसत नाही..." जॉन म्हणाला.

"आपलं कसं होणार...? तुला काय तू तर कुठेही हात मारशील? माझं काय" अफजल म्हणाला.

"माझी अवस्था काय तुझ्यापेक्षा वेगळी आहे का? लॉकडाऊन उठवलं तरी लोकांकडे पैसे नाही. कामं कशी मिळणार...?" हताश झालेला जॉन म्हणाला.

"मला तर या महिन्यात गावी बायको मुलांसाठी पाठवायला पैसे देखील नाहीत", हताशपणे अफजल म्हणाला.

"तू असं म्हणतोय जसं काय माझ्याकडे भरपूर पैसे आहेत. हे बघ या चहावाल्या शंकरचे पण चहाचे पैसे दिले नाहीत..."

"मग कसं होणार आपलं....?"

"तुला मी मागे जो प्लॅन सांगितला होता तो प्लॅन करूया...." जॉन म्हणाला. ते ऐकून अफजल गंभीर झाला.

"नको नको... ते मला अजिबात जमणार नाही"

"मग मर उपाशी आणि तुझ्या बायकोपोरांनाही मार उपाशी"

अफजल काहीच बोलला नाही...

"आपल्याकडे दुसरा पर्याय नाही आता. लोकं या लॉकडाऊनमुळे आत्महत्या करायला लागली आहेत.

कुटुंबच्या कुटुंब उध्वस्त होऊ लागली आहेत." जॉन तावातावाने सांगत होता.

"राहू दे जॉन... काहीतरी मार्ग निघेल... मी जातो आता"

"कसा जाणार आहेस?"

"विदाऊटच तर जातोय. पैसे आहेत कुणाकडे ट्रेनचा पास काढायला. एकही काम मिळालेलं नाही", निराशेने हसतच अफजल म्हणाला.

"ठिक आहे. माझ्या प्रस्तावावर विचार कर;" जॉन त्याचा निरोप घेत म्हणाला.

वांद्रेवरून विरार फास्ट ट्रेन अफजलने पकडली आणि नालासोपारा येथील घरी जायला निघाला. अफजल आणि जॉन हे दोन इलेक्ट्रिशियन होते. करोनामुळे लावलेल्या टाळेबंदीमुळे त्यांना कामं मिळत नव्हती. त्यामुळे आर्थिक परिस्थिती खालावली होती.

ट्रेनमध्ये अफजल सारखा जॉनने दिलेला प्रस्ताव आठवत होता. त्याला ते काम करायचं नव्हतं. पण परिस्थिती आता हाताबाहेर जात होती. इलेक्ट्रिशियनची लहानमोठी कामं करून अफजल आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवत होता. कामाच्या निमित्ताने त्याची मुंबईत राहणाऱ्या जॉनबरोबर ओळख झाली होती. कामं नसल्याने दोघेही समदुखी होते. ट्रेन धावत होती आणि अफजलच्या डोक्यात विचारचक्र सुरू झाले होते. 'मर, उपाशी रहा, कर आत्महत्या' हे जॉनचे शब्द त्याच्या डोक्यात घुमू लागले होते. जॉनच्या प्रस्तावाचा विचार करावा का असं त्याचं एक मन सांगू लागलं होतं. काम सोप्पं होतं. मार्ग चुकीचा होता. चुकीचा नाही तर गुन्हेगारीचा होता. आपण आयुष्यात कधी मारामारी केली नाही. मग एवढा मोठा गुन्हा करावा का?

शेवटी अफजलने जॉनच्या प्रस्तावावर विचार केला आणि तो करण्याचा निर्णय घेतला. त्याने ट्रेनमधूनच जॉन ला फोन लावला...

"जॉन...प्लॅन कधी अमलात आणूया?"

-------------------------------------------------

मलबार हिलमधील वसाहतीत जॉन रहायचा. तो स्लम एरिया होता. तेथील एका नेहमीच्या चहाच्या टपरीजवळ जॉन आणि अफजल भेटले.

“मला आनंद आहे अफजल, तू या कामासाठी तयार झालास एकदाचा” जॉन म्हणाला.

“तरी मला भीती वाटते...”

“आता तयार झालाच आहेस ना मग कसली भीती...?”

“भीती म्हणजे... ज्वेलर्सचं दुकान लुटायचं आहे ना. आयुष्यात कधी मी कुठलाही गुन्हा केलेला नाही आणि थेट ज्वेलर्सला लुटायचा प्लॅन बनवतोय”

“हाहाहाहा... अरे मित्रा कुणाचा खून थोडी ना करायचा आहे. दुकानात शिरून त्याला धमकावयचं. बघ फक्त आपण दुकानात शिरायचं. हे गुजराथी मारवाडी स्वभावाने तिरसट असले तरी एकमद गांडू म्हणजे घाबरट असतात. चाकू बघितला तर पॅंट ओली होईल. दुकानातील माल हिसकवायचा आणि लगेच पळायचं.”

“जॉन, हे खूप कठीण काम आहे. दुसरं काही तरी करू ना. पकडले जाण्याची शक्यता आहे.”

“मी परत परत सांगतो हे सोप्पं काम आहे.”

“काय सोप्पंय? प्रत्येक दुकानात सीसीटीव्ही कॅमेरे आहेत. सर्व दुकाने दाटीवाटीने आहेत. जराशी जरी चूक झाली तर पकडले जाऊ. लोकांच्या तावडीत सापडलो तर मरेपर्यंत मारतील.”

“म्हणून तर फक्त असं दुकान निवडायचं ज्यात एकही कर्मचारी नसेल.” अफजलच्या शंकांचं निरसन करताना जॉन म्हणाला.

“पण असं दुकान असतं का? ज्वेलर्स दुकानात एकतरी नोकर, कर्मचारी असतोच.”

“बरोबर आहे तुझं, अफजल. पण मला एक दुकान माहीत आहे. नालासोपारा पश्चिमेच्या एसटी डेपो रोडवरील परिसरात १४ ज्वेलर्सची दुकानं आहेत. त्यापैकी एक दुकान असं आहे की ज्याच्या दुकानात एकही कर्मचारी नाही....”

“कुठलं ज्वेलर्स?”

“साक्षी ज्वेलर्स...”

“पण यासाठी लागणारा चाकू, बंदूक वगैरे कुठून आणणार...?”

“त्याचा बंदोबस्त मी करतो. नकली बंदूक सहज मिळेल. चाकू मी आणतो”

“प्लॅन कधी अमलात आणायचा?”

“आधी किमान पंधरा दिवस तरी आपल्याला रोज त्या ज्वेलर्सच्या दुकानाबाहेर रेकी करावी लागेल. दुकान किती वाजता उघडतं, ज्वेलर्स मालकाचं दैनंदिन काम कसं असतं ते बघायचं. आसपासच्या ज्वेलर्स आणि इतर दुकानांची हालचाल लक्षात ठेवायची आणि आपला प्लॅन करायचा.”

“ओके... पण फक्त त्याला घाबरवायचं ना. मारायचं नाही ना?”

“नाही नाही. विरोध केला तर एकदोन ठेवून देऊ. पण ती वेळ येणार नाही, बघ रिस्क तर घ्यावी लागेल, अफजल”

अफजल तयार झाला होता. प्लॅन कसा अमलात आणायचा, कसं पळून जायंचं, पोलिसांना कसा चकमा द्यायचा ते जॉनने अफजलला सांगितलं.

-----------------------------

ठरलेल्या योजनेनुसार अफजल आणि जॉन दररोज नालासोपारा पश्चिमेच्या एसटी डेपो रोड वरून ये-जा करू लागले. बारकाईने ते परिसराचा अंदाज घेत होते. साक्षी ज्वेलर्स त्यांचं टार्गेट होतं. बाहेरून ते दुकानाच्या आत बघायचे. ते दुकान छोटं होतं. दुकानाच्या शोकेसमध्ये दागिने ठेवलेले होते. आत एक खोली होती. दररोज सकाळी १० वाजता दुकानाचा मालक दुकान उघडायचा आणि आतल्या खोलीत देवपूजा करायला जायचा. बाहेरून या गोष्टी सहज दिसत होत्या.

सकाळी ११ पर्यंत दुकानात कुणीच येत नसतं. अकरा नंतर तुरळक गिऱ्हाईक आले तर आले. त्यामुळे सकाळी मालकाने दुकान उघडल्या उघडल्याच आपला डाव साधायचा असे त्यांनी ठरवले. जॉनने नकली बंदूक आणि एक धारदार चाकू मिळवला होता.

---------------------

राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर खूप राजकीय समीकरणं बदलली होती. राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि भाजपात गेलेले नारायण राणे सरकारविरोधात विशेषत: शिवसेना आणि उध्दव ठाकरे यांच्या विरोधात आक्रमक झाले होते. त्या राणेंनी राज्यात जनआशिर्वाद यात्रा काढली होती. ती यात्रा वसई विरार शहरातून निघणार होती...

३ ऑगस्टचा दिवस होता. रिपरिप पाऊस सुरू होता. नारायण राणे यांच्या

शहरभर नियोजित दौऱ्यासाठी पोलीस बंदोबस्त तैनात ठेवण्यात आला होता. जागोजागी कार्यकर्ते राणे यांच्या स्वागताला पावसात उभे होते. अनुचित प्रकार घडू नये, कायदा सुव्यवस्था बिघडू नये म्हणून पोलीस दक्ष होते. याच दिवशी आपल्या प्लॅनला अमलात आणण्याचं जॉनने ठरवलं होतं.

---------------------

साक्षी ज्वेलर्स हे मालक किशोर जैन यांचे दुकान होते. ते गेली अनेक वर्ष या व्यवसायात होते. काही वर्षांपूर्वी त्यांचे मुंबईत ज्वेलर्सचे दुकान होते. त्या दुकानात असलेल्या नोकरांनीच एकदा दुकानात चोरी केली होती. तेव्हापासून जैन यांचा नोकरांवरचा विश्वास उडाला. यापुढे दुकानात नोकर किंवा कर्मचारी ठेवायचा नाही, असे त्यांनी ठरवले होते आणि तेव्हापासून त्यांच्या दुकानात कुणी नव्हते. ते नालासोपारामध्ये आले आणि येथे त्यांनी आपले स्वतंत्र दुकान सुरू केले होते. आसपास दाट वस्ती परिसरात सगळीकडे सराफांची दुकाने होती. त्यामुळे त्यांना सुरक्षित वाटत होते.

३ ऑगस्ट रोजी सकाळी दहा वाजता नेहमीप्रमाणे जैन यांनी आपले दुकान उघडले. देवपूजा करण्यासाठी ते आतल्या खोलीत गेले. अफजल आणि जॉन सकाळपासूनच त्या ठिकाणी आले होते. पाऊस जोरात पडत होता. त्यामुळे वर्दळ कमीच होती. साडेदहा वाजता अफजल आणि जॉन दुकानात शिरले. सीसीटीव्हीत दिसू नये म्हणून दोघांनी अंगावर रेनकोट, टोपी, मास्क घालून स्वत:ला पुरेपुर झाकून घेतलं होतं. जॉनने चाकू काढून त्याला धमकावले. अफजलने पटापट शोकेस मधले दागिने बॅगेत टाकले. आतल्या खोलीत तिजोरी होती. जॉनने आणि अफजलने जैन यांना फरफटत आत नेले. आता बाहेरून काही दिसण्याचा धोका नव्हता. जॉनने जैन यांच्याकडे चावी मागितली. मात्र चावी देण्यास नकार दिला. चावी जैन यांच्या खिशात होती. झटापट सुरू झाली. वेळ जात होता. धडधड वाढली. कोणीही येण्याची शक्यता होती. दुकानाचा मालक प्रतिकार न करता चावी देईल असे दोघांना वाटले होते. मात्र झाले भलतेच.

अफजल आणि जॉन घामेघुम झाले. आता काय करायचं? जॉन चावी खेचण्याचा प्रयत्न करत होता. मात्र चिवट जैन यांनी जोरदार प्रतिकार केला. मग

जॉनने आपल्या चाकूने सपासप त्यांच्यावर वार केले. अफजल ते पाहून हडबडला. “अरे काय करतोय. तू का मारतोय? आपलं ठरलं होतं ना की मारायचं नाही.”

“गप्प बस्स. वेळ कमी आहे. एवढ्या मेहनतीने प्लॅन केला आहे.”

चाकूचे वार केल्यामुळे जैन यांची पकड सैल झाली. अफजलने खिशातून चावी काढली. पण तो चाव्यांचा जुडगा होता. नेमकी कुठली चावी ते समजत नव्हतं. घाईघाईने सर्व चाव्या लावून पाहिल्या. पण तिजोरी उघडत नव्हती. जैन रक्ताच्या थारोळ्यात कण्हत पडले होते.

आता दोघेही गांगरले. जवळपास अर्धा तास झाला होता. आता थांबणं धोकादायक होतं. अफजलने तो पर्यंत दुकानाच्या कपाटातील सर्व दागिने बॅगेत टाकले होते. आता थांबण्यात अर्थ नव्हता. शोकेसमधील दागिने तरी मिळाले होते. मग दोघांनी बाहेर जाण्याचा निर्णय घेतला. शांतपणे दोघे बाहेर निघाले. पावसाची रिपरिप सुरूच होती. ते ठरल्या प्लॅनप्रमाणे चालत स्टेशनच्या दिशेने गेले.

साडेदहा वाजता जैन यांनी एका इसमाला पैसे घेण्यासाठी बोलावले होते. तो जैन यांना फोन करत होता. मात्र ते कॉल उचलत नव्हते. मग त्यांनी त्यांच्या इमारतीत राहणाऱ्या एका महिलेला दुकानात पाठवले. ती महिला दुकानात आली आणि आतलं दृष्य पाहून जोरात किंचाळली..

—-------------

साक्षी ज्वेलर्सचे मालक किशोर जैन यांची हत्या झाली होती. ती बातमी पटापट सगळीकडे पसरली. केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्या दौऱ्यानिमित्त सर्व वरिष्ठ पोलीस अधिकारी नालासोपाऱ्यात होते. ते सर्व घटनास्थळी आले. ज्वेलर्सच्या हत्येने खळबळ उडाली होती. शहरातील व्यापाऱ्यांमध्ये संताप पसरला. व्यापाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे बंद पाळला. साक्षी ज्वेलर्सच्या बाहेर व्यापाऱ्यांची गर्दी जमू लागली. पोलिसांविरोधात संताप निर्माण झाला होता. यापूर्वी वसईत ज्वेलर्सचे दुकाने लुटली होती. पण कधी कुणाची हत्या झाली नव्हती. पोलिसांपुढे आता या हल्लेखोरांना पकडण्याचं आव्हान होतं.

—------------------

मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयाच्या गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त डॉ. महेश पाटील यांच्याकडे

तपासाची सूत्रे आली. ही साधी लुटीची घटना नव्हती. तर सराफाची हत्या झाली होती. कुठलीही घटना घडली तर तात्काळ तपास करायचा असतो. ती वेळ खूप महत्वाची असते. त्याला ‘गोल्डन तास’ असे म्हणतात. म्हणजे यावेळेतच दुवे आणि पुरावे शोधायचे असतात. ते वेळ चुकली की मग तपासाचे दुवे मिळत नाही. उपायुक्त पाटील यांनी या कामासाठी गुन्हे शाखेतील सर्व हुशार आणि अनुभवी अधिकाऱ्यांना एकत्र केले. २० अधिकारी आणि ७० पोलीस कर्मचाऱ्यांची टिम बनवली. त्या टिमचे नाव होते ‘स्पेशल ९०’

सीसीटीव्ही मध्ये दोन हल्लेखोर दिसत होते. ते कुठे गेले असतील त्यांना शोधायचे होते. प्रत्येक मिनिट महत्वाचा होता. पोलीस आपल्या मागावर सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या मदतीने लागतील याची जॉनला कल्पना होती. त्यामुळे त्याने पोलिसांना चकमा देण्यासाठी योजना बनवली होती. त्यानुसार दुकानातून बाहेर पडल्यानंतर ते दोघे चालत स्टेशनजवळ गेले. तेथून परत उलट्या दिशेने माघारी फिरले. चालत ते नालासोपारा पश्चिमेकडील उड्डाणपूलावरून पुर्वेला गेले. तेथे वळसा घालून स्टेशनवर आले आणि चर्चगेटच्या दिशेने जाणारी ट्रेन पकडली.

पोलीस प्रत्येक ठिकाणचे सीसीटीव्ही पाहत होते. दोघांचे चेहरे दिसत नव्हते. पण त्यांची हालचाल दिसत होती. ते दोघे ट्रेनमध्ये शिरल्यापर्यंतचे सीसीटीव्ही मिळाले होते. ते सीसीटीव्हीमध्ये दिसेपर्यंत पोलिसांना आशा होती. पण ट्रेनमध्ये शिरल्याने आशेवर पाणी फेरले होते. एवढ्या गर्दीत ते मिसळून गेले होते. आता त्यांना शोधायचं कसं?

पण पोलिसांनी हिम्मत सोडली नव्हती. स्पेशल ९० च्या टिमने मग अजून एक अशक्यप्राय आव्हान स्विकारलं. नालासोपारापासून प्रत्येक स्थानकाचे सीसीटीव्ही तपासायला सुरवात केली. ते काम किचकट होतं. पण सध्यातरी त्याशिवाय पर्याय नव्हता. त्यातून काही साध्य होईल याची खात्री नव्हती. पण प्रयत्न करायचे होते. त्यांनी पकडलेली ट्रेन ज्या ज्या स्थानकात थांबली त्या प्रत्येक स्थानकातील सीसीटीव्ही तपासले जात होते. अखेर पोलिसांच्या प्रयत्नांना यश आले. ते दोघे मुंबई सेंट्रल स्थानकात उतरलेले दिसले. पोलिसांची टिम तेथे रवाना झाली.

मुंबई सेंट्रलवरून त्यांनी बेस्टची बस पकडली. सुदैवाने तेथील सीसीटीव्ही देखील पोलिसांना मिळाले. ती बेस्ट बस मलबार हिलला गेली होती. तिथून पुढे मात्र सारं ठप्पं झालं. तिथे सीसीटीव्ही कॅमेरे नव्हते. मलबार हिलच्या चाळींच्या दाट वस्तीत दोघे शिरले होते. आता पुढे काय?

दोघे हल्लेखोर या वसाहतीत गेले आहेत. तिथूनच त्यांना शोधून काढावं लागेल, असा पोलिसांनी निश्चय केला. खबऱ्यांचे जाळे पेरले. सर्व गुन्हे शाखेचे अधिकारी आपापल्या सोर्सेसद्वारे कामाला लागले. साध्या वेषातील पोलीस त्या अवाढव्य पसरलेल्या वस्तीत शिरले. त्या दोघांचे चेहरे स्पष्ट नव्हते. पण सीसीटीव्हीतून काढलेली छायाचित्रे पोलिसांकडे होती. पोलिसांनी परिसर पिंजून काढायला सुरवात केली. शेवटी एका खानावळीत ते दोघे आल्याचे समजले. तेथून त्यांनी चिकन करी पार्सल नेल्याचे समजले. पोलिसांचे काम सोपे झाले होते.

मलबार हिल येथे जॉनचे घर होते. ४८ तासात पोलीस त्याच्या दारात पोहोचले. नालासोपाऱ्यातून अफजलला देखील अटक करण्यात आली. आपण पकडले जाणार नाही याचा जॉनला भरवसा होता. त्याने पोलिसांना चकमा देण्यासाठी पळून जाण्यासाठी वेगवेगळया रस्त्यांचा वापर करत लोकल ट्रेन गाठली होती. पण पोलीस त्यांच्यापर्यंत पोहोचले.

त्यांना तिजोरीची चावी मिळून देखील ती उघडता आली नव्हती. जे दागिने शोकेसमधून चोरले होते ते नकली होते. पोलीस दारात पोहोचेपर्यंत किशोर जैन यांचा मृत्यू झाला हे दोघांना माहित नव्हतं. आणखी लांब पळून जाणे शक्यच नव्हतं. कारण त्यावेळी अफजलच्या खिशात केवळ ४० रुपये होते....

करोनामुळे निर्माण झालेल्या बेरोजगारीमुळे दोन इलेक्ट्रीशियन्सला गुन्हेगार बनवलं होतं. एवढं करून हाती काहीच लागलं नव्हतं. किशोर जैन यांचा हकनाक बळी गेला. त्यांची एकुलती एक मुलगी पोरकी झाली. पोलिसांच्या "स्पेशल ९०" च्या टिमने सलग केलेल्या ४८ तासांच्या तपासाला यश आलं. त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

# न्याय की निकाल ?

■ अतुल आल्मेडा, निर्मळ, वसई

The first thing we do let us kill all the lawyers. - William Shakespeare

१. न्यायासाठी व अन्यायाचे परिमार्जन करण्यासाठी व्यक्ती, संस्था न्यायालयाचे दरवाजे ठोठावतात. न्यायालयात वर्षानुवर्षे फेरा घालत असतात. काही वेळेला समोरच्यांना धडा शिकवण्यासाठी सुद्धा लोक न्यायालयात जातात. न्यायालयाची प्रक्रिया अन्याय करण्याचे साधन म्हणून वापरतात.

२. मात्र न्यायालयात मिळतो तो न्याय का निकाल, असा संभ्रम जनसामान्याचा व्हावा अशी परिस्थिती आज दिसत आहे. अर्थात रूढार्थाने असे म्हणणे बरोबर आहे की, न्यायालयात निकाल मिळतो. त्याच्यामुळे न्याय होतो की न्यायाचे विडंबन होते हे प्रत्येक प्रकरणावर अवलंबून असते. कनिष्ठ न्यायालयाचा निकाल उच्च न्यायालय रद्द करते तर सर्वोच्च न्यायालय उच्च न्यायालयाचा न्याय बरोबर नाही असा निकाल देते. कधीकधी तर सर्वोच्च न्यायालय आपल्या पूर्वीच्या निकालाचाही फेरविचार करते. मग कुठल्या न्यायालयाने दिलेल्या निकालाने न्याय झाला असे समजावे / ओळखावे. निकाल मात्र प्रत्येक न्यायालयाने दिलेला असतो. Court delivers judgement and not justice याची अनेक कारणे असू शकतात व त्यामुळेच म्हणतात ‘न्यायदेवता आंधळी असते’. न्यायाची प्रक्रिया मानवाने निर्माण केलेल्या कायद्याच्या आधारे होत असते.

एक उदाहरण पाहू. पुण्याचा मंजुश्री सारडा खून खटला. या बाबतीत न्यायालयात निकाल होतो का न्याय होतो याविषयी सर्वसामान्य जनमानसात संभ्रम आहे. पुण्याच्या सत्र न्यायालयाने सर्व पुराव्यांची छाननी करून मंजुश्रीच्या पतीला तिच्या खूनाला जबाबदार धरून शिक्षा केली. उच्च न्यायालयाच्या दोन नामवंत न्यायमूर्तींनी सुद्धा पुराव्यांची अनेक दृष्टिकोनातून छाननी करून सत्र न्यायालयाने दिलेला निकाल कायम केला व मयत मंजुश्रीच्या पतीची शिक्षा कायम

केली. अर्थात सर्वसामान्य नागरिकाला त्यामुळे मंजुश्रीच्या बाबतीत न्यायालयाने न्याय केला अशी भावना झाली. मात्र मंजुश्रीचा पती श्रीमंत व राम जेठमलानीसारख्या वकिलाची फी देण्याची ऐपत असलेला म्हणूनच त्यांनी हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात नेले आणि सर्वोच्च न्यायालयाने मंजुश्रीच्या पतीला तिच्या खुनाच्या आरोपातून संशयाचा फायदा घेऊन सोडून दिले. सर्वसामान्यांना भेडसावतो तो प्रश्न हा की, न्याय कोणाला मिळाला? मंजूश्रीला की तिच्या पतीला आणि न्याय कोणत्या न्यायालयाच्या निकालामुळे झाला? ‘Roses in December’ ह्या आपल्या आत्मचरित्रात ख्यातनाम न्यायमूर्ती एम. सी छगला म्हणतात, “I do feel ironically enough. having passed judgments for almost 20 years of my life, that no man is in fairness, entitled to sit in judgements on others.” ख्रिस्ताने दोन हजार वर्षांपूर्वी हेच सांगितले आहे. (मत्तय : ७:१-२).

३. आधुनिक काळात विज्ञानामुळे मानवाची भौतिक प्रगती व विकास अनेक प्रकारे झाला आहे. मात्र त्या विकासामुळे माणसाने आपल्या माणुसकीच्या संस्कृतीमुळे विकसित केलेले सर्वच व्यवसाय (Occupation) न राहता धंदे (Business) झालेले आहेत. पेशा / व्यवसाय यांची जागा धंद्याने घेतली आहे व त्याचमुळे जे समाजाच्या अनेक क्षेत्रात झाले तेच न्यायालीन क्षेत्रात होत आहे. न्यायालयाचा सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे वकील मंडळी. जे कार्य समाजाचे आरोग्य सुखी ठेवण्यासाठी डॉक्टरांनी करायचे, समाजाला सुसंस्कृत करण्याचे कार्य शिक्षकांनी करायचे, तसेच समाजात न्याय्य वातावरण ठेवण्याचे काम वकिलांनी करायचे. पण, आज डॉक्टरी व्यवसायाचे किंवा शिक्षकी पेशाचे जे झाले आहे तेच वकिली व्यवसायाचे झाले आहे व त्याचा परिणाम म्हणून न्यायालयात न्याय न मिळता ‘निकाल’ मिळण्यात होत आहे. अर्थात यालाही अपवाद आहेत ही आशादायक बाब.

४. न्यायालयीन कामकाज खर्चिक, वेळखाऊ आणि सर्वसामान्यांना निराशाजनक वाटते. Justice delayed is justice denied असे वादीच्या वकिलाने म्हटले तर Justice hurried is justice buried असे म्हणत प्रतिवादी त्याला शह देतो. वकील मंडळी न्याय व्हावा म्हणून व्यवसाय न करता आपल्या अशिलाची जीत व्हावी म्हणून काम करतात. वकील मंडळींना कामासाठी करावे लागणारे कष्ट

आणि फी यांच्यामध्ये काही तर्कसंगती नाही. न्यायालयाची इभ्रत वाढवायची असेल व न्यायालयीन प्रक्रियातून समाजात न्यायव्यवस्था निर्माण करावयाची असेल तर वकिलांनी आपला पेशा ठेवणे निकडीचे आहे. अब्राहम लिंकन म्हणतात,

'Discourage Litigation, Persecute your neighbour to compromise whenever you can. As a peacemaker the lawyer has superior opportunity of being good man there still be business enough.'

५. न्यायालयात अपेक्षित माणुसकीला अभिप्रेत न्याय होत नाही याची जाणीव न्यायालयाला व शासनालाही होऊ लागली आहे व त्याचाच परिणाम म्हणून दिवाणी दाव्यासाठी 'लोक न्यायालय' ही संकल्पना अलीकडे उदयास येत आहे. दोन्ही पक्षांना हार-जीत ही भावना निर्माण न करता समझोत्याचा मध्यम मार्ग स्वीकारून दोन्ही पक्ष द्वेषहीन, शांततेचे, समाधानाचे जीवन जगू शकतात. 'न्यायालयाने न्याय करावा, म्हणून वकिलांनी न्यायालयात साहाय्य करावयाचे आणि न्यायालयानेही वकिलांचे योग्य ते साहाय्य घेऊन न्याय द्यावा ही न्यायदानाची सरळ सोपी संकल्पना आहे. मात्र या सरळ न्यायदानाच्या प्रक्रियेत हार आणि जीत ही कल्पना पक्षकारांनी वकिलांच्या सल्ल्याने राबविण्याचे अंगिकारल्यामुळे न्यायदानाची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. मात्र तरीही आज न्यायव्यवस्था शाबूत आहे (अपवाद वगळता) ही आशेची व संतोषाची बाब आहे.

६. न्यायालयाची प्रक्रिया भ्रष्टाचारी करण्यात न्यायालयापेक्षा पक्षकार आणि वकील मंडळी जास्त प्रमाणात जबाबदार आहेत. आज शासन व्यवस्था अत्याचारामुळे कोलमडून पडत असताना नागरिकांना आशेचा किरण न्यायालयाच्या माध्यमातून दिसत आहे. त्याचकरिता न्यायप्रक्रियेत अतूट सहभाग असलेल्या वकील मंडळींनी समाजातील नागरिक म्हणून जबाबदारी व कर्तव्य याची जाणीव ठेवून वकील म्हणून व्यवसाय (धंदा नव्हे) (Occupation) केल्यास न्यायदानाच्या प्रक्रियेबद्दल जो काही संभ्रम सर्वसामान्य माणसांत निर्माण झाला आहे तो नाहीसा होण्यास मदत होईल. न्यायदानाची प्रक्रिया सुलभ होईल व संबंधितांना न्याय मिळेल. A Lawyer is said to be a soldier of justice and defender of rights. वकील मंडळी या उक्तीवर मनन चिंतन करतील, तर नव्या युगाची सुरुवात होऊ शकते.

# ग्रंथ आमचे साथी, ग्रंथ आमचे हाती

■ जॉन गोन्सालवीस, उमराळे, वसई

*'साहित्य सोनियाचिया खाणी |*
*उघडवी देशियेचिया क्षोणी |*
*विवेकवल्लीची लावणी | हो देई सैंघ ||*

या शब्दांत ज्ञानेश्वर माऊलींनी साहित्याचे वर्णन केलेले आहे. जीवन समृद्ध, संपन्न करण्यासाठी साहित्याचे वाचन हाच एक उपाय आहे. कोणी ग्रंथाला 'गुरु' मानतात, कोणी ग्रंथाला 'ज्ञानकुंभ' मानतात, कोणी ग्रंथाला 'आनंदनिधान' संबोधितात, कोणी ग्रंथाला 'देवदूत' समजतात; तर कोणी ग्रंथाला 'पवित्र ठेवा' म्हणतात. मिल्टन हा महाकवी पुस्तकाला 'Life blood of a master spirit' म्हणतो.

मला मात्र ग्रंथ हे मित्र म्हणजे मितवा म्हणजेच फ्रेंड, फिलॉसॉफर व गाईड वाटतात. नव्हे तेच मी आजपर्यंत अनुभवीत आहे. पुस्तकातल्या दुनियेची वाट निवडली आणि जीवन अधिक सुखमय, आनंदमय, शांतीमय, ज्ञानमय, संतोषमय झाले. पुस्तकाशी मैत्री हीच माझ्या पिंडाला पोषक अशी होती असं आज तरी वाटतंय. जसजशी पुस्तके वाचत गेलो तसतशी त्यांच्याशी जवळीक, आपुलकी, सलगी वाढत गेली. एखाद्या मित्राशी वाढावी तशी...

बाळ सामंत यांनी 'ग्रंथायन' या पुस्तकात लॉर्ड मेकॉले यांनी आपल्या भाचीला लिहिलेल्या पत्राचा उल्लेख करीत लिहिले आहे, "तुला पुस्तके आवडतात हे कळून तर मला तुझ्याबद्दल जास्तच आपुलकी वाटायला लागली आहे. तू माझ्या वयाची जेव्हा होशील तेव्हा तुला कळून चुकेल की, आपली सारी खेळणी, खाऊ, मित्र-मैत्रिणी या साऱ्यांपेक्षा ग्रंथ हेच खरे जवळचे मित्र !"

पुस्तकांची मित्रांशी तुलना केली जाते. असेच मित्रांच्या संगतीत गप्पा मारत असताना पुस्तकांचा विषय निघाला. एकाने सहज प्रश्न विचारला, "आजपर्यंत तू अनेक पुस्तके वाचली असशील, वाचतही आहेस, निदान तुझ्या या मित्रांची नावे नको; पण संख्या सांगशील का?"

मित्राच्या या प्रश्नाने मी अवाक् झालो. खरंच आजपर्यंत आपण किती पुस्तके

वाचली असतील? थोडावेळ मी अंतर्मुख झालो आणि लगेच मला श्री. बा. जोशी यांनी सांगितलेली सूफी अवलियाची कथा आठवली.

हातात तस्वीह (जपमाळ) मोजत अल्लाची नव्याण्णव नावे जपत एक फकीर नदीकाठी भटकत होते. झाडाच्या आडोशाला कोणी प्रणयी युगुल प्रेमकुंजनात दंग होते. प्रियकर-प्रेयसीचे वारंवार चुंबन घेत होता आणि मग तो म्हणाला, “किती झाली गं, शंभर?” तिनं लाजत मुरडत उत्तर दिलं, “इश्श, चुंबने ही कधी मोजायची असतात का? त्यांचा आनंदानुभव घ्यायचा असतो !”

हे ऐकताच फकीरांनी आपली तस्वीह (जपमाळ) नदीत टाकली आणि ज्ञानप्राप्तीच्या त्या अपार आनंदात न्हाऊन ते पुढे गेले. पुस्तकांचा आनंदही असाच... प्रत्येक वाचनीय पुस्तक हे एक वरदान असतं. त्याची मोजदाद हवीच कशाला? त्याची मोजदाद न करता आनंद लुटायचा... अनुभवायचा... आस्वादायचा... पाणी पिताना कोणी पाण्याचे घोट मोजतात का? जेवताना कोणी अन्नाचे घास मोजतात का? गाणं गाताना कोणी स्वरांची गिनती करतो का? जगताना कोणी श्वास-उच्छवास मोजतात का? मग वाचलेली पुस्तके कोणी मोजून ठेवतो का?

त्याचवेळी माझ्यासमोर असंख्य मित्र, सगेसोयरे तरळून गेले. पु. ल. देशपांडे यांचा परोपकारी गंपू, अंतू बर्वे; श्री. म. माटे यांचा बन्सीधर, शेवंता; ताम्हणकर यांचा गोट्या, गो. नी. दांडेकर यांचा माचीवरला बुधा, हेमिंग्वेचा म्हातारा कोळी; जी. ए. कुलकर्णी यांची तानी मावशी; साने गुरुजींचा मातृहृदयी श्याम व त्याची सहृदयी आई; मॅक्झिम गॉर्कीची आई; रवींद्रनाथ टागोर यांचा काबुलीवाला; वि. स. खांडेकर यांचा ययाती; व्यंकटेश माडगूळकरांची माणदेशी माणसं; भालचंद्र नेमाडे यांच्या ‘कोसला’मधील पांडुरंग सांगवीकर; राम गणेश गडकरी यांचा सुधाकर, तळीराम, सिंधू; वि. वा. शिरवाडकर यांच्या ‘नटसम्राट’मधील गणपतराव बेलवलकर अशा अनेक व्यक्तिरेखा नजरेसमोरून सरकून जातात... तरळून जातात. सोयरे सकळजन होऊन जातात. पुस्तकातला गोतावळा खूप काही शिकवून जातो... देऊन जातो... ऋणानुबंधांचे नाते निर्माण होते.

काही मित्र आपल्या आयुष्यात येतात आणि जातात. तर काही मित्र आपल्या जीवनात कायमचे मुक्काम

ठोकून राहून साथी, सोबती, सहचर, जिवलग होऊन जातात. पुस्तकेही तशीच असतात. काही पुस्तके तेवढ्या वेळापुरतीच साथ देतात; तर काही पुस्तके जन्मभराचे नाते आपल्याशी जोडतात. एखादे नवे परंतु उत्कृष्ट पुस्तक माझ्या वाचनात आले, तर नवा मित्र भेटल्याचा आनंद होतो आणि पूर्वी वाचलेले पुस्तक पुन्हा वाचण्यात आले तर जुना मित्र पुन्हा भेटल्याचा आनंद होतो.

पुस्तक हा माणसाचा अबोल मित्र आहे. तो आपल्याशी प्रत्येक शब्दातून, वाक्यातून, पानापानांतून बोलतो. पुस्तक हा कसलीही तक्रार न करणारा मित्र आहे. आपल्या सेवेसाठी सदैव चोवीस तास हजर असतो. पुस्तक हा असा मित्र आहे की तो कधीही फसवत नाही. रागवत नाही. अबोला धरत नाही, वाईट मार्गावर येत नाही. कोणत्याही अपेक्षा करत नाही... म्हणूनच फ्रान्सिस बेकन म्हणतात, मी माणसांपेक्षा ग्रंथांचाच अधिक अभ्यास केला कारण ग्रंथ हेच माणसाचे खरेखुरे मित्र आहेत. ते तुमची कधीही खोटी स्तुती करणार नाहीत किंवा व्यर्थ निंदाही करणार नाहीत. ते तुमच्याशी सदैव प्रामाणिक राहतील आणि तुम्हाला अखंड सोबत करतील.

फ्रेंच लेखक व्हिक्टर हयुगो म्हणतात, “Books are cold, but its true friends” अर्नेस्ट हेमिंग्वे पुस्तकास जिगरी दोस्त मानतात. ते म्हणतात की, ‘There is no friends as loyal as book.’ डॉ. आनंदीबाई जोशी एप्रिल १८८६मध्ये शिक्षणासाठी अमेरिकेला गेल्या होत्या. त्यावेळी प्रवासात त्यांचे फार हाल झाले. आपले पती गोपाळरावांना त्यांनी एका पत्रात लिहिले, “मी एक फारच चांगला मित्र निवडला आहे. हा मित्र कोण म्हणाल, तर एक ग्रंथ – ‘सिटीझन ऑफ दि वर्ल्ड’. हा ग्रंथ वाचत असताना मी परदेशात एकटी आहे असे कधीही वाटले नाही.” आज आपल्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या जंजाळात जुना पारंपारिक मित्र हरवून बसलो आहोत. शेवटी गुलजार यांच्या एका कवितेचा विजय पाडळकर यांनी केलेला हा अनुवाद खूप काही सांगून जातो -

*मित्रांशिवाय सारा दिवस कसाबसा ढकलला*
*स्वतःशीही अनोळखी असा एकाकी, उदास*
*समुद्रकिनाऱ्यावर दिवस विझवून*
*मी परत इथेच आलो*
*निर्मनुष्य रस्त्यावरील रिकाम्या घरात*
*दरवाजा उघडताच*
*टेबलावर ठेवलेलं पुस्तक*
*हलकेच पानं फडफडवीत म्हणाले,*
*‘उशीर केलास मित्रा !’*

# आज मुक्तीचा चंद्र उगवला

■ ऑन्थनी परेरा, नंदाखाल

त्या दिवशी ग्रंथालयातील काम आटोपून मी बाहेर आलो. रस्त्यावर आज काही वेगळीच माणसं दिसत होती. आमचे मित्र, ॲण्ड्र्यू सरही त्यांच्यामध्ये होते. मला पाहताच अभिवादन करून सरांनी मला त्यांच्या जवळ बोलावले,

“सर, आज जरा माणसं बाहेरची दिसतात. आज नक्की कार्यक्रम काय आहे.” माझा प्रश्न.

“सर, कार्यक्रम तसा काही विशेष नाही. आमची नेहमीची मीटिंग आहे, ही माणसं मात्रबाहेरसीसीची आहेत.” ॲण्ड्र्यू सर.

इतक्यात एक तीस-पस्तीस वर्षाचा तरुण, आपली पत्नी व दोन मुलांसह आमच्या दिशेने आला. त्यांच्याकडे पाहून वाटलं की, ते कुठेतरी लग्न कार्यक्रमाला चालली असावीत. सुंदर भारीतली साडी, गळाभर दागिने व केसात वेणी माळलेली त्याची पत्नी तसेच मुलंही नवीन कपड्यात व नीटनेटकी. ते कुटुंब जवळ आले आणि ॲण्ड्र्यू सरांनी मला त्यांची ओळख करून दिली.

तो तरुण, कुलदीप इंजिनियर आहे व मुंबईतल्या एका मोठ्या कंपनीत काम करतो. लठ्ठ पगाराची त्याला नोकरी आहे असे समजले. त्याची पत्नी तर आज खूप आनंदी दिसत होती. मुलं तर पिकनिकच्या मूडमध्ये दिसत होती. हे कुटुंब बाकीच्या इतर माणसांमध्ये सहभागी होऊन गप्पागोष्टी करू लागले. तेवढ्या अवधीत ॲण्ड्र्यू सरांनी मला त्या तरुणाची खरी हकीकत सांगितली.

इंजिनिअर असलेला हा कुलदीप कामावरून रोज उशीरा घरी परत यायचा. येताना फूल नशेत असायचा. मग बायकोला मारहाण, आदळआपट, शिवीगाळ आणि दोन छोटी मुलं भीतीने थरथर कापत कुठेतरी कॉटखाली किंवा कपाटामागे दडून बसलेली. संध्याकाळी

सगळ्यांच्याच जेवणावर पाणी. रात्र भयानक, भीतीदायक आणि वेदनादायक. सतत तीन वर्षे हे सैतानी चाळे त्या घरात सुरू होते. पत्नी आणि मुले यांच्या चेहऱ्यावरचे हास्य पळून गेले होते आणि संसाराची रयाच निघून गेली होती.

कुलदीप व्यसनाच्या जाळ्यात पूर्ण अडकला होता. त्यात गुरफटला होता. या व्यसनाने त्याच्या शरीरावर आणि मनोबलावर फार मोठा परिणाम केला होता. आईवडील आणि जीवलगांचे प्रेमही  त्याच्या मदतीला आता येऊ शकत नव्हते. आपलं चुकतंय हे कळत असूनही तो व्यसनाच्या जाळ्यातून बाहेर पडू शकत नव्हता. त्याच्या संसाराची पूरती ससेहोलपट झाली होती. सततच्या गैरहजेरीमुळे कंपनीने त्याला कामावरून काढून टाकले होते. सर्व बाजूंनी त्याला संकटांनी घेरले होते. अशा या दुष्टचक्रात असताना कोणीतरी त्याला ॲण्ड्र्यू सरांचा पत्ता दिला. तो दर शनिवारी मिटींगला येऊ लागला. व्यसनापासून दूर राहण्याचा तो निग्रह करी, परंतु पुढच्याच दिवशी तो निग्रह गळून पडे. मात्र ॲण्ड्र्यूसर व त्यांच्या ग्रुपचे प्रयत्न सुरू होते. मीटिंग, चर्चा, एकमेकांच्या अनुभवांची देवाण-घेवाण हा कार्यक्रम चालूच असे. त्याचा परिणाम हळूहळू दिसू लागला; आणि आता गेले वर्षभर तो नशेपासून दूर आहे. त्याच्या वर्तनात झालेला बदल पाहून कंपनीने त्याला पुन्हा कामावर घेतले आहे. आता घरात शांती आणि सौख्य आहे. अगदी दोन मिनिटात ॲण्ड्र्यू सरांनी मला ही माहिती पुरवली. आज त्या कुटुंबाकडे बघून मला त्याची खात्री पटली होती.

तेवढ्यात ॲण्ड्र्यू सर बोलले, “सर, अजून थोडे थांबा, अजून एक मोठा माणूस येथे येणार आहे.” ‘कोण?’ असे मी विचारले असता ते म्हणाले, “ज्या कंपनीत कुलदीप कामाला आहे त्या कंपनीचे मालक टेरेन्स डिकुन्हा येथे आम्हाला भेटायला येणार आहेत.” असे आम्ही बोलत आहोत तोच एक आलिशान कार आमच्या बाजूला आली आणि त्या कारमधून एक उंचापुरा, रूबाबदार माणूस व त्याची शालीन पत्नी कारमधून बाहेर आले. एवढ्यात कुलदीपही तिथे धावत आला. त्याने आपल्या साहेबांची व ॲण्ड्र्यूसरांची एकमेकांना ओळख करून दिली. मग सरांनी माझी ओळख त्या साहेबांना

करून दिली. त्यानंतर जे मी ऐकले, पाहिले त्याने मी अचंबितच झालो.

सतत तीन चार वर्षे दारूच्या नशेत कुटुंबाची व स्वतःची धुळदाण करणारा आमचा कर्मचारी गेल्या वर्षभरात कसा सुधारला, कोणी ही जादू केली हे बघण्यासाठी कंपनीचा मालक स्वतः येथे आला होता. ॲण्ड्र्यूसरांना तो सतत धन्यवाद देत होता. त्यांची पत्नी, ॲण्ड्र्यू सर व त्यांचे सहकारी यांचे आभार मानत होती; आणि ॲण्ड्र्यू सर चर्चकडे बोट दाखवून एकच वाक्य बोलत होते, ‘पवित्र आत्म्याची किमया’

सगळ्यांना ॲण्ड्र्यू सरांनी चहा घेण्याचा आग्रह केला, मलाही आग्रह केला. आम्ही हॉटेलमध्ये बसलो. चहा घेता घेता हा चमत्कार कसा झाला, हा माणूस नक्की काय करतो? असेच प्रश्न त्या कंपनीच्या मालकाच्या चेहऱ्यावर मला दिसत होते. फक्त अर्ध्या तासासाठी ते मुंबईहून येथे आले होते. ॲण्ड्र्यू सरांना भेटून, त्यांची मीटिंग कशी चालते हे पाहून लगेच त्यांना निघायचे होते.

ज्या क्लासमध्ये ॲण्ड्र्यू सर सकाळी बीकॉमच्या मुलांचे वर्ग घेतात, त्याच क्लासमधे दर शनिवारी संध्याकाळी समस्याग्रस्त, व्यसनाधीन व्यक्तींचे ते क्लास घेतात. त्यांच्यापुढे रोज एक छोटे उद्दिष्ट ठेवले जाते, ते म्हणजे ‘मी आज दारू पिणार नाही.’ उद्या पुन्हा तेच उद्दिष्ट. छोटे उद्दिष्ट असले की तो पूर्ण करायला सोपे जाते. एव्हरेस्ट काही एका प्रयत्नात किंवा एका दिवसात सर होत नाही. गिर्यारोहकांचे छोटे छोटे प्रयत्न सतत चालू असतात. अनेक वेळा पाय घसरतो, तो पडतो, उठतो आणि पुन्हा पुन्हा प्रयत्न करतो आणि एक दिवस तो त्या सर्वोच्च शिखराला गवसणी घालतो.

ही समस्याग्रस्त माणसे स्वतः कबूल करतात की तो नशेबाज आहे. आज तो नशा करणार नाही. ग्रुपमधील जी माणसे नशीब पासून आता दूर आहेत ती आपला अनुभव कथन करतात. या व्यसनाधीन माणसाला त्याच्या समस्येतून बाहेर पडण्यास मदत करतात. व्यसन हा एक आजार आहे, त्यासाठी त्या व्यक्तीला योग्य प्रकारे हाताळून त्याचे मनोबल वाढविण्याची गरज असते. ही माणसं नेहमी भेटतात, विचारपूस करतात आणि हे करता करता नवीन समस्याग्रस्त माणसाचा शोध घेत राहतात. जसा

कुलदीपचा त्यांनी शोध घेतला, त्याला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी खूप परीश्रम घेतले. आज कुलदीप व त्याचे कुटुंब गृहसौख्य अनुभवत आहेतं. मुक्ती अनुभवत आहेत.

ॲण्ड्र्यू सर व त्यांच्या टिमचे हे कार्य गेली कित्येक वर्षे चालू आहे. त्यांच्या प्रयत्नाने अनेकांचे मोडलेले संस्कार पुन्हा उभे राहिले आहेत. अनेकांना नवजीवनाची मंगल पहाट अनुभवायला मिळाली आहे. ज्यांच्या जीवनात असा बदल झाला ते इतर समस्याग्रस्त माणसांचा शोध घेऊन त्यांच्याही जीवनात आनंदाची फुलबाग फुलावी म्हणून प्रयत्न करीत आहेत. त्या टीममध्ये अशी अनेक माणसं आहेत.

ॲण्ड्र्यू सर ज्यांना तात्या म्हणून संबोधतात ते सिल्वेस्टर मचाडो यांचा जीवनानुभव तर खूप मोठा आहे. अनेक समस्स्यांवर मात करून ते आज सुंदर जीवन जगत आहेत. अनेक नशेबाज माणसांचा शोध घेऊन तात्या त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करीत आहेत. ॲण्ड्र्यू सरांना मोलाची साथ देत आहेत.

ही सर्व चर्चा चालू असताना ती माणसं मीटिंगसाठी क्लासवर निघून गेली. एव्हाना हॉटेलमध्ये कोपऱ्यात बसलेला एक माणूस माझ्याकडे येत म्हणाला होता, त्याच्या ओळखीचा एक नशेबाज माणूस आहे त्याला इथे घेऊन यावे असे वाटते. परंतु तो शिव्या घालेल अशी त्याला भीती वाटते. मी त्या गृहस्थाला म्हणालो, गुलाब पाहिजे असेल तर काट्यांना घाबरून कसे चालेल? चांगले काम करताना महामानवांना त्रास काय कमी झाला असेल? तुम्ही फक्त एक काम करा, त्या माणसाचा पत्ता या ग्रुपकडे द्या. बाकीची ते बघतील.

चांगल्या कामाला कोणीतरी हात घालावा लागतो. हे काम बिल विल्यम आणि डॉ. बॉब या अमेरिकन माणसांनी १९३५ साली सुरू केले. त्यांचा एक दूत हॅरी मथाईस हे मिशन कार्य घेऊन १९५६ साली मुंबईला आले. नशेच्या आहारी गेलेल्या नशेबाज लोकांना त्यांच्या नशेपासून दूर करण्याचे कार्य आम्ही करू म्हणून शासनाकडे परवानगी मागितली. परंतु त्यांना परवानगी नाकारण्यात आली. हे गृहस्थ नंतर त्यावेळचे मुंबईचे कार्डिनल ग्रेशस यांना भेटले. कार्डिनल म्हणाले,

तुमच्या प्रयत्नाने व्यसनाधीन माणसे मुख्य प्रवाहात येणार असतील तर मी तुमचे स्वागत करतो व तुमच्या कार्याला परवानगी देतो. मग सगळीकडे AAचे कार्य सुरू झाले.

१९८६ साली माणिकपूरला AAचे वर्ग सुरू झाले. १९९४ मध्ये फा. मायकल जी यांनी नंदाखाल येथे या कार्याला परवानगी दिली. तेव्हापासून हे कार्य सुरू आहे. शेकडो समस्याग्रस्त माणसे मुख्य प्रवाहात आली आहेत. त्यांच्या घरात आता शांती नांदत आहे. मी घरी आलो; परंतु कुलदीप, त्याची पत्नी व त्या गोजिरवाण्या मुलांचे हसरे चेहरे माझ्या नजरेसमोरून हटत नव्हते. या टीमच्या प्रयत्नांमुळे कुलदीपचा संसार पुन्हा बहरला आहे. ते शांती आणि मुक्ती अनुभवित आहेत. नाताळचा तोच तर संदेश आहे. गोरगरीब, कष्टकरी, व्यसनाधीन माणसांचे जीवन प्रकाशाने उजळो व त्यांना शांतीचा अनुभव मिळो यासाठीच तर आपण प्रार्थना करतो. परंतु ही टिम त्यासाठी प्रयत्न करते. अशांना विशेष बळ मिळावे म्हणून आपली प्रार्थना असावी.

# चारोळया

प्रेयसीने सांगितलेला चंद्र तोडून
आणण्यासाठी जरी प्रियकर हवा
तरी चंद्रावरील पाण्याचा अंश
शोधण्यासाठी वैज्ञानिकच हवा.

घड्याळाच्या सरकत्या काट्यासह
आयुष्यही न थांबता सरकत असतं
विसाव्यासाठी घुटमळत राहिलो तर
जगणं जगायचं राहून गेलेलं असतं

हातून घडलेल्या एका अपराधानंही
जेव्हा आपलं मन खात असतं
काही अंश चांगुलपणाचा तेव्हा
शिल्लक असल्याचं ते चिन्ह असतं

कोवळ्या पाखरांना हुड.. करून
दूर पळवता येणं सोपं असतं
निशस्त्रावर शस्त्र चालवणं हे
नामर्द पळपुट्याचंच काम असतं

# वसईतील सामाजिक राहणीमान

■ वैष्णवी विवेकानंद राऊत, नायगाव, दरपाळे

वसई... मुंबईपासून जवळच असलेला तालुका! समुद्र आणि निसर्गसौंदर्याने बहरलेला. मुंबईला प्राणवायू देणारा भाग. खरं तर मुंबईचं हृदय म्हणावं असा हा भाग. ख्रिश्चन, पानमाळी, आगरी, कोळी, आदिवासी व भंडारी हा येथील मूळचा समाज असून येथील प्रमुख व्यवसाय शेती आहे. हाच तालुका वाढत्या मुंबईला आजपर्यंत भाजीपाला, मासळी, ताडी व केळी पुरवत आला आहे. अशा या निसर्गसंपन्न आणि विविध समाजातील नागरिकांनी नटलेल्या वसईच्या संस्कृतीचा आढावा घेणार आहोत.

**पानमाळी समाज ( वाडवळ ) :**

सोमवंशी क्षत्रिय समाजाचे अस्तित्व भारतातील विविध राज्यांमध्ये आढळून येते. वसईमध्ये शेकडो वर्षे वास्तव्य केलेल्या या समाजाने अनेक गोष्टी बदलल्या, स्वीकारल्या, सादर केल्या. सोमवंशी क्षत्रिय समाज हा वसई भागात पानमाळी (वाडवळ) समाजाच्या नावाने प्रसिद्ध आहे. वसईच्या मुख्यतः सावेवाडी, किरवली, मुळगाव; तसेच, होळी-वासळई-देव्हाळे, उमेळे, विरार यासह इतर भागात या समाजाचे वास्तव्य आहे. येथील राऊत, सावे, वर्तक, म्हात्रे, पाटील, चौधरी अशी प्रामुख्याने आडनावे असलेले म्हणजे पानमाळी! वेलची केळी, भातशेती, फुले आणि पांढऱ्या कांद्यांची शेती देखील समाजातील काही शेतकऱ्यांतर्फे करण्यात येते. वसईतील या समाजातील नागरिकांनी सर्वच क्षेत्रात आपले नाव उंचावले आहे. विशेष म्हणजे खेळ असो वा सांस्कृतिक कार्यक्रम, यामध्ये देखील या समाजाचे योगदान आहे.

समाजातील तरुणांसह महिलांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी विशेष महिलांसाठी क्रिकेट्स्पर्धा दरवर्षी आवर्जून तर दुसरीकडे सांस्कृतिक कार्यक्रम देखील एकत्र येऊन आयोजित करतात. जिल्ह्यात विविध भागात पसरलेला समाज या निमित्ताने एकत्र येऊन मैत्रीचे आणि कौटुंबिक संबंध वाढवावे हे एक मात्र त्याचे उद्दिष्ट. या समाजाच्या विवाह सोहळ्यातील साखरपुडा, हळद आणि लग्न या तीन महत्त्वपूर्ण घटकांच्या अवतीभोवती इतर सर्व वैवाहिक विधी संप्पन्न होत असतात. तसेच आजही कुलदैवतांचे सण प्रामुख्याने साजरे केले जातात. काही सणांना बळी देण्यात येतो, परंतु ही प्रथा सध्या मागे पडलेली आहे. विशेष म्हणजे या समाजाने आजही आपली बोलीभाषा वसईत टिकवून ठेवली आहे. या समाजातील काहींचे साहित्यातही योगदान असल्याचे दिसून येते.

**भंडारी समाज :**

वसईतील आणखीन एक महत्त्वाचा घटक म्हणजे भंडारी समाज. ह्या समाजाचे मुख्यतः गिरीज, खोचिवडे, दरपाळे, निर्मळ, पापडी, वसई गाव, वासळई, नाळे गाव अशा विविध ठिकाणी वास्तव्य असल्याचे आढळून येते. म्हात्रे, राऊत, कडू, पाटील, चौधरी अशी त्यांची आडनावाने ओळखली जातात. ताडीमाडीचा धंदा आणि शेती हा त्यांचा मुख्य व्यवसाय. भातशेती आणि फुलांची शेती देखील या समाजातर्फे करण्यात येते. आजही हा व्यवसाय त्यांनी टिकवून ठेवला असला तरी सध्याची पिढी या व्यवसायासह इतर व्यवसाय करताना देखील दिसून येते.

आज विविध क्षेत्रात या समाजातील तरुण पिढीने भरारी घेत समाजाचे नाव उंचावले आहे. त्यांच्या या कर्तृत्वाचे समाजातर्फे कौतुक करून त्यांना प्रोत्साहन देण्यात येते. तसेच या समाजाचे वास्तव्य आलेल्या प्रत्येक गावात त्या गावाची कुलदैवत असते. आणि वर्षातून एकदा मुख्यतः एप्रिल मे महिन्यात येणारा उभा दैवतांचा पालखी सोहळा आवर्जून मोठ्या थाटामाटात साजरा करतात. मागील अनेक वर्षांपासूनची पालखी सोहळ्याची परंपरा आताच्या तरुण पिढीने पुढे सुरु ठेवली

आहे. या व्यतिरिक्त या समाजाच्या लग्न सोहळ्यातील गाणी अतिशय लोकप्रिय आहेत. घरातील ज्येष्ठ नागरिकांच्या तोंडून ही गाणी आजही लग्नसमारंभात गायली जातात.

**आगरी समाज :**

वसईच्या विविध भागात मोठ्या प्रमाणात आगरी समाज आहे. वसईच्या आगरी समाजाला कोण ओळखत नाही? शेतीचे, मिठाचे आणि बागायतीचे आगर पिकवून आपली उपजिविका करणारा समाज अशी आगरी समाजाची ओळख आहे. वसईच्या अर्नाळा, बोळींज, उमेळमान, पाणजू, पाचूबंदर, कळंब, जूचंद्र यांसह इतर भागात आगरी समाजाचे वास्तव्य आहे. या समाजाने आजही समाजात प्रचलित असलेल्या रुढी व परंपरा, व्यवसाय यांचे अस्तित्व कायम ठेवले आहे. मासेमारी व्यवसायासह, रेती व्यवसाय त्यांचा पारंपरिक व्यवसाय असून आजही गावागावातून पालखी सोहळे, सण व उत्सव साजरे केले जातात. प्रत्येक लग्नसमारंभात त्याची श्रीमंती अधिकाधिक अधोरेखित होते.

**कोळी समाज :**

आगरी आणि कोळी समाजाच्या चालीरीती, व्यवसाय आणि लग्न पद्धतीत बरेचसे साम्य आहे. वसईला लाभलेल्या किनारपट्टीच्या भागात कोळीवाडे दिसून येतात. यामध्ये कोळी समाजाचे वास्तव्य असून कळंब, राजोडी, पाचूबंदर, नायगाव, अर्नाळा या ठिकाणी मुख्यतः कोळी वाडे आहेत. मनमिळावू आणि दिलखुलास जगणारे अशी या समाजातील नागरिकांची ओळख. मासेमारी करणे आणि मासळी विक्री करणे हे मुख्य व्यवसाय त्यांचे आहेत. वसईत आजही पारंपरिक मासेमारी करणारे मच्छिमार असून समुद्र जैवविविधतेला धोका पोहचू नये यासाठी हे मच्छिमार विशेष प्रयत्न करीत असतात.

वसईतील सर्व मासळी बाजारात मासळी विकताना कोळी महिला निदर्शनास येतात. सुकी मासळी बनविण्यासाठी राबविलेली प्रक्रिया

वसईत वेगळी असून ही सुकविलेले मासळी इतर जिल्ह्यातील नागरिकांना आकर्षित करते. त्यामुळे सुकी मासळी असो किंवा न सुकविलेली मोठी मासळी असो या दोन्ही वसईतील मासळीला मुबईच्या बाजारात आणि बाहेरील देशात मोठी मागणी असते. परकीय चलन मिळावे असा या वसईतील कोळी समाजाचा मुख्य उद्देश आहे. वसईतील कोळी समाज अतिशय मेहनती असून बाजारात मासळी विक्रीसाठी नेण्याव्यतिरिक्त घरोघरी देखील मासळीची विकण्याची कामे ते करतात.

**आदिवासी समाज :**

पालघर जिल्हा हा आदिवासी जिल्हा म्हणून घोषित करण्यात आला आहे. त्यामुळे या आदिवासी जिल्ह्यात आदिवासी नागरिकांचे वास्तव्य डहाणू, वाडा, मोखाडा या सारख्या भागात जास्त आहे. मात्र वसईतही आदिवासी समाजाची वस्ती आहे. त्यांची गावे वसई पूर्वेला डोंगराळ भागात कामण, पेल्हार, ससुनवघर येथे जास्त असली तरी वसईच्या पश्चिम भागात त्यांचे पाडे आपल्याला दिसून येतात. तर काही आदिवासी बांधव पिढ्यांपासून, वाडवळ लोकांच्या वाडीवर काम करण्यासाठी स्थायिक झाले आहेत.

प्रत्येकाला त्याच्या मालकाच्या वाडीवर घर बनवून, त्यात संसार थाटण्याची मुभा असल्यामुळे, ते वसईचे अविभाज्य घटक बनले आहेत. वाडीतील सर्व जबाबदारी त्या गड्यांवर असे. रहाटाला बैल जोडणे, पाणी शिंपणे, शेतात ‘राब’ करणे, मळणी-कापणी सर्वच काही. एकीकडे असे चित्र असताना दुसरीकडे वसईतील आदिवासी समाज देखील उन्नत्ती करत आहे. बऱ्याचशा आदीवासी तरुणांनी उच्च शिक्षण घेऊन डॉक्टर, वकील, इंजिनियर अशा पदव्या आपल्या नावावर केल्या आहेत.

# संस्कृती संपन्न वसईची लोकगीते

■ मेलविन डाबरे, गिरिज, वसई.

संस्कृती म्हणजेच मानवी समाजाचा आंतरिक विकास. परमेश्वराने सर्वांग सुंदर असे विश्व निर्माण केले आणि ह्या विश्वात मानवाला सर्वोच्च स्थान दिले. मानवाने आपल्या बुद्धीच्या जोरावर आपला ठसा आजूबाजूच्या निसर्गावर व परिसरावर उमटविला. अनेक शोध लावले. अनेक तत्त्वे त्यांनी शोधली, आपले जीवन अधिक आकर्षक आणि सुंदर करण्याचे अनेक मार्ग अवलंबिले, त्यातून शास्त्रांचा विकास झाला. अनेक कला उदयास आल्या व या कलेतून मानवाने जीवनाचा अनुभव घेतला. वेगवेगळ्या श्रद्धा त्याने जोपासल्या, जगण्याच्या अनेक पद्धती निर्माण केल्या त्यातून त्याची जीवनदृष्टी रुंदावली, त्यातून उत्तम आदर्श निर्माण झाले आणि वेगवेगळी मुले विकसित झाली, हीच खरी संस्कृती होय.

**संस्कृती संपन्न वसई**

जगात जे जे काही सत्यम शिवम सुंदरम दिसेल ते ते घेऊन वाढणारी संस्कृती म्हणजे भारतीय संस्कृती व भारतामध्ये असलेल्या अनेक संस्कृतीपैकी वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती म्हणजे वसईची संस्कृती होय.

वसईचा इतिहास सर्वज्ञात आहेच. पूर्वेला पर्वतरांगा, पश्चिमेला अरबी समुद्र व किल्ले, दक्षिणेला केळीच्या व नारळी-पोफळीच्या बागा आणि उत्तरेला वैतरणा नदी अशा या निसर्गाच्या, समुद्राच्या आणि डोंगरकपारीच्या सानिध्यात वसलेली वसई व या वसईत राहणारे आपण सर्व 'वसईकर'.

वसईलाच 'बसीन', बादपूरा असेही म्हटले जाते. पूर्वी सोपारा व गास ही वसईतील प्रमुख व्यापारी केंद्रे आणि अर्नाळा व सोपारा ही वसईतील प्रमुख

नावाजलेली बंदरे त्यामुळे सहाजिकच वसईचा संपूर्ण जगाशी व तेथील संस्कृतीशी संबंध होता. वसईतून सोने, चांदी, जडजवाहीर, लाकूड मोठ्या प्रमाणात आयात होत असे. वसईला मौर्य, सातवाहन, शककर्णी, चालुक्य, राष्ट्रकुट, देवगिरी, यादव, पेशवे, पार्शियन, अरब, इराणी मुसलमान, पोर्तुगीज, इंग्रज अशा वेगवेगळ्या राष्ट्रांचा, घराण्यांचा व त्यांच्या संस्कृतीचा स्पर्श झालेला आहे. तसेच संत महंतांच्या पदस्पर्शाने वसई पावन झालेली आहे. आज वसईत आदिवासी, कोळी, कुपारी, आगरी, भंडारी, वाडवळ, वलकर, पाठारी, मानकर, पुरकर, ब्राह्मण, सामवेदी, सोमवंशी, शेषवंशी, गोरक्ष, पाचकळशी, चौकळशी असे सर्वजण गुण्यागोविंदाने नांदत आहेत आणि प्रत्येकाच्या संस्कृतीचे एकमेकांमध्ये मालूम बेमालूमपणे मिश्रण झालेले आहे.

**वसईची लोकगीते : समाजाचा आरसा**

कोणत्याही समाजाचे यथोचित दर्शन हे त्या समाजाच्या लोकगीतातून घडते. माणसाने आपल्या बोलीभाषेत सहजस्फूर्त अशी जी प्रसंगानुरूप विविध गीते रचली, ती म्हणजे लोकगीते होत. जिव्हाळ्याचे विषय, विशिष्ट भूप्रदेश, नैसर्गिक वैशिष्ट्ये, समाजातील आचार-विचार, संस्कृती, शिक्षण, सण, उत्सव, चालीरीती, इतिहास, सामाजिक परंपरा, धर्म, सुखदुःखे, प्रेम यांचे चित्रमय प्रतिबिंब लोकगीतात दिसून येते. म्हणूनच असे म्हटले जाते, मानवी संस्कृतीचा प्रत्यक्ष ऐतिहासिक व सांस्कृतिक पुरावा म्हणजे लोकगीत होय.

वर उल्लेख केल्याप्रमाणे वसईत पूर्वीपासून राहणाऱ्या सर्व समाजाच्या संस्कृतीचे दर्शन त्यांच्या लोकगीतातून होते. समाजातील चालीरीती, सुखदुःखे यांना खांद्यावर घेऊन ही लोकगीते भूतकाळातून वर्तमानकाळाकडे वावरताना आढळतात. त्यांची जडणघडण, प्रवाही शब्दरचना, डौल व बालबोध स्वरांच्या लयींवर झालेला तालबद्ध आविष्कार दिसून येतो.

आजीने नातवंडांना झोपाळ्यावर बसवून गायलेली अंगाई गीते, दूर सासरी जाताना नववधूच्या आंतरिक ताटातुटीची गीते, भावाच्या सुखासाठी हपापलेली बहीण, सासरचा आदर व माहेरची ओढ

यांचा मनोमन संगम, भूतकाळाची आठवण करून देणारी भावनाप्रधान गीते, शेताबांधावर कष्टाची कामे करणाऱ्या कष्टकऱ्यांचे श्रमपरिहार करण्यासाठी गायलेली गीते, माहेर व सासरच्या लोकांची खिल्ली उडविणारी विनोदी गीते, तारुण्याच्या उंबरठ्यावर उभे असलेल्यांसाठी रचलेली प्रणयगीते, सणावाराचा आनंद द्विगुणित करणारी आनंद गीते या सर्वांमधून शब्द, सूर, लय व ताल यांचा सुंदर मिलाफ झालेला दिसून येतो.

**वसईच्या लोकगीतांचे वर्गीकरण**

वसईच्या संस्कृतीवर आधारित लोकगीतांचे साधारणतः पुढील प्रकारे वर्गीकरण करता येते.

१) **अंगाईगीते** :- घरच्या ओटीवर असलेल्या लाकडी हिंदोळ्यावर घरातील आजी वा आई बाळाला झोपविण्यासाठी ही गीते गात असत. सगळ्याच लोकभाषेत अंगाईगीते आढळतात.

उदा. गाये गाये गो निजबाये, गायशा रे गोठवी दादा, साव झुजे इरजे मरी, वाटेवरशा वडा तुजडी वाटोली सायरे, बाळू माजा लाना, पानी पडॅ दॅ.

२) **सणावाराची गीते** :- वसईत अनेक जाती धर्माचे, वंशाचे लोक राहतात व या सर्वांमध्ये येणाऱ्या सणावाराला विविध गीत गाऊन सणांचा आनंद द्विगुणीत केला जातो. उदा. अगो माजे बारजे, सण पैरू, कालोखी रात, माय मी सणाला जातेय गे,

३) **बडबड गीते** :- वेळ घालवण्यासाठी व लहान भावंडाना खेळवून हसत ठेवण्यासाठी ही गीते गायली जात असत.

उदा. यारे पोरांदो खेळायला, आंब्योरसॉ आंबॉ पडलॉ, येरे बापा आपल्या घरा...

४) **भक्तीगीते** :- समाजाचे शरीर मानवी नात्यांनी घडलेले असते तर समाजाचा आत्मा घडवीत असतो त्याचा धर्म व त्याची ईश्वरशरणता. ही भक्तीगीते समाजाची ईश्वराप्रती असलेली श्रद्धा व नम्रता व्यक्त करतात.

उदा. बांधावरशे शेवतुले, माऊली नऊ मयनॅ गरबार, रमॅदाये आये, जेणू खेळता जेजू माळता.

५) **विवाहगीते** :- वसईतील काही समाजात लग्नकार्याच्या एक दोन महिने आधी गावातील स्त्रिया रात्रीचे जेवण झाल्यावर एकत्र येऊन वधूच्या वा वराच्या घरी ओटीवर असलेल्या हिंदोळ्यावर बसून विवाहगीते गात असत. या गीतातून वातावरण निर्मिती होत असते तसेच आनंद व्यक्त होत असे.

उदा. आले गे राती, दातीरशा तरीवरी, डोंगराचे कडसनीला, बांगडी टिचलंय गो, माथ्यान फूलं दुये.

६) **नाती दर्शविणारी गीते** :- आई-बाप, भाऊ-बहीण, मामा-मामी, पती, सासू-सासरे, नणंद, मदरीन-पदरीन ह्या नात्यामागच्या वेगवेगळ्या भावना अशा गीतांमधून व्यक्त होतात. ह्या गीतांमधून सर्वाप्रती असलेली प्रेम, माया क्वचित असूयाही व्यक्त होत असे.

उदा. मामा मामी कडे गेली, सांदा रे पयल्या सांदा, दारापुढच्या डोकरा, ताडी आनली रे मामा, एक निरोप पाठव्योतॉ, शिशिशे पोगूरले, वेलू न वेलू, भोवा बंदवासे.

७) **शृंगार गीते** :- तरुण आणि तरुणी आपल्या पुढील आयुष्याची स्वप्ने रंगवतात व ह्या स्वप्नांचे वर्णन अशा लोकगीतातून आढळते.

उदा. लाल लाल गाल, दवन्या गे आंब्याखाली, सय गो सय, रिमझिम पाऊस पडते, गल्यान साखळी सोन्याची, आमचे गावान वराड, वैशाखाची निंबर.

८) **निसर्ग गीते** :- वसईचा निसर्ग हा सृष्टीसौंदर्याने नटलेला, मधुर फुला-फळांनी, भाताच्या सोनेरी पिकांनी डोलणारा, नारळी-पोफळीच्या बागांनी भरलेला व सर्वांना आकर्षित करणारा आहे. ह्यांचे मनमुरादपणे वर्णन करणारी असंख्य लोकगीते आहेत. या लोकगीतांतून निसर्ग व मानवाचं नातं किती अतूट आहे ह्याची प्रचिती येते.

उदा. बागे सभोवती, उठ माळ्या, सांद डेवला, मोगरा फुलयला, साफा बाय फुलयला, दर्याशा किनारीला उंबराचं झाड, आंबा बाय लाविला.

९) **विरह गीते** :- आपल्या रक्ताचे नातेवाईक सोडून परघरात नांदायला निघालेल्या नवविवाहितेचा विरह तसेच सासरी गेलेल्या मुलीला आपल्या माहेरची लागलेली ओढ, मुलीच्या जाण्याने शोकाकुल झालेलं कुटुंबीय ह्या सर्वांचं

हृदयस्पर्शी वर्णन या लोकगीतांमधून केलेलं आढळतं. ही गीते गाताना वा ऐकताना डोळ्यातून अश्रू ओघळल्याशिवाय राहत नाही, एवढी ताकद या लोकगीतांमध्ये आहे.

उदा. जाते माझे माहेरला, नवरीचे आये गे, तूये सासऱ्या डोंगरान मोर, झोपाळ्यावर बैसू, वलानीवरशी झुबली, आजपासून खपलं गो तूये, एक बांगडी शिनाय कोंबडी.

१०) **कष्टकऱ्यांची गीते** :- वसईचा समाज हा कष्टकरी समाज. शेतात, वाडीत राबणारा. या समाजाचे नाते जमीन व शेतीवाडीशी पक्के जोडलेले आहे. पुरुष व स्त्रिया दोघेही वरील कष्टाची कामे करीत असतात. अशावेळी क्षीण घालविण्यासाठी व विरंगुळा म्हणून काही लोकगीते रचलेली आढळतात. त्यातून आनंद मिळतो व परिश्रमाची सार्थकता जाणवते.

उदा. भरले आबावर ढग, शेतकरी आमी शेतकरी, मुंबई जाता माज्या, कय जाता माझे सेनापती, फुलवाली फुलांची वेणी, बोलतान रामा माना वसय गावान, मी केळीवाली, चल गो आपू धंदा करू.

११) **इतर गीते** :- अशा या गीतांव्यतिरिक्त लग्नाच्या एक दिवस आधी म्हणजे शनिवारी वड्यासाठी पीठ टाकताना तसेच वडे काढताना गायलेली गीते, नवरा-नवरी लग्न संस्कार घेऊन घरी येतात तेव्हा म्हटलेली गीते, नवरीला दुसऱ्या दिवशी सासरहून माहेरी आणण्यासाठी रचलेली गीते, सासर व माहेरच्या लोकांची चेष्टामस्करी करणारी गीते, संयवरी पाण्याची गीते.

अशा विविध भागात लोकगीतांची वर्गीकरण करता येते. बहुतेक गीते ही स्त्रीप्रधान आहेत. त्यामानाने पुरुषप्रधान गीतांचा अभाव जाणवतो. ही गीते कोणी रचली असावीत याविषयी शंकाच आहे. तसेच ही गीते कधीपासून आली? ह्याचेही उत्तर सांगता येत नाही. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे मौखिक पद्धतीने ही गीते संक्रमित झालेली आहेत. मात्र ही संक्रमित होत असताना त्या गीतांमध्ये बराचसा बदल झालेला दिसून येतो.

# अंक पहिला

■ विलास पागार, नाळा, वसई
फोन : ९८६७२५८७००

नाटकाचा किडा मला लहानपणीच चावला असावा. मी तिसरीला होतो तेव्हा मला एक छोटसं पुस्तक सापडलं. त्यावेळी लहान मुलांनी वाचायची गोष्टीची पुस्तकं अशीच छोटीशी असायची. पण ते पुस्तक गोष्टींचं नव्हतं. ते होतं वि. वा. शिरवाडकर यांच्या 'दिवाणी दावा' या नाटीकेचं. त्याकाळी मी हातात पडेल ते वाचून फस्त करायचो. तसं तेही पुस्तक वाचून काढलं. पण हे प्रकरण तिथेच थांबलं नाही. मला ते नाटक करावंसं वाटू लागलं. म्हणून मी काही मुलांना जमवून त्याच्या तालमी सुरू केल्या. पण आमच्या कलाकार मित्रांचा उत्साह काही फार दिवस टिकला नाही आणि एका तिसरीतल्या मुलाने बसवलेल्या नाटकाचा तो ऐतिहासिक प्रयोग होता होता राहिला. त्या नाटकातल्या साक्षीदाराच्या पात्राच्या तोंडी एक पालुपद होतं- "चहाला आणि देवाच्या कीर्तनाला कधी नाही म्हणू नये." ते मला अजुनही आठवतं.

आमच्याकडे नाळ्यात त्याकाळी काही ना काही निमित्ताने दरवर्षी प्रत्येक आळीत नाटकं व्हायची. त्यातली माझ्या घराजवळच्या भंडारआळी आणि मांगेलआळीत नाटकं व्हायची ती मला पहायला मिळायची. आळीच्या टोकावर स्टेज केलेलं असायचं. त्यावर पडद्यांचं नेपथ्य. क्वचित प्रसंगी बॉक्स सेट असायचा. नाटकं कौटुंबिक जिव्हाळ्याची. तिसऱ्या अंकात खूपच हृदयद्रावक प्रसंग असायचे. पण शेवट गोड व्हायचा. नाटकातली सगळी पुरुष पात्रं गावातली असायची. पण स्त्री भूमिका करणारी 'नटी' मात्र मुंबईहून यायची. तिला पहायला मुलांमध्ये अहमहमिका लागायची. क्वचित कुणाला ती दिसायची. नाहीतर तिचं दर्शन व्हायचं ते ती प्रत्यक्ष स्टेजवर अवतिर्ण झाल्यावरच. या नाटकांमध्ये

सगळ्यात महत्वाचा रोल असायचा तो प्रॉम्प्टरचा. तो बिचारा प्रेक्षकांना दिसणार नाही या बेताने पडद्याच्या भिंती मागे, खिडकी खाली किंवा कधीकधी तर चक्क नेपथ्यातल्या सोफ्याखाली छोटी टॉर्च घेऊन दबक्या आवाजात आपली ड्यूटी करे. कधीकधी तर हे प्रॉम्प्टर स्वतःच भूमिकेत शिरायचे. मग त्यांचा आवाज माइकमध्ये शिरून प्रेक्षकांपर्यंत पोहोचायचा. पण प्रेक्षकांनीही अर्थातच प्रॉम्प्टर असणार हे गृहीत धरलेलं असायचं. त्यामुळे कुणालाही फरक पडायचा नाही. प्रेक्षक छानपैकी नाटकाशी समरस व्हायचे आणि नाटक संपल्यावर डोळे पुसत घरी जायचे. असं हे नाटक वेड.

नाटकाच्या या वेडाचा गावाला फायदा सुद्धा झाला. आमच्या शाळेची नवी इमारत बांधायची होती. त्याच्या मदतीसाठी गावात एक नाट्य महोत्सव झाला. तोही गावकऱ्यांनीच सादर केलेल्या नाटकांचा. मी तेव्हा पहिली दुसरीत असेन. त्या नाटकांची नावं आजही मला लख्ख आठवतात. वेगळं व्हायचंय मला, माझा कुणा म्हणू मी, दिवा जळू दे सारी रात, कथा कुणाची व्यथा कुणा अशी ती नाटकं. तिकिटं असूनही चारही दिवस प्रेक्षकांची भरपूर गर्दी होती. हेही मला आठवतंय. नंतर काय झालं कुणास ठाऊक, पण गावात नाटकं होईनाशी झाली.

माझं पाठांतर चांगलं होतं. त्यामुळे शाळेत वक्तृत्व, कथाकथन, काव्य गायन अशा स्पर्धांमध्ये मला कायम बक्षीसं मिळायची. शाळेच्या गॅदरिंगमध्ये एखाददुसरं नाटक व्हायचंच. त्यात मी असायचो. त्या काळी आमच्या शाळेचं गॅदरिंग म्हणजे जाहीर कार्यक्रम असायचा. गॅदरिंगमधले कार्यक्रम पहायला सारा गाव लोटलेला असायचा. मग गॅदरिंग नंतरचे दोनचार दिवस रस्त्यात जाता येता लोक मला ओळखून नाटकाच्या पात्राच्या नावाने हाक मारायचे. ते त्याकाळचं फॅन फॉलोविंग! मजा यायची. आपण कुणीतरी विशेष आहोत असं वाटायचं. मधल्या काळात माझ्या भावाने मुंबईला नेऊन डॉ. लागूंची नटसम्राट, हिमालयाची सावली, श्रीकांत मोघे - दया डोंगरे यांचं लेकुरे उदंड जाली अशी नाटकं दाखवली होती. असं नववीपर्यंत सुरू होतं.

कॉलेजला गेलो तेव्हा मनात पहिला विचार हा आला की नाटकात काम करायला मिळेल ना? त्याआधी नववीत असताना आमच्या गावातल्या एकाबरोबर वर्तक कॉलेजच्या गॅदरिंगला गेलो होतो. म्हणजे त्याने मला नेलं होतं. खास

जगतकुमार पाटीलचं नाटक पहायला. जगत तेव्हा व्यायसायिक नाटकांमध्ये कामं करायचा. ही श्रींची इच्छा, सागरा प्राण तळमळला, झोपा आता गुपचूप अशी त्याची नाटकं सुरू होती. कॉलेजमध्ये त्याच्या नावाला ग्लॅमर होतं. हे अर्थातच त्या मित्राकडून कळलं. जगतने त्यावर्षी रमेश पवार यांची 'हंगर स्ट्राइक' ही एकांकिका बसवली होती. त्यात जगत स्वतः कामदेखील करत होता. ती पाहिल्यावर एकदम भारवल्यासारखं झालं. आजपर्यंत पाहिलेल्या नाटकांपेक्षा कितीतरी वेगळं. जिवंत आणि रसरशीत! आपणदेखील अशा नाटकांमधून कामं करायला हवीत असं वाटायला लागलं. त्या गॅदरिंगमध्ये आणखी एक एकांकिका पाहिली. वसंत सबनिसांची 'आम्ही सौजन्यात आहोत' ही. वसंत सबनिसांचंच 'सौजन्याची ऐशी तैशी' हे गाजलेलं विनोदी नाटक म्हणजे याच एकांकिकेचा विस्तार होय. ती एकांकिका धमाल होती. तोपर्यंत मी अशा प्रकारचं, म्हणजे फार्सिकल नाटक पाहिलं नव्हतं. पात्रांनी रंगमंचावर घातलेला गोंधळ कसा बरं बसवत असतील, असा प्रश्न मला बरेच दिवस पडला होता. कॉलेजला आल्यावर हे सगळं आठवलं. वाटलं, आपल्याला नाटकात काम करायला मिळेल ना?

अकरावीतच मला हिंदी नाटकात काम मिळालं. मेन रोल! गॅदरिंगच्या मराठी नाटकात काही माझी डाळ शिजणार नव्हती. त्याचं कास्टिंग झालेलं होतं. त्यात काम करणारा एक नट, अमृत साळगावकर, तो हिंदी एकांकिका बसवत होता. त्याने अनपेक्षीतपणे हीरोच्या रोलसाठी माझी निवड केली. त्यात त्याचा एक डाव होता. कॉलेजच्या गॅदरिंग कमिटीने एक नियम केला होता. एका विद्यार्थ्याला एकाच नाटकात काम करता येईल असा. म्हणजे जास्तीतजास्त विद्यार्थ्यांना गॅदरिंगमध्ये संधी मिळेल. त्या नियमानुसार अमृतला हिंदी एकांकिका दिग्दर्शित करता येणार होती पण त्यात भूमिका करता येणार नव्हती. आमच्या तालमीत जोरात झाल्या. नाटक छान बसलं. पण नाटकाच्या दिवशी अमृत मला म्हणाला, "तुझं काम नीट होत नाही. तुझ्यामुळे नाटक पडेल, म्हणून तुझं काम मी करणार." माझ्या पायाखालची जमीन सरकली. मी ही गोष्ट कॉलेजमधला सीनियर विद्यार्थी नरेश नाईक याला सांगितली. त्याने लगेच हे प्रकरण ज्युनियर कॉलेज इनचार्ज कृष्णमुर्ती सर आणि चक्रवर्ती सरांकडे नेलं. त्यांनी अमृतला मनाई केली आणि आमचं महाविद्यालयीन रंगभूमीवर पदार्पण झालं.

पुढे मी रीतसर जगतकुमार पाटील, नरेश नाईक यांच्या गृपमध्ये वावरू लागलो. त्यांची 'नाट्य अभिलाषी' ही संस्था होती. त्यात सामिल झालो. जगत नाट्य अभिलाषीचा म्होरक्या. त्याचा मुंबईच्या रंगभूमीवर वावर होता. त्याचे व्यावसायिक नाटकांचे दौरे आणि राज्य नाट्य स्पर्धा यामुळे त्याला महाराष्ट्रभरची रंगभूमी ठाऊक होती. तो स्वतः मुंबई मराठी साहित्य संघाने चालवलेल्या अमृत नाट्य भारतीच्या नाट्य वर्गात प्रशिक्षित झालेला रंगकर्मी होता. त्याच्या अभ्यासाचा, निरीक्षणाचा, अनुभवांचा फायदा आम्हाला मिळत होता. मी नाट्य अभिलाषीला जॉईन झालो त्यावेळी जगत, प्रेमानंद गज्वी यांची 'देवनवरी' ही एकांकिका बसवत होता. वसईच्या अमर कला मंडळाच्या एकांकिका स्पर्धेत ती सादर करायची होती. देवनवरी आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांमध्ये गाजलेली एकांकिका होती. पण जगतने ती वेगळ्या पद्धतीने बसवली. कीर्तनाच्या फॉर्ममध्ये. मी मॉबमध्ये होतो. पण मला पूर्ण एकांकिका पाठ होती. मॉबमध्ये असल्याचा एक असा फायदा झाला, की मला नाटक बसत असताना ते डोळसपणे पाहता आलं. माझ्यात सतत एक कुतुहल जागृत असतं. हे 'कसं घडत असेल?' असं. म्हणजे मी ऑर्केस्ट्रा पहायला गेलो तर मी कायम ॲकॉर्डियन वाजवणाऱ्याकडे किंवा गिटार, व्हायोलीन वाजवणाऱ्याकडे पहात असे. त्यांच्या रिहर्सल्स पहायला जाई. गाण्याचा कार्यक्रम असेल तर हार्मोनियमच्या स्वरपट्टीवर वादकाची फिरणारी बोटं पहात बसे. अगदी कुणी टायपिंग करत असेल तर तेही लक्षपूर्वक पाही. प्रत्येक क्षणी माझ्यातलं कुतुहल जागृत असे. त्यामुळे नाटकाच्या तालमी दरम्यान दिग्दर्शकाच्या सूचना, तालमीनंतर होणाऱ्या चर्चा मी मन लावून ऐके. त्यात माझं आपसूकच प्रशिक्षण होत होतं. त्याच काळात मी बॅकस्टेजची कामं शिकून घेतली. गरज पडेल तसं लेव्हल्स लावणे, प्रॉपर्टी लावणे, वेशभूषा सांभाळणे, लाईटमनला मदत करणे अशी कामं स्वतःहून करू लागलो. भूमिकांपेक्षा बॅकस्टेजच्या म्हणजे पडद्यामागच्या कामात रमू लागलो.

मधल्या काळात वसईच्या अमर कला मंडळाने नाट्य प्रशिक्षण शिबीर आयोजित केलं होतं. महिनाभर चालेल इतकं प्रदीर्घ. संचालक होते माधव खाडिलकर. ते राष्ट्रीय नाट्य विद्यालयात (National School of Drama - NSD)

शिकून आलेले. शिवाय त्यावेळी ते 'सागरा प्राण तळमळला' या नाटकात स्वातंत्र्यवीर सावरकरांची भूमिका करीत होते. त्यामुळे त्यांच्या नावाचा दबदबा होता. वसईच्या बाजीपूर वनिता विनयालय कॉलेजात हे शिबीर झालं. (जिथे आता मी माझ्या नाटकांच्या तालमी घेतो.) या शिबिरामुळे नाटकाबद्दलच्या मूलभूत गोष्टी समजल्या. त्याचबरोबर भरत मुनींचे नाट्यशास्त्र, ग्रीक रंगभूमी, भारतीय लोक रंगभूमी, मराठी रंगभूमी आणि समकालीन रंगभूमी यांच्याबद्दल माहिती मिळाली. अभिनयाच्या, सादरीकरणाच्या विविध शैलींबद्दल माहिती मिळाली. नाटकाचा एकूण आवाका माहीत झाला. त्या वयात या गोष्टी माहीत होणं ही मोठी गोष्ट होती. त्यामुळे नाटकाकडे पाहण्याची दृष्टी मिळाली. नाटकाकडे केवळ हौस म्हणून न पाहता अभ्यासूपणे पाहण्याची वृत्ती तयार झाली.

खाडिलकरांनी या शिबीरात आम्हाला 'इडिपस रेक्स' या प्रसिद्ध ग्रीक शोकांत नाटकाचा पु. ल. देशपांडे यांनी 'राजा ओयदीपौस' या नावाने अनुवाद (की रुपांतर?) केला आहे तो शिकवला. इडिपस रेक्स ही जागतिक रंगभूमीवरची एक अजरामर शोकांतिका. मराठीत त्याचे वेगवेगळे अनुवाद उपलब्ध आहेत. पुलंनी हा अनुवाद बंगाली नाटकावरून केलाय. 'ओयदीपौस' हा इडिपसचा मूळ ग्रीक उच्चार. खाडिलकरांनी हे नाटक शिकवताना ग्रीक जीवन पद्धती, तिथली राजकीय व्यवस्था, ग्रीक रंगभूमी, ग्रीकांची एरीना पद्धतीची नाट्यगृहे, पात्रांची वेशभूषा, त्यातला कोरसचा वापर, अशा अनेक आम्हाला सांगितल्या. त्यामुळे भारतीय रंगभूमी बरोबरच जागतिक रंगभूमीचा इतिहास समजला. हे सगळं उमलत्या वयात घडत होतं. त्यामुळे आम्ही सगळे चार्ज्ड झालो. मुख्य म्हणजे नाटकाच्या हौसेला अभ्यासाची दिशा मिळाली.

पुढे नाट्य अभिलाषीमधून एकांकिका स्पर्धा, राज्य नाट्य स्पर्धा असं सुरू झालं. दिग्दर्शक अर्थातच जगतकुमार पाटील. मी पडद्यामागे. तिथे आम्ही देवनवरी, औतान, दरवेशी या एकांकिका आणि कलंकमुद्रा, सूरनिर्वाण, वैष्णव जन तो, राइज ऑफ रेझिस्टन्स अशी वेगवेगळ्या शैलीतली नाटकं केली. या सर्व नाटकात नाना वळवईकर प्रमुख भूमिकांमध्ये असे. वसईत स्पर्धा असेल तर नाना आमचा प्रतिस्पर्धी असे. पण राज्य नाट्य स्पर्धा करताना आम्ही एकत्र असू.

निरोगी स्पर्धेचं (Healthy Competition) बाळकडू आम्हाला तेव्हाच प्राप्त झालं होतं. या सर्व गोष्टींच्या अधेमधे जगतने एक मोठा प्रयोग केला. त्याला आपल्याकडच्या वारली लोकांच्या जीवनावर आधारीत वारली बोलीतलं नाटक करायचं होतं. तोपर्यंत वारली लोकांचे जीवन, त्यांची बोली रंगमंचावर आली नव्हती. त्या नाटकाची कथा जगतने आधीच लिहिली होती. नाटक लिहायचं बाकी होतं. फक्त तो वारली बोली लोकांना समजेल की नाही याबद्दल साशंक होता. त्यासाठी त्याने एक प्रयोग केला. त्याचे गुरु, शिवाजी विद्यापीठाचे तत्कालीन मराठी विभाग प्रमुख प्रा. प्रभाकर पाटील यांनी 'पारध' ही आदिवासी पार्श्वभूमी असलेली एकांकिका लिहिलेली होती. त्यातली भाषा पश्चिम महाराष्ट्रातली होती. जगतने प्रभाकर पाटील सरांच्या परवानगीने ती एकांकिका वारली भाषेत रुपांतरीत केली. ती एकांकिका वर्तक कॉलेजतर्फे आम्ही विद्यापीठ युवक महोत्सव, आयएनटी अशा आंतरमहाविद्यालयीन आणि प्रबोधन, नानासाहेब फाटक स्मृती, अमर कला मंडळ अशा खुल्या स्पर्धांमध्ये सादर केली. मी त्यात मुख्य भूमिकेत होतो. बऱ्याच दिवसांनी अभिनय केला. पारधला सगळीकडे तिसरं बक्षीस मिळालं. त्यामुळे दोन गोष्ट झाल्या. विद्यापीठीय आणि इतर स्पर्धांमध्ये वसईच्या नावाची नोंद झाली आणि लोकांना वारली भाषा समजते हे जगतला, आम्हाला आणि लोकांनाही समजलं.

त्यानंतर आलं 'आसाचा फेरा'! संपूर्णपणे वारली जीवनावरचं अस्सल नाटक. त्या नाटकात जगतने जीव ओतला होता. त्या नाटकाच्या पूर्ण प्रोसेसमध्ये म्हणजे लिखाण, नाटक बसताना, प्रयोग ते बक्षीस मिळेपर्यंत मी हजर होतो. मी भूमिका करत नव्हतो. पण बाकी सगळ्या कामात होतो. नाटक उभं राहताना, त्याचा प्रयोग होताना आणि ते यशस्वी होताना पाहणे ही एक अद्भुत अनुभूती असते. आसाचा फेराला दैदिप्यमान यश मिळालं. सर्व आंतरमहाविद्यालयीन नाट्य स्पर्धांमध्ये ती अव्वल ठरली. सर्वत्र वसईच्या नावाचा डंका वाजला. पुण्याच्या गगन विहारी बोराटे यांनी ही एकांकिका पुरुषोत्तम करंडकमध्ये केली. तिथेसुद्धा ती पहिली आली. त्याच्या पुढल्या वर्षी नरेश नाईकने लिहिलेली वसईच्या कोळी जीवनावर आधारित 'कोळीया राजा' ही एकांकिका जगतने केली. पण मुंबईच्या रुईया महाविद्यालयातून तिलाही तसेच यश मिळाले. या दोन थोर आणि महत्वाच्या

कलाकृतींच्या निर्मितीचा साक्षीदार होण्याचं भाग्य मला लाभलं.

आसाचा फेरा आणि कोळीया राजा या नाटकांच्या बॅकस्टेजची कामं करताना माझा विशेष फायदा झाला तो म्हणजे त्याकाळातला महान लाईट डिझायनर गिरीधर मोरे याच्या बरोबर काम करायला मिळालं. गिरीधर मोरे हा बंडखोर प्रकाश दिग्दर्शक होता. प्रकाश योजनेतले पारंपारीक संकेत धुडकावून तो वेगळ्या पद्धतीने रचना करी. नाटकाच्या फॉर्मप्रमाणे त्याचे डिझाइन बदलत असे. रंगसंगती बदलत असे. त्यामुळे दरवेळी तो प्रेक्षकांना आणि जाणकारांना चकीत करत असे. मी गिरीच्या हाताखाली नुसतं कामच केलं नाही तर गिरीने मला प्रकाशयोजनेची बाराखडी शिकवली. त्यातल्या क्लुप्त्या, बारकावे सांगितले आणि सर्वात महत्वाचं म्हणजे सौंदर्यदृष्टी दिली. त्याचे हे ऋण कधी विसरता येणार नाही. पडद्यामागे केलेल्या या सर्व धडपडीचा आज मला नाटक दिग्दर्शित करताना फायदा होतो.

त्यानंतर मला एक सुवर्णसंधी मिळाली. नरीमन पॉईंटच्या एनसीपीएचे (National Centre for Performing Arts) त्यावेळी पु. ल. देशपांडे अध्यक्ष होते. डॉ. अशोक रानडे मुख्य संचालक. त्यांच्या दिमतीला दिग्दर्शक वामन केंद्रे (जे आता राष्ट्रीय नाट्य विद्यालयाचे मुख्य संचालक आहेत), दिग्दर्शक चेतन दातार हे होते. तर, एनसीपीएने 'थिएटर डेव्हेलपमेंट प्रोजेक्ट' अंतर्गत नाटकाच्या विविध अंगावर प्रशिक्षण शिबीरांचे आयोजन केले होते. त्यातल्या सेट अँड लाइट्सच्या शिबीरासाठी माझी निवड झाली. दहा दिवसांचं पूर्ण वेळ शिबीर. सकाळी दहा ते रात्री आठपर्यंत. संचालक होते, ज्यांच्या 'गर्म हवा' या सिनेमाने न्यू वेव्ह हिंदी सिनेमाची मुहूर्तमेढ रोवली ते एम. एस. सथ्यू. सथ्यू सर भारतीय रंगभूमीवरचे महत्वाचे दिग्दर्शक आणि सेट डिझायनर होते. इप्टा (Indian Peoples Theatre Association) मधून त्यांनी अनेक मोठमोठ्या नाटकांची निर्मिती केली. त्या शिबीरात सथ्यू सरांनी खूप गोष्टी शिकवल्या. तिथे मोठमोठे लोक व्हिजिटींग फॅकल्टी म्हणून यायचे. त्यांच्याकडून बरंच शिकायला मिळालं. वर्ल्ड मास्टर्सच्या कामाच्या फिल्म्स, फोटोज पाहता आले. खूप समृद्ध करणारा अनुभव होता तो!

एनसीपीएच्या त्या शिबीरात आणखी एक गोष्ट घडली. त्या शिबीरात आम्हाला एक प्रोजेक्ट होता. संचालकांनी दिलेल्या नाटकाची नेपथ्य रचना (सेट

डिझाइन) करायची. माझ्या वाट्याला शेक्सपियरचं 'रोमीयो अँड ज्युलियट' हे नाटक आलं होतं. आम्हाला सेटचा ग्राउंड प्लॅन, एलिव्हेशन डिझाइन आणि कार्डबोर्ड मॉडेल सबमिट करायचं होतं. मी 'रोमीयो अँड ज्युलियट'चा त्या नाटकातील विविध स्थळं लक्षात घेऊन एक कौंपोझिट सेट (म्हणजे नेपथ्यातल्या एकाच स्थानाचा अनेक स्थळं म्हणून वापर करणे.) डिझाइन केला. माझं डिझाइन, मॉडेल मी सबमिट केलं. अभिमानाची गोष्ट ही की शिबीर संपल्यानंतर एनसीपीएचं मुखपत्र 'रंग अंतरंग'मध्ये या शिबीराचा वृत्तांत प्रसिद्ध झाला, त्यात सेट्सची जी फक्त तीन डिझाइन्स छापली होती त्यात एक माझं होतं.

असा नाटकाच्या जगात संचार सुरू असताना आपणही नाटक दिग्दर्शित करावं असा विचार वारंवार मनात डोकावत असे. एके दिवशी आमचे गुरुवर्य जगतकुमार पाटील यांनी सुचवलं की वसईत दरवर्षी साजरा होणाऱ्या कला क्रीडा महोत्सवातल्या एकांकिका स्पर्धेत नाट्य अभिलाषीतर्फे भाग घे. स्क्रिप्टची शोधाशोध सुरू झाली. त्यावेळी व्ही. पी. सिंग सरकारने महाजन अहवालाची अंमलबजावणी करायचे ठरवले होते. त्यामुळे समाजात राखीव जागा समर्थक आणि विरोधक अशा दोन गटात प्रचंड वादविवाद सुरू होता. त्यात कडवटपणाही येत चालला होता. या परिस्थितीचं वास्तव चित्रण करणारं नाटक करावं असं मला वाटत होतं. मी ही कल्पना नरेश नाईक याला सांगितली. त्यातला आशय काय असावा, त्यात काय मुद्दे असावेत याची चर्चा केली. नरेशने स्क्रिप्ट दिली. त्यावर थोडे संस्कार करून तालमीला सुरुवात केली. एकांकिका दोन पात्री होती. त्यात माझा मित्र आशीष भिडे आणि दिनार केळूसकर यांनी भूमिका केल्या. एकांकिकेचं नाव ठेवलं 'गोष्ट तुझी माझी.' एकांकिका सादर झाली. ती संपली तेव्हा प्रेक्षक सुन्न झाले होते. त्यांना टाळ्या वाजवायचं देखील भान नव्हतं. काही क्षण गेले आणि नंतर टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. त्या स्पर्धेत 'गोष्ट तुझी माझी' पहिली आली. मला सर्वोत्कृष्ट दिग्दर्शन आणि सर्वोत्कृष्ट प्रकाश योजनेचं पहिलं बक्षीस मिळालं. सर्वोत्कृष्ट नेपथ्य, सर्वोत्कृष्ट पार्श्वसंगीताचंही पहिली बक्षिसं मिळाली. इतकंच नव्हे तर नाटकातल्या दोन्ही पात्रांना सर्वोत्कृष्ट अभिनयाचं पहिलं आणि दुसरं बक्षीस मिळालं. तो एक विक्रमच होता. हा सिलसिला पुढे असाच सुरू राहिला. त्या नंतर लागोपाठच्या दोन

वर्षी 'अरण्यगर्भ' आणि 'प्रश्न निरंतर' या दोन एकांकिकांना असंच यश मिळालं. वसई तालुका कला क्रीडा महोत्सवातल्या एकांकिका स्पर्धेतली पहिली हॅटट्रिक माझ्या नावावर लागली.

जनरली एखादा फॉर्म्युला यशस्वी झाला की तोच पुन्हा पुन्हा वापरून यश पदरात पाडून घ्यायचं असा सगळ्यांचा कल असतो. पण मी तसं नाही केलं. या तिन्ही एकांकिका वेगवेगळ्या शैलीतल्या होत्या. 'गोष्ट तुझी माझी' वास्तववादी शैलीतली होती. 'अरण्यगर्भ' जुन्या क्लासिकल शैलीत बसवली होती, तर 'प्रश्न निरंतर' अमूर्त म्हणजे अब्सर्ड शैलीतली होती. तिन्ही एकांकिकांना सर्वत्र उत्तम यश मिळालं. रसिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. माझी एक चांगला दिग्दर्शक आणि प्रकाश योजनाकार अशी ओळख प्रस्थापित झाली.

पुढे बरीच कामं झाली. आमचा ज्येष्ठ मित्र नाना वळवईकरला (नटवर्य मा. दत्ताराम यांचे सुपुत्र) वि. वा. शिरवाडकरांच्या 'कौंतेय' या तीन अंकी नाटकाचा दिर्घांक करायचा होता, तोही दोन पात्रात. (मूळ नाटकात सोळा सतरा पात्रं आहेत.) ते नाटक संपादित आणि दिग्दर्शित करण्यासाठी त्याने मला पाचारण केलं. नानाने त्यात कर्ण आणि सुमित्रा देवधरने कुंतीची भूमिका केली होती. त्याचे महाराष्ट्रभर प्रयोग झाले. काही वेगळं करून पहावं म्हणून वसईच्या मन्वंतर नाट्यमंडळासाठी 'वत्सराज उदयन' आणि 'गणवैराज्य' ही संगीत नाटकं दिग्दर्शित केली. अ. भा. म. नाट्य परिषदेच्या वसई शाखेसाठी 'चौकटीत कोंडलेलं आकाश' ही Science Fiction दिग्दर्शित केली.

या सगळ्या प्रवासाच्या एक एक टप्प्यावर मार्गदर्शक म्हणून जगतकुमार पाटील, नाना वळवईकर असे गुरुतुल्य मित्र लाभले. आशीष भिडे सारख्या बहुगुणी मित्राची सोबत मिळाली. सर्वात भाग्याची गोष्ट म्हणजे त्यापुढल्या प्रवासात डॉ. अनिल बांदिवडेकर यांच्यासारखा नित्य नवे सृजन साकारणारा लेखक - दिग्दर्शक फ्रेंड, फिलॉसॉफर आणि गाईड म्हणून लाभला. त्यांनी मी लिहिलेलं 'जिव्हार या जगाचे' हे नाटक आणि 'आपुलाची वाद आपणासी' ही एकांकिका दिग्दर्शित केली. त्यांच्या बरोबर काही टेलिव्हिजन मालिका लिहिल्या. डॉक्टरांच्या सहवासात समोर येणाऱ्या कामाला, आव्हानाला अभ्यासपूर्वक भिडण्याची वृत्ती निर्माण झाली. नाटकाकडेच नव्हे तर जगाकडे, जीवनाकडे पाहण्याची दृष्टी व्यापक झाली. सध्या ही वृत्ती, ही दृष्टी अंगी बाणवून वाटचाल सुरू आहे.

# काळ्या ढगाआड...

■ ॲलेक्स मच्याडो, नंदाखाल, वसई

नेहाला आज खूपच उदास आणि एकटं एकटं वाटत होतं. काही करायला मन तयारच होत नव्हतं. कधी ती बराच वेळ आपल्याच विचारात एकाच ठिकाणी बसून रहायची तर कधी उगाच ह्या खोलीतून त्या खोलीत अशी घरभर फिरत राहायची. घराचा कोपरा अन् कोपरा तिला खुणावत होता, बोलावत होता. एकेक आठवण ताजी करत होता. ताज्या होणाऱ्या प्रत्येक आठवणीबरोबर ती अधिकच उदास होत होती, व्यथित होत होती.

मागच्याच आठवड्यात तिने आईला घरी पाठवलं होतं. गेल्या दोन महिन्यांपासून आई तीच्याजवळच होती. आई जाण्यास तयार नव्हती. थोडे दिवस अजून थांबते म्हणून सांगत होती. पण नेहाने ऐकलं नाही. गेले दोन महिने नेहाला आईची सवय लागली होती. आता तिला घरात आईची उणीव प्रकर्षाने जाणवत होती. सुरुवाती सुरुवातीला घरात नातेवाईकांची ये जा सुरू असायची. त्यांच्याशी बोलण्यामध्ये नेहाचा वेळ निघून जात होता. आताशा ही ये जा थांबली होती. घर पुन्हा एकदम रिकामं रिकामं झालं होतं.

घरात तिला सोबत असायची ती फक्त प्रतिकची, तिच्या एकुलत्या एका मुलाची. त्याची देखिल शाळा सुरू झाली गेल्या आठवड्यात आणि नेहा खूपच एकटी पडली... ऑफीसमधून एकसारखे फोन येत होते, कधी जॉईन होणार म्हणून. पण घरातून बाहेर पडायला नेहाचं मन तयारच होत नव्हतं. एक दीर्घ उसासा टाकत नेहा खुर्चीत बसली. तिचे डोळे मिटले होते. मनात विचारांचं काहूर माजलं होतं. आठवणीं दाटून येत होत्या...

सगळं कसं छान चाललं होतं. ती, राजन आणि त्यांचा मुलगा, प्रतीक. तिघांचं छोटंसं कुटूंब, छोटीसी दुनिया. राजनचा

स्वतःचा व्यवसाय आणि तिची चांगली नोकरी. प्रतिक शाळेत सातवीला. चुणचुणीत आणि हुशार. अतिशय सुखात होते सगळेच...

आणि अचानक एक दिवस हे सगळंच बदललं. होत्याचं नव्हतं झालं. "येतो गं मी नेहा" असं सकाळी घरून निघताना नेहाला सांगून गेलेला राजन कधी परत आलाच नाही. एका जीवघेण्या अपघाताने त्याचा बळी घेतला आणि त्या तिघांची ती छोटीसी सुंदर दुनिया जणू उद्ध्वस्त झाली. संसाराची सगळी घडीच विस्कटून गेली. एखादा वृक्ष अचानक जमिनीवर कोसळावा आणि त्याच्या आधाराने उभी असलेली नाजूक वेल मुळासकट उन्मळून भुईसपाट व्हावी तशीच गत नेहाची झाली. आधार तुटला होता. समोर सगळा अंधार पसरला होता....

नेहाने डोळे उघडले. बाहेर सगळं काळवंडल्याल्यासारखं वाटत होतं. तिला थोडं नवल वाटलं. आताच तर स्वच्छ उन होतं. मग अचानक हा अंधार कसा? नितळ, निरभ्र आकाशात हे मळभ कुठून दाटून आलं असं?....

ती तशीच उठून खिडकीजवळ गेली आणि तिने वर आकाशाकडे पाहिले. एक मोठया काळ्या ढगाने संपूर्ण सूर्याला झाकून टाकलं होतं. त्या काळ्याकुट्ट ढगाने सगळीकडे अंधार करून टाकला होता. नेहाच्या मनात आलं, आपलं देखिल जीवन अश्याच एका काळ्याकुट्ट ढगाने झाकोळून टाकलं आहे... ह्या विचारासरशी तिचं मन पुन्हा उदास झालं. ती तशीच येऊन पुन्हा खुर्चीत बसली. तिची नजर टेबलावर ठेवलेल्या राजनच्या तसबिरीकडे लागली होती...

"का केलंस तू असं? असा कसा निघून गेलास मला असं एकटीला सोडून? ..." तिचं मन आतल्या आत आक्रंदत होतं.

बाहेर रिक्षा थांबल्याचा आवाज आला तशी नेहा उठली. तिने पटकन दार उघडलं. प्रतिक शाळेतून परतला होता. पाठीवरचं दप्तर काढत, हसत हसत प्रतिक आत आला. नेहाच्या अंगात आता थोडा उत्साह संचारला होता. प्रतिक खूप गोड आणि बडबड्या. शाळेतल्या गमतीजमती सांगत त्याची आता बडबड सुरू होणार होती...

"मम्मी, बघ ना कसा काळोख पडलाय आज?" नेहाने फक्त "हुं" केलं. आता पुन्हा तिला ते उदास विचार नको होते.

"प्रतिक, हात तोंड धुवून घे पटकन. मी तुला जेवायला वाढते. भूक लागली असेल ना?"

"हो मम्मी."

प्रतिकने दप्तर टेबलावर ठेवलं आणि तो खिडकीजवळ गेला.

"मम्मी, मम्मी. हे बघ काय?" प्रतिक खूप उत्तेजित झाला होता. नेहाने त्याच्याकडे पाहिलं. तो बाहेर वर आकाशाकडे पाहत होता. नेहा त्याच्याजवळ येऊन उभी राहिली आणि तिने वर पाहिले, आकाशात.

मघाशी सूर्याला झाकोळून टाकणाऱ्या त्या काळ्याकुट्ट ढगाच्या आडून सूर्याची सोनेरी किरणे वर आकाशाच्या दिशेने पसरत होती, झेपावत होती जणू. त्या काळ्या ढगाला दूर ढकलून बाहेर येण्यासाठी ती किरणे जणू नेटाने प्रयत्न करत होती. हळुहळू सगळीकडे पुन्हा सूर्याचा प्रकाश पसरत होता. त्या काळ्याकुट्ट ढगाला त्या किरणांची सुंदर रुपेरी किनार लाभलेली होती... चमचमणारी... सूर्याच्या पुनरागमनाची ग्वाही देणारी... खूप मोहक दृश्य होतं ते.

इतक्यात प्रतिक धावत टेबलाजवळ गेला. टेबलाच्या खणातून त्याने एक लांबट आकाराची वही काढली आणि नेहाजवळ आला. नेहाने त्या वहीकडे बघितलं आणि तिला आठवलं. ही राजनने प्रतिकसाठी बनवलेली वही. राजनला सुद्धा आवड होतीच. त्याने ह्या वहीमध्ये पेपरमधील, मासिकांमधील अनेक रंगीत, सुंदर चित्रे चिकटवलेली होती. प्रत्येक चित्राच्या खाली एखादी ओळ लिहिलेली होती.

प्रतीकने त्या वहीतील एक पान उघडून नेहाच्या समोर केलं. नेहाने पाहिलं, त्या पानावर कोणत्यातरी मासिकांमध्ये आलेलं एक छान चित्र चिकटवलेलं होतं. एका मोठ्या काळ्या ढगाआड लपलेला सूर्य आणि आकाशात पसरू पाहणारी त्याची असंख्य किरणे आणि त्या किरणांच्या प्रकाशाने त्या काळ्या ढगाला लाभलेली ती चमचमणारी रुपेरी कडा. नानाविध मोहक रंगांमध्ये खुलून गेलेलं

आभाळ. त्या चित्राच्या खाली राजनच्या सुवाच्च अक्षरात लिहिलेल्या दोन ओळी....

"Every cloud has a silver lining."

"प्रत्येक काळ्या ढगाला एक रुपेरी किनार असते"

नेहा पुन्हा पुन्हा त्या ओळी वाचत होती. त्या अक्षरांवरून हळुवारपणे तिची बोटं फिरत होती. राजनचा स्पर्श जाणवत होता तिला. जणू राजनच तिच्याशी बोलत होता.

"मम्मी, पपा सांगायचे, माणसाच्या जीवनात देखिल असंच असतं, ह्या चित्रासारखं" इतका वेळ तिच्याकडे पाहत असलेल्या प्रतिकने म्हंटलं.

"मम्मी, आपले पपा खूप हुशार होते ना गं?" त्याच्या आवाजात नेहाला आज वेगळंच काहीतरी जाणवलं. अगदी लहान वयात त्याला खूप समज आल्यासारखं वाटलं तिला. नेहाने एकदा प्रतिककडे पाहिलं आणि दुसऱ्याच क्षणी तिने त्याला आवेगाने आपल्या पोटाशी धरलं. तिचे डोळे ओथंबलेले होते. प्रतिकच्या मऊ मऊ केसांमधून हात फिरवताना तिच्या मनात विचार चालू होते.

"माझ्या जीवनात आलेल्या काळ्या ढगाची रुपेरी किनार आहे माझा प्रतिक, ही रुपेरी किनारच माझ्या जीवनातील ह्या काळ्या ढगाचा अंधार दूर करेल आणि बाहेर काढील सूर्य ह्या ढगाआडून.... मला त्यासाठी उभं राहायला हवं... रहायलाच हवं...."

रात्री जरा उशिराच नेहाने आईला फोन केला. "आई, काही दिवसांसाठी येशील का गं माझ्याकडे?"

गेल्या आठवड्यात नेहानेच हट्टाने परत पाठवलेल्या आईला कळेना काय बोलावं...

"आई, मी सोमवारपासून ऑफीसला जाणार म्हणत्येय..."

"येईन ना बाळा, नक्की येईन..."

नेहाने फोन ठेवला. तिला तिच्या डोळ्यांसमोर डबडबलेल्या डोळ्यांची आईची प्रेमळ मूर्ती दिसत होती....

# कोरोना नि करुणा

■ बर्नर्ड लोपीस, आगाशी, वसई.

कोरोना महामारीने हे शतक खडबडून जागे केले आहे. माणसाने स्वार्थापोटी चालवलेला पर्यावरणाचा ऱ्हास, प्रगतीच्या शर्यतीत विसरले गेलेले निसर्गाचे भान, हे जग आपले एकट्याचं नाही अशा उदासीन व कृतघ्नपणापोटी तयार झालेला स्वार्थभाव, मी व माझे या मानसिकतेतून लयाला जात चाललेली माणुसकी, गोरगरिबांविषयी कमी होत चाललेला कळवळा, धर्माचे दुकान मांडून केले जाणारे घाणेरडे राजकारण व माणसाच्या जीवाची खालावलेली किंमत... या सर्वांवर पुन्हा एकदा विचार करण्यासाठी कदाचित ही महामारीची योजना निसर्गानेच मानवाच्या हातात शास्त्राचे कोलीत देऊन केली असेल की काय अशी शंका येते.

मुळात या महामारीच्या उगमाचे खापर चीनवर फोडले जाते परंतु सारासार विचार करता आपली राजकीय पोळी भाजण्यासाठी व सत्तेसाठी त्याचा संगनमताने वापर झालाच नाही असे ठामपणे सांगता येणार नाही. ज्या रोगांवर औषधच सापडले नाही तो रोग बरा करण्याचे प्रयत्न लाखो रुपयांची औषधे वापरून, झाले असे भासवले गेले तीच औषधे आता बहिष्कृतही करण्यात आली आहेत. मग त्याचा उदोउदो करून तुटवडा दाखवून कुणी तुंबड्या भरल्या? नकली वेंटिलेटर बाजारात आले. माणसाच्या जीवाशी अतिशय घाणेरडा खेळ खेळलेला काही ठिकाणी पहायला मिळाले. रेमेडीसेवीर नावाचं औषध म्हणून तर काही महाभागांनी ग्लुकोजचं पाच मिली पाणी आठ हजारांपासून पंचवीस हजारांपर्यंत विकत आपदा में अवसर कसा असू शकतो हे सिद्ध केले.

वेगवेगळ्या कारणांनी आजारांनी दरमहा लाखो लोक मृत्यूमुखी पडत असत, परंतु कोरोनाचा बोलबाला झाल्यापासून माणसं डेंग्यू, हृदयविकार, रक्तदाब नि मधुमेह वगैरेनी आपापले गाशे गुंडाळून ठेवलेले पहायला मिळाले. निवडणुका असलेल्या विभागातील, तालुक्यातील नि राज्यातील कोरोना हा आपोआपच पळून जात असे. हे गजब संसर्ग प्रकरण

ऊलगडलेच नाही. जनता वोटिंगसाठी बाहेर पडली की कोरोना त्यांना घाबरत असे. मात्र जीवनावश्यक वस्तूसाठी किंवा उदरनिर्वाहासाठी बाहेर पडली की पोलिसांच्या दंडुक्याशी गाठ पडत असे. हा सारा प्रकार आकलनाच्या पलिकडे होताच पण सगळे मृत्यू हे फक्त नि फक्त कोरोनाच्या नावावर खपवण्यात आले आहेत याचा अर्थ हाच समजू शकतो. जनता दुधखुळी नाही परंतु माध्यमांना हाताशी धरून हे चित्र उभं करण्यात व मृत्यूचे भय घालण्यात जगभरातील सत्तापिपासू काही काळासाठी यशस्वी झाले आहेत. हा भाग अलाहिदा

आपल्या ख्रिस्ती समाजापुरते बोलायचं तर.. कोरोना हा शब्द कदाचित करूणा या शब्दाशी साधर्म्य सांगणारा असला तरी कोरोना काळात ख्रिस्ताची करूणा काही ठिकाणी उठून दिसली तर काही ठिकाणी भीतीने श्रद्धेवर मात केल्याचं चिन्ह स्पष्ट दिसलं.

या काळात चर्चेस बंद केली, देऊळे बंद झाली, मंदिरं बंद झाली, मशिदी बंद झाल्या, परंतु जगभरात गोरगरिबांसाठी आणि रोग्यांसाठी भूमिका घेतली गेली तशी भूमिका सर्वच अनुयायांनी घेतली असे जाणवले नाही. एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली ती रूग्णांना मदत करणारी नि कुटुंब व नातेवाईक यांनी स्पर्श करायला नकार दिलेल्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी कितीतरी संस्था नि व्यक्ती पुढे आल्या. लाँकडाऊनमधे कितीतरी संस्थांनी आपापल्या जागा कोविड इस्पितळ म्हणून वापरायला दिली. कितीतरी सेवाभावी संस्थांनी गोरगरीब व गरजू लोकांना अन्नपुरवठा करायची जबाबदारी उचलली.

आपण मोठ्या गर्वाने अभिमानाने व श्रद्धेनेही म्हणतो, आम्ही जगलो किंवा मेलो तरी आम्ही ख्रिस्ताचेच आहोत. मात्र या काळात जवळपास प्रत्येक माणूस मरणाच्या भयाने घरात लपला होता. वास्तविक या महामारीत हातावर पोट असणाऱ्या वर्गाचे अतोनात हाल झाले. करोडो लोकांच्या नोकऱ्या संपल्या. आहेरे नि नाहीरे मधली दरी वाढली, असे नाही तर नाहीरेचे टोकच संपवण्याचा विडा उचलला गेला आहे अशीच शंका येऊ लागली.

जगभरातील व देशातील परिस्थिती बाजूला ठेवून आपण आपल्या धर्मप्रांताचा विचार केला तर काय चित्र दिसते?

धर्मवरीष्ठांनी नेमकी काय भूमिका घेतली? चर्चमधून एक आँनलाईन मिस्साबली अर्पण करून लोकांचे प्रश्न सुटले का? रंजल्या गांजलेल्या लोकांसाठी आलेला ख्रिस्त आपण विसरलो का?

करशील जे गरीबांसाठी होईल ते माझ्यासाठी... या शिकवणूकीचे काय झालं? अळी मिळी गुप चिळी होऊन बसलेले चर्च या महामारीत लोकांना का मदतीचा नि हिमतीचा हात पुढे करू शकलं नाही? चर्च बंद करून धर्मगुरू लोकांत उतरायला हवे होते, भले मास्क, सुरक्षित अंतर, सॅनिटायझरसह का होईना पण लोकांना मॉरल सपोर्ट मिळायची गरज होती. दुर्दैवाने यातलं काय झालं ते जाहीर आहे. आता लस देऊन सर्व काही सुरळीत झाल्यावर चर्च लसीकरणासाठी हास्यास्पद पुढाकार घेत आहे. नोकरी व्यवसाय संपून गेलेल्या पालकांना मुलांच्या फीचे तगादे सुरू आहेत, थकलेल्या कर्जाच्या वसुलीसाठी वित्तीय संस्था नोटिसा बजावत आहेत. महागाईने कहर केला आहे. संपूर्ण जनमानसात एक उदासिनता नि गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे. अशावेळी लोकनिधीतुन साचवून ठेवलेल्या निधीचा विनियोग करणे आवश्यक होते. परंतु दुर्दैवाने तसे आपण क्षमता असूनही करू शकलो नाही.

कोरोनाने कुटुंबातील माणसे हिरावून नेली व कदाचित नाईलाजाने जवळही आणली पण नेतृत्वाने मात्र भिंतीच्या आत भीतीच्या छायेखाली राहणंच पसंत केले. बायबलमध्ये नमूद केल्याप्रमाणे भुकंप, पूर, महामारी येईल ते जर जगाच्या अंतकाळाचं निदर्शक असेल, व देवाचं राज्य जवळ आलं असेल तर ती चाहूल सर्वात आधी गुरुजनांना लागायला हवी होती नी तशी ती वागायला हवी होती. संकटकाळात नि आपत्कालिन परिस्थितीत निदान नैतिक पाठिंबा मिळाला असता तरी कितीतरी जीव वाचले असते.

काही ठिकाणी देवच आजारी असल्याचे हास्यास्पद प्रकार आढळले. लोकांच्या दानावर जगणारी उघडी पडली. देवाच्या मदतीचा हात भाविकांच्या भावनेच्या खिशात असतो. आपणही त्यापेक्षा फार काही वेगळे वागू शकलो नाही. कोरोना महामारीत काही सन्माननीय अपवाद वगळता जे काही वर्तन झाले त्यात बऱ्याच धर्माचे बुडबुडे मात्र फुटून गेले. परमाचार्य पोप फ्रान्सिस यांच्या पुढाकाराने सिनडच्या निमित्ताने समाजमंथन होत आहे. कोरोनाचे नवनवीन व्हेरीयंटही येत आहेत नि पुढे येणारही आहेत. सर्व जगातील लोकांना ख्रिस्ताच्या करूणेची शिकवणच कामाला येणार आहे... आपल्या मार्गदर्शक दिव्याखालचा अंधार दूर व्हावा म्हणून या आगमनकाळात प्रकाशपुत्र व शांतीदूत येशूबाळाकडे विनम्र याचना.

# सूटकेस

■ अमर म्हात्रे, वसई

(घटना सत्यतेवर आधारीत आहे. प्रकरणाच्या गोपनीयतेसाठी नावे आणि ठिकाणं यांचा उल्लेख टाळला आहे.)

एक निसर्ग नियम आहे; तुम्ही जी वस्तू, गोष्ट लपवण्याचा प्रयत्न कराल ती कितीही लपवली तरी बाहेर काढण्याचं काम नियती चोख करत असते. कदाचित या प्रक्रियेत विलंब लागत असेल परंतु न्याय हा होतोच... याच तत्वावर जीवन सुरु होतं, आहे आणि राहिल...

मी सूटकेस... तीच सूटकेस जी प्रवासात सामान नेण्यासाठी उपयुक्त ठरते, कधी कधी लोकांची अनेक गुपितं पोटात ठेवून, ठेवल्या जागी अंधारात निपचित पडुन असणारी, मला मोठ्या शहरात, एका छोट्या इमारतीत, सदनीकेत, कपाटामधे मला दडवलं होतं. माझ्यात ठेवलेल्या काही महत्वाच्या वस्तूमुळे असेल कदाचित... आता खरतर माझ्यापर्यंत कुणालाही पोहोचण्याचा मार्ग, शक्यता खूपच कमी.. मात्र नशिबाचे फासे फिरले की काहीही शक्य होतं आणि तसंच झालं...

या कपाटापासून ते कचरापेटी पर्यंतचा प्रवास आणि त्या नंतर दडवलेलं सत्य समोर आणण्यासाठी झालेल्या उलथापालथी, घटना सारं वेगानं घडलं. कचरापेटीतून सापडलेल्या माझ्यामधून जे 'घबाड' समोर आलं ते सर्वांना अनपेक्षित होतंच, तितकंच धक्कादायकही होतं.

काही घटना घडतात अन ठसठशीत कायम लक्षात रहातात. ही सुद्धा त्यातलीच घटना;

साधारण १०/१२ वर्षापूर्वीची गोष्ट असेल. सकाळी जवळच्या पोलीस ठाण्यात 'बेवारस सूटकेस' म्हणून माझी नोंद झाली. कचऱ्यातून सापडल्यावर आणखी काय होणार? अजून आत काय आहे कुणाला काही ठाऊक नव्हतं. पोलिसांनी मला जमा करताना जी दक्षता घ्यायला हवी होती ती सुद्धा घेतली नाही. आतमधे घातपात घडवणारं सामान असेल

की अजून काही असेल? त्यासाठी पंचनामा करणे, बॉम्बनाशक पथक बोलवणे, श्वान हुंगवणे हे काहीही झालं नाही, हे विशेष !!

पोलीस ठाणं गाठलं. तपासात जे समोर यायचं होतं ते अस्पष्टपणे आलं. उघडून पहाण्यासाठी त्यांची हातघाई सुरु झाली. चावी नसल्यामुळेही पंचाईत होती. अरे विद्वानांनो, आत एखादा ह्यूमन बॉडी पार्ट ही असेल ! पण कुणाला त्याची तमा नव्हती. पूर्ण ताकद लावूनही ते लॉक तोडू शकले नाही. उचकापाचकी करून सर्व दमले. सरते शेवटी चावीवाल्याला पाचारण केलं. त्याने अगदी सहज कुलुप उघडलं.

"घ्या, पाहिलं.. ?"

डोळे विस्फारुन काय पहाता?

झाला जीव शांत ??

आता लागा आता कामाला "

सूटकेस फेकून देणाऱ्या व्यक्तीचा पोलीसांना मागमूस लागला. त्यांचं जुळवाजुळव सुरु झालं. एका क्षणाकरता वाटलं, सर्व मार्गी लागणार. सगळं गैरकृत्य बाहेर येणार.. न्याय होणार पण कुठलं काय ? त्यांची तडजोड ,सेटलमेंट सुरु झाली.

नियती त्यांच्यावर हसली. तीने यांचे रागरंग पाहुन वेगळी तजवीज केली. दिवसभर पोलीस ठाणं शांत होतं. वादळापूर्वी शांत असतं तसंच.. सकाळी वादळ घोंघावायला सुरवात झाली. ४/५ विविध माध्यमांचे पत्रकार माझ्या शोधात पोहोचले. बहुदा त्यांना माझ्या बेवारसपणाचा सुगावा लागला होता. पोलीस त्यांना माहिती द्यायला तयार नव्हते. समोर इन्फॉर्मेशन डेस्कवर पत्रकार आणि पोलीस यांच्यात मजबूत राडा सुरु झाला. शाब्दिक चकमकी, वाद प्रतिवाद या बरोबरच सूटकेसची माहिती द्या म्हणून त्यांनी हट्ट धरला होता. त्यावर अजुन तक्रार दाखल नाही, माहिती कशी देणार? असा सवाल करत ठाणे अंमलदार डोक्याला हात लावून बसला होता.

इतकं काय आहे सूटकेसमध्ये ? एरव्ही न विचारता माहिती देता ना ?? किमान सूटकेस पहायला तरी मिळेल का? अशी प्रश्नांची सरबत्ती सुरु झाली. सूटकेस कुठाय ? या प्रश्नावर संपूर्ण पोलीस स्टेशनच्या चेहऱ्याची हवा उडताना दिसत होती तसेच त्यांची देहबोलीही बदलत होती.

"मी इथे आहे , शेवटच्या रूम मधे या इथे"

माझा (सूटकेसचा) आवाज त्यांना कुठे पोहोचणार होता. परंतु ती कमतरताही थोड्या अवधीत पूर्ण झाली. पोलीस-पत्रकार या वादात सरते शेवटी एका नव्याने दाखल झालेल्या माध्यम प्रतिनिधीने उडी मारली.

"बरं ते जाऊ दे... सध्या सूटकेस कुणाच्या ताब्यात आहे? प्रकरण तपासासाठी कुणाकडे तरी देण्याच ठरलं असेलच ना ?"

पोलिसांनी नाईलाजास्तव एका सहाय्यक पोलीस निरीक्षकाचं नाव सांगितलं. त्यांच्या केबिनमध्येच मला ठेवण्यात आलं होतं. सर्व पत्रकार मंडळी तिथे पोहोचली. अधिकाऱ्यानेही त्याचं हसत मुखाने स्वागत केलं. स्थानापन्न झाल्यावर आमच्या त्यांचे प्रश्न सुरु झाले. पोलीस उलटतपासणी करतात. मात्र इथे पोलिसांचीच उलटतपासणी सुरु होती. त्यांनी थेट मुद्द्यालाच हात घातला. प्रश्न तोच नेहमीचा... "ती सूटकेस कुठे आहे?"

अधिकाऱ्याच्या मागच्या टेबलावर मला ठेवलं होतं. हॅलो, मी इथे आहे, समोर... पण छे, त्यांना दिसतच नव्हतं.

पोलीस एखाद्या आरोपीला विचारतात ना अगदी तसंच.. अर्धा तास विचारुन पोलीस अधिकाऱ्याला हैराण केलं मात्र तरीही माहिती दिली जात नव्हती. त्याचं एकच पालुपद "अजुन चौकशी सुरु आहे" गाडी त्यापुढे जायलाच तयार नव्हती.

"अरे सांग ना.. माझ्यात काय सापडले आहे, आणि त्यावरून तुम्ही सारे काय सेटलमेंट करायला निघाला आहात.." मी मनातच पुटपुटली.

अखेर एकाचं लक्ष माझ्यावर गेलंच, तसे सारे माझ्या दिशेने धावले. फोटो काढण्यासाठी, व्हिडिओ शूट करण्यासाठी... त्यालाही पोलिसांनी दोन्ही हात पसरवून मज्जाव केला.

"ओ आता थांबा, तपासात गोंधळ होईल"

"फोटो काढू नका, allow नाही."

तरीही कोण ऐकतोय ? फोटोग्राफर्सनी त्यांचं काम केलं. त्यांना अर्धी ब्रेकिंग न्यूज मिळाली होती. बाकीची मुख्य कथा अजूनही गुलदस्त्यात होती. त्याकरता पोलीस कर्मचारीच पुढे आला. त्याने साहेबा समोरच एकेक पुडी सोडायला सुरवात केली.

" हे प्रकरण खुप वाढणार आहे."

"साधं सुधं नाही हे"

असं सांगत त्याने पत्रकाराना हिंट द्यायला सुरवात केली.

हे पाहुन त्याचे साहेब खवळले. सूटकेसचं रहस्य हा बाहेर काढेल की काय? याची भीती त्यांना वाटली असेल. त्याला लगेच चालत केलं, आणि हा सोर्सही बंद झाला.

सूटकेस ज्या १५ वर्षाच्या मुलाने कचऱ्यात फेकून दिली होती त्याला चौकशीसाठी आणलं होतं. तो बाकावर बसून हा सारा तमाशा पाहत होता. त्याच्याकडे यातील थोडी हकीकत माहिती होती. जमलेल्या काही पत्रकाराचं खुप उशिरा त्याच्यावर लक्ष गेलं.

"हा कोण आहे?"

"याच गुन्ह्यातील आरोपी आहे."

"काय म्हणतोस काय?"

"इतका छोटा?"

"बोलुया का त्याच्याशी? "

अशी त्यांची कुजबूज सुरु झाली.

कडी हळूहळू उकलत गेली.

पोलीसांनी तब्बल २४ तास दाबून ठेवलेली, प्रत्येक गोष्ट समोर येण्याच्या स्थितीपर्यंत आली होती. जी माहिती उपलब्ध झाली होती त्या आधारे सगळे झाडून कामाला लागले.

वस्तुस्थिती अशी होती ..

एका श्रीमंत कुटूंबातील महिलेच्या घरातून ही सूटकेस चोरीस गेली होती. तिचा नवरा बाहेर गावी वास्तव्यास होता. आपल्या घराच्या पहिल्या मजल्यावरुन कपाटातुन महत्वाची सूटकेस गायब आहे. किंबहुना ती वरुन फेकून देऊन चोरी झाली आहे. या बाबत खरं तर तिला सुतराम कल्पना नव्हती. अटक अल्पवयीन गरीब मुलगा तिच्याकडे कामाला होता. साफसफाई दरम्यान त्याला सूटकेस दिसली. यात चांगले कपडे, वस्तु असतील या आशेने त्याने चोरी केली. परंतु चावी मिळत नाही आणि लॉक उघडत नाही, त्यामुळे पुन्हा परत त्याच घरी सूटकेस घेऊन जाण्यात त्याला जोखीम वाटली. आपण पकडले जाऊ या भीतीपोटी त्याने ही सुटकेस महानगरपालिकेच्या कचरा पेटीत भिरकावली.

त्याने उघडायचे कष्ट घेतले असते, तर त्याचेही डोळे पांढरे झाले असते.. पोलीसांच्याच एका खबऱ्याने बेवारस सूटकेसबाबत पोलीसांना माहिती दिली. त्यांनी ताब्यात घेऊन तपास सुरु केला तेव्हा काही तासांत पोलीस सदर महिलेपर्यंत पोहोचले. आरोपी मुलालाही अटक झाली. ही महिला म्हणजे सूटकेसची

मालकीण.. ती पोलीस ठाण्यात पोहोचली. पोलीस ठाण्यात सूटकेस उघडली गेली तेव्हा पोलीसही अवाक् झाले.

मात्र, ती सूटकेस स्वीकारायला तयार नव्हती. "हे माझं नाहीच, मला ठाऊक नाही." असाच अविर्भाव तीच्या देहबोलीत होता. जिथे सूटकेस स्वीकारायला तयार नाही तिथे ती महिला चोरी झाल्याची, वस्तु हरवल्याची तक्रार देणं शक्य नव्हतं. मग कसला गुन्हा? कसला आरोपी ? आणि कसला ऐवज?? म्हणजे मुद्देमाल जप्त, फिर्यादी आरोपी हजर मात्र चोरीची तक्रारच नाही. अशी अजब कथा सुरु होती.

"मालकीण बाई , अहो करा की स्वीकार " सूटकेस पुन्हा पुटपुटली.

तर यात होते बेहिशेबी वीस लाख रुपये आणि ज्वेलरी...

एकूण प्रकरणाच्या कच्च्या दुवामुळे पोलिसांची नियत फिरली. कपडे वगैरे चोरी गेल्याचे साधी तक्रार करण्याचं ठरवून हे पैसे गायब करण्याच जवळपास ठरलं होतं. मात्र काही अतृप्त आत्मे आणि वेळ यामुळे प्रकरण बाहेर आलेच.

दुसऱ्या दिवशी प्रमुख वर्तमानपत्र, चॅनल्सवर मथळे रंगले होते. त्याचा व्हायचा तो अपेक्षित परीणाम झाला. पोलीस अधिक्षकाकडून चौकश्या लागल्या. दोषारोप ठेवले गेले. अधिकारी घरी बसले. नियती पुन्हा एकदा हसली.

मी मात्र मुद्देमाल या नव्या नावाने स्टोअर रूम मधे जमा झाले.

श्रीमद भगवत गीतेत १४ व्या अध्याय १६ व्या श्लोकात म्हटल्याप्रमाणे,

कर्मणः सुकृतस्याहुः सात्त्विकं निर्मलं फलम्।
रजसस्तु फलं दुःखमज्ञानं तमसः फलम्।।

अर्थात सात्विक कर्माचे फळ सात्विक, निर्मळ, सुखमय, ज्ञानमय, वैराग्यमय असते. राजस कर्माचे फळ दुःख देणारे असते. तर तामस कर्माचे फळ अज्ञानच असते.

माणूस सर्व काही ठरवत असतो. ठरवलेलं चांगलंवाईट तडीस नेण्यासाठी सर्वप्रकारे प्रयत्न करतो. त्याला वाटतं या वाईट कृत्यात मला यशच मिळणार, मी जिंकणार, मी पचवणार परंतु या सर्वात त्याला विसर पडत असतो बुद्धीबळाच्या पटावर तो जिथे खेळायला बसला आहे. तिथे त्याच्या समोर प्रत्यक्षात नियतीच विराजमान असते. ती जिंकू देत नाही आणि आपण तीच्या इच्छेविरुद्ध जिंकूच शकत नाहीत.

# कोविड, वसईकर आणि भवितव्य - एक थॉट एक्सपेरीमेंट

## (प्रिपेअरींग इज बेटर दॅन रिपेअरींग)

■ **प्रकाश आल्मेडा, करियर गुरु** (मो. ८६००१७८८२५)

"करोना" या पूर्वी न ऐकलेल्या शब्दाने आपले जीवन कसे व्यापून करपवून टाकले होते याची आठवणही नकोशी होते. "व्हायरस" हा शब्द जगण्यातला रस गढूळ करतोय, प्रत्येकाच्या छातीत धडकी भरवितोय. जगातील कोणत्याही भाषकाला एकवेळ "गॉड" हा शब्द कळणार नाही पण "करोना, व्हायरस" हा शब्द नक्कीच कळतोय. संपूर्ण जगाला या करोनाने लॉकडाऊनमध्ये टाकून पिचून काढले, सगळे जग ओस पाडले! जगातल्या प्रत्येकाच्या जीवनावर राज्य करणारा आणि प्रत्येकाचे (अगदी पशू, पक्षी, किटक सगळयांचेच) जगणे बदलून टाकणारा हा करोना नवा सैतान आता सर्वपरिचित झाला आहे. कोविड ओसरत असल्याचे जाणवत असताना आणि पुन्हा जीवनाचा, जगण्याचा रहाटगाडा सुरू होत असताना ओमिक्रॉन विषाणूचे रुग्ण भारतात वाढत असल्याने सर्वत्र चिंतेचे वातावरण आहे आणि मुंबईत कलम १४४ काही काळासाठी लागूही करण्यात आले. भविष्यातही करोनाहून अधिक घातक विषाणूच्या संसर्गाच्या लाटा येतील असे भयकारी भविष्य वर्तविले जात आहे. त्यांची नवी रूपे (व्हेरिअंटस्) येताहेत त्यांच्या बातम्यांनी महासत्तांचाही थरकाप होतोय! हा लेख लिहीत असताना "पुन्हा लॉकडाऊन" होईल का हा प्रश्न आ वासून उभा आहे. "भय इथले संपत नाही" हेच जणू खरे आहे.

डोळयांना न दिसणारा एक विषाणू चीनमधील कुठल्यातरी वुहान प्रांतात अगदी रहस्यमयरित्या येतो काय आणि हा हा म्हणता जगभर पसरून ज्याला "तीन तेरा वाजविणे" म्हणतात तसे करतो काय,

अख्खं जगच "शट डाऊन" चिडीचूप होतं काय...! सर्वत्र टाळेबंदी होते काय, शहरे, गावे सगळं ठप्प होऊन ओस पडतं काय... काहीच कळलं नाही. सगळेच कसे अतर्क्य, अनाकलनीय! आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे अनिश्चिततेच्या खाईत लोटणारं! कोविडने शिकविलेला एक महत्वाचा धडा म्हणजे आपण खूप सुरक्षित आहोत असे समजणे यापुढे खचीतच धोक्याचे आहे, कदाचित मूर्खपणाचेही ठरणारे आहे. उद्या नव्हे आज, आत्ता या क्षणी टिव्हीवर, तुमच्या हातातल्या मोबाईलवर काय बातमी येईल आणि पळापळ सुरू होईल हे सांगता यायचं नाही. मॅनेजमेंटतज्ज्ञ याला आता जगण्याचा "न्यू नॉर्मल" असं म्हणतात. हा "न्यू नॉर्मल" जगणं किती ॲबनॉर्मल करतो याचा अनुभव काही पिढयांच्या लक्षात राहिल असाच आहे. आता म्हणूनच जगण्याचा "न्यू पॉसिबल" काय आहे, काय व कसा असू शकेल याचा भविष्यवेधी विचार करायला हवा. खरेतर करोनाने एक दणका आणखी दिला आहे तो म्हणजे भविष्य वर्तविण्याची आपली क्षमता अगदीच व्यर्थ ठरली आहे. व्यवस्थापनतज्ज्ञ याला "प्रेडिक्शन डिसेबिलीटी" असं म्हणतात. "लाइफ इज व्हॉट हॅपन्स टू अस व्हेन वुइ आर बिझी प्लानींग फॉर सो मेनी थिंग्जस्" असे जे म्हणतात त्याची प्रचिती आली आहे. त्यामुळे दीर्घकालीन योजना करण्याचे प्रयास अगदीच व्यर्थ ठरू शकतात. कालपरवापर्यंत सुखनैव नांदत असलेलं अमेरिकेसारख्या विकसीत देशातलं शहर काही तासात धडकलेल्या वादळानं असं काही उध्वस्त होऊ शकतं की त्याचे वर्णन करायला शब्दही नसावेत. स्मार्ट वगैरे झालेल्या शहरांचे उकिरडे व्हायला आता हिरोशिमा व्हायची गरज नाही. वसईत आपल्यालाही याचे अगदी अलिकडे पर्यावरणीय दणके बसले आहेत. सगळेच कसे अनिश्चिततेच्या कडयावर आहे. वसईतील एक विचारी लेखक सचिन मेंडिसने "वादळानंतरची शांतता" असा अंगावर काटा उभा करणारा लेख लिहीला होता त्याची येथे आठवण होतेय. वादळांचा कोणालाच अंदाज येत नाही हीच खरी मेख आहे. एकविसाव्या शतकातील प्रगतीचा बुरखा टराटरा फाटला आहे, पंख तुटलेल्या पक्ष्यासारखी केविलवाणी स्थिती आहे. हजारो अण्वस्त्रे, महासागरात लपविलेल्या त्या अजस्त्र विनाशकारी पाणबुडया, अक्राळविक्राळ विमानवाहू युद्धनौका, अवकाशातूनही मारा करू शकणारी अण्वस्त्रसज्ज भेसूर क्षेपणास्त्रे इत्यादींचा मतलब काय, कोणापासून कोणाची सुरक्षितता असा प्रश्न पडतो. शेवटी

करोनावर लस बनवायला जगाला एक व्हावे लागले. यातही नव्या मानवजातीला नवे आत्मभान देणारी नव्या अभ्युदयाची, नव्या शहाणपणाची एखाद्या “न्यू पॉसिबल”ची चाहूल असण्याचीही शक्यता आहे. तसे झाले तर करोनाची दिलेली किंमत सार्थकी लागल्यासारखे होईल. ज्यांचे बळी गेले ते मानवतेच्या स्वातंत्र्यलढयातील हुतात्मा ठरावेत.

सगळया जगाची दैना उडाली, अर्थव्यवस्था कोलमडल्या. अजूनही संकट टळलेले नाही, किती काळ आपल्याला करोना विषाणू बरोबर शांतीकरार करून जगण्याचा, जीवनाचा गाडा सूरू ठेवावा लागणार आहे ते अजून स्पष्ट नाही. मुळात या महामारीचे खरे स्वरूप अजूनही गोंधळास्पद आहे. तज्ज्ञांची विधाने परस्परविसंगत असल्याने गोंधळात नित्यनेमाने भर मात्र पडत आहे. त्यात चौथी लाट तर पाचवीही लाट येऊ घातलीय. यात भरीला “लाट नव्हे लाटा येतील” असं तज्ज्ञ बजावीत आहेत.

या महामारीने आपण खरोखर कसे आहोत याचेही दर्शन घडले. आर्थिकदृष्टया कमजोर असलेले, हातावर पोट असलेले, मोलमजूरी करणारे आरपार भरडून निघाले. शहरांकडून गावाकडे परत जाताना मजूरांचे झालेले अपार हाल सहजी विसरता येणारे नाहीत. हा देश स्थलांतरीतांचा देश आहे हे लक्षात आले. करोडो लोक परत दारिद्रयात ढकलले गेले. लोकांचे जीवन म्हणजे केवळ सरकारी कागदांवरील सांख्यिकीय आकडयापुरता उरले जणू. किती जणांचे बळी गेले याविषयीचा विश्वसनीय डेटा ‘डेटा ड्रिव्हन” अर्थव्यवस्था उभारू पहाणाऱ्या आपल्या देशात नाही हे वास्तव आहे. सगळीकडे एक मारक जाचक अविश्वसनीयतेचे मळभ दाटून आले आहे.

समाजातील विविध घटकांवर वेगवेगळे आघाती परिणाम झाले आहेत. स्त्रियांना या लॉकडाऊनच्या काळात अनेक समस्यांना सामोरे जावे लागले. अनेकांना “सुपर वाइफ, सुपर मॉम” व्हावे लागले. कामाच्या रगाडयात पिचावे लागले. “वर्क फ्रॉम होम” मुळे तर ताणतणाव वाढले. आर्थिक विवंचना, प्रायव्हसीचा अभाव, तोचतोचपणा, कामाचा रगाडा, त्यात घरची मंडळी, नवरा, मुले यांचे सगळे करता, स्वत:वर दुर्लक्ष करता, अनेक आघाडयावर झगडता तिचा जीव मेटाकुटीला आला आहे. यात आपण वंचित स्त्रियांचा विचार करीत नाहीत. या महामारीचा एक मोठा आघात झाला आहे

तो वयात येत असलेल्या मुलींवर. अनेक मुलीची लग्ने (बालविवाह म्हणावा) एवढया कमी वयात होत आहेत. आर्थिक विवंचना यामागे आहेत. मुलींचे पालक हताश आहेत. मुलींना, असहाय स्त्रीला नाहीतरी कोणी वाली नव्हताच; आता तर त्यांची दुर्दशा सुरू आहे. केंद्र सरकारने मुलींना वेश्याव्यवसायात ढकलण्याचे प्रकार वाढत असल्याचा राज्यांना इशारा दिला आहे मात्र फारशी कारवाई होताना दिसत नाही. आपण सगळ्यांची चिंता केली पण रोज स्वत:चा देह चिरडून पिचून घेणाऱ्या वेश्या व अशा दुर्दैवी स्त्रियांच्या दुर्दशेविषयी फार काही बोलले लिहीले गेले नाही. आपण किती चांगले, किती वाईट, किती ढोंगी, स्वार्थी बेदरकार, शोषण करणारे तकलादू आहोत हे या कोविड महामारीने आपल्यासमोर आरसा धरून दाखविले आहे. सरकारवर फारसे अवलंबून राहाण्यात शहाणपणा नाही असा समज दृढ होऊ लागला आहे जो लोकशाही व्यवस्थेसाठी पोषक नाही. मुळात संकट आले आणि कोसळले ते असे की ना कोणाला अनुभव होता, ना प्रशिक्षण, ना कसली तयारी. सगळंच हिमकडयासारखं कोसळलं.

“कोविड महामारी पाहिलेली पिढी” एवढयापुरता न राहाता त्यावर मात करून अशी आव्हाने आलीच तर मोडून पडणारी नव्हे तर योग्य धडे शिकून समर्थपणे तोंड देण्यासाठी सज्ज असलेली पिढी असे काही व्हायला हवे. यासाठीच आता या “न्यू नॉर्मल”मधून “न्यू पॉसिबल”कडे आता वाटचाल करावी लागणार आहे. वसईकरांनी या “न्यू नॉर्मल”साठी काय करायला हवे, या कोविडसारख्या संकटाला केवळ प्रतिक्रिया न देता साधकबाधक प्रतिसाद कसा देता येईल, अस्ताव्यस्त होणारी गाडी त्वरेने पुन्हा रूळावर कशी येईल, कमीत कमी हानी कशी होईल, पहिले, दुसरे, तिसरे काय व कसे करायचे याचे नियोजन करणे, विविध पर्याय तयार करणे याचा येथे विचार करू या. आपत्ती व्यवस्थापनात आपत्तींना तोंड कसे द्यायचे याविषयी काही तंत्रे वापरली जातात. त्यात संभाव्य धोक्यांचा वेध घेणे, त्यासाठी आधीच सावधपणे उपाययोजना सज्ज ठेवणे अशी हॅझर्ड मॅपींग, व्हल्नरेबिलीटी मॅपींग सारखी तंत्रे आहेत. समजा तज्ज्ञ सांगतात तसे काही (लाटा वगैरे) घडू लागले तर त्या सगळया अनिश्चिततेला तोंड देण्यासाठी आपल्याला कोठे; कशी व कोणती सज्जता ठेवावी लागेल याचा एक वैचारिक प्रयोगवजा प्रयत्न (थॉट

एक्सपरीमेंट) करू या. यात आपण आपल्या वसईपुरता विचार करू या. संभाव्य स्थिती किती वाईट होऊ शकते याविषयी ठामपणे ठोकताळे बांधता येणे शक्य नाही मात्र काही बाबीं विचारात घेता येतील व संभाव्य चित्र रंगवून त्याविषयी काय करता येईल याचा उपाययोजनात्मक सर्जनशिल विचार करता येईल. खरेतर वसईतील गावागावात, आळ्याआळ्यातून विशेषत: तरूणांनी "कोविडचे धडे, पुढचे चित्र व तयारी" याचा विचार करायला हवा. पुन्हा संकट उद्भवले तर काय करता येईल, एखादी युद्धजन्य स्थितीसाठी असते तशी उशीर न करता, असहाय न ठरता योग्य प्रतिसादासाठी काही तयारी करता येईल का, कोविडकाळात ज्या क्षमता व शक्तीस्थाने विकसीत झाली त्याचे काय करता येईल याचा विचार करता येईल. "प्रिपेअरींग इज बेटर दॅनं रिपेअरींग" हे तत्व उपयोगी ठरेल. आता यापुढे बेसावध सापडणे अक्षम्य आहे.

आता बऱ्यापैकी निर्बंध उठविण्यात आले आहेत. ओमिक्रॉनचे खरे स्वरूप व प्रताप कळायला वेळ लागेल, खरेतर हाच "तयारीचा, सज्ज होण्याचा काळ आहे." करोनाचे हे नवे रूप अवघ्या २२ दिवसात तब्बल ५८ देशांत प्रकट झाले आहे. परत अर्थव्यवस्था टाळेबंदीत अडकविणे कंबरडे मोडणारे ठरेल. सर्वतोपरी काळजी व सुरक्षात्मक उपाय करणे ओघाने आलेच. मात्र नेमके हेच आपण करीत नाहीत. कामासाठी तर बाहेर पडावे लागणार आहे. शाळा कॉलेजेस सुरू होत आहेत मात्र पालकांच्या मनात धाकधूक आहे. मुलांना संसर्ग झाला तर काय ही भीती आपल्या आरोग्य व्यवस्थेची याआधीची दुर्दशा लक्षात घेता रास्त आहे. शिक्षणाची गाडी परत ऑनलाईनच्या जंजाळात अडकून पडायची अनेकांना भीती वाटते. कधी नव्हता तेवढा शिक्षकवर्गावर ताण आहे. त्यांच्या समस्यांकडे या काळात बऱ्यापैकी दुर्लक्ष झालय. निवृत्तीच्या मार्गावर असलेल्यांच्या समस्या तर गहिऱ्या आहेत. शाळा कॉलेजेस पूर्ववत सुरू झाल्यावर तर त्यांना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागणार आहे कारण येणारी मुले पूर्वीप्रमाणेच विद्यार्थी नसणार आहेत तर लॉकडाऊनने पिचलेली, गांजलेली नव्या जडणघडणीच्या बदललेल्या व्यक्ती असणार आहेत. त्यांच्या हातातून जो मोबाईल काढण्यासाठी सगळे धडपडत होते तोच मोबाईल त्यांच्या हाती सोपविण्याची वेळ आली. अनेक मुले मोबाईलमुळे जणू 'इम्मोबाइल" झाली, मोबाईलच्या छोटया स्क्रीनवर गुरफटून

गेली. त्यांना आवरणे, सावरणे अवघड झाल्याचे चित्र आहे. मुलांना समज येण्याआधीच खूप स्वातंत्र्य मिळाले वा गमावावे लागले. शिक्षकांना समुपदेशकाच्या भूमिकेत जावे लागणार आहे. अनेक तणावग्रस्त विद्यार्थ्यांचे समुपदेशन करताना त्यांच्या अस्वस्थ भावविश्वाची स्थिती चिंताक्रांत करणारी होती. अनेकांना कुटुंबाची खरी आर्थिक स्थिती कळल्याने त्यातील अनिश्चिततेमुळे भविष्याविषयी फारशी आशाआकांक्षा वाटेनाशी झाली होती. अनेक विद्यार्थ्यांनी महत्वाकांक्षा, ध्येयेच सोडून दिल्याने त्यांना धीर देऊन पुन्हा प्रेरित करणे मोठे कठीण काम होते. शिक्षकांना आता या विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी, पुन्हा त्यांना स्वयंप्रेरित करून नव्याने अध्ययनक्षम करावे लागणार आहे. शिक्षकांना या सगळया नव्या भूमिकांचे ना प्रशिक्षण होते ना पूर्वानुभव पण करोनायोद्धे होऊन त्यांनी जमेल तो आटपीटा केला आहे त्यासाठी समाजाने, देशाने कृतज्ञ असायला हवे. करोनाकाळात अनेक शिक्षकांना समुपदेशकाची भूमिका बजावावी लागणार असल्याने समुपदेशन कौशल्याचे काही ऑनलाईनं प्रशिक्षण वर्ग घेताना शिक्षकांच्याही व्यथित करणाऱ्या समस्या दिसून आल्या. वसईत हजारोंच्या संख्येने शिक्षक आहेत. त्यांच्यावर प्रचंड ताण होते, शिकविण्याच्याच नव्हे तर घरगुती समस्या होत्या, प्रकृतीच्या समस्या होत्या. आजही तीच स्थिती आहे. त्यांनी स्वत:च्या आरोग्याकडे लक्ष द्यायला हवे. समुपदेशनाच्या माझ्या अनुभवानुसार मुलांचेच नव्हे तर आता पालकांचेही समुपदेशन गरजेचे झाले आहे. आता केवळ "प्रॉब्लेम चिल्ड्रनच नव्हे तर प्रॉब्लेम पेरेन्टस्" आहेत. त्यामुळे गुणकारी स्पर्शाची गरज सर्वत्र आहे. व्यावसायिक शिक्षणाच्या पदव्या घेतलेल्यांना अनेक ताणतणावांना सामोरे जावे लागत आहे, लागणार आहे. अर्थव्यवस्थेत काय चाललंय हे समजून घेण्याची मोठी गरज आहे. अशा अनेक बाबींचा वेध गावपातळीवरून घेता यईल का? वसईत असा एखादा थिंक टँक सूरू करता येईल का? आर्थिक साक्षरता (जी बहुतांशी वित्तीय स्वरूपाची असते) नव्हे तर समग्र अर्थव्यवस्थेविषयीची साक्षरता हवी. कोविड काळात मोठया संख्येने डॉक्टर्स, नर्सेस, आणि पोलीस यांचे बळी गेले. त्यांचीही कृतज्ञपणे आठवण करू या.

आज वसईतल्या अनेकांच्या नोकऱ्या गेल्या आहेत, अनेकांना आहे त्या रोजगाराची शाश्वती नाही; अनेकांना पुन्हा

कामावर बोलाविलेच गेले नाही, हॉटेल व पर्यटन व्यवसायात मोठया प्रमाणात वसईकर तरूण रोजगार मिळवितो. या क्षेत्रांनाच टाळे लागल्याने त्यांची मोठीच अडचण झाली. शीपवर गेलेले कसेबसे सुखरूप परतले. अनेकांचे लग्न समारंभ कसे झाले ते येथे सांगायलाच नको. विविध सोहळ्यांची वसईची एक मोठी अर्थव्यवस्था आहे. ती कोलमडून पडली. इस्टर, मे महिन्यातला उन्हाळा जाणवलाच नाही. चर्चने मोठया प्रयासाने त्याही परिस्थितीत लोकांचे आध्यात्मिक पोषण ऑनलाइन करण्याचा यथाशक्ती प्रयत्न केला. नशिब म्हणजे हातात मोबाईल होता आणि लोकांना संपर्कात राहाता येत होते. वसईत दररोज वाढणाऱ्या केसेस, पडणारे बळी भयावह होते. त्यातही अनेक लोक पुढे येऊन अडल्या नडलेल्यांना मदतीचा यथाशक्ती हात देऊन माणूसकीची उब टिकवून ठेवीत होते. यातून मोठया क्षमता निर्माण झाल्या, क्षमतांची जडणघडण झाली. याचवेळी कोणत्याही समाजाचे सामर्थ्य हे त्या समाजाकडे असलेल्या संसाधनसंपन्न संस्था व सक्षम व्यक्ती (उदा. उद्योजक, विविध क्षेत्रांतील उच्चपदस्थ व्यावसायिक) यांच्यातूनच येते हेही लक्षात आले. गावागावातील आपल्या ज्या विविध संघटना व संस्था आहेत त्यांच्या संघटीत शक्तीचे बळ किती महत्वाचे आहे हे स्पष्ट झाले आहे.

शिक्षण संपवून बाहेर पडलेल्यांपुढे आज अंधार आहे. अर्थव्यवस्था रिकव्हर व्हायला बऱ्यापैकी काळ जावा लागेल आणि त्यानंतर विकासवाढ होईल. तोवर एकूण वातावरणच मंदीग्रस्त, ओढग्रस्त असेल. अनेकजण मिळेल ते, सापडेल ते काम करायचा प्रयत्न केला. काहींनी नेटाने काही व्यवसाय सुरू करण्याचे प्रयत्न सुरू केले. प्रत्येक जण प्रत्येकाच्या दु:खाने ग्रस्त होता; आजही आहे आणि धडपडतो आहे. कालचे सुपात असलेले, सुस्थितीत असलेले अनेक जात्यात जाऊन भरडून आलेत. आजवर साथीचे रोग, महामारी आजवर आपण केवळ ऐकून, वाचून होतो. ना कसला अनुभव, प्रशिक्षण ना कसली तयारी. अशा वेळी या अभुतपूर्व परिस्थीतीतून आपण तावून सुलाखून बाहेर पडलो आहोत. मात्र जे उद्योग सुरू केले ते परत नोकरी सुरू झाल्याने बंद करून चाकरमानी झालेत की उद्योजकतेत आनंद व समाधान व विकासाच्या संधी साधण्यासाठी टिकून राहायचे ठरविले आहे हा अभ्यासाचा विषय ठरू शकेल. उद्योजकता म्हणजे सोयीसवडीने वा गरजेनुसार “हाफ प्रेग्नंट” राहाणे नव्हे.

आपल्या तरूणांमध्ये उद्योजकता वाढू लागली होती, जगण्याचे पर्यायी साधन विकसीत करण्याची जिद्द व उमेद दिसू लागली होती. नव्या पिढीची ही पालवी आता आहे की कोमेजली ते शोधावे लागेल. आपल्या बँकेने याविषयीचा एखादा अभ्यास करावा. काही करून ही उद्योजकता वाढविता, टिकविता येण्यासाठी काही संस्थात्मक प्रयत्न करता येईल का? या कोविडकाळात वसईतल्या स्थानिकांची बाजारपेठ कशी व किती आहे याचा अंदाज आला आहे. अनेकांनी कोविड काळात सुरू केलेले उद्योग आता बऱ्यापैकी वाढले आहेत. त्यांचा संघर्ष, त्यांनी शिकलेले धडे मोलाचे आहेत. कोविड काळात बहरलेली उद्यमशिलता हा एक सकारात्मक परिणाम होताच.

सर्वात महत्वाचे म्हणजे काहीही गृहित न धरता या आपत्तीला सामोरे जाणे. “मला आतापर्यंत काही झालेले नाही, करोना होऊनही गेला असेल, ॲंटीबॉडीज वगैरे तयार झालेल्या असतील, उगाच फालतू काळजी घेण्यात अर्थ नाही, माझी बॉडी स्टील बॉडी आहे”, इत्यादी भ्रमात राहाणे फार धोक्याचे ठरू शकते. या घडीला “जगात कशाविषयीही निगेटिव्ह व्हा, पण करोना पॉझिटीव्ह होऊ नका” हा संदेश महत्वाचा आहे. हॉस्पिटलात उपचारांचे बील किती असू शकते याविषयी सगळयांना ज्ञानप्राप्ती झाली आहे. सुदैवाने लसीकरणाची स्थिती समाधानकारक आहे. अर्थात सध्यातरी तोच मार्ग आहे. दोनही डोसच नव्हे तर बुस्टर डोस घेतलेल्यांनाही ओमिक्रॉनचा संसर्ग झाल्याच्या अस्वस्थ करणाऱ्या बातम्या असल्या तरीही लसीकरणात आपण सुस्थितीत आहोत. राहिली बाब म्हणजे बेसावध राहाणे सोडावे आणि जबाबदार नागरीक म्हणून मास्क घालणे, अंतर पाळणे, हात धुणे वगैरे आवश्यक त्या बाबींकडे लक्ष द्यायलाच हवे; नव्हे त्या सवयी लावायला हव्यात कारण तुमच्या बेपर्वाईची किंमत तुमच्या घरच्यांना व सभोवतालच्या इतरांना चुकवावी लागेल. लसीकरणाबद्दल हयगय करता कामा नये. “जान है तो जहान है” हे विसरता कामा नये. त्यामुळे स्वत:च्या जिवाला, आरोग्याला जपणे हे सर्वात आधी करायचे. टिकून राहाणे सर्वात महत्वाचे. “हेल्थ इज वेल्थ” हे कधी नव्हे तेवढे लक्षात आले आहे. (तसेच वेल्थ आणि हेल्थचाही संबंध बऱ्यापैकी लक्षात आला आहे.)

दुसरे म्हणजे आपले नाते संबंध जपायचे. नाती किती महत्वाची असतात हे

सगळयांच्याच लक्षात आले आहे. फेसबुकवर असतात ते केवळ “कॉनटॅक्ट्स’, ‘रिलेशन्स’ नव्हेत. फ्रेंडस् रिक्वेस्ट पाठवून झालेले, गुड मॉर्निंग ते गुड नाइट व चारदोन व्हिडीओ शेअर करण्यापर्यंत अनेक फ्रेंडस् आता फारसे उरलेले नाहीत हे लक्षात आले असेलच. या करोना काळात नात्यागोत्याची, मैत्रीचीही नव्याने ओळख व उजळणी झाली आहे, नात्यांची श्रीमंती कशी मोलाची असते ते लक्षात आले आहे. अर्थात सगळेच अडचणीत, तांणतणावात होते; अजूनही आहेत; सगळयाचीच परीक्षा सुरू होती; एकूण परिस्थितीच अभूतपूर्व होती हे लक्षात घ्यावं. आता यापुढे एकमेकांना सांभाळून घेत, जमेल ते सहाय्य करीत पुढे जायचे आहे. आज घराघरात ताणतणाव, रागाराग, जागाजमिनीवरून भांडणे वाढल्याचे काहिसे चित्र आहे. हा आपत्तीचा काळ आज ना उद्या जाणार आहे हे लक्षात ठेवावे. पुढे आपले आजचे वागणे दु:खद. लाजिरवाणे वाटू नये. आपली खरी कमाई बँकेतील रक्कम नसून तुमच्यासाठी कधीही मदतीला धावणारे तुमचे नातेसंबंधी आहेत. त्यांना जपायला हवे असे अनेक धडे घेतल्याचे अनेकांच्या बोलण्यातून जाणवले.

विवेकी दृष्टी या काळात महत्वाची आहे; विचारात व वागण्यात आवश्यक ते बदल करायला हवेत; अहंकार, ताठा वगैरे बाजूला ठेवून जुनी स्पर्धा वगैरे बाजूला ठेवून “संघर्षस्पर्धा नव्हे तर सहकार्य-“ असा विचार करायला हवा. पालकांनी मुलांनी आता कोविड येण्याआधी होते तसे व्हावे असा दुराग्रह करू नये, मुलांचे वर्तन पूर्ववत करण्याचा अटटाहास करू नये. मुलांचे केवळ शैक्षणिकच नव्हे तर शिकण्याच्या एकूण क्षमतेचेच नुकसान झाले आहे. अनेक मुलांना लिहिण्यावाचनाच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. सामाजिकरणाची हानी झाली आहे ती वेगळीच. नववीची मुले थेट बारावीत व बारावीची थेट पदवीच्या तिसऱ्या वर्षाला असा त्रांगडा प्रकार झाल्याने एकत्रित शिकताना होणारा व्यक्तिमत्व विकास खोळंबला आहे. त्यातून वर्तनाच्या, बोधनक्षमतेच्या समस्या निर्माण झाल्याचे भान पालकांनी ठेवायला हवे. मुलांच्या अभ्यासाविषयी लवचिक राहा. परीक्षांतील गुणांऐवजी शिकण्याच्या क्षमतांच्या विकासावर भर द्यायला हवा. यासाठी आपल्याकडील अनुभवी शिक्षकांनी व तज्ज्ञांनी मार्गदर्शन करायला हवे. मुलांच्या समस्या अस्वस्थ करणाऱ्या आहेत याचे भान ठेवून पालकांनी गांभीर्य

समजून घ्यायला हवे. मुलांनी मोबाईल वापरूच नये, सतत अभ्यास करावा, वाचन करीत राहावे वगैरे अतिअपेक्षा सद्यकाळात अविवेकी ठरू शकतील. कधी नव्हे तितकी आज विवेकी पालकत्वाची गरज आहे. घरातल्या वातावरणाचा, ओढाताणीचा आघाती परिणाम आपल्या मुलांवर होत आहे याचे भान पालकांनी ठेवायला हवे; अनेक मुलांच्या महत्वाकांक्षांना ओहोटी लागलीय, गरीबीमुळे धीर खचू लागलाय; या सगळया परिस्थितीचा वाईट परिणाम त्यांच्यावर होतोय, भविष्याच्या चिंतेने (उदा. बाबांची नोकरी गेली तर?) तेही भयभीत आहेत. मुलांना धीर देणे गरजेचे आहे. घर मजबूत असेल तर कोणत्याही वादळांना तोंड देता येईल. आईवडीलांनी स्वत:च्या आरोग्याला जपणे फार महत्वाचे आहे. गरजा कमी करणे, पैसे वाचविणे, योग्य आरोग्यविमा अग्रक्रमाणे घेणे, जंकफूड टाळणे, घरातील वातावरण सकारात्मक ठेवणे, मुलांसमोर सतत भविष्यातील समस्यांची व तुमच्यासमोरील अडचणींचा पाढा वाचत सतत चर्चा न करणे, अशा बाबी तर कॉमन सेन्सच्याच आहेत.

कोविडकाळ म्हणजे एका अर्थाने आपला सार्वत्रिक व संघटीत प्रशिक्षणाचा, सगळया जगण्याचीच नव्याने मांडणी करायचा, स्वत:चा नव्याने शोध घेण्याचा काळ होता जणू. “इटस ए टेरीबल आयडीया टू वेस्ट ए क्रायसिस लाइक कोविड” हा विचार महत्वाचा आहे. हा नव्या प्रारंभांचा काळ ठरू शकतो अशीही सकारात्मक विचारसरणी दिसून आली. आता नव्याने जगण्याचा प्रतिसाद द्यायचा आहे. तरूणांनी निराश, हताश न् होता आपत्तीत संधी (अपॉरच्युनिटी इन ॲडवरसिटी) शोधल्या. विपरीत काळातही संधी शोधल्यावर अनेकांना संधी सापडल्याही,. आपणही उद्योगासारखी संधी मिळवू शकतो, किमान धडपड करून कल्पनाही केल्या नाहीत, आजवर जाणवल्या नाहीत त्या क्षमता विकसीत करू शकतो, टिकून राहाण्यासाठी वेगळा विचार, वेगळी धडपड करू शकतो याचे नवी ऊर्जा व उर्मी देणारे हे भान आहे. कदाचित याहूनही विपरीत स्थिती ओढवली (हवामान बदलांमुळे हे असे वारंवार होऊ शकते असे इशारे शास्त्रज्ञ देत आहेत) तर हा कोविडकाळ जणू काही आपले पूर्वप्रशिक्षण आहे असे समजायला हवे. “कोविडकाळात मी काय शिकलो, काय मिळविले, काय जोडले, काय गमाविले?” अशा विषयांवर चर्चा, लेखन स्पर्धा व्हायला हव्यात. एकमेकांच्या

ज्ञानाचा फायदा घ्यायला हवा. कारण या संकटकाळात संधींचे दरवाजेही उघडले गेले, अनेकांनी शोधले आणि विस्तारले.

करोनाने निवांत वेळ दिल्याने अनेकांना स्वत:चे छंद जोपासता आले. उत्तम वाचन, स्वत:ची स्वत:शी निवांत गाठ पडल्याने मनन चिंतन करता आले. स्वत:च्या अस्तीत्वाविषयी, जगण्याविषयी, भविष्याविषयी तटस्थपणे विचार करता आला. अनेकांना धावपळीच्या जगण्यातून मिळालेला निवांतपणा खूप काही शिकवून शोध लावून देणारा ठरला. अनेकांनी नवी दिनचर्या मिळविली. अनेक जण व्यायामाकडे वळाले. नविन काही वाचन करू लागले, शिकू लागले. आई व बायको किती कष्ट करतात हे लक्षात आले. अनेकांनी स्वयंपाकघरात विविध प्रयोग केले. घरकाम करून स्ट्रेस कमी होतो हा शोधही लागला. बायकोला स्वयपाकात मदत करणे आणि एकत्र जेवणे किती आनंददायक असते हे ही लक्षात आले. माझे एक मित्र आहेत. एका बहुराष्ट्रीय कंपनीचा व्याप पहातात. त्यांनी प्रांजळपणे सांगीतले की ते घरी आता बायकोला मदत करतात आणि त्यात त्यांना खूप आनंद मिळतो. त्यांना आता खूप काही बनविता येतंय. त्यांनी जे सांगीतलं त्याची गंमत वाटली – “मी महत्वाच्या बाबींचा विचार भांडी धुताना करतो. लक्ष एकाग्र होतं. अनेक महत्वाचे निर्णय मी घरात भांडी धुताना, ब्रेकफास्ट तयार करताना घेतलेत!” स्वत:मध्ये आवश्यक तो विवेकी बदल करूनच या करोना काळाला तोंड देता येईल. पुढच्या पिढयांना आपण आज जे भोगतोय व उपभोगतोयही (निवांतपणा, स्वत:साठी वेळ, कमी प्रदूषण इत्यादी लाभ झाले ते वेगळेच.) हे सांगायला असेल. त्याच्या आठवणी जेवढया सुखद असतील ते उत्तमच. येणाऱ्या काळाविषयी आशावादी असायला हवे. भावनिक बुद्धीमत्ता महत्वाची आहे ती यासाठीच.

करोनाकाळात आपल्या जगण्याविषयीच्या गरजा नेमक्या काय व किती आहेत, महत्वाचे काय आहे याचे एक भान आपल्याला आले आहे. करोनाकाळात कोणी टिव्ही, एसी, फ्रिज, गाडया वगैरे खरेदी करीत नव्हते. विकत घेत होत्या त्या केवळ निव्वळ जीवनावश्यक वस्तू. अवघ्या काही हजारांतही जगता येते हे लक्षात आले होते. इतरांशी होणारी स्वत:ची व इतरांची तुलना थांबली होती. एवढया सगळया वस्तू कशासाठी जमविल्या हेही प्रश्न अनेकांना पडले होते.

या करोनाकाळाने प्रत्येक व्यक्तीला, प्रत्येक कुटुंबालाच काहीतरी शिकवण मिळाली आहे. त्याच्याच आधारे वसईकरांनी येऊ घातलेल्या भविष्याला कसे तोंड देता येईल हे पाहू या.

वसईकरांना कंपन्यांना प्रशिक्षण देताना सांगतो तेच "थ्री एस" हे धोरण सुचवित आहे. हे धोरण म्हणजे "व्हॉट टू स्टॉप, व्हॉट टू स्टार्ट- आणि व्हॉट टू अक्सेलरेट". "काय बंद करायचे थांबवायचे, काय सुरू करायचे आणि काय वाढवायचे" हे प्रत्येकाने ज्याचे त्याचे ठरवायला हवे तसेच कुटुंबाने एकत्रितरित्या ठरवावे लागेल. अगदी समाजालाही ठरवावे लागेल. आपण एकमेकांशी कसे जोडलेले, जुळलेले आहोत याचे भान आले आहेच. आपण प्रत्येक बाबीचा विचार करू या. सर्वात आधी "काय बंद करायचे, म्हणजे करणे थांबवायचे" याकडे येऊ या. "परिस्थितीनुसार बदला, बदलत्या परिस्थितीशी जूळवून घ्या, स्वत:मध्ये, भोवतालच्या परिस्थितीत शक्य ते सकारात्मक, पूरक बदल करा; आणि टिकण्याचा संघर्ष करा" हे व्यवस्थापनाचे तंत्र आता व्यक्तीला, कुटूंबांना व समाजाला व देशाला स्विकारावे लागेल. बदल सहजासहजी आपण स्विकारीत नाही; त्यासाठी मोठी वेदना वा संकट यावे लागते. सामर्थ्यशाली माणसानेही बदल केला नाही तर त्याचीही पडझड ठरलेलीच आहे. बळी तो कान पिळी हे तत्व आता नाही. "बदलेल तोच टिकेल" हे तत्व आहे. अर्थात हे बदलही वेळीच व्हायला हवे. नाहीतर डायनोसोर एवढे जबरदस्त मोठे व बलशाली होते मग ते का नष्ट झाले? कोविडने वसईकरांचे कधी नव्हे ती सामूहिक प्रशिक्षणाची संधी दिली आहे. या कोविडने वसईकरांच्या क्षमता (स्ट्रेन्थ्स) आणि कमजोरी (विकनेसेस) यांवर झगझगीत प्रकाश टाकला आहे. व्यवस्थापनात "स्वॉट ॲनालिसीस (स्ट्रेन्थ्स, विकनेसेस, अपॉरच्युनिटीस अँड थ्रेटस्) असे एक फ्रेमवर्क सद्य परिस्थितीचा व्यापक व खराखुरा आढावा घेऊन नियोजन करण्यासाठी वापरले जाते. असा आढावा घेऊन शासन व इतरांवर कमीतकमी अवलंबून राहून वसईतील प्रत्येक व्यक्तीने, कुटुंबाने, शेजोळाने, आळीने, गावाने, पॅरिशने 'वर्स्ट केस सिनारिओ' विचारात घेऊन कसा प्रतिसाद देता येईल याचा निदान एक क्रिएटिव्ह एक्सरसाइज म्हणून विचार करावा. येथे "नियोजन" हा शब्द महत्वाचा आहे. नव्याने कोविडसारखे संकट उद्भवल्यास

काय करता आले असते याचा विचार होऊ शकतो. असे एकदम सगळयांनी संघटीतरित्या असहाय होणे व समजणे खूप मारक ठरू शकते. स्ट्रेटेजिक डिफेन्समधले एक मार्गदर्शक तत्व असते ते म्हणजे “इटस् डेंजरस टू फिल टू सेफ. बी प्रिप्रड फॉर एनी एव्हेन्च्युएलिटी”. सुसज्ज राहाणे हेच शहाणपणाचे आहे.

वसईकरांना एक बाब या करोनासंकटाने प्रकर्षाने दाखवून दिली ती म्हणजे वसईकरांचे मुंबईवरील रोजीरोटीसाठी असलेले अवलंबित्व. मुंबई थांबली तर सगळंच थांबेल. वसईतल्या ज्या भागात शेती आहे ते अधिक चांगल्या प्रकारे टिकू शकतात. चुळणे गावासारख्या अर्धशहरी भागात जेथे शेती नाही तेथे अवलंबित्व मोठे आहे. निदान घरी खाण्यापुरता तरी पिकवू शकतात. कधीही शेतीवाडीत न् गेलेले शेतीकडे वळाले आणि चारदोन केळयांच्या लोंगरी विषयी व्हाटस्अ्रपवर “घरपोच डिलीव्हरी” असा मेसेज टाकू लागली. घरचा भाजीपाला विकायला उपलब्ध होऊ लागला. या सगळया प्रक्रियेतील परिवर्तनकारी सुक्ष्म बदल लक्षात घ्यायला हवा. आहे त्या परिस्थितीत चार पैसे कसे कमाविता येतील याच विशेषत: तरूणवर्गाने केलेला विचार) हे मोठेच संघटीत परिवर्तन आहे. जमेल तो उद्योग करणाऱ्या मुलांविषयी पालकांनाही अभिमान वाटून त्यांचाही सक्रिय सहभाग दिसू लागला. “उत्तम शेती, मध्यम व्यापार, कनिष्ठ नोकरी” याकडे परत अनेकांचे विचार वळले. आजवर बाहेरच्यांनी येऊन केलेले उद्योग आपण केले असते तर कदाचित मुंबईला न् जाताही बऱ्यापैकी (‘आपला पैसा आपल्याच लोकांकडे’ या तत्वाने) पैसा कमाविता येऊ शकतो याचेही भान आहे. वसईकरांची म्हणून एक प्रचंड मोठी काही शेकडो कोटींची बाजारपेठ आहेच. ख्रिस्ती, सामवेदी समाजाला समाजबांधवांच्या उद्योगाला हातभार लावण्यासाठी ती संघटीतरित्या उपलब्ध होऊ शकते. जमेल तो उद्योग करायला (अगदी घरपोच डिलीव्हरी करायलाही संकोच वाटेनासा झाला). कालपरवापर्यंत उद्योगव्यवसायाची भीती व लाज वाटणाऱ्या समाजात हे परिवर्तन नव्या बदलांची नांदी ठरू शकते. या काळात या उद्योजकीय चेतनेला अधिक जोपासण्यासाठी वसईतील बँका वा इतर संस्थांनी अपवादानेच प्रयत्न केले. वसईतील “बसीन कॅथॉलिक बिझनेस असोसिएशन’ (www.bcba.co.in)ने मात्र उद्योजकतेला प्रेरित करण्यासाठी

अनेक वेबिनार घेतले, आपल्या विद्यार्थ्यांना शालेय जीवनापासूनच एक करीअर म्हणून उद्योजकतेचे शिक्षण कसे देता येईल याविषयीही या वेबीनारमध्ये विचार झाला. आता समाज आर्थिकदृष्टया स्वतंत्र व संपन्न कसा होईल असे विचार व प्रवचने व्हायला हवीत. शेवटी जगण्याचा संघर्षच कळीचा ठरतो. समाजातील उद्योजक ही समाजाची मोठी ताकद असते हेही लक्षात आले आहे. म्हणून बीसीबीएप्रमाणे आपल्याकडील संस्थांनी उद्योजकतेसाठी पुढाकार घ्यायला हवा. निवृत्तीनंतर अनेकांना हाती पैसा असल्याने उद्योजकतेत "सेकंड करीअर'चा विचार करता येईल. निवृत्तीला दोनचार वर्षे असताना त्यादृष्टीने प्रशिक्षण व तयारी करता येईल. शोधल्या तर संधी मिळतातच; नव्या संधी निर्माणही करता येतात. (बाय द वे, ए बेस्ट वे टू सीक्यूअर युवर फ्युचर इज टू क्रिएट वन फॉर युवरसेल्फ" हे वाक्य येथे आठवले) समाजाला जगण्याविषयी अशी सर्जनशील नवदृष्टी मिळते तेव्हा ते अंकुर जोपासायचे असतात; कारण हे असे बदल वारंवार होत नाहीत.

शेवटी आर्थिक स्वातंत्र्य नसेल, स्वत:चे पैसे स्वत:च्या वकुबाने कमाविता येत नसतील तर या सार्वभौम, समाजवादी, लोकशाही प्रजासत्ताक भारतात खऱ्या अर्थाने कोणीही स्वतंत्र नाही, त्याला स्वातंत्र्य नाही याची जळजळीत जाणिव सगळयांना झाली. केवळ मुंबईत स्वत:चे ज्ञान व श्रम विकणारे होऊन वसईकरांना आर्थिक स्वातंत्र्य मिळणार नाही. उच्चशिक्षण घेऊनही नाही. मूळात शिक्षणावरच्या गुंतवणूकीतून खरोखरीच अपेक्षित रिटन्स मिळतीलच असे सांगता येत नाही अशी डिसरप्टीव्ह" स्थिती आहे. येथे विषय निघालाच आहे म्हणून करीअर काउन्सिलींगचा दोन दशकांचा अनुभव व अर्थशास्त्राचे ज्ञान डोळयांसमोर ठेवून "फ्युचर ऑफ वर्क" सारखे अभ्यास अहवाल विचारात घेऊन एक इशारा द्यावासा वाटतो की यापुढे वसईतील तरूणवर्गाला आर्थिक स्वातंत्र्यासाठी नोकऱ्यावर अवलंबून राहाणे धोक्याचे आहे. ही आकडेवारी पाहा: दहापैकी नऊ एमबीए व इंजिनिअर्सना नोकऱ्या नाहीत; चार पैकी तीन एमबीए तर अनएम्प्लॉएबल असतात, ८५ टक्के पदवीधर बेकार असतात, तंत्रज्ञानातील बदलांमुळे मोठया प्रमाणात नोकऱ्या जातील. ऑटोमेशनमुळे भारतात तब्बल ६० टक्के नोकऱ्या जातील. सरकारी कंपन्या व बँका खाजगीकरणाच्या दिशेने गेल्यावर तेथेही रोजगार घटेल (रिझर्वेशनमधून मिळणाऱ्या

संधी ओसरत जातील), कायम नोकरी असा प्रकार संपून जाईल... अशा बदलांचा वेध घेऊन भविष्याचे डोळस नियोजन करण्यासाठी विचार व्हायला हवा; होणाऱ्या बदलांच्या गदारोळात "अराइव्ह ए डे बिफोर" हे धोरण ठेवण्यासाठी जागृती व्हायला हवी ती होताना दिसत नाही. म्हणूनच वाटते की कोविडसारखी संकटे पुन्हा उद्भवली तर आपली दुर्दशा होईल, दाणादाण उडेल. मात्र मोठमोठे वृक्ष उन्मळून पडतील पण लव्हाळी जगतील आणि पुन्हा उभी राहातील.

यासाठी आपत्ती व्यवस्थापनाचे एक तंत्र वापरता येईल. क्रियेटिव्ह एक्सरसाइज म्हणून वसईतील प्रत्येक पॅरिशमधील युवक संघटनांनी सभोवतालच्या बदलत्या आर्थिक सामाजीक, राजकीय वगैरे परिस्थितीचा चिकीत्सक  वेध घ्यावा व आपत्ती व्यवस्थापनात करतात तसेच हॅझर्ड व व्हलनरेबिलीटी कोठे, काय, कशी व का आहे त्याचा वेध घ्यावा. हॅझर्डस् व व्हलनरेबिलीटी मॅपिंग करून जोखिम शोधणे (रिस्क आयडेटीफिकेशन), जोखिम कमी करणे (रिस्क मिटीगेशन) आणि एकूणच जोखिमीचे कमितकमी हानी होईल असे व्यवस्थापन (रिस्क मॅनेजमंट) करणे असे तंत्र वापरता येईल.

या काळात आपल्याकडे कोण, किती बेकार झाले, का झाले, पर्यायी व्यवस्था काय करता आली असती याचा विचार करता येईल. युवक संघटनांनी गावात उद्योगव्यवसायाच्या कोणत्या आर्थिक संधी आहेत (ज्या आपल्या पैशावर बाहेरच्या मंडळींनी ताब्यात घेतल्या आहेत) त्यांचा शोध घ्यावा (उदा, बेकऱ्या, विविध सेवा). हे उद्योग आपल्याकडेच राहिले तर काही कुटुंबांची सोय होईल. असे आपापल्या गावांचे बिझनेस मॅपींग करावे, इतर गावांतील आपल्या मंडळींकडून काय देताघेता येईल त्याचा विचार करावा. एकदाचे मार्केट दिसले की लोक गुंतवणूक करू लागतील. याकामी सोशल मिडीयाचा वापर करता येईल. बीसीबीएच्या वेबसाइटवर असे अनेक मार्गदर्शनपर व्हिडीओज आहेत त्याचा लाभ घ्यावा. चर्चमधून यासाठी पुढाकार घ्यायला हवा (उद्योगातही अध्यात्म आहेच). मग युवकांनी ई-कॉमर्सच्या मदतीने प्रायोगिक तत्वावर काही करता येईल का ते पाहावे. त्यासाठी आपल्याकडील प्रस्थापित उद्योजकांनी पुढे होऊन "उद्योगपिता" होऊन या नवयुवा उद्योजकांना मार्गदर्शन करावे. नवयुवा उद्योजक घडविण्याकडे जर युवक संघटना दुर्लक्ष करणार असतील तर त्यांचे नेमके  प्रयोजन काय असा प्रश्न चुकीचा ठरणार नाही. शेवटी आर्थिक प्रश्न

सुटले की अनेक प्रश्न सुटतात; मुळात अनेक प्रश्न (उदा. सामाजिक प्रश्न) हे आर्थिक प्रश्नांतूनच येतात. मग किती संधी होत्या ज्या आपण बाहेरच्यांना दिल्या (गावातील दुकांने, इत्यादी) याची यादी करावी. आज चारपाच हजारात वेबसाइट टाकून स्वत:चा ई-कॉमर्स व्यवसाय सुरू करता येऊ शकतो. यासाठी वसईकरांमध्ये, विशेषत: तरूणांमध्ये एक मुलभूत “कॉग्निटीव्ह शिफ्ट व आपल्या संस्थांमध्ये कॉग्निटीव्ह पॅराडाईम शिफ्ट” यायला हवी. याला उशीर म्हणजे समाज कमकुवत राहाण्यांची प्रक्रिया नेहमी प्रमाणेच सुरू राहाणे. परिवर्तन लादले जाण्याऐवजी वेळीच स्वत:हून पुढाकार घेऊन स्विकारणे, त्याचा लाभ घेणे हे उत्तमच.

कोविडकाळात वसई व वसईकरांचा प्रतिसाद याविषयावर आपल्या चर्चपासून सर्वत्र विचारमंथन व्हायला हवे. या कोविड संकटातून वसईकर (निदान ख्रिस्तीजन) काही शिकून उद्योजकतेकडे वळण्यासारखे काही सकारात्मक, रचनात्मक बदल करणार नसतील तर मोठीच संधी वाया गेली, नव्हे आपण आपल्याच हाताने गमाविली असे म्हणावे लागेल. वर म्हटल्याप्रमाणे इटस् ए टेरिबल आयडीया टू वेस्ट ए क्रायसिस! खरेच आहे ते. म्हणूनच, कोविडसारखा क्रूस परत वाटयाला आला तर दु:खसहन सुसह्य होण्यासाठी जागे व्हायला हवे, वेगळे विचार करायला हवे.

अनेक तरूणांनी हातातल्या मोबाईलमुळे “इम्मोबाइल” होऊन उमेदीचे काही महिने धडपणे काही न करता वाया घालविल्याचेही दिसून आले. त्यांना ऑनलाईन शेकडोंच्या संख्येने असलेले स्वत:चे मानवी ज्ञानकौशल्याचे भांडवल वाढविणारे अनेक विनामुल्य ई-लर्निंग कोर्सेस जे आजही आहेत आहेत ते करता आले असते. (उदा. www.nptl.ac.in, www.swayam..gov.in) आपण एक व्यक्ती आणि एक कुटुंब म्हणून तरी या कोविडकाळात काय मिळविले, गमाविले याचा विचार करू या. “सगळयांनीच गमाविले तर मी कशाला वेगळा विचार करू?” असे म्हणणे खचितच चुकीचे आहे. काय वाचले, वेचले, काय शिकले, काय विचार केला, कोणती नवी दिशा शोधली याचा आजही विचार करता येईल. इंटरनेटचा काय उपयोग केला त्याचा धांडोळा घ्यावा. असंख्य वेबसाइटसवर असंख्य विनामुल्य इबुक्स आहेत, करायचे ठरविले तर असंख्य पर्याय आहेत. बेपर्वा, बेजबाबदार, आळशी असाल तर तुम्हाला काहीही सापडणार नाही. शोधल्या तर संधी सापडतात यात काही नवे नाही. शोधायचे की काही घडायची वाट पाहात राहायचे?

हातात मोबाईल आल्याने अनेकजण (विशेषत: मुले) ‘इम्मोबाइल’ झाली आहेत. मोबाईलमध्ये हरवली आहेत. मोबाईल जणू त्यांच्या शरीराचाच एक अवयव झाला आहे. शिक्षणापासून लॉगऑफ होऊ लागल्याने पालकांनी स्वत: मोबाईल विसंबून न राहाता सक्रियरित्या शिकविण्यात सहभागी व्हावे. पालकांना याविषयी ऑनलाईनं कार्यशाळांमध्ये मार्गदर्शन करताना मुलांच्या शिक्षणाच्या समस्या मोठया आहेत हे लक्षात आले. ते नक्की इंटरनेटवर काय करतात त्याकडे बारकाईने लक्ष हवे. नको तेथे आततायीपणा व असंमजपणा नको. कामकाजासाठी पालक घराबाहेर पडले की शाळेत न जाणारी घरी असणारी मोबाईलसज्ज मुले हा मोठा चिंतेचा विषय आहे. मुलांना जपायला हवे. शाळा सुरू झाल्यावर मुलांच्या हातातील मोबाईल ही मोठीच कटकट होणार आहे.

एक महत्वाचा धडा आहे तो स्त्रियांसाठी. त्यांनी आर्थिकदृष्टया स्वावलंबी होणे किती महत्वाचे आहे हे या कोविड काळाने दाखवून दिले आहे. स्वावलंबी तोच स्वतंत्र हे खरेच आहे.

मानवजातीने अशा महामारीची संकटे अनेक सोसली आहेत आणि अजूनही टिकून आहे. “मानव तितुका एकच आहे” हे लक्षात घेऊन जगभरात करोनावर लस बनविण्यासाठी संशोधन सुरू झाले ते सगळया जगासाठी. आज ना उद्या सगळे निवळेल; आजचे जगणे आठवणीत जमा होईल; अधूममधून खपल्या निघत राहातील. मात्र जे धडे शिकलो असू ते मात्र सोबतीला असतील. नुकसान सगळयांचेच झाले आहे, होत आहे, होणार आहे. आपण सगळे एकाच बोटीत आहोत. अमेरिकेसारख्या विकसीत म्हणविल्या जाणाऱ्या देशांचा, प्रगत पाश्चिमात्य देशांचा माज कसा उतरला ते आपण पाहिले आहे. वसईकरांनी मुंबईला श्रम विकण्यापुरता राहू नये हा लेखाचा कळीचा मुद्दा आहे. जे इतिहास विसरतात त्यांचा भूगोल बदलतो असे जे म्हटले जाते ते समजून घेतले पाहिजे.

ख्रिस्त “शोधा म्हणजे सापडेल” हे जे म्हणतो ते आज मोलाचे आहे. कोविडकाळात स्वत:चा एक व्यक्ती व समाज म्हणून नव्याने शोध घेऊ या. भविष्यात काय वाढून ठेवले आहे याविषयी कोणालाच निश्चितपणे काहिच सांगता येणार नाही. आत्मविश्वासाने स्वत:च्या क्षमता वाढवित राहाण्याला, सज्ज राहाण्याला पर्याय नाही. कोविडने सावध केले आहेच. ख्रिस्तावरील श्रद्दा हा ख्रिस्ती श्रद्दावतांच्या सामर्थ्याचा स्त्रोत आहे. ख्रिसमसच्या शुभेच्छा.

# हम्पी सफरनामा

■ शेखर सदाशिव जोशी, नालासोपारा

भ्रमणध्वनी - 9923168955/7021934100

प्रवासात माणूस जुन्याचा नवा होतो. शहरातील रूक्ष आणि नीरस जीवनामुळे अरण्यातील आनंददायी आणि प्रसन्न वातावरणाची, त्यातील सौंदर्याची माहिती फारच थोड्या लोकांना असते. अरण्यातील वास्तव्याने मन विचारी बनते. भावना अधिक पवित्र होतात. - सुप्रसिद्ध वनाधिकारी आणि लेखक श्री. मारुती चितमपल्ली.

गेली दोन वर्ष आपण सर्वांनीच कशीबशी ढकलली. एक जिवाणू काय काय करू शकतो हे सर्व जगाने अनुभवले. कधीकधी बंधनं आपणच आपल्यावर घालून घेतलेली असतात, त्यामुळे ही बंधनं कधीतरी झुगारून टाकली पाहिजेत. ह्या लॉकडाऊन दरम्यान हंपी सिनेमा बघितला. मनोमन ठरवले हम्पीला जायचेच. तो योग लगेच जुळून आला. ऑक्टोबरमध्ये काही कामानिमित्त नाशिकला गेलो. आमचे परममित्र श्री. उज्वल पवार नेहमीच व्हिडिओ कॉल, फोनकॉल करत होते, “चल रे कुठेतरी जाऊन येऊ. ह्या pandemic मुळे कुठे बाहेर जायला मिळाले नाही.”

त्याला विचारले, “हम्पीला जाऊ या का?”

“काय आहे तिथे? कुठे आहे ते?”

त्याला म्हटले, “मला सुद्धा माहित नाही. फक्त इतकं माहीत आहे की रामकालीन नगरी आहे.”

त्याने लगेच होकार दिला मग गुगल सर्च. जवळचे स्टेशन कुठले, जवळचे एअरपोर्ट कुठले इ. नाशिकहुन जाणाऱ्या गाड्या, त्याच्यामध्ये सापडले होस्पेट स्टेशन. लगेच गाडी सर्च केली. शिर्डीवरुन निघणारी एकच गाडी होती आणि ती सुद्धा आज रात्री बारा वाजता. आता वाजले होते सकाळचे आठ. आयआरसीटीसी वेबसाईटवर लगेचच दोघांचे बुकींग करून टाकले. जिगरी दोस्त उज्ज्वल पवारला



ठरवली. हम्पी तेरा किलोमीटर. रुपये दोनशे होतील, म्हणाला. रस्त्यात त्याचा इंटरव्यू घेतला पवारांनी. पुढचे दोन दिवस लगेच त्याला ठरवून टाकले त्याला तोडके मोडके हिंदी येत होते. गुरु त्याचं नाव. पुढील दोन दिवस तोच आमचा गुरु आणि गाईड

तसा फोन केला. संध्याकाळी सात वाजता महामार्ग बसस्टँडवर भेटायचे ठरले. लगेच माझी तयारी केली. रात्री साडेनऊ वाजता शिर्डीला पोहोचलो. शिर्डी रेल्वे स्टेशन एकदम झकपक, इंटरनॅशनल. आमची आगिनगाडी तर एकदमच पॉश. आम्ही भारतातच प्रवास करत आहोत का इतपत वाटण्याजोगे. सर्व गाडी 'नीट अँड क्लीन'. गाडीला 3AC चे पाच डबे पण बुकिंग जास्त नसल्याकारणाने टीसीने आम्हाला एकाच बोगीमध्ये प्रवास करण्याची विनंती केली. बाकी चार डब्यांचे एसी बंद ठेवून त्यांनी सगळ्याच गोष्टींची बचत केली. खूपच बरे वाटले.

दुसऱ्या दिवशी दुपारी तीन वाजता होस्पेट येथे पोहोचलो. प्रवासात हॉटेल सर्च केले. त्यातल्या त्यात बनाना फार्म हाऊस बरे वाटले. बुक करून टाकले. रिक्षा

बनला. बनाना फार्म हाऊसचे मालक फारच चांगल्या स्वभावाचे. संपूर्ण कुटुंब येणाऱ्या जाणाऱ्यांची काळजी घेतात. श्री. आणि सौ. पाम्मपी. खूपच आदरातिथ्यशील सौ. पाम्मपी तर अन्नपूर्णा. पोहे, उपमा, डोसे, आप्पे, खाण्याची नुसती रेलचेल. जेवणात दोन भाज्या, वरणभात, सांबार, चटणी व कोशिंबीर. कशाची कमतरता नाही.

संध्याकाळी फ्रेश झालो आणि विरूपाक्ष मंदिरला पोहोचलो. पाऊस सुरू होता. खुपच छान परिसर. या मंदिराची खासियत म्हणजे इथली लक्ष्मी हत्तीण. तिच्या सोंडेमध्ये पैसे ठेवल्यावर ती ते माहुताला देते आणि आपल्या डोक्यावर हळुवार सोंड ठेवून आशीर्वाद देते. पावसामुळे लवकर रूमवर आलो.

दुसरा दिवस भरगच्च होता. सकाळी साडेपाच वाजता विरूपाक्ष मंदिरासमोरील टेकडीवर सूर्योदय बघण्यासाठी गेलो. सूर्योदयाचे दृश्य विलोभनीय. तिथून निघावे असे वाटतच नव्हते. नंतर खाली आलो. चहा नाश्ता बनाना फार्महाऊसवर केला.

सकाळी दहा वाजता विठ्ठल मंदिराकडे निघालो. युनेस्को प्रमाणित जागतिक वारसा. सगळ्यात पुरातन मंदिर. आठव्या किंवा नवव्या शतकातील खोदकाम तसेच कलाकृती आहेत असे जाणकार आणि इतिहासकार सांगतात. चालुक्य आणि ह्योसला या राजांच्या काळात ह्या मंदिराची निर्मिती झाली. दगडांवर सुंदर कोरीव काम आणि नक्षीकाम करण्यात आले. हे लक्षणीय मंदिर भारदस्त अशा मुख्य रस्त्यापासून पन्नास मीटर उंचीवर बांधण्यात आले आहे.



ह्या मंदिराचं अजून एक वैशिष्ट्य म्हणजे दर्शनी भागात असलेले ५६ खांब. एका खांबाला मारले असता सर्वांमधून संगीत निर्माण होते. त्यामुळे त्यांना म्युझिकल पिलर्स असे म्हणतात. मंदिराचे बांधकाम १५१३ साली सुरू करण्यात आले परंतु १५६५ मध्येच ते मोठ्या प्रमाणात मुघलांकडून उद्ध्वस्त करण्यात आले.

नंतर दुपारी चार वाजता पोहोचलो होस्पेट येथील होली क्रॉस चर्चला. याचं नाव पूर्वी बीडरॅम चर्च असे होते. चर्च ऑफ होली क्रॉस ऑफ होस्पेट हे नाव टिपू सुलतान याच्या मृत्यूनंतर म्हणजे १७९९ मध्ये प्रचलित झाले. या चर्चचे वैशिष्ट्य म्हणजे हे पहिले चर्च आहे जे क्रूसिफॉर्म शैलीमध्ये बांधले गेले आहे आणि गॉथिक शैलीचे आहे. जुन्या पद्धतीच्या चर्चचे नूतनीकरण फादर जेरोम पॉल कार्व्हालो यांनी १८६५ साली केले. हे चर्च साधारण

१७६१ मध्ये बांधण्यात आले असावे किंवा त्या अगोदर सुद्धा बांधले गेले असण्याची शक्यता आहे असे जाणकार सांगतात. होस्पेट हे जैन राजांची राजवट असलेले शहर होते. जैन संतसाहित्यामध्ये हे चर्च १६४८ च्या अगोदर बांधले गेले असावे असा उल्लेख सापडतो. टिपू सुलतान आणि मूडबिद्री संस्थानाचा चौथा राजा यांचे खूप सलोख्याचे मैत्री संबंध होते त्यामुळेच हे चर्च टिपू सुलतानाच्या नजरेतून सुटले नाहीतर त्याचे पण अवशेष शिल्लक राहिले नसते.

संध्याकाळी अंजनेरी टेकडीवर गेलो. इथे हनुमंताचा जन्म झाला आहे. अंजनी हनुमंताची आई. जागोजागी वानरांचे दर्शन होते. अंजनेरीवरून संपूर्ण हंपीचे दृश्य विलोभनीय.

तिसऱ्या दिवशी लवकरच तुंगभद्रा नदीवरील धरण बघण्यासाठी गेलो. खूपच सुंदर परिसर आहे. कर्नाटक सरकारने बाग-बगीचे खूप सुंदर ठेवले आहे. डोळ्याचे पारणे फिटते. तुंगभद्रा नदीवरील धरण हे डॉ. तिरुमलाई अय्यंगार यांनी १९५३ साली पूर्ण केले. आपण किती भाग्यवान आहोत की ही माऊली आपल्याला रोजचे पाणी पुरवते. संध्याकाळी तुंगभद्रा नदीचे बॅकवॉटर त्याला साना लेक असे नाव आहे तेथे पोहोचलो. तेथे कोरेकल राइड केले. खूप मजा आली. गोल थाळीसारख्या होड्या, त्यांना कोरेकल म्हणतात.

रात्री आम्ही व्हाया हुबळी परतीच्या प्रवासाला लागलो. अशी ही सुंदर सुहाना सफर नित्य नियमित आठवणीत राहणार.

एखादा उनाड दिवस असतो तसे ही आमची उनाड सफर. ना प्लॅनिंग, ना काही गाजावाजा. चला तर आपण पण बॅग भरू आणि निघू या. अशाच सफरीला.

---

सरळमार्गी जीवन जगताना
वाईट सवय पदरी नको
वळायचे कष्ट पडतील पण
एकाच दिशेने प्रवास नको

सुंदर 'फूल और कांटे' रक्तबंबाळ
एकाच झाडाची दोन अपत्ये आहेत
फुलांचं कुरवाळणं होत असतं
काटे बोचरे म्हणून वेगळे केलेले आहेत

# अभागिनी

■ बॅप्टिस्ट एम वाझ. दारसेंग, गोम्सआळी

शवपेटीत शांत पहुडलेले तीचे कलेवर पाहून "देवा फार बरं झालं, एकदाची सुटली ती" असेच शब्द माझ्या मनात उमटले. दहा दिवसांपूर्वीच रस्त्यावर वॉक घेतांना ती मला भेटली होती. समोर येताच मला पाहून ती हसली व म्हणाली "बंदवा कोहॉं हा?" मी तिच्यापेक्षा लहान असूनही ती मला नावाने हाक न देता बंधू या नावाने पुकारत असे. मळकी नायटी, विस्कटलेले केस, निस्तेज व त्रासलेला चेहरा या अवतारात ती मला दिसली.

लग्नाअगोदर ती माझ्या शेजारी राहत होती. मी पाचवीत असतांना म्हणजे साधारण ११-१२ वर्षांचा असताना तिचे लग्न झाले. त्यावेळी ती अवघ्या १९ वर्षांची होती. दोन बहिणी व दोन भावांमध्ये ही सर्वात मोठी. घरातील पहिले लग्न म्हणून त्या काळच्या रितीरिवाजानुसार तिचं लग्न थाटामाटात लावण्यात आले. त्यावेळी आजच्या सारखे डेकॉरेटर, कॅटरर, ब्यूटिशिअन व फोटोग्राफर असा प्रकार नव्हता.

देवळात लग्नाची पहिली घोषणा झाली की शेजोळ्यातील बायका रात्रीचं जेवण आटोपले की हिंदोळ्यावर बसून लग्नाची गाणी गात असत. रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्यांना ती गाणी ऐकून सदर घरात लग्न आहे याचा संदेश आपसूक मिळत असे. गावकऱ्यांना लग्नाचे खास भोजन लग्नाच्या आदल्या दिवशी दिले जात असे. हे भोजन नातेवाईक व गावातील लोक एकत्र येऊन हास्यविनोद करत व घुमटाच्या तालावर नाचत व गाणी गात बनवित असत. ते जेवण केळीच्या पानावर वाढल्याने त्याचा स्वाद काही आगळाच असे. वर व वधूला त्यांचे मित्र मैत्रिणी लग्नासाठी सजवित असत. तिच्याही लग्नात या सर्व प्रथा पाळण्यात आल्या होत्या. निरवणीच्या वेळेला 'खेम' म्हणजे अलिंगन देऊन साश्रू नयनाने तिला निरोप देण्यात आला.

तसं पाहिलं तर ती खूश होती. त्याला कारणही तसेच होते. मोठ्या खानदानी घरातील देखणा व रुबाबदार

मुलगा तिला पती म्हणून लाभला होता. वरातीत लोक बॅंडच्या तालावर नाचत होते. हास्यविनोदांनी सभोवतालचा माहोल आनंदीत झाला होता, परंतू तिचं तिथे लक्ष नव्हते. ती आपल्या मनात भावी संसाराचे स्वप्न रंगवत होती. पण तिला काय ठाऊक की नियतीने तिच्या समोर काय वाढून ठेवले आहे ते?

त्यांची वरात वाजत गाजत मांडवात आली. सासूने 'खेम' घेऊन तिला स्वत:च्या हाताने पेढा भरवला. तिचे तोंड गोड केले व हाताला धरून तिला घरात घेतले. ती पहिल्या रात्री तत्कालीन प्रथेनुसार सासूच्या कुशीत झोपून राहिली.

सकाळी सासूबरोबर ती लवकर उठली. प्रात:विधी आटोपल्यावर नास्ता करताना तिची नजर नवऱ्याच्या दर्शनासाठी भिरभिरत होती. परंतू तो तिच्या नजरेस पडला नाही. कामात व्यग्र असेल अशी स्वत:ची समजूत घालीत असताना मिनार आल्याचे नणंदेने सांगितले. तिने लगबगीने शालू निट केला आणी ओटीवर गेली व तेथे ठेवलेल्या पाटावर बसली. मिनारने सौभाग्याचे प्रतीक म्हणून तिच्या हातात हिरवा चूडा भरला त्यावेळी गावातील बायकांच्या गाण्यांना व चेष्टामस्करींना ऊत आला होता. जमलेल्या सवाष्ण बायकांनीही चूडा भरुन आपला आनंद व्यक्त केला. त्यानंतर गावातील बायकांनी तिला प्रेमाने आपापल्या घरी नेऊन तिचे आगत स्वागत केले व घरच्यांची ओळख करून दिली. तोपर्यंत सायंकाळ झाली. आज लग्नानंतरची पहिली सायंकाळ! आज तिला पतीसमवेत माहेरची माणसं मोठ्या सन्मानाने व वाजत गाजत माहेरी बोलावून नेणार होते. ती तयारीला लागली. तिचा पतीही तिची मस्करी करत तयारीला लागला. दूरवर घूमटचा आवाज व गाण्याचे स्वर कानावर पडताच तिचा चेहरा फुलला. हळूहळू गाण्याचे स्वर जवळ येऊ लागले तशी तिने हॉलमधल्या खिडकीतून मांडवात पाहिले. १५-२० तरुण मुलेमुली घुमटच्या तालावर नाचत गात मांडवात येत होती. थोडा वेळ नाचगाणी झाल्यावर व्यांही मंडळीचे आगतस्वागत करण्यात आले. नंतर उभयतांची तिच्या सासूसासऱ्यानी 'खेम' घेतली. मग ती आपल्या पतीसमवेत सजवलेल्या टांग्यात बसली. बाकीची मंडळी बैलगाडीत बसली. बैलगाडी वेशीवर आल्यावर दोन्ही बाजूच्या बांबूला बांधलेले तोरण तोडण्यात आले.

थोड्या वेळाने टांगा तीच्या माहेरच्या मांडवात पोहचताच शेजोळ्यातील व नातेवाईकातील उपस्थितांनी एकच कल्ला केला. त्यातील बायका पटापट हिंदोळ्यावर बसून नवरदेवाची मस्करी करणारी गाणी म्हणू लागल्या. त्यानेही खिलाडीवृत्तीने हसून त्या गीतांना दाद दिली. गंमतीशीर गाणी व थट्टामस्करी संपल्यानंतर ते दोघे ओटीवर आले व दरवाजात उभे राहिले. तीच्या आईवडिलानी खेम घेऊन त्यांना घरात घेतले. हळूहळू गावातील लोकं निघून गेली. आता फक्त ती दोघं आणि कुटूंबातील माणसे उरली. एकमेकांची विचारपूस झाल्यावर सगळे एकत्र जेवायला बसले. जेवताना तिने आपल्या पतीकडे पाहिले. पण त्याचे जेवणात लक्ष नसल्याचे तिच्या लक्षात आले. पण ती काही बोलली नाही. जेवण आटोपल्यावर ती दोघं हिंदोळ्यावर बसली. झोके घेता घेता गप्पा मारू लागले. अचानक त्यांनी झोके थांबवले व तिला म्हणाला “मला आता घरी गेले पाहिजे”. “अहो असं काय करता तुम्ही? तुमच्या झोपण्याची सोय वेगळ्या खोलीत केली आहे. तुम्ही आता येथून निघून गेल्यास ‘बयबाबांना’ वाईट वाटेल”. त्यावर तो बोलला “अगं तुला माहित आहे ना की आपला दुधाचा धंदा आहे. भूरी म्हैस माझ्याशिवाय कोणाला दूध काढून देत नाही. तू हे तुझ्या ‘बयबाबांना’ सांग” असे म्हणून तो उठला आणी सरळ चालत चालत त्याच्या घरी निघून गेला.

रात्रभर तिला झोप लागली नाही. ती या कुशीवरून त्या कुशीवर वळत होती. तिला आपल्या पतीचं वागणं थोडं विचित्र वाटू लागलं पण असतो एखाद्याचा स्वभाव असे समजून तीने तो विचार झटकून टाकला. सांयकाळी ती आपल्या लहान बंधूबरोबर सासरी परतली. आपल्या खोलीमध्ये हातातले सामान ठेवून आपला नवरा आजूबाजूला दिसतो का म्हणून तिने नजर फिरवली. पण तो तिला दिसला नाही. तिच्या सासूच्या हे लक्षात आले. त्या म्हणाल्या “बाबू आतेस बार गेलॅ, यॅदे लवकर”. येईल लवकर असं म्हणता म्हणता अंधार पडला, दिवेलागण झाली, जेवणखाणं भांडीकुंडी झाली तरी ह्यांचा पत्ता नव्हता. वाट बघून ती आपल्या खोलीत झोपायला गेली. तसं म्हटलं तर वास्तव अर्थाने लग्नानंतरची ती पहिली रात्र होती. पण या ‘सुहाग रात्रीच्यावेळी’ तीचा नवराच गायब झाला होता. तिला झोप लागत नव्हती. आपल्या पतीची वाट बघत ती या कुशीवरून त्या कुशीवर वळत होती. रात्रीचे दहा वाजले... अकरा वाजले... ती

घड्याळाकडे पाहत होती. पण ह्यांचा पत्ता नव्हता. शेवटी १२च्या सुमारास दरवाजावर टिकटिक झाली व तिने दरवाजा उघडला. समोर मद्यधुंद अवस्थेत तिचा नवरा उभा होता. त्या अवस्थेत पाहून ती हिरमुसली व पंलगावर जाऊन तिने अंग टाकले. तोही तिच्या बाजूला झोपला व काहीतरी असबंद्ध पुटपुटत तो झोपी गेला.

रात्री दोन वाजता घड्याळाचा गजर वाजला तशी तिला जाग आली. ती उठणार इतक्यात दरवाज्यावर टकटक झाली. तिने दरवाजा उघडला. समोर सासूबाई उभ्या होत्या. त्यांनी बाबूला म्हशीचे दुध काढायला उठविले. तसा त्यांचा दुग्धविक्रीचा पिढीजात धंदा. वडिलांचे अपघाताने अचानक निधन झाल्यामुळे दुध काढण्यापासून ते मुंबईला घेऊन जाण्यापर्यंतची कामे बाबूला करायला लागत असे. त्या रात्री पतीसमवेत तीही उठली. रात्री झोपतेवेळी तयार केलेली खुराकाची घमेली म्हशीपुढे ठेवली. सर्व म्हशीचे दुध काढेपर्यत व भांडी भरेपर्यंत तिने आपल्या पतीला मदत केली. दुधाची कावड घेऊन बाबू मुंबईला निघून गेला. तोपर्यंत रात्रीचे तीन वाजले होते. तिने पलंगावर अंग टाकले. थकल्यामुळे ती लगेच झोपी गेली.

सकाळ झाल्यावर ती उठली व कामाला जुंपली. गाईम्हशींना चारा देण्यापासून ते गोठ्यातले शेण गोळा करून ते खाणीत टाकेपर्यंत तिचा दिवस कसा भरायचा हे तिलाही कळत नसे. तसं पाहिलं तर तिच्या माहेरी गाईम्हशी असल्यामुळे व कामांची सवय असल्यामुळे तिला कामाचं काही वाटत नव्हतं. पण तिला एकच चिंता सतावत होती. ती म्हणजे तिच्या नवऱ्याचं दारुचे व्यसन! सकाळी सकाळी मुंबईतून परत येताना ताडीच्या गुत्त्यात जाऊन मनसोक्त ताडी पिवूनच तो घरी येत असे. घरी आल्यावर गाईम्हशीवर देखरेख झाली की जेवण घेई. त्यानंतर झोपी जात असे. दुपारी गाई म्हशीचे दुध काढून झाल्यावर सांयकाळी सामान आणण्याचे निमित्ताने बाजारात गेले की तेथून दारू पिऊन येत असे. रात्री दोन घास खाल्ले की असंबद्ध बडबड करीत झोपी जात असे. हा त्यांचा रोजचा नित्यक्रम होता. त्यामुळे तिला वैवाहिक सुखही मिळत नव्हते. पतीच्या अशा वागण्याला ती कंटाळली होती व त्याबाबत नवऱ्याला काही समजावायला गेल्यावर तो घाणेरड्या शिव्या देऊन तिला चूप बसवत असे. पुढे पुढे तो तिच्यावर हातही उगरायला लागला.

दिवसेंदिवस त्यांचे दारुचे व्यसन वाढत होते. त्यामुळे मुंबईत दुधाचा ‘खाडा’ होत असे. गिऱ्हाईक दुध वेळेवर मिळत नाही म्हणून तक्रार करू लागले. ती समजावायला गेली की तो तिला गुरासारखा बडवत असे. ती दुःखाने विव्हळत असे. गावातील लोक मजा बघत असत. त्यामुळे ती लाजेने अपमानीत होत असे.

दुधाचा वारंवार खाडा होऊ लागल्यामुळे बहुतेक गिऱ्हाईकांनी दुध घेणे बंद केले. मग त्यांनीही मुंबईला जाणे बंद केले व आजूबाजूच्या गावात कमीजास्त भावाने दुधविक्री करायला लागला. त्या पैशातून मित्रासमवेत बक्कल दारु पिऊ लागला व घरी आल्यावर हिंसक होऊन तिला मारायला लागला. आईला दया येत असे. ती त्याला म्हणत असे “ बाबू, तिला तू विनाकारण कादो मारता? तिने तुआ का केले? तुला फक्त दारु पेऑ नाका ओडास हांगिला ना?” हे ऐकल्यावर तो आईला देखील मारत असे.

पुढे दारु प्यायला पैसे कमी पडू लागले म्हणून त्यांनी एकेक म्हशी विकायला सुरवात केली. त्या विक्रीतून आलेले पैसे संपेर्यंत दारु, पार्ट्यांना ऊत येत असे. एव्हाना मित्रांचा गोतावळा वाढला होता. त्यातच त्याला जुगाराचाही नाद लागला. गोठ्यातील सगळ्या गाईम्हशी विकल्यामुळे गोठा रिकामा झाला. त्या रिकाम्या गोठ्याकडे पाहून तिचे अश्रू अनावर होत असत. मधल्या काळात सासूचेही निधन झाले. तिचा शेवटचा आधारही हरपला. आता मोठ्या घरात ती एकटी पडली.

गाईम्हशी विकल्यामुळे घरात पैसे येणे बंद झाले. मग ती आपल्या शेतात काम करु लागली. भाजीपाला वगैरे पिकवून बाजारात विकू लागली. त्यातून दैनंदिन उपजिविकेसाठी लागणारे सामान खरेदी करु लागली पण त्या पैशावर देखील त्याचा डोळा असायचा. दारु पिण्यासाठी तो तिच्याकडून बळजबरीने पैसे मागू लागला. पैसे न दिल्यास तो तिला लाथा बुक्क्यांनी मारु लागला.

वर्षे भराभर निघून जात होती. वय म्हातारपणाकडे झुकू लागले होते. शेतात काम करायला शरिरात ताकद उरली नव्हती. पण इलाज नव्हता. नवराच्या दारुसाठी व पोटापाण्यासाठी शेतात राबणे गरजेचे होते. तरीही स्वत:च्या शेतात राबायला तिला काही कमीपणा वाटत नव्हता. पण जुगाराच्या नादापायी त्याने एकेक शेत विकायला सुरवात केली. त्यातले पैसे संसारासाठी न वापरता स्वत:च्या व्यसनापोटी खर्च करु लागला. कालांतराने शेतंही विकून झाली, पैसेही संपले. मग एकेकाळी स्वत:च्या मालकीचे असलेल्या

शेतात तिला मजूर म्हणून राबावं लागलं. तोही अपमानाचा पेला तिने रिचवला. दिवसभर काबाडकष्ट करून मिळवलेले मजूरीचे पैसे ती घरात लपवत असे पण तेही पैसे शोधून तो स्वत:च्या घरात चोरी करु लागला. ते पैसे तो दारुच्या व्यसनात उडवीत असे व दारु पिऊन आल्यावर काहीतरी कारण काढून शिव्याशाप देऊन तिला बेदम मारत असे.

शेजाऱ्यापाजाऱ्यांना तिच्या या वेदना पाहवत नव्हत्या. पण त्याला जाब विचारण्याला सुद्धा तो शिव्याशाप देऊ लागला. त्यामुळे शेजारी कानाडोळा करु लागले. त्यातल्या काहींनी तिच्या भावांची भेट घेऊन या नरकातून तिची सुटका करण्याचे विनविले. भावांना देखील आपल्या ताईचे दु:ख पाहवले नाही. ते तिला माहेरी येण्यासाठी विनवत होते. तरीही ती आपल्या दारुड्या नवऱ्याला एकटं सोडून माहेरी यायला तयार नव्हती. त्यामुळे भावांचाही नाईलाज झाला.

आपल्या नवऱ्याचे दारुचे व्यसन सुटावे म्हणून तिने वैद्यापासून ते भगतबुवापर्यंत सगळे प्रयत्न केले पण तिला त्यात यश लाभले नाही. कालांतराने अतिमद्यपानामुळे त्याचे लिवर खराब झाले. वैद्यकीय उपचार करण्यात आले. डॉक्टरांनी, “दारु सोडली तरच हा जगेल” असे सांगितले तरीही त्याची दारु सुटली नाही आणी एकेदिवशी दारुच्या नशेतच त्यांनी जगाचा निरोप घेतला. नवऱ्याचे कलेवर स्मशानभुमीत नेताना तिने ‘धन्या’ म्हणून टाहो फोडला ते ऐकून साऱ्यांचे डोळे पाणावले. त्या ‘टाहो’मध्ये विरहाच्या वेदना होत्या की सुटकेचा निःश्वास होता हेच मला कळले नाही.

काळ कोणासाठी थांबत नसतो. तो आपला नित्यक्रमण करत असतो. तीही मोलमजूरी करुन आपला उदरनिर्वाह करीत होती. एक दिवस तिच्या पोटात दूखू लागले. वेदना असह्य झाल्यावर ती डॉक्टरकडे गेली. अनेक तपासण्या झाल्यावर कॅन्सर झाल्याचे निदान झाले. भावांच्या मदतीने कॅमोथेरपीसारखे उपचार करण्यात आले पण काही फायदा झाला नाही. प्रचंड वेदना सहन करुन तिने जगाचा निरोप घेतला. तिच्या प्रेतयात्रेत सहभागी होतांना या सर्व गोष्टी चलतचित्राप्रमाणे माझ्या मनपटलावर एकेक करत सरकू लागल्या व मनात विचार आला की देव एखाद्या व्यक्तीला दु:खच का देतो? देवालाही तिची दया आली नसेल का? तिला मुठमाती देतांना मातीसोबत माझे अश्रूही त्या मातीत मिसळले गेले. जणू मेल्यानंतरही अश्रू तिचे साथ सोडायला तयार नव्हते...!

# आज सोचा तो......

■ मॅक्सवेल लोपीस, नंदाखाल, वसई

साठ-सत्तरच्या दशकातील संगीतकारांमध्ये मदनमोहन नावाच्या अवलियाने जी यशाची उंची गाठलेली आहे, तशी उंची त्यांच्यासारख्या फारच कमी प्रयोगशील संगीतकारांना आजवर गाठता आलेली आहे. मदनमोहनच्या संगीताचे असे वेगळेपण तरी काय होते?..... संगीत सम्राट नौशादच्या संगीताप्रमाणे असंख्य रागरागिण्यांनी शृंगारलेले, तबला-सारंगी-सतारींच्या नादांनी दरबारी वलय निर्माण करणारे असे ते संगीत नव्हते; अथवा ओ.पी. नय्यरच्या संगीताप्रमाणे टांगा ऱ्हिदमवर चाललेले अल्लड, खट्याळ असे देखील ते नव्हते. शंकर-जयकिसनप्रमाणे भारतीय, लेबनिज, पाश्चात्त्य, ग्रेगोरियन अशा अनेक संगीतछटा त्यात दिसणार नाहीत; अथवा संगीतकार रवी प्रमाणे हरएक गीत साधे आणि सुंदर असेदेखील तिथे नाही. एस.डी. बर्मन, सलील चौधरी यांच्याप्रमाणे लोकसंगीताच्या चैतन्याने सळसळणारे हे संगीत नाही. गज़ल हे या संगीताचे खरे रूप असले तरीही त्यांच्या गज़लदेखील उस्ताद फैयाज़ खाँ, बेगम अख्तर अशा दिग्गजांच्या सहवासात रूजूनही आपली मुळ छाप न दाखवता गज़ल दुनियेत एक वेगळीच मुशाफिरी करतात. तर असे हे मदनमोहनचे संगीत आहे. निघून गेलेल्या दिवसांच्या भूतकाळरूपी पुस्तकाची सुवर्णपाने अलगदपणे उघडून दाखवणारे तत्त्वज्ञान!

कदाचित त्यामुळेच असेल, ज्यावेळी मदनजींचे सुपुत्र श्री. संजीवजी कोहली यांनी 'वीरझारा' सिनेमासाठी आपल्या वडीलांच्या तीस वर्षांपूर्वी बनविलेल्या काही रचना वापरल्या त्यावेळी गीतकार जावेद अख्तर यांना काव्य स्फुरले,

'ज़िन्दगी ले के आयी है, बीते दिनों की किताब

घेरे हैं, अब हमें, यादें बेहिसाब.....'

मुळात 'दिल ढुंढता है' या 'मौसम' चित्रपटातील गाजलेल्या गीतासाठी बनवण्यात आलेली ही धून 'तेरे लिए' या गीतासाठी वापरण्यात आली आणि ती देखील या चक्रवान जमान्यात अविस्मरणीय बनून राहिली. योगायोग असा की 'दिल ढुंढता है' हे गीत दीदींनीच गायलेले होते व तीस वर्षांनंतर 'तेरे लिये' गायले तेही दीदींनीच! हे दीदींचे भाग्य म्हणावे... मदनभय्यांसोबत असलेले त्यांचे ऋणानुबंध म्हणावेत.... का आम्हा संगीत रसिकांना मिळालेली अपूर्व पर्वणी म्हणावी!

वास्तविक आधी चाल की आधी गीत हा मुद्दा संगीतकारांत चर्चेचा विषय ठरलेला आहे. त्यात बहुसंख्य संगीतकारांनी आधी गीत मग चाल हा मुद्दा उचलून धरलेला आहे. त्यांच्यामते प्रत्येक गीतात एक चाल दडलेली असते, जी संगीतकारास शोधून काढायची असते. परंतु चालीला जन्म देण्याइतकी क्षमता जर गीतात असेल तर प्रकृतीच्या अनंत छटा ज्यामध्ये सामावलेल्या आहेत त्या संगीतात का ती क्षमता नाही?

मदनजींच्या वीरझारातील प्रत्येक रचना याच प्रश्नाचे उत्तर देतात. पटवून देतात की काव्यातील अभिव्यक्तीदेखील स्वरांत लपलेल्या असू शकतात व गुणी संगीतकारास त्या सुस्पष्टपणे दिसू शकतात.

मागे एकदा प्रवासात मी मदनजींचे 'वह कौन थी' चित्रपटातील 'नैना बरसे' हे गीत सलग दहा वेळा ऐकले होते. अर्थशास्त्रातील प्रो. मार्शलचा 'Law of diminishing marginal utility' सिद्धांत न जाणे कुठल्या कुठे गायब झालेला होता आणि त्या गाण्यात माझ्यासाठी असलेली Utility संपता संपत नव्हती. तसे या गीतात वरवर पाहता तोचतोचपणा! परंतु त्याच्या खोलात पाहता गवसणारे तत्त्व 'राजा मेहंदी अली खाँ' यांच्या प्रत्येक शब्दांना जिवंत करणारे,

'ये लाखो़ ग़म ये तनहाई, मुहब्बत की ये रुसवाई

कटी़ ऐसी कई रातें, ना तुम आये, ना मौत आयी.....'

त्यात संथ-जलद लयीची एक प्रकारची रस्सीखेच प्रचंड गुढता निर्माण करणारी! आपल्या अमृतवेल कादंबरीत एका प्रसंगात गुढतेचे वातावरण निर्माण करण्यासाठी या गीताचा वापर करून साहित्यराज वि. स. खांडेकरांनी वाचकांना कर्णसुखाचाच एक इफेक्ट दिलेला होता.

असेच 'मौसम' चित्रपटातील एक गीत. तारूण्यात छडीच्या एका गमतीदार प्रसंगात जुळून आलेले प्रेम, त्यानंतरचा प्रेमभंग, आयुष्यातील चढउतार आणि कधी काळी एकजीव झालेल्या दोन जीवांमध्ये निर्माण झालेली अबूज दरी! नंतर त्याच छडीने नायकाच्या मनात जागृत केलेली सद्सदविवेकबुद्धी आणि गमावलेल्या त्याच्या प्रेमाचा शोध__ असा हा पूर्ण घटनाक्रम चलतचित्राद्वारे आकर्षितपणे सादर करण्यात सर्वात मोठा वाटा होता तो याच गीताचा,

'छडी़ रे छडी़ कैसी गले मे पडी़, पैरों की बेडी़ कभी लगे हतकडी़'

'मेरा साया' चित्रपटातील पत्नीच्या वियोगात तडफडणाऱ्या पतीची व्यथा ज्या ताकदीने सुनील दत्तने सादर केलेली आहे, त्याला मदनजींच्या संगीताने पूर्णत्व दिलेले आहे. आप्तांच्या विरहाग्नीत जळणाऱ्या जीवांनी हे गीत ऐकावे आणि म्हणावे दु:ख देखील किती सुंदर आहे!

'जिंदगीने कर दिया जब भी उदास

आ गये घबराके हम मंजी़ल के पास.....'

असेच एक फारसे न गाजलेले परंतु पुरेपुर सृजनशीलतेचा वापर केलेले मदनजींचे आशाताईंच्या आवाजातील गीत म्हणजे, 'शौक नज़र की बिजलीयाँ, दिल पे मेरे गिराये जा' (वह कौन थी). बर्फातील स्कीइंगचा मनमुराद आनंद घेणारी सहनायिका, मनात भळभळणारी प्रेमभंगाची जखम, तरीही ते शल्य लपवून आपल्या प्रेमिकाला आनंदात पाहण्याची तिची धडपड; शिवाय चित्रपटातील गंभीरतेपासून प्रेक्षकांना काही वेळ बाहेर काढण्याची दिग्दर्शकाची तजवीज असा सर्व लपंडाव मदनजींच्या या गाण्याचे अक्षरशः जिंकला आहे.

प्रवाहात टिकण्यासाठी चित्रपटातील प्रसंगानुसार 'झुमका गीरा रे', 'गली गली मे किया रे बदनाम' अशी गाणी देखील मदनमोहननी दिली. मात्र मदनमोहनच्या संगीताची खरी ओळख दाखवतात ती गाणी म्हणजे लगजा गले, नैनो में बदरा छाये, आपकी नज़रोने समझा, रंग और नूर, रस्मे उल्फत, वो भूली दासता ही गाणी. त्यांच्या 'है इसीमे प्यार की आबरू' या गाण्यावर बोलताना तर नौशादजींनी अनेकदा म्हटले होते की माझ्या आयुष्याची सारी गाणी एका बाजूला आणि मदनजींचे हे गीत एकाबाजूला!

अशी किती गीते सांगावीत! आणि त्या गीतांच्या संगीत संयोजनावर भाष्य करावे तर मग शब्दाच्या मर्यादाच स्पष्ट दिसू लागतील.

सन १९४३ साली भारतील सैन्यदलात रूजू झालेला मदनमोहन कोहली नावाचा हा जवान 'कर चले हम फिदा' अशा सैन्यजीवनावर आधारित हृदयस्पर्शी गाण्याची रचना करतो यात नवल ते काय! परंतु हाच जवान अगदी जीवनाच्या अंतिम टप्प्यावर आयुष्याचे मुल्यमापन करण्याची वेळ येते तेव्हा एका हळव्या मनात उमटून येणारे जीवन तरंग देखील तितक्याच समर्थपणे संगीतबद्ध करतो. त्यात रहिस खान यांच्या दर्दभऱ्या सतारीची साथ! वाटत राहते की फ़नकाराने हृदयात उचंबळून आलेल्या कटू गोड स्मृतींचे निर्झर त्या सतारीला पाजले असावे. आणि मग पुन्हा मदनजींच्या संगीताला सर्वांथाने न्याय देणारा तो दीदींचा एकमेवाद्वितीय स्वर बाहेर पडतो. नव्हे, दीदींच्या स्वरात मदनजींच्या साऱ्या चाहत्यांच्या भावनाच सामावून गाऊ लागतात,

'आज सोचा तो आसूँ भर आये....

मुद्दते हो गयी, मुस्कूराये.....’

(लेखक नरसी मोनजी महाविद्यालयात वाणिज्य अध्यापक असून भारतीय संगीताचे अभ्यासक आहेत.)

# आनंद

■ एमेल आल्मेडा, चौकाळा.

हौसेला मोल नसते. आपल्याला आवडणारी आणि आनंद देणारी एखादी वस्तू आपल्याकडे असणे यासारखी दुसरी आनंददायी गोष्ट नाही. खुपशा गोष्टी आपण केवळ हौस भागवण्यासाठी आणतो. अनेक गोष्टी परिस्थितीमुळे व इतर जबाबदाऱ्यांमुळे घेणं राहून जातात. योग्य वेळी संधी मिळाल्यावर ह्या इच्छा ज्वालामुखीसारख्या अचानक वर येतात. खिशाला भूकंपाचे धक्के देतात परंतू सोबत आनंदाच्या त्सुनामीदेखील आणतात.

आपल्याकडे बुलेट असावी ही माझ्या मनातील सुप्त इच्छा कधीतरी बोलण्याच्या ओघात मी बायकोला बोलून गेलो. जवळ गरजेपुरती आवश्यक वाहने असताना आणखीन त्यात उगाच बुलेटची भर नको म्हणून मी ते घेण्याचे टाळत होतो. परंतु सध्या सौभाग्यवतीच्या मनातदेखील ह्या विचाराने उचल खाल्ली आहे. आता ते तीने तीच्या वैयक्तिक आनंदासाठी की मला आनंदी पाहण्यासाठी अथवा माझ्या आनंदात तिला आनंद मिळत असावा ह्यासाठी असावे! पण सारखा गाडी घेण्याबाबत तिने तगादा लावला आहे.

शेवटी मीही तयार झालो. थोडे माझ्याजवळचे, थोडे तिच्याजवळचे आणि उर्वरित रकमेची तजवीज कशाप्रकारे करता येईल ह्याचे नियोजन करुन आमचे एकदाचे गाडी घेण्याचे नक्की झाले.

ख्रिस्तराजाच्या सणाच्या दिवशी संध्याकाळी वेळ काढून आम्ही गाडी बुकिंग करण्यासाठी शोरूममध्ये पोहोचलो. तिकडे गेल्यानंतर आम्ही अनेक गाड्या बघितल्या. त्यातील आमच्या पसंतीला आलेल्या गाड्यांसोबत त्यांच्या परवानगीने फोटो काढले. जेव्हा गाडीचे कोटेशन घेतले तेव्हा आमचे बजेट आणि गाडीची प्रत्यक्ष किंमत यांच्यात बरीच तफावत आढळून येत होती. बायको म्हणाली एवढी महागडी गाडी आपल्याला घ्यायला नको आहे. शिवाय पैशाची अरेंजमेंटही होणं गरजेचं होतं. आम्ही बुकिंग करण्यासाठी नंतर येतो असे सांगून आम्ही शोरूममधून बाहेर पडलो.

नाही म्हटले तरी तीचे मन नाराज झाले होते. बायकोच्या नाराजीवर रामबाण उपाय म्हणजे खरेदी करणे. आम्ही कपड्यांच्या शोरूममध्ये गेलो आणि काही कपडे खरेदी केले. नाराजीच्या ह्या यज्ञात पाच हजार रूपयांच्या समिधा अर्पण करून उत्साहास धरलेली काजळी दूर करण्याचा आम्ही प्रयत्न केला. मी मनोमन खुश होतो कारण काही लाखांचा भुर्दंड पडणार होता पण ते केवळ पाच हजारांवर निभावले. लालमहालात 'जीवावर आलेले, बोटावर निभावले' हा इतिहासातील धडा आठवला. गाडीऐवजी आनंद घेऊन आम्ही घरी आलो होतो.

परंतु हा निव्वळ माझा गैरसमज होता. मला माहीत नव्हते की ही वादळापूर्वीची शांतता आहे. दोन दिवसात दुखरे वारे आणि मतलबी वारे ह्यांची सरमिसळ झाली आणि परत एकदा काळ्या रंगाची बुलेट घेण्याचे काळे ढग तीच्या मनात दाटले. गाडीकरिता येणारी आर्थिक अडचण सोडविण्यासाठी तिने बँकेचा फायनान्स घ्यायचा पर्यायही शोधून ठेवला होता.

आगमन काळाला सुरुवात झाली होती. आमच्या मनात एक वेगळाच आनंद भरून उरला होता. आम्ही शनिवारी संध्याकाळी शोरूममध्ये पोहोचलो. अगोदरच्या आठवड्यात सगळी बोलणी झाल्यामुळे आज विशेष अशी काही चौकशी करायची नव्हती. आम्हाला हवा असलेला गाडीचा रंग पसंत केला आणि मग गाडी बुकिंगच्या फॉरमॅलिटीज सुरू झाल्या. मी सेल्स एक्झिक्युटिव्ह बरोबर बोलत होतो. मी बायकोकडे बघितलं तर ती गाडीकडे एकटक बघत आहे असं मला वाटलं. मी तिला याबाबत विचारलं तर तिने मला बोट करून काचेच्या पलीकडे बाहेर झाडाखाली उभे असलेले एक कुटुंब दाखवले.

मी टेस्ट राईड घेण्यासाठी शोरूमच्या बाहेर येत होतो. ती मला म्हणाली ते कुटुंब अडचणीत दिसत आहे. आपण जाऊन त्यांना काही मदत हवी आहे का ते विचारु या का? मी म्हटलं, जरा थांब. तुझ्यातील सोशल वर्कर इतक्यात जागा होऊ देऊ नकोस. मी टेस्ट राइड करून येतो आणि मग काय ते बघूया.

मी गाडीवर बसणार इतक्यात त्या व्यक्तीने मला हाक मारली 'दादा'. त्याला म्हटले दोन मिनिट थांब, मी येतो इतक्यात. तीनशे मीटरचा फेरफटका मारून मी दोनतीन मिनिटांत परत माघारी आलो पण ह्या तीन मिनिटांत माझ्या कानात त्याची

आर्त हाक होती, 'दादा'. गाडी स्टँडला लावून मी त्यांच्याकडे गेलो. पस्तीस वर्षांचा तो, तीशीतील त्याची बायको आणि चार वर्षांचा लहान मुलगा असा परीवार होता. त्याचा चेहरा ओशाळला होता, बायकोच्या चेहऱ्यावर चिंता होती आणि मुलाच्या चेहऱ्यावर मलूलता स्पष्टपणे दिसत होती. तिघेही थकलेले व भुकेले जाणवत होते.

मी त्याला अडचण विचारली. हा औरंगाबादचा, वसई ईस्टला ह्याचा कोणतरी गाववाला नोकरीला आहे. त्याच्याच ओळखीने ह्याला नोकरी मिळणार होती. राहण्यासाठी त्याची खोली होती म्हणून हा सहकुटुंब अवतरला होता आणि नेमकी ती व्यक्ती कंपनीच्या कामानिमित्त गुजरातला गेली होती. त्याचा फोन लागत नव्हता आणि हा संपूर्ण दिवस परेशान होता. जवळचे पैसे संपले होते. समोर रात्र होती. रात्र कशी व कुठे काढावी हा प्रश्न होता. परतीचा प्रवास सुरू करायचा तर खिशात एक छदामही नव्हता.

मी त्याला माझ्या घरी चला, रात्र काढा व उद्या प्रवासाला निघा असा प्रस्ताव दिला. पण त्यांना ते उचित वाटले नसावे. अनोळखी ठिकाणी अज्ञात व्यक्तीवर भरवसा कसा ठेवावा ही त्यांची शंका मला रास्त वाटली.

‘तुम्हाला किती पैसे हवे आहेत?’ माझ्या सरळ प्रश्नाने तो किंचितसा गोंधळला. त्याने परतीच्या प्रवासाचा हिशोब करुन मला आकडा सांगितला. मी क्षणाचाही विलंब न करता त्याने मागितलेल्या रकमेच्या पेक्षा दुप्पट पैसे त्याच्या हातात ठेवले जेणेकरून प्रवासात त्यांच्या खाण्यपिण्याच्या गरजाही पुर्ण व्हाव्यात. त्याने त्याच्या सत्यतेचा पुरावा म्हणून मला त्याचे आधार कार्ड व पॅन कार्ड दाखवले. मी म्हटले, “मला पुराव्याची गरज नाही. तुमच्या चेहऱ्यावरच्या निरागसतेवर माझा विश्वास आहे.” आम्ही मोबाईल नंबर एक्सचेंज केले. आम्ही त्यांना प्रवासासाठी शुभेच्छा देऊन शोरुममध्ये गेलो. गाडी बुकींगचे सोपस्कार पार पाडले.

परतीच्या प्रवासात बायको बोलली, आज मन एक वेगळाच आनंद अनुभवत आहे. मलादेखील हर्षभरीत समाधानाची अनुभूती होत होती. मनात विचार सुरु होते. दोन हजार वर्षापूर्वी ते दोघेही असेच हताशपणे विनवणी करत होते. आधार आणि आसरा शोधत होते. त्या कडाक्याच्या थंडीत त्यांना गोठ्यात प्रवेश मिळाला आणि जगाला आनंदाचे कारण सापडले.

# माझा IISc (भारतीय विज्ञान संस्था) चा प्रवास

■ सिद्धेश नाईक, गास

अन्न, वस्त्र आणि निवारा या माणसाच्या मूलभूत गरजा आहेत. बदलत्या काळानुसार त्यात शिक्षण आणि आरोग्य याची भर पडली आहे आणि ते यथोचितच आहे. पैकी शिक्षणाबद्दल बोलायचे झाले तर ते का घ्यावे आणि त्याचे फायदे काय याबाबत आता समाजात खूपच जागरूकता आली आहे. परंतु तरीही शालेय शिक्षणानंतर असलेले पर्याय आणि संधी याबाबत अजूनही म्हणावी तशी समज आली आहे असे म्हणता येणार नाही. उच्च शिक्षणातील माझे अनुभव कथन करत असताना मला याबाबतीत थोडेफार मार्गदर्शन करता येईल अशी मी आशा बाळगतो.

लवकरात लवकर पदवी प्राप्त करून कुठेतरी नोकरी पकडावी, मग लग्न, मुले आणि संसार असे स्थिर व्हावे, या जगण्याच्या एका ठराविक ढाच्यात आपण सर्वच जण वाढलेलो आहोत. परंतु फक्त नोकरीसाठी, परीक्षेसाठी अभ्यास का करावा? माणसाने आजवर जी प्रगती केली, त्यासाठी केवळ आणि केवळ माणसाची ज्ञानपिपासूवृत्तीच कारणीभूत आहे. अधिकाधिक ज्ञान प्राप्त करून या जीवनाचे कोडे सोडवायची पराकाष्ठा हा मनुष्यप्राणी सदैव करीत असतो, मग यात आपले योगदान काय असेल? असे बरेच प्रश्न लहानपणी डोक्यात घोळत राहायचे. सर्वांना अवघड वाटणाऱ्या गणित विषयात बऱ्यापैकी गती असल्याने यातच काहीतरी योगदान असावे असे नेहमी वाटे, परंतु म्हणजे नक्की काय याबाबतीत स्पष्टता नव्हती. त्यातही फक्त गणित विषयासाठी असणारे अभ्यासक्रम नगण्य होते. त्यातल्या त्यात अभियांत्रिकी अभ्यासक्रमात आपल्याला हवे ते गणित शिकता येईल या भ्रमात मेकॅनिकल इंजिनीअरिंगसाठी प्रवेश घेतला. पण अभ्यास करता करता लवकरच लक्षात आले की शालेय गणित (School Maths), स्पर्धा परीक्षा गणित (Competitive Maths), ऑलिम्पियाड गणित (Olympiad Maths), उपयोजित गणित (Applied Maths), शुद्ध गणित (Pure

Maths), मनोरंजन गणित (Recreational Maths) असे गणिताचे विविध प्रकार आहेत आणि अभियांत्रिकीमध्ये उपयोजित गणित वापरले जाते. अशा गणितात संशोधनासाठी वाव तुलनात्मकरित्या कमी असतो. तरीसुद्धा गणित चांगले असल्याने अभियांत्रिकीचा अभ्यास करताना काहीही अडचण जाणवली नाही. एकंदरीतच नोकरीसाठी किंवा परीक्षांसाठी अभ्यास कधी केलाच नाही त्यामुळे पुढे उच्च शिक्षण घ्यायचे हे मनाशी पक्के होते, नाही म्हणायला TCS मध्ये तशी संधी होती सुद्धा. परंतु अजून शिकायचे आहे या इच्छेमुळे त्याकडे जास्त लक्ष दिले नाही.

पदवी करतानाच लक्षात आले की पदवीनंतर उच्च शिक्षणासाठी भरपूर पर्याय आहेत. आपल्याच क्षेत्रात आपण मास्टर्स पदवी घेऊ शकतो. त्यातही भारतातच किंवा विदेशात असे पर्याय आहेत. विदेशात शिक्षणासाठी आपल्याला पदवीच्या शिक्षणातील कामगिरी व्यतिरिक्त एखाद्या नावाजलेल्या प्राध्यापकांची शिफारस, आपले स्वतःचे Statement of Purpose (SoP), GRE, TOEFL परीक्षा या गोष्टींची गरज पडते. भारतातच करायचे म्हटले तर तांत्रिक क्षेत्रात आयआयटी, भारतीय विज्ञान संस्था (IISc), TIFR असे बरेच उत्तम पर्याय आहेत. ज्यात अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रवेश मुख्यतः GATE या परीक्षेतून घेतला जातो. विज्ञान शाखेतील विद्यार्थी JAM ही परीक्षा देऊ शकतात. आपल्या पदवीच्या शाखेव्यतिरिक्त उच्च शिक्षण घ्यायचे असेल, उदा व्यवस्थापन (Management) तर IIMs हा भारतातील सर्वोच्च पर्याय आहे ज्यासाठी आपल्याला CAT ही परिक्षा द्यावी लागते. माझा कल भारतात राहूनच माझ्या विषयातच अभ्यास करण्याचा असल्याने येथेच उच्च शिक्षण घ्यावे असे मनाशी पक्के होते. त्यादृष्टीने अभियांत्रिकीच्या तिसऱ्या वर्षातच GATE परीक्षा दिली, ज्यात उत्तम यश मिळाले आणि आयआयटी, IISc ची दारे खुली झाली. GATE या परीक्षेच्या तयारीसाठी इंजिनीअरिंगच्या सर्वच वर्षांच्या अभ्यासाची गरज पडते. त्यामुळे सुरुवातीपासूनचा, केवळ परीक्षांसाठी अभ्यास नाही, हा दृष्टिकोन कामी आला, वेगळा अभ्यास करावा लागला नाही.

यात एक किस्सा सांगावासा वाटतो. अभियांत्रिकीच्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षा होत्या आणि आयआयटी खरगपूरचा कौन्सिलिंगचा दिवस दोन परीक्षांच्या एकदम मधोमध पडत होता. त्यावेळेस

ऑनलाईन कौन्सिलिंग नसल्याने प्रत्यक्ष जाऊन प्रवेश घेणे गरजेचे होते. २४ आणि २६ ला इकडे परीक्षा आणि २५ ला तिकडे कौन्सिलिंग असा पेच होता. त्यामुळे तातडीने आयुष्यातला पहिला विमान प्रवास करून २५ तारखेला तेथे जावे लागले. कौन्सिलिंगची वेळ जवळ येत नव्हती पण परतीच्या विमानाची वेळ जवळ येत होती त्यामुळे हा सर्व उपद्व्याप व्यर्थ जातो की काय असे वाटायला लागले. पण ऐन वेळेस तिकडे ॲडमिशन झाले आणि वेळेत विमान पकडुन दुसऱ्या दिवशी परीक्षा देता आली. आता त्या गोष्टीची आठवण झाली की अंगावर काटा येतो, कारण जर विमान चुकले असते तर परीक्षाही चुकली असती आणि मग घोळ झाला असता. पण एवढा सगळा ताप घेऊन तिथे जॉईन केलेच नाही, कारण नंतर IISc मध्ये मेकॅनिकल, गणित, एरोस्पेस तिन्हिकडे प्रवेश मिळाला होता. सांगण्याचा उद्देश असा की असा धोका पुन्हा कोणी पत्करू नये.

IISc मध्ये जायचा दिवस जवळ आला पण आदल्या दिवशीच माझ्या आजोबांचे निधन झाले ज्यामुळे आनंदावर एक दु:खद छटा होती. पण त्यातल्या त्यात बंगलोरला जाण्याआधी आई वडिलांसोबत त्यांचाही आशीर्वाद मिळाला ह्याचेच तेवढे समाधान.

IISc मध्ये गणित विभागात Integrated PhD ची संधी होती पण त्यासाठी तब्बल ७ वर्षे खर्च करण्याची तेव्हा मनस्थिती नव्हती. इंजिनीअरिंगमध्ये IISc त मास्टर्स कोर्सेस मध्ये सुद्धा पर्याय आहेत. जसे की संशोधन आधारित लवचिक मास्टर्स डिग्री (MSc Engg) ज्यात २-३ वर्षांचा वेळ आपल्याला मिळू शकतो, नियोजित कोर्स आधारित साचेबद्ध मास्टर्स डिग्री (M.E.) ज्यात २ वर्षाचे वेळेचे बंधन असते. संशोधनात आवड असल्याने मी मेकॅनिकल मध्येच MSc Engg घेतले होते. दोन्ही प्रकारच्या डिग्रीमध्ये पहिल्या वर्षी काही सामायिक कोर्सेस बंधनकारक असतात. दुसऱ्या वर्षापासून तुम्ही निवडलेल्या संशोधन विषयाप्रमाणे कुठल्याही विभागात तुम्ही कोर्स करू शकता जसे की मेकॅनिकल विभागात असूनही जर तुमच्या संशोधनात जैवतंत्रज्ञानाची गरज पडली तर जीवशास्त्र विभागातही तत्सम कोर्स करू शकता. माझ्या विषयात गणिताची गरज पडत असल्याने मी गणित विभागातील कोर्स घेतला होता.

संशोधन करताना त्याचे तीन मूळ प्रकार माझ्या लक्षात आले ते असे, सैद्धांतिक संशोधन (theoretical research), प्रयोगाधारीत संशोधन (Experimental Research) आणि संख्यात्मक संशोधन (Numerical Research). सैद्धांतिक संशोधन या प्रकारात तुम्हाला एखादा तुम्ही कल्पिलेला एखादा प्रश्न घेऊन तो तुमच्या कल्पनाशक्तीनेच सोडवायचा असतो. सोप्यात सोपे उदाहरण द्यायचे झाले तर असे की जर समजा तुमच्याकडे १०० मीटर लांब कुंपणासाठी पैसे आहेत, तर आयताकृती कुंपणामध्ये तुम्ही जास्तीत जास्त किती क्षेत्रफळ व्यापू शकता? याचे गणित आपण कागदावर मांडून आरामात सोडवू शकतो. या प्रकारात आता बरीच संपृक्तता (saturation) आली आहे त्यामुळे हा प्रकार साधारणपणे सगळ्यात कमी संशोधिला जातो. प्रयोगाधारीत संशोधनामध्ये आपण एखाद्या गोष्टीची छोटी प्रतिकृती बनवून त्यावर प्रयोग करतो ज्याचे निष्कर्ष गणित वापरून त्याच्या वास्तविक आकारासाठी वापरू शकतो. उदा एखाद्या विमानाचे छोटे मॉडेल बनवून त्यावर विविध परिस्थितीचे प्रयोग करू शकतो. हा प्रकार सर्वात जास्त खर्चिक आणि वेळखाऊ आहे. संख्यात्मक संशोधनमध्ये सैद्धांतिक संशोधनातील एखादा प्रश्न संगणकाच्या आधारे सोडवला जातो. उदा वरील उल्लेखलेल्या विमानाची प्रत्यक्ष प्रतिकृती करण्यापेक्षा संगणकावर ही प्रतिकृती बनवून त्यावर प्रयोग करायचे. यासाठी विविध सॉफ्टवेअर्स उपलब्ध आहेत. हा प्रकार तुलनेने सोपा आणि कमी खर्चिक असल्याने सर्वाधिक लोकप्रिय आहे.

IISc मध्ये संशोधनासाठी खूप पोषक वातावरण आहे. उत्कृष्ठ, अद्ययावत असे टाटा ग्रंथालय आहे. प्रत्येक विभाग, उपविभागात अद्ययावत अशा प्रयोगशाळा आहेत ज्या २४ तास चालू असतात, उच्चविद्याविभूषित प्रोफेसर्स आहेत. नेहेमी मदतीला तत्पर असे प्रगल्भ वरिष्ठ विद्यार्थी मित्र मैत्रिणी आहेत. आंतरराष्ट्रीय परिसंवाद हे नित्यनियमाने होतच असतात. संस्थेचा १०० वर्षाहून अधिक जुना निसर्गरम्य कॅम्पस राहायला आणि अभ्यास करायला अतिशय शांत आणि उत्कृष्ठ आहे. आरोग्यदायी आणि उत्कृष्ट जेवणासाठी ३-४ खानावळी आहेत.

माझ्या प्रोजेक्टसाठी मी Solid Mechanics आणि Fluid Mechanics यातील एक एक प्रश्न घेऊन तो सैद्धांतिक पद्धतीने सोडवायचे निश्चित केले होते. थोड्याफार प्रमाणात संगणकाचेही सहाय्य लागणार होते. अशा संशोधन आधारित कोर्स मध्ये सर्वात महत्वाची भूमिका तुमच्या मार्गदर्शकाची (Guide) असते. तुमचा प्रश्न

निवडण्यापासून ते त्यावर उपलब्ध असलेले संशोधन याबाबत माहिती देण्यापर्यंत किंवा संशोधन चालू असताना काही अडचणी आल्या तर त्या निस्तरण्यापर्यंत खूप महत्वाची भूमिका असते. मूळचे मराठीच असलेले मुंबईचे डॉ. चंद्रशेखर जोग यांचं मार्गदर्शन मला लाभले हे माझे भाग्य. माझ्या संशोधनासाठी प्रश्न निवडताना लवकरच लक्षात आले की जो प्रश्न मी निवडतो, तो आधीच कोणीतरी कोणत्यातरी पद्धतीने सोडवला आहे. खूपच मूलभूत असे प्रश्न कमीच शिल्लक आहेत आणि त्याची उत्तरे शोधणे खूप कठीण आहे. पण या सर्व खटाटोपात भरपूर शिकायला मिळाले. दिलेल्या वेळेपेक्षा जास्त वेळ लागला पण प्रबंध पूर्ण झाला. तसे मास्टर्स नंतर सुद्धा बरेच पर्याय उपलब्ध होते. माझ्याबरोबरच्या काही जणांनी IISc मध्येच PhD साठी continue केले. काही परदेशात PhD साठी गेले, ज्याच्यातले बरेच आता आयआयटी, IISc मध्ये प्रोफेसर सुध्दा झालेत. काहींनी नोकऱ्या केल्या, काहींच्या PhD अर्धवट सुद्धा राहिल्या. Schlumberger, ANSYS यासारख्या नावाजलेल्या कंपन्यांबरोबर काम करायची संधी होती. पण पुन्हा गणितातील आवडीने डोके वर काढले आणि गणिताशी निगडितच आयआयटी प्रवेश परीक्षांसाठी अध्यापन चालू केले.

लहानपणीची सुप्त इच्छा आता आवडीच्या विषयातच करिअर करून पूर्ण केल्याचे समाधान आता आहे.

उच्च शिक्षणाचा माझा अनुभव अभ्यासाव्यतिरिक्त इतर गोष्टींच्या उल्लेखाशिवाय अपूर्ण आहे. जसे की IISc मध्ये मराठी मुलांनी स्थापन केलेले मराठी मंडळ आहे ज्याच्या कार्यकारिणीत मला काम करायला मिळाले. गणेशोत्सव, कोजागिरी पौर्णिमा, निरोप समारंभ वगैरे भरपूर कार्यक्रम आयोजित केले. बंगलोरच्या महाराष्ट्र मंडळात दरवर्षी एकांकिकेत भाग घेतला. रात्री बंगलोरच्या आसपासच्या टेकड्यांवर बरीच भटकंती केली. म्हैसूर पर्यंत सायकल भ्रमंती सुद्धा केली. या सर्व अनुभवांशिवाय फक्त उच्च शिक्षण अपूर्ण आहे. त्यामुळे उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या सर्वांना माझी एकच सूचना आहे की फक्त नोकरी, मार्क्स याच्या मागे न जाता तुमच्या आवडीच्या क्षेत्रात मन लावून अभ्यास करा, जीवनाचा आनंद लुटा आणि ३ इडियट्स मध्ये म्हटल्याप्रमाणे

"कामयाबी के पीछे मत भागो. काबिल बनो. कामयाबी तुम्हारे पीछे..."

लेखक नारायणा एज्यू. ग्रुपमधे IIT प्रवेश परीक्षांसाठी गणित विषयाचे अध्यापन करतात.

# बारदानी कुटुंबे

■ पॅट्रिक कोरिया, फ्लॉरिडा, अमेरिका

पूर्वी आपल्याकडे कुटुंबे मोठी असायची. बहुतेकांची लग्ने वयाच्या २० वर्षाच्या आत होत असल्याने कुटुंबात ६ किंवा त्यापेक्षा जास्त मुले बऱ्याच लोकांना असत. बऱ्याच वेळेला मोठा नातू हा वयाने शेवटच्या मुलाइतकाच किंवा मोठा असे. दुधवाले बारदानी कुटुंब म्हणजे चार किंवा त्याहून जास्त भाऊ व तितक्याच बहिणी. २-३ एकर जमीन आणि दुधाचा धंदा. मोठा भाऊ मुंबईला दुध न्यायचा, दुसरा शेती बघायचा, तिसरा सारखा गावढ्याला बैलगाडी घेवून उन्हाळ्यात पेंढा व पावसाळ्यात गवत आणायचा. कधी कधी त्याला डोंगरबाबा म्हणत. त्याला व्यवहार इतका फारसा जमत नसे. कधी कधी ह्याला दारूचे व्यसन असे. चौथा दुधाच्या धंद्यात मदत करणारा असायचा. कावड तयार करून मोठ्याला ती बसपर्यंत पोहोचवून देणे तसेच म्हैस दुभणे ही ह्याची मुख्य जबाबदारी असे. हा जर शिकलेला असला तर त्याला धर्मगुरू होण्यासाठी पण पाठवण्याची शक्यता असायची.

रोकड पैसा मोठ्याकडे येत असल्याने त्याची चंगळ असायची. आपल्या जीवावरती सगळे चालले आहे असा काहीसा दिखावा हा करीत असे. मध्येच तो ओटीवर बसुन मोडी लिपीत काही गिचमीड लेखणी टिपणी करी. कधी तो तोंडावर चिंतेचे सावट दाखवी व कुटुंबातील सर्व बायाबापड्याचे तापमान त्याप्रमाणे खालीवर होई. तो चालताना धोतराची निर धरून ऐटीत चाले व चालताना त्याला जग लहान वाटे. तो निस्वार्थी असला तर सर्व कुंटुंबाचे भले होई. हा जर आजारी असला तर मुंबईला दुध पोहोचविण्याकरिता चौथ्याला पाठवीत. ह्यावेळी चौथ्याला धंदा कमीतकमी कसा समजेल ह्याची पहीला काळजी घेई. चौथ्याला तो गिऱ्हाइकाची नांवे सांगत नसे. मध्यभागी असलेले एका बिल्डिंगमधले गिऱ्हाईक सेंट्रल समजून त्यानुसार; उजवीकडच्याला १ लिटर, डावीकडच्याला दिड, उगवतीला २, मावळतीला अर्धा, खालच्यास १, वरच्यास

२ असे दुध देण्यास सांगे. चौथा हमखास यांत चूक करत असे व त्यामुळे पहीला भाऊ किती महत्चाचा आहे याची सर्वांना खात्री पटे. रोझरी (तेस) करताना मोठ्यासाठी जरा राखीव जागा ठेवलेली असे त्या जागेवर आणखी कुणी बसत नसे.

तिसऱ्या व चौथ्याच्या बायकांच्या हाती पैसा येत नसे मग त्या अळू, हळद, कंदमुळे (कोंफळ), गवती चहा, तुळशी किंवा गुलछेडीचा पाला विकून वरखर्ची काढत असत. पहील्याची बायको सोडली तर बाकी सर्व बायकांनी दिवस उजाडायच्या आत मिस्सा ऐकले पाहीजे असा अलिखीत नियम असायचा. पहील्याची बायको चौथ्या मिस्साला जावून, गप्पाटप्पा आटपून आली तरी चालत असे. तिच्या हाती पैसा असे. त्याला या बारदानी कुटुंबातील बारोजी म्हणत. क्वचित प्रसंगी चार भावात दुही पडल्यासारखे वाटे पण मग एखादी म्हैस शेणाच्या खड्ड्यांत अडकण्यासारखा बाका प्रसंग होई व ती म्हैस खड्ड्यातून बाहेर काढताना एकत्र आल्याने दुहीचे जळमट वितळून जात असे.

विचारी बापाच्या जर तीन पोरी असल्या तर त्या समाजाच्या तीन कोपऱ्यात दिलेल्या असत. हे कुटुंब नंदाखाल भागातील धरले तर एक पोरगी बोळींज भागात, दुसरी सप्ताळच्या आसपास तर तिसरी निर्मळ किंवा कातरवाडीच्या आसपास! हेतू हा की बाप गेल्याची बातमी आली कि सर्व दिशेने पोरी छाती कुटीत रडत याव्यात. शक्यतो मुलीकडे जाताना वाटेत दुकान न लागेल तर बरे समजत. म्हणजे काही दुकानी वस्तू नेण्या-आणण्याचा प्रश्न सुटला! आपल्या घरी येणारी पोरी गरीब घराण्यातली बघायची व आपली पोरगी श्रीमंत घरात द्यायची म्हणजे पोरीं मिस्गीन (म्हणजे काय?) वागतात अशी एक सौम्य समजूत असे. थोडक्यात पोरींच्या बाबतीत चढती भाजणी व पोरांच्या बाबतीत उतरती भाजणी! (असे काहीसे गणितात होते ना?) ह्याहून जास्त पोरी असल्या तर त्यातली एखादी धर्मभगिनी होत असे.

घराच्या भिंतीवर कधी "रविवार ता. १८ मार्च - मेंढी म्हैस धळली" असा जाहीरनामा कोरलेला असे. या दुधाच्या धंद्यात दोन भांडी महत्वाची. एक म्हणजे सणपाळणा म्हणून सूनबाई माहेरून आणायची ते एक भांडे व दुसरे म्हणजे गाभण म्हशीचे भांडे येणे म्हणून एक प्रकार असायचा. त्या भांड्याची काळजी घेण्यासाठी दाऊद म्हणून एका व्यक्तीस

बोलावत असत. हे भांडे धंद्यास फार हानीकारक असे. दाऊद ते भांडे पुन्हा बसवित असे. त्या काळी हा एकच दाऊद लोकांना माहीत होतां. म्हैस व्यायल्यानंतर तिचे जोहार येणे म्हणून एका प्रकार असायचा. हा काहीसा बाळंतीणीचे कॅाम्लीक्शन सारखा म्हशीचा प्रकार असे. पण राजपूतांचा जोहार असतो तितकाच हा जोहार कुटुंबाची भंबेरी उडवणारा असे.

जी कुटुंबे पैशांच्या बाबतीत कमी ती दुसऱ्या अर्थाने बारदानी असतं. म्हणजे त्याकडे गोणपाटाचे तरटापासुन केलेले बारदान असे. आडे, शिके, बारदान या पलीकडे त्यांची फारशी इस्टेट नसे. ते भाजीपाला व केळी घेवून मुंबईस जात. अशा प्रकारची कुटुंबे दोन प्रकारची असत. पहील्या प्रकारच्याचे मुंबईला गाळे असे, त्याची कमाई फार चांगली असे. ते घरी केळी पिकवून गाळ्यावर विकायला घेवून जात. त्याच्या पाचसहा मोठ्या पाट्या (डाग) एकेका वेळेला जात. ते थोडेसे शिकलेले आणि बोलण्यात पटाईत असत. अंगावर पैसे देवून ते शेतकऱ्याकडून केळ्याचे तापे विकत घेत.

दुसऱ्या तऱ्हेचे पासवाले कुटुंब हे मुंबईला भाजीपाला घेवून जाणारे गरीबीत वाढलेले असे. त्याच्याकडे जमिनजुमला फारसा नसे. खूप वेळेला ते सुखी असत पण कधी कधी त्यांच्यावर बाका प्रसंग येई. मोठा आर्थिक धक्का सहन करणे त्याना शक्य नसे. असाध्य आजारपणा किंवा नादिष्टपणा किंवा अपघातामुळे कर्ता माणूस देवाघरी जाई व मग म्हातारी आई, तरूण बायको आणि एकदोन पोरं मागे रहात. बायकोला सगळे जग खायला आल्यासारखे होई. म्हातारीला सारखे जुने दिवस आठवत. ज्यांचे ठिक चालत नसे त्या शेजाऱ्यांचे आता ठिक चालले आहे व आपण खाली पडलेलो आहोत ह्याची तिला सारखी जाणीव होते व ती सारखी पुटपुटते, “ते होते ते ये जाले अन ये होते ते ते जाले आन मा धन्या पायतारा गेले.” नातवांना मात्र ती भरपूर प्रेम देते. ज्या नातवाला बिशा किंवा अत्या म्हणून नेहमी बोलत ते आता बिशो किंवा अत्यो म्हणून गणले जातात. थोडक्यात ती नातवाला त्यांच्या वयापेक्षा मोठा करते. अधून मधून ती सुनेला टोचते. “ आते तू कोडां दुःख धरदां?” थोडक्यात तू कामाला लाग हे ती सुचित करते. असा खमकेपणा केला नाही तर सगळे घर डबघाईस येईल हे म्हातारी पक्के जाणून असे.

आपण बिशा हा एकच नातू आहे असे धरू या. माणूस गेल्यानंतर दोनतीन

महीने लोक सांत्वनासाठी येत व मग सून व आजी यांना रितीनुसार मोठमोठयाने रडावे लागे. बिशाला ते अजिबात आवडत नाही. कधी कधी तो आईला सुचवित असे, “ओटीवर कोणी बाई तुला रडवायला आली आहे, तिला तू घरी नाही म्हणून सांगू का?” सांगायचा हेतू हा की नवरा गेल्याचे दु:ख फार असे पण भरीस त्याचे प्रदर्शन करावयास लागे ते पण दु:ख असायचे.

अंगावरचे दागिने विकून आई आणि आजी कसेबसे वर्ष दोन वर्षे काढत. आई व आजी लोकांच्या म्हशी बाळगून व काही वेळा शेजारांत मोलमजुरी करून पण थोडेसे पैसे मिळवित. मध्यंतरी बिशाला शाळा सोडायला लागते. तोही थोडा टणका होतो. आवाज पण बदलायला लागतो. हळूहळू तो शेजारातल्या त्याच्या सारख्याच लोकांबरोबर मुंबईला माल घेवून जावू लागतो. आई आणि आजी त्याच्या वागण्यावर फार लक्ष ठेवून असत. उपाशी मरू पण कोणाच्या कटकटीत नको ह्याचा ते पाठपुरावा करत.

सुरुवातीला बाकी पासवाले बिशाची फार थट्टा करत. मध्येच कुणी लबाड पासवाला पिचकारी मारतो, “लोक काहीही म्हणोत पण तुझे सगळे काही ठीक होईल बघ” हे जेव्हा त्याने ऐकले तेव्हा त्याने ते आजीला सांगितले व चिंता व्यक्त केली. “काहीही म्हणोत” म्हणजे आपल्याबद्दल काय म्हणत असतील लोक? आजीला पासवाल्याची पारख असते. ती त्याची समजूत काढते, “बिशो, लोकांआ बंगल्योर डोकावोन आपल्या खोपटाला आग नाका लावो.” बिशाला काही कळत नाही तो समजल्यासारखे करून पुढचा मार्ग अनुसरतो.

पुढे कधीतरी गिऱ्हाईकाकडून बिशाला लग्नकार्यासाठी केळीच्या खांबाची वर्दी येते. अर्थातच सांगून आलेला माल म्हणजे जास्त कमाई! बिशाला पैशांच्या बाबतीत थोडा हात सैल सोडावासा वाटतो. त्या दिवशी येताना बिशा तंबाखूपान खातो शिवाय वांद्र्याहून देठ आणतो. देठ म्हणजे मांसाचा काळजी, आठी व फुफ्फुसे ह्याचा सेट. पानात तंबाखू असल्यामुळे बिशाला गरगरते व चेहरामोहरा बदलतो. आजीला हा दारू पिवून आला आहे असे वाटते. ती त्याला टोचते. आई पोरगं फुकट जाणार ह्या कल्पनेने नाराज होते व जेवत नाही. सकाळपासून आनंदी असलेला बिशा दु:खाने झोपी जातो. करायला गेलो एक अन झाले काय! दुसऱ्या दिवशी गेली दोन

वर्षे गैरहजर असलेला मामा, पोराला सांभाळा म्हणून ताकीद देवून जातो. बिशाला चुक कळते व नंतर तो सगळ्या गोष्टी आई व आजीला विश्वासात घेवून करतो. गाडी पुन्हा रूळावर आल्यासारखे वाटते.

बिशाचे उत्पन्न येते तसे दु:ख थोडेसे हलके होते. बिशा नवीन पासवाला असल्याने त्याला शेजारीपाजारी माल विकत घेताना घासघीस करायला लागते, त्याची लाज वाटते म्हणून तो बाजारात माल घ्यायला जातो. बाजारात माल घेतला व तिथेच पैसे दिले की कटकट नाही अशी त्याची भावना असते.

ह्या घाईगर्दीत त्याला बाजारात कुठेतरी त्याची भावी पत्नी भेटते. तिचे नाव शिजू समजू या. शिजू तिच्या वाडीतला माल भाजीपाला विकायला बाजारात आठवड्यातून एकदोनदा येत असते. शिजूबरोबर घासाघीस करायला बिशाला आवडते. नेहमीच्या वहीवाटीमुळे जेव्हा मंदी असते तेव्हा आणखी कोणी नाही पण बिशा तरी येईल व मालाची तो रास्त किंमत देईल अशी शिजूला शाश्वती वाटू लागते. ती हसते तेव्हा दोन्ही गालावर खळ्या पडतात ते बिशाला फार मोहक वाटते. अशाच एका मंदीच्या दिवशी बिशा वांग्याची दोनतीनदा किंमत करतो. किमतीत शिजू थोडीशी खाली येते पण जास्त खाली येत नाही. तसा किमतीत फरक फारच कमी राहीलेला असतो. बिशा बाजारात उगाचच तिच्या पुढून, दोनतीनदा मागेपुढे फेऱ्या मारतो, पण असे दाखवतो की त्याचे तिच्यावर लक्ष नाही. तेव्हा ती बिशाला बोलते.

“ये बिशो, तुओ का बेत हाई?” बिशाला माहीती आहे की ती वांग्याविषयी बोलते आहे. थोडक्यात तू वांगी घेणार की नाही असे ती विचारत आहे. पण बिशा मोठ्या आवाजात शिताफीने, “तुओ बेत हायदे ते येत्या आश्विनात माव पण बेत हाय”

बस! सगळे हसतात. शिजू लालेलाल होते. ती राग आल्यासारखे दाखवते अन लाजते. बिशाचा बाण नेमका हवा तिथे बरोबर लागलेला असतो. तिसऱ्या दिवशी शिजूची मावशी निरोप घेवून बिशाच्या आई अन आजीकडे येते. गप्पांत दोन महिन्याअगोदर समोरच्या फरशीकरवी पाठवलेला निरोप फरशीने खाल्ला हे उघड होते. थोडक्यात बाजारात बीशाने थट्टा केली ते बरे झाले असे सगळे समजून घेतात. २५ वर्षाअगोदर हीच अवस्था बिशाच्या बाबाची होती. बिशाची

सोयरीक ठरवतात. शेजारपाजारी “शिजू पोरी शिंगाडो, नवरा मिळाला भंगाडो” म्हणून लहान पोरं चिडवायला सुरवात करतात.

दोन वर्षांनी “वाकड्या ताडावरून ताडावरून उडी मारली, शिजू तुझ्या जीवासाठी जीवासाठी उडी मारली” असे गात लग्न होते. पुन्हा जीवनाचे चक्र चालु होते. आपल्यात बोलतात ना की ढाक गेली अन रोपो लाविलो. बिशा नवीन रोपा म्हणायचा! ही बारदान कुटुंबाची यशस्वी बाजू झाली. ह्याला अयशस्वी बाजू पण असू शकते. त्या बाजूबद्दल आणखी केव्हा तरी बोलू.

लांबलचक घरात अशी बरीच कुटुंबे असत. संध्याकाळ झाली की ओटीवर जत्रेचं स्वरूप येई. एका बाजूस अळू बांधणे चालले आहे. तर दुसऱ्याबाजूला केळीच्या पाणाचा पुडा वळतोय, तिसऱ्या बाजुला पोरं लंगडी खेळतात, चौथ्याबाजूला आंघोळी, पाचव्या बाजूस हिशोब चाललाय, सहाव्या बाजूस वांग्याची टोपली भरायला लावली आहे, सातव्या बाजूला रोझरी, तर आठव्या बाजूला खडाजंगी अशा नाना क्रिया एकाच वेळेला बघायला मिळत. ओटी म्हणजे जसे काही मुंबईची बदाम गल्ली किंवा मिरची गल्ली किंवा मंगलदास मार्केट सारखे वाटे.

पोरगं बिचारं एकटं पडलं आहे. त्याच्याशी खेळायला कोण नाही. असे कधीच होत नसे. बारदानी कुटुंबाची किमया ही!

अशा तऱ्हेने कुटुंबे जगत व वाढत असत. पण मग दुधवाले जे मोठे कुटुंब कधीतरी विभक्त होई. त्याची असे होई. दुधवाल्या बारदानी कुटुंबात चार भाऊ व तीन बहीणी आहेत. बहीणीपैकी शेवटचीचे लग्न वडीलांच्या मरणानंतर झालेले आहे त्यामुळे दागिन्यांची देवाणघेवाण तिच्या मनाप्रमाणे झालेली नाही. त्यामुळे तिच्या मनात मोठ्या भावाबद्दल थोडीफार कसर आहे. मोठ्या बहीणींची पोरगीही वयात आली आहे आणि तिला माहेरचे कुटुंब एकत्र असणे ही बाब पोरीची सोयरीक जमवायला सोयीची वाटते. मधल्या मुलीला तिच्या सासरी जास्त मेहनत पडत असल्यामुळे माहेरी काय चालले आहे ह्याची कल्पना नसते व तिला दुसऱ्या पॅरीशमध्ये दिलेले असल्याने तिचा माहेरच्याशी फारसा संबंधही येत नाही.

कुटुंबात असंतोष आहे पण तो अजून बाहेर दिसत नाही. सगळ्यात लहान

(चौथा) भाऊ दु:खी आहे कारण त्याला कामाचा बोजा फार जास्त वाटतो. कामापेक्षा त्याला पहीला भावजी वागणूक देतो त्याबद्दल फार राग येतो. पण वयात १५ वर्षाचा फरक असल्यामुळे त्याला डायरेक्ट उलट बोलता येत नाही. रात्रंदिवस आम्हा युध्दाच्या प्रसंग! तो दिवसा म्हशी तळ्यावर घेवून जातो तेव्हा काही म्हशी “स्वतंत्र बुध्दीच्या” असल्याने त्या पैलतिरी बाहेर उतरून चरायला लागतात. तळ्याच्या त्या बाजूला जायला रस्ता नसल्याने त्याला म्हशी घरी वेळेवर परत आणता येत नाहीत. थोडक्यात त्या जेव्हा येतील तेव्हा येतील असे होते. एका म्हशीचे वासरू मरण पावल्याने ती लवकर पान्हा देत नाही व तिचे दूध काढणे अवघड होते. तिचे वासरू बद्धकोष्ठतेने मरते. त्या वासराला डिकामळ व गहरळ किंवा इसबगुळ दिली असती तर ते मेलं नसतं. मेल्यावरसुद्धा त्यांच्या कातड्यात भुसा भरून, फेक वासरू करतां आलं असतं. नेहमीचा कातडेवाला विचारायचा देखील येतो. पण ह्या गोष्टींना पैसा लागतो अन मोठा पैसे देत नाही. चौथ्याला वासराची इतकी गरज वाटते की वासरू नाही म्हणून घरातलं पोरगं म्हशी पुढे बांधून त्यावर कोंडा टाकला तर फायदा पडेल असे त्याला वाटू लागते. थोडक्यात तो घायकुतीला आला आहे. मोठ्यामुळे हा सगळा त्रास आपल्याला सहन करायला लागतो असे चौथ्याला वाटते. दिवसा हे सगळे करून पुन्हा रात्री कावड पोहचवायला लागते ते निराळे. तो सारखा आईकडे तक्रार करत असतो.

तिसरा, डोंगरबाबा, त्याच्या मनांत “हे विश्वची माझे घर” अशी विश्वव्यापी भावना वास करीत असल्यामुळे त्याचे कुठेच काही म्हणणे नसते. तो त्याची नेहमीची कामे करतो व वेळप्रसंगी गरज लागली तर कोणाच्या मरणांवर पण जातो. सातव्याच्या सुतकाच्या जेवणाला किंवा बारशाचे जेवण असले तर तिथे मोठा जातो हे निराळे सांगायलाच नको. तिसऱ्याला कोणाचे बरे झाल्याचे सुख वाटत नाही किंवा कोणाचे वाईट झाल्याचे दु:खही वाटत नाही. स्थितप्रज्ञ म्हणतात ते हेच!

चारही बायकांत मात्र फार तेढ निर्माण झालेली असते. दुसऱ्याची बायको वाडीत काम करून बेजार झालेली असते. “डोंगरी शेत माझे ग मी बेनु किती?” अशी तिची अवस्था” तर तिसरी व चौथी, “घरात पंधरा म्हशी, शेण भरावं किती?” अशी अवस्था! शेणखड्ड्यातले जुने शेण काढताना लालडोक्याचे पांढरे किडे बघून चौथीचे तर डोकेच रागे लाल होते. ह्या

सगळ्या गोष्टीमुळे एक दिवस बाचाबाची होते.

ह्या सर्वांची आई (म्हातारी), हे सगळे बघते. तिला वाटते की मोठे भांडण व्हायला फक्त एक ठिणगीची गरज आहे. मध्यंतरी मोठ्या पोरीची पोरगी, जी वयात आलेली असते तिची सोयरीक होवून जाते. नंतर एखादा मोठा सण जातो. म्हातारी चर्चनंतर खोयारे बांधता बांधता पहील्या व तिसऱ्या पोरींना घरात काय स्थिती आहे याची कल्पना देते. “परीपूर्ण जाहला काळ, बाळ जन्मला बाळ” हे देवळातले गाणे तिच्या डोक्यातून जात नाही. तिला खरच काळ परिपक्व झालेला वाटतो. मग घरी आल्यावर मिरच्यांचे वाटण कुटताना वरवंटा पाट्यावर जोरात मारते. पाट्याचे दोनतीन तुकडे होतात. म्हातारी पाटा फुटल्याबद्दल दिलगीरी व्यक्त करताना बोलते, “अरेरे.. आज इतक्या वर्षाचा जुना पाटा फुटला. हा आजोबांच्या हातचा पाटा. हा फुटला आणी माझे सगळं मनच उतरलं. परमेश्वर आपल्याला सांगतो की आता आपले पाटे न वरवंटे अलग व्हायला पाहीजेत”

हे बोलण्याने चारही भाऊ अलग होतात. परिस्थिती बदलते. मोठा भाऊ दिड तोळ्याची जी चैन सदऱ्याच्या आतून घालत असे ती आता बाहेरून घालतो आणी त्याला कंठी म्हणतो. त्याची बायको आता चौथ्या ऐवजी पहिल्या मिस्साला जायला सुरवात करते. दुधाच्या धंद्यामुळे कुटुंब किती कर्जबाजारी झाले आहे ते तो भावांना दाखवतो.

बाकीच्या तिन्ही भावांच्या बायका आता चौथ्या मिस्साला जावू लागतात. चौथीचा भाऊ तिच्या लग्नानंतर कुणी पाहीला नव्हता, तो आता दर तिसऱ्या दिवशी दिसायला लागतो. शेजारीपाजारी विषय निघाला तर बोलतात, त्यांचा “पाटा फुटला” आहे. ते सगळे आता वेगळे आहेत. बारदानी कुटुंब आता फारसे बारदानी रहात नाही. तिसरा सोडला तर सर्वाचे व्यवस्थित चालते. तिसऱ्याला थोडा वेळ लागतो. त्याची पोरं हुषार निघतात. पुन्हा नवीन संसार चालू होतात. पुन्हा ती हरिवंशरायची निर्माण कविता.

नाश के दु:ख से कभी
दबता नहीं निर्माण का सुख
प्रलय की निस्तब्धता से
सृष्टि का नव गान फिर-फिर!

नीड का निर्माण फिर-फिर,
नेह का आव्हान फिर-फिर!

# वसईला वाचविताना...

■ मॅकेन्झी डाबरे, भुईगाव, वसई

मागील महिन्यात मुंबई महानगर पालिकेच्या आयुक्तांनी एक अहवाल प्रसिद्ध केला, त्यानुसार सन २०५० मधे नरिमन पॉइंटचा सुमारे ८०% भाग पाण्याखाली जाईल. परंतु आयपीसीसीचा अहवाल समजुन घेतला तर कळेल की, असेच औद्योगिकरण चालू राहिले तर २०५० सालात मुंबईसह भारताची सर्व किनारपट्टी पूर्ण बुडालेली असेल.

नासाचे माजी संचालक डॉ. जेम्स हॅनसेन यांच्या, सन २००९ मध्ये आलेल्या 'स्टॉर्म्स ऑफ माय ग्रँडचिल्ड्रन' या पुस्तकात ते लिहतात कि, 'पृथ्वीच्या सरासरी तापमानात २°C ची वाढ झाल्यावर, ३० लाख वर्षांपूर्वी असलेल्या 'प्लायोसिन' कालखंडात पृथ्वी जाईल. त्यावेळी त्या उष्णतेत सागराची पातळी आतापेक्षा ८० फूट वर होती.'

गंभीर बाब म्हणजे गेल्या वर्षी सन २०२०च्या ऑगस्ट महिन्यात ही २°C ची वाढ नोंदली गेली आहे. म्हणजे ८० फूट पातळीकडे वाटचाल सुरू झाली आहे. परंतु विकासाच्या नावाखाली जगातील माणसे, राजकारणी व नोकरशहा गाफील आहेत.

जागतिक तापमानवाढीमुळे जगात मागील १० वर्षात घडलेल्या घटनांचा वेध घेतल्यास आपल्या लक्षात येईल की आपण दर दिवशी विनाशाच्या मार्गाने धावत आहोत. सन २०१५ पासुन अंटार्क्टिकाचे तापमान जवळजवळ वर्षभर शून्यावर राहत आहे, जे पूर्वी -६० ते -१० पर्यंत असायचे. याचाच अर्थ पूर्वीप्रमाणे, सूर्य उत्तर गोलार्धात गेल्यावर शून्याखाली तापमान जाऊन बर्फाचा थर पुन्हा पूर्ववत निर्माण होत असे, तसे आता होत नाही. बर्फ सतत वितळत आहे. नैसर्गिक उष्णयुगांत पृथ्वीच्या सरासरी तापमानात १°C ची वाढ होण्यासाठी काही दशलक्ष वर्षांचा काळ लागत होता. इतक्या दीर्घकाळात जीवसृष्टी स्वतःला या बदलास जुळवुन घेऊ शकत होती. परंतु सध्याच्या यंत्र-मानवनिर्मित उष्णयुगात दर १० वर्षांत सरासरी तापमानात १°C ची वाढ होत राहणार आहे. ही वाढ अभूतपूर्व आणि महाविस्फोटक आहे. याचा अर्थ पृथ्वीवरील अंटार्क्टिका, ग्रीनलँड व हिमालयासह इतर

पर्वतांवरील सर्व बर्फ वितळणार आहे. जगातील सर्व बर्फ वितळल्यास महासागराच्या पातळीत सुमारे २०० फूट वाढ होवू शकते. सत्य हे कल्पितापेक्षा अदभूत आहे.

जगात वाढत्या उष्णतेमुळे होत आहे. दरवर्षी वाढते वणवे, उष्णतेच्या लाटा, अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, महापूर, वादळे इ. रूपात आपण अनुभवत आहोत. ब्राझील, ऑस्ट्रेलिया, अमेरिका आदी ठिकाणी वणवे लागण्याचे प्रमाण प्रचंड वाढलेले आहे. तरीही आपण मोटारी व विजेसाठी रोज करोडो टन तेल व कोळसा जाळत आहोत. विजेवर चालणाऱ्या मोटारी येतील परंतु त्याला लागणारी वीज निर्माण करण्यासाठी शेवटी कोळसा लागणारच. आपल्या अनेक सुख वस्तू बनविण्यासाठी करोडो कारखाने धूर ओकत आहेत. त्यामुळे परिस्थिती बिघडत आहे.

वसईसाठी हे सर्व जाणून घेणे का महत्त्वाचे आहे? कारण वसई तीन बाजूने पाणी व एका बाजूने डोंगर अशी निसर्गाने वेढलेली आहे. निसर्गाचा आनंद आपण लुटत असताना हवामान बदल व अयोग्य शहरीकरण यामुळे वसई आपला निसर्ग गमावित आहे. आज वसईची लोकसंख्या २५ लाख आहे. इतक्या अवाढव्य शहराला लागणारे पाणी, रेती, वाळू, माती, लाकूड आदी देता देता वसई पूर्णतः विद्रूप झाली आहे. विरार, नालासोपारा, वालीव आदी पूर्वेकडील भागात फिरलो तर आपणास लचके तोडलेले डोंगर, जंगले तोडून भकास केलेला भाग काँक्रिटच्या जंगलाने व्यापलेले आहेत. त्यामध्येच आपल्याकडे एमएमआरडीए आराखड्यात व विकास नियमावलीत बदल करून १ FSI दिला असल्याने परिस्थिती अजून गंभीर बनणार आहे.

बुलेट ट्रेन, एक्स्प्रेस हायवे, दिल्ली मुंबई कॉरिडॉर, रेल्वे कॉरिडॉर, विरार अलिबाग मल्टिमोडर, सागरी महामार्ग, वाढवण बंदर, जिंदाल बंदर आदी विविध प्रकल्प येत आहेत. या सर्व प्रकल्पासाठी डोंगर तोडून प्रचंड भराव केला जाणार आहे. मुंबईमध्ये बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स उभे राहिले त्यावेळी मोठ्या भरतीत वसई किनारपट्टी भागातील बरीचशी जागा समुद्राने गिळून टाकली. आज एकट्या वाढवण बंदरासाठी ५००० हेक्टर क्षेत्रावर समुद्रात भराव केला जाणार आहे. इतक्या मोठया प्रमाणात भराव केला तर पाणी आपला मार्ग बदलून वसईला नक्की बुडविणार. वसईत आधीच अनधिकृत बांधकामे उभे राहिल्याने मागील ५ वर्षापासून वसई सातत्याने बुडत आहे. हवामान बदलामुळे सागराची पातळी वाढत आहे. त्यात असे भराव करण्यात आले तर

किनारी भागात राहणारे आपल्या सर्वांचे काय अस्तित्व असेल? वसईची भौगोलिक परिस्थिती पाहता एक मोठी भरती व भरतीच्या लाटा अर्धी वसई गिळंकृत करू शकते.

मित्रानो, सत्य नेहमी कटू असते पण त्याचा स्वीकार करून मार्ग न काढल्यास ते अधिक गंभीर बनू शकते. आज जगातील सर्वशक्तिमान असलेले अमेरिका, चीन, जर्मनी, डेन्मार्क आदी देश हवामान बदलामुळे कसे मेटाकुटीला आले आहेत ते आपण पाहत आहोत. जर्मनीसारखा देश आज पूर्णतः पर्यावरण पूरक विकासासाठी धडपडत असेल तर आपली अवस्था केविलवाणी आहे. आज जगात प्रती मिनिट एक फुटबॉल मैदान इतके घनदाट जंगल नष्ट होत आहे. करोना काळात आंदोलन, मोर्चा आदी बंदी असल्याचा फायदा घेत एकट्या भारतात खाणी, कोळसा, हिरे आदी प्रकल्पांसाठी ३ लाख हेक्टर इतके महाप्रचंड जंगले तोडून साफ करण्यात आले.

आपण आपल्यासाठीच विनाशाचा सापळा रचून आपला विनाश करीत आहोत. आपल्याला वाटेल की, माझा काय यात संबंध? मध्यप्रदेश, झारखंड, छत्तीसगडमध्ये काय घडते याच्याशी माझा काय संबंध? तर तो संबंध नक्की आहे. घनदाट जंगले पृथ्वीला ऑक्सीजन पुरवितात सोबत पाऊस, वारा यासाठी महत्त्वाची भूमिका बजावत असतात. आज आपण पाहतो की कधीही कसाही पाऊस पडतो, थंडी लागते, प्रचंड वेदनादायी ऊन असते. त्यामुळे जगणे असह्य होत आहे. प्रदूषणामुळे श्वास कोंडला जावून श्वसन आजार वाढत आहेत. कॅन्सर तर घराघरात वाढेल किं काय अशी परिस्थिती आहे. पन्नाशीनंतर आयुष्य आजार व कुरबुरीत जात आहे. पिण्याचे पाणी दूषित त्यात आपणास नळाचे पाणी मिळत नसल्याने किडनी व हृदयरोग आजार वाढत आहे. त्यामुळे आपले पुढील भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी आज लढले पाहिजे. माझे नेहमीचे सांगणे आहे, आम्ही का लढतो कारण आम्हाला वसई सोडून दुसरा गाव नाही आहे. वसईवर आमचे प्रेम आहे, निसर्गाने नटलेली वसई सदोदित हरित फुललेली राहावी यासाठी लढत आहोत.

आपण सर्वानी, सर्व भूमिपुत्रांनी आता एकत्र येवून वसई वाचविले पाहिजे. भूमिपुत्रांच्या मागे कायम उभे राहिले पाहिजे. नायगाव ते नारंगी हा ३० किमी लांबीचा किनारपट्टी भाग किमान टिकावा यासाठी संघर्ष अटळ आहे. पर्यावरण संवर्धन करण्यासाठी झाडे लावणे सोबतच पर्यावरण हानी करणाऱ्या प्रकल्पाविरोधात लढले पाहिजे.

# ख्रिस्ती धर्मगुरू व सामाजिक कार्य

■ फादर असिस रॉड्रिग्ज, SJ ( येशू संघीय),
संत पीटर चर्च, वांद्रे

गेली दहा वर्ष धर्मगुरूचे जीवन जगत ज्या येशु संघासाठी मी कार्यरत आहे, त्या संघाच्या वतीने समाजातील विविध घटकांमध्ये काम करण्याचा अनुभव मी घेतला. समाजसेवा म्हणजे संघटित कार्यरचना जिच्यामार्फत मुख्यतः सामाजिक संसाधनांचे संवर्धन, संरक्षण व सुधारणा साध्य करण्याचे योजनाबद्ध प्रयत्न केले जातात. धर्मगुरूचे जीवन हे त्याच्या सामाजिक जीवनात विलीन झालेले असते.

संत तुकाराम म्हणतात, 'जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले. साधू तोचि ओळखावा, देव तेथेची जाणावा' गोरगरिबांच्या जीवनसंघर्षात संपूर्ण सहभागी होऊन त्यांना आपलेसे करणे हे आम्हा धर्मगुरूंचे आद्यकर्तव्य आहे. लोयोलाचे संत इग्नेशियस म्हणतात, "प्रेम शब्दापेक्षा कृतीत जास्त दिसून येते." "Love is shown more in deeds than in words.

समाजातील बांधवाप्रती असलेलं धर्मगुरूंचं प्रेम त्यांच्या प्रत्येक कृतीतून दिसून येत असते. धर्मगुरूंच्या समाजाप्रती असलेल्या प्रेमामुळेच अनेकांची जीवन संपन्न झालेली दिसत आहेत. आपल्या वसईची झालेली प्रगती त्याचाच एक भाग आहे. समाजातील प्रत्येक नागरिकाला भारतीय घटनेने स्वातंत्र्य, प्रतिष्ठा, समता व मूलभूत हक्क प्रदान केले आहेत. परदेशातून आलेल्या मिशनरी धर्मगुरू यांनी हे जाणले. केवळ त्यांनी आपल्याला धर्म दिला नाही तर समाजातील अनेक जाचक रूढीपरंपरा बंद करून शिक्षण देऊन आपल्याला संपन्न बनवले. आज आपल्या अनेक संस्था सामाजिक कार्यात अग्रेसर आहेत.

समाजाची सेवा हे जणू अनेक धर्मगुरूंचा श्वासच बनलेले आहे, असे अनेक धर्मगुरू आपल्यासमोर आहेत, ज्यांनी अगदी निस्वार्थीपणे समाजाची सेवा केली. समाजाची प्रगती ही नागरिकांच्या स्वास्थ्यावर अवलंबून असते. कृषीक्षेत्रात लक्षणीय प्रगती, कृषिक्षेत्रात नवीन प्रयोग, वैज्ञानिक प्रगती, व नवीन शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रांची दारे खुली करण्याचे प्रयत्न अनेक धर्मगुरूंनी केले. अगदी नजीकच्या काळात दिवंगत झालेले मूळचे स्विझरलँड येथील येशू संघीय फा. हर्मन बाकर यांना फादर ऑफ कम्युनिटी म्हटले जाते. त्यांनी त्यांच्या आयुष्याची ६० वर्ष महाराष्ट्रात घालविली. सर्वत्र दुष्काळपिडीत लोकांच्या वेदना त्यांनी जाणल्या व ते त्यांच्या वेदनाशी एकरूप झाले. त्यांनी अहमदनगर येथे पाणलोट प्रकल्प सुरु करून अनेकांचे जीवन फुलवले.

काही क्षेत्रांत आजही सरकारी सेवा-सुविधा पोहचू शकल्या नाहीत किंवा काही भागात त्यांचा योग्य परिणाम साधला गेला नाही. आजही तेथे दारिद्र्यरेषेखालील जनतेचे प्रमाण फार मोठे आहे अशा आदिवासींच्या हक्कांसाठी आयुष्यभर लढणारे व शेवटी आपला प्राणसुद्धा देणारे फादर स्टॅन स्वामी (येशू संघीय) आपल्याला परिचयाचे आहेत. पोप फ्रान्सिस यांनी १० ऑक्टोबर २०२१ रोजी सिनड २०२३ची अधिकृत घोषणा केली. त्या सिनडसाठी सहभागिता, एकात्मता आणि मिशन या विषयावर अधिकाधिक भर देण्यात येत आहे. धर्मगुरू म्हणून प्रत्येक कार्यात लोकांचा सहभाग व सहकार्य याद्वारे एक चांगले मिशन घडून येऊ शकते व त्याद्वारे लोकांची सेवा घडली जाऊ शकते.

नाशिक जिल्ह्यातील जेज्वीट संचालित संस्था म्हणजे महाराष्ट्र राज्य प्रबोधन मंडळ (MPSM). संपूर्ण नाशिक जिल्ह्यात खेडोपाडी कार्यरत आहे. गेली कित्येक दशकं ते शेतकऱ्यांच्या सोबत कार्य करीत आहेत. शेतकऱ्यांच्या हक्कासाठी ते लढत आहेत, शेतकऱ्यांचा आवाज सरकारी यंत्रणेपर्यंत पोहोचवत आहेत. कोवीड काळात त्यांनी अनेक उपक्रम राबविले. अनेक सिस्टरांच्या संस्थांना आमंत्रण देऊन त्यांच्यासोबत

नाशिक जिल्ह्यातील गावोगावी आरोग्य दानाचे कार्य केले.

जून २०२१ पासून माझी नियुक्ती संत पीटर चर्च, बांद्रे येथे झाली. ह्या चर्चचे एक खास वैशिष्ट्य आहे. मुंबई शहरातील सामाजिक कार्यात हे चर्च अग्रेसर आहे. करोनाकाळात अनेक निर्वासितांस आश्रय देऊन चर्चच्या धर्मगुरूंनी त्यांची देखभाल केली. त्यांची ट्रेनची तिकिटं बुक करून त्यांना घरी जाण्यास मदत केली. यूथ फॉर युथ व युथ सोशल सर्विस हे दोन ग्रुप गेली तीस वर्ष जवळजवळ १५० गरजवंत लोकांना रोजचे जेवण वाढत आहेत. असे एक ना अनेक सामाजिक कार्ये धर्मगुरूंच्या प्रेरणेने व प्रापंचिकांच्या सहकार्याने होत आहेत.

पोप फ्रान्सिस म्हणतात, “Let us not soundproof our hearts; let us not remain barricaded in our certainties. Certainties often close us off. Let us listen to one another,” आपण आपल्या अंतःकरणाला ध्वनिरोधक करू नये; आपण आपल्या निश्चिततेमध्ये अडखळत राहू नये. खात्री अनेकदा आपल्याला बंद करतात. आपण एकमेकांचे ऐकू या,”

कोणतेही सामाजिक कार्य प्रापंचिकांच्या सहकार्याशिवाय धर्मगुरूंना शक्य होत नाही. समाजात सुधारणा प्रत्यक्ष घडून यावयास समाजाच्या अंगप्रत्यंगांत क्रांती करणारी शक्ती उत्पन्न व्हावी लागते. आणि म्हणूनच ख्रिस्तसभेमध्ये प्रापंचिकांचा सहभाग अधिकाधिक वाढावा.

एकमेकांच्या साथीने सहकार्याने एक आदर्श समाज निर्माण व्हावा. यासाठी आपले पोप प्रयत्नशील आहेत. आपल्या सामाजिक बांधिलकीतून एक नवीन समाज निर्माण करण्याचा प्रयत्न करूया जेथे प्रेम, दया व शांती सदैव वास करेल.

# परदेशस्थ श्रावणबाळ

■ डॉ. नेन्सी विन्सेंट डिमेलो, गास

सकाळी चर्चमध्ये दिसलेले मेरी व जॉन संध्याकाळी खुशीखुशीत वॉकिंग करताना दिसले. दोघे अगदी आनंदात होते. त्यांची दोन्ही मुले उज्वल भविष्यासाठी परदेशी स्थायिक झाली होती. भेटणाऱ्या प्रत्येकाला अतिशय उत्साहाने आपली मुलं परदेशी कशी सूखीसमाधानी आहेत हे ते आवर्जून सांगत होते. तसेच परदेशी भविष्य घडवू इच्छिणाऱ्या मुलांच्या पालकांनाही ती दोघे निस्वार्थीपणे मार्गदर्शन करीत होती. मुलांच्या जाण्याबाबत ना कोठेले शल्य ना कसली खंत त्यांच्याठायी दिसत होती. मुलांच्या सुखात ते समाधानी होते. म्हातारपणी आपला सांभाळ करावा म्हणुन मुलांना न अडवता उभयतांनी आपल्या मुलांना मातृ-पितृ ऋणातून मुक्त केले होते.

"या चिमण्यांनो परत फिरा रे, घराकडे अपुल्या, जाहल्या तिन्ही सांजा..." लता मंगेशकर यांनी गायलेल्या या गीतात दूर गेलेल्या मुलाबाळांच्या आठवणीनं व्याकुळ झालेल्या मातेची दर्दभरी कैफियत मनाला स्पर्शून जाते. आजमितीला असे हजारो माता-पिता या स्थितीत जगत असली तरी त्यांनी आनंदाने परिस्थिती स्वीकारली आहे. लहानपणापासून कोडकौतुकानं वाढवलेली मुलं जेव्हा शिक्षणासाठी, नोकरीसाठी, लग्नामुळे किंवा अन्य कारणांसाठी परदेशी निघून जातात, त्यावेळेस त्यांच्या आई-वडिलांना आपली ‘म्हातारपणाची काठी’ हरवल्याची जाणीव होते. मुलं असतानाची आणि नसतानाची परिस्थिती यांच्यात सतत तुलना होत राहते. वृद्धत्वातली आजारपणं, महत्वाचे प्रसंग, सणासुदीचे दिवस असे कौटुंबिक सुखाचे क्षण न उपभोगण्याची आणि मुलांच्या गैरहजेरीचं दुःख करत राहण्याची वृत्ती निर्माण होते. काही पालक आपल्या जीवनातील या बदलांना योग्य रीतीनं सामोरं जायला

असमर्थ ठरतात आणि या मानसिक परिस्थितीत आपण आपल्या मुलांना गमावलं अशी भावना निर्माण होते.

आजच्या जीवनशैलीत वैयक्तिक उत्कर्षासाठी घर सोडून बाहेर पडणे युवा पिढीला अत्यावश्यक बनले आहे. परदेशात स्थायिक होणे ही बाब सोपी नसून आपली मुले मोठ्या दिव्यातून जात आहेत ह्याची जाणीव पालकांना असते. आयुष्यभर आईवडील आपल्या मुलांना सतत आपल्या पंखाखाली घेऊन बाह्यजगापासून दूर ठेवत असतात. आता ही मुलं सातासमुद्रापलिकडील परदेशात त्यांच्या पायावर एकटी कशी उभी राहतील किंवा सुरक्षित राहतील का? याची चिंता त्यांना सतावत असते. वेगळा देश, वेगळी भाषा आणि संस्कृती, दिवसागणिक बदलणारी आव्हाने, वेगवान स्पर्धा ह्यात आपल्या प्रेमाचे पाठबळ व आश्वस्त शब्द फार मोलाची कामगिरी पार पाडत असतात. त्यामुळे आपल्या नाराज दुःखी नजरा व स्वर त्यांचे मनोबल कमी करणार नाहीत ना ह्यांचे भान फार महत्वाचे आहे. पिलांच्या गगनभरारीमध्ये आनंद मानून स्वतःच्या क्षीण होणाऱ्या पंखात नवी ताकद गोळा करणे हाच आजचा युगधर्म आहे. मी माझ्या मुलांसाठी रात्ररात्र जागवली म्हणून आपण त्याचे व्याज वसुल करणार का? आई वडिलांनी मुलांना प्रेम दिले म्हणून त्याची परतफेड झाली पाहिजे ही अपेक्षा चूक आहे. तुमचे प्रेम जर मुलांच्या पायातील बेडी ठरणार असेल तर ते प्रेम स्वार्थी आहे. आईवडिलांना आजारी असताना उत्तम वैद्यकीय सेवा आणि शुश्रुषा देणे हे मुलांचे कर्तव्यच आहे. त्याचा बाऊ करणे हा प्रकार चूक आहे. प्रत्येकाला एकच भीती असते की आपल्या शेवटच्या क्षणी मुलगा/ मुलगी आपल्याजवळ असतील कि नसतील? आणि त्या शेवटच्या क्षणाचा विचार पुर्ण उतारकाळ व्यर्थ घालवतो. याउलट कधीकधी फ्लॅटमध्ये शेजारच्या खोलीत झोपलेल्या मुलाला वडिलांची शेवटची हाक ऐकू येत नसल्याचे प्रसंग आपण ऐकत असतो.

फार पूर्वीपासून मातृपितृ ऋण ही संकल्पना अस्तित्वात होती. बालक कसा असावा? तर श्रावणबाळासारखा, आईवडिलांची सेवा करणारा. हे भारतीयांच्या डोक्यात पक्कं बिंबलेले आहे. मृत्यू येत नाही तोवर आपल्या मुलाबाळांसोबत एकाच छताखाली राहण्याची संस्कृती फक्त भारतातच

मोठ्या प्रमाणावर जोपासली जाते. इतर अनेक देशात मुलं मोठी झाली की, आपल्या आईवडिलांपासून लांब राहू लागतात. मात्र हीच मुलं गरज पडेल तेव्हा आईवडिलांच्या मदतीलाही धावून जातात. भारतातही आता एकीकडे अशाप्रकारच्या विभक्त कुटुंबपद्धतीला प्राधान्य दिलं जात असल्याचे दिसून येते.

परदेशात राहणाऱ्या भारतीय मुलांविषयी सोशल मिडियामधून ही मुलं कशी स्वार्थी, बेजबाबदार आहेत, जन्मदात्या आईवडिलांना वाऱ्यावर सोडून ही मुलं स्वत: कशी चैनीत जगतात अशा प्रकारच्या चर्चा आपण नेहमी ऐकतो, वाचतो. काही अंशी हे खरेसुद्धा असते. फक्त भारतातच नाही तर इतर कुठल्याही देशांमध्ये अशी मुले सापडतीलच. पण सगळ्यांना याच एका तराजूमध्ये तोलणे चुकीचे आहे. भारतात राहून आईवडिलांची देखभाल न करणारी, वर्षानुवर्ष त्यांची तोंडे ही न पाहणारी मुलेही खुप आहेत. याउलट परदेशी राहून आईवडलांशी सातत्याने संपर्कात असणारी, भावनिक जवळीक असणारी मुले खूप आहेत. आपण जर वृद्धाश्रमात जाऊन पाहिले तर बहुसंख्य वृद्धांची मुले परदेशस्थ नसून स्वदेशस्थच आहेत असे दिसून येते.

परदेशी असले तरी मुले आईवडिलांना मुळीच विसरलेली नसतात, उलट आईवडील आणि आपले भविष्य यांच्यामध्ये निवड करायला लागल्यामुळे आयुष्यभर अपराधीपणाची भावना घेऊन ती जगत असतात. किमान ९९ टक्के मुलांना हा पर्याय निवडताना आईवडिलांना मागे सोडायला लागल्यामुळे दु:ख झालेले असते. प्रत्येक पिढी ही पुढच्या पिढीचा विचार करून निर्णय घेत असते. मागच्या पिढीशी नातं कितीही घट्ट असलं तरी प्राधान्य कशाला द्यायचे ही वेळ जेव्हा येते तेव्हा पुढच्या पिढीलाच व त्यांच्या भविष्यालाच प्राधान्य दिले जाते. शिक्षणासाठी, नोकरीसाठी.. आपल्यापैकी कित्येक लोक त्यांच्या तारुण्यात खेड्यातून शहरात आली. मग मुलांचा जन्म झाल्यावर मुलांना चांगल्या संधी मिळाव्यात, त्यांच्या आयुष्याला वेगळी दिशा मिळावी म्हणून गाव सोडून शहरात कायम स्थाईक झाले. तसाच परदेशी स्थायिक होण्याचा निर्णय आपल्या भविष्यासाठी घेतला तर त्यात गैर असे काय आहे? आता फरक एकच आहे की

अंतर खूप जास्त आहे, पण यावरही उपाय आहेत.

एका परदेशी मैत्रिणीने आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले "आईबाबांना सोडून कायमचे इथेच कसं काय राहायचं या एका प्रश्नावर विचार करण्यात आमचे कित्येक तास, कितीतरी शक्ती खर्ची पडली आहे. दर वीकेंडला इथल्या मित्र-मैत्रीणी बरोबर रात्ररात्र जागून ज्या चर्चा व्हायच्या त्यात हा विषय सगळ्यात मोठ्ठा असायचा. आम्हीही आता आईबाप आहोत. मुलांवरचं प्रेम म्हणजे काय असतं, ती अॅटॅचमेंट कशी असते याची आम्हालाही थोडीशी झलक मिळालीय. कालांतराने आपले आईवडील म्हातारे होतील, आत्ता त्यांना रिकामेपण जाणवतंच पण काही काळानं आपली खरीखुरी, प्रत्यक्ष गरज पडेल तेव्हा आपण वेळेला जाऊ शकू ना? अचानक त्यांच्या तब्येतीचं काही कमी जास्त झालं तर? देव न करो पण रात्री अपरात्री फोन तर नाही ना येणार एक दिवस? काही न बोलताच निरोप घ्यावा लागला तर..."

थोडक्यात आईवडिलांना मागे सोडल्याचे शल्य जर मुलांना सतत बोचत राहणार असेल तर पालकांनी योग्य तो निर्णय घ्यावा. एकतर परदेशी मुलाबरोबर स्थलांतरित व्हावे किंवा आम्हाला कसलीही अपेक्षा नाही, कसलेही दुःख नाही. तुम्ही आनंदाने जगा असे स्पष्ट करावे. खरंतर आजच्या ग्लोबलायझेशनच्या युगात कितीही दूर गेलेली मुलं ही स्काइप, व्हॉट्सअॅप, फेसबुक अशा संगणकीय संपर्क माध्यमातून सतत जवळ असल्यासारखीच असतात. त्यामुळे या माध्यमांचा वापर प्रकर्षानं करायला हवा. दूर गेलेल्या मुलांना त्यांच्या ठिकाणी अधूनमधून जाऊन भेटणं किंवा ती इथे भेटायला येणे ह्यात एक वेगळाच आनंद असतो.

काही पालक मुलांना सांगतात तूम्ही कामात बिझी असणार तर आमचा तिथे वेळ कसा जाणार? मला हया पालकांना सांगावेसे वाटते की तुम्ही तुमच्या तारूण्यातील कारकिर्दीची काळात तुमच्या आईबाबांना जमेल तसा थोडाथोडका वेळ दिला ना? त्यांनी त्यातच समाधान मानले ना? तसेच नातवंडे आणि तुमचे छंद यात तुम्ही आनंदाने वेळ व्यतीत करु शकता.

आपल्या परदेशस्थ मुलामुलीकडे कायमचे राहायचा निर्णय घेतला की हितचिंतक आणि स्नेही तुम्हाला अनेक सल्ले देतील, “गाशा गुंडाळून तुम्ही जात आहात पण पूर्ण विचार करा. आम्ही असल्या खूप स्टोरीज ऐकल्या आहेत की पटत नाही म्हणून परत आलेले आहेत. आता ठीक आहे पण पुढे जास्त वय झाल्यावर तिकडचा बर्फ आणि थंडी सोसण्याचा आपला पिंड नाही. मग विचार बदलावा लागेल." परिणामी पालक मुलांकडे साशंक नजरेने पाहत सैरभैर होतात.

एकदा एक मुलगा हट्टाने त्याच्या आईवडिलांना कायम परदेशी घेऊन गेला. परंतु ते कधीच तिथे रमले नाहीत. शेवटपर्यंत त्यांच्या घराची आठवण काढत असायचे. त्या मुलाचा अपराधीपणा असा की सोबत ठेवूनही तो त्याच्या आईवडिलांना सुखी ठेऊ शकला नाही. आयुष्यभर ही खंत त्याला टोचत राहिली. पालकांनी सकारात्मक विचार करून, थोडा त्याग, थोडं प्रेम आणि भरपूर समजूतदारपणा ह्यांची सांगड घालून योग्य निर्णय घेणे आवश्यक आहे.

परदेशस्थ भारतीय मुलांना दूषणे देणे आणि भारतात राहणारी मुले कशी आईबापांची सेवा करणारे श्रावण बाळच आहेत असे गोडवे गाणे हे एकाच मत्सरी मनोवृत्तीचे लक्षण आहे. आपल्या मुलांच्या प्रगतीचा आनंद मानण्यापेक्षा तो मोठा झाला म्हणून आमच्यासाठी त्याला वेळ देता येत नाही म्हणून रडणाऱ्या आईबापांनी स्वतःचे जीवन नव्या उमेदीने जगायला हवे. घरातील मुलं दूर गेल्यावर, पतीपत्नींना एकमेकांच्या सहचर्याची जास्त गरज भासते. भावनात्मक दृष्ट्या हे आवश्यक असते. पतीपत्नीचं नातं अधिक दृढ करण्याची ही एक उत्तम संधी असते. मुलांची जबाबदारी संपल्यामुळे आर्थिकदृष्ट्या खर्च थोडे कमी होतात, त्यामुळे स्वतःचे छंद जोपासणं, देशांतर्गत किंवा परदेशी प्रवास करणे, एखादा नवा व्यवसाय सुरू करणे किंवा निवृत्त होण्याचे मनसुबे रचणे, याबाबतचे विचार प्रत्यक्षात आणता येतात. खुल्या मनानं सकारात्मक विचार केला, तर अनेक सामाजिक, सांस्कृतिक गोष्टींमध्ये मन रमवून उत्साही राहता येते. आपल्या आयुष्यात असा दिवस उगवणार आहे, याचा कयास घेऊन आधीपासूनच मनाची तयारी करायला हवी. अशी मानसिकता भारतीय पालकांची होणे व त्यांना वास्तवाचे भान येणे खूपच आवश्यक आहे.

# तुटला धागा, गळले मोती

■ सौ. सुनिता बर्नड परेरा, गास, वसई.

वैशाख सरून ज्येष्ठ खुणावत होता. नैऋत्य मोसमी वारे प्रचंड वेगाने वाहत वसईच्या किनाऱ्यावर धडकत होते. बळीराजा पर्जन्याची आतुरतेने वाट पाहत होता. भाताच्या चिमुकल्या बियांना आपल्या कुशीत सामावून घेण्यासाठी धरतीमाता आसुसलेली होती. काळानुसार वसईतील परिस्थिती बदलली होती. कुपारी समाजाने कात टाकली होती. धर्मगुरूंच्या प्रेरणेने समाजात सुधारणा होऊन येथे फार मोठ्या प्रमाणात शैक्षणिक क्रांती झाली होती. ऐंशी-नव्वदच्या दशकात बरेचसे तरुणतरुणी उच्चशिक्षित होऊन मुंबईत आणि परदेशात रोजगारानिमित्त बाहेर पडत होते. तरीही शेतजमीनीचे महत्त्व कमी झाले नव्हते. भरपूर शेतजमीन असलेल्या घराण्याला खानदानी आणि उच्च पायरीचे असे गणले जात होते.

अंजू... गावातील जमीनदार आणि प्रतिष्ठीत असलेल्या शिलूची एकुलती एक कन्या! तीन भावानंतर जन्मलेले हे कन्यारत्न म्हणजे त्या कुटुंबातील अतिशय लाडके. सर्वच तिच्यावर जीव ओवाळत असत, त्यामुळेच काहीशी हट्टी आणि गर्विष्ठ झालेली अंजू दिसायला मात्र फार सुंदर, गोरीपान! तिचा नाजूक बांधा, लांबसडक केस सर्वांचे लक्ष वेधून घेत असत. तरुण दिलांची ती धडकन होती. पण अंजू मात्र कोणाचीही डाळ शिजू देत नसे. कॉलेजमध्ये SYBAला शिकणारी अंजू त्या दिवशी नेहमीप्रमाणे ५:३०ची बस पकडण्यासाठी आली. ती आधीच्या ट्रेनने आल्यामुळे कॉर्नरची जागा तिने पटकावली होती. आभाळ काळ्या मेघांनी भरून आले होते. मोसमी वारे उभारलेल्या तरुण मनाला मोहित करत होते.

आणि अशा या धुंद वातावरणात अचानक एक उमदा तरुण तिच्या शेजारी येऊन बसला. तिने हळुवारपणे कटाक्ष टाकला, तोच तो क्षण.... दोघांची नजरानजर झाली. तिने चटकन मान फिरवली आणि ती खिडकीतून बाहेर डोकावू लागली. तिच्या शेजारी बसलेला

रॉबर्ट तिच्या मनोवेधक सौंदर्याने पुरता घायाळ झाला होता. अधूनमधून तो तिच्याकडे प्रेमळ कटाक्ष टाकत होता, अचानक पवनराजाच्या सोबत जलधारांची बरसात होऊ लागली. जणू पर्जन्यराजाने त्या दोघांच्या प्रेमाला मूक संमती दर्शवली होती. तिचे वाऱ्यावर उडणारे केस रॉबर्टला स्पर्श करू लागले, आणि त्या क्षणी तो अंजूच्या प्रेमात पडला. ही त्या दोघांची पहिली भेट....

रॉबर्ट बीएमसीमध्ये पाणी विभागात अभियंता म्हणून काम करत होता. रॉबर्टची घरची परिस्थिती बेताचीच! त्याच्या कमाईवर घर चालत असे. आईवडील दोघेही शेतात राबत असत. त्यामुळे लहान भावंडाची जबाबदारी त्याच्यावर होती. रॉबर्ट अतिशय कष्टाळू आणि गुणी मुलगा होता. तो आपली संपूर्ण कमाई कुटुंबासाठी खर्च करत होता. असा हा गुणी मुलगा आज मात्र अंजुच्या सौंदर्याने घायाळ झाला होता. त्याचे एकतर्फी प्रेम बहरत होते.

त्याला धार्मिकतेची खूप आवड, त्यामुळे तो चर्चमध्ये कार्यरत होता. अनेक चर्चसंलग्न संघटनेत तो सामील होत असे. दर बुधवारी आणि शनिवारी रात्री ७:४५ची मिस्सा तो कधीही चुकवत नसे. योगायोगाने अंजूदेखील त्याच मिस्साला येत असे. त्याकाळी फोन, मोबाईल ही साधने नव्हती, त्यामुळे चर्च, तलाव, शेतमळा ह्या जागा प्रेमवीरासाठी उत्तम माध्यम बनल्या होत्या. 'शब्दावाचून उमगले मजला, मनातील मनोगत' या उक्तीनुसार अंजू आणि रॉबर्ट यांचे प्रेम चर्चमध्ये, बसमध्ये बहरू लागले. 'नयन से नयन मिले, प्यार के संगीत जुड गये' म्हणत दोघेही एकमेकांच्या प्रेमात आकंठ बुडाले. मिस्सा सुटल्यावर बाहेरील गॅलरीमध्ये तासनतास गप्पा रंगत असत. एकमेकावाचून त्यांना करमेनासे झाले. दोघेही बिनधास्तपणे भटकू लागले.

एके दिवशी दोघे गिरगाव चौपाटीला फिरायला गेले असता अचानक अवकाळी पाऊस बरसू लागला, छत्री नसल्यामुळे दोघेही चिंब भिजले. त्यातच काळोख पडू लागला होता, पाऊस काही थांबण्याचे नाव घेत नव्हता. दोघेही तसेच भिजत भिजत बसस्टॉपच्या शेडखाली आले. सर्वांग भिजलेल्या अंजूचे रूप आज खूप खुलून दिसत होते. रॉबर्ट तिच्या सुंदर रुपाकडे न्याहाळून पाहू लागला. अवेळी पाऊस पडल्यामुळे हवेत गारठा वाढला होता. अंजू थंडीने कुडकुडत होती. रॉबर्टने तिचा हात हातात घेतला, त्याचा तो राकट स्पर्श अंजूला हवाहवासा वाटू लागला. दोघेही

बेभान होऊन एकमेकांकडे आकर्षिले गेले. रॉबर्टने अंजूला गच्च मिठी मारली आणि अंजूही त्याच्या मिठीत साखरेसारखी विरघळली. कितीतरी वेळ दोघे एकमेकांच्या मिठीत होते. अचानक पाऊस थांबला आणि ते भानावर आले. मनासोबत शरीरेदेखील आसुसलेली होती.

गावातील युवक संघटनेची सहल लोणावळा येथे आयोजित केली होती, अंजू आणि रॉबर्ट दोघेही सहलीला गेले. तेथे रात्रीच्या थंडीत पेटवलेली शेकोटी आणि शेकोटीभोवती चाललेला संगीत कार्यक्रम दोघांनाही उत्तेजित करून गेला. दोघांचा 'मिले, मिले, मिले दो बदन' या रोमँटिक गाण्यावरील नृत्य त्यांना अधिक जवळ घेऊन आले. शेकोटी कार्यक्रम संपला, मात्र यांच्या तनामनातील प्रणयाची आग अजून विझली नव्हती, दोघेही एकमेकांच्या मिठीत होते. रॉबर्टचा राकट स्पर्श आणि अंजूचा नाजूक बांधा यांचे मिलन झाले. सहल संपली, पण अंजू आणि रॉबर्ट यांच्या प्रेमाला बहार आला. आता तर एकमेकांशिवाय ते राहूच शकत नव्हते. जळीस्थळी, काष्ठीपाषाणी रॉबर्टला अंजू दिसू लागली, तो तिच्यासाठी पागल झाला. तीही त्याच्यासाठी वेडी झाली. 'दो दिल मिल रहे है, मगर चुपके चुपके' पण ही चुप्पी किती दिवस टिकणार होती? मोगरा उमलला की त्याचा सुगंध संपूर्ण परिसर परिमळून टाकतो. अगदी तसेच अंजू आणि रॉबर्ट यांचे प्रेम प्रकरण संपूर्ण गावभर पसरले.

अंजूच्या श्रीमंत घरातून विरोध झाला, पण तिच्या हट्टी स्वभावापुढे तिचे कुटुंब नमले आणि त्यांनीही या नात्याला समंती दिली. दोनतीन वर्ष अंजू-रॉबर्ट यांचे प्रेम प्रकरण असेच चालू राहिले. अंजूचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर लग्न करण्याचा निर्णय घेण्यात आला. सगळे कसे मनासारखे जुळून आले होते... पण नियतीला हे मान्य नव्हते... कुणाची तरी दृष्ट नजर लागली. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर अंजू मुंबईला एका नामांकित कार्यालयात नोकरी करू लागली.

आज तिचा वाढदिवस होता, त्यामुळे तिने सुंदर गुलाबी रंगाचा पोशाख परिधान केला होता. हलकासा मेकअप केला होता. ओठाला गुलाबी रंगाची लिपस्टिक लावलेली होती. अंजू मुळातच देखणी होती, त्यात आज ती खूपच सुंदर दिसत होती. सर्वांसाठी तिने केक आणला होता. ती बॉसच्या केबिनमध्ये शिरली आणि बॉस वेड्यासारखा तिला न्याहाळत राहिला. असे विलक्षण सौंदर्य त्याने

आजवर पाहिले नव्हते. बॉसने तेवढ्याच प्रेमाने तिचा हात दाबला, ती देखील समजून गेली. असं म्हणतात की, सहवासाने प्रेम वाढते, अंजू आणि बॉस यांच्या बाबतीत असेच झाले, हळूहळू दोघेही एकमेकांच्या प्रेमात पडले. हे कसले प्रेम? हे फक्त एक आकर्षण होते. बॉसच्या श्रीमंतीचे, पदाचे आणि व्यक्तिमत्त्वाचे! अंजूचा नखरेल स्वभाव आणि विलक्षण देखणेपणाला बॉस भुलला होता. रॉबर्टपेक्षा तिला आता बॉस आवडू लागला होता. ती रॉबर्टला टाळू लागली. प्रेमाची जागा द्वेषाने घेतली. रॉबर्ट अक्षरशः उद्ध्वस्त झाला. तो वाईट व्यसनाच्या आहारी गेला. चर्चमध्ये कार्यरत असणारा रॉबर्ट आता दारूच्या बारमध्ये दिसू लागला. त्याने फार मनाला लावून घेतले. अंजू अशी कशी वागू शकते? ही खंत त्याच्या मनाला टोचू लागली. दारूच्या आहारी गेल्यामुळे नोकरी सुटली, त्याचे कुटुंब उध्वस्त झाले. गरीब आईवडील आणि भावंडे यांना काय करावे तेच समजेनासे झाले. रॉबर्ट वेड्यासारखा वागू लागला. वाढलेली दाढी, विस्कटलेले केस, मळके कपडे अशा अवतारात त्याने स्वतःला घरात कोंडून घेतले. रात्रंदिवस अंजूच्या नावाचा तो मंत्र जपू लागला. त्याला अंजूशिवाय जगणे नकोसे झाले. प्रेमावरचा विश्वास उडाला आणि ती काळरात्र उजाडली. रॉबर्टने विष प्राशन करून स्वतःला संपवले. प्रेमाचा धागा तुटला आणि विश्वासघाताचे मणी मातीमोल झाले. 'अंजूच्या विश्वासघातामुळे रॉबर्टचा मृत्यू' ही बातमी संपूर्ण गावभर पसरली आणि रॉबर्टसाठी सारा समाज हळहळला.

अंजूच्या बॉसच्या कानावर ही खबर गेली आणि तो हादरला. त्याने अंजूसारख्या विश्वासघातकी मुलीसोबत असलेले संबंध तोडले. अंजू एकाकी पडली. रॉबर्टचे विरह अश्रू तिच्या जीवनासाठी शाप ठरले. गावात झालेल्या बदनामीमुळे तिचे लग्न जुळत नव्हते. वयाची तिशी ओलांडल्यानंतर कसेबसे तिच्या कुटुंबीयांनी तिचे लग्न परधर्मातील एका ४५ वर्षीय विधुरासोबत लावून दिले. पण तिचा संसार कधीही सुखी झाला नाही. नवऱ्याचा संशयी स्वभाव आणि दारूची सवय ह्यामुळे तिची कुचंबणा होऊ लागली. तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करत असतानाच रॉबर्टला फसवल्याचे शल्य मरेपर्यंत तिचे पाठ सोडणार नव्हते.

'ही आहे एक प्रेमकहाणी, न फुललेली, न बहरलेली... अधुरी, आणि विश्वासघातकी'

# निवड

■ आशा (पेट्रेशिया) गोन्सालवीस, मराडी / बोरिवली (प.)

“अगं, आज तुला उशीर झाला का, सगळ्या चर्चगेट आहेत.” समोरची स्तेला आंटी कळकळीने सांगत होती.

“हो, चालेल. मी काय एवढ्याशा जागेतही अँडजेस्ट होते. काल घरी पाहुणे होते. जेवायला त्यामुळे सगळाच उशीर झाला आणि एरव्हीपण झोप कुठे होते पूर्ण. मग दादरपर्यंत १ तास झोप होऊन जाते. पण आज काही मिळणार नाही झोपायला. भायंदरनंतर रेटारेटी चालू होईल.”

स्तेलाआंटी व ग्रूपमधल्या सगळ्या वसई येईस्तव पेंगायला लागल्या म्हणून बरं झालं, नाहीतर कोण पाहुणे, काय गं... हजार चौकशा केल्या असत्या. डोळे मिटून विचारांच्या गाडीवर एव्हाना ती आरूढ झाली. काल घरी आलेला मुलगा तसा बरा आहे. घरदांज आहे, बँकेत आहे. परमनंट झाला आहे. घरदार, जमीनजुमला सगळं आहे. दोन भाऊ, दोन बहिणी... हा सगळ्यात मोठा म्हणजे जबाबदाऱ्या आहेत पण खानदानी आहेत. सासूसासरे तालेवार आहेत. होकार दिला आहे मी. पण घाई नाही ना होत माझी... छे.. छे.. कसली घाई...आत्ताशी मी २१ पूर्ण केलं.

बीएमसीत मेरीटवर मस्त शिक्षिकेची नोकरी आहे. तसे मागे लागलेले... इथूनतिथून "निरोप' (मागण्या) खूप आहेत. पण काल आलेला मुलगा अगदी योग्य आहे. बँकेत जाँब म्हणजे secure job. सगळं चांगलं आहे. तरी माझं मन कुठेतरी घुटमळतं का.. शालेय जीवन, काँलेज, डी. एड हे सगळे पार पडताना कमी का मोह आले ? पण कधी कोणात अडकले नाही, मग...

त्या ग्रुपमधला ५.३०च्या ट्रेनसाठी वाट बघणारा, तो का असा अधूनमधून डोकं वर काढतो? त्याच्याविषयी मनात सुतरफेणीसारखे गोड वेटोळे का झाले आहे? आत्ताशीच लागलाय वाटतं जाँबला... दादरला उतरून बाहेरच्या ब्रिजवरून घाईघाईने जाताना दिसतो. म्हणजे सेन्ट्रलने जात असावा. नक्कीच सिमेन्स, प्रिमियर नाहीतर गोदरेज कंपनीत असावा. का त्याचे बघणे मला आवडते? हवेहवेसे वाटते? एकदा धीर करून मी नजर दिली होती... त्यानेही हलकेसे स्मित केले. अंग शहारले होते. अख्खा दिवस मी नुसती तरंगत होते. उंच, गोरा, नेव्ही ब्ल्यू शर्ट, मोतीकलरची पँन्ट, रूबाबदार वाटतो. हातात बँग नसते म्हणजे कँन्टिनलाच जेवत असेल... जाऊ दे, पण नजरेचीच भाषा बोलतो. त्यापुढे त्याची गाडी सरकत नाही.

आवडत असावी का मी त्याला... बहुदा नसेल किंवा त्याची कोणी असेल आधीच... पण एकदा तो मी त्या ग्रुपच्या बाजूने प्लँटफाँर्मवरून जात होती, तेव्हा तेरी चाल है नागीन जैसी... की जोगी तुझे... असं गाणं गुणगुणल्याचे अस्पष्ट ऐकलं होतं. नाव काय, गाव कोणतं काही माहित नाही. कोणाला विचारावं... माझा मामापण असतो त्यांच्या ग्रुपला. पण आपणहून असं विचारणं... मामाला काय वाटेल?

कुठे उतरणार? बोरिवलीच्या बायका चढल्या आणि अधाशासारख्या विचारत होत्या... त्यात माझी विचाराची गाडी थांबली... मी परत डोळे मिटले... त्याच्याच विचाराची जपमाळ जपू लागली. काहीही असो... पण तो माझी वाट बघत असतो रोज... हे मलाही आत्ताशा कळत होतं. पण स्माईल तेही मित्रांच्या नकळत... एव्हढ्यावर कसं समजू? कि मी त्याला जोडीदारीण म्हणून हवी आहे?...

माझी रोज वाट पाहतो हे कळतं मला. तरीपण.. त्याच्या मनातलं कसं ओळखू? आठवतं मला, मागच्या महिन्यात मी वाढदिवसाला छान साडी, गजरा माळला होता. तेव्हा त्याने हाताने सुंदर दिसते असे केले होते व queen असे चिडवले होते. पण मग तो बोलत का नाही... ओळख तर वाढवायची होती नं...

जाऊ दे... आता आपली सोयरीक झाली आहे. हे असले दुसऱ्याचे विचार करणे बरे नाही. पण, मग सारखं मनाला असं का वाटतं, की आपण लग्नाची घाई करतो, त्याला एकदा विचारायला हवं का? ओळख वाढवावी का?? कदाचित चांगल्या संस्कारातला असल्यामुळे त्याला माझ्याशी बोलायचा धीर होत नसावा... किंवा बहिण नसेल, कधी मुलींशी बोलला नसेल... मी तर फुलपाखरांसारखी... सगळ्यांशी बोलणारी... मी एकदा बोलायला हवे होते त्याच्याशी...

एकदा मामा घरी आला होता तेव्हा सांगत होता... आमच्या ग्रुपमधली काही पोरं तुला queen बोलतात. पण मी त्यांना तू माझी भाची आहे हे काही सांगितलं नाही. दोघे तिघे तुझ्यावर खूप फिदा आहेत. त्या दोघांतिघांमध्ये तोही असेल कदाचित...

जाऊ दे.. आता लग्नाची तयारी... भविष्याची स्वप्ने... तो कदाचित माझ्या मनोराज्यातला राजकुमार असेल. खऱ्या आयुष्यातला नसेल. बाकी त्या देवाच्या हाती... त्यानेच जोड्या जुळवल्या आहेत वरून... परवा त्याला शेवटचे पाहिले. उद्यापासून down train सोडायची... रोज डायरेक्ट गाडीने जायचं.... म्हणजे नजरभेट नको, आतल्या आत अपराधीपण नको. ज्या गावी जायचे नाही तो रस्ता शोधा कशाला? असं मनाला समजावलं खरं, पण आत कुठेतरी एक सल राहून गेली... निवड चुकली तर नाही ना....

---

जगण्याचा मंत्र व्यवस्थित शिकला
की तंत्रही विनासायास अवगत होत असते
जगराहाटीसाठी पुस्तकी ज्ञान हवेच
पण व्यवहारज्ञानाचे पारडे कधीही भारी
असत

जीवनात काही प्रश्न उत्तरासह मिळतात
काहींची उत्तरेच कुठे नसतात
पदरच्या उत्तराचे ठिगळ लावताना
प्रश्नचिन्हे कायम अनुत्तरीत राहतात

# प्रतिफळ

■ फ्रँक डॉ. मिरांडा, उमराळे, वसई

रात्रीचे ९ वाजले होते, मनिकुमार भाडे संपवून घरी येत होता. तो रिक्षाचालक असल्याने त्याची घरी येण्याची वेळ ठरलेली नसायची, प्रवाशी नसले तर लवकर, प्रवाशी असले तर उशीरा, असा त्याचा दिनक्रम असायचा. शिक्षणापासून वंचित राहिल्याने, चांगली नोकरी करण्याचे त्याचे स्वप्न कायम अपूर्ण राहिले होते, आता उपजिविकेसाठी तो रिक्षा चालवत होता.

नेहमीप्रमाणे तामीळ गाणे ऐकत तो घराच्या दिशेने जात होता. तो ज्या भागात रिक्षा चालवत होता तेथून त्याचे घर ९ किमी दूर होते आणि घराचा रस्ता एकदम भयानक होता. सर्वत्र ओसाड जमीन, लहान खडकाळ रस्ता, रस्त्याला पथदिवेही नव्हते, पण त्याच्यासाठी हे सर्व नवीन नव्हते. काही अंतर पुढे गेल्यावर त्याला रस्त्यात एक सफेद कार दिसली. ह्या खेड्यात कार घेऊन कोण आले असेल ह्या कुतूहलाने त्याने रिक्षा थांबवली आणि बाहेर येऊन पाहिले. कारमध्ये दोन व्यक्ती होत्या. एक महिला आणि एक पुरुष. त्याने त्यांच्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला, पण त्यांना तामिळ येत नव्हती आणि मनिकुमारला इंग्रजी समजत नव्हती. शेवटी तुटक इंग्रजी आणि हातवारे करून त्यांनी मनिकुमारला सांगितले की त्यांना दूर शहरात जायचे आहे.

त्या भागात कसल्याही सुविधा उपलब्ध नव्हत्या, नाही मोबाईल नेटवर्क, नाही जास्त लोकवस्ती, नाही सार्वजनिक वाहतूक. त्या दोघांना मदतीची नितांत गरज होती हे मनिकुमारने ओळखले. त्याने वेळ पाहिली, रात्रीचे ९:१५ वाजले होते. त्याने त्यांना रिक्षात बसवले, त्याच्या घरी आणले. त्याचे घर म्हणजे एक छोटीशी झोपडीच म्हणावी. घर छोटे असले तरी, त्याने ते स्वच्छ आणि नीटनेटके ठेवले होते. त्याच्या वृद्ध आईने त्यांच्यासाठी बनवलेले जेवण त्यांना दिले. ते जेवण करत होते तोवर मनिकुमारने आंघोळ करून घेतली

आणि कमरेभोवती लुंगी गुंडाळून बाहेर आला.

आपल्या आईला तामिळमध्ये काहीतरी सांगून, त्याने तिचा निरोप घेतला आणि त्यांना घेऊन शहराच्या दिशेने निघाला. भाषेचा अडथळा असल्याने प्रवासादरम्यान त्यांचा काहीही विशेष संवाद झाला नाही. जवळपास दीड तास प्रवास केल्यानंतर मनिकुमारने त्यांना हॉटेलवर पोहचवले. त्यांनी त्याला आत बोलावले आणि हॉटेलमधील स्थानिक व्यक्तीच्या मदतीने त्याच्याशी संवाद साधला. मनिकुमारने ज्यांना अडचणीत मदत केली ते मुंबईहून येथे आले होते. त्यांची चेन्नईत फॅक्टरी होती आणि त्यांना दुर्गम भागात जमीन हवी होती त्यासाठी ते त्या गावात आले होते, पण दुर्दैवाने त्यांची कार बंद पडली. त्या भागात पहिल्यांदा आल्याने आणि दळणवळणाची कोणतीही सुविधा नसल्याने ते तेथेच अडकून पडले होते. पण मनिकुमार त्यांच्यासाठी देवदूतासारखा प्रकट झाला होता.

पूर्ण दिवस मेहनत करून थकून घरी आल्यानंतर, जेवण आणि आराम न करता त्यांना घेऊन परत घरापासून दूर येण्याची तयारी दाखवलेल्या मनिकुमारला त्यांनी त्या पंचतारांकित हॉटेलात जेवण दिले. ते त्याच्यासोबत बसले आणि त्याची माहिती घेऊ लागले. तो महिन्यापोटी किती पैसे कमावतो, त्याच्यावर कोणाची जबाबदारी आहे हे त्यांनी जाणून घेतले आणि त्याने केलेल्या निस्वार्थी मदतीबद्दल त्यांनी त्याला त्यांच्या कंपनीत चांगल्या पगाराची नोकरी दिली. मनिकुमारने त्यांचे मनापासून आभार मानले आणि त्यांचा निरोप घेतला.

मनिकुमारचा आनंद गगनात मावेनासा झाला. अफाट मेहनत करून महिण्याकाठी ८-९ हजार कमावणाऱ्या मनिकुमारला २० हजार पगाराची पक्की नोकरी तर मिळालीच, पण त्याखेरीच चांगल्या कंपनीत नोकरी करण्याचे त्याचे अपूर्ण स्वप्नही पूर्ण झाले. हसत-हसत त्याने रिक्षा सुरू केली आणि पुन्हा घराच्या दिशेने निघाला.

जीवनात प्रत्येक गोष्ट फायद्यासाठी न करता काही गोष्टी सेवा म्हणून केल्या तर त्याचे प्रतिफळ हे निश्चित मिळते.

# सांजसावल्यातील तेज

■ डॉ. नेन्सी विन्सेंट डिमेलो, गास, वसई

आज त्यांचा साठावा वाढदिवस होता. त्यांचे अंत:करण जड झाले होते. आज त्यांच्या सेवेचा अखेरचा दिवस होता. वयाच्या विशीत ज्या नोकरीला सुरुवात केली होती, तिला आज पूर्णविराम लागणार होता. पूर्ण जाहले म्हणण्याची वेळ येऊन ठेपली होती. या कामाच्या व्यापात वयाची साठी कधी येऊन ठेपली हे त्यांना कळलेच नाही.

ते मोठ्या अधिकारपदावर कार्यरत होते. सामान्यांच्या भाषेत ते मोठे साहेब होते. साहेब, सर या संबोधनांशिवाय कोणी त्यांना आवाज देत नसे. त्यांच्या ऑफिसबाहेर सतत गर्दी असे. त्यांच्याकडे येणाऱ्या सर्वांशी ते अत्यंत प्रेमाने व आपुलकीने बोलत असत आणि आपल्या परीने त्यांची कामे ते विनाविलंब करत असत. गरीब-श्रीमंत, परिचित-अपरिचित या गोष्टीचा त्यांनी कधी विचार केला नव्हता. आपल्या कारकिर्दित समाजकल्याणकारी जितकी कामे करता येतील तितकी त्यांनी केली होती याचे त्यांना आज समाधान होते. परिणामी सतत अभिवादनासाठी झुकणाऱ्या माना, सतत वाजणारी फोनची रिंगटोन, फुलांचे मोठे सुबक गुच्छ यामुळे त्यांचे ऑफिस सतत चैतन्याने सळसळत असे. ऑफीसचा एक कोपरा रंगीत वेष्टनातील छोटीमोठया साभार भेटवस्तूंनी सतत व्यापलेला असायचा. मोठया श्रीमंतांची, नेत्यांची, व्यापाऱ्यांची स्नेहभोजनांची निमंत्रणे हात जोडून वाट पाहत असायची. सार्वजनिक मंडळे, संस्था संघटना ह्यांच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन त्यांना बोलवणाऱ्यांची रीघ लागली असायची.

आणि आज त्यांची सेवापूर्ती आहे. अचानक आयुष्यातली धावपळ गडबड संपणार होती. सतत कार्यमग्न राहण्याची शरीराला, मनाला सवय झालेली होती. फोन एकदम निपचित, निर्जीव भासू लागला होता. माणसांची रेलचेल थांबली होती. सगळी कामे नेहमीप्रमाणे चालू होती. आपली खुर्ची दुसऱ्या कोणासाठी तरी त्यांनी हसत रिकामी करुन दिली होती.

पण आता हे रिकामेपण फक्त खुर्चीपुरते नसून त्यांच्या आयुष्यातही उतरू पाहत होते.

कोणी व्यक्ती एखाद्या वरिष्ठ पदावर असेल अथवा कोणी साधा कारकून, कामगार असेल तरी प्रत्येकाच्या जीवनात थोड्याफार फरकाने रिकामेपणा सेवानिवृत्तीच्या अथवा म्हातारपणीच्या काळात दिसून येतो. साधारणतः मनुष्याचे ऐन तारुण्य कामाच्या धकाधकीत गेलेले असते. त्यामुळे आता मी काय करू? या विचाराने नोकरीतूनच नव्हे, तर आयुष्यातून निवृत्त झाल्यासारखे असे काहीना वाटते. आपल्यावर समाजाचे लक्ष केंद्रित राहणार नसून समाज आता आपल्याला विसरत जाणार आणि त्याच्या विसरण्याचा वेग हा आपल्या अपेक्षेपेक्षा खूप जास्त असेल ह्यामुळे दुःखी होणे योग्य नाही. हा तर जगराहाटीचा नियम असून तो कोणालाही चुकला नाही. आपण लोकांचे कितीही भले केले असले तरी एकसारखे आपल्याला बघायला कोणी येणार नाही. आपला इतिहास कितीही उज्ज्वल आणि दैदिप्यमान असला, आपण कितीही प्रसिद्धीच्या झोतात वावरले असले तरी विशिष्ट काळानंतर ते दिवस राहत नाहीत हे सत्य पुरातन आहे. त्यामुळे निवृत्त झाल्याक्षणी समाजातील आपले स्थान अचानक कोणीतरी काढून घेतले आहे, आपण दुय्यम आहोत असे वाटणे निरर्थक आहे.

याउलट काहीनी सेवानिवृतीनंतर काय काय करावे याचे नियोजन आधीच केलेले असल्यामुळे त्यांच्या फक्त कामात बदल होत असतो. निवृत्ती म्हणजे आराम, सर्व जबाबदारीतून मुक्तता असे साधारणत: असते. निवृत्तीच्या वयात येईपर्यंत मुले मोठी होऊन नोकरी लग्न संसार या टप्प्यावर पोचलेली असतात. नातवंडेदेखील आलेली किंवा येऊ घातलेली असतात. असे असले तरी सर्वांच्या नशिबी सेवानिवृत्तीनंतर विसावा असतोच असे नाही. काहींना शेवटच्या क्षणापर्यंत कौटुंबिक जबाबदाऱ्याचे ओझे वाहावे लागत असते तर काहीचा ऐन सुखाच्या क्षणी जीवघेण्या आजाराशी संघर्ष सुरु होतो.

पूर्वी निवृत्तीनंतर हाती येणारा पैसा खूप कमी असायचा. एकत्र कुटुंब असल्याने जबाबदाऱ्याही खूप असायच्या. पण आता असे फार कमी आढळते. कुटुंबे आता लहान झाली आहेत. बहुतांशी मुले चांगली उच्चशिक्षित असल्यामुळे त्यांच्याकडे आर्थिक स्थैर्य असते. "तुमचे

पैसे तुम्ही मौजमजा करण्यासाठी संपवा, आम्हाला तुम्ही शिकवले व पायावर उभे केले तितके पुरेसे आहे. आम्हाला आणखी काही नको" असे दिलखुलासपणे सांगणारी मुले आजकाल दिसून येतात. या उलट आईवडिलांच्या निवृत्तीनंतर येणाऱ्या पैशाचे किती हिस्से करायचे, काय काय करायचे याचे मनसुबे रचून आईवडिलांवर भावनिक दबाव आणणारे महाभागही खूप आहेत. जमापुंजीची नाईलाजास्तव वाटणी केल्यानंतर म्हातारपणात आपले कसे होईल? आपली मुले आपली काळजी घेतील का? या विचाराने निराशाग्रस्त होऊन अशी वृध्द मंडळी खंगत असलेली आपल्याला दिसतात.

आपल्या समाजात आजही संस्कारी मुले आपली कर्तव्य नेमाने, निस्वार्थीपणे पार पाडत आहेत. आई-वडिलांकडे पैसा असो वा नसो त्यांच्या जीवाचे हाल मुले होऊ देत नाही हे अभिमानास्पद सत्य आहे. तरीपण काही गोष्टी भावना बाजूला ठेवून ज्येष्ठ लोकांनी विसरू नये. वृद्धत्व आले म्हणजे भविष्य संपले असे नसते. आपण वृद्ध झाल्यावर आपल्यासमोर काय वाढून ठेवले असेल असा विचार न करता काही ज्येष्ठ आपल्या जीवनभराची जमापुंजी आपल्या मुला-मुलीत वाटून टाकतात किंवा त्यातील मोठा हिस्सा परदेशवारी, पर्यटन यात घालवतात. यामागे विचार असा असतो की जिवंतपणी यथेच्छ जगून घ्यावे, मेल्यावर पैसे काय बरोबर नेणार आहोत का?.. रास्त आहे हे, पण जर का आयुष्याच्या अस्ताला अचानक दीर्घ दुर्धर आजारपण उद्भवले तर... कधीकधी आपल्याकडे भरपूर पैसा आहे, संपत्ती आहे त्यामुळे सगळे आपली सेवा करतील, प्रेमाने वागतील अशी भ्रामक समजूत बाळगून स्वभावातील आडमुठेपणा कायम ठेवला जातो. त्यांनी समाजात आपल्यापूर्वी काही वृद्धांना काय भोगावे लागले आहे हे वेळ काढून पाहावे. सोयीस्कररित्या त्यावर दुर्लक्ष करुन आपली गोष्ट वेगळी आहे अशा भ्रमात राहण्याचा अव्यवहार्यपणा टाळणे हिताचे आहे. थोडक्यात स्वभाव, वाणी, पैसा आणि आरोग्य ह्यात समतोल राखणे अनिवार्य आहे.

आज निवृत्तीनंतरचे जीवन पूर्वीइतके कंटाळवाणे वा निरस राहिलेले नाही. निवृत्तीच्या आधीपासूनच तयारी करून काही छंद जोपासले असतील तर जीवन आनंददायी बनते. तरुण पिढीशी नातेसंबंध चांगले कसे राहतील, ह्याकडे लक्ष द्यायला हवे. आज असंख्य ज्येष्ठ

आहेत जे अगदी सत्तरी पार केल्यानंतरही सक्रीय आहेत. आपल्या समाजात अगदी चर्चपासून मिशन भागापर्यंत ज्येष्ठ नागरिक उत्साहाने कार्यरत असल्याचे दिसतात. त्यांनी नोकरीच्या खुर्चीशिवाय आपले स्वतःचे अस्तित्व निर्माण केलेले आहे. स्वतःचा आत्मसन्मान, सुख, आरोग्य आणि स्वतःचे अस्तित्व... सारे अबाधित ठेवून स्वतःला सक्षम ठेवले आहे. काही वेळेला असे आढळून येते की तारुण्यातील व्यापामुळे तारुण्यात सामाजिक कार्यात इच्छा असूनही काहींना योगदान देता आले नसते. अशांना 'इतकी वर्षे कुठे होतात?' हे बोल सर्रासपणे ऐकावे लागतात. तेव्हा कोण काय म्हणते याकडे लक्ष न देता, आपण आपली आब राखून आपल्या ज्ञानाचा समाजाला फायदा करून देत रहावे.

आपण जन्मभर ज्या मुलांच्या मागे धावलो ती आपापल्या मार्गांनी उडून गेलेली असतात. कालपरवापर्यंत तुमच्याकडे पैसे मागणारी मुले आज अचानक, "काही लागले तर सांगा" असे म्हणतील तेव्हा समजावे की आता मुलांचा विचार करण्याची गरज नाही तर आपला स्वतःचा विचार करणे गरजेचे आहे. संसारासाठी, मुलांसाठी जगता जगता स्वतःसाठी जगायचे राहूनच गेलेले असते. आपली मुले, आपले नातेवाईक आपला वृद्धत्वाचा काळ आनंदी बनवतील यात शंका नाही पण त्यांच्यावर विसंबून न राहता. स्वतः आधीपासून तयार राहावे. म्हातारे नाही तर ज्येष्ठ व्हावे. म्हातारपण लपवावेसे वाटते तर ज्येष्ठत्व दाखवावेसे वाटते. ज्येष्ठत्व अनुभवसंपन्न, विनम्र व संयमी असते. विचारले तरच ज्येष्ठ व्यक्ती सल्ला देते वा सुचविते. ज्येष्ठत्व दुसऱ्याला आधार देते. आनंदाचा शोध घेत घेत मार्गक्रमण करणे हेच खरे निवृत्तीनंतरचे कार्य. प्रत्येक घरातील ज्येष्ठांनी असे राहायचा प्रयत्न केला तर संध्याछायांना न भिता त्यांना आणि त्यांच्या मुलाबाळांनाही समृद्ध जीवन जगता येईल आणि त्यांच्या जीवनात आनंदाचा झरा वाहू लागेल. शेवटी सकल निवृत्त किंवा ज्येष्ठ 'यंग सिनिअर्स' लोकांना हा आनंदाचा ठेवा मिळो हिच प्रार्थना.

nvd1602@gmail.com.

# पश्चिमेकडची गोष्ट

**■ मुकेश माचकर, संपादक ‘मार्मिक’**

डिसेंबरचा महिना. तारीख २३. एक म्हातारबुवा आणि त्यांची पत्नी हे दोघेच घरात. एक मुलगा आणि एक मुलगी अशी दोन मुलं वेगळय़ा भागांमध्ये स्थिरावलेली. वर्षानुवर्षांत दोघांची फेरी होत नाही. म्हातारबुवा बराच वेळ घरात अस्वस्थ आणि संतप्त आहेत. त्यांच्या मनात काहीतरी खदखदतंय. ते मनोमन निर्धार करतात आणि फोन खेचून नंबर फिरवतात. पलीकडे मुलगा.

“हाय पॉप्स, गुडमॉर्निंग...''

“गुडमॉर्निंग म्हणण्यासारखी परिस्थिती नाहीये बेटा. मी काय सांगतोय ते जरा नीट ऐक. मी तुझ्या आईपासून वेगळा होतोय. आम्ही घटस्फोट घेतोय.”

पलीकडे मुलगा अवाक्. त्याचे आईवडील हे जगातलं एक आदर्श जोडपं म्हणून सगळीकडे फेमस आहेत. त्यांच्याकडे पाहून लोक एकमेकांना सुखी संसाराचं उदाहरण देतात. या दोघांमध्ये कधी काही बेबनाव झाल्याचं ऐकलेलंच नाहीये त्याने आणि आज अचानक घटस्फोट!

“पप्पा, बरे आहात ना! काय झालं तरी काय असं?”

“हे पाहा. मी ४५ वर्षं तिच्याबरोबर निमूटपणे संसार केलेला आहे. तुमच्या जन्मानंतर तुम्हाला काही कमी पडू नये, आईबाप दोघांची माया मिळावी म्हणून मी तिची कटकट सहन करत आलो. तुम्हाला कधी माझं दु:ख दाखवलं नाही. पण तिच्या रोजच्या कटकटींना मी वैतागलेलो आहे. आता माझ्यावर काही जबाबदारी नाही. या वयात तरी मला सुखाने, शांतपणे आणि समाधानाने जगण्याचा अधिकार आहे, हे तूही मान्य करशील. तेव्हा आता माझ्या मनधरण्या करू

नकोस. आयम गेटिंग डिव्होर्स्ड. आता तुझ्या बहिणीलाही मी हेच सांगणार आहे फोन करून!"

"पपा, प्लीज डोन्ट बी अ फूल. घाईघाईत निर्णय करू नका. मी उदय़ाच येतो तिकडे. आत्ता लगेच फ्लाइटचं बुकिंग करतो. मी आल्याशिवाय काहीही ठरवू नका."

म्हातारबुवा त्याच तिरीमिरीत लेकीलाही फोन करून तीच बातमी देतात. लेकीशीही तेच बोलणं होतं आणि तीही तेच सांगते, "मी उदय़ाच येते तिकडे. विमानाचं तिकीट काढते लगेच. पण, मी येईपर्यंत प्लीज काही करू नका."

शेजारी स्वेटर विणत बसलेल्या म्हातारबाईंचे डोळे विस्फारले आहेत, तोंडाचा आ वासलेला आहे. फोन ठेवल्यावर म्हातारबुवा बायकोला डोळा मारतात आणि मिष्कीलपणे हसत म्हणतात,

"अशी वेडगळासारखी काय बघत बसली आहेस? उठ. तयारीला लाग. इतकी वर्षं सुनासुना ख्रिस्मस साजरा केल्यानंतर यंदा ख्रिस्मसला दोन्ही पोरं येताहेत आपल्याकडे. तीही स्वखर्चाने. मेरी ख्रिस्मस!"

(आधारित)

## असं काहीच नसतं

असं काहीच नसतं की,
काही करताच येणार नाही.
असं काहीच नसतं की,
आता जगताच येणार नाही.
एकदा हे उमजल की,
असं काहीच नसतं की,
जे कधीच सूटणार नाही;
मग कितीही आणि काहीही संपलं तरी,
बरच काही सापडत राहतं,
जे कधीच संपणार नाही.

■ **सबिना फोस (गास, वसई), ९१५८२२३५५२**

# बाळ जन्मला

▪ क्लेमेंट डिमेलो, नंदाखाल, वसई

भ्रमणध्वनी - 9082318532/ 9011574814

आज चोवीस डिसेंबर प्रभू ख्रिस्ताचा जन्मदिवस. रात्र जणू सजली होती. चर्च दिपमाळांनी सजवण्यात आलं होतं. चर्चच्या प्रांगणात नाताळगोठा (ख्रिस्तजन्माचा देखावा) उभारण्यात आला होता. मरीया, जोसेफ अन मेंढपाळांच्या मूर्ती योग्य ठिकाणी ठेवण्यात आल्या होत्या. फक्त बाळ येशूची मूर्ती तेवढी ठेवण्यात आली नव्हती. ती दरवर्षाप्रमाणे रात्री बाराच्या ठोक्यालाच मरीयामातेच्या पुढ्यात ठेवली जायची.

त्या चर्चसमोरच्या फूटपाथवर गरीब जोडपं राहत होतं. त्यांच्याकडे दोन गाढवं होती. त्या गाढवांच्या पाठीवर मातीने भरलेल्या गोण्या लादून ती माती एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेण्याचं काम ही नवरा बायको करत होती. आज दिवसभर मातीकाम करून ते दोन जीव प्रचंड थकले होते. त्या फूटपाथवर अंग टाकून ते दोघे पडल्या पडल्या दिपमाळांनी सजलेल्या चर्चकडे पाहत होते. त्यांची गाढवं तिथेच बाजूला उकिरड्यावर चरत होती. हळूहळू त्या दोघांना झोप येऊ लागली होती.

तो पुरूष क्षणभरातच गाढ झोपी गेला पण त्याच्या बायकोला काही केल्या झोप येत नव्हती. ती सारखी तिच्या पोटावरून हात फिरवत होती. नऊ महिन्याची गरोदर स्त्री असल्यामुळे व आज पोटात थोडं दुखत असल्यामुळे ती स्त्री सारखी ह्या कुशीवरून त्या कुशीवर अशी वळत होती. रस्त्याकडेला असलेल्या खांबावरील बल्बचा पिवळा उजेड त्या दोघांच्या चेहऱ्यावर पडला होता. आता तिला कळा अगदीच असह्य झाल्या तशी ती उठून बसली व तिने शेजारी झोपलेल्या तिच्या नवऱ्याला उठवले. वेदनेने तिचा चेहरा पिळवटून निघाला होता. तिच्या चेहऱ्यावरील वेदना पाहून तो अस्वस्थ झाला. काय करावं त्याला सूचेना. मला

दवाखान्यात घेऊन चला म्हणून ती त्याला सांगू लागली. तो डोके खाजवू लागला. ती स्त्री तिची जीभ दाताखाली आवळत कंबरेवर दोन हात ठेवून पोटात उठणाऱ्या असह्य कळा डोळे मिटून सोसण्याचा प्रयत्न करत होती.

त्यांच्या समोरून लोकं आता चर्चमध्ये जाऊ लागली होती. त्यात भरजरी साड्या नेसलेल्या स्त्रिया होत्या, उंची कोट व ब्लेजर घातलेली पुरूषमंडळी व नवे कपडे घातलेली लहान मुले उत्साहाने चर्चच्या दिशेने निघाले होते.

तो पुरूष अस्वस्थ नजरेने जाणाऱ्या येणाऱ्यांकडे पाहत होता. चर्चमध्ये जाणाऱ्या लोकांना त्या रस्त्याकडेला बसलेल्या व असह्य वेदना सहन करणाऱ्या त्या स्त्रीकडे पहायला अजिबात वेळ नव्हता. त्यातच भर म्हणजे आजूबाजूला असलेल्या घरांत नाताळगीते वाजत होती व त्या गजबजाटात त्या स्त्रीची वेदना कुणापर्यंतच पोहचत नव्हती.

आता आपल्या पत्नीला कुठल्यातरी सरकारी हॉस्पीटलमध्ये नेलं पाहिजे म्हणून तो उठला. उकिरड्यावर चरणाऱ्या त्याच्या दोन गाढवांपैकी एक गाढव त्याने कानाला धरून खेचत आणले. त्याने कसेबसे आपल्या बायकोला गाढवाच्या पाठीवर बसवले व तो निघाला. त्याचवेळेला समोरच्या चर्चमध्ये मिस्साला सुरूवात झाली.

तो पुरूष त्याच्या बायकोला घेऊन एका हॉस्पीटलसमोर उभा राहिला. असह्य वेदनेने पिडीलेल्या त्याच्या पत्नीला त्याने हाताचा आधार देऊन गाढवाच्या पाठीवरून खाली उतरवले.

त्याने तिला तिथे खाली बसायला सांगितले व तो समोर दिसणाऱ्या त्या हॉस्पीटलच्या इमारतीकडे पाहू लागला. ते एक खाजगी हॉस्पीटल होते. तो आत जायला कचरत होता. त्याच्या मनाला भीती वाटत होती की, ह्या इतक्या मोठ्या हॉस्पीटलचा दरवाजा कसा खटखटावयाचा? आपल्याला हाकलून तर नाही ना देणार? ह्या विचाराने तो माघारी फिरला पण त्याच्या पत्नीकडे त्याचे लक्ष गेले. तिचा प्रसूती वेदनेने कसानुसा झालेला चेहरा त्याला पाहवेना.

त्याने हिंमत केली व तो कसाबसा दाराजवळ पोहचला. दारावरची बेल वाजवणार इतक्यात त्याला कोणीतरी हाक मारली. त्याने अंधारात त्या हाकेच्या दिशेने पाहिले. एक वॉचमन हातातली काठी

उगारत त्याच्या दिशेने येत होता. तो वॉचमन जवळ आला व त्याने ह्या माणसाची गचांडी पकडली. तो माणूस हात जोडून वॉचमनला गयावया करू लागला. त्याने हॉस्पीटलपासून थोड्या दूरवर बसलेल्या त्याच्या पत्नीकडे बोट दाखवून वॉचमनला आपली अडचण सांगायचा प्रयत्न केला पण वॉचमन उद्धटपणे म्हणाला, "रहनेका ठिकाना नही, तो बच्चे पैदा क्यू करते हो। चलो यहाँसे यह अस्पताल तूम जैसे लफंगोके लिए नही है।" असे बोलून जवळ जवळ धक्के मारून त्या वॉचमनने त्या गरिबाला व त्याच्या पत्नीला हॉस्पीटलच्या आवारातून हाकलून दिले.

त्या गरिबाने पुन्हा कसेतरी त्याच्या बायकोला, गाढवाच्या पाठीवर बसवले व तो त्या रात्रीच्या अंधारात चालू लागला. तो बराच फिरला पण त्याला कुठेच सोइस्कर अशी जागा मिळाली नाही. तो पुन्हा त्या फुटपाथवर आला. त्या वेळेला चर्चमध्ये वाचले जाणारे वाचन रस्त्यावर स्पष्टपणे ऐकू येत होते. ते शब्द होते. "तिला पुत्र होईल अन त्याचे नाव तू येशू असे ठेव, कारण तोच आपल्या प्रजेला त्यांच्या पापापासून तारील." तो गरीब मनुष्य क्षणभर जागेवर थांबला व चर्चसमोर जे मोठमोठे बंगले होते त्या बंगल्यांच्या दिशेने पाहू लागला. त्याच्या मनात आलेल्या विचाराने त्याचा चेहरा उजळला व तो गाढवावर बसलेल्या पत्नीला घेऊन त्या बंगल्याच्या दिशेने निघाला.

त्या गरीब माणसाने घाबरत घाबरत त्या बंगल्याचा गेट उघडला. तो तिला घेऊन बंगल्याच्या आवारात शिरला. बंगल्यासमोरच्या अंगणात नाताळगोठा केला होता. त्या मनुष्याने जेव्हा गेट उघडला तेव्हा त्या लोखंडी गेटच्या आवाजाने त्या बंगल्यातली एक स्त्री जागी झाली. तिने दरवाजा उघडला तेव्हा तिला हे गरीब जोडपे दिसले. त्या अडलेल्या स्त्रीने व त्या माणसाने त्या श्रीमंत स्त्रीपुढे हात जोडले. त्या श्रीमंत स्त्रीने त्या गरीब जोडप्याकडे रोखून पाहिले. तिला सगळ्या गोष्टीचा अंदाज आला. तिने त्या दोघांना हाताला धरून बाहेर काढले. जेव्हा ते पुन्हा पुन्हा गयावया करत एक रात्री पुरता निवारा मागू लागले तेव्हा ती स्त्री म्हणाली, " लवकर निघा पहा येथून. आम्हांला उद्या सकाळी मिस्साला जायचे आहे. उगाच आमची झोपमोड का करता?"

ते गरीब जोडपे नाईलाजाने तेथून बाहेर पडले. पुन्हा ते आपल्या मुळच्या जागी आले. त्या पुरूषाने त्या गांजलेल्या स्त्रिला गाढवाच्या पाठीवरून खाली उतरवले. एक फाटकी चादर फुटपाथवर टाकली व त्यावर ती स्त्री आडवी झाली. तिच्या प्रसुती वेदनांनी कळस गाठला होता. समोरच्या चर्चमध्ये "गाईच्या गोठ्यात ख्रिस्त जन्मला, पुनवेच्या चांदण्यात तारा उगवला.." ह्या गीताचे स्वर टिपेला पोहचले होते. त्या गाण्याच्या आवाजात ह्या गरीब स्त्रिच्या वेदना कुणाला ऐकूही येत नव्हत्या. आता चर्चसमोरच्या पटांगणात ख्रिस्तजन्मोत्सवाच्या उन्मादाने फटाक्यांची आतिषबाजी सुरू झाली होती. फादर हातात बाळ येशुची छोटी मूर्ती घेऊन चर्चसमोरच्या नाताळगोठ्याकडे निघाले होते. बरोबर बाराच्या ठोक्याला त्यांनी त्यांच्या हातातली बाळ येशूची छोटी मूर्ती त्या नाताळगोठ्यात मरियामातेच्या पुढ्यात ठेवली अन त्याच वेळेला फुटपाथवरच्या गरीब स्त्रीने बाळाला जन्म दिला. जीवंत, हाडामांसाच्या त्या बाळाने टाहो फोडला. पण फटाक्यांच्या आतिषबाजीत तो कुणालाही ऐकायला गेला नाही.

पण ते दृश्य मात्र असे दिसत होते. रस्त्याकडेला उभ्या असलेल्या खांबावर पेटलेल्या त्या मोठ्या बल्बच्या पिवळ्या उजेडात, आपल्या बाळाला कुशीत घेतलेली ती स्त्री, तिच्या बाजूला गुडघे टेकून बसलेला तो तिचा पती, त्याच्यापासून थोड्या अंतरावर बसलेली कुत्री, अन थंडीचे दिवस असल्याने शेकोटी पेटवून त्या शेकोटीभोवती स्वतःला शेकत बसलेले व नवलाने त्या नुकत्याच जन्मलेल्या बाळाकडे औत्सुक्याने बघणार भिकारी.

# वेलंकनी ट्रेनचे स्वप्न पूर्ण झाले ! एक गोड आठवण.

■ चार्ली रोझारिओ, नाळा.

आपल्या सर्वांच्या परिचयाचे दक्षिणेतील तामिळनाडू राज्यातील नागापटिनम येथील वेलंकनी तिर्थक्षेत्र हे फारच प्रसिद्ध असुन, लाखो भाविक वेलंकनी येथील आरोग्यदायीनी मातेच्या दर्शनासाठी, तिच्या भक्तीसाठी व तिचे नवस फेडण्यासाठी नियमितपणे जात असतात. विशेष म्हणजे प्रत्येक वर्षी ३० ऑगस्ट ते ८ सप्टेंबर या काळात आरोग्यदायीनी मातेच्या जन्माप्रित्यर्थ नऊ दिवस नोव्हेना, प्रार्थना व भक्तीचा कार्यक्रम आणि ८ सप्टेंबर रोजी आरोग्यदायीनी मातेच्या जन्मदिवशी मोठया उत्साहात सण साजरा केला जातो. या प्रसिद्ध वार्षिक महोत्सवात सहभागी होण्यासाठी संपुर्ण भारत देश व परदेशातुनही लाखो भाविक जात असतात. परंतु सुरवातीच्या काळात वेलंकनी येथे जाण्यासाठी रेल्वे, रस्ते इत्यादीची पुरेशी साधने नव्हती. त्यामुळे भाविकांना वेलंकनी येथे जाण्यासाठी फारच त्रास व गैरसोयीचा सामना करावा लागत असे. साहजिकच त्यावेळी भाविकांना वेलंकनी येथे जाण्यासाठी प्रथम चेन्नईपर्यंत रेल्वेने किंवा विमानाने जावे लागत असे व पुढचा प्रवास म्हणजेच चेन्नई ते वेलंकनी हा सुमारे १० ते १२ तासाचा प्रवास बस अथवा कारने करावा लागत असे. त्यातच त्यावेळीं चेन्नई ते वेलंकनी हा रस्तासुध्दा फारच अरुंद व खड्डयानी भरलेला होता. त्यामुळे भाविकांना प्रवास करताना फारच त्रास होत असे. यामध्ये काही भाविक बॅंगलोरमार्गेही रेल्वे व विमानाने जात होते व पुढे बॅंगलोर ते वेलंकनी बस किंवा कारने जात होते. परंतु हाही मार्ग खडतरच होता.

अशावेळी मीसुद्धा वेलंकनी येथे आरोग्यदायीनी मातेच्या दर्शनासाठी जाण्याचा प्रयत्न करीत होतो. परंतु जाण्याचा योग काही जुळून येत नव्हता. त्यावेळी आगाशी येथील सॅबेस्टियन उर्फ बस्तुल्या परेरा हा वेलंकनीसाठी कार्यक्रम आयोजित करीत होता. अशा रितीने मी प्रथम सॅबेस्टियन परेरातर्फे सन २००१मध्ये फक्त तीन दिवसासाठी वेलंकनी

येथे गेलो व तेथील त्यावेळची परिस्थिती पाहून फारच आश्चर्य व खेद वाटला. कारण हजारो भाविक सर्व गैरसोयी सहन करुन वेलंकनी मातेच्या भक्तीसाठी येत होते. साहजिकच हे सर्व पाहुन मला न राहुन काही नियमितपणे वेलंकनी येथे येणाऱ्या भाविकाकडे चौकशी करता समजले की वेलंकनी रेल्वेसाठी वेलंकनी चर्चकडुन रेल्वे खात्यास भरीव मदत करण्याचे मान्य केलेले असुन सुमारे एक कोटी रुपये रेल्वेकडे संपुर्द केलेले असुन दोन वर्षात रेल्वे ट्रेन सुरु करण्याचे आश्वासन रेल्वेने दिलेले होते.

त्याप्रमाणे सुरवातीला कामाला चांगलाच वेग येऊन वेलंकनी रेल्वे स्टेशनची सुंदर इमारतही बांधून पूर्ण झाली. परंतु दुर्देवाने केंद्रात सत्तापालट झाल्यामुळे वेलंकनी रेल्वे ट्रेनचा विषय शितपेटीत अडकुन पडला. याबाबतीत वेलंकनी चर्चकडे अधिक चौकशी करता त्यांनीही या गोष्टीस दुजोरा देऊन, त्यानी वेलंकनी ट्रेनसाठी सर्वानी प्रयत्न करण्याचे आवाहन केले. साहजिकच मी त्यावेळी मुंबईस पोहचताच प्रथम दै. महाराष्ट्र टाईम्समध्ये मुंबई ते वेलंकनी ट्रेन सुरु करण्यासाठी एक तक्रारवजा पत्र प्रसिद्धीस पाठविले व दै. महाराष्ट्र टाईम्सने त्यास दि. ९.१०.२००१च्या अंकात वेळीच योग्य ती प्रसिद्धी दिल्यानें विषयाला अधिक चालना मिळुन बऱ्याच वेलंकनी भाविकाकडुन मला पाठिंबा व प्रोत्साहन मिळाले. तर काहींनी नेहमीप्रमाणे नाके मुरडुन बोलुन गेले की रेल्वे खाते हे महासागर असून अशा पत्राचा कोण विचार करतो? परंतु अशाने मी नाउमेद न होता, मी माझा पत्रव्यवहार, पाठपुरावा व प्रयत्न सातत्याने मध्य रेल्वे, दक्षिण रेल्वे, रेल्वे मंत्रालय, रेल्वेमंत्री, पंतप्रधान व त्याचबरोबर इतर राजकिय नेते व खासदार यांच्याबरोबर सुरुच ठेवला. तसेच या कामासाठी नवी दिल्ली, दक्षिण रेल्वे, चेन्नई, मध्य रेल्वे, सीएसटी, पश्चिम रेल्वे, चर्चगेट, याचबरोबर खासदार इत्यादी नेत्यांना वारंवार भेटुन वेलंकनी ट्रेनचा प्रश्न लवकरात लवकर सुटावा म्हणून पाठपुरावा सुरुच होता.

वेळप्रसंगी वृतपत्रांचीही मदत घेऊन वृतपत्रांमध्ये वेलंकनी ट्रेनविषयी बातम्या देऊन वेलंकनी भाविकांच्या गैरसोयीला वाचा फोडण्याचा प्रयत्न करित होतो. यामध्ये माझा बराच वेळ व आर्थिक खर्चही होत होता. परंतु समोर एकच ध्येय होते ते म्हणजे, आज ना उद्या वेलंकनी ट्रेन सुरु होणार. याबाबतीत मला आठवते की काही राजकीय नेते खासकरुन आजी-माजी खासदर मा. दामु शिंगडा, मा. प्रिया दत्त, मा. संजय निरुपम, मा. गोपाळ शेट्टी, आमदार मा. हितेंद्र ठाकुर, मा. गिल्बर्ट मेंडोन्सा

इत्यादी नेत्यांनी वेळच्या वेळी फार मोलाची मदत केलेली आहे. केवळ त्यांच्या मदतीमुळेच आम्हाला रेलभवन व रेल्वेमंत्री, नवी दिल्ली यांना प्रत्यक्षात भेटुन वेलंकनी ट्रेनविषयी गाऱ्हाणी त्यांच्यासमोर मांडून प्रश्न मार्गी लागण्यास फारच मदत झाली. याबाबतीत मराठी व इंग्रजी वर्तमान पत्रे विशेषकरुन लोकसता, लोकमत, महाराष्ट्र टाईम्स, नवशक्ती व इंडियन एक्सप्रेस, टाईम्स ऑफ इंडिया व दक्षिणेतील द हिंदु, न्युज एक्सप्रेस इत्यादी वर्तमानपत्रांनी सुध्दा वेळच्या वेळी मी पाठवलेल्या वेलंकनी ट्रेनविषयी बातमीस ठळकपणे प्रसिद्धी देऊन वेलंकनी भाविकांस फार मोठी मदत केलेली आहे. या बाबतीत माहितीचा अधिकार या कायद्याचासुध्दा फार मोठा उपयोग झालेला आहे.

सन २०१२ रोजी वेलंकनी रेल्वेचे काम पूर्ण झाले, परंतु नंतर सेक्युरिटी तपासणीसाठी गाडी अडुन बसली. यासाठी सुध्दा दक्षिण रेल्वेबरोबर निकराने प्रयत्न केल्यानंतर त्यांनी प्रथम दादर ते नागापटिनम व परतीसाठी नागापटिनम ते दादर या स्पेशल गाड्या सोडण्यास परवानगी दिल्यानंतर दि. २७ ऑगस्ट २०१० रोजी मुंबईहुन दादर ते नागापटिनमसाठी ट्रेन नं. ०१७१ व परतीसाठी दि. ८ सप्टेंबर रोजी नागापटिनम ते दादर अशी पहिली डायरेक्ट स्पेशल ट्रेन सुरु झाली. तर त्याच्या पुढच्याच वर्षी म्हणजेच दि. २७ ऑगस्ट २०११पासून डायरेक्ट वेलंकनीपर्यंत ट्रेन जाऊ लागल्याने वेलंकनी भाविकांची गैरसोय दुर झाली. तसेच पुढे आपल्या वसई व पश्चिम उपनगरातील भाविकांच्या सोयीसाठी पश्चिम रेल्वे व रेल्वे बोर्ड यांच्याबरोबर पत्रव्यवहार करुन शेवटी वांद्रे व्हाया वसई ते वेलंकनीसाठी स्पेशल ट्रेन मिळविण्यात यश आले व वांद्रे वसईमार्गे थेट वेलंकनीसाठी २७ ऑगस्ट, ट्रेन नं. ०९०१३ अशी स्पेशल ट्रेन पश्चिम रेल्वेकडुन सोडण्यात आली. तर दि. ८ सप्टेंबर रोजी वेलंकनी ते वांद्रेसाठी दक्षिण रेल्वेकडुन परतीच्या प्रवासासाठी प्रथमच स्पेशल रेल्वे ट्रेन मिळविण्यात यश आले. यामुळे आपल्या वसई विरार व मुंबई, पश्चिम उपनगरातील हजारो भाविकांची चांगली सोय झालेली आहे.

हे वेलंकनी ट्रेनचं कार्य करतांना मला बऱ्याच भाविकांचे भावनिक आशीर्वादही मिळाले. काही ठराविक उदाहरणे येथे मुद्दाम देत आहे. त्यांचे काय आहे की सुरवातीला वेलंकनी ट्रेन सुरु झाली तेव्हा मी दादर रेल्वे स्टेशनवर वेलंकनी भाविकांना मदत करण्यासाठी हमखास जात असे. मी दादर स्टेशनवर प्लॅटफॉर्मवर मदतीसाठी

फिरत असता एक कालीना येथील ईस्ट इंडियन भाविकांनी थांबवुन त्याच्या जवळ विल चेअरवर बसलेल्या आईकडे पाहुन मला म्हणाला, “ममी, हेच ते चार्ली रोझारिओ, ज्यांच्यामुळे आज तु वेलंकनीस जात आहे.” नंतर तेच सदगृहस्थ मला म्हणाले की “साहेब, माझी आई गेल्या वीस वर्षांपासुन वेलंकनी येथे जाण्याचे स्वप्न पाहत होती, परंतु ती व्हीलचेअर शिवाय चालु शकत नाही, त्यामुळे तिला वेलंकनीस जाता आले नाही, परंतु आज आपण प्रयत्न करुन वेलंकनीसाठी डायरेक्ट रेल्वे ट्रेन सुरु झाल्यामुळे आम्ही आज तिला वेलंकनीला घेऊन जात आहोत. यामुळे तुमचे आभारी आहोत.” असेच बऱ्याच भाविकांचे नोव्हेनादरम्यान आशिर्वाद मिळत आहेत.

तसेच एकदा असे झाले की वेलंकनी ट्रेनची दादरहुन सुटण्यची वेळ झाली, परंतु त्याचवेळी मुसळधर पावसामुळे वसईहुन बसला येणारे भाविक ट्रॅफिकमध्ये अडकल्याने ते मला फोनवर फोन करु लागले. साहजिकच धावपळ करणे महत्त्वाचे होते, कारण वेलंकनीस जाण्यासाठी दुसरे साधन नव्हते, यास्तव वेलंकनी ट्रेन न मिळाल्यास त्यांना घरी परत जावे लागले असते. अशा वेळी ओळखीच्या रेल्वे मॅनेजरला फोन करुन सत्य परिस्थिती कथन करुन मदत करण्याची विनंती केली असता त्यांनी दादर स्टेशन मॅनेजरला मदत करण्याचे सांगितले व त्याप्रमाणे वेलंकनी गाडी सुरु होताच भाविकांनी चैन खेचल्यामुळे वेळ मिळुन ट्रॅफिकमध्ये अडकून पडलेल्या भाविकांना वेलंकनी ट्रेन पकडता आली. वेलंकनी नोव्हेनासाठी ट्रेनची सोय झाली, परंतु इतर वेळी वेलंकनीस जाण्यासाठी नियमित ट्रेन नसल्याने गैरसोय होत होती. त्यासाठी सुध्दा सातत्याच्या प्रयत्नाला यश येऊन आता मध्य रेल्वेकडुन कुर्ला टर्मिनस ते कॅरिकल व्हाया नागापटिनम अशी विकली नियमित ट्रेन सुरु करण्यात आलेली आहे.

वेलंकनी ट्रेनचं काम करीत असताना माझ्या काही मित्रांनी सुध्दा मदत व सहकार्याचा हातभार लावलेला आहे. विशेष करुन श्रीमती योना डिसोजा, आय. सी. कॅालनी, मा. खासदार गोपाळ शेट्टीचे पी. ए. श्री मयुर. तसेच वेलंकनी यात्रेकरू संघटनेचे अध्यक्ष श्री. मायकल डिमेलो, उपाध्यक्ष श्री. न्युमन तुस्कानो, सर्वश्री. मार्शल कोरिया, रिक्सन तुस्कानो, विल्यम डाबरे, मोझेस रॉड्रिग्ज, विल्यम कोरिया व माझे मित्र अँड. जीमी घोन्साल्विस, ज्यो परेरा व मायकल बरबोज या सर्वानी सुध्दा मोलाची मदत व योगदान दिलेलं आहे. अशा रितीने सुमारे दहा वर्षाची तपश्चर्या व परिश्रम फळास आले.

# कथा आमच्या टोबीची

■ कल्पना रॉड्रिग्ज, टेक्सास, अमेरिका

कोरोना महामारीचा काळ. माझे ऑफीस बंद. जे काही थोडंफार काम होतं ते घरून करायला लागत होतं. मुलांचेही कॉलेज बंद होऊन त्यांचे ऑनलाईन क्लासेस सुरू झाले होते. फावल्या वेळात कुकिंग आणि पेंटिंग्जमध्ये मी स्वतःला गुंतवून ठेवत होते. मोठा मुलगा आपल्या संगीत आणि अभ्यासात रममाण होता. धाकटा मात्र बेचैन होता. अभ्यास करून झाल्यानंतर तो कंटाळत होता कारण पूर्वीसारखं बाहेर खेळायला जाणं बंद झाले होते आणि या सर्व परिस्थितीत लहानपणापासून त्याच्या मनात असलेली इच्छा परत एकदा उफाळून आली. त्याच्या मित्राचा आलेला तो फोन, त्यानंतर बदललेला त्याचा मूड हे सर्व मी निरखत होते.

तो माझ्याकडे आला आणि बोलला, "आता मी मोठा झालोय, मी स्वतःची काळजी घेतो आणि मी आता त्या पिलाचीही काळजी घेऊ शकतो, मम्मा, तू हा बोल गं, मला पाहिजे ते पिल्लू, आपण आणू या त्याला, घर मिळेल गं त्याला." एका दमात तो सर्व बोलून गेला. मी नेहमीप्रमाणे त्याला सर्व कारणे द्यायचा प्रयत्न केला. 'सध्या आपण घरी आहोत, पण नंतर सर्व सुरळीत चालू होईल तेव्हा घरात त्याला बघायला कोण असणार, जर आपलं परदेशी जाणं निश्चित झालं तर मग त्याचं काय? वगैरे वगैरे' पण माझा मुलगा काही ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हता. तो बोलला, "उद्या आपण जाऊन बघूया, तीन पिल्लं आहेत आणि आपल्याला जे आवडेल त्या पिलाला आपण घर देऊया, सध्या ते दीड महिन्याचे आहेत आणि अजून पंधरा दिवस आपल्या आईकडे राहतील मग मात्र त्यांच्यासाठी चांगली घरं शोधावी लागतील."

ती संध्याकाळ आणि रात्र त्याची त्या छोट्या पिल्लाच्या स्वप्नात गेली. सकाळी त्याच्या समाधानासाठी मी त्याला घेऊन त्याच्या मित्राच्या घरी गेले. तिथे कळले की त्यांच्या घराशेजारी रस्त्यावर या आईने तीन गोंडस पिलांना जन्म दिला होता.

पावसाळ्याचे दिवस होते, वाहनांची रहदारीही होती. मग मोठ्या मनाने त्या लोकांनी त्या आईला तीन पिल्लांसह आपल्या टेरेसवर आणले व त्यांची देखभाल करायला सुरुवात केली. त्यांच्याकडे स्वतःचे दोन पाळीव कुत्रे होते आणि आता ह्या बाळांसाठी ते घरे शोधत होते.

‘खुपच छान पिल्लं होती ती’ मनातल्या मनात मी बोलले. पंधरा दिवसात खूप काही बदलेल मी तोपर्यंत ह्याची समजूत काढेन की आपण नाही बाळगू शकत पिल्लाला. इतक्यात एक छोटंसं पिल्लू आलं आणि माझ्या बुटाच्या दोरीशी खेळायला लागलं. हळूहळू त्याने माझ्या बुटाची दोरी सोडली. माझा मुलगा बोलला, “मम्मा, त्याला तू आवडलीस, आपण यालाच दत्तक घेऊ या.” त्याच्या मित्राला त्याने सांगितले की या पिलाला आम्ही येऊन घेऊन जाणार. त्यानंतरचा प्रत्येक दिवस त्या छोट्या पिल्लाच्या घरी आणण्याच्या तयारीत त्याने घालवला. तोपर्यंत आमच्याही मनावर त्या पिल्लाने भुरळ घातली होती. ठरलेल्या दिवशी, ठरलेल्या वेळी आम्ही जाऊन त्या छोट्याश्या कुत्र्याच्या पिल्लाला घरी घेऊन आलो आणि त्याचे नामकरण केले, ‘टोबी’.

सुरुवातीला छोटा असल्यामुळे टोबी घरभर आपला मुत्रविसर्जनाचा कार्यक्रम पार पाडायचा, बाहेर घेऊन गेले की मस्त फेरफटका मारायचा आणि घरात प्रवेश केल्याबरोबर हा आपला कार्यक्रम उरकायचा. मग ऑनलाइन वाचून, ज्यांना अनुभव आहे त्यांच्याशी बोलून हळूहळू त्याला ट्रेनिंग दिले आणि मग अगदी शहाण्या बाळासारखा टोबी प्रत्येक चांगली गोष्ट आत्मसात करू लागला.

तीन महिन्याच्या कालावधीत त्याने सर्व गोष्टी शिकून घेतल्या. टोबी खूप प्रेमळ आणि भावूकपणे वागायचा. मी स्वयंपाक करत असताना तो किचनपाशी येऊन बसायचा, आपल्या जेवणाची वाट बघत. “टोबी, वेळ आहे अजून” असं बोललं की मग नाराज होऊन निमूटपणे गच्चीत जाऊन बसायचा. आम्ही बाहेर जाण्यासाठी गाडीची चावी घेतली की हा धावत जाऊन दरवाज्यापाशी बसायचा. बघता बघता त्याने आम्हा सर्वांना आपलेसे करून टाकले आणि आमच्या हृदयात हक्काची जागा बनवली. दिवसा तो गच्चीत बसून बाहेर खेळणाऱ्या छोट्या मुलांकडे कौतुकाने बघत राहायचा, मध्येच दरवाज्यापाशी काही चाहूल लागली की धावत जाऊन भुंकत राहायचा. आम्ही

कोणीही बाहेरून आलं की हा सरळ आमच्या हातावर, अंगावर उड्या मारत राहायचा आणि सांगायचा की मी तुमची आठवण करत होतो. त्याला आम्ही घरी एकटं कधीच ठेवलं नाही. खूप चाणाक्ष आणि हुशार होता तो. अंगाई गाऊन गोंजारलं की स्वारी पाच मिनिटात झोपी जायची. सकाळी सर्वप्रथम उठायचा आणि मग येऊन माझे केस ओढून मला जागवायचा, मी बाथरूममध्ये गेले की हा निमूटपणे दरवाज्याबाहेर बसून राहायचा.

खूपशा गोष्टी तो आमच्याकडून आणि आम्ही त्याच्याकडून शिकत होतो. तो आमच्या जीवनात आल्यानंतर सगळं काही चांगलं घडत होतं आणि अशातच एक दिवस एक लेटर आले, आम्ही परदेशी जाण्याच्या तयारीत होतो आणि करोना महामारीमुळे आमची कागदपत्रे अडकून पडली होती. पण आता त्या पत्राद्वारे आम्हाला कळविण्यात आले होते की आम्हाला बाकीचे सोपस्कार लवकरात लवकर पूर्ण करायचे आहेत. आमचा टोबी आता सहा महिन्याचा झाला होता. ‘टोबीचे काय?’ या प्रश्नाने आम्ही सर्वजण चिंतीत होतो. आमच्या व्हिसाचा प्रोसेस सुरू असतानाच आम्ही टोबीला बरोबर घेऊन जाऊ शकतो का? ह्या गोष्टीची माहिती काढायला सुरुवात केली पण करोना महामारीमुळे ते शक्य नव्हते. मग जड अंतकरणाने आम्ही टोबीसाठी प्रेमळ घर शोधायला सुरुवात केली. टोबी खूप चांगला होता आणि त्याची एकच गरज होती, ‘प्रेम आणि काळजी’. आम्ही टोबीचे फोटो आणि व्हिडिओज शेअर केले, आम्हाला चांगला प्रतिसाद मिळाला. मग हळूहळू आम्ही टोबीशी बोलायला सुरुवात केली की तुला आता दुसऱ्या घरी जायचे आहे वगैरे... आम्ही अशी चर्चा जेव्हा करायचो तेव्हा टोबी दुःखी चेहरा करुन ऐकायचा आणि मग माझ्या पायापाशी येऊन बसायचा. आमचा पहिला पाळीव कुत्रा होता तो आणि आमच्या प्रेमाचा मोबदला तो आमच्यावर दुप्पट प्रेम करून देत होता. खूप चिंतेत असतानाच हृदय कठोर करून आम्ही सर्वकाही ठीक असल्याची खात्री करून टोबीला एका घरी घेऊन गेलो. त्या मुलाने व त्याच्या आईने टोबीचे जंगी स्वागत केले. आम्हाला आश्वासन दिले की ते टोबीची काळजी घेतील. टोबीच्या बऱ्यावाईट गुणांची आम्ही त्यांना जाणीव करून दिली आणि टोबीची नजर चुकवून आम्ही तेथून घरी परत आलो.

आम्ही घरी आल्यानंतर आम्हा प्रत्येकाच्या डोळ्यात अश्रू होते. दरवाजा

उघडल्यावर अंगाखांद्यावर उड्या मारणारा टोबी नव्हता. जो तो आपापल्या खोलीत जाऊन मूकपणे अश्रू ढाळीत राहिले पण टोबीच्या भल्यासाठी आम्हाला त्याला वेगळं करणं गरजेचं होतं. दुसऱ्या दिवशी फोन करून त्याची चौकशी केली, तो ठीक होता पण रात्रभर दरवाज्यापाशी बसून होता आणि जसाकाही आमची वाट बघत बसला होता. त्या मुलानेही आपला बिछाना मग टोबीच्या शेजारी लावला होता.

चारपाच दिवस झाले, टोबी तिथे रुळू लागला पण अचानक एके दिवशी टोबीची नजर टेबलावर ठेवलेल्या त्याच्या आईच्या बँकेच्या पासबुकवर गेली आणि खेळणं समजून त्याने ते फाडून टाकले. त्या मुलाला आणि त्याच्या आईला टोबीचा लळा लागला होता म्हणून त्यांनी ती गोष्ट फारशी मनावर घेतली नाही. बँकेतून दुसऱ्या पासबुकसाठी विनंती करता येईल असे ठरवून त्यांनी टोबीचे जसे लाड करत होते तसे करणे चालू ठेवले. त्या मुलाचे वडीलही संध्याकाळच्या वेळेला आपला वेळ टोबीला देऊ लागले. दहा-बारा दिवसात टोबी त्यांच्यात मिसळून गेला. आम्ही फोन केला की तो आमचा आवाज ऐकत राहायचा. आम्हाला आनंद वाटत होता की टोबीला चांगले घर मिळाले आणि तो खूप खुश आहे. पण खट्याळ टोबीने परत एकदा खेळणं समजून त्या मुलाच्या वडिलांचा फोन टेबलवरून खाली पडला. ते एक कारण पुरेसं झालं, त्याच्या वडिलांच्या रागाचा पारा चढायला. त्यांनी मुलाला सक्त ताकीद दिली की त्याला घराबाहेर कर. कधीही काहीही त्रास दिला टोबीने तर पहिला फोन आम्हाला करा असं आम्ही आधीच सांगितल्याने त्या मुलाने आम्हाला फोन केला. खूप अपराधीपणाने तो बोलला की तुम्ही टोबीला परत घेऊन जा. आम्ही लगेच एक तासाभराचे अंतर पार करून त्याच्या घरी पोहोचलो. गेट उघडून आमची गाडी आत जाताबरोबर टोबी धावत आला आणि गाडीचा दरवाजा उघडल्याक्षणी टुणकन उडी मारून गाडीत जाऊन बसला.

आमच्यासाठी ती निशाणी होती की त्याला तिथे नाही राहायचे आहे. त्या मंडळीचे आभार मानून आम्ही घरी परत आलो. घरात शिरल्याबरोबर टोबीने आपल्या गच्चीचा ताबा घेतला आणि बाहेरचा नजारा बघायला लागला. परत एकदा आमचे जीवन टोबीभोवती फिरू लागले. पण त्याच्यासाठी घर शोधणे गरजेचे होते आणि तो उपक्रम परत चालू झाला. आमच्या घरात असताना तो कधीच

काही नुकसान होईल असे वागला नाही, ना त्याने कधी कुणाला चावा घेतला, ना कधी काही तोडफोड केली. काही कारणास्तव जर आम्ही त्याला रागावलो तर मान खाली घालून डोळ्यांच्या कोपऱ्यातून बघत राहायचा. त्याला खेळायला आणि गाणी ऐकायला खूप आवडायचे. खायला तो सर्व काही खायचा पण सुके बोंबील त्याला जास्त आवडत होते. मी ही त्याच्यासाठी त्याच्या आवडीचे जेवण बनवायची, त्याच्या अंगाखांद्यावर हात फिरवून त्याच्याशी बोलायची व सांगायची की त्याला आता दुसरीकडे राहणे गरजेचे आहे. एकामागून एक असे करत टोबी तब्बल चारपाच घरी गेला पण कुठेही रूळला नाही. आमच्या घरी साळसूदपणे राहणारा तो दुसऱ्या ठिकाणी काही ना काही उचापती करायचा, चावा काढायला धावणे, उशी फाडणे, पाहुण्यांवर भुंकणे अशा त्यांच्या तक्रारी यायच्या आणि त्याची घरवापसी व्हायची. आम्हाला परदेशी जायला आता फक्त एक आठवडा शिल्लक होता आणि टोबी आमच्याकडे होता. त्याच्या चिंतेने आता आमची रात्रीची झोप उडवली होती. त्याचे सगळे वॅक्सीन, औषधाचे डोस सर्व काही व्यवस्थित झाले होते म्हणून परत एकदा त्याला बरोबर नेता येईल का याची चौकशी केली पण यश काही आले नाही.

अशातच माझी एक मैत्रीण माझ्या मदतीला धावून आली. ती बोलली, “मी तुझ्या घरी येते तेव्हा टोबी माझ्याबरोबर छान राहतो. मी त्याला सांभाळीन, तुम्ही काहीही काळजी करू नका, पण तुम्ही जायच्या तीन दिवस आधी मी त्याला घेऊन जाईन म्हणजे त्याला परत आणण्याचा पर्याय उरणार नाही. मी कसेही करून त्याला ठेवीन.” परत एकदा आमच्या जीवात जीव आला. आमच्या हाती जो काही थोडाफार वेळ होता तो आम्ही त्याच्याबरोबर घालवू लागलो. त्याच्याशिवाय राहण्याची मानसिक तयारी आम्ही करत होतो. अजूनही आठवतेय, मी बॅगा पॅक करत असताना, टोबी सरळ येऊन एका सुटकेसमध्ये बसला, जसे काही त्याला सांगायचे होते की मला घेऊन चला. खूप वाईट वाटले ते बघून. वाटत राहिले की याला आपल्या घरी आणून चूक केली का? पण मग मुलं समजवायची, “मम्मा, एव्हाना तो रस्त्यावर भटकत असता, त्याला आपण इतके महिने चांगले जीवन दिले. आताही त्याच्या नशिबात चांगले जीवन असणार म्हणून तो कुठेच रुळत नाही, बघूया काय होते पुढे?”

ठरल्याप्रमाणे आमच्या प्रवासाच्या तीन दिवस आधी संध्याकाळी माझी मैत्रिण आली. यावेळी फक्त माझा छोटा मुलगा त्याला तिच्याबरोबर घेऊन गेला. रात्री टोबी व्यवस्थित जेवला व झोपला पण दुसऱ्या दिवसापासून त्याने खाणं-पिणं सोडलं. इतकेच नाही तर नैसर्गिक विधीही बंद केले. तो थोडासा रागीट बनला. आपली साखळीही त्याने टाकली. माझ्या मैत्रिणीने तो दिवस कसातरी काढला पण संध्याकाळची वेळ सरली आणि जशी रात्र जवळ येऊ लागली तसे तीचे अवसान गळले आणि मग तिने फोन करून आम्हाला टोबीविषयी कळवले. आमची स्वारी परत टोबीला आणायला रवाना झाली.

तिच्या घरी माझा मुलगा पोहोचताबरोबर टोबी सरळ त्याच्याकडे धावत आला व क्षणाचाही विलंब न लावता दरवाज्याबाहेर पडला. कुंपणाच्या बाहेर पडताक्षणी त्याने एक कोपरा शोधला व आपले विधी उरकून घेतले. मग तो धावत गाडीच्या दिशेने आला व माझ्या हातात असलेल्या बाटलीतून मी त्याला पाणी देईपर्यंत उड्या मारू लागला. गाडीत बसल्यावर मी त्याला विचारले, "टोबी, आता पुढे काय? तू का नाही राहत कुठे? आमच्याकडे फक्त एक दिवस आहे, काय करायचे बोल?" छोट्या निरागस बाळासारखे तो सर्व काही ऐकत होता. जसे काही झालेच नाही.

इथे माझ्या मैत्रिणीला अपराधीपणाची भावना स्वस्थ बसू देत नव्हती. तिने रातोरात तिच्या सर्व ग्रुपवर टोबीचे फोटो, माहिती व व्हिडिओ अपलोड केले. परत एकदा खूप इच्छुक लोक पुढे आले आणि मग त्यामधून एका व्यक्तीची निवड करून तिने त्यांचा नंबर मला पाठवला.

श्री. श्याम साखळकर, पणजीपासून दीड तासाच्या अंतरावर त्यांचे घर आहे. मी सकाळी त्यांना फोन केला, माझी ओळख दिली. ते बोलले, "ताई, तुम्ही काही काळजी करू नका, टोबीला मी जसे तुम्ही वाढवले आहे अगदी तसेच ठेवीन, मुलासारखे. त्याला प्रेमाची आणि वेळेची गरज आहे. मी त्याची काळजी घेईन प्राण्यांची आपली एक विचारसरणी असते, त्यांचे मानसशास्त्र असते आणि त्याची मला चांगली जाण आहे. माझ्याकडे दोन पाळीव कुत्रे आहेत आणि टोबी त्यांचा मित्र बनेल." त्यांचे ते धीराचे बोल ऐकून खूप बरे वाटले.

मनात विचार आला, कदाचित टोबीच्या नशीबात हे घर आणि ही माणसं असतील. संध्याकाळी ते आपल्या एका मित्राबरोबर ओपन जीपमधून टोबीला न्यायला आले. प्रथम टोबी त्यांच्यावर भुंकला. ते बोलले की हा त्याचा स्वभाव आणि हक्क आहे. आणि नंतर पाचच मिनिटात त्यांची दोस्ती झाली. अर्धाएक तास थांबून ते टोबीशी खेळले. आम्हा सगळ्यांची ओळख झाली आणि त्यांनी आम्हाला निश्चिंत राहण्यास सांगितले. टोबीच्या ज्या काही वैयक्तिक गोष्टी होत्या त्या आम्ही त्यांना दिल्या व टोबी परत एकदा आपले नशीब आजमावण्यासाठी आमच्या घरातून बाहेर पडला.

टोबीबरोबर घालवलेले सहा महिने आमच्या आयुष्यातील सुवर्ण महीने होते. खूप आनंद दिला त्याने आम्हाला. करोनाच्या महामारीत मनाला आलेली मरगळ त्याच्यामुळे गायब झाली होती. त्याची काळजी घेताना मुलांमध्ये एक भावनिक बंधन जुळून आले होते. टोबीने आम्हाला भरभरून दिले होते आणि म्हणूनच आम्ही त्याच्यासाठी प्रेमळ लोकांच्या शोधात होतो. देवाने आमची प्रार्थना ऐकली आणि श्यामसारख्या माणसांच्या सानिध्यात त्याने आमच्या टोबीला घर मिळवून दिले.

आज टोबी आपल्या नव्या घरी खूप खुश आहे. त्याचे खूप लाड होतात. तोही सतर्क आणि जागरूक राहून आपली जबाबदारी पार पाडतोय. आम्ही व्हिडिओ कॉल करतो तेव्हा आमच्याकडे पाहून आमचा आवाज ऐकत असतो. टोबीमुळे आम्हाला एक कुटुंब मिळाले आहे. अगदी खूप वर्षापासूनचा घरोबा असल्यासारखे आता आमचे संबंध आहेत. त्या घरात टोबी अगदी आमच्या घरात राहत होता तसाच राहतोय बिनधास्त, प्रेमाने आपली ऐट आणि आपला तोरा जपत. टोबीच्या पहिल्या वाढदिवसाचा केकही त्यांनी टोबीकडून कापून त्याचा वाढदिवस साजरा केला.

आमच्यासाठी टोबी म्हणजे दोन कुटुंबांना एकत्र आणणारा एक दुवा ठरला. खूप गोड गोड आठवणीची शिदोरी त्याने आम्हाला दिली आहे. तो कायम आमच्या हृदयात राहील. ‘माणसंच नाही तर प्राणीही प्रेम करतात आणि प्रेमाची भुकेली असतात’ हेच आमच्या टोबीकडून आम्ही शिकलो. ‘प्रेम करा आणि तुमच्यावर प्रेम केलं जाईल’ असं भुंकत भुंकत तो आम्हाला नेहमी सांगत असतो.

# वसईचं पाणी

■ ऑल्विन रॉड्रीग्ज, अटोळी नानभाट, ९०४९८३६७८३

पाणी - फक्त दोन अक्षरांचा एक साधा शब्द, मात्र ह्या शब्दात एवढी ताकद आहे की गावांना, शहरांना, राज्यांना इतकंच काय तर राष्ट्रांनाही एकमेकांशी भांडायला लावू शकतं हे आता दिसायला लागलंय. तर विद्वानांच्या मते तिसरं महायुध्द जर झालं तर ते पाण्यासाठीच असणार आहे!

आपण वसईकर तसे सुखवस्तू, नाही का!

नाही... म्हणजे कमीतकमी पाण्यासाठी आपल्याला कुठे रणरणत्या उन्हात ५-१०-१५ किलोमीटर पायपीट करुन जावं लागत नाही, किंवा लाखो रुपये खर्चुन २००-३००-५०० फुट खोल बोअर मारावी लागत नाही की आंदोलन करावे लागत नाही! जमिनीत जेमतेम २०-२५ फुट खणलं की आपल्याला शुध्द, स्वच्छ पाणी भरभरुन मिळतं, अन एक बटण दाबलं की आपल्या टाक्यांत भरतं, मात्र १९८०-९० नंतर ही परिस्थिती काही प्रमाणात बदलु लागली...

वसई शहरात विकासाचे वारे वाहू लागले, परप्रांतियांचे लोंढे हिरव्या वसई-विरारच्या ह्या सर्वसंपन्न भागात धडकू लागले, कारण स्वस्तात मिळणारी घरं, वर मुंबईला सरळ लागून. मग ह्या वसईचा 'विकास' होऊ लागला, पुर्वेकडे मुख्यत्वे उद्योग-धंदे तर पश्चिमेला रहिवासी इमारती, चाळी व झोपड्याही. पण त्या विकासात प्यायचे पाणी, रस्ते, गटारे, वीज, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था यापैकी कशा-कशाचंही नियोजन केलं गेल्याचं सद्यस्थितीवरुन दिसत नाही.

मग तेथून सुरवात झाली ती ह्या लोंढ्यांना मुलभुत गरजापैकी महत्वाची पाणी पुरवठ्याची पुर्तता करण्याची. सर्वत्र विहीरी खणल्या गेल्या व त्यातून बेसुमार पाण्याचा उपसा सुरु झाला, हा उपसा इतका मोठा होता की कित्येक विहीरींना खाडी-समुद्राचं खारं पाणी येऊ लागलं, मग ह्या बिल्डर लॉबीने पाण्यासाठी आपला मोर्चा गावांकडे वळवला, गावांतील विहीरींतील पाणी टॅंकरद्वारे ह्या

नवीन शहरांना पोहचवू लागले, काही स्थानिक पाणी विकून अचानक होत असलेल्या ह्या विनामेहनतीच्या फायद्याने हरखुन गेले मात्र वसईच्या विहीरींतील पाण्याच्या ऱ्हासाला येथूनच खरी सुरवात झाली!

काही वर्षे हा उपसा व पाणीविक्रीचा धंदा खुलेआम दिवसरात्र सुरु होता (बऱ्याच प्रमाणात आजही आहेच), मग ह्या टँकरने गावात होणाऱ्या अपघातातही लक्षणिय वाढ झाली, वरचेवर स्थानिक लोकांचा उद्रेक होऊ लागला, मात्र तो उद्रेक, पाणीविक्रीविरोधी आंदोलन सर्वदुर पसरलं नव्हतं, नंतर-नंतर वसई-विरारमधे सर्वत्र गावांतील विहीरींच्या पाण्याची चव बदलत चालल्याचं निदर्शनास आलं, तसेच बऱ्याच पाण्याशी संबंधीत विविध आजारांची, रोगांची लागण गावागावांत दिसू लागली, तोपर्यंत बराच काळ लोटला होता.

मग आंदोलन उभे राहिले ते हरित वसईचे, पाण्याचे. आंदोलनं झाली, त्यात स्त्रिया, मुलं, म्हातारी माणसं सर्वंच पुढे होती, (आंदोलनाविषयी अगदी थोडक्यात नमुद करतोय), शेवटी सरकार दरबारी आवाज पोहचला व वसई-विरारमधील गावांगावांतील पाण्याची तपासणी करुन अहवाल सादर करण्याचे आदेश दिले गेले. बिघडलेलं पाणी थोडंच सुधारणार होतं! शेवटी बहुतांशी रिपोर्ट हे पाणी पिण्यायोग राहीलं नाही ह्यावरच शिक्कामोर्तब करत होते, सरकारलाही मग प्यायच्या पाण्यासाठी उपाययोजना राबवणे भाग पडले, महाराष्ट्र जल प्राधिकरणाने ही ६९ गावांची पाणी योजना राबवली मात्र ह्या योजनेची सुरवात व्हायला २००८-०९ साल उजाडलं, नंतर पुढे महानगरपालिकेने ह्या योजनेची जबाबदारी घेतली, तेव्हापासून आजपर्यंत (डिसेंबर २०२१) ही योजना अजुनही कार्यान्वित झालेली नाही, सुरु झालेली नाही, गावांच्या तहानेला इतक्या वर्षानंतर आजदेखील आश्वासनांचेच पाणी पाजले जात आहे ही महानगरपालिका व येथील राजकारण्यांसाठी शरमेची गोष्ट आहे, ही त्यांची अकार्यक्षमता आहे!

सरकारी यंत्रणेची, स्थानिक राजकारण्यांची हे काम पूर्ण न करण्याचीच की काय (?) दिसणारी इच्छा, इतर कोणताही पिण्यायोग्य पाण्याचा स्त्रोत उपलब्ध नसणे ह्या गोष्टींमुळे मग

गावातील लोकांचा कल हा घरघुती पाणी शुध्द करणाऱ्या यंत्रांकडे वळला. मात्र काहीही शास्त्रशुध्द माहिती न घेता बहुतेकांनी निव्वळ भीतीपोटी वा अज्ञानाने किंवा त्याने लावलं म्हणुन मग मीही असे RO फिल्टर लावले !

सुरवातीला सर्वकाही आलबेल व्यवस्थित सुरु होतं, मात्र गेल्या काही वर्षांत ह्या RO च्या पाण्याचे परिणाम दिसून येऊ लागले आहेत, आपल्याकडील सर्वंच वयोगटांमध्ये हाडं कमकुवत होणे, शरिरात कॅल्शियम व विटामीनची कमतरता, डोकेदुखी, सततची ॲसिडीटी, थायरॉईड, हृदयाचे आजार व असे अनेक इतरही आजार नियमित दिसु लागले आहेत, मात्र आता ह्या आजारांचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध हा प्यायच्या पाण्याशी असल्याचे जागतिक आरोग्य संस्थेसह अनेक अभ्यासात पुढे आले आहे, अन येत आहे!

त्याशिवाय RO फिल्टरद्वारे १ लिटर शुध्द पाणी तयार करण्यासाठी ३ लिटर पाणी वाया जाते ते वेगळेच! म्हणजे दिवसाला १०-१५ लिटर फिल्टरचं पाणी एखादं कुटुंब वापरत असल्यास ३०-४५ लिटर पाणी वाया जाते, महिन्याला ९००-१३५० लिटरपर्यंत तर वर्षाला १०९५० ते १६४२५ लिटर पाणी फक्त एका घरातून वाया जाते, त्यावरुन संपुर्ण गावात वा बिल्डींगचा हिशोब लावावा!

RO (Reverse Osmosis) ह्या प्रकारच्या बनवल्या जाणाऱ्या पाण्याच्या फिल्टर्समध्ये ही RO प्रक्रिया पाण्यातील जवळपास १००% घटक, क्षार, मिनरल्स काढुन टाकते व पाणी शुध्द करते मात्र ह्या शुध्द केलेल्या पाण्यात इतर कोणतेही शरिरास आवश्यक व मुख्यत्वे पाण्यातुन मिळणारे घटक, क्षार, मिनरल्स नसतात, ह्या पाण्यात फक्त १०-२०-३० ppm क्षार दिसून येतात, आपल्याकडे ३०००-४००० घरगुती फिल्टरचे नमुने तपासले असता त्यापैकी ९०% पेक्षा जास्त नमुन्यांचे क्षार (TDS) ३५-४० ppm च्या दरम्यान आढळले, जे अतिशय घातक आहे. तसेच हे घटक काढून टाकण्याचे काम मशिनद्वारे अतिशय जास्त दाबाखाली केले जाते त्यामुळे पाणी ॲसिडीक बनते, असे पाणी प्यायल्यास त्याचा परिणाम शरिरावर लगेचच आढळून येतो.

हृदयाशीसंबंधीत आजार, ॲसिडीटी होणे, वेळोवेळी पाणी पिऊनदेखील तहान न भागणे, शरिरातील क्षार-कॅल्शियम व इतर आवश्यक घटकांच्या कमतरतेमुळे अशक्तपणा येणे, हातपाय दुखणे वगैरे अनेक त्रास ह्यामुळे होत असल्याचे निदर्शनास आले आहे, जागतिक आरोग्य संस्थेच्या व इतर पाण्यावर काम करणाऱ्या संस्थांच्या संकेतस्थळावरही काही अभ्यास उपलब्ध आहेत. TDS कंट्रोल म्हणून सुविधेद्वारे ह्या फिल्टरमध्ये काही प्रमाणात क्षार वाढवता येतात, मात्र हे क्षारही अतिशय अल्प असतात.

जागतिक आरोग्य संस्थेनुसार (WHO) ३००ppm पर्यंत क्षार असलेले पाणी पिण्यास सर्वात उत्तम असते, ३००ते ६०० ppm पर्यंत क्षाराचे पाणी चांगले, तर त्यापुढे ९०० ppm पर्यंत चांगलं पाणी उपलब्ध नसल्यास वापरावे असे, तर १२०० ppm व पुढील क्षारांचे पाणी पिण्यास अयोग्य म्हटले आहे. ह्याच कारणामुळे भारतात पर्यावरण जपणेसाठी काम करणाऱ्या राष्ट्रिय हरित लवाद (National Green Tribunal-NGT) संस्थेने अलिकडेच ५०० ppm TDS पर्यंत (विरघळलेले क्षार व घटक) असलेले पाणी हे उकळवून असेच कोणत्याही RO फिल्टरविना पिण्यास योग्य असल्याचा निर्वाळा दिला, ह्या ५०० ppm पर्यंत विहीरीच्या पाण्यात शरिराला आवश्यक घटक उपलब्ध असतात. प्रगत देशांत-परदेशांत पाण्यात ५०० ppm पर्यंत क्षार असलेल्या ठिकाणी RO फिल्टर लावण्यास बंदी आहे. साहजिकच त्यामुळे हा 'फिल्टरचा' गोरखधंदा धोक्यात येऊन बंद पडेल म्हणुन मग ह्या निर्णयाला पुन्हा कोर्टात आव्हान दिले गेले.

मग ह्यावर सद्य परिस्थितीत सोपा उपाय काय?

तर शक्यतो ५०० ppm व त्यापेक्षा कमी क्षारांचे पाणी असल्यास फक्त UV व UF फिल्टर ज्यामध्ये माती, कचरा, दुर्गंधी व जंतू काढून टाकले जातात असे फिल्टर वापरणे, ६०० ppm पेक्षा जास्त क्षार असलेल्या ठिकाणी हे RO फिल्टर अगदीच काढुन टाकायचे नसेल तर फिल्टरमधील पाणी एका भांड्यात काढून त्याचे क्षार २००-३०० ppm पर्यंत येतील अशा प्रकारे उकळवलेले विहीरीतील पाणी मिक्स करुन वापरणे. दोन चार वेळा हा प्रयत्न

केल्यास जुन्या RO फिल्टरचे किती पाणी घ्यावे व त्यात विहीरीतील किती पाणी मिक्स करावे हे सहज समजून येते व तसे नियमित करण्यास सोपे जाते.

पाण्याच्या वाढत्या क्षारांच्या समस्येवर कायमस्वरुपी उपाय म्हणजे आपल्या कडील पाणीउपसा बंद करण्यासाठी प्रयत्न करणे, आपल्या पाण्याच्या वापरावर नियंत्रण ठेवणे, तसेच आपापल्या घरी पावसाळी पाण्याचे विहीरीद्वारे जमिनीत पुनर्भरण करणे, जेणेकरुन पावसाच्या शुध्द पाण्यामुळे जमीनीतील क्षार कमी होण्यास मदत होते व काही वर्षांत हे क्षार आटोक्यात येतात असे अनुभवाअंती दिसून येत आहे. त्यामुळे सर्व गावांनी, इमारतीतील रहिवाशांनी वगैरे विहिरीद्वारे पावसाच्या पाण्याचे पुनर्भरण केले तर त्याचा योग्य फायदा आपल्यालाच होईल.

तर थोडक्यात:

- ५०० ppm पर्यंत क्षार असलेले पाणी शरिरास चांगले असते त्यामुळे त्यासाठी RO फिल्टर लावु नये, हे पाणी उकळवुन प्यावे अथवा UV+UF हा फिल्टर लावावा, ज्यामध्ये फक्त माती, कचरा, जंतू वगैरे निघतात मात्र पाणी व मिनरल्स वाया जात नाही.
- विहीरींतील पाण्यात जास्त क्षार असलेल्या ठिकाणी जर RO फिल्टर वापरावे लागत असेल तर त्या फिल्टरचा TDS २००-३०० ppm पर्यंत वाढवून घ्यावा व ते शक्य नसल्यास फिल्टरच्या पाण्यात विहीरीतील पाणी मिक्स करुन २००-३०० ppm क्षारापर्यंत वापरावे.
- घराच्या, इमारतींच्या छपरांवरील पावसाचे पाणी विहीरींत /जमिनीत पुनर्भरण करावे, जेणेकरुन भुगर्भातील पाण्याचे क्षार कमी होण्यास मदत होईल.

तर मंडळी, सर्वांनी मिळुन भविष्यातील आजार, अडचणी ओळखून त्यावर आताच प्रभावी उपाय शोधायला सुरवात केल्यास पुढील वाटचाल सुकर सुखकर होईल, मात्र ह्यात सहभाग सर्वांचा हवा!

# श्रद्धा

■ भरत  वाळींजकर, समेळपाडा, नालासोपारा (प)

१८ सप्टेंबर, माझा वाढदिवस. सौ.बरोबर एखाद नाटक पाहायचं, फिरायला जायचं, बाहेर जेवायचं, संध्याकाळी केक कापायचा, एकत्रित जेवण असा नेहमीचा कार्यक्रम. पण या वेळेस बाहेर जायला नाही जमलं. मग ती हौस २ ऑक्टोबर, गांधी जयंतीला पुरी करायचं नक्की झालं. दुपारची २.३० वाजताची लोकल पकडली. बांद्राच्या रंगशारदा नाट्यगृहात 'येवा कोकण आप लंस असा' हे विनोदी नाटक पाहायचं होतं. नाट्यगृह तसं अत्याधुनिक पण आ म्हाला थोडसं लांब.

सौ. दीपा, चार वर्षाच्या आकाशसह आम्ही ३.३० वाजता पोहचलो. तिसऱ्या रांगेची तिकिटे मिळाली. श्री. मच्छिन्द्र कांबळी व संजीवनी जाधव ह्यांच्यामुळे सुसह्य वाटलेलं हे नाटक बऱ्यापैकी गर्दी. हास्यांचा पाऊस. पण आकाश मात्र कंटाळला आणि फिरत राहिला. ६.४५ ला नाटक संपलं. बाहेर आलो आणि पाहतच राहिलो. पावसाची रिपरिप चालू होती. जवळजवळ पाच वाजेपर्यंत काहीही चिन्ह नसताना नंतर निर्सगाचा चमत्कार चालू झाला. अंधार आता आपले हात पाय पसरू लागला होता. स्टेशनवर जाण्यासाठी बस किंवा रिक्षाची जरुरी होती. आणि नेहमीप्रमाणे वाहन मिळत नव्हतं. अनोळखी जागा. पावसाची तीव्रता वाढत होती. जोडीला वाराही जोरदारपणे साथ देत होता. आम्ही असह्यपणे वाहनाची वाट पाहत होतो. घड्याळाचा काटा पुढे सरकत होता. आतातर विजेचा थयथयाट चालू झाला. आम्ही जवळच असलेल्या मंदिराचा आसरा घेतला.

भक्कम ताडपत्राचा तिथे मांडव घातला होता. तल्लीन होऊन भजन मंडळी किर्तनात दंग झाली होती.

पावसाच्या व विजेच्या ह्या आकस्मित व अकल्पित अशा रौद्ररूपाने त्यांनाही आवरते घ्यावे लागले. इतक्यात लाईटही गेली अन अवघा परिसर अंधारात बुडाला. मुंबापुरीतही चाललेला लाईटचा हा खेळ तसा आश्चर्यकारकच वाटला. वेळ सरत होती तसतसं टेन्शन वाढायला लागलं. आतातर देवळातील गर्दी पण ओसरायला लागली. पाऊस थोडासा कमी झाल्यासारखा वाटला अन आम्ही जवळच्या बसस्टॉपपाशी जाण्याचा निर्णय घेतला. मनोभावे परमेश्वराची आराधना केली. श्रीगणेशाचे स्मरण केले.

मंदिरातच मिळालेला आसरा तसा शुभकारकच होता. सश्रद्ध मनाला तेवढाच मोठा दिलासा होता. नमस्कार करून त्या रीपरीप पावसात आम्ही बसस्टॉपजवळ आलो. आकाश पावसाची मजा लुटत होता. मी व दीपा मात्र चिंताग्रस्त झालो होतो. नाटकाची चाखलेली मजा आता बरीच कमी झाली होती. दादरला शॉपिंगसाठी ठरलेला बेत केव्हाच पावसाने धुऊन गेला होता. बांद्रा स्टेशनवर कधी सुखरूप पोहचतो याचे तीव्रतेने वेध लागले होते.

इतक्यात समोरच एक मारुती कार उभी राहिली. त्यामधून एक व्यक्ती उतरली. मी त्यांच्याजवळ लिफ्टविषयी बोलायचा प्रयत्न करीपर्यंत ती व्यक्ती मंदिरात पोहचली होती. दोन मिनिटात ती व्यक्ती मंदिरातील पुजाऱ्याला घेऊन आली. त्याही परिस्थितीत मी त्यांच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला. परिस्थितीने मला पुरतं नामोहरण केलं होतं. ती व्यक्ती गाडीत बसता बसता पुन्हा बाहेर आली. आमच्याकडे पाहिलं. 'तुम्हाला कुठे जायचं आहे'. चातकासारखी आम्ही त्या शब्दाची वाट पहात होतो. 'बांद्रा स्टेशनला'

“पण मला तर.... ठिक आहे. तुम्हाला मी जवळच्या सिग्नलला सोडतो. या.”

पडत्या फळाची आज्ञा लगेचच झेलून आम्ही गाडीत बसलो. कपडे तसे ओलेच होते. मनोमन परमेश्वराचं मनन केलं.

"कुठे रहाता"

"नालासोपारा"

"इथे कुठे"

“नाटक पहायला”

“हे माझे वडील” त्यांच्या शेजारी बसलेल्या पुजाऱ्याकडे पाहून त्यांनी त्यांची ओळख करून दिली.

“नेहमी ते कोणाबरोबर तरी रिक्षाने घरी येतात. पण आज ह्या धुवाधार पावसाने, ढगांच्या गडगडाटाने, अन विजांच्या चमचमाटापुढे म्हटलं आज आपण स्वतः जाऊन त्यांना आणावं. नेहमी ह्या देवळात येतात. पुजाऱ्याचं काम पाहतात. शेवटी एवढ्या पावसात गाडी काढली अन त्यांना घ्यायला आलो” ते बोलत होते.

माणूस बोलघेवडा वाटला. आम्ही रिलॅक्स झालो. ती व्यक्ती कदाचित त्यांच्या वडिलांनाच घ्यायला आली असेल. पण आमच्या दृष्टीने मात्र परमेश्वरच आला होता. श्रद्धेची तार अशी झंकारली होती. त्याचे स्वर अंतर्मनात पुन्हा पुन्हा उमटत होते. मघाचची बैचैनी आता बरीशची कमी झाली होती. पाऊसही आता विश्रांतीच्या मूडमध्ये होता. वीजाही चमकून थकल्या होत्या. साचलेल्या पाण्यात मुंबई प्रतिबिंबित झाली होती. स्वतःचं रूप न्याहळत होती. निसर्गाच्या त्या रूपालाही ध्येयाने सामोरी गेली होती. भेदरलेली होती ती माणसं.

गाडी सिग्नलजवळ उभी राहिली. "समोरच स्टेशन आहे." आम्ही उतरलो. पुन्हा पुन्हा धन्यवाद देत राहिलो. कसं उतराई होऊ तेच कळतं नव्हतं. परमेश्वरच धावून आला होता जणू. गाडी निघून गेली. जवळच्याच हॉटेलमध्ये गेलो. थंडगार पाण्याने फ्रेश झालो, शरीराने अन मनानेही. शाही कबाब, रोटी, बिर्याणी भरपेट खाल्लं. नशिबाने रेल्वे वेळेवर धावत होती. ०९.०२.च्या ट्रेनने १०.१५ पर्यंत घरी पोहचलो. घरचेही वाटच पहात होते. मी मात्र त्या अनामिक गाडीवाल्यालाच आठवत राहिलो... पुन्हा पुन्हा...

# खेळ नियतीचा कुणा न कळे...

■ अशोक बाप्टीस्टा डिब्रिटो, नंदाखाल, उंगणभाट.

फोन- ९६८९७८१३०९

जगण्यासाठी आणि आपल्या प्रियजनास जगविण्यासाठी आयुष्यभर धडपड, धावपळ करायची, नोकरी आणि कामधंद्याचे व्याप सांभाळत शरीरस्वास्थ जपण्यासाठी भौतीक सुखवस्तूत न अडकता साचेबंद जीवन जगायचं, परमेश्वरावर भिस्त ठेवून आपल्या शरीराबरोबर मनही स्वच्छ राखायचं आणि तरीही लपून बसलेली नियती आपणास कोणताही ईशारा न देता, आपल्या प्रिय जणांचा निरोपही न घेवू देता आणि वाचण्याची एकही संधी न देता आपल्या प्रियजनांपासून आपणास कायमचे घेवून जाताना पाहण्याचं दुर्भाग्य लाभते, तेव्हा प्रश्न पडतो माणसानं जगायचं तरी कसं?

असा अवेळचा आपला विरह आपल्या आईवडीलांचे स्वप्नं, आपल्या पतीपत्नीचा आधार, आपल्या लेकरांच्या अपेक्षांचा चुराडा करत असतो. जबाबदारीच्या ह्या वयात आपण कुटूंबासाठी आणि समाजासाठी जळणारे दीप असतो. सर्वांच्या सुखसमाधानासाठी आपली जीवनज्योत अखंड पेटत राहीली पाहीजे.

नियतीचा खेळ मात्र काही वेगळाच असतो. सर्वकाही आलबेल आहे, कौटुंबिक जीवनात सुखसमाधान आहे असे आपणांस वाटू लागते, कुटूंबाला, समाजाला नेमकी ज्यावेळी आपली गरज असते, त्याचवेळी पडद्यामागून नियतीचे काही वेगळेच चालू असते. आपल्या मागे दबा धरून बसलेली नियती एकही संधी सोडत नाही आणि आपल्याला एकही संधी न देता क्षणार्धात होत्याचं नव्हतं करून टाकते. आपले वयस्क आईवडील, आपले पतीपत्नी विशेषतः आपली कोवळी, निष्पाप निरागस बाळं पूर्ण हादरतात. जीवाच्या आकांताने आक्रोश करतात मात्र आपण निपचित असतो. वर्षानूवर्ष चालत आलेला नियतीचा हा खेळ कधी थांबेल का?

आज उगवलेला सुर्य संध्याकाळीच मावळणार ह्यात शंका नाही मात्र

आपल्या आयुष्याची संध्याकाळ आपला जीवनसुर्य पाहीलंच ह्याची शाश्वती नाही आणि म्हणूनच आयुष्यात मिळणारा प्रत्येक दिवस मनमोकळेपणे जगा, राग-द्वेष, मत्सराने मिळालेला क्षण घालवू नका,धन-दौलत, जमीन-जुमलाच्या नादात माणूसकी हरवू नका, पद, प्रतिष्ठा आणि प्रसिध्दीच्या मोहात आपलं कौटोंबिक सुख गमावू नका कारण खेळ नियतीचा कुणा न कळे. आपल्या भातुकलीचा डाव कधी, कुठे आणि कसा मोडेल, आपल्याला ठावूक नाही. जन्माला आलेल्या प्रत्येक जीवाला मरण आहे हे शाश्वत सत्य आहे. पण फांदीवरील कळी उमलण्याआधी आणि फुललेलं झाड बहरण्याआधीचं जेव्हा कोमेजतं, तेव्हा जी हृदयावर जखम उमटते तीच्या वेदना न शमणाऱ्या असतात.

आज माणसाचं जीवन समृध्द आहे. शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक जीवनात बहार आलेली असताना त्याचा स्वच्छंदी, निरामय स्वाद घेताना अंतरंगात चिंतेची धग वणव्याचं रूप घेवू लागली आहे. आपल्या वाडवडीलांनी शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक गरीबीचे चटके सहन करूनही आयुष्याची संध्याकाळ समाधानात पाहीली आणि आज आपण प्रगत असूनही, प्रत्येक सुखसुविधांचा सडा आपल्या हातातोंडाशी असतानाही आपलं जीवनाचं पुष्प असे मधेच, अकल्पीत का कोमेजते? हा चिंतेचा तसाच चिंतनाचा विषय आहे.

मागच्या दोन वर्षात कोरोना नामक वादळात जीवनाची फार मोठी पडझड झाली. ध्यानीमनी नसताना अनेक जीव काळाच्या पडद्याआड गेले. नुकताच बहरलेल्या, उमललेल्या अनेक संसाराच्या प्रांगणातील कळ्या अवेळीच कोमेजल्या. कोणी आपली आई गमावली तर कोणी आपला बाप गमावला, कुणाच्या अंगाखांद्यावर खेळणारं बाळ हरवलं तर कोणी सुखदु:खात साथ देणारे जोडीदार गमावले आणि ह्यात सर्वांत मोठं दु:ख होतं ते म्हणजे ह्या वादळात अनेकांना आपल्या प्रिय व्यक्तींना शेवटचा निरोपही देता आला नाही, अशा ह्या विरहाची जखम कशी भरून येणार?

ह्या वादळाने आणि त्यानंतरही चाललेल्या जीवनमृत्यूचा खेळ आपणास दाखवून देत आहे की आपला कालचा दिवस भरला, उद्याचे माहीत नाही आणि म्हणून आजचा दिवस जगा, आनंदाने, शांतीने आणि प्रेमाने. मनासारखे नको तर मन सांगते तसे जगा आणि जगातील आपल्या क्षणभंगूर सफारीचा आस्वाद घ्या आणि आज जगा, उद्याच्या भरवशावर राहू नका कारण खेळ नियतीचा कुणा कधीच ना कळे...

# ख्रिस्ती लोकांसाठी वारसा हक्क कायदा

■ ॲड. अनिल डिसोजा, सोज आळी

भारतीय उत्तराधिकारी अधिनियम १९२५ या कायद्यात ख्रिस्तीधर्मीय समाजासाठी वारसाहक्क कशा पद्धतीने मिळतो याबाबत ठराविक तरतुदी आहेत. त्याबाबतीत महत्त्वाची माहिती किंवा त्याचा ऊहापोह आपल्या माहितीसाठी या लेखात करण्यात आला आहे.

१) या कायद्याप्रमाणे तीन प्रकारचे वारस ओळखले जातात

अ) पती आणि पत्नी (विधुर किंवा विधवा)

आ) रेषीय रक्त संबंधित (वंशपरंपरागत) :- म्हणजे कायदेशीर लग्नसंबंधाने एका व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीपासून सरळ वंशक्रमात जन्म झालेला असतो असे. उदा. वडील, त्याचा मुलगा, नातू, पणतू इत्यादी. परंतु एखाद्या मुलीला किंवा मुलाला झालेली अनौरस संतान रेषीय रक्त संबंधीत धरली जात नाही.

इ) संपाश्रीक रक्त सबंधीत (एकत्रित आप्त) :- ज्या व्यक्तीचा एकाच मूळ पुरुषापासून किंवा पूर्वजापासून वंश सुरू होतो अशा व्यक्ती. परंतु यात अवैध संबंधातून झालेल्या व्यक्तींना एकत्रित आप्त मानलं जात नाही. त्याचप्रमाणे सासू-सासरे किंवा सावत्र आई-बाप यांनासुद्धा एकत्रित आप्त धरले जात नाही.

आप्त संबंधीत तीन प्रकारात मोडतात :-

१) मुले (Children), मुलांची मुले (Grand Children) इ.

२) आई-वडील, आजी-आजोबा इ.

३) भाऊ-बहिणी आणि त्यांची मुले. त्यानंतर काका-काकी इ. रक्ताचे नातेवाईक

२) हा कायदा कलम २६ प्रमाणे एकत्रित रक्त संबंधाचे वारस म्हणजे एकाच मूळ पुरुषापासून किंवा पूर्वजापासून जन्मलेले आहेत ते, पण सरळ (थेट) रेषेत नाहीत (उदा. भाऊ-बहिणी). हा कायदा ख्रिस्ती लोकांसाठी आई किंवा बाबा यांच्या बाजूने आलेल्या वारसामध्ये फरक करीत नाही. ही एक महत्वाची गोष्ट लक्षात

घेण्यासारखी आहे. विना मृत्युपत्र एखादी व्यक्ती मृत झाली तर त्या व्यक्तीच्या आई आणि बाबा यांच्या बाजूंच्या वारसांना समान हक्क मिळतो.

त्याचप्रमाणे विवाहबाह्य संबंधात झालेल्या संततीला वारसा हक्क मिळत नाही तसेच द्विभार्या संततीला आणि ह्या शिवाय दत्तक पुत्रांना सुद्धा हक्क मिळत नाहीत. फक नैसर्गिक रीतीने झालेल्या संततीला हक्क मिळतात. (दत्तक पुत्राबाबत थोडेसे स्पष्टीकरण पुढे आहे)

३) विना मृत्युपत्र मृत झालेली व्यक्तीची वारस कलम ३२ प्रमाणे ठरविलेल्या नियमाप्रमाणे पत्नी किंवा पती आणि इतर एकत्र निकटवर्तीयांना दिली जाते.

४) इस्टेट किंवा संपत्ती, ती वंशपरंपरागत असो अगर स्वकष्टाने मिळवलेली असो, ती वारसांना खालील प्रमाणात वाटली जाते.

अ) मृत्युपत्र केलेले असेल, त्या पत्रात नमूद केलेल्या तरतुदीप्रमाणे.

आ) विना मृत्युपत्र व्यक्तीच्या बाबतीत ठरवलेल्या कायदेशीर तरतुदीप्रमाणे.

५) मृत्युपत्र केलेल्या मृत व्यक्तीबाबत या कायद्यात भाग क्रमांक ६, कलम ५७ ते १९१ मध्ये तरतुदी नमूद केलेल्या आहेत. त्या नियमात विशेषत: मृत्युपत्र आणि त्याचे जोडपत्र (परिशिष्ट) यामध्ये नमूद केल्याप्रमाणे वारस (उत्तराधिकारी) ठरविला जातो. कुठलीही ख्रिस्ती व्यक्ती (पुरुष अगर स्त्री) मृत्यूपत्र करून आपली इस्टेट कोणाला कशी दिली जावी याबाबत नोंद करू शकते.

६) विना मृत्युपत्र मृत ख्रिस्ती व्यक्ती संबंधात संपत्तीच्या वाटणी हक्काबाबत:-

अ) वारसाहक्क कायदा फक्त अधिकृत लग्न झालेल्या वारसाचे हक्क विचारात घेते.

आ) मृत व्यक्तीच्या मागे विधवा असेल व रेषीय वंशज असतील (म्हणजेच मुलगा, मुलगी, नातू इ.) तर संपत्तीचा एक तृतीयांश हिस्सा (भाग) विधवा बाईला मिळतो आणि राहिलेला दोन तृतीयांश हिस्सा रेषीय वंशजाना जात असतो.

इ) जर त्या व्यक्तीला रेषीय वंशज नसतील तर 1/2 हिस्सा विधवेला मिळतो आणि 1/2 हिस्सा इतर आप्त वंशजांना मिळतो. आणि आप्त वंशज नसतील तर पूर्ण संपत्ती विधवेला मिळते.

ई) घटस्फोटीत पतीला पत्नीच्या संपत्तीमध्ये हिस्सा मिळत नाही. इंडियन डिव्होर्स ॲक्ट प्रमाणे न्यायिक घटस्पोट

झालेला असेल तर त्या मृत पत्नीची संपत्ती पती जिवंत नाही असे समजून तिच्या वारसांना दिली जाते.

उ) विना मृत्युपत्र व्यक्तीच्या सूनेला संपत्तीत हिस्सा मिळत नाही.

ऊ) जर मृत व्यक्तीची मुले हयात नसतील आणि नातू किंवा नातवंडे असतील तर संपत्ती त्यांना समान पद्धतीने वाटली जाते.

ए) दत्तक पुत्राबाबत कायद्यात वैधानिक तरतूद नाही म्हणून त्याला संपत्तीमध्ये हिस्सा मिळत नाही तथापि उच्च न्यायालयामध्ये देण्यात आलेल्या निर्णय आधारे आता दत्तक पुत्र हिस्सा मागू शकतो.

ऐ) शेवटी मृत व्यक्तीला जवळचा किंवा लांबचा नातलग नसेल तर त्याची मिळकत सरकार जमा होत असते.

विना मृत्युपत्र मृत झालेल्या वस्तीमधील बऱ्याच ख्रिस्ती व्यक्तीचे वारस वर्षानुवर्षे कोर्टात आपसात भांडत असतात हे वास्तव आहे. त्यामुळे आपण आपली जी इस्टेट/संपत्ती आहे त्याबद्दल योग्य वेळी आपल्या कोणत्या वारसाला कशा पद्धतीने दिली जावी याबद्दल मृत्युपत्र केल्यास नंतर वारसात भांडणे होणार नाहीत.

वैध मृत्युपत्र करण्यासाठी खाली दिलेल्या गोष्टी लक्षात घ्याव्या लागतात.

१) मृत्युपत्र लेखी स्वरूपात आणि करणाऱ्याने साक्षांकित केलेले असले पाहिजे.
२) मृत्युपत्र दोन साक्षीदारांसमोर केले पाहिजे आणि साक्षीदार म्हणून साक्षांकित केले पाहिजे.
३) मृत्यूपत्र रजिस्टर केलेच पाहिजे असे नाही, ते करणाऱ्या व्यक्तीच्या मर्जीवर अवलंबून आहे.

# माझा गायन प्रवास

■ विजय मच्याडो, नंदाखाल

आमच्या घरातील वातावरण लहानपणापासुन संगीतमय होते. माझ्या जुन्या घरी आमच्या चर्च मधील व्हायोलिनवादक अनेक वर्षे रहायला होते. त्यामुळे रोज संगीत कानावर पडत होते. त्यातून प्रेरणा घेऊन माझी आत्या सि. लुईजा मच्याडो ह्यांनी संगीतात बीए व वाराणसी येथून संगीत विशारद पूर्ण केले. त्या उत्तम गायिका होत्या. घरी सुट्टीवर आल्यावर त्या तानपुरा घेऊन आमच्या जुन्या घराच्या ओसरीत आम्हाला घेऊन रियाज करायच्या. फादर डॉ. चार्ल्स वाझ ह्यांच्या कॅसेट सिरीज मधील त्या आघाडीच्या गायिका आहेत. 'आदी मे था, नमो ये मेरी मा, प्रार्थना करते है' अशी अनेक प्रचलित गाणी त्यांनी गायिली आहेत. त्यातूनच प्रेरणा घेऊन आम्हालाही संगीत गायनाची आवड निर्माण झाली.

१९८५ मध्ये गावात नाताळ सणावेळी गायन सुरू केले व त्यातून पुढे चर्चमध्ये गावातील गायन मंडळ स्थापन केले. मी आणि बहिणी हेमा व बॉबी हयांचाही आवाज चांगला होता म्हणुन गाण्यांचा शास्त्रीय अभ्यास सुरु केला. पंडित शांताराम राऊत, विरार, व्यास संगीत विद्यालय दादर येथे पाच वर्ष शास्त्रीय संगीत शिकलो. पुढे मुंबई विद्यापीठातून १९९३ मध्ये सुगम संगीत गायन विषयात डिप्लोमा पूर्ण केला. माझी बहीण हेमा हिनेसुद्धा सुगम संगीतामध्ये डिप्लोमा व बीए पदवी पूर्ण केली आहे. प्रसिद्ध गायक व मराठी चित्रपट संगीतकार स्वर्गवासी पंडित अच्युत ठाकुर हे तेथे आम्हाला गुरु म्हणुन लाभले होते. पुढे अनेक हिंदी ऑर्केस्ट्रा व मराठी वाद्यवृंदांमधून स्टेज कार्यक्रम केले. विरार येथे स्वतःचा ध्वनीमुद्रण स्टुडिओ १० वर्षे चालवला. येथे अनेक जातीधर्माच्या भक्ती गीताच्या कॅसेट, सीडी काढण्याचा व इतर धर्मीय गाणी गाण्याचा अनुभव लाभला.

विविध ध्वनीफितीमध्ये जवळजवळ २००च्या वर मराठी ख्रिस्ती

उपासना गीते गायिली आहेत. ‘अनंता तुझे, घ्या नि खा देह माझा, याजक युगायुगाचा, देह मंदिर, हे आमच्या बापा, सर्वसमर्थ परमेश्वर या जगी, वस ना तू मन मंदिरी माझ्या’ इत्यादि गाणी प्रचलित आहेत. तसेच ईतर धर्माच्या मराठी हिंदी CD मध्ये सुद्धा भक्तिगीते गाण्याची संधी मिळाली. वसईची तसेच कोळी लोकगीतेसुद्धा प्रचलित आहेत.

अजूनही अनेक ऑर्केस्ट्रा मध्ये गायन सुरू आहे. दक्षिण वसईतील काही कलाकारांना घेऊन एक म्यूजिकल ग्रुप सुरू आहे. त्या माध्यमातुन अनेक विवाह म्युझिक शो चालू असतात. "सूनहरी यादे", "मेलडी मेकर्स" सारख्या प्रसिद्ध ऑर्केस्ट्रामध्ये परफॉर्मन्स केला आहे. फेब्रुवारी २००२ साली स्टार प्लसवरील "चलती का नाम अंताक्षरी" मध्ये सहभाग घेतला व दुसरे चषक जिंकले. दूरदर्शन व सहारा टीव्ही वर अनेक वेळा समूहगान अणि गुड फ्रायडे कार्यक्रमात भाग घेतलाय.

मागील ३५ वर्षापासुन नंदाखाल चर्चमध्ये नितांत गायन सुरू आहे. कोरोना काळात चर्च बंद असल्यामुळे अनेक महिने रेकॉर्डेड गायन करून प्रार्थनेत सहभाग घेतला. मोठा गायक बनण्याची खूप स्वप्न होती. त्यासाठी खूप मेहनतही केली पण कौटुंबिक जबाबदारीत अडकल्याने जास्त पुढे जाता आले नाही.

असो गायन संगीत हाच सगळ्या टेन्शन मधुन बाहेर काढणारा व जीवनाला आनंद देणारा एक उत्तम पर्याय आहे हाच तो काय ह्यातील सार आहे.

# एका सत्याचा उलगडा

■ मेल्सीना तुस्कानो, नंदाखाल, वसई

झोपेतून खाडकन जागी झाले. चेहरा घामाने भिजला होता. बाजूला असलेला मोबाईल घेऊन पाहिले तर रात्रीचे २ वाजले होते. छातीत खूप धडकी भरली होती. टेबलावर ठेवलेली पाण्याची बॉटल घेतली आणि घटाघटा पाणी प्यायले. पण हे काय होतं? मीना काकी? अन् त्याही माझ्या स्वप्नात... का ???

"पोरी तीचे हे पाप बाहेर काढ. तिला पोलिसांच्या ताब्यात दे, तिला सोडू नको... तिला सोडू नको"

हे वाक्य माझ्या कानात गुंजत होते. हे काय होतं... त्या काकी ज्यांना मरून एक महिना झाला होता, त्या माझ्या स्वप्नात कश्यासाठी आल्या.

मीनाकाकी माझ्या सख्या चुलतकाकी. गावी आमचं एकत्र मोठं घर होतं, पण त्यांच्या मुलाला वेगळं राहायचं असल्याने त्यांनी स्वतःच एक छोटं घर आमच्या घराशेजारीच बांधलं. लहानपणापासून मी मीनाकाकी कडेच जास्त वेळ असायची. आईबाबांनी नसते केले एवढे लाड माझे काकीने केले आहेत. माझ्यासाठी आई समानच होत्या त्या. काकीच्या हाताला खूप चव होती. त्या जेवण इतक्या स्वादिष्ठ बनवायच्या की शहरातील हॉटेलमध्ये जेवण खाणारे ही काकूंची स्तुती केल्याशिवाय राहणार नाहीत.

काकींचा मुलगा म्हणजे सतीशदादा. याचे आमच्याच गावातील प्रीती या मुलीवर प्रेम होते. तशी ती दिसायला सुंदर होती पण बोलण्यात जरा कडवट होती. पण मुलाच्या हट्टापायी काकीने तिला सून म्हणून स्वीकारलं. लग्न झालं आणि दादाने संसारात पाय अडकवला. सर्वकाही सुरळीत चाललं होतं पण लग्नाच्या दोन महिन्यानंतरच काकू आजारी पडायला लागल्या. त्यांनी थोडं जरी श्रम केलं तरी दम लागू लागला. काकींना गावातील दवाखान्यातील औषध उपचार सुरू झाले. त्यांची शेतातील कामे, गावात फिरणे कमी झाले. मला काकीला अशा अवस्थेत बघून

रडू यायचे. मी माझ्या परीने होईल तशी त्यांची सेवा करायची.

पण तो दिवस... आठवला तरी मला रडू येते. डोळे पाण्याने ओलेचिंब होतात... कारण तो प्रसंग मनाला आघात होईल असा होता. मी दुसऱ्या गावात राहणाऱ्या मैत्रिणीजवळ गेले होते. तसे ते गाव आमच्या गावापासून जवळजवळ ३ तास लांब होते, मोबाईलला नेटवर्क तेथे नीट मिळत नव्हता, एकदम अस्सल खेडेगावसारखं, आणि त्यातच बसचा काही ठावठिकाण नव्हता, म्हणजे बस वेळेवर सुटत नव्हती त्यामुळे घरी परतण्यास जरा उशीरच झाला. रस्त्यावरून चालत येत असताना लांबून काकीच्या घराजवळ गर्दी झालेली पाहिली.

काय झालं असेल... असा प्रश्न मनात आला आणि म्हणून मी धावत धावत घराजवळ आले. तर मला लांबून माझी आई, आजी, प्रीती वहिनी, सतीश दादा आणि गावकरीही रडताना दिसले. पण जेव्हा मी समोर जाऊन पाहिलं तर माझं अवसानच गळालं. काकींची प्राणज्योत मावळली होती. त्यांना अंगणात झोपवलेलं होतं. अंगावर पांढरा कपडा दिला होता. हे सर्व समोर पाहून काही सुचेनासे झालं, तशीच धावत आईजवळ गेली आणि रडत रडत तिला मिठी मारली आणि तिला विचारले, तेव्हा समजले की त्यांनी विहिरीत जीव देऊन आत्महत्या केली, माझ्या आईसमान काकी मला सोडून देवाघरी गेल्या होत्या. शेवटचं डोळे भरून पाहून घेतलं काकूंना... झाला अंत्यसंस्कार, अन झाला पाचवा...

मी कॉलेजच्या शिक्षणासाठी मुंबईला जाण्याचे ठरवले होते. गावात कॉलेज नव्हते आणि म्हणून मला मुंबईला जायचे होते. काकीच्या पाचव्या नंतर मी दुसऱ्याच दिवशी मुंबईला दाखल झाले आणि कॉलेजच्या हॉस्टेलमध्ये राहू लागले. आज मला येथे एक महिना पूर्ण झाला आहे. पण आज हे स्वप्न का पडले असावे, काय रहस्य दडलेलं आहे ह्यात काही समजत नव्हतं. ह्या विचारात परत एकदा कधी झोप लागली ते समजलेच नाही. जाग आली... पाहिलं तर सात वाजले होते.

कॉलेजला जायचे होते म्हणून पटापट आवराआवर केली आणि कॉलेजला गेले. दुपारी हॉस्टेलवर परत आली आणि जेवण वगैरे उरकून पार्टटाईम जॉबला निघून गेली. पूर्ण दिवस असाच

भरला. रात्री ८ ला हॉस्टेल वर परत आले. फ्रेश वगैरे होऊन जेवले आणि खूप दमले असल्याने १० वाजताच झोपी गेले. पण कुठे माहित होतं की कालच्यासारखं आज पण तेच स्वप्न पडेल म्हणून... आजही रात्री २ वाजता झोपेतून घाबरून जागी झाले. कारण स्वप्नात आजही काकी आली होती. ‘तिला पोलिसांच्या ताब्यात दे, तिला सोडू नको, तिला सोडू नको’ हेच ती म्हणत होती.

काय करावं ते कळत नव्हतं, काकू कोणाबद्दल बोलत होती? कोणाला पकडायचं? कोण होतं? काय होतं? काहीच समजत नव्हतं. मी खूप घाबरले होते. होस्टेलमध्ये कोणाला सांगितले तर ते टर उडवतील. कोणाची मदत घ्यावी याचा मी विचार करू लागले. पण त्याच वेळी एक विलक्षण गोष्ट घडली. माझ्या त्या काळोखी रूममध्ये एक झगमगता प्रकाश निर्माण झाला तो इतका तीव्र होता की डोळ्यांना त्या प्रकाशाकडे पाहणे शक्यच नव्हते. हळूहळू तो प्रकाश कमी होऊ लागला आणि एकदम संथ प्रकाश झाल्यावर मला जे समोर दिसले ते पाहून मी अवाकच झाले. माझी शुद्ध हरपली. तोंडातून शब्दच बाहेर पडायचे राहिले. कारण समोर होती एक अस्पष्ट आकृती...

आता ती आकृती माझ्या जवळ येत होती आणि त्या सोबत तो प्रकाशही. माझे हातपाय कापत होते. अंगा-तोंडाला घाम फुटला होता.

"कोण तूssssम्ही." - मी जवळजवळ किंचाळलेच.

ती आकृती आता रडू लागली, इतकी रडू लागली की तो आक्राळविक्राळ आवाज सहन व्हायचा राहिला आणि रडण्यातच ती म्हणू लागली, "ओळखलं नाही मला??? मी तुझी काकी”.

“मीना ssss काकी..”

“हो, मीना काकी...."

"पण काकी तू तर........." पुढचं मी बोलूच शकली नाही.

"मी मेले नाही; मला मारले तुझ्या त्या वहिनीने. माझ्या सुनेने." असं बोलून ती परत रडू लागली.

मी हे ऐकून चक्रावूनच गेले, हे काय नवीन. "वहिनीने तुम्हाला मारले! का?... असं का केलं तिने?"

"लग्न झाल्यापासूनच तिला माझी अडचण वाटू लागली. माझ्या प्रत्येक गोष्टीचा वेगळा अर्थ लावायची, काही चांगलं बोललं, स्तुती केली तर तिला

वाटायचं मुलाच्या पुढे चांगली राहण्यासाठी करते. ती चुकली असेल तर समजावलं तर म्हणायची की माझ्या फक्त चुकाचं काढा. नसेल आवडत माझं काम तर स्वतः लागून करा. अशी उलट उत्तरे तिच्याकडून मिळायची. मुलाला समजवलं की तू सुनबाईला सांग. माझ्या मनात तिच्याबद्दल काही वाईट नाही आहे म्हणून. पण मुलगा माझा राहिलाच नव्हता, त्याला माझे शब्द ऐकू येतच नव्हते, तो तर त्याच्या बायकोच्या पदरी बांधला गेला होता. ही रोजची खिटपिट होती. पण मी तुझ्या घरी कधी बोललीही नाही आणि कोणाला कळू ही दिलं नाही. चारचौघात इज्जत नको जायला म्हणून मी ह्या गोष्टी घराच्या आतच ठेवल्या.

पण हे रोजच होऊ लागले मी सतत चिंतेत विचारात असायची आणि त्यातून मला आजारपण येऊ लागले, त्या दिवशी दुपारी मी घराच्या मागच्या बाजूस विहिरीवर कपडे धुण्यास गेली होती. मी कपडे धुण्यास मग्न असतानाच माझ्या मागून हळूच प्रीतीदेखील आली आणि बाजूचा दगड उचलून माझ्या डोक्यावर मारला. हा असा अचानक झालेल्या प्रहारामुळे मला काही समजलेच नाही.. डोक्यातून रक्ताच्या धारा वाहू लागल्या. मी मागे वळून पाहिले तर ही होती. डोळ्यात राग अन मनात द्वेष ही भावना तिने आज विकृतीत उतरवली होती आणि क्षणाचाही विलंब न लावता तिने मला विहिरीत ढकलून दिले. पण त्याच वेळी नेमकी तुझी आजीही माझ्याकडे आली होती आणि तिने हे सर्व पाहिलं. तीही खूप घाबरली आणि आरडाओरडा करणार तो प्रीतीने तिला धमकावले व म्हटले ह्या बद्दल कुठेही काही बोललात तर मग हीच वेळ तुमच्यावरही येईल. अश्या ह्या धमकीमुळे तिला गप्प रहावं लागलं आणि माझ्या मरण्याला आत्महत्येचं रूप मिळाले."

काकी हे सर्व सांगत होत्या, मी रडत होती. मनात वहिनीबद्दल राग निर्माण झाला. मी संतापून बोलले, "हे सर्व करताना वहिनीला जरादेखील भीती नाही वाटली? तिच्या हातून हे क्रूर पाप घडलंय... शीSSS. किती क्रूर बाई आहे ती!"

"हो, तेव्हाच तिने मला मारण्याचं धाडस केलं."

"पण काकी, मी आता काय करू? हे सर्व कसं काय सर्वांना सांगू? आणि तुम्ही मलाच दिसतात की सर्वांना.”

“नाही पोरी, तू माझ्या लाडाची होती, माझा जीव होती. माझ्या स्वतःच्या पोराने तर त्याच्या लग्नानंतर मला टाकूनच दिले होते. तो माझा असूनही माझा नव्हता. मी मेले जरी असले तरी माझ्या आत्म्याला मुक्ती नाही मिळाली. माझा आत्मा अजूनही भटकतोय आणि मी फक्त तुलाच दिसते. जर तुला वाटतं असेल माझ्या आत्म्याला मुक्ती मिळावी, तर माझं एक काम कर."

"कोणतं काम?" मी प्रश्नार्थक नरजेने विचारले.

"माझ्या घरात असलेल्या त्या सैतानी बाईला पोलिसांकडे द्यायचं आणि माझ्या मुलाला तिचे हे रूप दाखवायचे."

"पण काकी मला हे कसे शक्य आहे. काय पुरावा आहे माझ्याकडे, माझ्या बोलण्यावर कोणीही विश्वास ठेवणार नाहीत उलट मला वेड्यात काढतील."

"तुला मी सांगते ते ऐक, प्रितीने माझ्या डोक्यात मारलेला तो दगड त्या विहिरीच्या किंवा बाजूला असलेल्या मोकळ्या रानात असेल तो तुला शोधून काढावा लागेल. त्या दगडावर माझं अजूनही रक्त आहे आणि तुझ्या आजींना तू बोलतं कर पोलिसांसमोर की झालं...."

मी ही आता मनोमनी ठरवलं होतं की आता काहीही करून हे सत्य बाहेर काढायचे. मी पुढे काही बोलणार तेवढ्यात ती आकृती गायब झाली. आणि परत सर्वत्र खोलीत अंधार पसरला. पण आता मला भीती वाटली नाही. कारण मनात एकच विचार होता की वहिनीचे हे भयानक रूप सर्वांसमोर ठेवायचे ह्या विचारात पूर्ण रात्र भरून गेली.

सकाळी आठ वाजता मी कॉलेजला प्रिन्सिपलच्या ऑफ़ीसमध्ये गेली आणि गावी आई आजारी आहे, ५ दिवसांसाठी गावी जायचे आहे अशी परवानगी काढली आणि परत हॉस्टेलला आली. एका शिपायांकडून रत्नागिरी गावाची इमर्जन्सी तिकिट काढून घेतलं. दुपारी एकची एक्स्प्रेस मिळाली. ६ तासाच्या प्रवासानंतर मी शेवटी रत्नागिरीला पोहचली. शिरगावाची बस पकडून २ तासात गावात पोहचली.

रात्रीचे १० वाजले होते. मला अशी दारात बघून आजी अवाकच झाली. "बाय तूSSS आन ते बी येवढ्या राती.” पुढे येऊन जोरात मला मिठी मारली.

“अगं ये सुनबाई... आपली बाय आली बघ." मला आजी बाय हाक

मारायची. “कायsss!" आई स्वयंपाक घरातून हात पुसत बाहेर आली. मला पाहिले आणि जवळ घेतले आणि म्हणाली, "तू आन अशी अचानक... काय झालं... एवढ्या रातीमंदी कशापायी आलीस. कॉलेजला समदं ठीक आहे ना?"

मी म्हटलं, "हो सर्व ठीक आहे. मी अशीच आली ५ दिवसांकरता तुमच्या सर्वांची आठवण येत होती म्हणून....."

पूर्ण दिवसाच्या प्रवासामूळे अंग खूप शिणले होते. गरमागरम जेवून लगेच झोपी गेली. पहाटेच्या त्या कोकिळच्या कुहूकुहूने जाग आली. खिडकीतून पिवळ्या कोवळ्या उन्हाचा प्रकाशझोत माझ्या बरोबर अंगावर पडला होता. मी आळस देतच उठली.

स्नानपान झाल्यावर अशीच गावात भटकून आली आणि आईला घरकामात मदत केली. दुपारचे जेवण झाल्यावर मी काकूच्या घराच्या मागच्या बाजूस गेली. दुपार झाल्याने आता मागील बाजूस विहिरीपाशी कोणी येणार नव्हतं आणि ह्या संधीचा मी फायदा घेतला. विहिरीपाशी येऊन आजूबाजूला तो दगड मिळतो का ते पाहू लागली. शोधता शोधता माझे लक्ष विहिरीकडे गेले मी त्या विहिरीत खोल डोकावून पाहिले. पाणी आत गेले होते. छोटे छोटे माश्याचीं पिल्ले इथून तिथून फिरताना दिसत होती. पण तेवढ्यात एक हवेची झुळूक आली, मला काकी असल्याचा भास झाला. मागे वळून पाहिले तर कोणीच नव्हते.

मी आजूबाजूला त्या दगडाचा खूप शोध घेतला; पण काही केल्या तो दगड सापडला नाही. मी बाजूलाच असलेल्या हिरव्या शिवारात गेली आणि तेथे शोधण्याचा प्रयत्न करू लागली. त्या रणरणत्या कडक उन्हात मी भाजून निघत होते. हताश होऊन परत विहिरी जवळ येण्यास वळली आणि थोडी पुढे जाते तोच एका आंब्याच्या झाडाखाली लाल रंग लागलेला तो दगड दिसला. मी पटकन धावत त्या झाडाजवळ गेली, ते झाड योगायोगाने काकीनेच लावले होते. त्या दगडाला खूप सारी माती ही लागली होती, पण तरीही त्या मातीतून ते रक्त काही लपले नाही. ते रक्त आहे हे नीट पारखल्यावर मी तशीच तिथून निघाले आणि घरी आले. संध्याकाळी मी आजीजवळ गेले. आजी देवघरात बसून देवासमोर दिवा लावत होती.

"आजी, मला तुझ्याशी बोलायचं होतं गं."

"काय? बोल की!"

"इथे नाही. खोलीत चल."

"अगं काय? असं काय हाय काम? हो पुढे तू , मी येते."

मी देवघरातून निघाले आणि खोलीत जाऊन आजीची वाट बघू लागले. आजी आली, तशी मी लगेच तिच्याजवळ गेले, तिचा हात धरून तिला पटकन खोलीत आणले.

"आवं काय करते? कसलं काम हाय तुझं?"

मी आजीला खाटेवर बसवून पटकन दरवाजा लावून घेतला आणि आजीला म्हणाले, "आजी, एक विचारायचं होतं."

"बोल की, काय झालं...?"

"आजी, काकी ने आत्महत्या नाही ना केली, तिला मारलं ना !"

माझं हे बोलणं ऐकून आजी पांढरीफकट झाली.

"काय बोलते हे तू? कोण बोललं तुला? काय बी ईचार येतात ते तुझ्या मनात." आजी नजर फिरवत कापत कापत म्हणाली.

"मी खरं सांगत आहे. आजी, तुला माझी शप्पथ आहे. जे खरं आहे ते सांग मला प्लिज."

आजी रडू लागली आणि रडता रडता त्या दुपारी घडलेली सर्व हकीकत सांगितली. हे सर्व सांगताना आजीच्या डोळ्यात अपराधी भावना दिसत होती.

"पण तुला समदं कस ठाव, तू नव्हती ना त्या येळेला."

"मी नव्हते. पण मला काकीने स्वप्नात येऊन सांगितले हे सर्व..."

"काऽऽऽय? आजी डोळे फाडून माझ्याकडे बघून बोलली.

"हो" आणि मी तिला सर्व वृत्तांत सांगितला.

आजी रडत रडत म्हणाली, "मला खूप वाईट वाटते गं. मी शांत बसायला नको होतं."

"जे झालं ते सोडून द्या, पण आता आपण गप्प राहायचं नाही, मी पोलिसांना बोलावते उद्या. तू फक्त सगळं खरं सांगून टाक. मी तो दगडही दाखवते. मग बघते वहीनी कशी सुटते ती."

दुसऱ्या दिवशी सकाळी मी पोलीस स्टेशनला फोन लावला आणि शिरगावला येण्यास सांगितले. पाच सहा गावाकरता एकच पोलीस स्टेशन होते म्हणून त्यांना येण्यास जरा उशीरच झाला. मी त्यांची वाट बघत अंगणात बसून होते. जशी त्यांची जीप येताना दिसली तशी मी लगेच घरातल्या सर्वांना बाहेर बोलावलं.

"इंस्पेक्टर, मी तुम्हाला फोन केला होता." मी पुढे येत म्हटलं.

"काय झालं मॅडम? बोला."

“साहेब, एक गुन्हा झाला आहे आणि त्या गुन्ह्याला आत्महत्येचं रूप देण्यात आलं आहे."

असं म्हणून मी साहेबांना वहिनीची सर्व हकीकत सांगितली आणि काकी स्वप्नात आल्याचेही सांगितले. पण स्वप्नातील गोष्टी सांगूनही पोलीस माझ्यावर विश्वास ठेवणार नव्हते हे मला माहित होतं आणि तसंच झालं, ते माझ्यावर हसू लागले, म्हणून मी आजीला पुढे केलं आणि आजीने सर्व हकीकत सांगितली. आता अजूनही विश्वास बसत नसेल तर माझ्या मागोमाग या, असे सांगून त्यांना त्या विहिरीच्या पलीकडे असलेल्या झाडाजवळ नेऊन म्हटले, “साहेब हा बघा दगड, ज्याने काकीच्या डोक्यात मारलं, हवं तर त्यावर कोणाच्या हाताची निशानी आहे हे तपास करण्यासाठी पुढे पाठवूनही द्या. कारण मला पक्की खात्री आहे, हा तोच दगड आहे आणि ते रक्ताचेच डाग आहेत हे बरोबर समजतेही.”

आता पोलीसांनीही नीट पाहिलं आणि हातात ग्लव्ज घालून तो दगड ताब्यात घेतला. आणि नंतर मला म्हणाले, "त्यांचे घर कोणते आहे?" मी बाजूच्या घरी इशारा केला. तसे ते तेथे गेले. स्वयंपाक घरात रममाण असलेल्या प्रीतीला पुढे येणाऱ्या संकटाची जरा देखील माहिती नव्हती.

"प्रीती येथेच राहतात का?" पोलिसांनी दारावर टकटक करून विचारले. स्वयंपाकघरातून बाहेर येत प्रीती इंस्पेक्टरला पाहून जरा दचकलीच.

"हो साहेब, मीच प्रीती."

"तुम्हाला खुनाच्या आरोपात अटक करण्यात येत आहे."

तोवर बाहेर गावकऱ्यांनी गर्दी केली होती आणि कोणीतरी सतीशला फोन लावून कामावरून बोलावलं होतं.

"पण मी काय केलं आहे साहेब. कोणता खून? कोणाचा खून?"

"हे बघा मॅडम, जास्त शहाणपणा करू नका. माझ्याजवळ पुरावे आहेत. तुमच्या सासूचा तुम्ही खून केला आहे." हे वाक्य नेमके सतीशने दाराजवळ पोहोचताच ऐकले.

"काय बोलता काय आपण. प्रीती का माझ्या आईला मारेल?"

"हे बघा, मला त्यांना अटक करायची आहे तुम्ही मला थांबवू शकत नाही"

पुढे सतीशदादा काही बोलणार तोच मी पुढे येऊन माझ्या बाबतीत घडलेली सर्व हकीकत दादाला सांगितली, हे सर्व ऐकून सतीशच्या पायाखालची जणू जमीनच सरकली. तो ह्या स्वप्नावर आणि माझ्यावर विश्वासच ठेवायला तयार नव्हता.

"काहीही म्हणू नकोस, म्हणे काकी दिसली तुला, मग मला का नाही दिसली, मुलगा मी त्यांचा आणि त्या दिसतात तुला, बस झालं तुझं" दादा चवताळला होता माझ्यावर.

मग इन्स्पेक्टरनी तो दगड दाखवला आणि 'आम्ही ह्या दगडावर कोणाच्या हाताचे निशाण आहे आणि रक्त कोणाचे आहे ते तपासण्यासाठी नेत आहोत' असे सांगितले. त्यांचे ते बोलणे ऐकून वहिनी खूप घाबरली. आता प्रीतीवहिनी पुरती फसली होती. तिच्या तोंडून अ ब अ असंच काहीतरी निघत होतं. तिला समजत नव्हतं की आता काय सांगावं.

"चला रे हिला ताब्यात घ्या." इन्स्पेक्टरचे हे बोलणे ऐकून प्रीतीवहिनी ढळाढळा रडू लागली आणि शेवटी तिने कबुली दिली. तिचे सर्व बोलणे ऐकून सतीश दादा संतापला. तिच्या अंगावर धावून गेला. पण पोलिसांनी अडवले आणि शेवटी प्रीती वहिनीला ताब्यात घेतले.

सर्व जण निघून गेले, पण मी तशीच त्या आंब्याच्या झाडाजवळ उभी होती. ते झाड मला काकींची आठवण करून देत होतं. तेवढ्यात अचानक एक हलकीशी झुळूक माझ्या अंगाला लागून गेली आणि समोर काकीचे अदृश्य रूप दिसू लागले....

"पोरी तू आज दाखवून दिले की तू माझ्यावर खूप प्रेम करते, तू माझी इच्छा पूर्ण केली. आज मला मुक्ती मिळेल. माझा आत्मा शांत होईल. सुखी रहा."

बस एवढं बोलून ती गायब झाली अगदी कायमचीच.

# संस्कृती डोळसपणे जपू या

■ एडविन डाबरे, भुईगाव

ग्लोबल वॉर्मिंगचे महाभयंकर संकट समस्त जीवसृष्टीच्या डोक्यावर घोंघावत आहे. निसर्गाची लय बदलून गेली आहे. त्याचे परिणाम आपण सध्या भोगत आहोत. करोना काळात स्पर्श व सान्निध्य कमी होत गेलं. आपल्याला एकमेकांमध्ये अंतर ठेवावे लागते. मानवी संस्कृतीचे हे अवलक्षण म्हणावं असं आहे. अशावेळी स्थानिक संस्कृती व तिचे संवर्धन हे मोठे आव्हान आहे. आपल्या उत्तर वसईतील कादोडी संस्कृतीतील परंपरा फार मोठ्या आहेत. त्या परंपरेकडे डोळसपणे बघावे लागेल. परंपरा टिकल्या तर आपण माणूस म्हणून टिकू. आज आपल्या संस्कृतीतील संचित बऱ्याच अंशी टिकून आहेत, ही भाग्याची गोष्ट आहे.

जो समाज काव्यरचना करतो, गातो, शतकानुशतके गात राहतो, तो समाज संस्कृतीच्या उच्च पातळीवर पोहोचलेला असतो. आपल्या कादोडी बोलीभाषेतील विवाहगीते,अंगाईगीते, भक्तिगीते ही सामवेदी लोकगीते, जी रचली आहेत, ती आजही लग्न समारंभ, सोहळे, सहली व अगदी सातासमुद्रापलीकडेही जपली जात आहेत. त्याचे संवर्धन होत आहे. कोणत्याही संस्कृतीतील प्रगती ही महत्वाची आहे. पण प्रगती म्हणजे वेग नव्हे, तर प्रगतीची दिशा महत्वाची आहे. रीतीरिवाज, परंपरा, चालीरीती ह्या आपल्या संस्कृतीची ओळख व अस्तित्व आहेत. त्याला अनुसरून आपली जीवनशैली, श्रद्धा, समजुती आहेत. जागतिकीकरण, तंत्रज्ञान, आर्थिक घडामोडी ह्यावर मात करून आपली संस्कृती पुढे जात आहे.

चर्च माध्यमातून होणारे धार्मिक प्रबोधन, आपल्या उत्तर वसईतील सर्व सामाजिक संस्था, सहकारी पतसंस्था,

युवा मंडळे ही सर्व संस्कृतीच्या संवर्धनाची प्रकाशाची बेटे आहेत. त्यातून समाजाला धार्मिक, आर्थिक, सामाजिक स्थैर्य लाभले आहे. आज माणसापेक्षा तंत्रज्ञान महत्वाचे ठरत आहे. हे मानवी संस्कृतीच्या विरुद्ध आहे. पण तंत्रज्ञान ही गरज असल्यामुळे तरुण पिढी त्याला आत्मविश्वासाने सामोरी जात आहे.

आज समाजात नवी पिढी उथळ आहे असे अनेकांना वाटते. उलट जगण्याचा झगडा ह्या नव्या पिढीला जास्त सहन करावा लागतोय. जास्त प्रामाणिक राहणे की जास्त भ्रष्ट होणे? असा आजच्या नव्या पिढीचा झगडा आहे. थोडंफार प्रामाणिक राहावे, थोडे फार जुळवून घ्यावे असे आधीच्या पिढीसारखं 'थोडंफार' करण्याची मुभा त्यांना नाही. त्यांना एकच काहीतरी व्हावे लागते. तरुणांना ते काही करत आहेत त्यासाठी त्यांना बळ द्यावे लागेल. कौतुक करावे लागेल. पूर्वी समाजात दूरदर्शीपणा असलेली, न्यायाबद्दल पोटतिडिक असणारी माणसं होती, त्यांचा शब्द अंतिम असायचा. आज मात्र ऐकण्यापेक्षा बोलणारे जास्त आहेत.

आज समाजात सगळ्याच क्षेत्रात राजकारणाचा प्रभाव आहे. पण मूल्यांचे काय? राजकारणातून समाजकारण व निष्काम सेवा ही मंगल भावना हरवलेली आहे. आपल्या समाजाला सक्षम नेतृत्व हवं आहे. नेतृत्वाचा संबंध पितृत्वापेक्षा कर्तुत्वाशी असायला हवा. कला, नाट्य, साहित्य ह्या क्षेत्रात आपली संस्कृती नक्कीच सरस आहे. ह्यात नव्या पिढीने मोठ्या प्रमाणात भाग घेणे संस्कृती संवर्धनाच्या दृष्टीने फार महत्वाचे आहे. समाजात कार्य करणारी माणसं आहेत पण त्यांचा कित्ता गिरवायला पुढे कोण येत नाही. तरुणांचा कल करियर ओरिएंटेड असल्यामुळे राजकीय प्रक्रिया व त्यातील नवे संदर्भ ह्याबाबत अनभिज्ञ आहेत. समाजात चळवळी, आंदोलन ह्यांना ओहोटी लागली आहे.

'पंख फुटताच पिलं, गेली भुरर्कन उडून

घरटं बिचारं आपलं, गेलं आठवणीत बुडून'

पिलासाठी खस्ता खाणारी अनुभव संपन्न पिढी आज म्हातारपणी एकटेपण अनुभवत आहे. प्रत्येक घरट्याची ही

वेदना संस्कृती संवर्धनाला मारक ठरत आहे.

समाज माध्यमाचा योग्य वापर, सोहळेबाजीला लगाम, रूढी, परंपरा जपताना सामाजिक भान ठेवणं अगत्याचे आहे. माहितीच्या ह्या महास्फोटात आपण सगळ्यांनी इतिहासाच्या हाका सावधपणे ऐकून त्यातून योग्य तो बोध घेतला पाहिजे.

जुन्या काळी दोन खणी घर पुरून उरायचं, आता शंभर खाणाचं घरही कमी पडते. माणसाचं घर वस्तूने भरून गेलं आहे. मात्र घरात राहणारा माणूस अडगळीत फेकला गेला आहे. आज माणूस स्वत: एक वस्तू झाला आहे. पण विचार केला तर कमी गरजा असणारी माणसे अधिक आनंदी असताना दिसतात.

संस्कृती म्हणजे केवळ आजच्या असुरक्षित आणि संघर्षमय दिवसापासून मुक्ती मिळवण्यासाठी जुन्या आठवणींना आठवत राहणे, खाद्य, पेहराव, वा मनोरंजन करणे असा नाही. तर संस्कृतीच्या परंपरा, चालीरीती, रूढी हा उत्क्रांतीचा इतिहास आहे. आज आपल्या कादोडी संस्कृतीने जी प्रगती केली आहे. ती एका दिवसाची जादूची गोष्ट नाही. अनेक वर्षाचा बदलता प्रवाह, प्रवास त्यात दडलेला आहे. हा प्रवाह सतत वाहत ठेवण्याची जबाबदारी आपल्या समाजाच्या प्रत्येक घटकावर आहे. सूर्यप्रकाश वाढू लागला की दवबिंदू आपोआप नाहीसा होतो. तसेच वेळेनुसार करोनाचे हे मळभही लवकरच दूर होईल, तोपर्यंत बुद्धी वाढलेल्या नकारात्मक गवताची स्वच्छता करून संस्कृती संवर्धनासाठी परंपरा, रूढी डोळसपणे जपवून जीवनाचा प्राजक्त टवटवीत ठेऊ या.

# वाडवळी लगीन

■ विनिता अजय राऊत, भास्कर वाडी, पालघर

लग्न म्हटलं की पंधरा दिवस ते महिनाभर आधी धावपळ असायची. आत्ताच्या काळात मंडप दोन-तीन दिवसात सजवून दिले जातात. अगदी स्टेजपासून यजमान सांगतील तिथंपर्यंत लांब आणि मोठा. तसाच जेवणाचा मंडप. मग त्याप्रमाणे लाइटिंग, फुलांची सजावट आणि त्यासाठी लागणारे लाखो रुपये.

पूर्वीच्या काळी अगदी साधे दोन मांडव घालायचे, एक अंगणात आणि दुसरा जेवणाचा. एका मांडवासाठी आठ ते दहा वासे (भेंडीचे किंवा बांबूचे) जमिनीत रोवून त्यावर ताडाची वाळलेली झावळी सावलीसाठी. ही झावळी ताडावरून तोडून त्याचे थोपे (झावळीचे देठ) काढून त्या झावळ्या शेतात सुकवायच्या. त्या झावळ्या सुकवण्याची पद्धत अशी एक झावळी त्याच्या अर्ध्या भागावर दुसरी झावळी त्याच्या अर्ध्या भागावर तिसरी झावळी. अशी रचना करून त्या उडू नयेत म्हणून त्यावर थोपे किंवा मोठे दगड ठेवून त्या पंधरा दिवस वाळवत. मग तयारी वासे गोळा करण्याची. ही कामं पुरुष मंडळींची. हे वासे प्रत्येक घरी जाऊन आणायचे. ज्या घरून वासे आणले त्यांनी रंग लावून खुणा केलेली असायची, ते हरवले जाऊ नयेत म्हणून.

अशीच लगबग बायकांची म्हणजे शेताच्या बांधावर पिकलेला उडीद जात्यावर दळून डाळ काढत. ह्या डाळीपासून पुन्हा त्यावर दळून पीठ तयार करून उडदाचे पापड तयार करत. ते पापड करण्यासाठी आदल्या दिवशी आळीतल्या सर्व बायकांना पापड लाटायला आमंत्रण द्यायचं. आणि रात्री हे पीठ पापड खार, मीठ घालून घट्ट गोळा बांधायचा आणि दुसऱ्या दिवशी पाट्यावर मुसळ घेऊन तो गोळा चांगला अर्धा तास कुटून घ्यायचा. त्यापासून पापड बनवत. सर्व बायका पापड लाटण्यासाठी येत असत. एका दिवसात पापड लाटून

सुकवून घ्यायचे. नंतर तांदूळ निवडण्यासाठी पुन्हा आळीतल्या सर्व बायका गोळा व्हायच्या. लग्नाला आठ दिवस बाकी असतील तेव्हा आलं आणि आख्ख्या मिरच्यांचं लोणचं तेही कमी तेल घातलेलं लोणचं चिनी मातीच्या मोठ्या बरणीत भरलं जायचं. त्या लोणच्याची चव म्हणजे एकदम भारी.

कपडे खरेदी म्हणजे मुलाचे लग्न असेल तर नवरीला साड्या देतात. नवरीसाठी हळदीची साडी, साखरपुड्याची आणि एक शालू. दागिन्यांमध्ये फक्त काळ्या मण्यांची गरसोळी. त्यात सोन्याचा वर्ख असलेले दोन मणी आणि एक वाटी. अगदी ऐपत असेल तर सोन्याची वाटी आणि मणी. आणि मुलीचे लग्न असेल तर नवरदेवाला शर्टपॅन्ट आणि ऐपत असेल तर अंगठी.

लग्नाच्या आदल्या दिवशी मंडप घालायचे. लग्नाचा दिवस उजाडला की आंब्याच्या पानांचे तोरण मंडपाला चारी बाजूने लावून घेत. आणि दाराला केळीचे खांब. पाहुणे किती पाच-पन्नास असायचे. आणि जेवण फक्त शाकाहारी असायचं. त्या भाज्यासुद्धा वाडीतले भोपळा, गवार, कोबी याची भाजी. गवार, बटाटा, कोबी, चणाडाळ, भोपळा आणि चवळी. भोपळा फोडायचा. त्याचीपण पद्धत असायची. भोपळा सुरुवातीला जमिनीवर दोन तीन वेळा आपटायचा. त्याला कोयत्याने कापत नसत. नंतर त्याच्या विळीवरती फोडी करून भाजी केली जायची.

दोन दिवस लग्न म्हणजे चार जेवणं. एक जेवणाला एक भाजी, वरण, भात, लोणचं, पापड आणि पत्रावळीत जेवायला. भात मोठया तांब्याच्या तपेल्यात शिजवायचा. आणि त्या तपेल्याला तोंडाला कंताण बांधून ते वाळणीवर वाळून त्यातली पेज काढून घ्यायचे. त्यासाठी मोठा जमिनीत खड्डा खणून त्यावर एक लाकूड किंवा जाड काठी आडवी ठेवून त्यावर तपेलं वाळून पेज काढायची. कुटुंबातील दोघी-तिघी मिळून जेवण चुलीवर बनवायच्या. पूर्वी जेवणात खडा मीठ वापरायचे. चुलीवर शिजवलेल्या भाज्या अप्रतिम लागायच्या. जेवायला पत्रावळी असायच्या. जेवायला पंगत जमिनीवरच साध्या गोणीची घडी घालून बसायचे. जमिनीच्या ढिपळावर पत्रावळी

व्यवस्थित राहायची नाही. भातावर घातलेलं वरण पत्रावळीतून वाहून जायचं. आणि ते वरण अडवण्याचा प्रत्येकाचा खटाटोप असायचा.

काही वर्षांनी थोडीफार आर्थिक परिस्थिती चांगली असलेल्याच्या लग्नात वांगी, वालाचे गोळे, शेगवाच्या शेंगाची भाजी आणि शेंगदाण्याची आमटी हे दोन भाज्यांचे प्रकार वाढले. आणि लाडू, सरबत मेनू वाढले. दुसऱ्या दिवशी मुलीचं लग्न असेल तर वरात यायची. पूर्वी गोरज मुहूर्तावर सर्व लग्न व्हायची. रात्री साडेदहा अकरा वाजता नावळ निघायची. पूर्वी वरात ही ट्रकमधून येत असे. मग एसटी बसमध्ये वरात येऊ लागली.

लग्नानंतर पूजा आणि तिसऱ्या दिवशी कुटुंबातील सर्वांना बोलावून मटणाचे जेवण दिले जाई.

साधे लग्न, दिखावा नव्हता, स्पर्धा नव्हती, चढाओढ नव्हती, राग मानपान नसायचा. लग्न पत्रिकापण नसायच्या. जसा बदल होत गेला तसं मंगळसूत्र सोन्यात बनवू लागले. मांडवाला सफेद आणि रंगीत कापड झावळ्याच्या खाली बांधले जाई. पत्रिका छापू लागले आणि टाशा आणि ढुमकं आणलं जाऊ लागलं आणि तो टाशा जोरात, सुरात वाजावा म्हणून शेकोटी पेटवून गरम करायचे. तीनचार दिवस लग्न असायचे आणि पाहुण्यांनी घर भरलेलं असायचं.

# करोना आणि वसईकर

■ विजय तुस्कानो, वळंबाव, उमराळे

कवी भा. रा. तांबे आपल्या 'जन पळभर म्हणतील हाय हाय, मी जाता राहील कार्य काय' या कवितेत सांगतात अगदी तसाच अनुभव अखिल जगाने घेतला. मागील दोन वर्षात जगात करोनाने थैमान घातलेले असताना आपण वसईकर तरी त्यामधून कसे सुटणार?

अगदी सुरुवातीपासून म्हणजे पहिल्या लाटेपासून लॉकडाऊनची सुरुवात झाली आणि जनतेचे हाल सुरू झाले. नोकरीधंदा बंद झाले. लोकांच्या हातचे काम थांबले. रोजंदारीवर काम करणाऱ्यांचे काम थांबले. पर्यायाने गरीबाघरच्या चुली पेटायच्या बंद झाल्या. लोकांचे हाल होऊ लागले आणि आपला युवक तहानभूक विसरून माणुसकीसाठी कामाला लागला. कोणी तांदूळ, कोणी गहू, कोणी डाळ तर कोणी मीठही जमा केले आणि जो तो आपापल्या परीने पुढे येऊन कामास लागला. जमवलेलं धान्य पाड्यापाड्यावर पोहचवू लागला. ज्या व्यक्तीला कधी बघितलं नाही, ती व्यक्ती फोन करून विचारू लागली, "दादा धान्य जमवलं आहे, कुठे पोहोचवू.

करोना व्हायरस हा आहे तरी काय हे कुणालाच समजत नव्हतं. म्हातारी लोकं जुन्या आठवणी सांगू लागले. स्वातंत्र्यापूर्वी असाच एक कालेरा (कॉलरा) नावाचा रोग आला होता आणि त्यावेळी अशीच परिस्थिती होती. ती आठवण सांगताना आमच्या ९६ वर्षांच्या आजीच्या डोळ्यातून अश्रू ओघळत होते.

जेमतेम पहिली लाट ओसरली आणि आता कुठे थोडंस शांत होणार तेवढ्यात नियतीने यूटर्न घेतला आणि दुसरी लाट आली. ही दुसरी लाट अनेकांच्या जीवावर बेतली. त्या लाटेत ना युवक वाचला ना म्हातारे वाचले. समाजातील अनेक लोकांना मृत्युने घेरले.

पुन्हा एकदा आपला युवक पेटून उठला. जात, धर्म, पक्ष सगळं बाजूला ठेवून युवक रात्रीचा दिवस करू लागला. आपल्या लोकांना हॉस्पिटलमध्ये पोहोचविण्यासाठी धावपळ करू लागला. कोणी बेडसाठी तर कोणी रेमडेसिवरसाठी झटु लागला. स्वतःच्या जीवाची पर्वा न करता माझ्या समाज बांधवांना वाचविण्यासाठी झटू लागला. समाजातील दानशूर व्यक्तींनी सुद्धा आपल्या तिजोऱ्या उघडायला सुरुवात केली. आपला युवक एकेक जीव वाचविण्याचा प्रयत्न करीत असताना अक्षरश: देवाकडे आणि लोकांकडे भीक मागू लागला.

रोज अमुक पॅरिशमध्ये अमुक जण मेले अशा बातम्या येत होत्या. प्रत्येक पॅरिशमध्ये चर्चच्या माध्यमातून टास्कफोर्स काम करत होते. चर्चचे फादर स्वतःच्या जीवाची पर्वा न करता टास्कफोर्सना मदत करीत होते. डोळ्यातील अश्रू सुकले होते. तहानभूक विसरलेल्या अवस्थेत आपले युवक दफनभूमीत स्वत:च मृतदेह पीपीई किट घालून दफन करण्याचे काम करीत होता. या दुसऱ्या लाटेत अनेकांनी आपले आईवडील गमावले, अनेकांनी भाऊ-बहीण गमावले. काही बालके अनाथ झाली आणि त्यांना आधार देणारा आपला युवावर्ग सावरू लागला. दुसरी लाट ओसरेपर्यंत वसईने बरंच काही गमावलं होतं. आता कुठे थोडसं पूर्वपदावर येत असताना प्रभू परमेश्वराजवळ एकच प्रार्थना करतो की, हे देवा झाले तितके भरपूर झाले, आता तरी आम्हाला जगू दे.

# पदर

■ आयवन डिकुन्हा, नानभाट, वसई

डोळ्यावरचे अश्रू पुसत ती पुन्हा त्या मातीच्या चुलीला फुंकर मारायला लागली. घरभर धुरांचे जणू ढग जमा झाले होते. आग काही लागता लागेना. हृदयातील आगीला मात्र वणवाच लागला होता. छतावर पडणाऱ्या पाण्याचा आवाज आणि त्यातूनच घरामध्ये लाकडाच्या बारीमधून चुकून पडणारे पाण्याचे थेंब दोन चार ठिकाणी पडत होते. जेमतेम चुलीला आवरत ह्या पाण्याच्या पडत्या थेंबाखाली भांडी ठेवत पाळण्यात बाळाकडे धावत गेली. धुराने ते बाळ अस्वस्थ होऊन कावरंबावरं झालं होतं. त्याला कवेशी धरत दरवाजाजवळ येऊन ती उभी राहिली. जोराचा पाऊस, मुसळधार धारा आणि मोकाट सुटलेला वारा... जणू कसलातरी रागच काढतोय.

तिची नजर समोरच्या रस्त्याकडे लागली होती. झाडाच्या फांद्या तुटून रस्त्यावर पडलेल्या, नारळाच्या झावळ्या आणि पिकलेले आंबेदेखील नजर चुकवत नव्हते. कोणीतरी शाळकरी मुलगा आंबे उचलून पळून जाताना दिसला. कसल्यातरी विचाराने तिची मनस्थिती एकदम ढासळली होती. राहत्या घरात तिने पाय ठेवल्याला आज दोन वर्ष होत आली. घरात पती आणि सासरे मिळून हे छोटे कुटुंब. माहेरील परिस्थिती बेताची होती. आयुष्यात अडचणी आणि हाल-अपेष्टा तसेच गळणारे छत ह्याशिवाय तिने दुसरं काही पाहिलं नसेल. एकदा मैत्रिणीबरोबर बांद्रा आणि ईरलाच्या देवळात गेल्याची एक आठवण तिच्याकडे आहे. बाकी सांगण्यासारखं फक्त दुख आणि कष्ट परंतु मनाने आणि वर्तणुकीने फार जिद्दी आणि प्रेमळ. सुक्या मासळीचा जेवण चुलीवर ठेवलं होतं. वांगी कापता कापता मूल रडायला लागलं होतं त्यासाठी तिची धावपळ झाली. तिने सासऱ्याला हाक मारली परंतु काही प्रतिसाद नसल्याने तिला वाटले बहुतेक गोठ्यातील गाईला

चारा द्यायला गेले असतील. तिने ओट्यावर ठेवलेल्या दोन झावळ्या विणून आणि एक अर्धीच विणून झाली होती. त्यांनाही आज छतावर टाकायचं राहून गेलं. पहिलीच मुलगी झाल्याने नवऱ्याच्या बहिणी, मावशी आणि तिचा सासरा देखील नाराज होता. तीन बहिणीचा एक भाऊ, तिचा पती आणि हीच्या आईकडे ह्या दोन बहिणी. तिसरे मुल तिच्या भावंडांपैकी आईच्या गर्भाशयात असताना देवाघरी गेले होते. परिस्थितीनुसार चांगला उपचार भेटला नव्हता असे म्हणतात.

आजपर्यंत तिला पदराने खूप सांभाळले ती म्हणते अश्रू अनावर झाले की माझा पदर माझी आई होतो. माझा ओला पदर मला जगण्याची अन लढण्याची ताकद देतो. दिवसभर शेतात काम आणि शेण-पाणी, स्वयंपाक व मुलीला सांभाळणं ह्यातच तिचा दिवस उगवायचा आणि मावळायचा. माहेरी कधी गेल्याचं तिला नक्की आठवत नसेल आणि ह्या दोन्ही बहिणी दोन टोकाला. ती कायमची म्हणते माझं सुखदुख माझ्या पदराला जास्त कळते. बाळाला झोपू देत पुन्हा त्या चुलीकडे वळली. आता पावसाने थोडा आराम केला होता आणि सासरे रस्त्यावरून दोन सुकलेले नारळ व हातात एक लोंगर घेऊन येताना दिसले. बहुदा वाऱ्याने केळ पडली असेल. लोंगर मोठं होतं परंतु पूर्ण तयार झालं नव्हत. सासऱ्याच्या कपाळावर आलेला राग आणि चेहऱ्यावर दु:ख हे लपता लपत नव्हत. तिने त्यांना पाहून पदर डोक्यावर घेतला आणि बोलली, “थोडं पाणी गरम करू का?” सासरा बोलला, “पोरी राहू दे मला पुन्हा वाडीत जावं लागेल. पाण्याने वापे (शेतात पाणी) भरले आहेत. दांड फोडून येतो. तोपर्यंत पाणी गरम कर. आता संध्याकाळचे सात वाजायला आले होते. थोडा थोडा अंधार पडत चालला होता. तिच्या पतीची येण्याची वेळ झाली होती, फारच बेताची अशी नोकरी नव्हती. स्वयंपाकाची घाई करत ती परत कामामध्ये मग्न झाली. आणि आपल्या भूतकाळाला मागे टाकत वर्तमानकाळाबरोबर पुन्हा सामील झाली. इतक्यात गोठ्यातील गाय हांबरली. तिला वाटले पती आले असतील. परंतु दारासमोर कोणी दुसरंच दिसत होतं. लाईट अजून यायचं नाव घेत नव्हती. कंदील वर करून बघते तर तिला तिच्या

माहेर गावातील मन्याकाका दिसले. या काकांनी तिच्या लहानपणी दुकानातील खाऊ, बिस्किट आणि पाववाल्याकडील गोडापाव भरपूर वेळा दिला होता. मन्याकाका हा तिच्या वडिलांचा मित्र आणि कुटुंबीदेखील. तिच्या वडिलांच्या जाण्याने त्यांच्या घरात मदतीचा हात त्याचा खूप वेळा लागला होता. मन्याकाकाला ती आज जवळजवळ सातआठ महिन्यांनी पाहत होती. थोडी दाढी वाढलेली, समोरचा एक दात कधीच गळून पडला होता. एकदा नांगरणी करताना चिखलात अडकून नांगरावर त्याचे तोंड आदळले होते. म्हणतात ना की आपल्या गावातला कुत्रादेखील परगावात जर दिसला तरी हायसं (बरं) वाटतं. मन्याकाकाला बघताच तिला जणू रडूच आलं आणि तिने त्याच्या ओल्या कपड्यातच त्याला घट्ट मिठी मारली आणि त्याच्या खांद्यावर रडू लागली.

त्याने तिच्या डोक्यावरून हात फिरवत तो आत आला आणि तिचे अश्रू पुसत बोलला "पोरी सगळं बरं आहे ना." ती पदराने डोळे पुसत हसत बोलली, "मला आज जाम बरं वाटलं तुम्हाला बघून, म्हणून हे अश्रू अनावर झाले." इतक्यात तिचे पती आणि सासरेदेखील आले. सासऱ्याने मन्याकाकाचा पाहूणचार केला. तो तिला बोलून निघू लागला. त्याला दाराकडे सोडायला येत तिने त्याच्या हातात दोन गावठी अंडी बांधून दिली. घरीच बाळगलेल्या कोंबडीची आहेत म्हणत त्याच्या पिशवीत ठेवली. मन्याकाका नजरेआड होईपर्यंत ती त्याला बघत राहिली आणि पुन्हा जुन्या विचारात बुडून गेली. हळूच आपला पदर डोळ्यावरून फिरवत घरामध्ये आली. पावसाने पुन्हा जोर पकडला होता. पावसाचे पाणी हे डोळ्यावाटे येणाऱ्या अश्रूपुढे काहीच नव्हते. मनातील वादळ आणि डोळ्यातील पाणी हे फक्त त्या पदरालाच माहित.

# कविता /

# चारोळ्या /

# कलाकुसर

# मोठ्ठं मोठ्ठं

मोठ्ठा टीव्ही
मोठ्ठा फ्रीज
मोठ्ठी हवेली
पार्किंगसाठी
मोठ्ठी जागा
बाग मोठ्ठी
उमललेली फुले मोठ्ठी
मोबाईलची स्क्रीन मोठ्ठी
सिगारला लावलेल्या
माचीसची काडी मोठ्ठी
मोठ्ठा ओवन
मोठ्ठा जाळ
मोठ्ठी ढूंगणं
मोठ्ठा धूर
जंगलातल सावज
केलेलं पारध
भिंतीवर टांगलेली कातडी मोठ्ठी
बॅंक बॅलेन्स मोठ्ठा
प्रॉफिट धंदा मोठ्ठा
पार्ट्या बारसं लग्न
जेवणावळी
उष्टं खरकटी मोठ्ठी
मोठे नाव
दरवाजावर पाटी मोठ्ठी
उठबस मोठ्ठी
घालमेल मोठ्ठी
घरातला कचरा
व पसारा मोठ्ठा
भल्या सकाळी
दरवाजावर
आलेली असते
म्युनिसिपालिटीची
शवपेटी
मोठ्ठी

■ **वर्जेश सोलंकी, आगाशी**

# सीसीटीव्हीप्रुफ मिथक मांजर

सीसीटीव्हीप्रुफ मिथक मांजर
आणि आमच्या
तर्जनी लाम्बतायेत
किलोकिलोमीटरने

डोळे फोकसतायेत
नसल्या गोष्टींवर असल्या विश्वासाने

जीभा शटरतायेत
बेलगाम वेगाने

विद्वानतोयत आम्ही
अभ्यासचिंतनाविना

मेंदू विरजणतोय
अजेंडा नि अफवांनी

शुल्लक स्वार्थ राक्षसवतोय आम्हाला
पण
आरसे सारे प्रशिक्षवलेत आम्ही
जे दाखवतात फक्त हिरो
जबाबदारी सदृश्य शब्द कोशात मारून
परिधान झगमग रेशीम सदरा बेझीजक

कान कधीच डस्टबीनवलेत
निरागस मुलांच्या तर्कशुध्द कचरा प्रश्नांसाठी
वर्तमानासक्त भविष्यांध आहोत आम्ही सीसीटीव्हीप्रुफ

■ **महेश लिलापंडित**

‘सीसीटीव्ही' आगामी कविता संग्रहातून

# सीसीटीव्ही

की वाढलेत सीसीटीव्ही
मी स्वसंरक्षणार्थ द्यावी
नियम पाळूनिया सूची
नि टाळुनिया तर्कसंगती
जीव घेणारी गोळी होती
ती नव्हती कुठल्या धर्माची
रिपू धर्म नियमावली विसरावी
इज इट ओके सीसीटीव्ही

ती झाडली कोणी
ती कवण आयडियॉलॉजि
ती कवण धर्माची

इन्क्वायरी केली कुणी
ती सारा त्वरित बाजूला जी
ती बाधा नरेटिव्हसाठीची

मी आहे मग कटिबद्ध
तुझ्या विरुद्ध
ठोकुनी शड्डु

णीजिची नि चीजिणीची
इथे झाली
चिंधी चिंधी

मला फक्त द्यायच्या होत्या शिव्या
पेट्रोल पंपच्या नोझलला
पेट्रोल पंपच्या नळीला

पेट्रोल पंपच्या मुलाला
पेट्रोल पंपच्या मशीनला
ड्राईवहारला
ट्रकला
ट्रकच्या चाकांना
इस्पितळाला
स्ट्रेचर बेड टेबल स्टाफला
बाजारमंडईला
शेतकऱ्यांना
त्यांच्या बैलांना
किंमतवाढीसाठी
तुमच्या तर्कानुसार
णीजिची नि चीजिणीची
इथे झाली
चिंधी चिंधी
णीजिची नि चीजिणीची
इथे झाली
चिंधी चिंधी

■ **महेश लिलापंडित**

सीसीटीव्ही' आगामी कविता संग्रहातून !

# मायेची दौलत..

जमीन जुमला घर दार
वाटणी सगळी पार पडली
सगळेच एकदम खुश होते
वाद ठिणगी नाही पडली

तीन बांधव अन् एक बहिण
सगळेच आज एकत्र भेटले
आपापसातच हिस्से सगळे
समसमान वाटून घेतले

एका ठिकाणी जरा मात्र
गाडी थोडी अडकून पडली
आई बाबांचं काय करायचं
चिंता सगळ्यांचीच वाढली

धाकट्याला दोघं झेपत नव्हती
मधल्याची कामंच संपत नव्हती
लेकीचा तर ह्याच्याशी संबंध नव्हता
थोरला लवकरच बाहेर जाणार होता

आईसाठी मग वेगळा हिस्सा काढला
आईला घ्यायला धाकटा लगेच धावला
बाबांच्या हिश्श्याची काढली चार शेते
लेक म्हणाली मीच बाबांना घरी नेते

थोरला मग जरा कोपऱ्यात गेला

म्हातारा म्हातारीच्या जवळ बसला
आई, तुला ही वाटणी पसंत आहे का?
अजून काही वाटायचं राहिलंय का?

ओल्या डोळ्यांनी तिने त्याच्याकडे बघितलं
अन् जड आवाजात त्याला सांगितलं
राजा, सगळीच हिस्से वाटणी तुम्ही केली
एक दौलत मात्र आमच्यापाशीच राहिली

सगळ्यांनीच आपले कान टवकारले
आईकडे अजून काय बरं बाकी राहिले?
अजून काहीतरी वाट्याला यायचं आहे
जे असेल ते सगळंच मिळवायचं आहे

लेकरांनो, तुम्हाला लहानाचं मोठं केलं
तुमच्याकडे कधी काही मागितलं नाही
आमच्याजवळ बाकी काय दौलत आहे
हे पण कधी तुम्हाला सांगितलं नाही

आमच्या मनात कधी तरी इच्छा व्हायची
ही सगळी दौलत तुमच्यात वाटून द्यायची
थोरला कमावतोय त्याला थोडी कमी

दुबळा आहे धाकटा, त्याला थोडी जास्त
मधल्याचा पण काढायचा तसाच वाटा

लेकीसाठी ठेवू या हिस्सा जरा मोठा

पण आम्ही तसं कधीच केलं नाही
कुणाला कमी अधिक कधी दिलं नाही
तुमच्यावर लेकरांनो माया करताना
व्यवहार कधीच आम्ही केला नाही
मायेची वाटणी आम्ही कधी केली नाही
एकाला कमी, एकाला जास्त दिली नाही

राजा, तुमचा मात्र व्यवहारच खूप वेगळा
मला किती मिळेल हाच हिशोब सगळा
आम्हां दोघांमध्ये सुद्धा तुम्ही व्यवहार केला
आमचा सुद्धा एकेक तुकडा अलग केला

राजा, सगळीच वाटणी आता पार पडलीय
आमची माया मात्र तशीच राहिलीय
बघ, तुमच्या व्यवहारामध्ये काही जमेल का
मायेची आमच्या वाटणी करता येईल का...

**■ ॲलेक्स मच्याडो, नंदाखाल**

# आकडे !

आकडे करतात पायपीट
एका राज्यातून दुसर्या राज्याकडे
अथक, अविरत
भूक नावाचा विषाणू मारण्यासाठी !

आकडे ताटकळतात रांगेत
घामाने कमवलेल्या नोटा बदलण्यासाठी
अडखळत, डळमळत,
पुन्हा घाम गाळत !

आकडे अडकतात टाळेबंदीत
कधी अर्धपोटी, अनेकदा उपाशी
मरतात शिळ्या भाकरीसाठी कुठेतरी ट्रॅकवर
घराकडे परताना, घरी न परतता !

आकडे नाडले जातात सरकारकडून
कधी व्यवस्थेकडून, अनेकदा निसर्गाकडून
आकड्यांची होते खुलेआम हत्या
अन बातम्यांत येते आत्महत्या !

वंचित थकतात, गरीब रडतात
श्रमिक भिजतात, शोषित सडतात
जिवंतपणी हे आकड्यांत मोजले जातात
अन मेल्यावरही आकड्यांत उरतात !

**■ सचिन मेंडिस, बोळींज**

# सांगा कसं जायचं ?

जायचं तर आहेच हो प्रत्येकाला
आपण सांगा कसं जायचं ?
अंगदान करून हसत हसत
की चटके खात रडत रडत,
तुम्हीच ठरवा !

मरण सांगा चुकलंय कोणाला ?
दहन किंवा दफन प्रश्नच कशाला
नवजीवन देऊन आठ जणांना
देणार आनंद साऱ्या जगाला
वाचवण्याचा आनंद घ्यायचा,
की गेल्याचं दु:ख जपायचं ?
तुम्हीच ठरवा कसं जायचं !

काळ्याकुट्ट काळोखात
हाती काहीच लागणार नसतं
तुमच्या तनातलं घेऊन तेज,
जीवन कुणाचं उजळणार असतं
प्रकाश बनून उजळायचं की
काळोखात सडायचं ?
तुम्हीच ठरवा कसं जायचं !

जायचं तर आहेच नां प्रत्येकाला ?

माता-भगिनी कोणाची तरी
कृतज्ञतेने आशीर्वाद देत
आठवण तुमची काढेल नां
दुआ घेत हसायचं की
चटके खाऊन जळायचं
तुम्हीच ठरवा कसं जायचं !

पुरुषोत्तम सरणावर सरला आहे
असं कोणाला म्हणता येतं
पुरुषोत्तम सरूनही उरला आहे
असं सुद्धा म्हणता येतं
सरला आहे म्हणायचं की
उरला आहे म्हणायचं ?
तुम्हीच ठरवा ! काय म्हणायचं ?

जायचं आहेच हो प्रत्येकाला
जातांना आपण देऊनच जायचं
जगून पुन्हा जगत रहायचं
मी ठरवलंय, तुम्हीही ठरवा !
आपण सर्वांनी असंच जायचं ..

■ **पुरुषोत्तम पवार, वसई**
9822049675

# अहं

बाजारात अहं विकायला मी गेले
शेजारी गर्दी पाहून मी बावरले
पेन्शनरचे भाव खाली उतरलेले
वर्कफॉम होमवाल्यांचे भाव वधारलेले||

दोन टक्केवाले उदास बसलेले
बाप जाद्याची कमाईवालेचढलेले
जगाच्या पोशिंद्याचेभाव पडलेले
रोजदारांचे चेहरेच झाले रडवेले||

कार्यकर्त्याने आपले भाव दडवलेले
ऩेते भाव वाढवून तिथे पाहू लागलेले
कारण त्यांनीच कार्यकर्ते घडवलेले
व्यापारी नफा न पाहता अहं विकू लागले
मी निराश मनाने अहं न विकता परतले||

# जगणं

खरंच सांगा आपण
जगतो किती स्व:तासाठी
धडपड सतत करतो
लागलंय कुणी तरी पाठी!!

सकाळ कुटुंबासाठी असते
बिछान्यात त्यांना चिंता नसते
नाश्ता छान जमेल का
खाण्यात ते रमेल का!!

नोकरीत जाणे धडपडीत
काम आटोपतो गडबडीत
अवतार तसाच,कोंबतो घास
वेळेत पोहचणे हाच ध्यास!!

टेबलावरील ढीग उपसतो
बॉस अंगावर खेसकतो
आपण डोळे पुसतो
मनातुन त्यावर रुसतो!!

आपले अस्तित्व विसरतो
खुप तहान लागली,घोट घेतो
भुक मारतो,चुक निस्तार तो
कामाच व्याप विस्तारतो!!

सांजवेळ,पोरांचा खेळ दिसतो
जेवणाचे बेत मनात आखतो
मनातले गोडधोड चाखतो
भाजीच्या पिशविने मात्र वाकतो

चालताना उसासे टाकतो
मध्येच पाय लचकतो
आपण इकडे तिकडे पाहतो
कुणी पाहिलं का?उभे राहतो!!

जखम दुर्लक्षित करतो
घरात पदर खोचतो

जेवणाचा बेत आखतो
कण्हतच भाजी चाखतो!!

रांधा,वाढा उष्टी काढा
पोरांना शाळेत धाडा
म्हातार्यांची सेवा करा
अवगुणाचा वाचती  पाढा!!

निवृत्तीनंतर नातवंड वाढवा
त्यांना निट संस्कारी घडवा
सुनांचीही करा सेवा
पोथी,पुराण कधी रे देवा!!

पगारातुन कर्ज हौस कुठली
घर,लग्न मतीच गुंगली
मुलांचे शिक्षण ठेव संपली
निवृतीनंतर  ठेव आपली!!

आजारपणाची वेळ आली
मिळकत त्यातच संपली
हौस,मौज आता कसली
जगणे स्वत:साठीच विसरली!!

**■ शकुंतला नारायण पाटील, नवाळे, निर्मळ**

# हुंड्याच्या विळख्यातून

पोरीस जन्म दिला अभिमानाने
शिकून शहाणे केले स्वाभिमानाने,

स्वावलंबाने उभे केले
मायबापांची ढाल बनले,

सासरला धाडण्यास झाली शोधाशोध
श्रीमंतांनी केला अपेक्षांचा ओकाओक,

मागितले सोने,नाणे ,पैसा अडका
बदल्यात देऊ आनंदी तडका,

बापाने ठरवले भूमिहीन होण्याचे
लेकीच्या सुखासाठी वाकण्याचे,

साध्या बापाची नसेल का कुणास कीव?

परंतु लेकीचा मात्र बापात जीव,
म्हणूनच म्हणाली, आसुरी माणसांस मी नाही भीत,
नाहीच घालणार यांस भीक ,
असेल माणुसकी तिथेच जाईन
 समाजास घालीन नवीन कित्ता
पळवून लावीन दृष्ट भित्ता,

हुंडा देणार नाही, घेणारेही नाही

-- **ब्रिनल कुडेल, गास**
९०९६९८१६३२

# चारोळया

सूर्याकडे नजर देऊन होतो
अगदी ठरवलेच होते.
त्या तेजोमय काळोखात
आंधळे व्हायचे होते.

माझा अहम् मध्येच,
कधीतरी उगवत राहतो.
मग सागर किनारी जाऊन मी
मावळतीचा सूर्य डुंबताना बघत राहतो.

मध्यान्हीचा सूर्य,
डोक्यावर येऊन बसतो.
मावळतीचा मात्र
पायाशी येऊन गुडूप होतो.

माझ्या समोर त्याने,
सृष्टीला प्रकाश दिला.
माझ्या समोरचं हे जग
अंधारात बुडवून गेला.

तुझ्या तेजाने मी,
भांबावून जातो.
मग एखाद्या पणतीचा,
आपला वाटू लागतो.

**आयवन क्रास्टो, उमराळा,**
**९९८७७८७०५६**

# स्वप्नफुले

एक स्वप्नफुले विकणारा फुलमाळी
आज मला भेटला
बऱ्याच देश- प्रदेशाच्या प्रवासानंतर
तो आज आमच्या नगरात आला होता
आणि तरीही त्याची करंडी
स्वप्नफुलांनी गच्च भरलेली होती
रुपेरी-सोनेरी स्वप्ने लाटण्यासाठी
सर्वांची एकच झुंबड उडाली होती

काहींना तो स्वतःहून आग्रहाने देत होता
काहींचे हात मात्र मागूनही
रिकामेच होते

मला हवं होतं
एक गुलाबी स्वप्नं
पण त्या गुलाबी स्वप्नांच्या वाटा
काटेरी स्वप्नांनी अडवल्या होत्या
क्षणभर त्या काटेरी स्वप्नांचा
मला राग आला
वाटले, त्या करंडीतून
त्यांना भिरकावून द्यावे दूर-दूर

अखेर त्या स्वप्नांनी
दिलंय केवळ दुःखच !
हवीतच कशाला ती स्वप्ने?

मी हट्टाने त्या काटेरी स्वप्नांना
हात घालणार तोच
तो फुलमाळी मला म्हणाला,
"बाळा, असा वेडा
अट्टाहास का करतोस?...
अरे आहेत अजुनी काटेरी स्वप्ने
कवटाळीत जगणारी मने
ती मने देतील दुषणे
तुला आणि मलाही

दुसऱ्यांच्या भाग्यातील ही
काटेरी वा सोनेरी स्वप्नफुले
तोडण्याचा... तुडविण्याचा... अधिकार
तुला नाही ना मलाही

ती तेथेच शोभतात
त्या स्वप्नफुलांना तिथेच
उमलू दे...
त्या स्वप्नफुलांना तिथेच
फुलू दे...!

■ **जिम (फिलीप) रॉड्रिग्ज, बोळींज**

# येशू बाळ जन्मला

येशू बाळ जन्मला, अनाथांचा नाथ जन्मला
मरिया योसेफाचा महान बाळ जन्मला
गुरागोठी जन्मला, असुनी राजांचा राजा
बेथलेम नगरी तारणारा जन्मला, जन्मला
गुरागोठी नाही खिडक्या, नाही दरवाजा
गव्हाणीत निजला लाडका बाळ ख्रिस्त राजा
मेंढपाळांना पूर्वेस शुभ्र तारा दिसला
सोडूनी मेंढरे निघाले भेटण्यास येशू बाळा
येशू जन्माची शुभवार्ता कळली हेरोद राजा
घाबरला, भ्याला बाळ येशू राजाला
जाईल मानसन्मान, धनसंपत्ती, सत्ता
बोलावूनी राजसभा, वटहुकूम काढला
दोन वर्षाखालील ठार मारा लहान बाळांना
देवदूताने दिला संदेश मरीया योसेफाला
सोडा ही नगरी, जा घाईघाईने ईजिप्त देशा
पापी लोकांना मुक्त करण्यास धरती आला
कष्टी, भाराक्रांत जनांस विसावा देण्यास आला
जगी सज्जनांना शांती देणारा जन्मला
दिन, गरीब जनांचा कैवारी जगती आला
ज्ञानी राजांनी केला मुजरा येशु बाळ राजाला
सोने, गंधरस, उद अर्पिले महान राजाला
सर्व मिळूनी नमन, वंदन करूया येशू बाळाला
येशु बाळ जन्मला, तारणारा राजा जन्मला

■ फ्रान्सिस अंतोन गावढ्या, अर्नाळा

# श्रद्धांजली

स्वीकारावी बाळा फुले आसवांची
लेकरू तू माझे, तुला अर्पिते प्रभूचरणी
अपार दुःख सोसूनीया गेला एकटाच देवाघरी
शोधाया तुज सभोवती भिरभिरे नजर अमूची
तुझ्या स्मृतीचा कस्तुरीसम सुगंध दे तू आम्हाला
प्रभू रे, काय मी देऊ तुजला
जीवनपुष्प सुंदर बाळा वाहिले मी तुजला || १ ||

आदर्श तुझा आमचा नयनी ठेवुनी गेलास तू स्वर्गी
विसरू कशी रे, तुझा सुंदर हसरा चेहरा
तारका होऊनी आकाशातून बघ तू आम्हा सर्वांना
काजवा होऊनी सभोवती घुटमळत राहा माझ्या
प्रेमळ मनाचा, सुमनासम, तेजस्वी हसरा चेहरा
विसरू कशी रे बाळा तुजला, कशी बोलावू माघारी || २ ||

चोवीस वर्षांचा सहवास आम्हाला तुझा घडला
एक दिवसही विसर न आम्हाला तुझा पडला
कशी जीवन कंठू तुजविण मी लाडक्या बाळा
कंठ दाटुनी, डोळे भरुनी, वाट पाहते मी तुझी
कशी शोधू प्रेमरूपी बाळा तुजला, सोडून गेलास का? दूर मला
कुठे गेलास? किती दिवसासाठी? कधी येणार?
विजा संपला? परत येण्या तिकीट मिळेना का तुला? || ३ ||

काबाडकष्ट करूनी घरकुल उभारले आपण बाळा
पण अर्ध्यावरती डाव संपवुनी, सोडून गेला तू आम्हाला
आवडत नव्हते का तुला, आम्हा संगे घरात राहणे आता

केव्हा येशील? परतुनी भेटाया तू मम्मी-डॅडी-ताईला
बाळा जपू तुझे गुण, तुझे गोड बोल
ठेवा आम्हा तुझा आहे अनमोल || ४ ||

सोन्या बाळा तुजला हीच असे मम्मी-डॅडी-ताई
मित्र-मैत्रिणी, नातेवाईक व संपूर्ण कुटुंबाची
अश्रूभरे नयनाची प्रेमळ श्रद्धांजली.

■ **श्रीमती. एलिजाबेथ लॉरेन्स गोन्सालवीस, जुने बरामपुर**

# धरतीचं झुरणं

धरतीचं झुरणं कधी कळेल का रे तुला?
काळा ढग होऊन भिजव ना.रे मला
काळ्या ढेकळांचा मेकओव्हर कर ना जरा
"फेअर" होण्याचा नाद सोड ना जरा
तयार आहे बीज मातीत मरायला
सरणावर त्यांच्या, ये तीर्थ शिंपडायला
धरतीचं झुरणं कधी कळेल का रे तुला?

कुजूनि जाईल त्याचा देह लाजरा
डौलाने वर येईल अंकुर साजिरा
बळीराजा मग हर्षाने नाचेल
मशागतीला सत्वर धावेल
कणसे मग पोटुशी होतील
सर्जाची मेहनत येईल रे फळाला
धरणीचे झुरणं कळेल का रे तुला

पाखरे शिवारभर भिरभिरतील.
गोफणीचा धाक त्याला दाखवतील
बारका बळीराजा वावरात हुंदडायला
त्याचे शिवारप्रेम येईल रे बळाला
धरतीचं झुरणं कळेल का रे तुला?

घामाचे मोती होतील
मोत्यांची पोती भरतील
कष्टाची भाकर भाजतील
पोटाची खळगी भरतील
घामाचे खारवलेपण जाणवेल ना रे तुला
धरतीचं झुरणं कळेल का रे तुला?

■ **आशा (पेट्रेशिया) गोन्सालवीस, बोरिवली (प.)**

# देवा आहेस कुठे रे.

देवा आहेस कुठे रे.
पापभिरू भक्त देवाला विचारतो
देवा,अरे दोन महिने होऊन गेले तू
देवळात,
चर्चमध्ये,मशिदीत एकटाच आहेस?
तुला lonely वाटते का रे.तू आहेस कुठे
रे?
अरे,वत्सा मी देव्हारा सोडून कधीच बाहेर
पडलो रे.
तू घरात बसावे म्हणून मी बाहेर पडलो रे
डॉक्टर,नर्स, ह्यांच्या रूपात आलो रे
कधी कठोर पोलीस झालो रे
नाईलाजास्तव पुढारीही झालो रे
पण तू काही ऐकत नाहीस रे
घरात थोडा काळ थांबत नाहीस रे
essential service  होऊन बाहेर
पडलो.रे
कोरोनाचा विषाणू राक्षस झाला रे
घास घेण्या सैरावैरा  धावत आहे रे
तू घरात कंटाळलास,
पण घर गाठण्यासाठी निघालेले
माझे मजूर गावच्या वेशीवरच टांगले
काही तर गाडीखाली चिरडले,
घराच्या ओढीने पावलं हलकी झाली रे
त्याच्या पायातल्या  वहाणा झालो रे
सोफ्यावर पाय लांबवून लोळणार्या,
तुला, मी कसा दिसणार रे
तू पंचपक्वानं करण्यात मशगुल
त्यांची तर पेटलीच नाही चूल.
कोरोनाची पिल्लावळ वाढत गेली रे
हि निर्मिती माझी नव्हती रे
किड्यामुंग्या वाणी माणसं मरत गेली रे
मानवाच्या नीतीलाच किड लागली रे.
किती मेले,किती वाचले
स्कोर बघण्यात  तू दंग झालास रे
मी मात्र मास्क होऊन वाचवत राहीलो रे
वत्सा,हल्लीहल्ली तू पण काळजी घेतोस
रे
मास्क लावून अर्थव्यवस्था बळकट
करण्या
रांगेत उभा राहतोस रे.
हात सँनीटाईज करतोस रे
नातीगोती दूर ठेवून,"सोशल डिस्टंस"
ठेवण्यात तू माहीर आहेस.
माझ्यासाठी एक काम करशील का?
माणुसकीला काळीमा फासणार्याच्या
ह्रदयालाही सँनीटाईज करशील का?

- **आशा (पेट्रेशिया) गोन्सालवीस, बोरिवली (प.)**

# आभाळा...

आभाळा तु निळा आहेस ना
आभाळा तू काळा आहेस ना
तु तांबुस आहेस की केशरी
आभाळा तु निराकार आहेस ना

आभाळा तू वीज पाडतोस ना
तुच चिंब भिजवतोस ना
तुच उजेडाला प्रसवतोस ना
इंद्र धनुष्य तुलाच अपत्य ना

काळे ढग तुझे मग पांढरे कुणाचे
विमानं कुणाची अन रॉकेटं कुणाची
दिशा कुणाच्या अन नक्षत्रे कुणाची
आभाळा तु फक्त पोकळी आहेस ना

आभाळा तु बाप आहेस ना
आभाळा तु आई आहेस ना
तु अमावसा आहेस की पौर्णिमा
आभाळा तुच देव आहेस ना

तुच स्वर्ग आहेस ना

आभाळा तु निर्जीव आहेस ना

■ **ब्रायन मेंडिस, बोळींज, वसई**

# वसई माझी जान

हिरव्यागार झाडांची, फळाफुलांची,
ऐतिहासिक वारसा असलेली माझी
सुवर्णनगरी

त्या सुवर्णनगरीत प्रेमाचे आणि अस्मितेचे
बंध
नव्या उमेदीने बहरला माझ्या वसई
तालुक्याचा सुगंध

व-म्हणजे वजनदार,
स-म्हणजे समजदार,
ई-म्हणजे ईमानदार

अशी माझ्या वसई तालुक्याची जाण
आहे आम्हा वसई तालुक्याचा सदैव
अभिमान

अथांग पसरलेल्या समुद्राची चादर,
भरधाव वेगाने येणाऱ्या समुद्राच्या लाटा
कडेकपारी दिसती हिरवळ रानांच्या
डोंगरमाथा

कलेच्या विश्वात माझा वसईकर भरभरून
बोले
कलासागरातील विजयश्री पाहुन तयाचे
कोमल दवासारखे पाणावले डोळे

आदरभावाने, प्रेमाने, हर्ष उल्हासाने
बहरली माझ्या सुवर्णनगरीची
कोमल शान
जगाच्या वेशीवर ALL TIME
FAVOURITE राहील वसई माझी जान

# आगरी कोळी समाज

माजे आगरी कोळी समाजाची जगन
स्वारी
माझी आगरी कोळी लोक
स्वभावन लय भारी
सण असुदे का जत्रा; असतन सगळी
एकत्र
येच माझे आगरी कोळी
समाजाचं चांगल चित्र
गावागावन
भली मोठी झाड न त्याची कोमल सावली
असाच आशिर्वाद रेवुदे माझे आगरी
कोळी समाजावर एकविरा माऊली
कलेचे सानिध्यन माझा आगरी कोळी
समाज स्वार
माजे आगरी कोळी
समाजाचा कलेचा झेंडा फडकला सातास
मुद्रापार

■ **जयेश प्रदीप घरत,**
**उमेळमान, वसई**

# कलाकुसर :-

## अमर म्हात्रे :-







AMAR MHATRE


AMAR
MHATRE


AMAR
MHATRE


AMAR
MHATRE

## ऑस्टिन डाबरे :-





## ऑल्विन कोरिया :-












## रॉयल बॅप्तिस्ट रॉड्रिग्ज :-





## ऑल्विन परेरा :-






## चार्ली कोरिया :-





## सेलीना कोरिया :-




